श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

## संप्रदाय सुरतरु भाग २ रा.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. अध्याय १३ वा. | पान. | ओळ. |
| --- | --- | --- |
| गुरुस्तवन १-१७, शिष्यप्रश्न व धर्मलक्षण १८-२३, धर्माचा गहनपणा व सौलभ्य २४-३०, भगवद्भक्तांना धर्मानपेक्षा व दैवादिकप्रतिबंधाभाव ३१-१६१, कर्मज्ञानास भक्तीची आवश्यकता, वासनांचे प्रकार व त्यांना रोधण्याचा उपाय .... | १८ | २२ |
| कर्मार्पणविचार, धर्मलक्षण, हिंसादिधर्मखंडण .... | १८ | २४ |
| मुख्याधिकारीनिर्णय .... | ५८ | २७ |
| ज्ञानानंतर भक्तीची अनुवृत्ति, भागवतधर्मवर्णन .... | ६० | १३ |
| स्वसंप्रदायरीति ३७६-३९६ .... | ७० | २६ |
| **अध्याय १४ वा.** | | |
| गुरुस्तवन १-११, शिष्यप्रश्न १२-१४ वर्णद्वेषनिराकरण १५-८५, भक्तीची मुख्यधर्मता ८६-१०३, हरिहराचे मुख्यउपास्यत्व १०४-२१९ .... | ७२ | |
| **अध्याय १५ वा.** | | |
| गुरुस्तुति १-२, आगमाचें धर्माधर्मनिर्णायकत्व ३-२१, आगमापेक्षां युक्तिश्रेष्ठत्वप्रतिपादक वासिष्ठवचनाचा भाव २२-२५, भागवतधर्माव्यतिरिक्त स्मार्तादिधर्मांचा युगानुरूप ऱ्हास २६-२७, भागवतधर्माचें श्रेष्ठत्व २८-३८ मोक्षधर्माहून त्याचा भेद ३९-४४ भागवतधर्माचें वैदिकत्व व उपादेयत्व ४५-७८, भागवतधर्माचें अक्षयत्व ७९-९१ भागवतधर्मप्रकारवर्णन ९२-११० .... | ८९ | |
| **अध्याय १६ वा.** | | |
| श्रीगुरुस्तवन १-२ श्रोत्यास प्रार्थना ३, शिष्यप्रश्न | | |

विषय. पान. ओळ.

४-८, सर्व अवस्थेंत श्रीहरीची सेव्यता ९-३३, बाह्यचिन्हांचें महत्व ३४-७६ भगवद्भजनप्रकार ७७-९५ श्रीगुरुस मागणी ९६-१०२ .... ९६

अध्याय १७ वा.

श्रीगुरुस्तवन १-२ भगवद्भक्तांस दुःखप्राप्तिशंका व समाधान ३-४१, भक्तींत भगवत्प्रीत्यर्थे उपाधिग्रहण ४२-६०, मानससेवा व बाह्यसेवाविचार ६१-१०५ मार्गांत सद्गुरूची आवश्यकता १०६-११७.... १०३

अध्याय १८ वा.

श्रीगुरुस्तुति १-३ पंचायतनोपासनासाम्येऽपि हरिहरोपास्यत्वोपपादन ४-३५, भक्त्यालंबनवर्णन ३६-५६, हरिहरैक्यत्वोपपादन ५७-७०, हरिहराहून गणेशाची मूर्तित्वे भिन्नता ७१-८३, देवीचें लालनभक्त्यालंबनत्व ८४-१०७, बाह्यपूजेचें सात्विकत्वमंडन, शिवविष्णूची निर्गुणता, नाथमतांत मानभावमताचा अप्रवेश, स्वेष्टनिरूपण १०८-१३३, हरिहरभावनाप्रकार १३४-१५० .... ११०

अध्याय १९ वा.

श्रीगुरुस्तवन १-३, संप्रदायाची आवश्यकता ४-११ भागवतादि सर्व धर्मांचे अनादित्व व युगानुरूप आविर्भावक्रमभिन्नत्व १२-९३, भागवतधर्मांचे नित्यत्व, सर्वदा सेव्यत्व, व विघ्नाभावत्व ९४-१३२ .... १२२

अध्याय २० वा.

श्रीगुरुस्तवन १,२ भागवतधर्मांचे वैदिकत्व ३-७, भागवतपुराणाचें स्वतः प्रमाणत्व ८-१३, भक्तींत वर्णाची सिद्धि १४-२४, निष्कामभक्तीची श्रेष्ठता २५-४०, सद्गुणी सेव्य ४१-६३, कोण्याही भावानें श्रीहरीची सेव्यता ६४-७४, भक्तींत बुद्धिपुरस्सर

| विषय. | पान. | ओळ. |
|---|---|---|
| कर्मत्यागाचा निषेध ७९-८५, कलींत भक्तीचें श्रेष्ठत्व | १३६ | |
| गाम्राचे कर्मसाद्गुण्यनिराकरण ८६-९९, आचार्यांच्या परमखंडनाचें तात्पर्य | १४६ | १ |
| चमत्कार आप्तत्वाला हेतु आहे याचें खंडण | १६४ | २४ |
| परमेश्वराचें आप्तत्व | १६६ | १३ |
| स्वधर्मांत परमेश्वराचें सुखसाध्यत्व | १६७ | २ |
| आप्तव्याख्या १४७ आचार्यांचें आप्तत्व १४८-१६१, दैवप्राप्तसामुग्रीनें निष्काम परमेश्वरभजनोपदेश व अधिकारानुसार तंत्रमार्गाची प्रामाण्यता १६२-२५०, नानाधर्मानुसार धार्मिकांचा वर्णनिर्देश २५१-२७२, सर्वमार्गांत भागवतधर्माचें श्रेष्ठत्व २७३-२८७ पांचरात्राहून भागवतधर्माचें भिन्नत्व २८८, सकामाला पुनरावृत्ति व निष्कामाला मुक्ति २८९-३०८, भागवतधर्मांत सर्वधर्मसमावेशदिशादिग्दर्शन ३०९-३१६ उपास्य ओळखण्याचा उपाय, व उपास्यानुसार भक्त्युपदेश ३१७-३७९ | १६८ | १८ |
| चिन्ह खंडण करण्यांत आचार्यांचा हेतु व कलींतहि हरीहराचें सममाहात्म्य | १८६ | १२ |
| चिन्हांचें सत्वोत्पादनत्व व सात्विकपदार्थविचार | १८८ | ६ |
| श्रुतियुक्त्यनुभवास धरून असल्यामुळें भागवतधर्माची सर्वांस मान्य होण्याची पात्रता ३९६-४०४ | १९० | २३ |
| परधर्मकथन व त्याच्यांत श्रेष्ठाश्रेष्ठविचार | १९१ | २० |
| सर्व धर्मीयांना भागवतधर्मांत येण्यास दिशादर्शन | १९८ | ९ |
| पुराणाना क्षेपक मानणाऱ्याचें खंडण | २०३ | २३ |
| स्वसंप्रदायविशेषरीतिनिरूपण व इतर सदुपदेश | २०६ | ०६ |
| स्त्रियांचे स्वभावतः भोगव्यावृत्तत्व ८०४-८०८, अयत्नसाध्यस्त्रीलक्षण | २३२ | २८ |
| सदुपदेश ८०९-८५०, मानभावादिमतांचा सारांश | २३६ | १३ |

| विषय. | पान. | ओळ. |
|---|---|---|
| ज्ञान्यास दीनांचा पक्ष घेण्याविषयीं उपदेश ८४१-८४६, ईश्वराचें दयालुत्व ८४७-८५०, अभ्युदय-साधन ८५१-८५२ चित्तशुद्धिसाधन ८५३-८५४ सकामकर्मोपास्तिफळ ८५५, निष्काम कर्म व संन्यास-विवेचन आणि स्वेच्छाचारियाची निंदा ८५६-८७२, ईश्वरसर्वज्ञताविवेचन ८७३-८८१ त्रिवर्गव्यवस्था ८८२-८८३, युगीं युगीं संपदापद्धर्म व भागवतधर्माचें सर्वयुगीं समानत्व ८८४-८८९, स्मार्त धर्माहून भागवतधर्माची व्यावृत्ति ९१२ पर्यंत, भागवत धर्मनिरूपण ९१३-९१५, भागवतधर्मावांचून सर्वांस कालभीति व सद्यो भागवतधर्म ९१६-९६७ अध्याय समाप्ति ९६८-९७८ | .... २४३ | ९ |

## उत्तर विहार.

### अध्याय २१ वा.

| | | |
|---|---|---|
| गुरुस्तुति १-४, सर्वांस ईश्वरप्रतीति ५-८, ईश्वराभावखंडण व ईश्वरसिद्धि ९-५९ | .... २५३ | १६ |
| सर्वागमांत ईश्वरसिद्धि | .... २५९ | १२ |
| वेदान्तांत ईश्वरसिद्धि | .... २६१ | १५ |
| सांख्यांत ईश्वरसिद्धि व आचार्योक्ति व्यवस्था | .... २६२ | २८ |
| योग, महापाशुपत, शैव, वैष्णव, पौराणिक, याज्ञिक, जैन, मीमांसिक, नैय्यायिक, चार्वाक, या सर्वांच्या मतांत ईश्वरसिद्धि | .... २६४ | ५ |
| ईश्वराचे ठिकाणीं रागद्वेष मानून दोषनिराकरण | .... २६५ | ९ |
| जैनकृत आक्षेपाचें निराकरण | ... २६९ | १९ |
| ईश्वराच्या सर्वज्ञतेंत त्रिपुटीचा स्वीकार, मनापेक्षां अविद्येचें विशेष सामर्थ्य व स्वप्नजाग्रत्तुल्यता | ... २६६ | १० |
| आचार्यांच्या परमतखंडणाचें रहस्य व आपण आचार्यांच्या ग्रंथांत विरोध दाखविण्याचें कारण | ... २७२ | १६ |
| ईश्वरसर्वज्ञतादिकांवर आक्षेप व खंडण, ईश्वरदया- | | |

| विषय. | पान. | ओळ. |
|---|---|---|
| लुता, सुखदु:खाचें जीव कल्पितत्व ७७-२५८ एकेश्वरवादमंडन २५९-२६४ ईश्वरव्यापकता सिद्धि २६५-२७८ | ... २७२ | २५ |
| अनुमानानें ईश्वरसिद्धि | ... २८७ | १२ |
| ईश्वर सशरीरी मानून तद्व्यापकताखंडण | ... २८८ | ११ |
| ईश्वर कारणवादांत वितंडा | ... २८९ | ९ |
| आत्माभावखंडण | ... २९० | ८ |
| चार्वाकखंडन | ... २९१ | ११ |
| कणाद व गौतम यांचें आप्तत्व | ... २९९ | २९ |
| आत्म्याचे अचिद्त्व निराकरण | ... २९६ | १५ |
| चार्वाकदर्शनाची उपयुक्तता व कर्त्याचें आप्तत्व | ... २९८ | २८ |
| भूतवादी लोकायतमताचा उपन्यास व खंडण | ... ३०० | २६ |
| बौद्धमतोपन्यास व खंडण | ... ३०२ | २८ |
| असताचें कारणत्वखंडण | ... ३०३ | १६ |
| अभावाचें कारणत्वखंडण | ... ३०९ | १३ |
| न्याय व बौद्ध यांचा भेद | ... ३१२ | १८ |
| सर्व वादांत कारकव्यापाराचें वैय्यर्थ्य व अनिर्वचनीयवादांत सार्थकता | ... ३१२ | २५ |
| खंडणखंडखाद्यांतील असत:कारणत्वोपपादनाचा अर्थ व खंडणोद्धाराचें खंडण | ... ३१५ | ९ |
| बौद्धांच्या शून्यवादाचा वेदान्तपर अर्थ | ... ३२१ | १९ |
| क्षणिकविज्ञानवादोपन्यास व खंडण | ... ३२२ | १४ |
| बाह्यास्तित्ववादखंडण | ... ३२७ | १३ |
| जैनमतोपन्यास व खंडण | ... ३३४ | १३ |

## अध्याय २२ वा.

श्रीगुरुस्तुति १-९, शिष्यप्रश्न १०-१५, गुरुलक्षण व चमत्कारी गुरुची निंदा १६-२३, अलिकडील गुरुशिष्यपद्धति २४-२८, गुरुशिष्य मर्यादा २९-३५, गुरुप्रतीति शास्त्रप्रतीति यांची आवश्यकता ३६-४९,

विषय. पान. ओळ.

श्रीगुरुचें जीवत्वनिराकरण ४६-४९, मूर्खगुरूची निंदा ५० गुरुसर्वज्ञत्वखंडण ५१-५४, गुरु करण्याविषयीं विचार ५५-५९, शिष्यअपराध सहन करणाऱ्या गुरूची निंदा ६०-६६, गुरु घरीं चालत आला पाहिजे असें ह्मणणाऱ्याची निंदा ६६-६८, गुरुशिष्यमर्यादा ६९-७०, मातापित्यांपेक्षां गुरूचें श्रेष्ठत्व ७०-७४, गुरुलक्षण ७६, तुस्त्या शाब्दिकाला गुरुत्वानधिकार ७७-७८, तुकाराम वाक्यावरून शिष्य करण्याविषयीं आक्षेप व त्यांचा भाव ७९-१२१, शिष्य करण्याविषयीं तुकाराम महाराजांचे प्रमाण व त्यांचा भाव १२२-१३५ ज्ञानहीन गुरूचा त्याग १३६-१५१, सम्यक् गुरूत्यागियाची निंदा १५५-१५९, उपास्तिगुरूत्यागाविषयीं तंत्रप्रामाण्य १६०-१६६ शिवनारायणोपास्तींत गुरुत्यागाचा निषेध १६७-१७८, अवैष्णवगुरुत्यागविषयक पद्मपुराणवचनाची व्यवस्था १७९-१९१, व्यर्थ गुरुत्यागाची निंदा व गुरुमहिमा १९२-१९७, सामान्यास मोठ्याचें आचरण अनुकरणीय नाहीं १९८-२११ गुरुभेदविषयक पिच्छिलातंत्रांतील वचनावरून गुरुत्यागविषयक रुद्रयामल श्लोकाची व्यवस्था, २१२-२२६ माधूर्यसंप्रदायांत गुरुत्यागाचा निषेध २२७-२३३, शिवकृष्णसमानोपास्ति २३४-२३९, गुरुविरहित मंत्रग्रहणप्रकार व गुरूपासून घेतल्याचें फलाधिक्य २४०-२४४ गुरूवांचून कृष्णमंत्रग्रहणनिषेध २४५, निर्लोभगुरूच्या अभावीं सच्छिष्याकरितां मैत्रविधि २४६-३२०, मुख्यदीक्षाविधीकरितां शिष्यपरीक्षाविधान ३२१-३५२, मुख्यविध्यंतर्गतसंबंधदीक्षाग्रहण ३५३—३६३, जातकर्म, चिन्हधारण, व संप्रदायचिन्हाकरतां

विषय. पान. ओळ.

वैदिकत्यागनिंदा ३६४-३८८ वेदाविरोधी पुराण-तंत्रप्रमाण ३८९-३९७, संबंधानुसार चिन्ह ३९८-४००, नामकर्मसंस्कार ४०१-४८९ नामकर्म-संस्काराची औपपत्तिक व शाब्दसिद्धि ४०८-४६६, मुद्राधारण ४६७-४७२, नामसंस्कारास गरुड पुराण-प्रामाण्य ४७३-४७९, पापियास दीक्षा देण्याचा प्रकार ४८०-४८२, गौणी विधींत हे संस्कार करावेत ४८३-४८५ मंत्रसंस्कार ४८६-६१२, पूर्वदेवताशुद्धिप्रकार ४८७-५१७ जन्मांतरीं उपयोगाला येणारे व न येणारे मंत्र ५१८-५३९, नाम व मंत्रांत भेद ५४०-५५२, सांप्रदायिक मंत्र निर्देश ५५३-६०४, शास्त्रीय मंत्र देण्याची आवश्यकता व पाप्यास व्युत्क्रमनामाधिकार ६०५-६०८, गुरुविश्वास सिद्धीला कारण ६०९-६१२, पूजा संस्कार ६१३-६१४, गुरुगम्य गुप्त ठेवण्याविषयीं उपपत्ति व गुरूचें महत्व ६१५-६६३, ज्ञान्यावांचून इतरांनीं महादीक्षा देऊं नये ६६५, गुरुविश्वासाची आवश्यकता व श्रद्धेचा पराजय कधीं होत नाहीं ६६६-६९६, अर्धविश्वासियाकरितां योग, अविश्वासियाचा त्याग ६०७-७०८, बोधकगुरुविश्वासफल व तद्व्यतिरिक्त गुरुविश्वासफळ ७०९-७१३, सिद्धारिचक्रविचार, मंत्रनिर्माणरीति व पथ्यापथ्य ७१४-७४०, मंत्रनिर्मितीची आवश्यकता ७४१-७४९, गृहस्थास मंत्रनिर्मितीचा अधिकार ७५०, अस्त्रमंत्र ७५१-७५२, मुद्रा ७५३, मानसपूजन ७५४-७५५, पुरश्चरण ७५६-७५७, उन्मत्तशिष्याचा निग्रह ७५८-७६२, मंत्रसिद्धीची आवश्यकता ७६३, स्वविषयक ७६४-७७८, नियानिर्मीतीविषयीं नियम ७७९-७९२.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# संप्रदाय सुरतरु.

## भाग २ रा.

### अध्याय १३ वा.

जय सद्गुरु करुणाघना । मज चातका स्वानंदजीवना । वर्षोनियां कल्याणनिधाना । तृप्त करीं ॥ १ ॥ तूं वळलिया दयाराशी । बहुत मिळे बहुतांशीं । कामुक का मराळी यासी । आंनदें सेविती ॥ २ ॥ शांताचिया केदारीं । समाधानाची धान पेरी । तें फळ पावती कुसरी तुवां वळलिया ॥ ३ ॥ तेथ कुकामा तिळिया तीळ । तामसा अळसी पिके प्रबळ । गहूं पिकती रसाळ । सात्विकातें ॥ ४ ॥ एकीं विद्येचे खाकस पेरिले । ते अहंकारअहिफेनासहित उगवले । मग तेणें मदें धाले । तैसेचि ते ॥ ॥ ५ ॥ एकीं कोरडा एरंड । पेरिला कामशास्त्र प्रचंड । तरी श्रमलिया उदंड । नारे ना थोपे ॥ ६ ॥ तुझिया अभयदा-नाचेनि बळें । वेली उगवली गरजफळें । ती शाखा नेऊनि रसाळें । उपादानतुष्टि पावले ॥ ७ ॥ तुजसदृश अश्विनी भरणी । कृत्तिका का रोहिणी । समजोनि केलिया पेरणी । वोफळ झाली कैएकांची ॥ ८ ॥ ह्मणोनि तुम्ही वर्षतां । परी भूमिऐसेंचि पिके तत्वता । यालागीं मियां समर्था । जलचि वर्जिलें ॥ ९ ॥ भूमीचें वर्जोनि जीवन । तुज वाहें तोंड पसरोन । अनादियुगापासून । माझी आर्त पूर्ण नाहीं जाहली ॥ १० ॥ मागें प्रऱ्हादाची पुरविली आर्त । म्हणून मी आल्यें अयोद्ध्येंत । तंव दुर्दैवप्रभंजन सुटोनि तेथ । नेलें अरण्यांत पुढती तुम्हा ॥ ११ ॥ म्हणोनि अवचिता व्रजस्थानीं । तुम्हीं जळद वळलिया मोक्षदानी । मी

तेथ पाहें येवोनि । तंव अक्रूरप्रभंजनीं मथुरे नेलें ॥ १२ ॥ मग पंढरी-वरी वळतां । मी तेथें येऊनि पाहतां । तंव नृपप्रभंजनें तत्वता । आना-गोजींस नेलें हो ॥ १३ ॥ यालागीं अलकावती । कळलें कीं नित्य मेघाची वस्ती । ह्मणोनि येथ धरोनि आर्ती । पातलें अपांपति चातकी मी ॥ १४ ॥ आजी निवळला प्रभंजन । करुणाधारेतें नाहीं खंडण । मुखरोगचि काय मजकारण । जाहला हें कळेना ॥ १५ ॥ तयाचें औषध तुझेंचि नाम । घेऊनि जलपान करीन सप्रेम । आणि तेणेंचि आनंदें उद्धारें परम । ग्रंथु एवढा ॥ १६ ॥ मज चातका तुझें मेघध्यान । तुझाचि नाद ऐकती श्रवण । यस्लागीं सद्दशवाद मुखांतून । ग्रंथरूपें पूर्ण प्रतिध्वनि उमटे ॥ १७ ॥ आतां सावधान श्रोता । शिष्य बद्धांजलि पुसे गुरुनाथा । मागां वर्णवाद सांगितला होता । तेथ अनिर्णय तत्वता ओळ-खिला म्यां ॥ १८ ॥ आतां धर्म ह्मणजे काय । तो कैशारीती होय । कवण कीजेल उपाय । कृपा करोनि मज सांगा ॥ १९ ॥ धर्म आहे सना-तन । परी तयाचें लक्षण कवण । संप्रदायीं ध्यावे कवण कवण । हेंहि संपूर्ण सांगावें ॥ २० ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । हा त्रिकांडोदित धर्म सांगती जन । सद्गुरु ह्मणती सावधान । समाधान श्रवण करीं ॥ २१ ॥ जयानें सत्व उपजे चित्तीं । किंवा जयानें उपजे विरक्ति । किंवा इंद्रियें रोधलिया जाती । तो धर्म चित्तीं ओळखें ॥ २२ ॥ जयाचें फळ ब्रह्मज्ञान । तोचि या धर्म जाण । जो आचरितां नारायण- । चरण-रति उपजे तो धर्मु ॥ २३ ॥ नवल या धर्माची गति । हा ओळखावा कवणे रीती । हें कठीण आहे जीवाप्रति । अल्पज्ञस्थिति ह्मणोनि ॥ २४ ॥ श्रुति स्मृति सदाचार । हे धर्माचे तीन बिढार । श्रुति स्वतंत्र स्मृति श्रुतितंत्र । आणि श्रुतिस्मृतितंत्र सदाचारु ॥ २५ ॥ परी या तिहींचीहि गति । दुर्लभ न कळे आम्हांप्रति । श्रुतींत विकल्प नाना रीति । भाष्य-कार ओढिती अर्थ त्यांचे ॥ २६ ॥ स्मृतिहि असती अनेक । परी तयांची एकवाक्यता देख । अतिदुर्घट सकळिक । घडेचि पैं ॥ २७ ॥ आणि-कहि एक धर्माची रीति । कवणें प्रतिबंधें कवण निवृत्ति । कवणें योगें कवणप्राप्ति । हे न कळे स्थिति अलुमाळ ॥ २८ ॥ यालागीं हाचि निर्णयो बरवा । तो दृष्टान्तेसीं आणिजे अनुभवा । जयातें मायबाप न

होवावा । तेणें स्वचातुरें भरावें उदर ॥ २९ ॥ मायबापाच्या ठायीं । एकाहि पुत्र पावे सोयी । तैसा जैमिनीमतीं ईश्वर नाहीं । तरी धर्म तिहीं विचारावा ॥ ३० ॥ तंव वादी ह्मणे हें अनुचित । भगवान् कर्माविण फळ न दे हें तुम्हा संम्मत । मग तुसुधें ईश्वरावरी चित्त । ठेवोनि काय उपयोगु ॥ ३१ तें सिद्धान्ती ह्मणे हें असो खरें । अन्न मागतां लेकुरें । तरी जें पचेल तेंचि बरें । देत माय ॥ ३२ ॥ परी मातृचरणाची इच्छा करितां । कीं मायेपासूनि दूर न जातां । तरी भुकेतहानेची चिंता माऊलीचि करी ॥ ३३ ॥ तैसें पाहिजे स्वर्गफळ । कीं जया वैकुंठादि लोकीं आवडी प्रबळ । ते कर्माविण प्रबळ । न दे परमेश्वरु ॥ ३४ ॥ परी परमेश्वरचि इच्छितां । तरी कर्मापेक्षा न लगे भगवंता । परमेश्वरचि जाणे तत्वता । कीं मी कर्मफळ नाहीं ह्मणोनि ॥ ३५ ॥ अथवा लेकुराचें रोदन । मातेचिया धांवणिया साधन । तैसें धर्मआदिक संपूर्ण । हरिचिंतन हरिभेटीं ॥ ३६ ॥

" अगा जेव्हां कां भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ति ।
तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं " ॥ ९९ ॥
( ज्ञानेश्वरी, अ०, १२. )

ऐसें तातवचन । ह्मणोनि सिद्धान्त गहन । कीं कर्मपाकापेक्षा न करोन । पावे भगवान् निजभक्ता ॥ ३७ ॥ वादी ह्मणे ऐसें वदतां । तरी यत्नवाद कां प्रशंसितां । सिद्धान्ती ह्मणे विश्वव्यवस्था । तुज अझोनि ज्ञात नाहीं ॥ ३८ ॥ रायाचे जे असती चाकर । तिहीं कार्य केलें पाहिजे नियमानुसार । नातरी कामाहूनि दूर । राय करी तयांतें ॥ ३९ ॥ आणि जे कां चोर होती । शिक्षा राय दे तयांप्रति । परी द्वारीं जे भिकारी येती । कैं कोण त्यांप्रति काम सांगे ॥ ४० ॥ तैसा ईश्वरावरी विश्वास । आणि तोंड पसरती धनिकास । आम्ही यत्न तयास । वारंवार उपदेशिला ॥ ४१ ॥ पादुका घालोनियां पेटीं । आपण सेजा उशिरतांटीं । तरी यत्न तयाची पाठी । सर्वथाहि सोडीना ॥ ४२ ॥ निजलियापाठीं लागे दैव । जागतियापाठीं यत्नस्वभाव । जिहीं आपुला सर्व भाव । परमेश्वरातें समर्पिला ॥ ४३ ॥ स्वामी करील तें जयाचें करणें । स्वामी नेईल तिकडे जाणें । स्वामिकार्य लाभे तरीच जिणें । एरवीं मरण

॥ ४४ ॥ आपण पडला राहे क्षिती । प्राण नेणों कोठें जाती । ठायीं आहे कीं अहंकृति । ठावाचि नसे ॥ ४६ ॥ कीं स्वामी निजले क्षीरसागरीं । वरी पाणियाच्या येतील लहरी । ह्मणोनि चित्ताचीच करी । गवसणी तया ॥ ४६ ॥ जें जें कां कर्माचें फळ । तें स्वामीसाठीं । अंगिकारी सकळ । सेवेमाजी तृप्तीची वेळ । कधींचि नाहीं ॥ ४७ ॥ कालखाचिया रीती । ह्मणें अजूनि मज कां न ये विपत्ति । जेणें आणिकाचरूनि लक्ष श्रीपति । काढोनि मजवरुती ठेवील ॥ ४८ ॥ वात्सल्यें ह्मणे क्षीरसागर । असतां उपमन्यास दिधला समग्र । तया मी मग पाजेन ह्मणोनि राहें ह्मणतां स्थिर । कवण अधिकार ममांगीं ॥ ४९ ॥ माधुर्यें ह्मणे अझोनि । कैं मी हें देखेन नयनीं । कीं स्वयें होवेनि सहस्रफणी । हृदयीं कैवल्यदानी पहुडलेती ॥ ५० ॥ समोर शत्रु उभा खगपति । परी तें मानाचि नाहीं चित्तीं । कीं नित्य मंचक स्वामीप्रति । होईन तैंचि माधुर्यें ॥ ५१ ॥ एवं सेवेची अतृप्तता । एवढी जया भगवच्छरणता । तयासी दैववाद यत्नवाद सांगतां । कवणिया अर्था उपयोगु ॥ ५२ ॥ हरि फळ न दे कर्माविण । परी येथ मागत आहे कवण । कर्मावांचूनि न भेटे आपण । तरी सुखें न भेटो ॥ ५३ ॥ तनु मन हरिनिर्माल्य केलें । आतां स्वीकारिलें कीं त्यागिलें । हें स्वामीचें स्वामी जाणे वहिलें । ऐसेंचि बोलिले तुलसीदास ॥ ५४. ॥

" जो परिहरहि मलिनमन जानी । जो सनमानहि सेवक जानी ।
तौ मेरे शरण रामहिकी पनई । रामसुस्वामि दोख सब जनही " ॥

कां लेकुराचिया फोड आंगीं । ह्मणोनि रडे सर्व प्रसंगीं । परी लीलास्वभावें मध्येंचि उमंगी । स्तनपानहि मागे ॥ ५४ ॥ तैं माय ह्मणे दुःखास आधीं । लावोनियां औषधी । मग स्तनपान करवीन बुद्धि । स्थिर घडीभरी असों दे ॥ परी केवळ स्तनपानार्थेचि रडतां । तरी दुसरें कारण न लावी माता । तेवि कर्माचा बाहणा भगवंता । सकामासाठीं बोलिला ॥ ५७ ॥ एरवीं जे सर्वदा निष्काम । जयांचा भगवत्पदींच प्रेम । तयांचे धर्माधर्म । पुरुषोत्तम अपेक्षीना ॥ ५८ ॥ तंव वादी ह्मणे ही कैसी रीति । ईश्वर होईल पक्षपाती । सिद्धान्ती ह्मणे प्रश्न आणि उत्तर या दोहींप्रती । नाहीं श्रीपतिवीण आधार ॥ ५९ ॥ तुवां जो पक्ष-

पाती निवडिला । तो कोणिया अधिष्ठानीं शोभला । आणि तुवां जो उत्तम निवडिला । तो शोभला कोणिया अधिष्ठानीं ॥ ६० ॥ उत्तमा मध्यमा कनिष्ठा । परमेश्वरुचि प्रतिष्ठा । ह्मणोनि जे जे भाविसी चेष्टा । ते त्या अधिष्ठानानीं मिळे ॥ ६१ ॥ देखें जार जारिणीचिया प्रीति । न्याय अन्याय न देखती । तैसें ईश्वरें करितां भक्ताप्रति । दोष चित्तीं कवण वाटे ॥६२॥ उत्तमपण आणि अधमपण । हें आघवेंचि वृत्तीचें लक्षण । ईश्वर वृत्तीचें अधिष्ठान । तो सदृश असोन अभोक्ता ॥ ६३ ॥ अग्नि लोहाकारें होय । परी लोहींच लागती घाय । तेविं वृत्ति साही न्याय अन्याय । ईश्वर होय अलिप्त ॥ ६४ ॥ ह्मणोनि जारजारिणींची प्रीति । तयाचा आश्रयहि श्रीपति । ह्मणोनि ईश्वराकडे तैसीचि अन्यायी वृत्ति । नेतां श्रीपति न्याय नापेक्षी ॥ ६५ ॥ यालागीं कर्माचें फळ । भक्तासाठीं नापेक्षी घननीळ । येथ प्रमाण आहे सबळ । त्रिपुरारहस्यवचन ॥६६॥

ज्ञात्वा सर्वात्मना तस्य योगक्षेमवहो भवेत् ।
अप्रतीक्ष्य कर्मपाकं नियतिं स्वां विधूय च ॥ ५८ ॥
( त्रिपुरारहस्य, अ०, ७. )

तया सर्वात्मकाचा योगक्षेम । स्वयें चालवी पुरुषोत्तम । न पाळी प्रारब्धाचा नियम । कीं स्वनियति परम अपेक्षिना ॥ ६७ ॥ तंव वादी म्हणे हें कैसें । प्रयत्नें दैवजय होतसे । हें बोलिले विशेषें । बृहद्वासिष्ठीं ॥६८॥

सर्वमेवेहहि सदा संसारे रघुनंदन ।
सम्यक्प्रयुक्तात्सर्वेण पौरुषात्समवाप्यते ॥ ८ ॥
( वासिष्ठ, मु०, प्र०, अ०, ४. )

अतः पुरुषयत्नेन यतितव्यं यथा तथा ।
पुंसां तंत्रेण सद्योगाधेनाश्वद्यतनो जयेत् ॥ ६ ॥
तावत्तावत्प्रयत्नेन यतितव्यं सुपौरुषम् ॥
प्राक्तनं पौरुषं यावदशुभं शाम्यति स्वयम् ॥ २१ ॥
( वासिष्ठ, मु०, प्र०, अ०, ५. )

वसिष्ठ ह्मणती रघुनंदना । जयाचे चित्तीं जे जे कामना । ते ते केलिया उत्तम प्रयत्ना । सर्वहि पावती सर्वत्र ॥ ६९ ॥ आळस सोडूनि प्रयत्न करितां । तरी फळासि आहे स्वाधीनता । जोंवरी प्रारब्धपराजय

सर्वथा । तोंवरी प्रयत्न करावा ॥ ७० ॥ तैं सिद्धान्ती ह्मणे योगवासिष्ठ। आम्हांसहि प्रमाण वरिष्ठ । परी वादी त्वां अवघा ग्रंथ स्पष्ट । वाचिलाचि नाहीं ॥ ७१ ॥ त्वां वाचोनि " मुमुक्षुप्रकरण " । यत्नाविषयीं श्लोक सांगितले प्रमाण । परी " निर्वाणप्रकरणीं " उत्तरार्धी व्याधाख्यान । तेथ असती श्लोक प्रमाण प्रारब्धाविषयीं ॥ ७२ ॥ कोणी एक मुनिवर। व्याधासि ब्रह्म बोधी सुंदर । अद्वैत ब्रह्म व्यापक सर्वत्र । अविद्यामात्र सर्व मिथ्या ॥ ७३ ॥ परी तो व्याध अतिमूर्ख । मनांत संकल्प करी अनेक । ह्मणे अविद्या केवढी आहे सुरेख । पहावया तप करावें ॥७४॥ मुख्य मायेचें लक्षण । माया पहावयाची हौस दारुण । तें पाहोनि मुनि आपण व्याधासि ह्मणे अज्ञ तूं ॥ ७५ ॥ आतां तुज ज्ञान न ह्वया । बहु काळ लागेल करितां उपाया । आधीं तप करोनियां । ब्रह्मवर मिळेल तुज ॥७६॥ मग त्या वरेंकरोन । अतितर मोठें शरीर मिळवून । अविद्या पाहशील शोधोन । परी श्रमशील अनंत ब्रह्मांडें पाहोनि ॥ ७७ ॥ मग कंटाळा येईल तुजप्रति । कीं अविद्या केवढी न सांपडे हातीं । मग प्राणत्याग करिशील निश्चितीं । योगबळें ॥ ७८ ॥ तेव्हां तुझें मोठें शरीर । स्वयें पडेल पृथ्वीवर । तेणें पर्वताचे शिखर । चूर्ण होतील सर्वथा ॥७९॥ तुझिया त्या शरीराप्रति । भक्षूनि टाकेल भगवती । तेव्हां व्याध ह्मणे मुनिप्रति । हें दुःख येईल मजप्रति माझ्याचि इच्छेनें ॥ ८० ॥ तरी याच्या निराकरणाचा उपाय । स्वयें सांगतील गुरुवर्य । तेव्हां मुनि ह्मणे भवितव्य । न टळे सर्वथा प्रयत्नें ॥ ८१ ॥ एकपंचाशदुत्तरशततमसर्गोपासून । पंचपंचाशततमसर्गापर्यंत पहावें वाचोन। कीं व्याधानें आरंभिलें क्रियमाण । परी तेंहि प्रयत्नें न टळे म्हणून मुनि सांगे ॥ ८२ ॥

> अवश्यं भवितव्योऽर्थो न कदाचन केनचित् ।
> विधातुमन्यथा शक्यस्तत्र क्षरति यत्नतः ॥ ५४ ॥
> ( वासिष्ठ, नि०, प्र०, उ०, अ०, १५५. )

होणें असेल पुढें कांहीं । तें यत्नें सर्वथा टळत नाहीं । जैसा वाम हस्त आपुले देहीं । तो सव्य हस्त करितां न ये ॥ ८३ ॥ एवं अभिप्राय क्रियमाण । जैं न टळे यत्नेंकरोन । तैं प्रारब्धजय प्रयत्नेंकरून हें विरोधी कथन झालें कीं ॥ ८४ ॥ तैं शिष्य विनवी श्रीगुरुमूर्ति ।

वादी जाणो वादीची गति । विरोधपरिहार मजप्रति । कृपा करोनि वदोत स्वामी ॥ ८५ ॥ श्रीगुरु म्हणती ऐक वचन । दैव तेंचि द्विविध जाण । एक जन्मांतरभोगद पूर्ण । आन कल्पांतरभोगदायी ॥ ८६ ॥ पहिल्या प्रारब्ध म्हणती । आणि दुसऱ्यास म्हणती नियति । याचा पर्याय रीति । लक्षण ऐकें ॥ ८७ ॥ फलोन्मुख कर्म तें प्रारब्ध जाण । ईश्वरसंकल्प ती नियति पूर्ण । सर्गाआधीं झाला उत्पन्न । सकल जन नियमावया ॥ ८८ ॥ जेंवि नदींत जलचर । आपुलिया वेगें फिरती समग्र । परी नदीवेगेंहि साचार । आलिया पूर वाहवती ॥ ८९ ॥ तैसें आपआपल्या प्रारब्धें करोन । प्राणी वर्तती संपूर्ण । कल्पाद्युत्थनियतिसंज्ञक भगवत्संकल्पें-करोन । प्रवाहापन्न इव भोगिती फळें ॥ ९० ॥ जरी प्राणिकर्मसापेक्षें-करून । सर्गादि भगवत्संकल्प होय उत्पन्न । तथापि समष्टिभावेंकरून । करी उपमर्दन व्यष्टिजीव यत्नाचें ॥ ९१ ॥ यास्तव मुमुक्षुप्रकरणीं जो बोलिला यत्न । तो व्यष्टिदैवपराजयाचें कारण । आणि ‘ निर्वाणप्रकरणीं ’ जें बोलिलें दैव प्रधान । तें नियतिरूप म्हणोनी ॥ ९२ ॥ नियति अनुकूल असतां । तरी पुरुषयत्नें प्रारब्धजय होय तत्त्वतां । नियति प्रतिकूल असतां । तरी प्रारब्धजय न होय ॥ ९३ ॥ तेव्हां वादी म्हणे नियति जिंकावया उपाय कवण । सिद्धान्ती म्हणे भगवत्प्रसादचि एक कारण । वादी म्हणे यास काय प्रमाण । सिद्धान्ती म्हणे ‘ त्रिपुरारहस्य ’ वचन ऐकें ॥ ९४ ॥ ‘ त्रिपुरारहस्य ’ ग्रंथीं । आख्यायिका येणें रीति । कोणी एक हेमचूड नृपति । हेमलेखा पत्नि तया ॥ ९५ ॥ दोघेहि सुंदर विशेष । पत्निप्रेमयुक्त रायाचें मानस । परी पत्नि सर्वदा उदास । भोग भोगितां दिसतसे ॥ ९६ ॥ गंधर्वनगरींची वसती । कीं स्वप्नींची सर्व संपत्ति । तैसे भोग वाटती तिजप्रति । नाहीं चित्तीं आन वार्ता ॥ ९७ ॥ तें पाहोनि नृपती । पत्नीस पुसे एकान्तीं । म्हणे माझा प्रेम एवढा तुजवरुती । असोनि उदास नित्य कां तूं ॥ ९८ ॥ प्रेम असतां परस्पर । तरीच सुखाचा होय संसार । तुजविरुद्ध अणुमात्र । माझें अंतर न जाय ॥ ९९ ॥ तें हेम-लेखा वदे आपण । माझा स्त्रीस्वभाव मूढ ह्मणोन । प्रिय अप्रिय संपूर्ण । कासया म्हणावें न कळे मातें ॥ १०० ॥ राव म्हणे ज्यानें उपजे सुख । तयास प्रिय म्हणती देख । जया पदार्थीं उपजे दुःख । तयासी अप्रिय

म्हणताती ॥ १०१ ॥ तैं ती वदे रायाप्रति । हें मज न कळे यथारीति । जैसें ठसेल माझे चित्तीं तैसें मजप्रति सांगावें ॥ १०२ ॥ शीतकाळीं सुखदायक अग्नि । उष्णकाळीं दुःखदानी । अत्यंत पति प्रिय म्हणती कामिनी । परी रुसतां सपत्नि नावडे तयां ॥ १०३ ॥ म्हणोनि सुखदायक कीं दुःखदायक । वस्तु जगांत नाहीं एक । यालागीं प्रियअप्रियाचा विवेक । संपूर्ण मज सांगावा ॥ १०४ ॥ राव ऐकोनि तियेचें वचन । तटस्थ वर्ते कार्य करोन । हेमलेखा भोगीं उदास पाहून । रायाप्रति बोलत ॥ १०५ ॥ म्हणे स्वामी पूर्वीसारिखा । मजवरी प्रेम नाहीं कां । किंवा प्रकृतिमाजीं निका । अस्वस्थ भावो ॥१०६॥ प्रकृति अस्वस्थ असेल जरी । अवश्य चिकित्सा करावी तरी । राव म्हणे ऐक सुंदरी । नाहीं मम शरीरीं प्रकृतिवैषम्य ॥१०८॥ तूं जें पूर्वी बोललीस ज्ञान । तेणें माझें उजळलें मन । आजवरी भोग भोगिले आन आन । नाहीं समाधान वासनेतें ॥ १०९ ॥ तरी जेणें क्षय पावेल वासना । जेणें समाधान वाटेल मना । ऐसा उपाय अनुगुणा । विदित असेल तो सांगे ॥ ११० ॥ तैं हेमलेखा संतोषोनी । विचार करी आपुले मनीं । म्हणे ईश्वरानुग्रहावांचुनी । अद्वैतवासना न होय ॥ १११ ॥ पतीतें मानलें माझें वचन । यासी ईश्वरानुग्रह कारण । मग म्हणे राया संपूर्ण । भय सांडोनि भजावा हरी ॥ ११२ ॥ जो या अचिंत्य जगाचा कर्ता । तो कृपें सकळां जीवां उद्धरता । तयाचीच करावी आस्था । आन अनस्था करोनी ॥ ११३ ॥

सुप्रसन्नान्समुद्धर्तुं प्रभवत्येव सर्वथा ।
अतस्तं सर्वभावेन शरणीकुरु सर्वदा ॥४३॥

म्हणोनि सर्वभावेंकरून । तूं परमेश्वरा जाईं शरण । कीं फळ न दे परमात्मा कर्मांविण । इत्यादि शंका करूं नको ॥ ११२ ॥

निदर्शनं तेऽभिधास्ये श्रुणु प्रत्ययकारणं ।
मितेश्वरोऽप्यत्र लोके चाकापट्यात्प्रसादितः ॥४४॥
सर्वात्मना योजयति स्वेष्टार्थैः श्रेयसे नरं ।
एष लोकेश्वरो देवः सम्यग्येन प्रसादितः ॥४५॥
तस्मै किंचिदिशेद्ब्रूहि भक्तलोकैकवत्सलः ।
पुरुषाहीश्वरा लोके चानवस्था अवत्सलाः ॥४६॥

निर्दयाश्च कृतघ्नाश्च तस्मात्तत्फलमस्थिरम् ।
परमेशो दयासिंधुः कृतज्ञः सुव्यवस्थितः ॥४७॥
अन्यथाऽनादिसंसारे कुतोऽनिश्चत्वमाप्नुयात् ।
व्यवस्थिता जगद्यात्रा चापि वा स्यात्कथं वद ॥४८॥
अनवस्थस्य राज्यं तु नष्टमालोक्यते यतः ।
तस्मादेष दयासिंधुः सुव्यवस्थश्च कीर्तितः ॥४९॥
तमेव सर्वभावेन भक्त्याशु शरणीकुरु ।
श्रेयसि त्वां नियोजयेत्सत्वं तत्परतां व्रज ॥५०॥

अल्प ऐश्वर्य जयाच्या पदरीं । तयांसीहि निष्कपट करितां चाकरी । आपणासमान लेखिती तरी । मग सर्वेश्वरीं काय शंका ॥ ११३ ॥ हा अनादि संसार व्यवस्थित । यास्तव व्यवस्थापक बुद्धिमंत । तो भक्तवत्सल कृपावंत । उपेक्षील कैसा तुजलागीं ॥ ११४ ॥ म्हणोनि सर्वभावें-करून । तूं सोडोनि मोक्षाचा प्रयत्न । स्वयें भजें नारायण । करुणानिधान जगद्गुरु ॥ ११५ ॥ कां पक्षियाचीं पिलीं । खावयाचें नेणतीं वहिलीं । तरी चारा आणोनि घाली । मायचि तयां ॥ ११६ ॥ तेविं जीवाचें आघवें हित । स्वयें जाणे भगवंत । यालागीं तो तुज यथार्थ । कृपें कळवील सर्व कांहीं ॥ ११७ ॥

उपासनं बहुविधमार्त्यार्थार्थित्वतोऽपि च ।
निर्हेतुकं तु काचित्कं तत्सत्योपासनं भवेत् ॥ ५१ ॥
दृष्टमेतत्सर्वतो वै चार्तेनोपासितः प्रभुः ॥
कदाचिद्दयाविष्ट आर्ति तस्य विमोचयेत् ॥ ५२ ॥
उपेक्षेत कदाचिद्वोपास्तेर्वै तारतम्यतः
एवमेवार्थार्थिनोऽपि मितंचानियतं फलं ॥ ५३ ॥
निर्हेतुकोपासकस्य ज्ञात्वा निर्हेतुतां चिरात् ॥
मितेश्वरोप्यव्यवस्थस्तदधीनो भवत्यलम् ॥ ५४ ॥

सकामनिष्कामभेदेंकरून । द्विविध असे उपासन । त्यांत सकाम उपासन । बहुप्रकार असे ॥ ११८ ॥ एक रोगें पीडिती । मग परमेश्वरातें धांव म्हणती । कोणी आठविती धनार्थी । कोणी पुत्रार्थी पूजिती ॥ ११९ ॥ परी निष्काम जे होती । तयांचीच यथार्थ भक्ति । येविषयीं

दृष्टान्तोक्ति । एक तुजप्रति सांगेन ॥ १२० ॥ मोलानें चाकरी करितां । तरीच चाकर म्हणती तत्वतां । मोल न घेतां चाकरी करितां । तरी उपकारक म्हणती जन ॥ १२१ ॥ निर्हेतुक दास्य करिताक्षणीं । रायाहि तयातें मित्र मानी । मग निष्कामा आपल्यासमान चक्रपाणि । करी येथें नवल कवण ॥ १२२ ॥ समोल चाकरीस दासपण । बलानियुक्त दास्यास बद्धपण । परी जे निष्काम दास्य करिती स्वेच्छेंकरून । ते न होती दास न होती बद्ध ॥ १२३ ॥ शिक्षार्थ जे कारागारीं घातले । ते बळें करोनि बांधले । तयापासून जे कां जाहले । तो दंडचि म्हणिजे कीं ॥ १२४ ॥ जे मोल घेऊनि दास्य करिती चुकतां शिक्षा तयांप्रति । जे निष्काम सेवा संपादिती । स्वामीहि अधीन होय त्यांच्या ॥ १२५ ॥ तैसें निष्काम भगवद्भक्त स्वयेंचि होती भगवंत । स्वेच्छेंकरोनि यथार्थ । दास्य घेती म्हणोनियां ॥ १२६ ॥ निष्काम दास्य वाढे जंव जंव । आपुलेपण वाढे तंव तंव । म्हणोनि निष्काम भक्ता भगवद्भावो । सर्वथा स्वयमेवो उपपन्न ॥ १२७ ॥ परी इतरांचे निष्काम भक्त होती । काळ लागे तयांच्या परीक्षेप्रति परी संकल्प उठतांचि कळे भगवंतीं । हें सांगे पुढती हेमलेखा

> निर्हेतुकत्वज्ञानाथ चिरं स्यादज्ञभावत: ।
> एप सर्वेश्वरो देवो हृदयेशोऽखिलस्य तु ॥ ५५ ॥
> सर्वं जानाति तत्काले फलं दद्याच्च सत्वरं ।
> आर्तमर्थार्थिनं देवस्तदर्थेनाभियोजितुं ॥ ५६ ॥
> स्वनियत्या कर्मपाकं प्रतीक्ष्य फलमादिशेत् ।
> निर्हेतुकोपासकं स्वमनन्यशरणं विभु: ॥ ५७ ॥
> ज्ञात्वा सर्वात्मना तस्य योगक्षेमवहो भवेत् ॥
> अप्रतीक्ष्य कर्मपाकं नियतिं स्वां विधूय च ॥ ५८ ॥

सर्वांतर्यामी परमेश्वर । तो जाणतसे समग्र । सकामासि कर्मपाकानुसार । फलदायी होतसे ॥ १२९ ॥ जैसी असे आपुली नियति । तैसाचि तरी कृपामूर्ति । परी निष्काम भक्ताप्रति । कर्मफळ निश्चितीं न पाहे ॥ १३० ॥ भगवाद्भिन्न जे जे पदार्थ । तेचि कर्मसंपाद्य समस्त । कर्माकर्मातीत भगवंत । निष्काम भक्तार्थ स्वतंत्रु ॥ १३१ ॥ पोहे घेतलियाविण । नाहीं दिधलें सुदामया धन । परी मी शस्त्र न धरीं ही प्रतिज्ञा

भंगोन। धांवे चक्र घेवोनि भीष्मावरी॥ १३२॥ अनन्य भक्ताचा योगक्षेम। मी स्वयेंचि चालवीं पुरुषोत्तम। ऐसें बोलिले मेघःश्याम। गीतेंत नवमाध्यायीं॥ १३३॥

तत्साधनं संप्रसाध्य द्रुतं संयोजयेत्फले।
एतदेव महेशत्वं स्वातन्त्र्यं महतं तु यत्॥ ५९॥

टीकाः— तस्य निष्कामिनो यत्साधनं तद्विघ्नापनयनेन सम्यक् प्रसाध्य। ननु नियतिः सर्वथानुलंघनीयेति चेदाह। एतदेवेति। नियत्यादेरुल्लंघनमेवेत्यर्थः॥ ५९॥

तयाच्या निष्कामोपासनेचें विघ्न। स्वयेंचि वारी नारायण। स्वयेंचि पूर्ण करी साधन। फलदानासवेंचि तें॥ १३४॥ येथ ह्मणती टीकाकार। कीं दैव नियति नाशोनि समग्र। फल द्यावया स्वतंत्र। परमेश्वर हा मूलार्थु॥ १३५॥

प्रारब्धं नियतिर्वापि महेशविमुखे भवेत्।
एतन्मृकुंडुतनयेऽत्यंतमीश्वरतत्परे॥ ६०॥

ह्मणोनि प्रारब्ध आणि नियति। हे भगवद्भक्तिरहिता स्थिति। महामृत्यु मार्कंडेय जिंकिती। परमेश्वरीं मति अर्पोनि॥ १३६॥

सर्वैर्ज्ञातं महेशस्य नियत्यारब्धलंघनम्।
अत्रोपपत्तिं ते वक्ष्ये शृणु प्राणप्रियेहि ताम्॥ ६१॥

टीकाः— नियत्यारब्धयोर्लंघनं। अत्र अनुलंघ्य प्रारब्धनियत्युलंघने उपपत्तिं। युक्तिं॥ ६१॥

यद्यप्यनुलंघनीये प्रारब्धनियती खलु।
तथाप्यपौरुषाणां तत् प्रारब्धमनपोहनम्॥ ६२॥

अपौरुषाणां पुरुषयत्नरहितानां॥ ६२॥

अत एव प्राणयमैः प्रारब्धं परिजीयते।
न तान्दृष्टेपु दुःखेषु प्रारब्धं योजयेत्फलम्॥ ६३॥

कुत एतदितिचेदाह। अत एवेति। प्राणयमैः प्राणायामपरैर्योगिभिः कथमेतज्ज्ञातमिति चेत्प्रत्यक्षेणेत्याह। न तानिति॥ ६३॥

प्रारब्धाहिनिगीर्णास्ते ये पौरुषपराङ्मुखाः।
एवं नियतिसंक्लृप्तं तथैवानुभवान्न तु॥ ६४॥

कुत एवं । पौरुषात्प्रारब्धपराभव इति चेत्तथैव नियतिस्वभावादित्याह । एतदिति । पौरुषेण प्रारब्धापोहनमित्यर्थः । तथैवेति । अनुभवानुरोधेन नियतेः कल्पनियत्वादिति भावः ॥ ६४ ॥

नियतिः स्यादीशशक्तिः संकल्पैकस्वरूपिणी ।

सत्यसंकल्प एवेशोऽनुलंघ्या ह्यत एव सा ॥ ६५ ॥

अत एव संकल्पादेव ॥ ६६ ॥

कुंठिता सापि भवति परमेशपरायणे ।

अकुंठितापि भवति यतः सा तादृशी भवेत् ॥ ६६ ॥

सापि अनुल्लंघ्या नियत्यपि । नन्वनुल्लंघ्यत्वकुंठितत्वामित्युभयं विरुद्धमिति चेदाह ; अकुंठितेति । यतः सा नियतिः तादृशी परमेशपरायणे कुंठितस्वभावैव । अयं भावः प्रारब्धं हि फलोन्मुखं कर्म । तच्च योगिना जीयत इति तथैव तन्नियत्यानियतं परिकल्प्यते । प्रकृतेर्निष्कामोपासकोऽपि कर्मयोगित्वेन योगी भवेदित्यनेनापि तज्जीयते । तथा च प्रारब्धमयोगिन एवानुल्लंघ्यम् । नियतिश्च भगवत्संकल्परूपा । सा सर्वथाऽनुल्लंघ्यस्वभावैव । तथापि भगवत्परायणे सा कुंठिता भवति इतिचेत्तस्याः स्वभाव एवेति ॥६६॥

तस्मात्कुतर्कं संत्यज्य महेशं शरणीकुरु ।

अहेतुकतया स त्वां नियोजयति श्रेयसि ॥ ६७ ॥

भावार्थः— येच विषयीं तुजप्रति । राया सांगतें एक युक्ति । प्रारब्धातें योगी जिंकिती । प्राणायामबळेंकरोनी ॥ १३७ ॥ दैवाहून योगाभ्यास प्रबळ । ऐसें विद्यारण्यहि बोलिले केवळ । तेंहि या श्लोकेंचि केवळ । उपपन्न होय ॥ १३८ ॥ द्वितीयासमासखट्वारूढ । तेथाचि प्रारब्धबीज रूढ । ह्मणोनि नियति अनुकूल दृढ । योगी जिंकिती प्रारब्धा ॥ १३९ ॥ भगवत्संकल्परूप नियति । ह्मणोनि लंघितां न ये कवणाप्रति परि भगवद्भक्ताप्रति । सामर्थ्य न चाले तियेचें ॥ १४० ॥ किंवा कर्मानुरूप प्राणिया फळ । हा भगवत्संकल्पचि केवळ । आणि " न मे भक्तः प्रणश्यति " हा सकळ । भगवत्संकल्पचि ॥ १४१ ॥ ' इदं विश्वं मदधीनं ' । स्वयेंचि ह्मणे नारायण । ' अहं भक्तपराधीनः ' । स्वयेंचि नारायण ह्मणे ॥ १४२ ॥ यास्तव नियति अनुकूल असतां । तरी योगिया दैवनाश ये करितां । आणि नियतिहि भगवद्भक्ता— । पुढें कुंठित स्वस्वभावें

॥ १४३ ॥ अभक्तापुढें अकुंठित हा नियतिस्वभाव यथार्थ । परि भक्तापुढें होणें कुंठित । हाहि नियतिस्वभावचि ॥ १४४ ॥ निःशेष देयावें मरण । हा विषस्वभाव संपूर्ण । परि वाचवावें सर्पदंशापासून । हाहि विषस्वभावचि ॥ १४५ ॥ स्वभावापुढें कांहीं शंका कराया अवकाश नाहीं । परि जडस्वभाव नास्तिक लवलाहीं । मानिती ह्मणूनि निंद्य ते ॥ १४६ ॥ एवं हेसलेखेचें सांगणें । भगवत्प्रसादें दैवनियतीतें । जिंकणें । तंव शंकायुक्त वादी ह्मणे । व्यभिचारी ह्मणणें तुमचें हें ॥ १४७ ॥ ईश्वरप्रसादेंकरून । जरी प्रारब्ध होतें क्षीण । तरी नलरामयुधिष्ठिराकारण । वनीं गमन कां झालें ॥ १४८ ॥ सिद्धान्ती ह्मणे उत्तर । देवाची कां हरिभक्तांची लीला विचित्र । लीलावतारी दशरथकुमर । तो सुरकार्यार्थ वना गेला ॥ १४९ ॥ नलरायाचें आख्यान । विशेष आहे धर्मप्रधान । हरिश्चंद्रें स्वयेंचि केलें राज्यदान । तें हरीनें काय कीजे ॥ १५० ॥ ऐसें बोलिलें भागवतीं । स्वयें कृष्णास ह्मणे कुंति । तुझें लक्ष राहील आह्मावरुती । तरी ते विपत्तिहि सदा असो ॥ १५१ ॥

" विपदः संतु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ।
भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भवदर्शनम् " ॥ २५ ॥

भाग० स्कं०, १ अ०, ८.

भावार्थः— कुंती ह्मणे नारायणा । तुझी भेटी मनमोहना । जेणें होय क्षणाक्षणा । तोचि उपाय आह्मां असो ॥ १५२ ॥ 'नः' ह्मणजे पुत्रासहित मजप्रति । 'शश्वत्' ह्मणजे यावन्मुक्ति । तुझी भेटी होय ह्मणूनि कृपामूर्ति । असो विपत्ति सर्वदा ॥ १५३ ॥ धन्य धन्य भगवद्भक्त । दुःखचि सुख जया वाटत । ह्मणोनि युधिष्ठिराचें वनगमन निश्चित संशयार्थ योग्य नाहीं ॥ १५४ ॥

" न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥१॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेंचि सांगे ॥ २ ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

( तुका० अभं०, १९०. )

हें तुकारामवचन प्रमाण आहे.

किंवा द्विविध सकाम भक्त । जे एक वेळ कामासक्त । कामनेसाठींच भजत । परमेश्वरातें ॥ १५५ ॥ एकासि दोन्ही अपेक्षित असती । कामना आणि श्रीपति । त्यांत पहिल्याचें श्रीपति । कर्मपाक अत्यंत अपेक्षी ॥१५६॥ दुसरिया भक्तास । कर्मपाकेंचि फळ दे विशेष । परि आपणहि तयास । रक्षितु राहे ॥ १५७ ॥ वना गेले पांडव । परि तेथहि रक्षी देवराव । किंवा निष्कामभक्ता विघ्न देव । करितां संकटीं हरि रक्षी ॥ १५८ ॥ म्हणोनि त्यांच्या कथेवरून । युधिष्ठिरादि भक्त सकाम वाटती मूर्खांकारण । किंवा हरीची भक्ति दृढ व्हाया कारण । दुःखियासारिखें जीवन हरिचि करी ॥ १५९ ॥ " यस्यानुग्रहमिच्छामि तस्य सर्वं हराम्यहमिति " । स्वयें बोलिले श्रीपति । किंवा हे भूभारनाशापुरती । लीलाचि देवभक्तांची ॥ १६० ॥ शुकगोपीआदि निष्काम । तयांचा देवचि योगक्षेम । चालवी येथ नाहीं उद्गम । शंकेचा कदा ॥ १६१ ॥ तंव वादी म्हणे कर्मज्ञान । असतां भक्तीचें काय कारण । सिद्धान्ती म्हणे कर्म अपूर्ण । सर्वदाचि राहत ॥ १६२ ॥ वासनाक्षयासाठीं । अवश्य भजावा जगजेठी । तेणेंचि उघडे विज्ञानपेटी । अहैतुक ॥ १६३ ॥ वादी म्हणे वासना किती । तीन आहेत म्हणे सिद्धान्ति । देहवासना पहिली म्हणती । निरूपण ऐक तयाचें ॥ १६४ ॥ आत्मवासना संबंधीवासना । ऐसी द्विविध देहवासना । त्यांत मी मनुष्य ही आत्मवासना । जी नाना अवगुणा अनुकारी ॥ १६५ ॥ आत्मवासनाहि द्विविध । लौकिक आणि शास्त्रीय प्रसिद्ध । मी पीन मी शुक्ल विशद । मी सदा असावें निरोगी ही लौकिकी आत्मवासना ॥ १६६ ॥ परि बहुतर उपाय करितां । रोगमृत्यूपासून देह न ये रक्षितां । म्हणोनि दुःसंपाद्य सर्वार्थी । वासना ही ॥ १६७ ॥ माझा झाला व्रतबंध । मी ब्राह्मण जाहलों शुद्ध । मी क्षत्रिय इत्यादि प्रसिद्ध । शास्त्रीय आत्मवासना ॥ १६८ ॥ तियेतें मातृव्यभिचारशंका बाधक । संबंधवासनाहि द्विविध देख । लौकिक आणि सम्यक् । शास्त्रीय जे ॥ १६९ ॥ गुणसंपादन दोषपरिहरण । लौकिक संबंधीवासनेचे प्रकार दोन । तैलाभ्यंगादि देह सुंदर करण । हे गुणाधान संबंधी लौकिक वासना ॥ १७० ॥ धौति बस्तिका वमन रेचन । इत्यादि उपायीं मलपरिहरण । ते द्वितीय लौकिकी संबंधीवासना जाण । म्हणती मुनी ॥ १७१ ॥ गंगास्नानादिकेंकरून ।

शरीरा इच्छिणें पवित्रपण । ही शास्त्रीय वासना गुणाधान । म्हणती मुनि ॥ १७२ ॥ पापनिवृत्तिनिमित्त । करणें अनेक प्रायश्चित्त । इयेतें म्हणती समस्त । दोषापलयनशास्त्रीयसंबंधवासना ॥ १७३ ॥ आतां हिचें नियमन । ऐक भागवतधर्मानुरोधेंकरून । लौकिक आत्मवासनेचा उपयोग पूर्ण । कीं मी मनुष्य होवोन पशुसम भोग न भोगावे ॥ १७४ ॥ शास्त्रीय जी आत्मवासना । तिनें अंगीं घ्यावा दासपणा । 'देहबुद्ध्या तु दासोऽहं' इया गुणा । धरावें हृदयीं ॥ १७५ ॥ आतां लौकिक संबंध वासनेचा । उपयोगु एवढाचि साचा । जे हरिदास्यार्थ तनूचा शक्त्यर्थ आणि निर्मळ भाव राहो ॥ १७६ ॥ आतां शास्त्रीय संबंधीवासना असती । ती नियमावी येणेरीती । गंगास्नान नामस्मरण संतसेवा निगुती । करूनि श्रीपति मिळवीन मी ॥ १७७ ॥ एवं देहवासना नियमून । शनैः शनैः द्यावी सोडून । परि गंगास्नानादि सात्विकाकारण निष्कामबुद्ध्या सेवितां वासनात्व नोहे ॥ १७८ ॥ कां भगवद्रूपत्वें गंगादिक । सेवितां भक्तीचि होय सुरेख । यालागीं शास्त्रीय वासना सम्यक । स्वशरीरकामनेचि त्याज्य होय ॥ १७९ ॥ एवं नियमावी देहवासना । आतां ऐकें लोकवासना । लोक करितील माझिया स्तवना । तैसें आचरण करीन मी ॥ १८० ॥ हेंचि तियेचें लक्षण । कीं दुःसाध्य अनंत कल्पेंकरून । ईश्वरासहि निंदिती आपण । नास्तिक जरी ॥ १८१ ॥ वैष्णव निंदिती शिवा । आणि शैव निंदिती माधवा । सकळपापनिवर्तक सुंदरस्वभावां । रामकृष्णादि देवांसि दुर्जन निंदिती ॥ १८२ ॥ येथ आमुची कथा कवण । येथ दंतकथा बोलती जन । कीं एकवेळ उमा आणि शिवभगवान । लोकांमाजी विचरत असतां ॥ १८३ ॥ नंदीवरी बैसले पशुपति । पायीं चालिली पार्वती । तैं लोक बोलिले कीं याप्रति । लाज नाहीं सर्वथा ॥ १८४ ॥ आपण बैसला नंदीवरी । पायीं चालविली सुंदरी । यास्तव उतरूनि त्रिपुरारी । नंदीवरी बैसविली उमा ॥ १८५ ॥ चालतां पुढें बोलती लोक । हा कैसा असे बाईलपूजक । स्त्रियेस नंदीवरी बैसवोनि निःशंक । पायीं आपण चालतु ॥ १८६ ॥ तीहि पतीस चालवूनि पायीं । नंदीवरी बैसतां लाज न धरी कांहीं । तेव्हां उमा शिव लवलाहीं । दोघेहि बैसले नंदीवरी ॥ १८७ ॥ तदा पुढें लोक बोलती । कांहीं तरी लाज दोघांप्रति ।

दोघेहि पशूचा प्राण घेती । दया चित्तीं अल्प नाहीं ॥ १८८ ॥ तेव्हां दोघेहि उतरूनी । नंदीस चालविती करीं धरूनी । तंव लोक ह्मणती याज-सारखे कोणी । मूर्ख नाहीं आणिक ॥ १८९ ॥ चालूनि दुखविती स्वचरण । वृषभ पोसला फुकट तरुण । तैं उमाशिव त्रिविध जना हांसोन । उपेक्षा करून वर्तती सुखें ॥१९०॥ येथ प्रमाण आहे स्मृति । तेहि ऐक सावध चित्तीं । कीं लोकवासना सोडूनि निश्चितीं । आत्महितीं रतावें ॥ १९१ ॥

" विद्यते न खलु कश्चिदुपायः सर्वलोकपरितोषकरो यः ।
सर्वथा स्वहितमाचरणीयं किं करिष्यति जनो बहुजल्पः " ॥
( तत्वानुसंधानसार, पान, ३२७. )

अर्थ स्पष्ट. सर्वथा लोक संतोषतील मनीं । ऐसा उपाय नाहीं त्रिभुवनीं । 'संतोषे जनयेत्प्राज्ञः' इत्यादि वचनीं । आत्मसंतोष मात्र दर्शविला ॥ १९२ ॥ विषयसंतोषेंकरून । सर्वथा न घडे लोकरंजन । यास्तव आपुलें आपण । परमार्थी हित कीजे ॥ १९३ ॥ लोकोपमर्दनीं देहवासना पोशी । शास्त्रें लोकाराधन विहित तयासी । नाहीं बोलिलें विरक्तासी । बुद्धिमंतासी सर्वथा ॥ १९४ ॥ जैसें उत्पलाचार्य आर्य असोन । स्पंदप्रदीपिकेंत बौद्धवचनहि घेती प्रमाण । तेवीं मीहि अश्वघोषाचे बुद्धचरित्रांतून । घेतों वचन प्रमाण वादितोषमात्र ॥ १९५ ॥

" क्षणाद्भवन्ति सुहृदो भवन्ति रिपवः क्षणात् ।
तोषस्थाने प्रकुप्यन्ति दुराराधाः पृथग् जनाः ॥
मामेवान्ये प्रशंसन्ति किं विषीदामि निंदितः " ॥
( अश्वघोषकृतबुद्धचरित. )

भावार्थः— घडींत मित्र होतात, घडींत शत्रु होतात, व आपल्याला जेथें संतोष होतो तेथें ते रागावतात. यास्तव लोकाराधन करणें अशक्य आहे. माझे कांहीं निंदा करणारे आहेतच; तर कोणी माझी स्तुति केली तर मी हर्षयुक्त कशाला व्हावें ? व माझे कांहीं स्तुति करणारे आहेत, तरी मग कोणी माझी निंदा केली असतां मी दुःखी कां व्हावें ?

ओव्याः— या लोकवासनेचें नियमन । करावें येणें उपायें करोन । कीं मी संतमनरंजन । सद्भावें करीन सर्वदा ॥ १९६ ॥ निश्चयें संतसेवा

करितां । अपूर्णहि राहतां । करुणा येईल भगवंता । संशयो नाहीं ॥१९७॥ संताहीं पीडितां माझीच कीर्ती । दयालु संत न उपेक्षिती । ऐसा नियम या लोकवासनावृत्ति । भगवंतीं प्रीति वाढवू ॥ १९७ ॥ आतां त्रिविध शास्त्रवासना । पहिली ती पाठवासना । द्वितीय अर्थवासना । तृतीय अनुष्ठानवासना । असाध्य जाणा तीन्हीहि त्या ॥ १९८ ॥ व्याकरण-महाभाष्यारंभीं उत्सर्गोपवाद सांगतां । श्रुति प्रमाण घेतली तत्वतां । तियेचा अभिप्राय कीं इंद्र शतवर्ष शब्द पढतां । नाहीं अंत पावला ॥ १९९ ॥ याविषयीं अद्वैतकौस्तुभांत तैत्तिरीयश्रुति घेऊन तिचा अर्थ केला आहे तो संपूर्ण येथें देतों.

" भरद्वाजोहि त्रिभिरायुभिर्ब्रह्मचर्यमुवास तं ह जीर्णं स्थविरं शयान-मिंद्रमुपव्रज्योवाच । भरद्वाज यत्ते चतुर्थमायुर्दद्यां किमेतेन कुर्या इति । ब्रह्मचर्यमेवैतेन चरेयमिति होवाच त ह त्रीन् गिरिरूपान् विज्ञातानिव दर्श-यांचकार तेषां हैकैकस्मात् मुष्टिना ददे स होवाच भरद्वाजेत्यामंत्र्य ह वेदावागते अनंता वै वेदाः एतद्वा एतैस्त्रिभिरवोचेथाः अथ इतरदनुक्तमेव हीमं विद्धीति पंचसप्तति वार्षिकं स्वाध्यायमधीयानं शयानं भरद्वाजं दृष्ट्वा जतुर्थमायुर्दास्यामीत्युक्तवांस्तच्छ्रुत्वा भरद्वाजोध्ययने मतिं चकार पश्चा-त्तद्दोषदर्शनेन ततो निवार्य तस्मै ब्रह्मविद्यामुपदिदेशेत्युपाख्यानश्रुतेरर्थः " ।

( तत्वानुसंधान अद्वैतकौस्तुभटीका, पान ९७. )

भावार्थः— भरद्वाजमुनि आपल्या आयुष्याचे तीन भाग वेदाध्ययन करीत राहिले. पण ते अतिवृद्ध अशक्त व मरणोन्मुख झाले आहेत, असें पाहून इंद्र त्यांच्या जवळ आला व ह्मणालाः मी जर तुह्मांस आयुष्याचा चवथा भाग दिला तर तुह्मी त्याचा कसा उपयोग कराल ? हें इंद्राचें वचन ऐकून ते पाठव्यसनी ह्मणाले मी पूर्वी प्रमाणेंच वेदाध्ययन करीत राहीन. हें त्यांचें उत्तर ऐकतांच त्यांची ती पाठवासना नाहींशी करण्या-च्या इच्छेनें इंद्रानें त्यास तीन वेद पर्वतरूपानें दाखविले. व त्यांतील एक एक मूठभर पर्वतभाग घेऊन त्यास ह्मटलें, मुने ! तुह्मीं आजपर्यंत या वेदांतील इतका भाग शिकलां आहां; व पर्वतप्राय असा हा वेदभाग तुह्मांस अजून शिकावयाचाच आहे; तेव्हां आयुष्याच्या एका चवथ्या भागानें काय होणार ? वेद अनंत आहेत, त्यांची समाप्ति कधींच होत नाहीं, यास्तव

आतां तुह्मी तत्वज्ञानाची इच्छा करा. इंद्राचें हें भाषण ऐकून भरद्वाजमुनि वेदपठणाविषयीं विरक्त झाले. नंतर इंद्रानें त्यांस ब्रह्मविद्येचा उपदेश केला. या आख्यायिकेवरून पाठव्यसन हानिकर आहे असें ठरतें.

ओव्या:-- एवं अशक्य पाठवासना । ती भगवन्नामस्मरणें नियमोनि जाणा । आतां शास्त्रार्थ जाणावयाची वासना । तीहि दुःसाध्य ॥ २०० ॥ श्रुत्यादींचे नाना जन । अर्थ सांगती भिन्न भिन्न । तयांचें तात्पर्य ब्रह्मचेतन । जाणोनि इतर त्यजावें ॥ २०१ ॥ अज्ञातसत्तासिद्ध भगवंत । यालागीं शास्त्रप्रमाण यथार्थ । हें जाणूनि मग शास्त्रार्थ। व्यसन आघवें टाकावें ॥ २०२ ॥ आतां अनुष्ठानवासना । तीहि असाध्य जाणा कर्म अपूर्ण क्षणक्षणा । राहताचि जाय ॥ २०३ ॥

" नेहाभिक्रमनाशोस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥

( गीता, अध्याय, २. श्लोक, ८. )

भावार्थः– या ठिकाणीं अभिक्रमाचां नाश नाहीं; प्रत्यवाय नाहीं थोडासा देखील धर्म मोठ्या भयाचें निरसन करितो. हें भगवंताचें वचन आहे. परंतु तें निष्काम भागवतधर्माविषयीं आहे. अन्यथा यज्ञशेषघृत हाताला राहून भोजन केल्यामुळें शंभर जन्म श्वान झाला: " यथेंद्रशत्रुः स्वरितोपराधात् " इत्यादि इतिहास व्यर्थ होऊं लागतील. याप्रामाणें ही अनुष्ठानशास्त्रवासना घातक आहे. हिचेंहि भगवंतार्पण कर्म करून नियमन केलें असतां भागवतधर्मदायी होतें. डोळे झांकून भागवतधर्ममार्गानें गेलें असतां स्खलन किंवा पतन नाहीं असें शास्त्र आहे.

" धावन्निमील्य वा नेत्रे नपतेन्नस्खलेदिह " ॥

अर्थ स्पष्ट.

वादी:– कर्मार्पणांतहि कांहीं विचार आहे कीं नाहीं. ?

सिद्धान्तिः– आहे. आणि तो सद्गुरूपासून समजून घ्यावा. व कांहीं येथें संक्षिप्त रीतीनें सांगतों. कर्म दोन प्रकारचें आहे. अदृष्टार्थसंपादक व दृष्टार्थसंपादक शास्त्रीय कर्म अदृष्टार्थसंपादक आहे. आणि लौकिक कर्म दृष्टार्थसंपादक आहे. यज्ञ इत्यादि शास्त्रीय असून भोजन इत्यादि लौकिक समजावें. त्यांतहि ब्रह्मज्ञान होईपर्यंत योग्यायोग्य असे

भेद आहेत. अहिंसागंगास्नानादि योग्य शास्त्रीय कर्म असून, श्येनयागादि अयोग्य शास्त्रीय कर्म आहे. शिष्टाचारासी अविरोध योग्यतेचा अर्थ समजावा. हें योग्य शास्त्रीय प्रथम करून नंतर परमेश्वराला समर्पण करावें; किंवा आधीं परमेश्वरप्रीत्यर्थ संकल्प करून अंतीं समर्पण करावें. वैदिकाविषयीं "ॐतत्सत्" यांतील शब्दाचा विनियोग भगवंतानें सतराव्या अध्यायांत सांगितला असून तातांनीं तो अर्थ स्पष्ट दाखवून दिला आहे, तो पहावा. अयोग्य शास्त्रीय कर्मांचा आरंभच करूं नये. अवचित घडलें असतां भगवन्नामप्रायश्चित्तानें शुद्ध व्हावें. आतां भोजनादिक योग्य लौकिक असून मलविसर्गादिक अयोग्य लौकिक आहे. हें कर्म प्रथम परमेश्वराला अर्पण करून नंतर आपण करावें. ह्मणजे प्रथम देवाला नैवेद्य दाखवून नंतर भोजन करावें. भागवतस्कंध ११, यावर टीका करतानां निर्माल्यग्रहणाविषयीं श्रीधर व एकनाथ या दोघांनीं दोन मतें दाखविलीं आहेत. नाथ ह्मणतातः– भगवन्निवेदित वस्तु घेऊं नयेत. भगवत्प्रसाद देखील अति थोडा घ्यावा. श्रीधर ह्मणतात हा प्रसाद लोभानें घेऊं नये. भक्तीनें घ्यावाच; परंतु श्रीधरांनीं जीं प्रमाणें दिलीं आहेत तीं कलिपर असून, त्या वचनांत "भुंजतां कलौ" असें पद असल्यामुळें कलिभिन्नपर नाथांचें ह्मणणें व कलिपर श्रीधरांचें ह्मणणें लावलें असतां उत्तम व्यवस्था होते; याकरितां हा श्लोक श्रीधरीटीकेसुद्धां लिहितों.

अमानित्वमदंभित्वं कृतस्यापरिकीर्तनम् ।
अपि दीपावलोकं मे नोपयुंज्यान्निवेदितम् ॥ ४० ॥

श्रीधरी टीकाः– कृतस्य धर्मस्यापरिकीर्तनम् स्वयमन्येन वा निवेदितम् न स्वीकुर्यात् । एतच्च साधारणस्थावरविषयम् रागप्राप्तविषयं वा भक्त्या तु ग्राह्यमेव ।

" षड्भिर्मासोपवासैस्तु यत्फलं परिकीर्तितम् ।
विष्णोर्नैवेद्यसिक्थेन पुण्यं तद्भुंजतां कलौ ॥
हृदि रूपं मुखे नाम नैवेद्यमुदरे हरेः ।
पादोदकं च निर्माल्यं मस्तके यस्य सोऽच्युतः ॥

इत्यादिवचनेभ्यः। यद्वा अन्यस्मै निवेदितं मे नोपयुंज्यात् मह्यं न निवेदयेदित्यर्थः

(श्रीमद्भागवतस्कंध, ११. अध्याय, ११. श्लोक, ४०.)

या श्लोकांतील विशेष असा आहे कीं " अन्नमयंहि सौम्य मनः " या श्रुतीप्रमाणें अन्नापासून मन उत्पन्न होत असल्यामुळें भक्तीनें नैवेद्य ग्रहण केला असतां मन शुद्ध होऊन भगवत्प्राप्ति होते. परंतु मंचकादि स्थावर पदार्थ केवळ कामवृद्धिकरच असल्यामुळें, ते परमेश्वरार्पित सर्वथा घेऊं नयेत. आतां अयोग्य जें मलविसर्गादि लौकिक कर्म तें मात्र ईश्वरार्पण करण्याची खटपट कोणी करूं नये. कारण याच ( श्रीमद्भागवत-स्कंध, ११. अध्याय, ११. ) अध्यायांतील पुढील श्लोकांत प्रिय आणि इष्ट पदार्थ ईश्वराला अर्पण करावे ह्मणून सांगितलें आहे.

" यद्यदिष्टतमं लोके यच्चातिप्रियमात्मनः ॥
तत्तन्निवेदयेन्मह्यं तदानंत्याय कल्पते ॥ ४१ ॥

टीका एकनाथीः– " हो कां चंद्रामृत तत्वतां । अवचटें आलें भक्ताचे हाता । तें अवघेंचि अर्पी भगवंता । देहलोभता न सेवी ॥ १ ॥ देहासी यावया अमरता । तेणें लोभें सेवं. अमृता । अमर अमृतपान करितां । मरती सर्वथा सकाळें ॥ २ ॥ नश्वर देहाचिया ममता । भक्त सेवीना अमृता । तेंचि भगवंतासी अर्पितां । अक्षयता अनश्वर ॥ ३ ॥ परिस चिंतामणि न प्रार्थितां । दैवें आलिया भक्ताचे हाता । तो लोभें न ठेवी सर्वथा । अर्पी भगवंता तत्काळ ॥ ४ ॥ लोभें कल्पतरु राखतां । कल्पना वाढे अकल्पिता । तोचि भगवंतीं अर्पितां । निर्विकल्पता स्वयें लाभे ॥ ५ ॥ स्वार्थें चिंतामणि राखितां । अत्यंत हृदयीं वाढवी चिंता तोचि भगवंतीं अर्पितां । निश्चिंतता चित्तासी ॥ ६ ॥ कामधेनु राखतां आपण । अनिवार कामना वाढवी जाण । तेचि करितां कृष्णार्पण । निरपेक्षता पूर्ण अंगीं बाणे ॥ ७ ॥ लोभें स्पर्शमणि राखितां । तो वाढवी धनलोभता । तोचि भगवंतीं अर्पितां । अर्थस्वार्थतानिर्मुक्त ॥८॥ हो कां देशकालऋतुमेळें । उत्तम पदार्थ अथवा फळें । नवधान्यादिकें सकळें । अर्पी भावबळें मजलागीं ॥ ९ ॥ पोटांतूनि आवडतां । प्राप्त झालिया पदार्था । मजचि अर्पिती सर्वथा । लोलिंगता सांडुनी ॥ १० ॥ आपुले हृदयींची आवडी । हरिचरणीं लाविली फुडी । आतां नाना पदार्थांची जे गोडी । ते मजचि रोकडी अर्पिती ॥ ११ ॥ मज अनंताच्या हातीं । आवडी अर्पिलें मद्भक्ती । त्याचीं फळें सांगतां श्रुति । मुक्या

होती सर्वथा ॥ १२ ॥ मी वेदांचा वेदवक्ता । मजहि न बोलवे सर्वथा । त्याचें फळ तें मीचि आतां । जाण तत्वतां उद्धवा ॥ १३ ॥ जीवाहिहूनि वर्तती । माझ्या ठायीं अत्यंत प्रीति । तिये नांव गा माझी भक्ति । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ तत्काळ मज पाविजे जेणें । तें माझे पूजेचीं स्थानें । अतिपवित्र जे कल्याणें । तुजकारणें सांगेन. ॥ १३२७ ॥

याचा अर्थ एकनाथमहाराजांनीं लिहिला आहे तोच लिहितों. मलविसर्ग, मूत्रविसर्ग इत्यादि कोणाला प्रिय नाहींत व इष्टहि नाहींत म्हणून ते अर्पण करणें संभवत नाहीं. या श्लोकांत आणखी असा विशेष आहे कीं, स्त्रीहि सर्वांनां प्रिय असून ईश्वरार्पण करावी कीं नाहीं, असा संशय उपन्यस्त झाला असतां, याविषयीं प्रत्येकानें विचार करावा असें मी ह्मणतों. अत्यंत ब्रह्मचारी आणि एकनिष्ठ पुरुषांनीं स्त्री अर्पण करावी असा विधि आहे. परंतु व्यासानें अष्टादशपुराणें करतानां स्कंधपुराणांतील काशीखंडांत स्वतःची गाढवरूप झाल्याची कथा वर्णन केली आहे. आणि महाभारतांत आपली धीवरकन्येपासून उत्पत्तिहि वर्णन केली आहे. परंतु स्वतः जरी बुडत असलें तरी दुसऱ्याला तसें करूं नये यांत शहाणपणा आहे. यद्यपि—

" परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरं नृणां ।
धर्मे स्वीयमनुष्ठानं कस्यचित्तु महात्मनां " ॥

या श्लोकानें, " परउपदेश कुशल बहुतेरे । जे आचरहि ते नर न घनेरे ॥

चालिती आडवाटा । आणिकां दाविती जे नीटा ॥ १ ॥
न मनी तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गव्हार ॥ २ ॥
वीष सेवुनी वारी मागे । प्राण जातां जेणें संगें ॥ ३ ॥
बुडतां हाक मारी । ठाव नाहीं आणिका पारी ॥ ४ ॥
तुका म्हणे न करीं हिका । गुण घेऊन अवगुण टाका ॥५॥

तुका० २८०६.

इत्यादि वचनानें जरी निषेध होतो तरी दुसऱ्याला बुडविण्यापेक्षां स्वतः बुडत असतानां दुसऱ्याला न बुडविणारा उत्तम मानूंच. तुकाराम महाराज हे शेवटले चरण ह्मणतात. " तुका म्हणे न करी हिका । गुण

घेऊन अवगुण टाका " " हेका " पाठ घेतला असतां आग्रह असा अर्थ करावा. व " हिका " पाठ घेतला असतां चिळस अर्थ करावा. याप्रमाणें थोडा उपोद्घात करून आपली आख्यायिका अशी लिहितों कीं— मणिकर्णिकेला प्रथम भगवदर्पण केल्यावर कात्यायनीमंत्र मला ज्यांनीं प्रथम दिला त्या दामोदरशास्त्री तिवसेकर यांनीं असें करूं नये म्हणून सांगितलें. तें असो. परंतु माझ्या चित्तामध्यें अत्यंत राग व कामासक्ति असल्यामुळें स्वपत्नी निवारण करीत असतांहि पुनरुपभोगास्तव मी पतित झालों आहे. गंगास्नान, नामस्मरणादिकानें तदपि स्वतःला पवित्र मानीत आहे. पुढें तसें आचरण करावयाचें नाहीं असा निश्चय आहे; इतक्या-वरहि हिताहित करण्याविषयीं कृपाळू भगवान् समर्थ आहे. याप्रमाणें माझी आख्यायिका ऐकून स्त्री समर्पण करतानां स्वाधिकाराचा प्रत्येकानें विचार करावा. गद्यरूप मंत्रानें स्त्रीसुद्धां सर्व समर्पण करून पुनः स्त्रीचा उपभोग घेणारा पंथ आर्यावर्तांत प्रचलित आहे. व तोच पंथ गुरूला स्त्री समर्पण करूनहि पुनः स्त्रीचा उपभोग घेणारा आहे याविषयीं विशेष माझ्या अन्य ग्रंथावरून जाणावा. परंतु हा प्रकार मला मान्य नसल्यामुळें मदीय सांप्रदायिकांनीं स्त्रीभगवत्समर्पणाविषयीं विचार करावा. आणि गुरूला तर स्त्री मात्र अर्पण करूंच नये, असा माझा दृढ निर्बंध आहे. कारण जो गुरूला स्त्री अर्पण करितो त्याला मी असें विचारतों कीं, गुरूचे ठिकाणीं तुझी असंबद्ध भगवद्बुद्धि आहे कीं संबद्धी भगव-द्बुद्धि आहे ? प्रथमपक्षीं सर्वभावशरणता व्यभिचार पावते; व द्वितीय-पक्षीं मातृबुद्धि, पितृबुद्धि, पतिबुद्धि किंवा पुत्रबुद्धि या चारच बुद्धि निष्पन्न होतात. पैकीं दोन भावांत तुझ्या स्त्रीचे ठायीं स्नुषाबुद्धिसंभवा-स्तव समर्पण अनुचित होतें. तिसऱ्या बुद्धींत तूं स्वतः स्त्री असल्यामुळें स्त्री अर्पण्याचा अधिकार येत नाहीं. चतुर्थ बुद्धींत मातृत्वास्तव स्त्री सम-र्पणाचा अधिकार येत नाहीं. पंचम स्वामिबुद्धि केली असतांहि गुरूला स्त्री अंगिकारणें उचित नाहीं. म्हणून गुरूला स्त्री समर्पण करूं नये असा मी दृढ निर्बंध करितों. झांशीच्या महाराणीचे सापत्न बंधु चिंतामणराव तांबे यांनीं आर्वीच्या जोधालालच्या स्त्रीदानाविषयींची तिच्या भारोभार द्रव्य दिल्याची गोष्ट मला सांगितली; परंतु ती लौकिक असल्यामुळें व

स्त्रीसंग्रहणविवाहसंस्कारसाध्य असल्यामुळें स्त्रीदान करणें विधेय होत नाहीं. स्वस्त्री देऊन देखील अतिथिसत्कार केल्याच्या पुराणांत ज्या कथा आहेत त्या कलिभिन्नयुगपर समजाव्यात. कलींत माझ्या संप्रदायापुरता तरी मी उत्तम निर्बंध करितों. पुराणकथेमध्यें तरी त्या अतिथींनीं त्या स्त्रीयांचा उपभोग घेतला अशा कथा नाहींत. याविषयीं पुष्कळ पुराणें पाहण्याचें सामर्थ्य नसेल त्यानें स्कंदपुराणांतील ब्रह्मांडखंडांतील 'भद्रायु' आख्यान वाचून पहावें. कीर्तिमालिनीचे दानावरून ब्राह्मणाला स्त्रीदानाचा अधिकार असो. मी शूद्र आहें; म्हणून स्वतःच्या संप्रदायास निर्बंध करण्यास स्वतंत्र आहें. ब्राह्मणाची इच्छा नसल्यास त्यांनीं या संप्रदायग्रंथाचा आश्रय करूं नये. याप्रमाणेंच हिंसापूर्वक जीं दानें आहेत, तींहि भगवंताला किंवा गुरूला अर्पण करूं नयेत; असा मी निर्बंध करतों. कारण घंटाकर्णानें ब्राह्मणाचें मांस कृष्णार्पण केलें असतां त्यांनीं तें ग्रहण केलें नाहीं अशी हरिवंशांत कथा आहे. यद्यपि एका भक्तानें शिवास मांस वाहिलें अशी स्कंदपुराणांत कथा आहे, तथापि त्या भक्ताला मांसावाचून अन्य उत्तम भक्ष्य ठाऊक नव्हतें. केवळ त्याचा परमेश्वराचे ठिकाणीं प्रेम मात्र होता. त्या प्रेमानेंच परमात्मा प्रसन्न झाले. असाच हरिवंशांतील घंटाकर्णोपाख्यानाचाहि आशय आहे. ज्यास शास्त्रविहित निवेद्य पदार्थ माहीत आहेत त्यांनीं बळेंकरून मांसादि पदार्थ निवेदिले असतां भक्ति संभवत नाहीं.

वादीः— मनुस्मृतींत पितृकार्यांत मांस द्यावें असें सांगितलें असून यज्ञाचे ठिकाणीं केलेली हिंसा, हिंसा नव्हे असें सर्व वेदवादी ह्मणतात.

सिद्धान्तीः— याविषयीं अनेक मतें आहेत. तथापि सात्वत श्रुतींत व त्यावरील श्रीधरस्वामीच्या टीकेंत याचा निर्णय केला आहे.

" लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्नहि तत्र चोदना ।
व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥

( श्रीमद्भागवतस्कंध, ११. अध्याय, ५. श्लोक, ११. )

श्रीधरी टीकाः— ननु व्यवायादीनामपि " ऋतौ भार्यामुपेयात् " "हुतशेषं भक्षयेत्" इत्यादिना विहितत्वात्किमेवं निंद्यते अत आह लोक इति ।

व्यवायः स्त्रीसंगः। नित्याः रागत एव नित्यप्राप्ताः जंतोः प्राणिमात्रस्य अतस्तत्र तासु चोदनाविधिर्नास्ति। ननु ऋतावुपेयादित्यादिना विधिर्दर्शितः। सत्यम् नत्वयमपूर्वविधिः। रागतः प्राप्तत्वात्। किन्तु नियमविधिरूपेण रागिणामभ्यनुज्ञामात्रं क्रियते तदाह व्यवस्थितिरिति। तेषु व्यवायादिषु कैः विवाहयज्ञसुराग्रहैः विवाहविषय एव व्यवायः कार्यः यज्ञ एवामिषसेवा "सौत्रामण्यां सुराग्रहान्" गृण्हातीति श्रुतेस्तत्रैव मद्यसेवेति नियमः क्रियते। ननु च नियमपक्षेऽप्यावश्यकत्वान्न निंदायुक्ता अत आह आसु निवृत्तिरिष्टेति अयं भावः नायं नियमविधिरपि नित्यप्राप्तत्वात् अतो निवृत्तिः परिसंख्यैव आसु व्यवायामिषमद्यसे[..]सु निवृत्तिरिष्टा। कथं तर्हि व्यवस्थितिरित्युक्तम् उच्यते न तावत् परिसंख्याविधिना श्रुत्या निवृत्तिरुच्यते तथा सति स्वार्थत्यागः परार्थकल्पना प्राप्तबाधश्चेति दोषत्रयं स्यात्। अतः क्वचित् प्राप्स्यतोऽप्यर्थस्य प्रमाणमनर्थकमित्यपूर्वविधिद्वाराऽन्यनिवृत्तिः फलतो भवति तद्यथा इमामगृभ्णन् रशनामृतस्येत्यश्वाभिधानीमादत्त इत्यत्र रशनालिंगतो गर्दभाश्वाभिधानी रशनाद्वये प्राप्स्यतो मंत्रस्यापूर्वविधिद्वारा परिसंख्योच्यते यथोक्तं तंत्रवार्तिके "अप्राप्तविधिरेवायमतो मंत्रस्य निश्चितः परिसंख्याफलेनोक्तानविशेषः पुनः श्रुते" रिति कचित्तु रागतो नित्यप्राप्तस्याप्राप्तांशपूरणलक्षणस्य नियमफलस्याप्यभावान्नियमविधिद्वारा फलतः परिसंख्या भवति यथा पंच पंच नखा भक्षा इति तथा रागतो नित्यवत्प्राप्तस्य व्यवायादेर्विवाहादिनियमेनाभ्यनुज्ञाद्वारा परिसंख्यैवेति ननु यद्यभ्यनुज्ञामात्रमेतद्भवेत् तर्हि "ऋतुस्नातां तु यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति। घोरायां भ्रूणहत्यायां पच्यते नात्र संशय" इत्यादि दोषश्रवणं न स्यात् नैष दोषः मनसि कामे सत्यपि तस्यामरुच्या द्वेषादिना वा तामनुपगच्छतो दोषश्रवणोपपत्तेरिति सर्वमनवद्यम्॥ ११॥

भावार्थ पूर्वपक्षीः– अहो! ऋतुकाळीं स्त्रीगमन करावें, यज्ञांत हवन करून उरलेल्या मांसाचें भक्षण करावें, इत्यादि विधि असल्यामुळें तुह्मी हिंसादिकांची निंदा कशी करतां?

उत्तरपक्षीः– आह्मी ह्मणतों तें सम्यक् आहे "अज्ञातार्थज्ञापको विधिः" असें मीमांसावचन आहे. "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः" असें पूर्वमीमांसेच्या पहिल्या अध्यायाच्या प्रथम पादाचें दुसरें सूत्र आहे. आणि

त्याचा असा अर्थ आहे कीं, वेदांनीं केलेली प्रेरणा हेंच त्याचें लक्षण असून ज्याचे ठायीं अर्थवत्ता ह्मणजे निरर्थकता नाहीं त्याला धर्म ह्मणावें. भाट्टभाष्यप्रकाशामध्यें असेंच ह्मटलें आहे.

" फलतोऽपि च यत्कर्म नानर्थेनानुबध्यते ।
केवलं प्रीतिहेतुत्वात् तद्धर्म इति कथ्यते ॥

अर्थ स्पष्टः– " वेदप्रतिपाद्यप्रयोजनवदर्थोधर्मः " असें लौगाक्षीभास्कर ह्मणतात परंतु प्रयोजनवत्तेचा ' अर्थ ' शब्दानें निर्वाह होत असल्यामुळें भाट्टभाषाकारांच्या लक्षणांत लाघव आहे. तथापि मध्यम लोकांनां समजण्याकरितां लौगाक्षीभास्करकृत लक्षणहि अनुपादेय नाहीं. भोजनादिकांनां अर्थवत्ता आहे. परंतु वेदप्रतिपाद्यता नाहीं. ह्मणून त्याचे- ठिकाणीं चोदनालक्षणत्व घटत नाहीं. व त्यामुळेंच त्याला धर्म ह्मणतां येत नाहीं.

वादीः– थोडे थांबा. मध्येंच मला थोडी शंका आली ह्मणून तिचें निराकरण केल्यावांचून, मी आपणास पुढें सांगूं देणार नाहीं. भोजन परलोकसंपादक नसल्यामुळें तें काम्यकर्म जरी होत नाहीं, तरी तें न केलें असतांनां प्रत्यवाय सांगितला असल्यामुळें, संध्येप्रमाणें तें नित्यकर्म आहे असें ह्मणतां येतें " दवडोनियां श्वासोच्छ्वास । वायांचि कीजती उपवास ॥ " इत्यादि तुमच्या आचार्यांनीं व्यर्थ उपवासाचा निषेध केला असून, शूद्र तीन रात्रींपेक्षां अधिक उपवास केल्यास पतित होतो, असें धर्मशास्त्रवचन आहे. ह्मणून भोजन हा नित्यधर्म होतो. आणि तसाच स्त्रीसंगहि परलोक देणारा नसल्यामुळें काम्यकर्म न होवो; परंतु नित्यकर्म झालाच पाहिजे. कारण,

" ऋतौ स्नातां तु यो भार्यां सन्निधं नोपगच्छति ।
घोरायां भ्रूणहत्यायां पच्यते नात्र संशयः " ॥ १ ॥

भावार्थः– "ऋतुस्नातस्त्रीसंयोग जो करीत नाहीं त्याला घोर बालहत्येचें पातक लागतें." या वचनानें स्त्रीसंग न करणाऱ्याला प्रत्यवाय सांगितला आहे. त्याचप्रमाणें श्राद्धांत जो मांस देत नाहीं, तो एकवीस

---

१ जाणून.

जन्म पशु होतो असें सांगितलें आहे. याप्रमाणें मद्याविषयीं वचनें शास्त्रांतून धुंडाळून घ्यावींत.

सिद्धान्तिः— मला वाटलेंच होतें कीं, तूं कांहीं तरी अशी खुळी कल्पना काढशील ह्मणून, शूद्राला जो तीन रात्रींहून अधिक रात्रींचा उपवासनिषेध आहे, तो मोठ्या तपाधिकारनिषेधाचें, उपलक्षण आहे. समजलास ? पण देवीपुराणादि ग्रंथांत नवरात्रादिकांत शूद्रांनीं उपवास करावा असें स्पष्ट लिहिलें आहे. मोठ्या तपाविषयीं देखील—

" तपः सर्वगतं तात हीनस्यापि विधीयते ॥ "

असें महाभारतवचनावरून व केदारखंडांतील वेश्यातपेतिहासावरून वैकल्पिक अधिकार सिद्ध होत आहे. ह्मणून तूं दिलेलें वचन वैकल्पिक शूद्रतपनिषेधोपलक्षण आहे. नित्यकर्माविषयीं वैकल्पिक देखील निषेध कोठें प्राप्त होत नाहीं. ह्मणून भोजनास नित्यकर्मत्व आहे असें सिद्ध होत नाहीं. स्त्रीसंगाविषयीं जीं वचनें आहेत तीं अंतःकरणामध्यें काम असून द्वेषादिकांच्या योगानें जो ऋतुकाळीं स्त्रीगमन करीत नाहीं, त्याला प्रत्यवाय सांगत आहेत. ह्मणजे केवळ स्त्रीगमन न केल्यानें दोष होत नाहीं, तर अंतःकरणामध्यें कामना असतांना स्त्रीगमन न करील तर अन्यस्त्रीगमन प्राप्त आहे. स्वतःची स्त्री सोडून देऊन दुसऱ्याच्या स्त्रीशीं बलेंकरून जो गमन करितो, तो त्या निषिद्ध कर्मानें दोषी होतो. याप्रमाणें ऋतुकाळीं स्वस्त्रीगमन न करणें कामी पुरुषाला परंपरादोषजन्यकारक आहे.

" कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥

गीता, अध्याय, ३. श्लोक, ६.

भावार्थः— अशा इंद्रियनिग्रहाचा भगवान्हि निषेध करितात. "य आस्ते मनसा स्मरन्" या पदाचें तात्पर्य असें कीं, एकेंद्रियवैराग्यांत इंद्रियांचा नियम होऊन मनांत विषय येत असतात. त्या एकेंद्रियवैराग्याचा भगवंतानें येथें प्रतिषेध केला आहे काय ? अशी उत्थाप्य शंका करून, नाहीं हें सांगण्याकरितां हें पद घातलें आहे. एकेंद्रियवैराग्यांत जरी मनांत विषय येत असतात, तरी ते येऊं नयेत याविषयीं विरक्त यत्न करीत असतो. आणि जो मूर्ख पुरुष कांहीं कारणामुळें इंद्रियांचा

संयम करीत असतो; तो दंभादिकानें बाह्येंद्रियांचा जरी संयम करीत असला, तरी मनामध्यें विषयासाठीं लाळ घोटीत असून, संधि आली म्हणजे आईबहिणीचा देखील तो विचार करील नाहीं, असा मला कित्येकांचा अनुभवहि आला आहे. अशाला एकेंद्रियविरक्त म्हणतां येत नाहीं. त्याचाच निषेध याठिकाणीं भगवंतांनीं केला आहे. म्हणून स्त्रीसंग नित्यकर्म होऊं शकत नाहीं. संध्या कोणत्याहि वेळीं केली असतां प्रत्यवाय लिहिला नाहीं. एकादशीचे दिवशीं भोजन केलें असतां प्रत्यवाय सांगितला आहे, म्हणूनहि भोजनाला नित्यकर्मत्व येत नाहीं. यद्यपि अशौचामध्यें संध्या केली असतां प्रत्यवाय आहे, तथापि तो अधिकारनिषेधक आहे. म्हणजे अशौचामध्यें संध्येचा अधिकार नाहीं. एकादशीचे दिवशीं न जेवणें हें अधिकारनिषेधक नसून, नित्य भोजनापेक्षां अधिक अधिकारसंपादक आहे. म्हणून भोजन नित्यकर्म होऊं शकत नाहीं. व त्याचप्रमाणें सर्व शुभ कर्मांत स्त्रीसंगाचा निषेध असल्यामुळें तेंहि नित्यकर्म होऊं शकत नाहीं. मनुस्मृतींतील वचन मांस खाण्याविषयीं नियामक आहे. त्याचा विचार या श्लोकानुरोधानें अर्थातच होणार आहे. मद्याविषयीं वचनें आम्ही पहात बसत नाहीं. तुला सांपडलीं नाहींत असें वाटतें— म्हणून त्याविषयीं सर्वत्र निषेध आहे; असें आम्ही म्हणतों बाह्यमार्गांतील तंत्रादिकांना वेदभिन्न प्रामाण्य नसल्यामुळें, या श्लोकाच्या अनुरोधानें जो आम्ही वेदविचार करणार आहों, त्यांतच तांत्रिक विचाराचाहि अंतर्भाव समजावा. तात्पर्य मद्यमांस व स्त्रीसंग यास "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः" या सूत्रानें अवकाश मिळत नाहीं.

वादीः— अहो ! लौगाक्षीभास्करकृत धर्मलक्षणांत तुम्ही अरुचि कां दाखविली ?

सिद्धान्तिः— लौगाक्षीभास्करानें "वेदप्रतिपाद्यप्रयोजनवदर्थो धर्मः" असें म्हटलें आहे. प्रयोजनाचे ठायीं अतिव्याप्ति होऊं नये म्हणून "प्रयोजनवत्" हें पद घातलें असून, अनर्थकता निवारण्याकरितां "अर्थ" पद घातलें आहे. आणि भोजनादिकांचे ठिकाणीं वेदप्रतिपाद्यता नाहीं म्हणून त्यावर अतिव्याप्ति वारण्याकरितां "वेदप्रतिपाद्य" हें पद घातलें आहे. परंतु या लक्षणाच्या ठिकाणीं आमची अरुचि कां

झाली तें सांगतों; श्रवण कर. ब्रह्मज्ञानाचें अखंड दुःखनिवृत्ति व अखंड परमानंदप्राप्ति हें प्रयोजन आहे. म्हणून ब्रह्मज्ञान प्रयोजनवत् आहे. अनर्थक नाहीं म्हणून अर्थस्वरूप आहे. " नावेदविन्मनुते " " तत्तुसमन्वयात् " " वेदैश्च सर्वैरहमेववेद्यः " इत्यादि श्रुतिसूत्रादिकांवरून वेदप्रतिपाद्य आहे. याप्रमाणें लौगाक्षीभास्करकृत तर्कसंग्रहांतील धर्मलक्षणाची ब्रह्मज्ञानाचे ठिकाणीं सर्वथा अतिव्याप्ति होत आहे. यद्यपि अर्धपूर्वमीमांसावादी ब्रह्मज्ञानास धर्मांग समजतात, तथापि मीमांसांतील सूत्रावरून तें सिद्ध होत नसल्यामुळें, ब्रह्मज्ञान धर्म आहे असें म्हणतां येत नाहीं. व म्हणूनच लौगाक्षीभास्करकृत धर्मलक्षण अत्यंत तुच्छ आहे. आणि जैमिनीसूत्रांस अनुसरून नाहीं. कारण " चोदनालक्षण " असें जैमिनीसूत्रांत पद आहे. ' चोदना ' म्हणजे विधि. ब्रह्मज्ञान वेदप्रतिपाद्य आहे पण " चोदनालक्षण " म्हणजे विधिस्वरूप नाहीं. जी गोष्ट कर्त्याच्या स्वाधीन असते त्याला विधि म्हणतात. ब्रह्मज्ञान कर्त्याच्या आधीन नाहीं तर तें केवळ वाक्याच्या आधीन आहे. म्हणजे यज्ञ करावा हें वाक्य उच्चारलें असतां तो करणें न करणें हें कर्त्याच्या इच्छेच्या आधीन आहे. त्याप्रमाणें " तूं ब्रह्म आहेस " हें वाक्य उच्चारलें असतां त्याचा अर्थ स्वेच्छेनें सोडून देणें कर्त्याचे हातीं नाहीं.

वादीः– कां ? द्वैती आदिकरून सर्व लोक या वाक्याचा निषेध करीत नाहींत काय ?

सिद्धान्तिः—करितात, पण तोहि दुसऱ्या प्रमाणानेंच; केवळ इच्छेनें त्याचा निषेध करूं शकत नाहींत. आतां त्यांच्या त्या प्रमाणाला आह्मी खोटें ह्मणतों, तें देखील इच्छेनें ह्मणत नाहीं; तर तें देखील प्रमाणप्राबल्यानेंच ह्मणतों. परंतु विधीची गोष्ट तशी नाहीं. आह्माला फळहि नको, आह्मी यज्ञहि करीत नाहीं असें कोणी ह्मणूं लागला तर विधिवाक्य त्याचें निवारण करूं शकत नाहीं; परंतु मोक्ष नको ह्मटलें तरी ऐकलेल्या ब्रह्मज्ञानाला हृदयांतून कोणाला काढून टाकतां येत नाहीं.

वादीः कां ? अहो ! मूर्खांच्या चित्तांतून, झालेलें ब्रह्मज्ञान देखील निघून जात असतें ना ?

सिद्धान्तीः– अरे ! कर्त्याचे इच्छेनें निघून जात नाहीं; तर उलटें

काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यास अधिक दृढ व्हावयाला लागतें. ह्मणूनच " इयं ज्ञानकला राम सकृज्जाताभिवर्धते " असें वसिष्ठ ह्मणतात. ज्याचें ज्ञान विसरतें, तें देखील भ्रांतीनें सत्य समजलेल्या प्रत्यक्ष प्रमाणाचा ठसा हृदयांत अधिक उमटतो ह्मणून. तात्पर्य ब्रह्मज्ञान धर्मरूप नाहीं. ह्मणूनच " चोदनालक्षणोऽर्थो धर्मः " असेंच जैमिनीनें सुंदर लक्षण केलें आहे. कर्त्याची प्रवृत्ति न समजलेल्या फलाकडे लावणें याचें नांव विधि आहे; व यालाच चोदना ह्मणतात. हा विधि तीन प्रकारचा आहे. अपूर्वविधि नियमविधि आणि परिसंख्याविधि. वाक्यावांचून दुसऱ्या कोणत्याच रीतीनें ज्याची फलाकडे प्रवृत्ति होत नाहीं, तो अपूर्वविधि होय. जसें तांदुळाचें प्रोक्षण करावें, हें त्या वाक्यानेंच सिद्ध आहे. दुसरें कोणत्याहि रीतीनें सिद्ध नाहीं. कारण वेदमंत्रावांचून दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें कोणाला प्रोक्षण करण्याचें प्रयोजन नाहीं. आणि असें करण्याचें कोणाजवळ साधनहि नाहीं. यद्यपि सहज पाणी कोणालाहि शिंपडतां येतें, तथापि यज्ञाकरितां शिंपडलेंच पाहिजे हें त्या वाक्यानेंच सिद्ध आहे, ह्मणून याला अपूर्वविधि ह्मणतात. असा विधि "ऋतुकालीं स्त्रीगमन करावें" इत्यादि वाक्यांत आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण स्त्रीगमन कोणाला ठाऊकच नसतें तर तसें ह्मणतां आलें असतें. परंतु वेदवाक्याचें ज्ञान देखील ज्याला होणें शक्य नाहीं, अशा पशुपक्ष्यांनां देखील स्त्रीगमन ठाऊक आहे ह्मणून " ऋतौ भार्यामुपेयात् " इत्यादि वाक्यांत अपूर्वविधि होत नाहीं.

वादीः— अहो ! स्त्रीसंगाविषयीं ही गोष्ट असो. पण मद्यमांसाची रुचि लागल्यावांचून तर त्याची इच्छा होत नाहीं ? तेव्हां तो अपूर्वविधि नाहीं, असें कसें ह्मणतां ?

सिद्धान्तिः— वेदवाक्य जाणत नसलेल्या व्याघ्रादिकांनां मांस खाणें ठाऊक आहे. व वेदवाक्य जाणत नसलेल्या अज्ञानी लोकांनां मद्य पिणें ठाऊक आहे. याप्रमाणें दृष्टिपरंपरेनें किंवा संगतिपरंपरेनें मद्यमांसाची स्वभावतःच प्रवृत्ति आहे; ह्मणून त्याविषयीं वाक्यजन्यसिद्धता नसल्यामुळें त्याला अपूर्वविधि ह्मणतां येत नाहीं.

शिष्यः— तरमग याला कोणता विधि ह्मणावें ?

श्रीगुरुः— अरे ! हा नियमविधि होऊं शकतो. नियम ह्मणजे दुसऱ्या रीतीनें करितां येत असलेल्या कर्माला एका अमुकच रीतीनें करावें असें सांगणें होय. ज्याप्रमाणें मलविसर्ग घरांतहि करतां येतो, पण तो गांवाच्या बाहेरच करावा असा नियम समजावा. यज्ञाकरितां तांदूळ सोलणें ते नखानें देखील सोलतां येतात. थोडेसे तांदूळ सोलावयाचे असल्यामुळें नखानेंच सोलणें संभवनीय आहे, तें होऊं नये ह्मणून यज्ञाकरितां तांदूळ कांडावे असा नियम केला जातो; त्याप्रमाणें भार्यागमन करावयाचें असल्यास तें ऋतुकाळींच करावें, मांस खावयाचें असल्यास तें हुतशेषच खावें, व मद्य प्यावयाचें असल्यास सौत्रामणि यज्ञांत त्याचा वास मात्र घ्यावा; असा नियम केला आहे. येथपर्यंत श्रीधरस्वामीच्या टीकेचा आशय स्पष्ट करण्याचा आह्मी प्रयत्न केला. येथून पुढें जी स्वामींनीं टीका केली, ती हिंसक पूर्वमीमांसकाला खाद्यरूप असून, विचारी पूर्वमीमांसकाला भूषणरूप आहे. ह्मणून तिचा आशय आतां आह्मीं स्पष्ट करीत आहों.

पूर्वपक्षीः— अहो ! नियम कां होईना परंतु तो पाहिजे आहेना ? कारण यज्ञ करावयाचा असल्यास तांदूळ कांडावेच हें आवश्यक आहे.

वादीः— पूर्वपक्षीचें ह्मणणें अति सम्यक् आहे.

सिद्धान्तिः— आधीं वादीला उत्तर देऊन नंतर उत्तरपक्षी काय ह्मणतो हेंहि सांगतों. वादीचा आशय असा दिसतोः कांडलेल्या तांदुळावांचून ज्याप्रमाणें होम सफळ होत नाहीं त्याप्रमाणें मद्यमांसादिकांवांचून सौत्रामण्यादिक होत नाहींत. पण हा आशय सम्यक् नाहीं. कारण " यद्घ्राणभक्ष्यो विहितः सुरायाः " इत्यादि वचनानें " सौत्रामण्यां सुरां गृह्णाति " इत्यादि श्रुतींचें उपबृंहण केलें असतां सुरापानाची निवृत्ति सिद्ध होत आहे. आणि ज्याच्या पानाची निवृत्ति आहे, त्याच्या प्रतिनिधिरूप गंधाची देखील प्राप्ति बोधन संभवत नाहीं. कारण प्राप्त्यंशाचे ठिकाणीं ज्याचें सामर्थ्य नाहीं त्याचेंच करितां अंशरूप संकोच होत असतो. सुरापान सर्वथा वेदवचनसिद्ध असतें, तर तें दुसऱ्या रीतीनें केलें असतां, त्याविषयीं प्रत्यवाय झाला नसता. परंतु आवडीनें सुरा पिणाऱ्याला सुरा लाल करून पाजावी असें सांगितलें आहे.

वादी:— पण संध्या देखील जानवें नसून केली असतां प्रायश्चित्त आहे ना ?

सिद्धान्ती:— अरे ! संध्या कोणी आवडीनें करीत नाहीं. वचनानें तिचा विधि आहे. व वचन सोडून भलत्या रीतीनें करण्याविषयीं निषेध आहे. परंतु मद्याची गोष्ट तशी नाहीं. मद्य आवडीनें कोणालाहि पितां येतें व तिचा निषेध मात्र वचनानें होत असतो. ह्मणून या विधिवोध्य सुरापानाचा संकोच केला नाहीं. तर रागतः प्राप्त सुरापानाचा संकोच केला आहे. एवढ्या करितांच तो नियम आवश्यक होऊं शकत नाहीं. आतां मांसाविषयीं तर, हिंसारूप यज्ञापरीस फलमूळांनीं केलेला यज्ञ अधिक फलदायक आहे, असें भारतांत स्पष्ट ह्मटलें आहे.

" उपगम्य वने शुद्धिं सर्वभूताविहिंसया ।
अपि मूलफलैरिष्टो यज्ञः स्वर्ग्यः परंतप " ॥
( भारतशांतिपर्व, मोक्षधर्म, अध्याय, २७२. श्लोक, ५. )

" हिरण्यदानैर्गोदानैर्भूमिदानैश्च सर्वशः ।
मांसस्य भक्षणे धर्मो विशिष्ट इति नः श्रुतम् " ॥
( भारत, अनुशासनपर्व अध्याय, २१५. श्लोक, ४०. )

ह्मणून मांसयज्ञ आवश्यक नाहीं. व त्यामुळेंच तो नियम आवश्यक होऊं शकत नाहीं. याप्रमाणें पूर्वपक्षीला संमति देणाऱ्या वादीच्या ह्मणण्याचें निरसन करून, टीकेंतील उत्तरपक्षीच्या ह्मणण्याचा विचार करूं.

उत्तरपक्षी:— ( स्वामी ) हे पूर्वपक्षिन् तुझ्या शंकेचें उत्तर देण्याकरितांच " आसु निवृत्तिरिष्टा " हें श्लोकांत पद आहे. स्त्रीसंग मद्य आणि मांस हें सोडून देणेंच चांगलें, असा त्या पदाचा अर्थ आहे. आणि आशय असा आहे कीं, " ऋतौ भार्यामुपेयात् " इत्यादि वाक्यें नियमविधि देखील होऊं शकत नाहींत. कारण पक्षेंकरून जें प्राप्त असतें, त्याच्या अंशाच्या पूरकालाच नियमविधि ह्मणतात. ह्मणजे नखानें तांदूळ सोलतां येणें अशीं पक्षानें प्राप्ति होत असल्यामुळेंच, तांदूळ कांडावे असा नियम केलेला आहे. ह्मणजे याठिकाणीं " अवहन्यात् " 'कांडावे,' या विधीचें प्राधान्य आहे. 'तांदूळ' या अर्थाचें प्राधान्य नाहीं. ह्मणजे या ठिकाणीं विधि रागतः प्राप्त नाहीं. तर तांदूळनिष्पत्ति प्राप्त

आहे. आणि तें दुसऱ्या पक्षानेंहि होऊं शकतें. ह्मणून एकापक्षीं कांडावे असा विधि सांगतां येतो. परंतु मद्यमांस व मैथुन हे पक्षेंकरून प्राप्त नसून नित्यप्राप्त आहेत. ह्मणजे तांदूळ कांडणाहून निराळे जसे नखानें सोलतां येतात, तसें मद्यपान मांसभक्षण व स्त्रीसंग दुसऱ्या एकानें करतां येत नाहीं. तर ज्या रीतीनें लोक करीत आहेत त्याच रीतीनें करतां येतात. ह्मणजे याठिकाणीं विधीचें प्राधान्य विधिच सर्वांनां ठाऊक आहे. ह्मणून "कांडावेच" या वचनाप्रमाणें दुसऱ्या रीतीनें नियमच करतां येत नाहीं.

वादीः— तरमग पूर्वपक्षीला तुह्मी नियम ह्मणून कां सांगितलें ?

सिद्धान्तिः— पूर्वपक्षीला आमच्या पक्षावर शंका न करतां आली ह्मणजे त्याचें अज्ञान आपोआपच प्रगट होईल असें दाखविण्याकरितां.

शिष्य— महाराज ! आपण मलाहि नियमविधि असें सांगितलें होतें.

श्रीगुरू— अरे ! तें दुर्जनतोषन्यायानें समज.

शिष्य— तर मग यथार्थ हा कोणता विधि आहे ?

श्रीगुरू— अरे ! हा परिसंख्याविधि आहे. दोन्ही प्राप्त झाले असतां एका वस्तूच्या निषेधार्थ विधि करणें याचें नांव परिसंख्या आहे.

वादी— अहो ! पक्षानें प्राप्ति झाली असतां त्याचें पूरण करणें याचें नांव नियमविधि असें तुम्ही सांगितलें. आणि आतां दोन्ही पक्षानें प्राप्त झालें असतां एकाची निवृत्ति करणें याचें नांव परिसंख्या ह्मणतां, तेव्हां नियमविधींत व परिसंख्याविधींत मला कांहीं भेद दिसत नाहीं.

सिद्धान्ति— शास्त्राचा विचार बरबर करण्याची संवय पडल्यामुळें तो दिसेल कसा ? अरे ! नियमविधींत व परिसंख्याविधींत मोठा भेद आहे. त्याचा प्रथमप्रकार असा कीं, एका पक्षाची ज्या वेळेला जेव्हां प्राप्ति असते, तेव्हां दुसऱ्या पक्षाची प्राप्ति नसते. अशा वेळीं जो एक-पक्ष ग्रहण करून दुसऱ्या पक्षाची निवृत्ति आपोआपच होत असते, त्याला नियमविधि म्हणत असतात. जसें— 'यज्ञासाठीं तांदूळ कांडावेत;' यांत 'कांडावे' जेव्हां सांगितलें तेव्हांच नखानें सोलण्याच्या पक्षाची निवृत्ति झाली. दुसरा प्रकार असाः कांडणें सोडून देऊन नखानें तांदूळ

सोलले असतां प्रत्यवाय होतो, तसा " पंच पंच नखा भक्ष्याः " या वाक्यांत पंचनख प्राणी न खाल्ले असतां प्रत्यवाय होत नाहीं. हाहि परिसंख्याविधि व नियमविधींतील भेद समजावा.

वादी— परिसंख्याविधीचीं आणखी कांहीं लक्षणें स्पष्ट करून सांगा.

सिद्धान्ति– परिसंख्याविधि दोन प्रकारचा आहे. अपूर्वविधिद्वारानें सिद्ध होणारा व नियमविधिद्वारानें सिद्ध होणारा. ज्या उभय अंशाची विधीनें प्राप्ति होत असून एका अंशाची निवृत्ति होते, त्याला अपूर्वविधिद्वारा सिद्ध झालेला परिसंख्या ह्मणतात. आणि विधीवांचून अन्य रीतीनें उभय अंशाची प्राप्ति होऊन नंतर विधिसदृश वचनानें एका अंशाचा निषेध होतो, त्याला नियमविधिद्वारा सिद्ध झालेला परिसंख्याविधि ह्मणतात.

शिष्य–भगवन् ! उदाहरणावांचून हें मला कांहींच समजत नाहीं.

श्रीगुरु— " इमामगृभ्णन् रशनामृतस्य " इति या मंत्रानें दोरीचें ग्रहण करणें सांगितलें आहे. परंतु ती दोरी गाढवाची धरावी किंवा घोड्याची धरावी ? गाढवाची व घोड्याची दोघांचीहि धरणें प्राप्त झालें आहे; म्हणून " अश्वाभिधानीमादत्ते " या मंत्रानें गाढवाची रज्जु धरूं नये, अशा एका अंशाचें निवारण केलें आहे. घोड्याची दोरी धरावी असें विधान केलें नाहीं. कारण 'दोरी धरावी' हें विधान " इमामगृभ्णन् रशनां " या वचनानेंच सिद्ध झालेलें आहे. म्हणून पुनः विधान करणें हें अनुवादमात्र होईल. तसें झालें म्हणजे " अश्वाभिधानी " या आपल्या अर्थास सोडून देणें व अनुवादमात्रता या अर्थाची कल्पना करणें व यांत कोणताच निश्चय न झाल्यामुळें दोरी कोणाची ग्रहण करावी या प्राप्तीचाच सर्वथा बाध होत असल्यामुळें, वाक्यच अनर्थक होतें. हे तिन्ही दोष टाळण्याकरितां या वाक्याला परिसंख्या मानणें उचित आहे.

वादी– अहो ! कांडावें या विधीचें उल्लंघन करून नखानें सोललें असतां असे अनर्थ प्राप्त होतात; तसें घोड्याची दोरी सोडून गाढवाची धरली असतां अनर्थप्रत्यवाय होतो, ह्मणून नियमविधींत व परिसंख्याविधींत कांहीं भेद नाहीं.

सिद्धान्ति— भेद आहे तर. नाहीं कसा ? नियमविधींत गाढवाची दोरी धरल्यानें जो प्रत्यवाय होतो, तो व्यावृत्ति केलेलें निषिद्ध कर्म केल्यामुळें होतो, आणि नखानें तांदूळ सोलण्यानें जो प्रत्यवाय होतो, तो नियमभंग केल्यानें होतो. म्हणजे तांदूळ कांडावे या विधीचें सर्वथा उल्लंघन नखानें सोलण्यानें होतें; तसें गाढवाची दोरी धरली असतां विधीचें सर्वथा उल्लंघन होत नाहीं. कारण दोरी धरावी या विधीचें पालन कोणत्या तरी विधीनें होतेंच. परंतु घोड्याचीच दोरी धरावी यानीं गाढवाच्या दोरीचा केलेला निषेध त्याच्या उल्लंघनानें प्रत्यवायमात्र होतो.

वादी— हेंच लक्षण नियमविधीस कां लागू नाहीं ? कारण यज्ञाकरितां तांदूळ पाहिजेत व त्याकरितां अर्थातच साळी आणाव्या लागतात. तेव्हां तांदुळाचें उल्लंघन येथें कांहीं होत नाहीं. आणि कांडावें या विधानानें नखानें सोलण्याची व्यावृत्ति केली आहे.

सिद्धान्ति— भलत्याच रीतीनें विचार करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. अरे ! नियमविधि आर्थिक सिद्ध असतो व अपूर्वविधिद्वारा सिद्ध होणारा परिसंख्याविधि वाचनीक असतो. यज्ञाकरितां तांदूळ पाहिजेत हें मनांत समजून "अवहन्यात्" या वाक्यानें नखविदलनाची व्यावृत्ति केली असतां नियमविधि होतो. आणि तसें एखादें वाक्य पाहून नंतर कांडावें या वचनानें नखानें सोलणें याची व्यावृत्ति केली असतां परिसंख्या होतो. पुनः यज्ञार्थ व्रीहि घ्यावें, असें वाक्य म्हणशील तर तुषसहितानें होम करावा अशी प्राप्ति होईल. तांदूळ घ्यावे असें म्हणशील तर कांडण्याच्या नियमावांचून त्याची सिद्धि होणार नाहीं. एवढ्याकरितां व्यर्थ शंका करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या तीनहि विधींचें लक्षण भट्टपादांनीं केलें आहे. " विधिरत्यंतमप्राप्तो नियमः पाक्षिके सति । तत्र चान्यत्र संप्राप्तौ परिसंख्येति गीयते " ॥

भावार्थ— वाक्यानें प्राप्त होणारा अपूर्वविधि एका पक्षानें प्राप्त असून दुसऱ्या एका पक्षाचें पूरण करणारा नियमविधि; व दोन्ही प्राप्त असतां एका पक्षाची निवृत्ति करणारा परिसंख्याविधि. आतां आम्ही म्हटलेला अपूर्वविधिद्वारा परिसंख्याविधि कसा होतो तें सांगतों. परिसं-

ख्याविधींत श्रुति एकाद्या अर्थाची स्वतंत्र निवृत्ति करीत नसते; तसें मानलें असतां स्वार्थत्याग परार्थ कल्पना व प्राप्तबाध हे वर सांगितलेले तीन दोष येतात. म्हणजे एकाद्या श्रुतीच्या अर्थाला सोडून द्यावें लागतें; दुसऱ्या एकाद्या अर्थाची कल्पना करावी लागते, व प्राप्त झालेल्या वस्तूचा बाध करावा लागतो.

शिष्य– तरमग हा विधि कसा होतो ?

श्रीगुरु– हा परिसंख्याविधि अपूर्वविधिद्वारा सिद्ध होतो. जसें– " इमामगृभ्णन्रशना " यज्ञांत दोरी धरावी, हें या मंत्रावाचून दुसऱ्या रीतीनें प्राप्त नाहीं. म्हणून हा अपूर्वविधि आहे. परंतु घोड्याची दोरी धरणें व गाढवाची दोरी धरणें हे दोन्ही अपूर्वविधीनेंच प्राप्त झाले आहेत. त्यांत " अश्वाभिधानीमादत्ते " घोड्यासंबंधीं धरावी, या वाक्यानें गाढवाच्या दोरीची व्यावृत्ति केली आहे. हे दोन पक्ष विवक्षित असतां समजावे. अश्वासंबंधीं धरावी या विधीला रज्जु दुसरा अर्थ नसल्यामुळें, व नुसत्या घोड्याची असा दुसराहि कांहीं अथ करितां येत नसल्यामुळें, दोरी धरावी या वाक्यानें प्राप्त असणाऱ्या अपूर्वविधिद्वाराच गर्दभदोरीची व्यावृत्ति घोड्यासंबंधीं धरावी या वाक्यानेंच फलित झाली आहे. म्हणजे नियमविधींत दोन्ही पक्षांचो अर्थानें प्राप्ति असून वचनानें एकाची निवृत्ति आहे. व परिसंख्याविधींत वचनानें दोन्ही पक्षांची प्राप्ति असून विधिवचनानेंच एका पक्षाच्या निवृत्तीचें विधान आहे. पण हा अपूर्ववि-धिद्वारा सिद्ध होणारा परिसंख्याविधि आहे. हेंच तंत्रवार्तिकांत सांगितलें आहे.

" अप्राप्तविधिरेवायमतो मंत्रस्य निश्चितः ।
परिसंख्या फलेनोक्ता न विशेषः पुनः श्रुतेः " ॥१॥

भावार्थ– या मंत्रांतील हा विधि अपूर्वच आहे. आणि फलानें परिसंख्याविधि सिद्ध झाला आहे. याहून विशेष नियम श्रुतीनें केला नाहीं. पण या सर्व आमच्या निरूपणाचा सारांश तुम्हा कोणाला समजला असें वाटत नाहीं.

वादी– पण आपण तर सांगा.

सिद्धान्ति– आमचें म्हणणें असें कीं अपूर्वविधिद्वारा सिद्ध होणारा

देखील परिसंख्याविधि "ऋतौ भार्यामुपेयात्" इत्यादि वाक्यांत नाहीं. कारण यज्ञांत दोरी धरावी हें जसें वाक्यानें प्राप्त आहे, तसेंच मद्यमांस व स्त्रीसंग हे प्रथम वाक्यानेंच प्राप्त नाहींत, तर वाक्यावांचून रागतः प्राप्त आहेत. ह्मणून ऋतुकाळीं स्त्रीगमन करावें इत्यादि वाक्यांत नियमविधिद्वारा सिद्ध होणारा परिसंख्याविधि आहे. नियमविधीचें उल्लंघन केलें असतां जसा प्रत्यवाय होत असतो, व ह्मणूनच नियमविधि कर्तव्यबोधक असतो, तसें नियमविधिद्वारा सिद्ध झालेला परिसंख्याविधि कर्तव्यबोधन करीत नाहीं. ह्मणजे तेथील व्यावृत्ति पाळून विधीनें सांगितलेली गोष्ट न केली असतां, प्रत्यवाय होत नाहीं. जसें— पांच पांच नखांचे प्राणी खावेत हें वाक्य आवडीनें पांच नखांचे व त्यावांचून असणारे प्राणी खाणें प्राप्त झालें असतां पांच नखांवांचून इतर प्राणी खाण्याची निवृत्ति "पंच पंच नखा भक्ष्याः" या वाक्यानें केली आहे; पांच नखांचे प्राणी खालेच पाहिजेत असें आवश्यक विधान केलें नाहीं. हेंच अद्वैतकौस्तुभांत सांगितलें.

"यथा पंचपंचनखाः भक्ष्याः इत्यत्र रागतः पंचनखापंचनखभक्षणयोरुभयोः प्राप्तौ अपंचनखभक्षणव्यावृत्तिं बोधयति पंचपंचनखाः भक्ष्या इति वाक्यं न तु पंचनखभक्षणं कर्तव्यत्वेन बोधयति तस्य रागतः प्राप्तत्वात्" (अद्वैतकौस्तुभ, द्वितीय प्रकरण, पान ९१.)

अर्थ आतांच सांगितला आहे; याप्रमाणें ऋतुकालीं स्त्रीगमन करावें, हवन करून उरलेलें मांस खावें, सौत्रामणि यज्ञांत सुराग्रहण करावी, इत्यादि वाक्यें हीं रागतः प्राप्त सर्वदा मद्यमैथुनाची व्यावृत्ति करितात. यज्ञांत मद्यमांस घेतलेंच पाहिजे, किंवा ऋतुकालीं स्त्रीगमन केलेंच पाहिजे, असें आवश्यक नियम सांगत नाहींत; ह्मणून हें सोडून देणेंच उत्तम, असा "लोके व्यवायामिषमद्यसेवा" या श्लोकाचा अर्थ होतो. मनुस्मृतींतील वाक्याचाही हाच अर्थ समजावा. ह्मणजे रागतः मांसभक्षणाचा तेथें निषेध केला आहे. किंवा मांस खावयाचें असल्यास पितरांनां देण्याच्या दिवशींच घ्यावें, अन्यथा घेऊं नये. हें असो. किंवा हीं वेदांतील वाक्यें अर्थवादरूप आहेत. कारण, तसेंच महाभारतांत सांगितलें आहेः

" स्वस्ति गोभ्योऽस्तु लोकेषु ततो निर्वचनं कृतम् ।
हिंसायांहि प्रवृत्तायामाशीरेषां तु कल्पिता ॥ ३ ॥
अव्यवस्थितमर्यादैर्विमूढैर्नास्तिकैर्नरैः ।
संशयात्मभिरव्यक्तैर्हिंसा समनुवर्णिता ॥ ४ ॥
सर्वकर्मस्वहिंसा हि धर्मात्मा मनुरब्रवीत् ।
कामकाराद्विहिंसंति बहिर्वेद्यां पशून्नराः ॥ ५ ॥
तस्मात्प्रमाणतः कार्यो धर्मः सूक्ष्मो विजानता ।
अहिंसा सर्वभूतेभ्यो धर्मेभ्यो ज्यायसी मते ॥ ६ ॥
( शांतिपर्व, मोक्षधर्म, अध्या० २६५. श्लो० ३ ते ६. )

सर्व धर्मांमध्यें अहिंसा श्रेष्ठ असें यांत सांगत असून जे यज्ञांत हिंसा करितात, ते शास्त्राचें तात्पर्य न जाणून स्वेच्छेनें करितात असें सांगून वेदवचनाचें तात्पर्य संकोचांत आहे असा भाव दाखविला आहे. व नंतर

" सुरां मत्स्यान्मधुमांसमासवं कृसरौदनम् ।
धूर्तैः प्रवर्तितं ह्येतन्नैतद्वेदेषु कल्पितम् ॥

याचा दुसरा पाठ असा आहे—

( शांति०, मोक्ष०, अध्या०, २६५. श्लो०, ९. )

" सुरा मत्स्याः पशोर्मांसं द्विजातीनां बलिस्तथा ।
धूर्तैः प्रवर्तितं यज्ञे नैतद्वेदेषु कथ्यते " ॥

भावार्थ– सुरा, मत्स्य, मांस, तिळभात इत्यादि लुच्चे लोकांनीं प्रचारांत आणले आहेत; वेदांत त्याविषयीं कांहीं सांगितलें नाहीं. व दुसऱ्या पाठाचा असा अर्थ आहे कीं, सुरा, मत्स्य, पशुमांस द्विजांचा बलि हे सर्व लुच्च्या लोकांनीं प्रवृत्त केले असून वेदांत मुळींच सांगितले नाहींत. पहिल्या पाठाचा भाव वेदाचा अर्थ न समजून अज्ञानानें ते प्रवृत्त केले असा आहे. व दुसऱ्या पाठाचा भाव क्षेपकपर आहे. यद्यपि क्षेपकवाद घेतला असतां अनवस्था होते, तथापि सर्वज्ञ महात्म्यांनीं जो क्षेपकवाद घेतला आहे तो ग्रहण करण्याला आह्मांला आपत्ति नाहीं. आतां प्रत्येक संप्रदायाचा अधिकारी सर्वज्ञ मानून प्रत्येक प्रत्येकाला क्षेपक म्हणूं शकेल खरें; परंतु त्याविषयीं इलाज नाहीं. आर्ष असें व्यासांचें वचनच आम्हाला सिद्ध असल्यामुळें इतरत्र आम्ही क्षेपकवाद

मानीत नाहीं. किंवा क्षेपकवाद या वाक्यांत सांगितलाहि नाहीं. वेदांचें तात्पर्य अन्य आहे; एवढेंच दाखविलें आहे. पशुयज्ञाविषयींची श्रुति अप्रमाण आहे असें म्हणणाऱ्यांचें पतन झालें, असा जो इतिहास भारतांत आहे तो श्रुतीचें प्रामाण्य दाखविणारा आहे. पशुयज्ञांत श्रुतीचें तात्पर्य सिद्ध करीत नाहीं. मेरुतंत्रादिकांचीं वचनें एतद्विरुद्ध असतील तर अर्थातच बाध्य आहेत. वचनसिद्ध अहिंसा येथें आम्ही सांगत आहों. अन्यत्रहि सांगूं.

वादी— अहो ! महाभारताच्याच वनपर्वांतील अध्याय २०८ मधील श्लोक ८, ९, १० यांनीं रंतिदेवाच्या येथें प्रतिदिन दोन हजार पूज्य पशूंचा वध होऊन मांसदान होत होतें असें प्रतिपादिलें आहे. आणि वसूंची कथा प्रसिद्धच आहे. म्हणून प्राण देवाला समर्पण करणें हितावह आहे.

सिद्धान्ति— याविषयीं नाना प्रकारें आम्ही समाधान केलें आहेच. पण तूं इतिहासच जर प्रमाण देत असशील तर त्याचें समाधान सांगतों. स्कंदपुराणांत ब्रह्मखंडांतर्गत धर्माख्यखंडांतील ३६ साव्या अध्यायांत अशी कथा आहे कीं, रामानीं दिलेला ब्राह्मणाचा अग्रहार एका कुमारपाल नांवाच्या जैन राजानें हिरून घेतल्यावर ब्राह्मणांनीं मागितला असतां, तुम्ही यज्ञांत हिंसा करणारे आहांत, म्हणून देत नाहीं; अहिंसाधर्मच सर्वश्रेष्ठ आहे; असें कुमारपाल बोलला असतां, ब्राह्मण याप्रमाणें म्हणाले.

ब्राह्मणा ऊचुः— अहिंसा परमो धर्मः सत्यमेतत्त्वयोदितम् ।
परं तथापि धर्मोऽस्ति शृणुष्वैकाग्रमानसः ॥६९॥
या वेदविहिता हिंसा सा न हिंसेति निर्णयः ।
शस्त्रेणाहन्यते यच्च पीडा जंतुषु जायते ॥ ७० ॥
स एवाधर्म एवास्ति लोके धर्मविदां वर ।
वेदमंत्रैर्विहन्यंते विना शस्त्रेण जंतवः ॥ ७१ ॥
जंतुपीडाकरा नैव सा हिंसा सुखदायिनी ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥ ७२ ॥
वेदोदितां विधायापि हिंसां पापैर्न लिप्यते ॥

भावार्थ–ओव्या– ब्राह्मण ह्मणती भूपाळासी । अहिंसाधर्म साच बोलिलासी । परी धर्माची गति कैसी । ती एकाग्र मानसीं ऐकावी ॥ २०४ ॥ जीवाप्रति दुःख देणें । याचेंचि नांव हिंसा ह्मणणें । मरणीं जीवातें दुःख होणें । हिंसा ह्मणोनि या नांव ॥ २०५ ॥ देहाभिमान जैसा जैसा । देहनाशविधि तैसा तैसा । ह्मणोनीच क्षत्रियांसी आपैसा युद्धीं मरण स्वर्गोपाय ॥ २०६ ॥ आपुलिया प्राणावरी उदार । होती ते देवा आवडती समग्र । परी गुरूतें प्राणदानप्रकार । मज नावडे हें सांगूं पुढें ॥ २०७ ॥ यज्ञांत पशूंची हिंसा । ते राया जाण अहिंसा । जे शस्त्रें यज्ञांत करिती हिंसा । तीचि महाभारतादौ निंदिली ॥ २०८ ॥ शस्त्रा वांचोनि मंत्रेंकरून । पशूस स्वर्ग मिळे दुःखावीण । परकायाप्रवेशाप्रमाण । जात्यंतरपरिणाम होय त्यांचा ॥ २०९ ॥ " जन्मौषधिमंत्रतपसमाधिजाः सिद्धय " इति । जन्मौषधिमंत्रतपसमाधीनें सिद्धि होती । एवं योगसूत्रीं वदती । पतंजली ॥ २१० ॥ ह्मणोनि मंत्रें जात्यंतरपरिणाम होय । तो सुखेंचि मिळतु आहे । जैसा उत्तमगृहीं स्थापिला होय । अधमगृहांतूनि गृहधनी कोणी ॥२११॥ कां सर्प आपुली कात टाकितां । दुःख न वाटे तयाच्या चित्ता । तेवीं मंत्रें पशुदेह सोडवितां । दुःख सर्वथा न वाटे ॥ २१२ ॥ परकायाप्रवेश करितां । कोण योगी भीतसे चित्ता । तेवीं मंत्रें पशुदेह सोडवितां । दुःख सर्वथा तया नव्हे ॥२१३॥ तंव वादी ह्मणे अभिचारी । वेदमंत्र कां सावरी । करोनि मारितां दुःखपुरीं । जीव पडती आणि कर्ता पापी होय ॥ २१४ ॥ अभिचारमंत्रांचा उपसंहार । विघेंत न करिती पराशरकुमर । वेधाद्यधिकरणीं विचार । ब्रह्ममीमांसेंत हा असे ॥ २१५ ॥ साच बोलिलासी ह्मणे सिद्धान्ती । परि हे वेदमंत्र अभिचार न होती । परोपकारें पुण्यसंप्राप्ति । पशुस्वर्गदानार्थ प्रवृत्ति मंत्रांची ॥ २१६ ॥ शत्रुआदि कल्पून । आभिचाराचें प्रवर्तन । केवळ धर्मार्थमंत्रें पशुकायात्याजन । तेणें हिंसा जाण कदा नोहे ॥ २१७ ॥ कारिरीयज्ञें शत्रुनाश । परि दुर्गति यजमानास । अश्वमेधादियज्ञें विशेष । तैसें नाहीं बोलिलें ॥ २१८ ॥ मंत्रें जात्यंतरपरिणाम होय । येविषयीं साक्षि देतु आहे । जैमिन्यश्वमेध स्वयें । तेंहि प्रमाण ऐक पां ॥ २१९ ॥

" युधिष्ठिरः कृतस्नानो यज्ञकर्मणि दीक्षितः ।
सुवर्णचयमासाद्य समानीय तुरंगमम् ॥९॥
प्रोवाचाग्रे पशुरभूच्छ्रुतिमेतां पठन्पुरः ।
पिव भो स्त्वमपो घोट तव लोको भविष्यति ॥१०॥
युधिष्ठिरस्य तद्वाक्यमाकर्ण्य तुरगः स्वयम् ।
धुनयामास वदनमपश्यत्केशवं मुदा ॥ ११ ॥
प्रोथाभ्यां स्वमभिप्रायं शशंस नकुलाय सः ।
ज्ञात्वा भावं तुरंगस्य नकुलः प्राह धर्मजं ॥१२॥
वाजी शंसति राजेंद्र नाहं यास्ये त्रिविष्टपम् ।
अन्येषु किन्तु यज्ञेषु स्वर्गकामेषु ये हयाः ॥१३॥
त्रिविष्टपं गता वीर तेषु कृष्णो न कर्मकृत् ।
अनीश्वरेषु यज्ञेषु स्वर्गस्तु परमं फलम् ॥ १४ ॥
जायते भुवि कर्तृणामस्मिन्यज्ञे फलं हरिः ।
ममापि कृष्णवदने स्थितं पश्यन्तु याज्ञिकाः ॥१५॥

नकुल उवाच– एवं ब्रूते धर्मराज तुरंगस्ते महाक्रतौ ।
अथैनं मुनयः सर्वे यूपपार्श्वे सुमंत्रितम् ॥१६॥
राजानः स्त्रीसमूहोऽपि यांतं पश्यंतु माधवं ।
नकुलस्य वचः श्रुत्वा यूपे नीतस्तुरंगमः ॥१७॥
यूपे बद्धो हयो विप्रैः सकृष्णैरभिमंत्रितः ।

धौम्य उवाच– भीम खड्गं समादाय तिष्ठ त्वं निश्चलः क्षणं ॥१८॥
यावत्परीक्षां कुर्वेऽहं वाजिनोऽस्य महामते ।
ततो धौम्यो हयस्याशु वामकर्णं न्यपीडयत् ॥१९॥
तावत्क्षीरस्य धारा तु निर्गता जनमेजय ।
विस्मिताः सकला लोकाः शोणितं नैव दृश्यते ॥२०॥
धौम्योऽब्रवीद्भीमसेनं छिंधि कं वाजिनोधुना ।
यथा तुष्येज्जगन्नाथः पुराणपुरुषोत्तमः ॥ २१ ॥
वादित्रनादे महति प्रवर्तिते । भीमोल्लुनात्तस्य हयस्य शीर्षं
ऊर्ध्वं गतं तच्च शिरो न चाधः । सूर्ये प्रविष्टं किल वह्निरूपम् ॥
शुद्धं ज्ञात्वा हृषीकेशस्तुतोदैनमुरस्थले ।

बैल्वेन कंटकेनापि भिन्नः कृष्णेन पावनः ॥२३॥
निर्गता क्षीरधारा तु तुरगस्य कलेवरात् ।
धारां विनिर्गतां वीक्ष्य ऋषयो धर्ममब्रुवन् ॥२४॥
एवंविधो न कस्यापि शुद्धः पूर्वं तुरंगमः ।
शुद्धं ज्ञात्वा हृषीकेशो धर्मपुत्रं तु सोऽब्रवीत् ॥२५॥
तथा ब्रुवंस्ते ऋषयो दृष्ट्वा शुद्धं तुरंगमम् ।
दिष्ट्या ते सफलो यज्ञो जायतेद्य युधिष्ठिर ॥२६॥
तेषां संवदतामेवं तुरंगमकलेवरात् ।
निर्गतं सुमहत्तेजः प्रविष्टं केशवानने ॥ २७ ॥
पश्चाच्छरीरं पतितं भूत्वा कर्पूरमेव तत् ।
विभूतिरिव रुद्रस्य च्युता गात्रादशोभत ॥ २८ ॥
विस्मिता मुनयस्तं तु कर्पूरं वीक्ष्य तेऽभवन् ।
कर्पूरं जुहुवुस्ते तु होमकुंडे तु तत्क्षणात ॥२९॥
यत्रोपविष्टो राजासौ सपत्नीकः समाधवः ।
व्यासो गृहीत्वा कर्पूरं स्रुवेणेदमथाब्रवीत् ॥३०॥
व्यास उवाच— गृहाणेंद्र महायज्ञे घनसाराहुतिं विभो ।
एहि राज्ञार्पितामेनां दुर्लभामग्रतः कलौ ॥३१॥
शक्रः समागतः साक्षात्प्रत्युवाच महामुनिं ।
देहि पावकवक्त्रेण यावत् तृप्तिर्ममाक्षया ॥३२॥
यां वीक्ष्य तृप्तिं प्राप्तोऽस्मि भुक्त्वा शं च भविष्यति ।
व्यासस्ततो जुहावाग्नौ वसंते दशमीदिने ॥३३॥
शुक्लपक्षे हि चैत्रस्य सार्पर्क्षे गुरुवासरे ।
स्वाहेतींद्राय विधिवत्परमामाहुतिं ददौ ॥३४॥
चंद्रादिदेवताभ्यश्च तत्तन्मंत्रैर्यथाक्रमम् ।
ततो दिग्देवताभ्यश्च मंत्रैर्दत्वा यथाविधि ॥३५॥
घनसारं जुहावाग्नौ देवतानां पुरस्तदा ।
हवनेन जगत्प्रीतं बभूव सचराचरम् ॥ ३६ ॥

( जैमिनीकृत संस्कृत अश्वमेध, अध्या० ६४. )

याचा अर्थ हरिविजयकार श्रीधरस्वामींनीं आपल्या प्राकृत जैमिनीअश्वमेधांत केला आहे तोच मी येथें लिहितों.

ओव्या– मग युधिष्ठिरें यागाजवळी । तो अश्व आणिला तात्काळीं । तयासी बोले ऋषिमंडळी । पशुत्व करीं या यज्ञीं ॥ १२ ॥ तुज प्राप्त होईल स्वर्गलोक । ऐसें बोलतां निःशंक । अश्वें हालविलें ग्रीवामस्तक । परमानंदेंकरूनी ॥ १३ ॥ केशवासन्मुख झाला नीट । बोलोन स्फुरवी दोन्ही ओष्ठ । तें नकुळें जाणितलें स्पष्ट । अव्यंग अश्वहृदयींचें ॥ १४ ॥ तुरंगमभाव नकुळ । धर्मरायासी निवेदी तात्काळ । अश्व हा बोलतो प्रांजळ । मी त्या पदा नव जावें ॥ १५ ॥ यज्ञीं अश्व पावती जे मरण । त्यांसी प्राप्त सत्य स्वर्गभुवन । ऐसें श्रुतीचें वचन । परि त्या स्वर्गाचा मी नोहें ॥ १६ ॥ जो यज्ञभोक्ता श्रीकृष्ण । तो या यागीं करितों कर्माचरण । त्या यागींचा मी श्यामकर्ण । तुच्छ मानितों स्वर्गातें ॥ १७ ॥ जे अनीश्वर याग केवळ । तेथें अश्वीं चिंतावें स्वर्गफळ । कृष्ण हृदयांबुज केवळ । मी तों तेथें प्रवेशेन ॥ १८ ॥ ऐसा याचा अभिप्राय । मजलागीं सांगतो हा हय । ऐसें बोलतां माद्रीतनय । जयजयकार ऋषि करिती ॥ १९ ॥ सर्व पावले समाधान । यूपीं योजिला श्यामकर्ण । सकळ राजे येऊन । तटस्थ तेथें विलोकिती ॥ २० ॥ तंव धौम्य बोले भीमाप्रति । तूं तीक्ष्ण शस्त्र घेईं हातीं । अश्वपरीक्षा करीं निश्चितीं । शुद्धपणा याचिया ॥ २१ ॥ मग धौम्यें धरिला त्याचा कर्ण । त्याचें केलें निष्पीडण । तों दुग्धधारा तेथोन । स्रवों लागल्या तेधवां ॥ २२ ॥ सकळ झाले जरी विस्मित । अश्वांगीं नसेचि शोणित । भीमातें ह्मणे धौम्य पुरोहित । अश्वशिर छेदीं आतां ॥ २३ ॥ या अश्वछेदनेंकरून । हा पुराणपुरुष नारायण । संतृप्त होईल पूर्ण । तेंचि तुवां करावें ॥ २४ ॥ लागल्या वाजंत्रांच्या ध्वनी । तेणें प्रतिशब्द उठिला गगनीं । भीमें स्मरोनि चक्रपाणी । अश्वमस्तक छेदिलें ॥ २५ ॥ ऊर्ध्व उडालें अश्वशिर तेणें भेदिलें रविमंडळ । सेविलें सूर्यांतर केवळ । तेजोरूप तें झालें ॥ २६ ॥ ऐसा शुद्धाश्व देखोन । आनंदले सकळ ब्राह्मण । दुग्धधारा लोटल्या संपूर्ण । शरीरांतून तयाचे ॥ २७ ॥ ऋषि ह्मणती धर्मयाग । पूर्वी झाले अनेग । परि शुद्धत्वाचा विभाग । कोठें न देखों या परी

॥ २८ ॥ तरी हा तुझा योग्य याग । घडला कीं यथासांग । जेथें इंदिरेसहित श्रीरंग । कार्य करी कुटुंबेंसी ॥ २९ ॥ ऐसें बोलतां सकळ द्विज । तों अश्वमुखांतून निघालें तेज । तेणें उघडोन कृष्णमुखांबुज । अंतरीं प्रवेशलें ॥ ३० ॥ मग अश्वधड पडिलें धरणीं । तो कर्पूरपुंज झाला तत्क्षणीं । मुनि सकळ नृपचूडामणि । आश्चर्य करूं लागले ॥ ३१ ॥ ह्मणती नाना याग केले । नेत्रीं अनंत देखिले । परि या यागासी तुळे । ऐसा याग न देखिला ॥ ३२ ॥ जी योगेश्वरा नसे गती । ती गति पावला अश्वपति । कृष्णमुखीं झालो वस्ती । त्या अश्वातें काय वर्णूं ॥ ३३ ॥ ज्याहीं केले होते याग । त्यांचा झाला गर्वभंग । ज्याच्या यागीं कार्यकर्ता श्रीरंग । आणि भोक्ताहि आपण ॥ ३४ ॥ नेणवे भाग्य पांडवांचें । ब्रह्मादिकां अलभ्य साचें । धन्य भाग्य आमुचें । झालें येथें आगमन ॥ ३५ ॥ सर्व राजे आश्चर्य करिती । ह्मणती अभिनव यागगति । ऋषिगण आनंदती । ह्मणती पावन झालों आह्मी ॥ ३६ ॥ अश्वशरीर झालें कर्पूर । कीं क्षीराब्धि आटोनि केला गोळ । सुवास सुटला अपार । तेणें दिशा कोंदल्या ॥ ३७ ॥ घेवोनि कर्पूराचीं अवदानें । यज्ञा होमिजेलीं ब्राह्मणें । तृप्ति केली यज्ञनारायणें । सपत्नीक कृष्णेसीं ॥ ३८ ॥ व्यास देत अवदान । स्रुवा घेवोनि आपण । इंद्राप्रति बोलिला वचन । तेंचि ऐकें जनमेजया ॥ ३९ ॥ इंद्रा तूं घेईं रे अवदान । समर्पितो धर्मनंदन । येथोनि दुर्लभ हे यज्ञ । कलियुगीं न होती ॥ ४० ॥ प्राप्त झालिया कलियुग । विशेषें बुडतील हे याग । तैं तुह्मां आहुतिविभाग । कोठूनि प्राप्त समजावे ॥ ४१ ॥ ऐकतां शक्र मूर्तिमंत । तेथें आलासे धांवत । आदरें व्यासातें बोलत । मज पावली आहुती ॥ ४२ ॥ संपूर्ण झाली कीं तृप्ति । ऐसी नव्हे पुढें स्थिति । ऐकतां ऐसी वचनोक्ति । सर्व झाले विस्मित ॥ ४३ ॥ ऐसीं यथाक्रमें व्यासनारायणें । देवांसि दिधलीं अवदानें । तेणें देव संतुष्ट मनें । झाले तृप्त सर्वही ॥ ४४ ॥ चराचर तृप्त संपूर्ण । ऐसें झालें धर्महवन । होमधूत्रें पावन । त्रैलोक्य झालें जनमेजया ॥ ४५ ॥

( श्रीधरस्वामीकृत जैमिनीअश्वमेध, अध्याय ९३. )

चूर्णिका— वादी ह्मणे उदाहृत स्कंदपुराणश्लोकांत। विनाशस्त्रें मंत्रें बोलिला पशुसंघात। येथ शस्त्र घेवोनि शिर छेदी वायुसुत। तरी हा पुराणजैमिनीयभारतविरोधु ॥ २२० ॥ ऐसें वादी वदतां। सिद्धान्ति ह्मणे ऐक आतां। ब्राह्मण यज्ञ करितां। मंत्रमात्रेंचि जात्यंतरपरिणति होय ॥ २२१ ॥ यज्ञ करितां क्षत्रिय। तदा शस्त्रस्पर्श-अपेक्षा होय। किन्तु कळावरूनि ऐसा निश्चय। कीं अश्व कर्पूर जाहला म्हणूनि जात्यंतर परिणाम वेदमंत्रें ॥ २२२ ॥ परी मारावयाच्या आधीं शस्त्र। धौम्यें पिळिला अश्वश्रोत्र। तैं तेथोनि निघालें क्षीर। ऐसा शुद्धसत्व पशु करूनी क्षत्रयज्ञहि प्रवर्त्तावा ॥२२३॥ भौतिक पशुतनु रक्तमांसाची। क्षत्रियाहि आज्ञा नाहीं तद्धननाची। ह्मणोनि हिंसामूलक विधीची। न धरावी कास ॥ २२४ ॥ एवं सामर्थ्य नसतां। पशुयज्ञ करूं नये सर्वथा। हें येणेंचि आख्यानें आतां सिद्ध जाहलें ॥ २२५ ॥ यज्ञद्वारा जगदुद्धरण। एवढें सामर्थ्य असे तेंचि घडे पूर्ण। एवं तपःसामर्थ्य नसतां दारुण। तैं शमादितप-सामर्थ्य तरी बुडवूं नये ॥ २२६ ॥ एवं स्कंदपुराणजैमिनीयभारत-श्लोकांचें। स्वारस्य बोलिलें साचें। आन पदार्थ पांडित्याचे। पंडित जाणोत मज न कळती ॥ २२७ ॥

ओव्या— वादी ह्मणे गा सिद्धान्ति। तूं असशी शांकरमती। सौगतमत खंडितां क्षितीं। शंकराचार्यें बोलिली हिंसा ॥ २२८ ॥ तें शंकरविजयांत आपुलें। अनंतानंदगिरीनें बोलिलें। वचन दाखवूं बहिलें तुज समजावया ॥ २२९ ॥

" रे रे सौगत नीचतर किं किं जल्पसि अहिंसा कथं धर्मो भवितुमर्हति यागीयहिंसाया धर्मरूपत्वात् तथाहि अग्निष्टोमादिक्रतुः छागादिपशुमान् यागस्य परमधर्मत्वात् सर्वदेवतातृप्तिमूलकत्वाच्च तद्वारा स्वर्गादिफलदर्शनाच्च पशुहिंसा श्रुत्याचारतत्परैरंगीकरणीया तद्व्यतिरिक्तस्यैव पाखंडत्वात् तदाचाररता नरकमेव यांति।

वेदनिंदापरा ये तु तदाचारविवर्जिताः।

ते सर्वे नरकं यांति यद्यपि ब्रह्मबीजजाः। इति मनुवचनात्

हिंसाकर्तव्येस्वत्र वेदाः सहस्रं प्रमाणं वर्तते। ब्रह्मक्षत्रवैश्यशूद्राणां

वेदेतिहासपुराणाचारः प्रमाणमेव तदन्यः पतितो नरकगामीचेति
( आनंदगिरिकृत सौगतमतनिबर्हण, प्रकरण, २६ वें. )

भावार्थ – अरे सौगता काय बडबडतोस? अहिंसा धर्म कसा होईल? यज्ञामध्यें पशुहिंसा सांगितली आहे. हिंसा करावी याविषयीं वेदाच्या हजारों श्रुति प्रमाण आहेत. श्रुति, स्मृति, पुराणें इतिहास हे चारहि वर्णांनां प्रमाण असल्यामुळें याच्याविरुद्ध वागणाऱ्यांनां नरक निश्चित आहे. इतकाच ह्या एकंदर गद्यांतील भावार्थ आहे. मला पुष्कळसें संस्कृत येत नाहीं. ह्मणून राहिलेल्या शब्दांच्या अर्थांच्या भानगडींत मी पडत नाहीं. याप्रमाणें वादीनें ह्मटलें असतां सिद्धान्ति ह्मणतात– आचार्यांनीं हजारों वेदांच्या श्रुति पशुयज्ञाविषयीं प्रमाण आहेत हें सम्यक् म्हटलें आहे. परंतु त्या श्रुतींचा अर्थ "अत्ता चराचरग्रहणात्" या न्यायानें ईश्वरपर किंवा "आत्मा यजमानः श्रद्धा पत्नी" इत्यादि श्रुति रूपकबलानें कामक्रोधादिपशुहिंसापर आहेत !

" प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्पाचे मेडे ।
मनोमहिषाचेनि मुंडें दिधली बळी "
( ज्ञाने०, अध्या०, १२. श्लोक, ४. ओवी, ६३. )

इत्यादि वचनांनीं तातानींहि असेंच ह्मटलें आहे. आतां तूं कदाचित् असें ह्मणशील कीं, "मन्युः पशुः" येवढ्या श्रुतीवरून सर्व श्रुतींतील पशुयज्ञाचें रूपक करणें ठिक नाहीं, तर सर्वच सांख्यपर श्रुतींचा शरीररूपकपर अर्थ वेदान्तसूत्रकारांनीं केला आहे; इकडेहि लक्ष असूं दे. आह्मांला पुराणेतिहासाचें रूपक मान्य नाहीं; ह्मणून रूपकालंकारच खंडित करावा असें नाहीं. महाभारतादिकांचें आलोचन केलें असतांहि, यज्ञ प्रशंसेला पावलेले नाहींत असें दिसतें. पुनः या यज्ञांतील हिंसेचा तातांनींहि निषेध केला आहे.

" परि ते ऐसी देखा । जैशा खांडूनियां शाखा । मग तयाचिया बुडंखा । कुंप कीजे ॥ २१९ ॥ कां बाहू तोडोनि पचविजे । मग भुकेची पीडा राखिजे । नाना देऊळ मोडूनि कीजे । पौळी देवा ॥२२०॥ तैसी हिंसाचि करूनि अहिंसा । निपजविजे हा ऐसा । पैं पूर्वमींमांसा । निर्णय केला ॥ २२१ ॥ जे अवृष्टीचेनि उपद्रवें । गादलें विश्व आघवें ।

ह्मणोनि पर्जन्येष्टि करावे । नाना याग ।। २२२ ।। तंव तिये इष्टीचिया बुडीं । पशुहिंसा तंव रोकडी । मग अहिंसेचि थडी । कैंची दिसे ।।२२३।। पेरिजे नुसधी हिंसा । तेथ उगवेल काय अहिंसा । परि नवल बापा धिंवसा । या याज्ञिकांचा ।। २२४ ।।

( ज्ञाने०, अ०, १३. श्लो०, ७. )

भागवतधर्मी सर्वथाहि । हिंसा बोलिलीच नाहीं । हें दाखविती लवलाहीं । पूर्वमीमांसामतखंडणें ।। २३० ।। सर्वांभूतीं भगवंत । हें ज्ञान ध्यान यथार्थ । या ज्ञानाचें नांव परमार्थ । आणि ध्यानाचें नांव सदुपासना ।। २३१ ।। कामक्रोधाचें दमन । याचेंचि नांव सत्कर्म पूर्ण । तेथें हिंसेलागीं पुसे कवण । जे कां विंदान पूर्तीचें ।। २३२ ।।

ज्याप्रमाणें झाडाच्या खांद्या तोडून त्याच्या बुडखाला कुंपण करणें, किंवा आपले हात तोडून, शिजवून, आपल्या भुकेची शांति करून घेणें हास्यास्पद आहे; त्याप्रमाणें यज्ञांतील. हिंसेच्या योगानें अहिंसा होते, असें या पूर्वमीमांसकांचें मत हास्यास्पद आहे. एकाद्याला दैवानें मरण आलें, तर त्याच्याबरोबर त्याचा परिवार जिवंत पुरविण्याची चाल कांहीं देशांत होती, तशांतलाच हा कांहींसा प्रकार आहे. कारण, दैवानें दुष्काळ पडला असतां पर्जन्यष्टि करावयाची, आणि तींत अनेक पशूंचा वध करावयाचा. याप्रमाणें हिंसा करणाऱ्या या लोकांनां अहिंसेचें तीर कसें दिसणार ? एरंड पेरून ऊंस मागणें जसें लाजिरवाणें आहे, त्याप्रमाणें हिंसा पेरून अहिंसा मागणें लाजिरवाणें आहे. तात " धिंवसा " या शब्दानें हें केवळ याज्ञिकांचें साहस आहे, असें सांगतात. ह्मणजे वेदांचा वास्तविक अर्थ तसा नाहीं.

वादी— अहो, तुमच्या तातांनीं आयुर्वेदाच्या हिंसेचें देखील खंडण केलें आहे.

सिद्धान्ति— होय. खंडण केलें आहे. परंतु " रोगें दाटला । आणि उदास ओखदीं " या वाक्यानें वृक्षौषधींची थोडीसी सूचना हि दिली आहे. आणि आमचें मत असेंहि आहे कीं, गंहू तांदूळ इत्यादिकांचें भक्षण करणें देखील हिंसा आहे. कारण योगसूत्रभाष्यांत नुसता ध्यानाचा आहार करून राहणारे कांहीं लोक आहेत, असें सांगितलें

आहे. परंतु तेवढी ज्या लोकांची गति नाहीं त्यांनीं शरीर वांचविण्यापुरतें अन्न खाऊन परमेश्वराजवळ क्षमा मागावी. परमेश्वरार्थ शिजविलेल्या अन्नांतील जीवांनां सत्संकल्पबलानें दुःख होत नाहीं. सर्वांनांच अग्निस्पर्शानें दुःख होतें, हा नियम नाहीं. कारण मणि, मंत्र, औषधि, व संकल्प इत्यादिकानें अग्नीचा प्रतिबंधहि होतो. वृक्षादि जीवांचा जात्यंतरपरिणाम केवल सत्संकल्पानें होत असून, पशूंचा शुद्ध जात्यंतरपरिणाम वेदमंत्रानें होतो. तो कसा हे स्कंदपुराणांतील वचनें घेऊन पूर्वीच सांगितलें. अथवा वृक्षजीवांची हिंसा करणें, ही अल्प हिंसा आहे, ह्मणून चेतन प्राण्याची हिंसा करणें योग्य आहे, असा त्यावरून विधि निघत नाहीं. सर्व लोक धान्य शिजवून अन्न खातात, ह्मणून राग्नीनें अन्न पचवून झालेली विष्ठाहि खावी असा विधि निघेल काय? श्रीमच्छंकराचार्यवचन स्कंदपुराणासीं समन्वित मानलें असतां आमचा कांहीं विरोध नाहीं. पण सध्यांच्या याज्ञिकाप्रमाणें त्यांच्या वचनाचा अर्थ केल्यास आह्माला आचार्यांपेक्षां तातांचीच अपेक्षा अधिक आहे. ती कशी हें अडाणी लोकांतील एका ह्मणीचा दृष्टान्त देऊन सांगतों. व त्या ह्मणीची भाषाहि त्या लोकांचीच येथें लिहितों:—

एक मानुस आपले घर सेकारत होता. त्याच पोरग आंगनांत आल. तहा ह्या मानसान आपल्या बापाले ह्मनल, "बाबा! त्याले सावलींत ने गा ऊन लागते" तहा त्या मानसाच्या बापानही त्या मानसाले ह्मनल "बाबू तूही खाल्या उत्तर मी घर सेकारतो" मानसान ह्मनल, "कां बोवा? मले काय होते? बाबान ह्मनल– तुह्या पोराची तुले उनींत फिरूं नये ह्मणून कायजी हाय. त तू कोन व्हयस् माहा? मले नाहीं काय तुही कायजी?

याप्रमाणें तातांचा माझा साक्षात्संबंध असल्यामुळें तातांचें प्रेमच माझ्यावर परंपरासंबंधीं आचार्यांपेक्षां अधिक आहे; असें मला वाटतें. आणि तातांच्या ह्मणण्यालाच महाभारतादि पुष्टि देत असल्यामुळें, तातवचनच आह्माला अत्यंत प्रमाण आहे.

शिष्य–आपण ज्याप्रमाणें तातांचा संबंध प्रत्यक्ष मानतां, त्याप्रमाणें आह्मी आपला संबंध प्रत्यक्ष आणि तातांचा संबंध परंपराजन्य मानावा काय?

श्रीगुरु— हें मला विचारण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण विचारलें आहेस तर उत्तर देतों. तूं तातांचा परंपराजन्यसंबंध मानूं नयेस. माझ्यापेक्षांहि साक्षात् मानावास. कारण मी जीव आहें आणि तात ईश्वर आहेत. असमर्थ पुरुषाच्या लेंकराचा सांभाळ आजाच करीत असतो; किंवा माझा कोणी शिष्यहि नाहीं. केवळ तातांचें ह्मणणें स्पष्ट करणें एवढेंच माझें काम आहे. मग मला हा प्रश्न करण्याचें कांहीं कारण नाहीं. 'संप्रदाय' शब्दाचा तातसंप्रदायाला अनुसरून मी उपयोग केला आहे. अथवा तातांनां गुरूआज्ञेची अपेक्षा नाहीं. कारण गुरु आणि त्यांची भिन्नता कधीं उत्पन्न झाली नाहीं. मला अझून ताताज्ञेची अत्यंतच अपेक्षा आहे. ह्मणून मी ताताधीन असल्यामुळें तूंहि अत्यंतच मत्संबंधी ह्मणून तात.धीनच असावेंस. सावित्रीनें सत्यवानासवें जातानां सत्यवानाच्या सांगण्यावरून श्वशुराचीच आज्ञा पाळली. रामानें पितृआज्ञेवरून कैकेयीचीच; किंवा मीहि, तातांची अपेक्षा अधिक आहे, या आशयास्तवच वऱ्हाडी म्हण प्रमाण दिली आहे असें ह्मण. वस्तुत: तातांपेक्षां माझें, मंडळीनें अधिक ऐकावें, अशी माझ्या मनांत वृत्ति आल्यामुळें हें प्रत्यक्ष पातक आहे; म्हणून माझ्यापेक्षां तातांचेंच सर्वांनीं अधिक ऐकावें असें मी आग्रहानें सांगतों.

आतां वेदांत पशुहिंसा आहे अशा प्रकारचा अर्थ धर्मशास्त्रानेंच दूषित आहे असें नाहीं, तर वैद्यशास्त्रानेंहि दूषित आहे. हें चरकाचार्यांचें वचन प्रमाण देऊन तुला सांगतों. अतिसाराचा इतिहास देतानां चरकाचार्य म्हणतात—

" आदिकाले खलु यज्ञेषु पशवः समालम्भनीया बभूवुर्नारम्भाय प्रक्रियन्ते स्म ततो दक्षयज्ञप्रत्यवरकालं मनोः पुत्राणां मरिष्यन्नाभागेक्ष्वाकुकुविडचार्येत्यादीनां च क्रतुषु पशूनामेवाभ्यनुज्ञानात्पशवः प्रोक्षणमवापुः । अतश्च प्रत्यवरकालं पृषध्रे दीर्घसूत्रेण यजमानेन पशूनामलाभाद्गवामालंभः प्रावर्त्तितः । तं दृष्ट्वा प्रव्यथिता भूतगणाः तेषां चोपयोगादुपकृतानां गवां गौरवादौष्ण्यादसात्म्यत्वादशस्तोपयोगाच्चोपहताग्नीनामुपहतमनसां अतीसारः पूर्वमुत्पन्नः पृषध्रयज्ञे ॥ ३ ॥

( चरक, चिकित्सास्थान, अध्या० १०. )

भावार्थ– फार प्राचीन काळीं पशूंचा वध होत नसे. नुसता त्यांचा परिग्रह केला जात असे. पुढें दक्षयज्ञानंतर मनूच्या मरिष्यन्, नाभाग, इक्ष्वाकु, कुविडचाय इत्यादि पुत्रांच्या यज्ञांत व त्यानंतर पशूंच्या अनुमतीनेंच मांस बली देण्याची प्रथा सुरू झाली. पुढें कांहीं कालानंतर पृषध्रानें एक दीर्घसूत्री यज्ञ केला. त्यावेळीं पशु न मिळाल्यामुळें त्यानें गोवध सुरू केला. याप्रमाणें आपल्यास अत्यंत उपयोगी पडणाऱ्या गाईची ही दशा पाहून, सर्व प्राणिमात्रास अतिशय दुःख झालें, आणि गोमांस खाणाऱ्यास तें जड, उष्ण, व मनुष्यप्रकृतीस न मानवणारें असल्यामुळें, आणि त्याचा अयोग्य उपयोग केल्यामुळें त्यांचा जठराग्नि मंद होऊन व मनहि विकृत होऊन या पृषध्रयज्ञांतच प्रथम अतिसार उत्पन्न झाला.

वादी उवाच– अहो ! पण या वाक्यांत पशूंच्या आज्ञेनेंच पशूंचा वध केला असें म्हटलें आहे.

सिद्धान्ती उवाच– म्हटलें आहे, पण त्याचा अर्थ तुला काय समजला आहे ? पशु आज्ञा कशी करीत असतात ? तेव्हां हे आज्ञा करणारे पशु कोणी तरी देव पशुयोनींत आलेले असावेत, असें म्हणण्याला काय हरकत आहे ? सर्पयोनींत जन्मलेल्या नहुषानें प्रश्न विचारले म्हणून सर्वच सर्प प्रश्न विचारणारे आहेत काय ? अष्टवसूंनां मृत्युलोकीं जन्म झाल्यामुळें, आम्ही जन्मल्याबरोबर तूं आम्हाला गंगेंत टाकून दे, असें गंगेला सांगितलें अशी कथा आहे. तेवढ्यावरून साऱ्या आर्यांनीं आपलीं मुलें नदींत टाकावीत काय ? त्याप्रमाणें देवयोनींत जन्मलेल्या पशूंनीं तूं आम्हाला यज्ञांत मार म्हणजे आम्ही स्वर्गलोकीं जाऊं असें कोणाला सांगितलें असेल, तर तेवढ्यावरूनच सरसकट पशूंचा यज्ञामध्यें वध करावा असा विधि निघत नाहीं. म्हणूनच गाईच्या यज्ञाविषयीं चरकाचार्यांनीं खेद दर्शविला आहे. याप्रमाणें पशुहिंसेचा इतिहास असल्यामुळें अनादि वेदांत ती सांगितली आहे असें म्हणणें धाडसाचें आहे.

ओवी– एवं जेथ जेथ पशुहिंसायज्ञ । तेथ तेथ हाचि अर्थ उपपन्न । मांसादि शब्दांचा अर्थ पूर्ण । रूढीतरवृत्तीनें कल्पावा ॥ २१३ ॥ यति आणि योगियासी । यज्ञहिंसा कां निषेधिली विशेषीं । सिद्धान्ती

ह्मगे यतीसी । कर्माधिकार नाहीं ह्मणोनी ॥ २३४ ॥ यज्ञादिकें शुद्ध चित्त । झालिया श्रवणादीच एक । यज्ञादि साधनें समस्त । ज्ञानासी बहिरंग होती ॥ २३५ ॥ अंतरंग श्रवणादिक । मुमुक्षूनें अंतरंग सेवावें सकळिक । बहिरंगांचा निःशंक । त्यजावा संगु ॥ २३६ ॥ ह्मणोनि तयातें कांहीं । ऋणत्रयहरणीं अधिकार नाहीं । आतां योगियातें अधिकार नाहीं । तयाचें कारण ऐकें पां ॥ २३७ ॥ मंत्रें हिंसा अहिंसा होत । परि मंत्रादि सिद्धि उपसर्ग समार्थीत । ह्मणोनि अहिंसा महाव्रत । स्वयें बोलती पतंजली ॥ २३८ ॥ सांख्यादि शास्त्रीं हिंसायज्ञ निंदिले । ते शास्त्रहिंसानिंदापर निखिलें । एवं मंत्रसामर्थ्य नसतांहि फळा आलें । अहिंसातत्व ॥ २३९ ॥ ज्या युगींचा जो धर्म । तो करावयाची सामुग्रीहि त्याचि युगीं परम । त्रेतायुगींचा यज्ञधर्म । ह्मणोनि मंत्र सामर्थ्यादि सामुग्रीहि त्याचि युगीं विशेष ॥ २४० ॥ द्वापरीं जे यज्ञ झाले । ते विभूत्यर्थचि बोलिले । सामान्य जनां निक्षेपिलें । पूजाशास्त्र तिये युगीं ॥ २४१ ॥ कलियुगींचा धर्म पूर्ण । आवडी करावें हरिकीर्तन । जो यज्ञांत नेघे अवदान । तो गोपाळासंगें जेवूं लागे ॥ २४२ ॥ पति पुत्र भाऊ बहिणी । यांची लज्जा न धरावी मनीं । मातापिता डावलोनी । हरिकीर्तनीं विनटावें ॥ २४३ ॥ कीर्तन करितां लोक । शब्द देती अनेक । तैसें आपुलें प्रारब्धपातक । क्षीण झालें जाणिजे ॥ २४४ ॥ " निंदक हा माझा कंठीचा ताईत । त्यानें केलें हित सर्व माझें " हें तुकारामोक्त । ह्मणोनि अहिंसाधर्मेंचि निश्चित । दयाळू भगवंत वश कीजे ॥ २४५ ॥ अन्नाचा सात्विक भाग तें मन । राजस भाग तें वीर्यादि जाण । तामस भाग तें मांसपूर्ण । तें भक्षितां तमोगुण अधिक वाढे ॥ २४६ ॥ यद्यपि जड अन्न तामस । तथापि त्यांतोनि लीन सात्विक भाग मिळे चित्तास । जड अन्नांतील तमःपरिणाम मांस । तेणें तामसगुणाचि वाढे ॥ २४७ ॥ वादी ह्मणे अन्न केलिया भक्षण । तरी जीवहिंसा न चुकेचि दारुण । सिद्धान्ति ह्मणे न देतां देवाकारण । आत्मार्थ शिजवितां अन्न हिंसाचि ते ॥ २४८ ॥ अतिथि आलिया गृहीं । जया आदर सर्वथा नाहीं । जवळीचिया सोडूनि मधुर खाई । हिंसक ठकलाही तो एक ॥ २४९ ॥ देवपितरअतिथींतें । देवोनि सेवी जो

यज्ञशेषातें । जो सकळ पापकिल्मिषातें । टाकोनि होय केवळ ॥ २५० ॥ " यज्ञशिष्टाशिनः संतो " हा श्लोक । तृतीयाध्यायीं बोलिले उत्तमश्लोक । अन्न भक्षिलियावीण देख । परिहार नाहीं प्राणाचा ॥ २५१ ॥ प्राणरक्षणीं भगवद्भजन । तरी अन्नान्यायें साह्य भगवान । जैसें क्षीराब्धीं गण तृप्त होती दुग्धें करून । केवळ दुग्ध पिऊन मर्त्य लोकींही वांचूं शकती ॥ २५२ ॥ तेवीं " अभयं सर्वभूतेभ्यो मत्तः स्वाहा " । येथवरी अहिंसा वाढे जेव्हां । केवळ अन्नहि न घेतां तेव्हां । योगानेंचि जीवन चाले मृत्युलोकीं ॥ २५३ ॥ ध्यानाहारी सवितर्कादिसमाधिआहारी । ऊर्ध्वलोकीं जन वर्तती निर्धारीं । हें योगभाष्यांत आचार्य वरी । बोलिले स्वयें ॥ २५४ ॥ तेवढी अहिंसा न होतां । परि अल्पमात्रहि साधतां । तरी अन्नस्थ जीवांचा तत्वतां । जात्यंतरपरिणाम होय ॥ २५५ ॥ तेणें ते सुखीचि होती । प्राणिज अन्न त्यागावें ऐसिया श्रुति स्मृति । म्हणोनि तें कवणाचिप्रति । निषिद्ध नाहीं ॥ २५६ ॥ दुसरियातें दुःख देवोन । आपुलें पोट भरणें असुरलक्षण । यालागीं वांचवायापुरतें प्राण । सेवावें अन्न मांसादिरहित ॥ २५७ ॥ मार्जार म्हपिलिया धरी कंठीं । परि दुःख न वाटे पिलियापोटीं । तेवीं करुणावंत अन्न भक्षी प्रारब्धासाठीं । परि सुखी होती जीव पोटीं जात्यंतरपरिणामें ॥ २५८ ॥ इष्टजन्मवेदनीयसंस्कार । कीं याच जन्मीं देव झाला नंदीश्वर । तेवीं सत्संगें अन्नस्थ जीवहि समग्र । जात्यंतरपरिणामें होती सुखी ॥ २५९ ॥ आतां मांसहि होईल तैसें । परि तेथ शास्त्राज्ञा उल्लंघन होतसे । म्हणोनि आपैसें । तमचि वाढे ॥ २६० ॥ ध्यानआहारादि अधिकार मोठा । तो न ये सामान्य जनांच्या वाटा । म्हणोनि वनस्पत्याहाराचा पुरवठा । सुखदायक सकळांतें ॥ २६१ ॥ एवं मांसदान । सर्वथा नाहीं मज प्रमाण । अहिंसेचें विशेष निरूपण । भावार्थदीपिकेंतून जाणावें ॥ २६२ ॥

आतां श्रियाळाप्रमाणें पुत्रार्पण माझ्या संप्रदायांत कोणी करूं नये; कारण शिवाला दिलेला पुत्र श्रियाळाला पुन्हा दिला, अशी शिवलीलामृतांत कथा आहे. परंतु मागील वर्षी नागपुरांत एका यवनानें गुरुकरितां मारलेला पुत्र पुनः जीवंत झाला नाहीं, ही गोष्ट सर्वांना विश्रुतच आहे. म्हणून पुत्रमांसार्पणहि करूं नये, व गुरुला तें मुलींना करूं नये. सर्वार्थ

पुत्र नियुक्त करण्यास मात्र प्रत्यवाय नाहीं. याप्रमाणें आत्मघातरूप प्राण समर्पणहि गुरूला कोणी करूं नये. गंगेंत वगैरे आत्मा समर्पण करावा कीं नाहीं, याचा विचार अन्यत्र करूं.

" गवार्थे ब्राह्मणार्थे च प्राणत्यागः कलौ नहि " ॥

असें धर्मशास्त्रांत वाक्य आहे; व गाईब्राह्मणांसाठीं प्राणत्याग विहित नाहीं असा त्याचा अर्थ आहे. म्हणूनहि गुरूला प्राणसमर्पण करणें मला संमत नाहीं. नानाकविमंडणादि मंडळी माझ्याकरितां प्राणत्याग करण्याचें दाखवीत असतात; तें खरें असो किंवा खोट्या भावानें असो, तसें करणाऱ्यांना अन्यजन्मीं माझा संग व भगवत्प्राप्ति होऊं नये असा मी शाप देतों. ज्यांना माझेठिकाणीं गुरुबुद्धि आहे त्यांनीं माझी आज्ञा उल्लंघिली असतां दोषबलानें अर्थात् माझा शाप फळेल; व ज्यांची गुरुबुद्धि नाहीं त्यांनीं बळेंकरून केलेल्या आत्महत्येमुळें तो शाप फळेल. श्रीतुकाराममहाराजहि वृथा आत्मघाताचा निषेध करितात.

" अतित्यायी देतां जीव । न ये कींव देवासी ॥ १ ॥
थोड्यासाठीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥ २ ॥
त्यासि परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥३॥
तुका म्हणे कृष्ण राम । स्मरतां श्रम वारिती " ॥४॥

( अभंग २४३२. )

वादी उवाच—"कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् । करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पये त्तत् " ॥ ३५ ॥

(भाग० स्कंद० ११ अध्या० २)

श्रीधरी टीका— ननु के ते भागवता धर्माः ईश्वरार्पितानि सर्वकर्माण्यपीत्याह कायेनेति । आत्मना चित्तेन अहंकारेण वा अनुसृतो यः स्वभावस्तस्मात् । अयमर्थः । न केवलं विधितः कृतमेवेति नियमः स्वभावानुसारि लौकिकमपीति । तथा च भगवद्गीतासु । " यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणमिति । यद्वा ननु कायादीनामेव कर्म आत्मन इत्याशंक्याह । अध्यासेनानुसृतात् ब्राह्मणत्वादिस्वभावान् यद्यत्करोतीत्यर्थः । तत्सकलं परस्मै परमेश्वराय नाराय-

त्मायेति समर्पयेत् । तथा सति सकलमपि कर्म भागवतो धर्मो भवतीति भावः " ॥ ३५ ॥

या श्लोकांत व टीकेंत योग्य अयोग्य सर्वच कर्मे भगवदर्पण सांगितलीं आहेत मग आपण जो एवढा कर्मार्पणाचा विचार सांगितला तो कसा ?

सिद्धान्ति उवाच– हें वचन सामान्य आहे. आम्ही जो विचार केला आहे तो भागवतांतील विशेष वचनानुसार केला आहे. विशेष वचनानें सामान्य वचनांचा बाध होत असतो. म्हणून हें वचन सामान्यमात्र आहे. किंवा ब्राह्मणादि अध्यासाच्या योगानें जो जो स्वभाव झालेला आहे, त्या त्या स्वभावानें सिद्ध झालेलें कर्म नारायणाला समर्पण करावें, असाहि अर्थ श्रीधरस्वामींनीं केला आहे; व त्यामुळें वर्णादिकांनां योग्य तेंच कर्म समर्पण करावें, असा विधि प्राप्त होत आहे. यद्यपि टीकेंत घेतलेल्या " यत्करोषि यदश्नासि " या गीतावचनावरून भोजनादि लौकिक कर्महि ईश्वरार्पण करावें, असा विधि निष्पन्न होत आहे, तथापि अपूर्वविधिद्वारा फलित अशा परिसंख्याविधीनें मलविसर्गादिकांची व्यावृत्ति करून पूर्वी सांगितल्याप्रमाणें भोजनादि कर्म योग्यायोग्य जाणून समर्पण करावें; असा गीतावचनाचा अर्थ होतो. किंवा एक क्षणहि जो परमेश्वराला विसरत नाहीं, त्याविषयीं भगवत्स्मृतिपूर्वक सर्व कर्म देखील समर्पण करण्याचा विधि या श्लोकांत सांगितला आहे. याविषयीं गरुडपुराणाचें वचन प्रमाण आहे तें सांगतों.

" वत्सस्य स्तनपाने च बालकृष्णं तु संस्मरेत् ।
दधिनिर्मथने चैव मंथाधारं स्मरेद्धरिम् ॥ ४७ ॥
मृत्तिकास्नानकाले तु वराहं संस्मरेद्धरिम् ।
पुंड्राणां धारणे चैव केशवादींश्च द्वादश ॥ ४८ ॥
मुद्राणां धारणे चैव शंखचक्रगदाधरम् ।
पद्मं नारायणीं मुद्रां क्रुद्धोल्कादींश्च संस्मरेत् ॥४९॥
श्रीरामसंस्मृतिं चैव संध्याकाले खगोत्तम ।
अच्युतानंदगोविंदाञ्छ्राद्धकाले च संस्मरेत् ॥५०॥
प्राणादिकपंचहोमे चाऽनिरुद्धादींश्च संस्मरेत् ।

अन्नाद्यर्पणकाले तु वासुदेवं च संस्मरेत् ॥ ५१ ॥
आपोशनस्य काले तु वायोरंतर्गतं हरिम् ।
वस्त्रधारणकाले तु उपेंद्रं संस्मरेद्धरिम् ॥ ५२ ॥
यज्ञोपवीतस्यच धारणे तु नारायणं वामनाख्यं स्मरेत्तु ।
आर्तिक्यकाले च तथैव विष्णोः सम्यक्स्मरेत्परशुरामाख्यविष्णुम् ॥ ५३ ॥
अपोशने वैश्वदेवस्य काले तदन्यहोमादिषु भस्मधारणे ।
स्मरेत्तु भक्त्या परमादरेण नारायणं जामदग्न्याख्यरामम् ॥ ५४ ॥
त्रिवार तीर्थग्रहणस्य काले कृष्णं रामं व्यासदेवं क्रमेण ।
शंखोदकस्योद्धरणेचैव काले मुकुंदरूपं संस्मरेत सर्वदैव ॥ ५५ ॥
ग्रासे ग्रासे स्मरणं चैव कार्यं गोविंदसंज्ञस्य विशुद्धमन्नम् ।
एकैकभक्ष्यग्रहणस्य काले सम्यक् स्मरेदच्युतं वै खगेंद्र ॥ ५६ ॥
शाकादीनां भक्षणे चैव काले धन्वन्तरिं संस्मरेच्चैव नित्यम् ।
तथा परान्नस्य च भोगकाले स्मरेच्च सम्यक् पांडुरंगं च विष्णुम् ॥५७॥
हैयंगवीनस्य च भक्षणे वै सम्यक् स्मरेत्तांडवाख्यं च कृष्णम् ।
दध्यन्नभक्ष्ये परमं पुराणं गोपालकृष्णं संस्मरेच्चैव नित्यम् ॥ ५८ ॥
दुग्धान्नभोगे च तथैव काले सम्यक् स्मरेच्छ्रीनिवासं हरिं च ।
सुतैलसर्पिःषु विपक्वभक्ष्यसंभोजने संस्मरेत् व्यंकटेशम् ॥ ५९ ॥
द्राक्षासुजंबूकदलीरसालनारिंगदाडिंबफलानि चारु ।
स्मरेत्तु रंभोत्तमनारिकेलधात्रीसुभोगे खलु बालकृष्णम् ॥ ६० ॥
सुपानकस्यैव च पानकाले सम्यक् स्मरेन्नारसिंहाख्यविष्णुम् ।
गंगामृतस्यैव च पानकाले गंगाताातं संस्मरेद्विष्णुमेव ॥ ६१ ॥
प्रयाणकाले संस्मरेत्तार्क्ष्यवाहं नारायणं निर्गुणं विश्वमूर्तिम् ।
पुत्रादीनां चुंबने चैव काले सुवेणुहस्तं संस्मरेत्कृष्णमेव ॥ ६२ ॥
सुसंगकाले स्वस्त्रियश्चैव नित्यं गोपीकुचद्वंद्वविलासिनं हरिम् ।
तांबूलकाले संस्मरेच्चैव नित्यं प्रद्युम्नाख्यं वासुदेवं हरिं च ॥ ६३ ॥
शय्याकाले संस्मरेच्चैव नित्यं संकर्षणाख्यं विष्णुरूपं हरिं च ।
निद्राकाले संस्मरेत्पद्मनाभं कथाकाले व्यासरूपं हरिं च ॥ ६४ ॥
सुगानकाले संस्मरेद्वेणुगीतं हरिं हरिं प्रवदेत्सर्वदैव ।
श्रीमत्तुलस्याश्छेदने चैव काले श्रीरामरामेति च संस्मरेत्तु ॥ ६५ ॥

पुष्पादीनां छेदने चैव काले सम्यक् स्मरेत्कपिलाख्यं हरिं च ।
प्रदक्षिणे गारुडांतर्गतं च हरिं स्मरेत्सर्वदा वै खगेंद्र ॥ ६६ ॥
प्रणामकाले देवदेवस्य विष्णोः शेषांतस्थं संस्मरेच्चैव विष्णुम् ।
सुनीतिकाले संस्मरेन्नारसिंहं नारायणं संस्मरेत्सर्वदापि ॥ ६७ ॥
पूर्तिर्यदा क्रियते कर्मणां च सम्यक् स्मरेद्वासुदेवं हरिं च ।
एवं कृतानि कर्माणि हरिप्रीतिकराणि च ॥ ६८ ॥ अर्थ स्पष्ट.

( गरुड महापुराण, उत्तरखंड, तृतीयांश ब्रह्मकांड, अध्याय, २९. )

परंतु यांतहि मलविसर्गादिक कर्म स्मृतिपूर्वक सांगितलें नाहीं. इतर आगमांत मलविसर्गादिकांचे मंत्र मात्र आहेत. हें असो. अथवा हा श्लोक एकनाथांनीं सिद्धपर लाविला आहे. त्यांचें सर्व कर्म ब्रह्मरूप होत असल्यामुळें त्याविषयीं आमचें कांहीं म्हणणें नाहीं. कर्मार्पणविचार आम्ही साधकभक्ताकरितांच सांगितला आहे.

वादी उवाच–"बहिरंगसाधनमशेषगुरोः परमेश्वरस्य चरणांबुजयोः । नियमात्समर्पितमशेषमघं विनिहन्ति बुद्धिनिलयं सुमहत् "

( संक्षेपशारीरक, अध्या०, ३. श्लो०, ३५१. )

टीका– न त्वंतरंगसाधनानुष्ठानस्येह वाऽमुत्रवा विद्याहेतुत्वनियमवद्बहिरंगसाधनानुष्ठानस्यापि नियतं विविदिषाहेतुत्वं वक्तव्यम् । नचैतदस्ति अनादिभवपरंपरायां केषुचिज्जन्मसु सर्वेषां वेदानुवचनाद्यनुष्ठानवतामपि विविदिषाभावादित्याशंक्य सर्वेषां समस्तप्रतिबंधकदुरितनिवर्त्तकानुष्ठानविशेषाभावाद्विविदिषाभाव इत्यभिप्रेत्य तन्निवर्त्तकं तदनुष्ठानविशेषमाह । बहिरंगेति । मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनंचेति भगवद्वचनात्स एव सर्वगुरुः । ततश्च तत्प्रीणनमवश्यं कार्यमित्यभिप्रेत्याशेषगुरोरित्युक्तम् । क्रियमाणमात्रविषयत्वं समर्पणस्य नियमादित्युक्तम् ॥ ३५१ ॥

श्लोक.

न तथांतरंगमुपलब्धिजने । ऽपकारकं शमदमप्रभृति ।
तदनुष्ठितं परमहंसजनैः परमात्मतत्वमुपलंभयति ॥३५२॥

टीका– तर्ह्यंतरंगसाधनानामप्यनुष्ठेयत्वाविशेषादीश्वरार्पणं कार्यमिति नेत्याह न तथेति । तथा बहिरंगवदीश्वरे समर्पणेनेत्यर्थः । अत्र च स्वयमेव नियामकं वक्ष्यति । तथाप्यनधिकारिणानुष्ठितं श्रवणादि न तदुपकारकं

किन्तु विवेकवैराग्यादिपूर्वकं त्यक्तैषणात्रयाधिकारिणानुष्ठितं सदात्मतत्वसाक्षात्कारकरमित्याह तदनुष्ठितमिति ॥ ३५२ ॥

श्लोक.

भगवाननादिनिधनः कृपया हरिरेतदाह जगदेकहितः ।
सकलं समर्प्य मयि युक्तमनाः कुरु कर्म शुद्धिकरमित्यसकृत् ॥३५३॥

टीका— कर्मणामीश्वरेऽर्पितानां चित्तशुद्ध्यादिद्वारा ज्ञानहेतुत्वमित्यत्र मानमाह । भगवानिति । "यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः । संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते" । इत्यादि भगवद्वचनमुक्तार्थे मानमित्यर्थः । तेषां वचनानामुक्तार्थे तात्पर्यवत्वज्ञापनायासकृदित्युक्तम् ॥ ३५३ ॥

श्लोक.

न तथांतरंगफलसंन्यसनं क्वचिदूचिवानत इदं विदितम् ।
अनपेक्ष्य तत्फलपरित्यजनं परमात्मनिश्चयफलं तदिति ॥ ३५४ ॥

टीका— अंतरंगसाधनानामीश्वरार्पणं कार्यमित्यत्र मानाभावात्तेषां तेन विनापि तत्वधीहेतुत्वं युक्तमिति वैषम्यमाह न तथांतरंगफलेति । इदमुक्तं विवृणोति अनपेक्ष्येति तच्छद्वद्वयमंतरंगसाधनविषयमितीदं विदितमिति संबंधः ॥ ३५४ ॥

श्लोक.

अपि च बंधनहेतुतया श्रुतं सकलमीक्षणकौशलशालिनः ॥
भवति शुद्धिकरं न च बंधकृद्भवति कर्म तथा घटते हि तत् ॥३५५॥

टीका— उक्तविभागे नियामिकां युक्तिमप्याह । अपिचेति । सकलं कर्मेति संबंधः । पाठान्तरे ब्रह्मार्पणबुद्ध्यानुष्ठानं समसमीक्षणकौशलम् । यद्यपि कर्मणां स्वभावतो बंधफलत्वं " पुण्यः पुण्येन कर्मणा भवति पापः पापेन " " धर्मरज्ज्वा व्रजेदूर्ध्वं पापरज्ज्वाव्रजेदध " इत्यादिवचनादवगतम् । तथापि तानीश्वरे समर्पितानि बंधहेतुत्वं विहाय चित्तशुद्धिकराणि भवंति । उक्तंहि "एवं क्रियायोगपथाः सर्वे संसृतिहेतवः । त एव ह्यात्मनाशाय कल्पन्ते कल्पिताः पर इति । भगवताप्युक्तम् । "यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोयं कर्मबंधनः । तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचरेदिति " ॥ तस्मादुक्तवि-

षाराधीने क्षणकौशलवतस्तथैवानुष्ठितं कर्म न बंधकृद्भवति । किन्तु चित्त-शुद्धिकरमेव भवतीति तथैव तदनुष्ठेयमित्यर्थः । ननु स्वभावतो बंध हेतोः कर्मणः कथमीश्वरे समर्पणेऽपि विपरीतकार्यहेतुत्वं शक्तिविपर्ययायोगादित्याशंक्याह । तथा घटत इति । हिं शब्दो दृष्टान्तप्रदर्शनार्थः । यथा दधि-विषादेः केवलस्य स्वभावतोज्वरमरणादिहेतोरपि मधुमंत्रादियुक्तस्य पुष्टि-जीवनादिहेतुत्वं तथैतदपि घटत इत्यर्थः ॥ ३५५ ॥

श्लोक.

तदिह साधनमात्मधियः श्रुतं । न च फलांतरहेतुतया श्रुतं ॥
शमदमादिकमत्र तु कौशलम् । किमपि कांक्षितमस्ति न सिद्धये ॥३५६॥

टीका— एवं बहिरंगसाधनस्य यज्ञादेः स्वतो बंधहेतोरपि विविदिषायां पर्यवसानायेश्वरार्पणबुद्ध्यानुष्ठानं कार्यमित्युक्तम् । इदानीमंतरंगसाधनस्य तत्वधीजननाय न तदपेक्षेति युक्तितो दर्शयति । तदिहेति । यच्छमदमादीति संबंधः । इह शास्त्रे । नचेत्यस्मात्प्राक् तदित्यध्याहार्यम् चोऽवधारणे । शुद्धिः फलांतरपदार्थः । अत्र शमदमाद्यनुष्ठाने । शमादिमदनुष्ठितश्रवणादीनां स्वतः फलांतरहेतुत्वे मानाभावात्तद्विघटनायेश्वरे समर्पणस्यानपेक्षितत्वात्तदनुष्ठान मात्रमेव तत्वज्ञानायोपकरोतीत्यर्थः ॥ ३५६ ॥

या श्लोकांत बहिःकर्मच भगवदर्पण करण्याचा नियम सांगितला आहे. अंतःकर्म भगवदर्पण करण्याचा नियम सांगितला नाहीं. ह्मणून भागवद्धर्म सर्वश्रेष्ठ आहे असें ह्मणतां येत नाहीं.

सिद्धान्ति उवाच— या श्लोकांचा भावार्थ तूं सांगितला तसाच आहे; पण या श्लोकांत सांगितलेलें अंतःकर्मच भागवद्धर्मरूप असल्यामुळें, व भगवत्प्राप्ति त्या कर्माचें साक्षात्फल असल्यामुळें, व अन्यथा अंतःकर्माचें फल दृष्ट नसल्यामुळें, व बहिःकर्माप्रमाणें तें बाधरूप नसल्यामुळें, शमद-आदि कर्म भगवदर्पण केलेंच पाहिजे असा नियम करण्याची अवश्यकता नाहीं. परंतु " कायेन वाचा " या श्लोकांत मनबुद्धीनें केलेलेंहि कर्म भगवंतास अर्पण करण्यास सांगितलें आहे; व त्यांत कायेन, वाचा, मनसा, इंद्रियेण, बुद्ध्या, आत्मना, स्वभावात् इत्यादि प्रत्येक पदाला एकवचन असून, " वा " हें पद असल्यामुळें अंतर्बहिःकर्माचा शेषशेषी-भावें करून समुच्चय संभवत नाहीं. म्हणजे अंतःकर्म अंग होऊन बहिः

कर्म अंगी झाल्यावर समुच्चयानें तें कर्म ईश्वरार्पण करावें, असा या श्लोकांचा अर्थ होत नाहीं; तर प्रत्येक कर्मच भगवदर्पण करावें असा विधि होतो. यांत मनबुद्धि इत्यादींनें केलेलें कर्म परमेश्वरार्पण करावें, या वचनानें अर्थांतच अंतःकर्महि परमेश्वरार्पण करावें असा विधि उपपन्न होतो. पुनः

धर्मः सत्यदया-पेतो विद्या वा तपसान्विता ।
मद्भक्त्याऽपेतमात्मानं न सम्यक्प्रपुनाति हि ॥
भाग०, स्कं०, ११. अ०, १४, श्लो०, २२.

श्रीधरी टीका– भक्त्यभावेऽन्यत्साधनं व्यर्थमित्याह द्वाभ्याम् । धर्म-इति ॥ २२ ॥

न रोधयति मां योगो न सांख्यं धर्म एव च ।
न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥१॥
( भाग० स्कं० ११ अ० १२ )

श्रीधरी टीका– न रोधयति न वशीकरोति । योग आसनप्राणायामादिः । सांख्यं तत्त्वानां विवेकः । धर्मः सामान्यतोऽहिंसादिः । स्वाध्यायो वेदजपः । तपः कृच्छ्रादि । त्यागः संन्यासः । इष्टापूर्तमिष्टं च पूर्तंच । तत्रेष्टमग्निहोत्रादि । पूर्तं कूपारामादिनिर्माणम् । दक्षिणा शब्देन सामान्यतो दानं लक्ष्यते ॥ १ ॥

युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन्दृश्यते पुनरुत्थितम ॥६२॥
(भाग० स्कं० १० अ० ५१)

श्रीधरी टीका— व्यतिरेकमाह । युंजानानामिति । उत्थितं विषयाभिमुखं ॥ ६२ ॥

इत्यादि श्लोकांत भक्तिरहित मानसकर्मांचीहि व्यर्थता दाखविली असल्यामुळें, आमच्या ह्मणण्यालाच पुष्टी येते. श्रीधरस्वामीहि भगवंताला अर्पण केलेले सर्व धर्मच भागवतरूप होतात असें ह्मणतात.

वादी उवाच– अहो ! ज्ञानोत्तरभक्तालाच हे भागवतधर्म उपयोगाचे असोत, परंतु साधकाला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. निर्गुण उपासना-साधकच मुख्याधिकारी सांगितला आहे.

सिद्धान्ति उवाच– तूं वेदान्त उत्तम ऐकला नाहींस. ज्ञानोत्तरभक्तीनें जीवन्मुक्ति मिळते हें आह्मी बहु ग्रंथांचे ठिकाणीं सांगितलें आहे. तसेंच साधक दशेंत असलेलीच भक्ति शीघ्र जीवन्मुक्तिफल देणारी होते, असेंहि आह्मी अन्य ग्रंथांत ह्मटलें आहे. यद्यपि वासनाक्षयाचा अभ्यास जीवन्मुक्तीला आवश्यक असा स्वामी विद्यारण्यांनीं सांगितला आहे, तथापि तो गौणाधिकारियाकरितांच आहे असें निःपक्षपातानें ' तत्वानुसंधानांत ' व त्याच्या ' अद्वैतकौस्तुभ ' टीकेंत ह्मटलें आहे.

" कृतोपासनस्य मुख्याधिकारिणस्तदपेक्षाभावेप्यकृतोपास्तेरस्मदादेस्तदभावे चित्तविश्रांत्यभावात् । उत्पन्नमपि तत्वज्ञानं विषयाबाधात् प्रमारूपमज्ञाननिवर्त्तकमपि असंभावनादिसंभवान्नतत्सुखकरमिति वासनाक्षयमनोनाशाभ्यासोपेक्षितः " ॥

अद्वैतकौस्तुभटीका–

कृतोपासनस्येति । शास्त्राधिकारिणो द्विविधाः मुख्या अमुख्याश्चेति । ये सगुणब्रह्मसाक्षात्कारपर्यंतमुपास्तिं कृत्वा परमेश्वरप्रसादेन दोषदर्शनात् वैराग्यादिसाधनसपन्नाः ज्ञानोद्देशेन श्रवणादौ प्रवर्तंते तेषां सकृच्छ्रवणादिना जीवन्मुक्तिपर्यवसायि तत्वज्ञानमुदेति प्रागेव योगाभ्यासेन चित्तैकाग्रतायाः संपन्नत्वात् । कृतोपासनानां तादृशमुख्याधिकारिणां वासनाक्षय मनोनाशाभ्यासो नापेक्षितः । ये पुनरिदानींतना अकृतोपास्तिकाः साधनसंपन्नाः जिज्ञासया श्रवणादौ प्रवर्तन्ते तेषाममुख्याधिकारिणामस्मदादीनां सम्यगनुष्ठितश्रवणादिभिस्तत्वसाक्षात्कार उत्पद्यत एव । उत्पन्नेऽपि तत्वसाक्षात्कारे वासनाक्षयमनोनाशयोः सम्यगनभ्यस्तत्वेन चित्तविश्रांतेरभावात् प्रमाणजन्यत्वाद्विषयाबाधाच्च प्रमारुपोऽपि ब्रह्मसाक्षात्कारः कदाचिदसंभावनादिप्रतिबंधसभवेनाज्ञाननिवर्त्तनयोग्योपि प्रारब्धापादितभोगवासनया दोधूयमानत्वात् स वातस्थदीपवदज्ञाननिवर्तनक्षमो न स्यादतस्तेषाममुख्याधिकारिणां संभावितप्रतिबंधनिवृत्यर्थं वासनाक्षयमनोनाशाभ्यासः कर्त्तव्योऽपेक्षितः " ।

( अद्वैतकौस्तुभ चतुर्थ परिच्छेद. )

भावार्थ— शास्त्राधिकारी दोन प्रकारचे मुख्य व अमुख्य. ज्यानें सगुणसाक्षात्कारापर्यंत उत्तम उपासना करून साधनचतुष्टय संपादिलें आहे, तो मुख्य अधिकारी होय. त्याला ज्ञान झालें असतां भक्तिबलानेंच

त्याची जीवन्मुक्ति सिद्ध होत असते. त्यामुळें त्याला मनोनाश, वासना-क्षय यांचा अभ्यास अपेक्षित नाहीं. परंतु आमच्या सारखे जे अमुख्य अधिकारी आहेत, त्यानां झालेलें ज्ञानहि सुखकर होत नाहीं. ह्मणून त्यांना वासनाक्षय, मनोनाश यांचा अभ्यास ज्ञानानंतर जीवन्मुक्तीसाठीं करावा लागतो.

हे मूलकार व टीकाकार अत्यंत निःपक्षपाती आहेत. यः दोघां-नींहि " अस्मदादेः " या पदानें आपणास अमुख्याधिकारियांत गणलें आहे. वेदान्तामध्यें आमच्यापेक्षां भगवद्भक्त श्रेष्ठ आहेत असें ह्मणणारे हेच महात्मे दिसतात. हे आपल्याला अकृतोपासकांत गणत असल्या-मुळें यांनीं केलेलें कृतोपासकांचें वर्णन अधिक प्रमाण आहे. यांच्या वचनावरून अमुख्याधिकारियांचा संन्यासधर्म शमदमादिकानें सिद्ध होत असून मुख्याधिकारियांचा भागवतधर्म सिद्ध होत आहे.

वादी उवाच— ब्रह्मसूत्राच्या तृतीयाध्यायाच्या तृतीय पादांत सांगितलेल्या ह्या उपासना आहेत काय ?

सिद्धान्ति उवाच— नाहीं, त्या उपासनामध्यें कर्मभगवदर्पणता स्पष्ट बोधित नाहीं; व या उपासनेंत स्पष्ट बोधित आहे. भागवतांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं,

" वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।
जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् " ॥७॥
( भाग० स्कं० १ अ० २ )

अर्थ स्पष्ट. आतां साधनभक्तीची अनुवृत्ति ज्ञानानंतर रहात नाहीं असें कोणी ह्मणूं नये. कारण,

" भक्तिःपरेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ।
प्रपद्यमानस्य यथाश्नतः स्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोऽनुघासम् ॥४२॥
( श्रीमद्भागवत, स्कंध० ११ अध्या० २ )

भावार्थ-- आतां जी गति योगी जनानां बहुत जन्मानींहि दुर्लभ आहे, ती केवळ नामसंकीर्तनानें एकाच जन्मामध्यें कशी प्राप्त होईल ? अशी शंका आली असतां, दृष्टान्तसहित सांगतात कीं, जशी भोजन करणाऱ्या पुरुषाला ग्रासाग्रासानेंच नाहीं तर शिताशितानेंहि संतोष, पोट-

भरणें व क्षुधेची निवृत्ति हीं होतात, त्याप्रमाणें भगवंताचें भजन करणाऱ्या पुरुषाला प्रेमलक्षणभक्ति, प्रेमाच्या आश्रयरूप भगवंताच्या स्वरूपाची स्फूर्ति, व तिनें तृप्त झालेल्याला गृह, स्त्री इत्यादिकांविषयीं वैराग्य हे तिन्हीं प्रकार, भजनाच्या वेळीं एकदम प्रकट होतात; आणि जशी पुष्कळ ग्रास भक्षण केल्यानें सुखादिकांची वृद्धि होते, त्याप्रमाणें पुष्कळ भजन केल्यानें परमभक्ति वगैरे प्राप्त होतात. ॥ ४२ ॥

" इत्यच्युतांघ्रिं भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ॥
भवन्ति वै भागवतस्य राजंस्ततः परां शांतिमुपैति साक्षात् ॥४३॥
( श्रीमद्भागवत स्कं० ११ अध्या० २ )

भावार्थ— हे राजा ! याप्रमाणें अविच्छिन्नपणानें भगवंताच्या चरणाचें भजन करणाऱ्या भगवद्भक्ताला भक्ति, वैराग्य आणि ज्ञान हीं प्राप्त होतात; आणि नंतर तो अंतकाळीं परमशांति पावतो ॥ ४३ ॥

या श्लोकांत " इत्यच्युतांघ्रिं भजतोऽनुवृत्त्या " या वचनानें साधनरूप भक्ति सांगितली असून, " भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः भवंति वै भागवतस्य " या वचनानें जीवन्मुक्तिस्थ फलरूपभक्ति सांगितली आहे. " ततः पराम् " इत्यादि भगवत्समाधिपर किंवा विदेहमुक्तिपर समजावें.

" मांहि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यांति परां गतिम् " ॥३२॥
( गीता अ० ९ श्लोक ३२ )

या भगवद्वाक्यांतहि साधनभक्तीनें कोणीहि मुख्याधिकारी होतो, असा भागवत धर्म दर्शविला आहे.

शिष्य उवाच— महाराज ! ते भागवत धर्म कोणते ?

श्रीगुरु उवाच— " ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये ।
अंजः पुंसामविदुषां विद्धि भागवतान्हि तान् ॥३४॥
( श्रीमद्भागवत स्कंध ११ अध्या० २ )

श्रीधरी टीका— भागवतधर्मलक्षणमाह । ये वै इति । मन्वादिमुखेन वर्णाश्रमादिधर्मानुक्त्वाऽतिरहस्यत्वात्स्वमुखेनैव भगवता विदुषामपि पुंसामंजः सुखेनैवात्मलब्धये ये वै उपायाः प्रोक्तास्तान्भागवतान्धर्मान्विद्धि ॥ ३४ ॥

यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् ।
धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥३९॥

( भाग० स्कं० ११ अ० २ )

श्रीधरी टीका— अंजः पदेनोक्तं सुकरत्वं विवृणोति । यानिति । यानास्थायाश्रित्य योगादिष्विव न प्रमाद्येत विघ्नैर्न विहन्येत । किं च निमील्य नेत्रे धावन्नपि इह येषु भागवतधर्मेषु न स्खलेत् । निमीलनं नामाज्ञानम् । तथाहुः । श्रुतिस्मृती उभे नेत्रे विप्राणां परिकीर्तिते । एकेन विकलः काणो द्वाभ्यामंधः प्रकीर्तित इति ।

अज्ञात्वापीत्यर्थः । यथा पदन्यासस्थानमतिक्रम्य शीघ्रं परतः पदन्यासेन गतिर्धावनं तद्वदत्रापि किंचित्किंचिदतिक्रम्यातिशीघ्रानुष्ठानं धावनम् । तथाऽनुतिष्ठन्नपि न स्खलेन्न प्रत्यवायी स्यात्तथा न पतेत्फलान्न भ्रश्येत् ॥ ३५ ॥

भावार्थ स्पष्ट आहे. श्रुति स्मृति न जाणून देखील ह्या धर्मांचें कशाहि रीतीनें अनुष्ठान केलें तरी प्रत्यवायादिकांची कांहीं भीति नाहीं. हेच धर्म तातांच्या वचनांनीं पुढें स्पष्ट करूं

वादी उवाच- वैष्णवधर्महि नाना प्रकारचे प्रत्यवायान्वित वराहपुराणादिकांत सांगितले आहेत. तेव्हां भागवतधर्माला आपण सुलभ कसें ह्मणतां ?

सिद्धान्ती उवाच -वैष्णवधर्म दोन प्रकारचे आहेत. आगमिक व भागवत. नाना पुराणांत सांगितलेले असून जे बहुप्रत्यवायान्वित आहेत व ज्यांत नैगमिक किंवा आगमिक कर्मसमुच्चय आहे ते पहिले; त्याचें निरुपण गौतमतंत्रादिकांत केलें आहे. आणि श्रीमद्भागवतांत सांगितलेले नामस्मरणादिक भागवतधर्म समजावे. शांडिल्यादिकांनीं आगमिक धर्माचा प्रचार केला आहे. व नारदादिकांनीं भागवतधर्माचा प्रचार केला आहे. त्याचप्रमाणें कलींतहि यामुनरामानुजादिकांनीं आगमिक धर्माचा प्रचार व आचार्य, तात, नाथ, तुकारामादिकांनीं भागवतधर्माचाच प्रसार केला आहे. क्वचित् भागवतधर्मांतहि आगमिक धर्माचा अंश येतो. व तो उपादेय असल्यामुळें आह्मी पुढें सांगूं. व तदनुकूल अन्यत्र असलेलाहि सांगूं.

ओवी— एवं बोलिला विचार । येथ उणें पुरें उपसाहोत समग्र । परि धर्म तो एक निर्धार । शार्ङ्गधर शरणता ॥ २६३ ॥ तंव वादी ह्मणे कर्माविण । योग्य नाहीं उपासन । ऐसे आचार्य बोलिले भगवान । ईशोपनिषद्भाष्यामाजीं ॥ २६४ ॥ तंव सिद्धान्ती ह्मणे बोलिले यथार्थ । परी ते ईश्वरोपासनासंबंधरहित । कैवल्योपनिषदीं संन्यासीयाप्रत । सगुण रुद्रोपासना बोलिली ॥ २६५ ॥

अंत्याश्रमस्थः सकलेंद्रियाणि निरुध्य भक्त्या स्वगुरुं प्रणम्य ।
हृत्पुंडरीकं विरजं विशुद्धं विचिन्त्य मध्ये विशदं विशोकम् ॥ ५ ॥

जरी कर्मसमुच्चयेकरून । विहित असते भगवदुपासन । तरी संन्यासियाकारण । अधिकार न होता तयाचा ॥ २६६ ॥ ईशावास्य श्रुतींत । केवळ विद्या शब्द प्रतीत । तयाचा अर्थ तो कांहीं पंडित । आनही करिती ॥ २६७ ॥ विद्या शब्दें करोनी निश्चिती । संदिग्ध ईशावास्य श्रुति । आणि स्पष्ट कैवल्योपनिषच्छ्रुति । यालागीं संदिग्ध श्रुति स्पष्ट श्रुतीस संकोचिना ॥ २६८ ॥ आणि रामचंद्र पंडिती । केली ईशावास्य रहस्यवृत्ति । तींत एक प्रमाण घेतली स्मृति । तीही विचारार्थी ऐकावी ॥ २६९ ॥

उपासते केवल कर्मजालं ये संसरंतीह पुनःपुनस्ते ।
तेभ्योऽधिकं यांति गतागतं ते उपासते केवल दैवतानि ॥

दैवतानि हे बहुवचन । श्लोकामाजीं उपपन्न । यालागीं ज्या देवता ईश्वरभिन्न । बोलिले तदुपासन कर्मसमुच्चित ॥ २७० ॥ कलिसंतरणोपनिषच्छ्रुति । अविधि नामस्मरणे सांगे मुक्ति । तयाची विशेष रीति । भक्तिभाष्यांत पहावी ॥ २७१ ॥ केवळ उलटे नाम जपून । वाल्मिकी तरला म्हणे अध्यात्मरामायण । अजामिळ तरला पुत्रनामान । भागवत प्रमाण येविषयीं ॥ २७२ ॥ केदारतीर्थी जावोनी साचार । वसिष्ठ सोडिला आचार । ऐसी पुराणीं कथा सुंदर । तीर्थमहात्म्यपर असे ॥ २७३ ॥ यालागीं भगवदुपास्तीच्या ठायीं । कर्मसमुच्चय अपेक्षित नाहीं । ह्मणवोनी मी विनवी सर्वांही । भागवत धर्म आश्रयावा ॥ २७४ ॥ सर्वथा भगवंतचि शरण । हें भागवत धर्माचें लक्षण । आब्रह्मस्तंबपर्यंत जन ।

अधिकारी पूर्ण ययाचे ॥ २७५ ॥ इतर धर्मांची नवल रीति । वसूनें अप्रमाण म्हणता हिंसा श्रुति । तरी तो पावला अधोगति । कथा निश्चिती भारती हे ॥ २७६ ॥ तैसीच दुसरी कथा । वसूनें पशु भक्ष्य सांगता । तरी तेणें पाताळीं तत्वता । शिरला तो ॥ २७७ ॥

श्रूयते हि पुरा कल्पे नृणां व्रीहिमयः पशुः ।
येनायजंत यज्वानः पुण्यश्लोकपरायणा ॥ ५६ ॥
ऋषिभिः संशयं पृष्टो वसुश्चेदिपतिः पुरा ।
अभक्ष्यमपि मांसं यः प्राह भक्ष्यमिति प्रभो ॥ ५७ ॥
आकाशादवनिं प्राप्तस्ततः स पृथिवीपतिः ।
एतदेव पुनश्चोक्त्वा विवेश धरणीतलम् ॥ ५८ ॥

( भारत अनु० प० अ० ११५ )

तिसरी कथा महाभारतीं । एक द्विज करित असता मखसंपत्ति । हिंसा विचार येता चित्तीं । धर्म म्हणे तुझे मखफळ गेले ॥ २७८ ॥ देशकाळाच्या अपेक्षेकरून । धर्माते येत अधर्मपण । अधर्महि देशकालेंकरून । धर्म होय ॥ २७९ ॥

भवत्यधर्मो धर्मोहि धर्माधर्मावुभावपि ।
कारणाद्देशकालस्य देशकालः स तादृशः ॥ ३ ॥

( भारत शां० रा० अ० ८० )

जगन्नाथक्षेत्री प्रसादांत । वर्णभेद पाहता पतन होत । गंगोदक घेता मद्यभांडांत । तरी पतन होत निश्चये ॥ २८० ॥ कलिधर्म न चालती कृतीं । आणि कृतीचे धर्म कलींत न होती । संपद्धर्म निराळे असती । आपद्धर्म वेगळे ॥ २८१ ॥ तपें स्वर्गासी अवघे जाती । परी तपचि व्यर्थ झाले कौषिकब्राह्मणाप्रति । ऐसीहि कथा महाभारतीं वर्णिली आहे ॥ २८२ ॥ ह्मणोनी धर्माचा निर्णय करिता । अत्यंत दुस्तर होय वार्ता । युधिष्ठिरें बोलिले तत्वता यक्षप्रश्नोत्तरीं ॥ २८३ ॥

तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणं
धर्मस्य तत्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पंथाः ॥

या श्लोकाचा पाहता विचार । कैसा बोलिला युधिष्ठिर । कीं श्रुतींचा न कळो शके विचार । ऋषिमतांचा निर्धार नाहीं ॥ २८४ ॥ परी

महाजन गेले ज्या मार्गे । आपणहि जावे तयाचि मार्गे । येथ ऋषि-वांचोनि प्रसंगे । महाजन कोण म्हणावे ॥ २८५ ॥ येथ महाजन शब्दार्थ । बहुसमुदाय चतुर्धर करीत । परी तो अप्रासंगिक । आणि असंमत सर्वथा आहे ॥ २८६ ॥ बहुजन हेचि जंव प्रमाण । तंव देहात्मवादी सर्वाहूनि बहुजन । यालागीं येथ महाजन । वेगळेचि ह्मणीजे ॥ २८७ ॥ ऋषि असोनी ब्राह्मण । परस्पर विवादती आपण । यालागीं विवाद नाहीं जया कारण । महाजन ते म्हणावे ॥ २८८ ॥ देवासुरांचे युद्ध । तैसा पशुभक्षणांत देवासुरांत झाला विवाद । परी जयास कळले विवादरहित पद । महाजन ते म्हणावे ॥ २८९॥ देवांत शिव विष्णु ब्रह्मा यम । ऋषींत सनत्कुमार नारद शुकादि परम । दैत्यांतहि प्रऱ्हाद बिभीषण । बळि आदि सप्रेम विवादरहित महाजन भक्त ॥२९०॥ हे श्रुतीचे रहस्य यथार्थ जाणोनी । श्रुतीतें प्रमाणचि करूनी । विचरती विवादरहित होवोनी । आणि ऐसेहि जे कोणी असती ॥२९१॥ ते आघवेचि भगवद्भक्त । महाजन बोलिजती समस्त । म्हणोनी तिहीं दाखविला जो पंथ । तो धर्म भागवत सेवावा ॥ २९२ ॥ कृतयुगीं प्रऱ्हाद सुमति । त्रेतायुगीं हनुमान शबर्यादि होती । द्वापारीं गोपिका उद्धवादि मूर्ति । कलींत विभूति नामदेवादि ॥ २९३ ॥ एवं चहुयुगीं भागवत धर्म । महात्म्ये आचरती सप्रेम । कलींत विशेष तारक परम । हे कलिसंतरण श्रुति सांगे ॥ २९४ ॥ नवल या धर्माची रीति । भलत्याचि साधनें महात्म्ये तरती । विपरीत नांव जपोनी निश्चिती । वाल्मिक ऋषि तरला हो ॥ २९५ ॥ मायबापाच्या सेवेसाठी । कौषिक ब्राह्मणें सांडिल्या तपाच्या कोटी । ते मायबापही भागवत धर्मासाठीं । अव्हेरिता शेवटीं तरले जन ॥ २९६ ॥ प्रऱ्हादें जनक सोडिला । भरतें मातेचा उपमर्द केला । पितृ आज्ञा प्रमाण होती रामाला । तरी काय भरताला न होती ॥ २९७ ॥ विरोधें तरले कंसादिक । कामें गोपिका तरल्या देख । गुदमैथुनीं तरला नपुंसक । ही कथा भक्तचरित्रीं ॥२९८॥ सेव्य एक भगवंत । मग भलताहि विकार धर्म होत । ऐसा हा धर्म भागवत । सोडोनी समस्त सेवावा ॥ २९९ ॥ ज्यासी वर्णाश्रमकर्माची इच्छा दारुण । तिहीं ते कर्मचि करोनी भगवदर्पण । या भागवतधर्माचें

पालन । अविरोधें जाण होवों शके ॥३०० ॥ जयासी वर्णबाह्य प्रवृत्ति । तिहीं देवार्थ तैसेहि करिता अंतीं । शेवटीं तयासहि सद्गति । देतो श्रीपति न विचारिता ॥ ३०१ ॥ मंदिर बांधावयाची इच्छा ह्मणोन । कोणी मामा भाचे दोघेजण । मूर्ति चोरावया जाहले जैन । शेवटी पावले पूर्ण भगवत्पद ॥ ३०२ ॥ ऐसी भक्तमालेंत कथा । आणिकही एक ऐकिली तत्वता । एक भक्त भोजन घाली संता । मार्गी समस्ता लुटोनी ॥ ३०३ ॥ तयाची परीक्षा पहावया कारण । आले रुक्मिणी नारायण । सावकाराचे सोंग करून । तंव बळेंकरून लुटिले तेणें ॥ ३०४ ॥ सवेंचि रुक्मिणी चक्रपाणी । आले बैरागी होवोनी । तंव तेणें आपुलिया सदनीं । होते ते देऊनी टाकिले तया ॥ ३०५ ॥ ऐशा भक्तांच्या कथा कीति । एक दोन कीं कोटी असती । धर्मांत (प्रत्यवाय) सदा ऐको येती । तैसा भक्तींत कोणे ऐकिला ॥ ३०६ ॥ वसिष्ठविश्वामित्रादिकांचा शाप । गायत्रीस म्हणोनी प्रतिबंधीं जप । परी अंबरीषा होता शाप । सोशी मायबाप समस्त हरी ॥ ३०७ ॥ जैसी सिंहाच्या प्रसादे करोनी । अजा बैसली गजमूर्धनीं । तैसा भगवदाश्रयें करोनी । क्रिडाहि निर्वाणी धर्मचि होय ॥ ३०८ ॥ आपण केळें भक्षोन । भगवंता सालटे अर्पोन । विदुरकान्ता धर्मसंपन्न । भक्तचरित्रीं ही कथा ॥ ३०९ ॥ शबरीचा पादस्पर्श करोनी । शुद्ध करावे घाटीचे पाणी । राघवे सांगितले ब्राह्मणालागोनी । भक्तमालेंत ही कथा ॥ ३१० ॥ कोणी एक भक्त आपण । सर्वथा न करीच नामस्मरण । स्वप्नीं नाम निघतां मुखांतून । सांडिला प्राण सप्रेमें ॥ ३११ ॥ कोणी एक भक्तवनिता । पुत्र मारोनी बोलावी संता । ऐशा असती नाना कथा । ह्या श्रुतिबाह्य सर्वथा न म्हणाव्या ॥ ३१२ ॥ महाभारतीं एक ऋषिपत्नी । पतीच्या क्रोधें शिवतप करोनी । जाहली सूत्रकाराची जननी । ही कथा अनुशासनीं महाभारतीं ॥ ३१३ ॥ एवं कोणत्या विकारे । धर्मे अधर्मे कीं वैरें । भगवंता सेविता निर्धारे । प्रत्यवाय कोणा न देखिला ॥ ३१४ ॥ हरिवंशामाजीं कथा गहन । ब्राह्मणाचेचि मांस घंटाकर्ण । श्रीकृष्णाते अर्पिताहि पूर्ण । देव तयावरी न कोपला ॥ ३१५ ॥ या भागवत धर्माची नवल रीति । नीच तेहि उच्चाधिकारी होती । ह्मणोनी मी पुनः सर्व

प्रार्थी । कीं निर्भय निश्चिती येथचि यावे ॥ ३१६ ॥ शंकराचार्य वर्णस्थापक । तेहि स्कंधपुराणानुसार देख । शिवानंदलहरींत बोलिले श्लोक । कीं भक्तिप्रतिपादित परिपूर्ण जो ॥ ३१७ ॥

मार्गावर्तितपादुका पशुपतेरंगस्य कूर्चायते ।
गंडूषांबुनिषेचनं पुररिपोर्दिव्याभिषेकायते ।
किंचिद्भक्षितमांसशेषकवलं नव्योपहारायते ।
भक्तिः किंन्नकरोत्यहो वनचरो भक्तावतंसायते ।

विटाळशी वेश्या असोनी । तिचे करोनी मुकुट घे चक्रपाणि । ऐसिही कथा वर्णिली वाणी । भक्तचरित्रीं ॥ ३१८ ॥ ह्मणवोनी विनवी सकला जना । आर्या आणि यवना । तुम्ही या भागवत धर्म सुगुणा । आश्रयावे ॥ ३१९ ॥ आर्यमतीं कर्मानुसार । गतिदाता परमेश्वर । विही कर्मार्पणरूप निर्धार । करावी भक्ति ॥ ३२० ॥ यवनमतीं गति ऐसी । कीं परमेश्वर भक्ताचे कर्म सोशी । तरी अंबरीषासाठीं दशगर्भवासी । झाला हृषीकेशी हे तयाही अनुकूल ॥ ३२१ ॥ मी स्वये प्रार्थी तांत्रिकाप्रति । कीं तुमचिया आगमाची रीति । मूत्रपान करावे प्रीति । तरी देवावरुते कीजे भावना ते ॥ ३२२ ॥ मूर्ति मानसीं आणोन । सुखें करावे शिवहरी विण्मूत्रपान । आह्मी निषेधितो ते लौकिकाचरण । तैसें आपण करूं नये ॥ ३२३ ॥ तुझी विष्ठा पंढरीराया । सारभूत माझी काया । ऐसे तुकारामहि लवलाह्या । बोलिले असती ॥ ३२४ ॥ मी स्वये प्रार्थी वेश्याप्रति । तुम्ही माधूर्यचि करावे भगवंतीं । लालन वात्सल्याची प्रीति । नाहीं तुह्माप्रति अपेक्षा ॥ ३२५ ॥ अवघ्यांत नीच वेश्याजाति । परी प्रविष्ट होता धर्मी भागवतीं । माधूर्यासाचि अधिकारी होती । नवल रीति धर्माची या ॥ ३२६ ॥ ज्या पुनर्विवाह करूं इच्छिती । मी प्रार्थी तयाहिप्रती । तुम्ही वेश्या होवोनी उघड रीति । या धर्मी भागवतीं प्रवेशावे ॥ ३२७ ॥ जी एकवेळ भ्रष्टली । ती धर्मी राहता गर्तीतुनि चुकली । यालागीं वेश्या होवोनी वहिली । भागवत धर्मी प्रवेशावे ॥ ३२८ ॥ वेश्या कुमारीहि होती । जैशा अप्सरा स्वर्गी असती । आणि विवाहितहि होऊं शकती । दैत्य युवती आणि कृष्ण युवति झाल्या म्हणुनी ॥ ३२९ ॥ ऐसी भविष्योत्तर पुराणीं कथा ।

ह्मणोनी कामे पुनर्विवाह न करिता । नावरेल तरी घ्यावे वेश्यापथा । नाहीं तरी पतिव्रता असावे ॥ ३३० ॥ पुरुष असेल जरी जार । आणि जारिणी होईल नार । तरी तियेते त्यागिता निर्धार । दोष पुरुषा मी स्वये ह्मणे ॥३३१॥ पुरुष असतां एकपत्नी । कामिनी राहील जारिणी । तरी निस्तार नाहीं तिजलागुनी । भोगिल्याबांचोनी शतकुंभपाक ॥३३२॥ तैसी नारी असेल पतिव्रता । आणि पुरुष सेवील परवनिता । तरी शतकल्प कुंभीपाक भोगिता । निस्तार नाहीं तयाते ॥ ३३३ ॥ आतां एक माझे स्पष्ट मत । तेही उघड सांगतो येथ । हे बोलिले नाहीं प्राचीन ग्रंथांत । ह्मणोनी रुचो न रुचो कवणाते ॥ ३३४ ॥ जरी काम नावरे स्त्रियेप्रति । तरी चर्माची करोनी कृष्णमूर्ति । बळे योनिमैथून करिताहि निश्चिती । तरतील निश्चिती मी स्पष्ट ह्मणे ॥ ३३५ ॥ परी पुरुषाते काम नावरे ह्मणोनी । उमारमा मूर्ति चर्माची करोनी । भोगिता तरेल कोटी कल्पानी । येथ माझी वाणी संमति नेदी ॥ ३३६ ॥ ह्मणोनी जार पुरुष आणि वेश्या । या दोघांचीच पाहता विचारापेक्षा । माझिया संप्रदायीं विशेषा । प्रवेशावया वेश्याचि पात्र ॥ ३३७ ॥ गुरूचे माधूर्य स्त्रियाप्रति । मी स्वसंप्रदायीं निषेधिले याचि ग्रंथीं । परी वेश्या गुरुमाधूर्येहि तरती । हें मीचि एथ ह्मणे ॥ ३३८ ॥ तरी गुरु करितां वेश्यागमन । अवश्य करोनी पावेल पतन । आतां जरी दोष नाहीं ज्ञानियाकारण । येथ प्रमाण सूतसंहिता ॥ ३३९ ॥ तथापि माझिया संप्रदायीं । प्रतिनिधि होवावया । वेश्या गमनीं ब्रह्मज्ञानिया । हि अधिकार नाहीं ॥ ३४० ॥ माझिया संप्रदायीं प्रविष्ट होती । आणि वेश्यागमन तंव न सोडिती । तिहीं संप्रदाय सेवा रीति । दोन कार्ये कीजे ॥ ३४१ ॥ एक वेश्या आणि आपण । रास करावा नाट्यशास्त्रें करून । दुसरें कार्य धनार्पण । संप्रदायाकारण करावे ॥ ३४२ ॥ मल्हारीसी लग्न लावुनी । मुरळ्या होती कामिनी । हे शिवमाधूर्य घडे ह्मणोनी । माझिया मनीं मानते ॥ ३४३ ॥ परंतु प्रथम देवासी लावोनी लग्न । मग करावे मनुष्य गमन । हें अमृत सोडोनी विष्ठाभक्षण । मजकारण मान्य नाहीं ॥३४४॥ आधीं वेश्यापण धरावे । मग मुरळी होता होता ते सोडावे । हे मज मान्य आहे स्वभावे । चित्तांतुनीचि ॥ ३४५ ॥ परी जनांची

पडली रीति । तेथ काय् करावी युक्ति ! परी संप्रदायांत मुरळ्या ज्या येतो इच्छिती । तयासी एक उक्ति प्रमाण आहे ॥ ३४६ ॥ प्रथम भोगोनी श्रीकृष्ण । कामें तत्पत्नी वेश्या होऊन । शेवटीं अनंग व्रत करून । पावल्या पूर्ण हरिपदा ॥ ३४७ ॥ तैशा ज्या पूर्वी वेश्या असती । तिही संप्रदाय घेतां माधूर्य करावे भगवंतीं । मुरळ्या सांप्रदायिक होता निश्चिती । अनंगव्रत सांगावे तया ॥ ३४८ ॥ एवं इंद्रियांचे चाळे । ईश्वरापासूनि उगवावे सगळे । ह्मणोनि भागवत धर्म मिळे । अवघिया सारू ॥ ३४९ ॥ वैदिका हा वेद विहित । पौराणिकासी पुराणोक्त । कल्पित धर्मीहि कल्पित । विधि करोनी भगवंत पूजावा ॥ ३५० ॥ अन्य फळाशा असेल जरी । वैदिकापरीस इतरा न्यून फल तरी । भगवद्आशाचि असेल अंतरीं । तरी वैदिका लौकिका समान फळ ॥ ३५१ ॥ ऐसा भागवत धर्म देखा । सांडोनी एवढा प्राण सखा । अन्यत्र श्रम करिती त्या मूर्खा । पाहोनी दुःख पोटीं वाटे ॥ ३५२ ॥ आतां गृहिणी स्त्रियांचा धर्म । पतीच समजावा मेघःश्याम । जंव पुत्र धनादिकांचा काम । अंतरीं आहे ॥ ३५३ ॥ पति ज्ञानी असेल जरी । इतरानुग्रह घेऊं नये तरी । गुरु माधूर्यहि पतीवरी । न विचारिता करावे ॥३५४॥ इतर धर्माचा विचार पाहता । मज श्रेष्ठ वाटे पतिव्रता । इतर धर्मी आपुल्या अर्था । भजती भगवंता सद्भावे ॥ ३५५ ॥ पतिवांचुनि पतिव्रता । अन्य न इच्छी ऐशा बहुत कथा । जरी कांहीं कामना वाटली चित्ता ! तरी दोघांच्याही अर्था परी स्वार्था नसे ॥ ३५६ ॥ ह्मणोनी पतिव्रतेचे चरण । आतां तपस्व्यासीहि वंद्य पूर्ण । परी पति असेल कामनासंपन्न । नारी असेल विरक्त जरी ॥ ३५७ ॥ किंवा पति असेल महा संसारी । स्त्रियेचे चित्त ईश्वरावरी । पतीते अव्हेरूनी तरी । इच्छानुसारी भजावा कृष्ण ॥ ३५८ ॥ दीक्षा घेऊनी सोडावे कुळ । पति मानावा जाश्वनीळ । सद्गुरूवरी प्रबळ । वात्सल्य करावे ॥ ३५९ ॥ किंवा पति मानावा घननीळ । सद्गुरूवरी सखि भाव सकळ । हे माझिया संप्रदायींच केवळ । व्यवस्था ऐसी ॥ ३६० ॥ शरीरें शुद्ध असता जिया प्रति । अपराधावीण त्यागी पति । त्या त्यक्ताप्रति आणि विधवाप्रति । हाचि विधि निश्चितीं मम संप्रदायीं ॥ ३६१ ॥ एकवेळ अपराध घडला

जरी । पांच चांद्रायणें तिनें करावे तरी । आत्मपिंड देऊनी निर्धारी । कुळा बाहेरी होवावें ॥ ३६२ ॥ मग माझिया संप्रदायीं येऊन । करावे भगवत्काम नैवेद्याविण । किंवा आत्मपिंड न देववेल पूर्ण । तरी वेश्या होवोन संप्रदायीं प्रवेशावे ॥ ३६३ ॥ परी अपराध करोनी गुप्त । सुखें राहोनी स्वकुळांत । या दोहोंतूनि एकादा विधि जरी अनाश्रित । तरी संप्रदायांत घेवो नये ॥ ३६४ ॥ आतां पुत्र धर्महि संपूर्ण । मायबापचि राधा कृष्ण । परी हा विधि विरक्ताकारण । सर्वथा नाहीं ॥ ३६५ ॥ आयकावे वाटतील भगवद्गुण । आणि मायबाप प्रतिबंध करतील दारुण । तरी सुखें निघावें घरांतून । भिक्षा मागोन सेवावा हरी ॥ ३६६ ॥ राजाश्रय असेल पितयाकारण । तेणें प्रतिबंध होईल दारुण । तरी नीच्याचे हातीचे भक्षोनि अन्न । भ्रष्ट होवोन सेवावा हरी ॥ ३६७ ॥ ऐसाचि प्रतिबंध स्त्रियेप्रति । तरी स्वाशुद्धपणाची आणोनी प्रतीति । कुंभीपाकहि सहावा घडीभरी चित्तीं । परी भगवत्प्रीति न्यून न कीजे ॥ ३६८ ॥ अग्नींत टाकील जेव्हां यम । तेव्हां ऐसा चित्तीं धरावा प्रेम । कीं माझे पक्व मांस मेघःश्याम । प्राणाहूति पूर्वक सेवो ॥३६९॥ ऐसा दृढभाव असतां चित्तीं । कोण निषेधील कोणाप्रति । उपेक्षा नाहींच भगवंतीं । हा विश्वास चित्तीं असो द्यावा ॥ ३७० ॥ ऐसा हा भागवत धर्म । जेथ करतळीं फळ मेघःश्याम । तो आश्रया रे सप्रेम । वारंवार विनवीं तुह्मा ॥ ३७१ ॥ वडील इक्षु घाण्यांत गाळा । कुळ देवता समूळ जाळा । भजा एका गोकुळपाळा । गोविंद गोपाळा ह्मणोनी ॥ ३७२ ॥ सांडा लौकिकाची लाज । सोडा स्वर्गाचेहि काज । आवडी भजावा कैलासराज । पार्वतीपते ह्मणोनी ॥ ३७३ ॥ श्रीकृष्ण अथवा शंकर । मुखीं गावे वारंवार । भागवत दृढ शास्त्र । धरावे हृदयीं ॥ ३७४ ॥ एवं ज्यानें ज्यानें वाढेल सत्व । अंतरीं ठसेल भगवत्तत्व । तो तो धर्म आपुलें स्वत्व । तेथचि ठेविजे ॥ ३७५ ॥ आतां स्वसंप्रदायाची रीति । जैसी जयाची असेल भक्ति । त्यांतील मुख्य निवडुनी प्रीति । तीन प्रतिनिधि करावे ॥३७६॥ लालन वात्सल्य माधुर्य व्यक्ति । एक एक कार्य प्रत्येकाप्रति । भगवत्सेवा विभाग प्रीति । करोनी कीजे ॥ ३७७ ॥ वात्सल्य असेल जयाचे । त्या पुरुषानें अथवा स्त्रियेनें

स्याचे । सकाळीं उठोनी भगवंताचे । पूजन कीजे बालभावें ॥ ३७८ ॥ एवं वत्सल भक्तें देवा । प्रातःकाळीं अर्पावी बालसेवा । माध्यान्हकालीं राजसेवा । लालन भक्तें समर्पिजे ॥ ३७९ ॥ रजनीमाजी कान्तसेवा । मधुरें समर्पिजे देवा । ऐसिया रीति वासुदेवा । हृदयठेवा करावे ॥ ३८० ॥ शिवाचे ठायीं वात्सल्य नाहीं । आणि प्रत्यक्षहि माधूर्य नुपजे कांहीं । यालागीं तिन्ही काळीं लवलाही । राजोपचारें सेविजे ॥ ३८१ ॥ शिवमाधूर्य असले जरी । तरी ते भावावे अंतरीं । एक सेवा करीत असता येरी । प्रेमें करोनी अवलोकावे ॥ ३८२ ॥ ताताची माधूर्य सेवा पूर्ण । सर्वदा करवावी माझ्याचि कडून । अथवा स्वयेंचि तात सांगतील ज्याकारण । त्याकरून करवावी ॥ ३८३ ॥ मागें सांगितले शिष्याचे नियम । ते प्रतिनिधीसी यथाकाम । एक सेवावा मेघःश्याम । परंधाम दयालु ॥ ३८४ ॥ ज्याची सेवा असेल जेव्हां । तद्भिन्न प्रति-निधीनें तेव्हां । वेदान्तविचार करावा । करावे किंवा हरिकीर्तन ॥ ३८५ ॥ प्रतिनिधि वेळेवरी नसतां तीन । तरी माधूर्य दीक्षा जया कारण । तिन्ही कार्य तेणें करोन । नारायण तोषवावा ॥ ३८६ ॥ मुख्य ठेवोनि माधूर्य चित्तीं । सकाळीं बालसेवा करावी प्रीति । भोज्येषु माता इया स्मृति । अनुसरोनी ॥ ३८७ ॥ दासी म्हणोनिया माध्यान्हीं । राजोपचारे पुजावा चक्रपाणि । मुख्य माधूर्य प्रकट करोनी । सेवावा हरी रजनींत ॥ ३८८ ॥ तेव्हां ज्ञानविचारासी । अवकाश नसतां खेद नसावा मानसीं । आतां मधुर प्रतिनिधि एकादे वेळेसी । न मिळेल जरी ॥ ३८९ ॥ तरी ज्याचे माधूर्य भगवंतीं । त्याचे चित्र साक्ष घेऊनी प्रीति । आज्ञा समजोनिया चित्तीं । रात्री सेवा प्रीति करोनी ध्यावी ॥ ३९० ॥ वेश्या ज्या होती । तिहीं सकाळीं माध्यान्हीं राजवत् पुजावा श्रीपति । कान्तसेवा करावी राती । बालसेवा चित्तीं आणूंचि नये ॥ ३९१ ॥ भगवत्सेवेसी सोडोन । करो नयेचि तीर्थाटण । आळंदीस जाता जावे पादुका घेऊन । व्यवस्था करोन शिवकृष्णसेवेची ॥ ३९२ ॥ परी मसतां आणूं नये माधूर्य भावना । विशेष सेवा आली लक्षणा । बोलिजेल अनुगुणा । कुसुमक्रमें ॥ ३९३ ॥ एवं सामान्य मात्रें करून । या पुष्पीं केले दिग्दर्शन । एरवी या ग्रंथीं जे निरूपण । तो सर्वचि धर्मू

समजावा ॥ ३९४ ॥ मुख्य माझा धर्म एक । आळंदीवल्लभाचे पाय सुरेख । रात्रंदिवस चिंतावे जवळिक । त्यांचेचि नाम गाऊनी ॥ ३९५ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माऊली । तियेची साष्टांग वंदोनी पाऊली । कविता कमळमाळ वाहिली । सप्रेम चरणीं ॥ ३९६ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदवद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे स्वाभिमतभागवतधर्मनिरूपणं-नाम त्रयोदशम् कुसुमम् ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

## अध्याय १४ वा.

नमस्ते सद्गुरु नरकेसरी । तूं माय बाप सर्वांपरी । मज घेवोनिया करीं । भवाब्धि तारी दयाळा ॥ १ ॥ येणें येणें विक्षेपें । सर्वदा हिरण्य-कश्यपें । मज गांजिलें अमूपें । सांगता नये तें ॥ २ ॥ सोहंभावें नारा-यण । करीत असतां तुझें ध्यान । येणें सुचिलें महाविघ्न । सिद्धि दारुण पाठविल्या ॥ ३ ॥ येणें क्रोधकरिपदीं दिधलें । येणें संसारानळीं सूदलें । येणें कडियावरोनि लोटलें । जन्ममरणावर्ती ॥ ४ ॥ येणें विषयविषाचा प्याला । बळेंचि मज पाजिला । स्वरूपावरणें धावला । निःशेष नाशु ॥५॥ आतां सखे श्रीगुरु आई । तुजवांचुनी आधार नाहीं । त्वरें प्रगटोनिया हृदयीं । भेदीं लवलाहीं विक्षेप हा ॥ ६ ॥ हा मायास्तंभ मोडी । अभय-दानें हाक फोडी । महासंकटीं घालोनिया उडी । रक्षी लवडसवडी प्रल्हादा मज ॥ ७ ॥ येणें येणें स्तवनें । भाग्यवंतें करुणाघनें । प्रगटोनि मधुरवचनें । नाभी नाभी म्हणीतलें ॥ ८ ॥ सकळ सुखाचा सोयरा तत्वतां । तया हृदयीं देखिलिया भगवंता । ओळखोनि आळंदीनाथा । चरणीं माथा वाहिला ॥ ९ ॥ मग प्रसादचतुराक्षरी मंत्रें । पूजिलिया न-मिलिया अनुतंत्रें । तैं कृपावरदें स्पर्शोनि गात्रें । स्फूर्तिप्रदात्रें दिली स्फूर्ति ॥ १० ॥ आतां तिया स्फूर्तिचें स्थूळरूप । कीं हें उगवलें स्वानंदरोप । ग्रंथ ऐकोत विज्ञानदीप । सज्जन श्रोते ॥ ११ ॥ ऐकोनि मागील निरूपण।

शिष्य बद्धांजळि करी प्रश्न । म्हणे भगवन् करुणाघन । संशयग्राही नेई मना ॥ १२ ॥ तुम्ही सांगितला भागवत धर्म । उपेक्षिले वर्णाश्रम । आणि भजावा ह्मणतां पुरुषोत्तम । आन देवता सांडोनि ॥ १३ ॥ तरी हें अवघें स्पष्ट पुढती । मज सांगावें कृपामूर्ति । ऐसी शिष्याची पाहोनी भक्ति । वादी पुढती सरसावला ॥ १४ ॥ म्हणे प्रसंग उत्तम आला । शिष्यें भला प्रश्न केला । परी तयामाजीं पहिला । संमत असे मजलागीं ॥ १५ ॥ बरवें उपेक्षिले वर्णाश्रम । ब्राह्मण मानोनियां परम । शूद्रासी मानिती अधम । यास्तव समता बरी केली ॥ १६ ॥ एवं पुरुष स्त्रियांसी मानिती परतंत्र । आणि आपणा म्हणती स्वतंत्र । आपण विग्रह करिती वारंवार । आणि स्त्रियेसी ह्मणती करूं नये ॥ १७ ॥ समान असोनि मनुष्य जाति । उगीच विषमता वाढविती । यालागीं वर्णाश्रमाची रीति । बरवी स्थीति मोडिली ॥ १८ ॥ आतां इतर देवता सांडोन । एक भजावा नारायण । हें तों नावडे मजकारण । सर्वां भूतीं भगवंत तरी ॥ १९ ॥ ऐसें ऐकोनि वादीचें वचन । सिद्धान्ती बोले प्रतिवचन । ह्मणे शिष्यप्रश्नाभिप्राय न समजोन । वादी वदतो भलतेंचि ॥ २० ॥ वत्साचिया बरोबरी । गोचिडहि राहे स्तनावरी । परी वत्स दुग्ध पीये गोचिड रुधिरीं । गुंतला राहे ॥ २१ ॥ आह्मी मोडिले नाहींत आश्रमवर्ण । स्ववर्णकर्मे समर्पून । आवडी भजावा नारायण । हा भागवतधर्म वर्णयुक्त ॥ २२ ॥ आतां शूद्रानीं सेवा न करावी ह्मणून । माजले ह्मणतोसि ब्राह्मण । परी धर्माची विचित्र गति पूर्ण । ते तुजलागीं कळेना ॥ २३ ॥ गुणकर्मपक्ष कीं जन्मपक्ष । कोणीहि आश्रयितां प्रत्यक्ष । सेवा इतरांसें साक्षेप । न करतांहि करणें ॥ २४ ॥ सद्गुणियाची सेवा । कोणा नावडे सुदैवा । यालागीं गुणकर्मपक्षीं ब्राह्मणसेवा । विहितसद्भावा चित्तचि मागे ॥ २५ ॥ आतां जन्मपक्षीं गुणकर्माविणें । जरी पदरीं आलें सेवा करणें तरी सोशितां अंतःकरणें । उच्च होय सेवकुचि ॥ २६ ॥ जैसें ब्राह्मणाचें वरदळपण । शूद्रा करावें लागे सहन । तैसी दुर्जनीं पीडितां क्षमाकरण । ब्राह्मणाकारण सहावें लागे ॥ २७ ॥ दुर्गुणी असतां अधिकारी । पैक्यासाठीं करावी चाकरी । धर्मार्थीच सेवा चोरी । देहशुद्धि तरी बळकावे ॥२८॥ म्हणसील ब्राह्मणीं कपटेंकरून । सेवक केले इतर जन ।

तरी मूर्ख कीं सज्ञान । सेवक निर्वाण ते केले ॥ २९ ॥ मूर्ख ह्मणाल तेव कवण भीति । सज्ञान ह्मणाल तरी निरहंकृति । दोंहीं पक्षीं सेवा रीति । विरुद्ध नाहीं सर्वथा ॥ ३० ॥ आणि दानवीं बळें करून । जैं तुह्मां केलें ताडन । तें राजावश सेवाकरण । तरी धर्मवश कां न करावी ॥ ३१ ॥ ह्मणसील कीं वेदमार्ग निरोधिला । आणि पुराणमार्ग व्यर्थचि दिधला । तरी हें ऐकोनी मजला । हांसेचि उमटे ॥ ३२ ॥ वैदिकमार्गें देव तोषला । आणि पुराणमार्गें शस्त्र घेवोनि धांवला । हें काय तूं देखो- नि आला । वैकुंठांतुनि ॥ ३३ ॥ दृष्टफळासाठीं भांडता । तरी होती उचितता । येथ अदृष्टफळ तत्वतां । भांडण सर्वथा अनुचित ॥ ३४ ॥ एकासि दिधलें चूर्ण । दुसऱ्यासि केलें क्वाथप्रदान । तरी रोग्यावैद्यांत काय ह्मणोन । झुंपावें भांडण तोंडसत्ता ॥ ३५ ॥ कोण्या कर्माचें कोणतें फळ । जाणे एक जाश्वनीळ । येथ शब्दचि प्रमाण केवळ । तर्क बळ उपजेना ॥ ३६ ॥ वादी ह्मणे उत्तमलोक । मिळे ते ब्राह्मणीं घेतले वैदिक । शूद्रासी मिळेल गौण लोक । ऐसें सेवा कर्म दिधलें ॥ ३७ ॥ सिद्धान्ती ह्मणे उगा राहें । श्रुतिस्मृति वाचोनि पाहें । धर्मावरी वृथा लवलाहें । उचित नोहे आक्षेपू ॥ ३८ ॥ काय ह्मणते अत्रिस्मृति । ते वाचुनी धरी चित्तीं । नाहीं लागत बहु व्युत्पत्ति । रूपावलिमात्रें कळों शके ॥ ३९ ॥

इष्टा पूर्ते च कर्तव्यं ब्राह्मणेनैव यत्नतः ।
इष्टेन लभते स्वर्गं पूर्ते मोक्षो विधीयते ॥४३॥

कर्म इष्ट आणि पूर्त । ब्राह्मणें करावें अखंडित । इष्ट कर्में स्वर्ग मिळत । मोक्ष प्राप्त पूर्त कर्में ॥ ४० ॥ अग्निहोत्र तप सत्य भाषण । वेदाध्ययन अतिथि- पूजन । सायंप्रातर्वैश्वदेवकरण । इष्टकर्म या नांव ॥ ४१ ॥ वापी कूप तडाग बांधणें । अन्नदान वाटिका लावणें । देवालय बांधणें तीर्थीं घाट करणें । इत्यादीस ह्मणणें पूर्त कर्म ॥ ४२ ॥

इष्टापूर्ते द्विजातीनां सामान्ये धर्मसाधने ।
अधिकारी भवेच्छूद्रः पूर्ते धर्मे न वैदिके ॥४६॥

इष्ट आणि पूर्त कर्म । द्विजानीं करावे दोन्ही धर्म । शूद्रानीं करावें पूर्त कर्म । इष्ट कर्म करूं नये ॥ ४३ ॥ या वचनांचा विचार पाहतां ।

तरी मोक्षद कर्म दिधलें शूद्राच्या हाता । येणेंहि धर्म पक्षपाता । प्रवर्तला हें ह्मणवेना ॥ ४४ ॥ वादी म्हणे हें वचन । वाटे तोंडा पुसतें पान । सिद्धान्ती म्हणे श्रौतकर्म उत्तमलोकसाधन । येथ वचनावांचून प्रमाण काय ? ॥ ४५ ॥ आम्ही नाहीं हीनयाति । म्हणोनि बळें हरितां वेदसंपत्ति । तरी रागयुक्त धर्मस्थीति । लाभ चित्तीं कवण तेणें ॥ ४६ ॥ वेदमार्गें पूर्ण तरला । आणि पुराणमार्गें लोंबकळला । ऐसा कोणें आयिकिला । कधीं तें सांग ॥ ४७ ॥ तंव वादी ह्मणे काळेंकरून । शूद्रास पुराणें उपजे ज्ञान । ऐसें दीक्षितांचें वचन । सिद्धान्ती म्हणे तें जाण असच्छूद्रपर ॥ ४८ ॥ अरे असच्छूद्रासि काळेंकरून । जितुक्या शिघ्र उपजेल ज्ञान । पतित ब्राह्मणासी त्याहीहून । काळ लागे अत्यंत ॥ ४९ ॥ येथहि आहे समता । सर्वथा नाहीं विषमता । धर्मभांडण करोनि वृथा । समाजव्यवस्था नाशूं नये ॥ ५० ॥ वादी म्हणे बळेंकरून । शूद्रासि पीडिती ब्राह्मण । सिद्धान्ती म्हणे ते पीडा करितां सहन । तरी मोठेपण शूद्रातेंचि ॥ ५१ ॥ श्रुति वदे द्विज मुख्य धर्मा । तेणें सर्वांभूतीं धरावी क्षमा । तें पीडा करावयाची मनोधर्मा । प्रवृत्तिचि नव्हे ॥ ५२ ॥ आतां आपुला धर्म सांडोन । पीडा देती शूद्राकारण । तरी दुर्जनींहि पीडिता ब्राह्मण । करावें सहन म्हणोनि दोन्ही सम ॥ ५३ ॥ तंव वादी म्हणे गीतेंत । स्वयें बोलिले भगवंत । द्विज गज गो श्वान श्वपाक समस्त । पाहती पंडित समचि ते ॥ ५४ ॥ सिद्धान्ती म्हणे स्वतंत्र । गुरुवांचोनि पाहतां शास्त्र । तयाचें फळ नरक परत्र । ऐहिक फळ बुद्धिभ्रंशु ॥ ५५ ॥ पंडित जे पाहती सम । गीता म्हणे तें परब्रह्म । एऱ्हवीं वर्तनामाजी सम । पाहतांचि नये ॥ ५६ ॥ कुत्री माता कैसी म्हणावी । गाढवा कन्या कैसी द्यावी । गाय बायको करावी । वेदीवरी केविं आणोनि ॥ ५७ ॥ धरोनि गजाचें शिश्न । कैसें करावें दोहन । अंबारी लादोनि ब्राह्मण । चालवावा कैसा ॥ ५८ ॥ विद्याविनयसंपन्न निश्चिती । त्यावरी कुभारें लादावी माती । ऐसी कैसी करावी स्थीति । जरी समवृत्ति विश्व सारें ॥ ५९ ॥ ह्मणोनि नाना अलंकार सुवर्ण । कीं एक मृत्तिका नाना भाजन । तेविं द्विज गज गो श्वपाक श्वान । या सर्वांत अभिन्न ब्रह्म एक ॥ ६० ॥ याचेंचि नांव समदृष्टि । भ्रष्ट नये आणिवेसाठीं । ब्राह्मणानें

अंत्यजधृष्टीं । करूंचि नये ॥ ६१ ॥ नीचत्व जाईं हीं आशा मनीं । तरी कोणीहि व्हावें सद्गुणी । गुणांची मुद्रा त्रिभुवनीं । स्वयेंचि जनीं मान्यता होय ॥ ६२ ॥ वादी बोलिला एक युक्ति । कीं पुरुष स्त्रियेशीं विषम मानिती । परी न निरखोनि श्रुति स्मृति । व्यर्थचि चित्तीं कलहेच्छा ॥ ६३ ॥ जेथ परपुरुषभोगाची शिक्षा दारुण । सांगितली आहे स्त्रिये कारण । तेथ पुरुषासहि घडतां परस्त्रीगमन । तरी शिक्षा वध प्रमाण बोलिली ॥ ६४ ॥ वादी ह्मणे ब्राह्मणासी । देहदंड नाहीं विशेषी । सिद्धान्ती म्हणे राज्यांतूनि तयासी । घालवूनि देणें बोलिलें ॥ ६५ ॥ इतरासी वधदंडें प्रायश्चित । झालिया तया स्वर्ग होत । पापी द्विज जो राहे जीवंत । तो पश्चात्तापाविण पतित होय ॥ ६६ ॥ वधदंड न देतां पातित्य होणें । या धर्मदंडाहूनि दंड कोणता ह्मणणें । मरण इच्छिती शहाणे । अयश दुर्धट त्याहूनि ॥ ६७ ॥ वादीसहि अयशचि नावडे तत्वता । ह्मणोनि करूं पाहे ब्राह्मणसमता । आणि ब्राह्मणासि अयशदंड पाहोनि तत्वता । ह्मणे मरणदंड कां न दिला ॥ ६८ ॥ द्विजातें सुरादंड गहन । पाजावी सुरा तापवोन । एवं कोठें वध आहे कोठें नाहीं ह्मणून । आक्षेप न घडे धर्मावरी ॥ ६९ ॥ आतां जेथ स्त्रीपुरुषाची आपत्ति । थोडीशी सवड दिधली चित्तीं । तेथ तंव स्त्रियांचिवरुती । दया केली ऋषींनीं ॥ ७० ॥ पुरुषासी प्रायश्चित्त दारुण । आणि स्त्रिया दोषी न होती व्यभिचारें करून । ऐसें अत्रिस्मृतीचें वचन । आहे प्रमाण तें ऐक ॥ ७१ ॥

अमीमांस्यानि शौचानि स्त्रीणां च व्याधितस्य च ।
न स्त्री दुष्यति जारेण ब्राह्मणो वेदकर्मणा ॥१८९॥
नापोमूत्रपुरीषाभ्यां नाग्निर्दहति कर्मणा ।
पूर्वं स्त्रियः सुरैर्भुक्ता सोमगंधर्ववन्हिभिः ॥१९०॥
भुंजते मानवाः पश्चान्न ता दुष्यन्ति कर्हिचित् ।
असवर्णस्तु यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते ॥१९१॥
अशुद्धा सा भवेन्नारी यावद्गर्भं न मुंचति ।
विमुक्ते तु ततः शल्ये रजश्चापि प्रदृश्यते ॥१९२॥
तदा सा शुध्यते नारी विमलं कांचनं यथा ।

स्वयं विप्रतिपन्ना या यदि वा विप्रतारिता ॥१९३॥
बलान्नारी प्रभुक्ता वा चौरभुक्ता तथापि वा ।
न त्याज्या दूषिता नारी न कामोस्या विधीयते ॥१९४॥

पूर्वी देवीं भोगिल्या युवती । मग तियेतें मनुष्य भोगिती । यालागीं त्या व्यभिचारितां पुढती । कदा त्यांप्रति सोडूं नये ॥ ७२ ॥ परगर्भधृता युवती । शुद्ध होय झालिया गर्भमुक्ति । आन स्पष्ट शब्दार्थ रीति । एवं स्त्रियांवरुती मुनिदया ॥ ७३ ॥ व्यभिचारिणीस टाकितां पति । तरी त्या वेश्याधर्मे तरोन जाती । परी तरावया जारपुरुषाप्रति । शास्त्रसंमति नाहीं नाहीं ॥ ७४ ॥ म्हणोनि त्यानें वारंवार । विवाह करावा हा निर्धार । एवं दोघांचा समचि विचार । विषम साचार नाहीं कोठें ॥ ७५ ॥ मुख्य धर्म तंव पाहतां । नर एकपत्नी स्त्री पतिव्रता । आणि गौण धर्माची समता । आतांचि बोलिली ॥ ७६ ॥ ब्राह्मण सेव्य शूद्राप्रति । जैसे वाक्य शास्त्रीं असती । तैसें शूद्रोऽपि द्विजवत् सेव्य इति । इतिहासांतीं वाक्य असे ॥ ७७ ॥

शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माब्रवीत्स्वयं ।

म्हणवोनि वादीस म्हणे सिद्धान्ती । ईश्वर नाहीं पक्षपाती । सूक्ष्म आहे धर्माची गति । वृथा अहंकृती मांडूं नये ॥ ७८ ॥ स्त्रियेस जरी असती परतंत्रता । तरी मातृपूजनविधि नसतां सुता । गाढवीपूजनाचा विधि तत्वतां । कोठेंचि नाहीं ॥ ७९ ॥ यद्यपि भगवद्भावें करून । गाढवीसहि सांगितलें नमन । परी भगवद्भाव न कळतांहि जाण । जननी पूज्य नंदनातें ॥ ८० ॥ उपरी उपरी समाभिमान । जरी पाहोनि कारेतील भांडण । तरी मी सुचवितों तेंहि भांडण । वाढवी आनसुखनाशार्थ ॥ ८१ ॥ बळेंचि शिकवी सुता । म्हणावें आम्ही कां सेवावा पिता । चाकरा सांगे यथार्थता । स्वामी आम्हीं सेवावा कां ॥ ८२ ॥ पित्यासी शिकवी दारुण । कीं बाळ जरी न सेविती तुम्हां कारण । तरी जन्मतांचि टाकावे मारोन । उगेंचि भरण कां कीजे ॥ ८३ ॥ स्त्रियांना सांगावें पुढतपुढती । कीं ऐसें विनवावें ईश्वराप्रति । असद्भागें आनंदी पति । आणि गर्भदुःख आम्हाप्रति साहणें लागे ॥ ८४ ॥ ईश्वर नायकेल जरी । वंध्याप्रद औषध घ्यावें तरी । दंड ठोकोनि अगावरी । घ्यावि

सर्वथा नांदवूं नको ॥ ८५ ॥ वादी म्हणे मज कळलें समस्त । इच्छा नाहीं कीं वागावें विपरीत । परी स्पष्ट म्हणणें यथार्थ । असेल तें निश्चित कळों द्यावें ॥ ८६ ॥ सिद्धान्ती म्हणे ऐक वचन । धर्म तंव पक्षपात-रहित पूर्ण । तथापि तुज साहवेना मान । तरी वाढवी सद्गुण आवडी ॥ ८७ ॥ अरे युधिष्ठिराच्या ईर्ष्येवरुती । दुर्योधनाचीहि दानांत कीर्ति । हें बोलिलें आहे किराती । प्रथमसर्गी ॥ ८८ ॥ तैसें ब्राह्मणाच्या ईर्ष्ये-वरी । सद्गुण वाढविसील जरी । मान मिळेल तुजहि तरी । शंका अंतरीं धरूं नको ॥ ८९ ॥ वास्तविक विचार पाहतां । मान अपमान देहाच्या माथां । तो देह काळाचें खाजें सर्वथा । म्हणोनि भगवंता भजावें ॥ ९० ॥ सद्गुणाहूनि वर्णथोरी । नाहीं हें उमेस सांगे पुरारी । महाभारतीं प्रमाण निर्धारीं । तें श्रवणविवरीं भरीं आजी ॥ ९१ ॥

सत्यधर्मरताः संतः सर्वलिंगविवर्जिताः ।
धर्मलब्धार्थभोक्तारः ते नराः स्वर्गगामिनः ॥५॥
( भारत अनुशासनप० अ० १४५. )

शहाणे जे असती । ते वर्णाश्रमचिन्हाग्रह न धरिती । धर्में मिळेल तेंचि खाती । शेवटीं जाती मुक्तीतें ॥ ९२ ॥ पुढें याचि अध्यायीं स्वदार-निरत । सांगितले याचि प्रकरणांत । म्हणोनि हा संन्यासधर्म नाहीं दिसत । एतदध्यायस्थ वीतरागादि पदें आसक्तिरहितपर ॥ ९३ ॥ एवं धर्मीच वर्णाश्रमाग्रहो नाहीं । तरी भागवतधर्मी असेल कायी । आणि वर्णाश्रमाचा द्वेषहि नाहीं । आतां आणखी सद्गुणाविषयीं प्रमाण ऐक ॥ ९४ ॥

यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान् बुधः ।
यमान् पतत्यकुर्वाणो नियमान् केवलान् भजन् ॥५७॥
( अत्रिस्मृति. )

यम सेवावे सर्वोपरी । माजवूं नये नियमाची थोरी । यम सोडोनि नियम करी । पतन निर्धारीं होय तया ॥ ९५ ॥ ऐसें अत्रिस्मृतीचें वचन । तंव वादी म्हणे नियमीं ईश्वराराधन । आणि यम श्रेष्ठ सांगतां नियमाहून । तरी झाला गौण भागवतधर्मु ॥ ९६ ॥ सिद्धान्ती म्हणे ऐक मात । ईश्वराराधन नियम हें पतंजलिमत । अत्रिस्मृतीच्या दृष्टीं

नियमांत । ईशाराधन घेतलें नाहीं ॥ ९७ ॥ तें वांचोनि पाहें अत्रि-स्मृति । ईशाराधनाहून तंव यमादिप्रति । गौणता सांगते सात्वतश्रुति । ती धरावी चित्तीं ऐकोनी ॥ ९८ ॥

धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसान्वितः ।
मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक् प्रपुनाति हि ॥२२॥

( भागवत स्कं ११ अ० १४. )

या श्लोकाचा अर्थ पूर्ण । पहावा नाथटीकेवरून । परी मूळीं सत्य दया हें यमोपलक्षण । आणि नियमोपलक्षण विद्या तप ॥ ९९ ॥ ते दोन्ही भक्तिवांचून । करूं न शकती पावन । म्हणोनि ईश्वराराधन । मुख्य धर्म मी म्हणे ॥ १०० ॥ अचौर्य सांगितलें यमांत । चोरी करोनि तरला कमालभक्त । म्हणोनि धर्म म्हणजे सेवणें भगवंत । येर व्यर्थ अधर्मु ॥ १०१ ॥ एथहि शास्त्र प्रमाण । आणि संताचें वचन । तेंहि ऐकावें प्रमाण । शंका निरसन होय जेणें ॥ १०२ ॥

आणि मजचिमार्जीं असतां । जेणें मी दुव्हावें पंडुसुता । तया पुण्य ऐसें म्हणतां । जीभ न तुटे कायी ? ॥ ३१७ ॥

( ज्ञानेश्वरी अ० ९. )

हें शास्त्रवचन झालें, आतां संतवचन सांगतों—

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावी ती ॥ १ ॥
येर प्रियापुत्रधना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । तैसी माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिपाय । आणिक उपाय दुःख मूळ ॥ ४ ॥

( अभंग ३०९४. )

इत्यादि वचनें तोचि धर्म । जेणें सांपडे मेघःश्याम । यालागीं भागवत-धर्म । तूं निभ्रंम होवोनि भजें ॥ १०३ ॥ आतां तुवां शंका केली होती । कीं भगवंत आहे सर्वांभूतीं । मग देवता त्यागाव्या हे कासया उक्ति । तरी ऐक उपपत्ति येविषयीं ॥ १०४ ॥ सर्वांभूतीं नारायण । हें जें तूं बोलिला वचन । त्याचा अर्थ काय ब्रह्मज्ञान । कीं ब्रह्मभावना हें सांगें ॥ १०५ ॥ प्रथम पक्ष म्हणसील तत्वतां । तरी आमुचा विवाद नाहीं सर्वथा । द्वितीय पक्ष अंगिकारितां । तरी निष्काम भावनार्थी

विवाद नाहीं ॥ १०६ ॥ सकामहि जरी जन । सर्वांभूतीं नारायण भजताल तरी तयांहि कारण । विशेष वाद आह्मीं न करूं ॥ १०७ ॥ परी नवल सकामांचा रीति । नित्य नवे नवे देव भजती । स्नानसंध्या सांडोनि प्रीति । वाचती सप्तशति नवरात्रीं ॥ १०८ ॥ सोडोनि गायत्रीचें पुरश्चरण । यक्षिणीमंत्राचें करिती साधन । सकामांचें चंचल मन । तात वर्णन करिती त्यांचें ॥ १०९ ॥

" तैसा मातें किरिटी । भजती गा पाऊटी । करुनि जो दिठी । विषो सूये ॥८१०॥ आणि भजिनालियासवे । तेचि विषय जरी न पावे । तरी सांडीं म्हणे आघवे । टवाळ हे ॥ ८११ ॥ कुणवट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची परवडी । करी तया ॥ ८१२ ॥"

( ज्ञानेश्वरी अ० १३. )

नवल सकामांची रीति । मज भजोनि विषय मागती । जैसे मायेस नमोनि मत्त याचिती । मातृमैथुन ॥ ११० ॥ मग मायेनें नाहीं म्हणतां । तरी तीसचि गांजिती तत्वतां । तेविं लागले माझ्या भजनपंथा । ते विषय न पावतां मजहि त्यजिती ॥ १११ ॥ फुलें तुळसी आणोनि सकाळीं । आसन मांडोनि पूजी वनमाळी । तंव काल संध्याकाळीं । बायकोस ज्वर आला ॥ ११२ ॥ मग दुसरे दिवशीं पूजा करोन । आरंभिलें देवासि याचन । ह्मणे आजवरी केलें जें पृजन । तरी वांचवी प्राण बायकोचे ॥ ११३ ॥ ती शय्येवर असल्याविण । मज न गमे एक क्षण । तंव स्त्रियेच्या वेदना ऐकोन । ह्मणे देव अझोन पावला नाहीं ॥ ११४ ॥ ह्मणोनि नवस करावा कांहीं । परी पैसाहि पुरता मिळत नाहीं । मग म्हणे संभवेल तैसा शेषशाई । प्रसाद वाटेन तुजलागीं ॥ ११५ ॥ एवं पूजेचा काळ सरला । शिवालयीं दर्शना गेला । मध्यें पीर पाहोनि ऊद उजळला । म्हणे बायकोला आयुष्य देई ॥११६॥ शिवालयाच्या पायरीवरी । जातां तंव कोणी मागून पाचारी । कीं तुमची स्त्री जाहली घाबरी । तंव बेल न वाहतां तैसाचि परते ॥ ११७ ॥ मग घरीं येऊनि पाहे । तंव कपाळ फुटलें आहे । स्त्रियेनें साधिला लवलाहे । परलोकमार्ग ॥११८॥ ह्मणोनि दहावे दिवशीं क्रियेस चालला । संगें देवाचा पुटळाहि घेतला । पिंड जेव्हां कावळ्यानें भक्षिला । तेव्हां संतापला देवावरी ॥ ११९ ॥ मग

शिवलिंग आणि शालिग्राममूर्ति । सूर्यकान्त देवि आणि गणपति । भैरव खंडेराव मारुती । वीर मानवणी होत्या कांहीं ॥ १२० ॥ हे देव आघवे एकत्र मिळवून । दिधले गंगेत टाकून । पिंडासवें पूजा विसर्जून । येऊनि भोजन झोडी गृहीं ॥ १२१ ॥ एवं देवाची ऐसी रीति । आतां गुरूची कवण गति । तेहि ऐकावी पद्धति । सकामांची ॥ १२२ ॥

तया गुरुमार्गी टेके । जयाचा सुगरुवा देखे । तरी तयाचा मंत्र शिके । येर नेघे ॥ ८१३ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

सकाम भजना उमळला । तंव तयासी साधु सांपडला । जैसा फाल्गुनीं वेश्येनें गोविला । एकला जार धुळमातिये ॥ १२३ ॥ गुरुदर्शन करी जेव्हां । स्वामींचें सामर्थ्य वाणी तेव्हां । काल मी निजलो जेव्हां । स्वप्न पडले तुमचेचि ॥ १२४ ॥ तेव्हां मज वाटलें मनीं । कीं स्वामी आहेत त्रिकाळज्ञानी । देव गुरुचे कीं स्वप्नीं पाहता कामिनी । माझी कांता त्रिकालज्ञानी न म्हणे ॥ १२५ ॥ मग गुरूपासुनि आणिली विभूति । तंव मार्गी चालता देखिली शेती । तिडक्या पडला गव्हाव-रती । त्यांत थोडीसी विभूति घातली ॥ १२६ ॥ चालता आला गोठाणीं । तंव ढोरकी सांगे ऐकिले कानीं । काल तुमच्या महिषीनीं । दिले नाहीं मूळींच दुध ॥ १२७ ॥ तीस कांहीं झाले असेल म्हणुनी । विभूति लावी चहूंहि थानीं । पुढें पाहतां म्हैस दोहुनी । तंव दोन्ही दिव-साचे दिधले दुध ॥ १२८ ॥ ह्मणे स्वामींचा चमत्कार मोठा । विभुति लाविता पुनित झाला गोठा । मग दुध घेऊनी मागल्या वाटा । स्वामी-कडे परतला ॥ १२९ ॥ जातां जातां मनांत । विचार करी कीं वनांत । चरावया बैल गेले बहुत । ते सुखी असोत स्वामीकृपें ॥ १३० ॥ परवा तें लेंकरूं दिनकर । शेंबुडे भरले होते फार । स्वामींची कृपा होईल जर । तरी पडसा जाईल त्याचा ॥ १३१ ॥ मग दुध घेऊनी गेला द्वारीं । स्वामीस विनवी परोपरी । ह्मणे देवा अंगिकारी । एवढें मज दीनाचें ॥ १३२ ॥ स्वामी न बोलला कांहीं । दुध ठेवुनी चालला गृहीं । मार्गीं शेत पाहुनी लवलाहीं । म्हणे अझोनि नाहीं तिडक्या गेला ॥ १३३ ॥ थोडेसे विचारी चित्त । ह्मणे स्वामी पाहत असतील अंत । उद्या शिरणी

वाटता पिक समस्त । येईल माझे ॥ १३४ ॥ तैसाचि चालला घरीं । तंव एक मांजर पाहिली बरोबरी । ह्मणे स्वामी दारापासुनि येथवरी । आली कैसी मांजर हे ॥ १३५ ॥ कीं स्वामीनें पाठविली भगवती । संकष्टीं रक्षाया मजप्रति । परी माझा बैसल्या अंगावरुती । नेणो अंबा त्याप्रति कां न ह्मणे ॥ १३६ ॥ घरीं येऊनी पाहत । तंव मामेबहिणीचा नातू दुखणाईत । मग विभुति कालवुनि पाण्यांत । आधीं देत थोडीशी ॥ १३७ ॥ घरीं सटवीचा अंगारा केला । तोहि कपाळीं लाविला । तंव स्त्री म्हणे माहेरच्या वेताळाला । नारळ वाहूं करावे ॥ १३८ ॥ बहिण म्हणे माझ्या गृहीं । जागती जोत जोगाबाई । तीस बाहू कराल कांहीं । तरी मान लवलाही देईल ती ॥ १३९ ॥ आपण म्हणे तुह्मा दिसल ते करा । स्वयें जाये वैद्य घरा । प्रातःकाळीं औषध आणोनी दे बरा । रात्रीं जाय घरा मांत्रिकाच्या ॥ १४० ॥ पुनः सकाळीं उठून । येऊं धांवला स्वामीदर्शन । तंव मध्यें ऐकिलें पावला मरण । दुखणाईत तुमचा ॥ १४१ ॥ मग तैसाचि परतला सदनीं । प्रथम रडणें सांडोनी विचारी मनीं । कीं स्वामीस सिद्धि आहे कीं निघोनी । गेली सकळ ॥ १४२ ॥ मग दुखणाईताची क्रिया करून । श्राद्धा बोलाविले इष्टजन । त्यासी सहज बोलता वचन । म्हणे बरवे धन वाचले माझें ॥ १४३ ॥ लागलों होतों स्वामीच्या पंथीं । परी बरवी लवकरचि उमजली प्रतीति । एवं सकामाची भक्ति । कमळपातीं तोय जैसे ॥ १४४ ॥

प्राणिजातेसी निष्ठुर । स्थावरीं बहु भर । तेविचि नाहीं एकसर । निर्वाह जया ॥ ८१४ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

केव्हां ऐसेचि भावी चित्त । कीं आपणा ऐसे मनुष्य संत । तेथ सामर्थ्य कोठिचे बहुत । ह्मणोनी पूजी दगडमूर्ति ॥ १४५ ॥ प्रथम मंदार काष्ठाचा गणपति । गृहीं आणोनी मांडिला प्रीति । कांहीं दिवस पूजी तंव विष्णुमूर्ति । चक्रांकित देखिली ॥ १४६ ॥ मग तेहि आणोनी मांडी देव्हारा । नवा देव पाहोनी बरा । आधीं शाळिग्राम पूजोनी खरा । मग पूजी पूर्वील गणपति ॥ १४७ ॥ पुढें एक गोसावी भेटला ।

तेणें पान्याचा महादेव दिधला । तो देव्हारा आणोनी मांडिला । पूर्वी घहिला शालिग्रामा आधीं ॥ १४८ ॥ दुसरी पूजा करी पुढती । तो देव्हारा देवीची रजतमूर्ति । पाहुनि पुसे स्त्रियेप्रति । तंव ती म्हणे माझ्या माहेरची दुर्गा ॥ १४९ ॥ तेव्हां आधीं तीस पुजोनी । मग इतर देवास पाजी पाणी । तंव पुत्रासाठीं नवस करोनी । आणिला खंडोबा सोन्याचा ॥ १५० ॥ तैं काळ पाषाण धातुमूर्ति । तुच्छ करोनी अव्वयियाप्रति । आपण पूजी सुवर्णमूर्ति । अन्याप्रति म्हणे हे इतर देव पूजा ॥ १५१ ॥

माझी मूर्ति निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो-देवीं । यात्रे जाय ॥ ८१५ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

एकी देवपूजेचा छंद केला । गृहीं माधवप्रासाद बांधला । पूजेसी ब्राह्मण नाहीं मिळाला । म्हणोनी लाविला भाचाचि ॥ १५२ ॥ सकाळीं बसता ओट्यावरुती । तंबाखु प्यावया बहुत येती । गोष्टींत फार वेळ होय मजप्रति । ह्मणोनी स्त्रीस म्हणे तूं करी पूजा ॥ १५३ ॥ मग माय-जीच्या यात्रेस निघाला । सकाळीं उठोनी चालला । खिळा घातला आवाराला । स्नानाविण ठेविला देवो ॥ १५४ ॥ ( चूर्णिका ) यात्रेहुनि आला मासीं । मग देव पूजिला मावंद्याचे दिवशीं । असो या ओवी वरोनी विशेषी । मी मागा बोलिलो सर्वांसी । कीं सोडुनिया सेवेसी । तीर्थाटणासी नव जावे ॥ १५५ ॥

नित्य आराधन माझें । काजी कुळदेवता भजे । पर्वाविशेषे कीजे । पूजा आना ॥ ८१६ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

नित्य करी विष्णु चिंतन । तंव घरीं जाहले पोराचें लग्न । मग घेऊनी पुत्र सुन । जोडा पायीं लावी मुंजोबाच्या ॥ १५६ ॥ पल्होडा नेसवी आसरासी । सांगे आणिका लोकासी । ह्मणे आमुच्या कुळासी । दिवस निशीं रक्षिले हिनें ॥ १५७ ॥ शालिग्रामाचें पूजन । हें आतांचि लागले बापापासून । एऱ्हवि कुळपरंपरा साधन । जाखिण आगुने ॥ १५८ ॥ असो या ओवीवरुनी चांग । मी पूर्वी सांगितला कुळदेवत्याग । एक

भजता रमारंग । आन प्रसंग कासया ॥ १५९ ॥

माझें अधिष्ठान घरीं । आणि वोवसे आनाचे करी । पितृकार्यो-वसरीं । पितरांचा होय ॥ ८१७ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

जीवंत असतां पिता । सुखें जेवूं न घाली तत्वतां । म्हणे देवासी नैवेद्य न दाविता । जेविता कां पोटीं पडली आगी ॥ १६० ॥ मेलिया रडे उकसा बुकसी । चिंतोनी ठेवी मानसी । कीं मजकडोनी न राहवे उपवासी । आतां बरवी एकादशी श्राद्धीं आली ॥ १६१ ॥ असो माझे मत या ओवीवरून । कीं पितृस्वरूप असतां जनार्दन । मग त्याचेचि करावे यजन । त्यांत विघ्न ऐसें श्राद्ध कासया ॥ १६२ ॥ विघ्न न येतां भगवद्भजनीं । श्राद्धादि क्रिया करावी जनीं । विसरोनिया चक्रपाणि । श्राद्ध पितरा नरकदान ॥ १६३ ॥ तंव वादी म्हणे वदता भलते । मनु काय बोलतो ते । कीं " पितृकार्यं विशिष्यते । देवकार्याद्द्विजातिनाम् " ॥ १६४ ॥ तेव्हां सिद्धान्ती म्हणे । येथ देव शब्दें विश्वेदेवादि घेणें । " दैवं हि पितृकार्यस्य पूर्वमाप्यायनं स्मृतम् " या वचनें । मनुचि सांगे ॥ १६५ ॥ नारायणाचें भजन । करितां श्राद्धहि द्यावे सांडोन । अथवा करावे न येतां विघ्न । परी ऋणातें भिऊन करूं नये ॥ १६६ ॥ येच विषयीं सात्वत श्रुति । प्रमाण दावूं ते धरी चित्तीं । व्यर्थ शिरोनि संशयप्रान्तीं । माथा भ्रांति घेऊं नको ॥ १६७ ॥

देवर्षिभूताप्तनृणां पितॄणां न किंकरो नायमृणी च राजन् ।
सर्वात्मना यः शरणं शरण्यं गतो मुकुंदं परिहृत्य कर्तम् ॥ ४१ ॥

( भागवत स्कं० ११ अ० ५ )

याच्याहि अर्थ संपूर्ण । पहावा नाथटीकेवरून । अभिप्राय कीं कोणतेहि ऋण । हरिभक्ता जाण बाधीना ॥ १६८ ॥ यद्यपि या श्लोकीचा अर्थ । कीं ऋण न बाधी सर्वभावें शरणागताप्रत । इतर तंव आहेचि अंकित । देवपितरांचा ॥ १६९ ॥ तरी देवपितृकार्य करावे त्यान । परी न येता हरिभजनीं विघ्न । अथवा भोळ्या भावेंहि करितां भगवच्चिंतन । देवपितर तोषति हे मत माझे ॥ १७० ॥

" एकादशीच्या दिवशीं । जेतुला पाड आम्हासी । तेतुलाचि

नागासी । पंचमीच्या दिवशीं ॥ ८१८ ॥ चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चवदसी ह्मणे माये । तुझाचि वो दुर्गे ॥ ८१९ ॥ नित्यनैमित्तिकें कर्मे सांडी । मग बैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । बहिरवा पात्रीं ॥ ८२० ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

सकामांच्या चंचळ वृत्ति । जितुक्या वृत्ति तितुक्या भक्ति । एकादशी करी पावावया मुक्ति । तंव देहममता चित्तीं अडवितु ॥ १७१ ॥ ह्मणे एकादे वेळे हरिकीर्तनीं । जावे लागते अंधारांतुनि । मज कदापि सर्प चावेल ह्मणी । यास्तव पंचमीदिनीं पूजी नागा ॥ १७२ ॥ विघ्नभयें पूजी गणपती । महामारीभयें पूजी पार्वती । चतुर्दशी आणि चतुर्थी । दोन्हीहि पाळी ॥ १७३ ॥ एवं भयवृत्तीनें पूजी देव । तंव स्त्रियेसी भांडला भावू माधव । ह्मणोनी कोप आला अपूर्व । स्नानसंध्या सुचेना ॥ १७४ ॥ मग वेगळा निघोनी सत्वर । मोठ्या गृहीं ठेविले देव समग्र । आपण मात्र धनस्त्रीपुत्र । घेवोनिया निघाला ॥ १७५ ॥ एक गावाबाहेर साचे । मंदिर होते रासाईचे । भाऊ मारावया रचे । नवचंडी होम तेथें ॥ १७६ ॥

पाठीं सोमवार पावे । आणि बेलेसी लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ॥ ८२१ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

तंव आली आठवण । माझा कुळदेव उमारमण । म्हणोनी सोमवारीं बेल घेऊन । शिवालयीं जाय ॥ १७७ ॥

ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन गांवद्वारीं । अहेव जैसी ॥ ८२२ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

ऐसा नित्य करी भजन । परी तें भजन नोहे भंजन । जे द्वैतनरकीं सदा मज्जन । तया सज्जन न गणती ॥ १७८ ॥

ऐसेनि जो भक्त । देखसी सैरा धांवत । जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ॥ ८२३ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १३ )

जो सुखामाजीं देहात्मवादी । दुःखी होता प्रते साधी । जेवि श्लेंकडी राती मनें घर बांधी । आणि उष्ण लाभतां मोडी मनोरथा ॥ १७९ ॥ मग कोणी विचारितां तयाप्रति । कीं इतुक्या देवांची कां हो प्रीति । तदा ह्मणे सर्वाभूतीं । एक श्रीपति नांदतो ॥ १८० ॥ अंतरीचा भाव पूर्ण । कीं एक देव नाहीं शक्तिमान । ह्मणोनिच आन आन । देव मांडी ॥ १८१ ॥ ईश्वर सर्वाभूतीं आहे । तरी हा काय परमेश्वर नोहे । मग पूज्यपूजकभाव साहे । कैसा याते ॥ १८२ ॥ दैवें ऐकता वेदान्त । देहासचि मी ब्रह्म मानित । दुःखी होता शरणागत । शीतळाईचा ॥ १८३ ॥

आतां आणिकहि संप्रदायें । परी माते नेणती समवाये । जे अग्नि इंद्र सूर्य सोमा ये । ह्मणवुनि यजिती ॥ ३४४ ॥ तेहि कीर मातेचि होये । कां जें हें आघवें मीचि आहे । परि ते भजती उजरी नव्हे । विषम पडे ॥ ३४५ ॥ पाहे पा शाखापल्लव रुखाचे । हे काय नव्हती एकाचि बीजाचे । परी पाणी घेणें मुळाचे । ते मुळीचि घापे ॥ ३४६ ॥ कां दहाहि इंद्रियें आहाती । इयें जरी एकेचि देहींचीं होती । आणि इहीं सेविले विषय जाती । एकाचि ठाया ॥ ३४७ ॥ तरी करोनी रस सोय बरवी । कानीं केविं भरावी । फुलें आणोनी तुरंबावी । डोळा केविं ॥ ३४८ ॥ तेथ रस तो मुखेंचि सेवावा । परिमळ तो घ्राणेंचि घ्यावा । तैसा मी तों यजावा । मीचि ह्मणोनी ॥ ३४९ ॥ येर माते नेणोनी भजन । ते वायाचि गा आनेआन । ह्मणोनी कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे ॥ ३५० ॥

( ज्ञानेश्वरी अ० ९ )

आघविया देवा जीवपण । तेथ ईश्वरहि भावितां उत्कर्षकरून । ईश्वराचें तव उपासन । ईश्वरेंचि होय ॥ १८४ ॥ वंध्याक्रियेस माय ह्मणतां । जरी मैथुनरागनिवृत्ति ये हाता । तरी आपुलीच माता । स्तनपानदात्री ॥ १८५ ॥ तैसे निकृष्टीं उत्कृष्ट ईश्वरभावन । तेणें जरी एकाग्र होय अंतःकरण । तरी भगवंतीचि भगवदुपासन । करितां शिघ्र ज्ञान भक्ति तेणें ॥ १८६ ॥ अखंडी न पुरे पदार्थाचा । म्हणोनी अपेक्षा उत्कृष्ट भावनेची । परी त्या पदार्थी हि वैदिक शुद्धीची । अपेक्षा आहे ॥ १८७ ॥ वैदिक शुद्धिहि घडतां । निष्कामासाचि लाभ तत्वता ।

किंचिल्लाभ सकामाच्याहि होतां। चढे जरी कर्मसमुच्चिता उत्कृष्ट भावन ॥ १८८ ॥ इंद्रादि देवांच्या अंतर। कीं सूर्यादि देवांचे जिव्हार। उपास्य बोलिला परमेश्वर। सूर्यादि जीव त्यागुनी ब्रह्मसूत्रीं ॥ १८९ ॥ तैसे शिव विष्णु मानोनी जीव। उपासावा अंतरीचा देव। हा सूत्रांत ना भाष्यांत भाव। बोलिले नाहीं आचार्ये ॥ १९० ॥ ह्मणवोनी सेवावे शिवचक्रपाणि। येथ प्रमाण तातांची वाणी। गुरु करणें लागे सदाशिव ह्मणोनी। पुढें अन्य स्थानीं दाखवीन ॥ १९१ ॥ यालागीं बळेंचि सांडुनी कुळदेव। सेवावे सात्विक शिवमाधव। आता कोणतें विरुद्ध नाहींत कुळदेव। तेहि ऐके ॥ १९२ ॥ नृसिंह उपासना असेल जरी। आम्हास विरुद्ध नाहीं ते तरी। रामोपासना असतां घरीं। मर्यादा मार्गी इष्ट मज ॥ १९३ ॥ कृष्णोपासना तंव जीव। तेथ कासयाचा शंका भाव। विठ्ठलोपासना स्वयमेव। अविरुद्धचि ॥ १९४ ॥ कुलदेव असतां शंकर। तेहि आवडे अति परिकर। देवि कुळदैवत असतां साचार। दक्षिणपंथे आश्रयावी ॥ १९५ ॥ वामपथ घ्यावा सोडोन। एवं गणपतीचेहि अविरुद्ध भजन। न त्यागावा सूर्य नारायण। कुळदेव जरी ॥ १९६ ॥ परी इतुकेचि करावे। इष्ट भजनाथा म्हणावे। आणि इतर देव ते पुजावे। आवरणरूपें ॥ १९७ ॥ विष्णूच्या ज्या विभूति। त्या मुख्यत्वेंचि पूजाव्या प्रीति। परी इष्टनिष्ठा चित्तीं। श्रीपतिची असो द्यावी ॥ १९८ ॥ श्रीव्यंकटेश कुळदेवता। तरी तेहि न सांडावी सर्वथा। परी इष्ट करावे भगवंता। उमानाथा आणि कृष्णा ॥ १९९ ॥ हें असो तात आणि श्रीकृष्ण। राधा उमा उमारमण। हे सेवावया कारण। संप्रदायीं आमुच्या ॥ २०० ॥ इतर कुळदेवता गौण होती। याहोनिहि आन ज्या असती। त्या तंव सोडोनी द्याव्या निश्चितीं। विचार चित्तीं न करितां ॥ २०१ ॥ अविरुद्ध देव हनुमान। तो कुळीं असता इष्ट करावा कृष्ण। परी कुळीं असतां नारायण। शिवकृष्ण इष्टचि ॥ २०२ ॥ सत्वाची करावी वाढ। रजस्तमाची न धरावी भीड। आणि देवता कबाड। अवघे गावाळ फेडावे ॥ २०३ ॥ जरी पूजावे पंचायतन। ऐसे बोलिले आचार्य प्राचीन। तरी तयाचेंहि रहस्य पूर्ण। करा श्रवण निज चित्तीं ॥ २०४ ॥ पांच ईश्वर मानोन। पूजो नये पंचायतन। हें मी केलें निरूपण। प्रियलीलामहोत्सवीं

॥ २०५ ॥ किंवा एका देवांत सामर्थ्य नाहीं। म्हणोनि पूजों नये पांच कहीं। माझा पति समर्थ नाहीं। म्हणोनी पर नर पूजी काय पतिव्रता ॥ २०६ ॥ एकचि देव पूजितां चित्तीं। एक श्रोमंळ मजवरुती। या भयेंहि शिव रमापति। सांडुनी आनाप्रति समत्वें न पूजावें ॥ २०७ ॥ उमा पुजावी मातृभावना। शिव पुजावा पितृभावना। कृष्ण पूजावा पतिभावना। भगिनीभावना राधादि गोपी ॥ २०८ ॥ मातृभावना पुजावी रुक्मिणी। अथवा गोपिकाहि मानाव्या जननी। सूर्य गणपति देव मानोनी। सप्रेम भक्ति पूजावे ॥ २०९ ॥ गणपती पूजावा बंधु म्हणोन। सूर्यमंडळी तव माधवाचेंचि चिंतन। शिवीं माधूर्य जयाकारण। तिहीं कृष्ण वात्सल्येंकरून पुजावा ॥ २१० ॥ कृष्णाचि आहे गणपति। ऐसें बोलिले ब्रम्हवैवर्ती। तैं वात्सल्येंचि गजाननाप्रति। पूजावे भावे ॥ २११ ॥ उमेस मानावी भगिनी। अथवा मानावी जननी। कोठेंहि माधूर्य नसेल ज्यालागुनी। तेणें गुरु शूलपाणि पिता चक्रपाणि पूजावा ॥ २१२ ॥ किंवा गुरु कृष्ण पिता शिव। उमा रमाराधादि माता सर्व। येर पुजनीं सामान्य भाव। श्रोतेचि ओळखती ॥ २१३ ॥ यांविण पंचमूर्तिपूजन। तरी ते होय राजस भजन। ऐसियाचा निषेध आपण। तुकाराम स्वयें करिती ॥ २१४ ॥

शिव शक्ति आणि सूर्य गणपति। एकचि म्हणति विष्णूसहि ॥१॥
हिरा गार दोन्ही मानिती समान। राजस भजनें वाया जाती ॥२॥
अन्य देवतासी देव म्हणवून। तामस जीवन तमोयोग्या ॥ ३ ॥
वाया जायासाठीं केलासे हव्यास। अन्य देवतांस देवपण ॥४॥
आपुलिया मुखें मागतसे धणी। नव्हे माझी वाणी पदरींची ॥५॥
धन्य ते वैष्णव भजती केशव। सात्विक हे जीव मोक्षायोग्य ॥६॥
तुका म्हणे मोक्ष नाहीं कोणापाशीं। एका गोविंदासी शरण व्हा रे ॥७॥
( अभंग ४३०० )

एवं इष्टनिष्ठा सांगोन। चावट पंचायतनोपासना खंडोन। हरिहर मानावे समान। हें तुकारामचि सांगती पुनः ॥ २१५ ॥

हरिहरा भेद। नाहीं करो नये वाद ॥ १ ॥ एक एकाचे हृदयीं। गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥ भेदकासी नाड। एक वेलांटीचि आड

॥ ३ ॥ उजवे वाम भाग । तुका ह्मणे एक अंग ॥ ४ ॥
( अभंग ३०४४ )
ह्मणोनी न पडता पंचायतनाचे भरी । आवडी पुजावे शंकर हरी । हे आह्मांस इष्ट परो । संप्रदायेंचि ॥ २१६ ॥ एको देवो केशवो वा शिवो वेति । ऐसी बोलताहे स्मृति । म्हणोनी शिव आणि श्रीपति । भजावे प्रेमे ॥ २१७ ॥ ( चूर्णिका ) याचे विशेष निरूपण । पुढें येईल संपूर्ण । आतां मी आपुलें इष्ट करितो स्मरण । कीं शिवकृष्ण दोन्ही तात आपण म्हणोनी सर्व भावे नमन तदीय पदीं ॥ २१८ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माऊली । वंदोनी तियेची पाऊली । कविताकमळमाळा अर्पिली । सप्रेम चरणीं ॥ २१९ ॥

हरि ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वे विहारे धर्मसाम्येऽपि भागवतधर्मवैशेष्यनिरूपणंनाम चतुर्दशम् कुसुमम्

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

## अध्याय १५ वा.

जय जय सद्गुरु तूं चिंतामणी । तूं सकळ विघ्ना दूर करोनी । स्फूर्ति देई मज लागोनी । पुढें वाणी वदवावया ॥ १ ॥ येणें स्तवनें साचारु । स्फूर्तिरूप जाहले श्रीगुरु । तरी पुढील ग्रंथविस्तारु । श्रोते निर्धारू ऐकोत ॥ २ ॥ मागील ऐकोनी निरूपण । सच्छिष्य सद्भावें करी प्रश्न । म्हणे वर्म सांगितले आपण । सकल भागवतधर्मांचे ॥ ३ ॥ आतां शुद्धाशुद्ध धर्माधर्म । निर्णायक तर्क कीं आगम । याचेंहि सांगावे वर्म । कृपा करोनी स्वामिया ॥ ४ ॥ आणि नवल कलियुगाची गति । तेथ न चाले धर्मस्थीति । एक पाद धर्माची गति । तरी केवि श्रीपति मग पावे ॥ ५ ॥ तैं श्रीगुरु वदती आपण । सावधान करी श्रवण । येथ शुद्धाशुद्धतेचें कारण । शास्त्र प्रमाण निश्चयें ॥ ६ ॥ शास्त्राविण कांहीं । शुद्धाशुद्धता बोलिली नाहीं । गुणांची सूक्ष्म गति लवलाही । शेषशाई

जाणत् ॥ ७ ॥ नाहीं तरी सूतिका स्पर्शता । अवघे वस्त्र कां क्षालता । यास्तव शुद्धाशुद्धविवेक तत्वता । शास्त्रेंचि कळे ॥ ८ ॥ कलि यद्यपि तामस । परी हरिभक्तासी सात्विक सुरस । जैसें मारक होय सर्पविष । परी सुधारस संन्निपातादौ ॥ ९ ॥ एका एकाचे उपमर्दन । करोनी चाले गुणसंक्रमण । यालागीं शुद्धाशुद्धविवेक पूर्ण । अतिकठीण तर्कयुक्ता ॥ १० ॥ धातूपात्रास अशुद्ध स्पर्शता । ते अग्नीनें शुद्ध होय तत्वता । मृत्पात्रास स्पर्श होता । तरी ते सर्वथा त्याज्य होय ॥ ११ ॥ शक्ति असलिया शरीरासी । कर्म न करितां दोष त्यासी । रोगें व्यापिता निज देहासी । कर्म कर्त्यासी महादोषू ॥ १२ ॥ द्विविध आहे गुणसंक्रमण । मनोज दैवज भेदेंकरून । इंद्रियनिग्रह कामादिप्रवर्तन । हें मनोज गुण-संक्रमण जाणिजे ॥ १३ ॥ सुटोनी देवतांची स्थीति । पिशाचादि सभों-वती नांदती । मग देहीं शिरोनी बिघडविती । निज बुद्धीतें ॥ १४ ॥ हे दैवज गुणसंक्रमण । तयाते निज कर्म कारण । कर्माचे जीवास नाहीं ज्ञान । ह्मणोनि शास्त्रेंचि प्रमाण शुद्धाशुद्धाविषयीं ॥ १५ ॥ मनोजन्य गुणसंक्रमण । तें किंचित् कळो शके तर्केंकरून । परी तेथेंहि घोटाळे अंतःकरण । जे धर्म कवणे निवडावा ॥ १६ ॥ अहिंसा एक साधू जातां । तरी सत्य न साधे तत्वता । वीतहव्य राजा आश्रमा येता । भृगु तद्रक्षणार्थ बोलले खोटें ॥ १७ ॥ आतां सत्यचि साधावे संपूर्ण । तरी अहिंसा सुटो पाहे करोन । " हितं मनोहारि च दुर्लभं वचः " ह्मणोन । किरातवचन स्पष्ट असे ॥ १८ ॥ दयेनेंचि राव भरत । हरिणी गर्भा गेला त्वरित । एवं मनोधर्माची विचित्र गत । न कळे निश्चित कवणाते ॥ १९ ॥ एकास एक धर्म वाटे । दुजा तो निषेधी नेटें । कठीण जीवन कलह प्रगटे । याचिमार्जी ॥ २० ॥ ह्मणोनी धर्माधर्म दोन्ही । सिद्ध मानाव शास्त्रावरूनी । महाभारतीं भीष्मानीं । सांगितलें ऐसें ॥ २१ ॥ योगवासिष्ठीं ऐसें वचन । कीं श्रुतीहूनि युक्ति बलवान् । यालागीं संशय दारुण । धर्माविषयीं ॥ २२ ॥ तथापि युक्तीच्या ठायीं । धर्मामार्जी आश्रयो नाहीं । वासिष्ठवचन लवलाही । ज्ञानपर असे ॥२३॥ वाक्य समन्वयादि रीति । कां शक्तिलक्षणादि वृत्ति । इत्यादि वचना अनुकूल युक्ति । वासिष्ठोक्ति बोलिल्या ॥ २४ ॥ परी धर्माधर्माच्या

ठायीं । शास्त्रावांचोनि गतिचि नाहीं । यालागीं सर्वाठायीं । शास्त्रचि सेविजे ॥ २५ ॥ परी तेहि शास्त्र युगानुरूप । ऐसें बोलिले सप्रप । तथापि हा संशयारोप । भागवतधर्मी कदा नसे ॥ २६ ॥ कलींत एकपाद धर्मस्थीति । ती जाणावी स्मार्तादि धर्मरीति । भागवत-धर्माची गति । तैसी नाहीं ॥ २७ ॥ जगीं नियम हाचि यथार्थ । न्यून तेचि दुर्मिळ होत । पूर्ण ते सुलभ मिळत । सकळालागी ॥ २८ ॥ जेंवि जल सुलभ सर्वाप्रति । परी गर्दभीमूत्र संग्रहावें लागे वैद्याप्रति । तैसा परमात्मा सुलभ सर्वाप्रति । दुर्लभ आणिक धर्मफळें ॥ २९ ॥ तंव वादी ह्मणे हे कैसे । शास्त्र वदे ईशाराधन कठिण असे । सिद्धान्ती ह्मणे तेहि आपैसे । योग्यचि आहे ॥ ३० ॥ नवल वासनेची रीति । सुलभ कठीण वाटे तियेप्रति । जननी कृपा सुलभ क्षिति । ते नावडे पुत्राप्रति सर्वथा ॥ ३१ ॥ साधावया गणिकादया । नाना करी धनोपाया । वासना सहज सांडोनिया । सायास इच्छी ॥ ३२ ॥ याचिलागीं भागवतधर्माहून । नाना धर्म निघाले गहन । कीं भागवत-धर्मी निष्काम । घनश्याम सेवा बोलिली ॥ ३३ ॥ तंव वादी ह्मणे ऐसे कां केले । हे पाहिजे होते भागवतधर्मीच बोलिले । कीं ईश्वरें काम पुरविजे सकळें । शनैःशनैः ॥ ३४ ॥ तरी ह्मणे सिद्धान्ती । हें काय पुससी आम्हाप्रति । जाऊनी पुसे शास्त्राप्रति । भागवतधर्मी प्रमाण जे ॥ ३५ ॥ शास्त्रें ऐसे कां नाहीं बोलिले । हें ईश्वरास पाहिज विचारिले । आह्मीं हें बोलिले हें न बोलिले । एवढेचि सांगू ॥ ३६ ॥ जैसा आपुल्या भेटीवांचोन इतर । ईश्वर फळ दे कर्मानुसार । तो कर्मप्रवाह अनादि समग्र । गति सर्वेश्वर जाणे त्याची ॥ ३७ ॥ ह्मणोनी कर्म न करोनि निर्माण । केवळ उपदेशिले लक्षण । भागवतधर्मी आपण । स्वतंत्र भक्ता भेटावया ॥ ३८ ॥ तवं वादी ह्मणे भागवतधर्म । ह्मणिजे काय मोक्षधर्म । तरी ते पूर्वी असोनी आज परम । क्षीणाचि झाले ॥ ३९ ॥ तैं सिद्धान्ती ह्मणे एक गोष्टी । भागवतधर्मे मोक्ष मिळेल शेवटीं । परी स्मार्त मोक्षधर्माहोनि परिपाठी । अन्य तयाची ॥ ४० ॥ नर्मदास्नाने गंगास्नानें । एकचि स्वर्ग जरी पावणें । तरी काय वेगळे न ह्मणणे । नर्मदेहून गंगेस ॥ ४१ ॥ मोक्षधर्माचिया

ठायीं। विशेष यतींविण अधिकार नाहीं। अधिकार यति व्हावयाहि। बहुश: ब्राह्मणाचाचि असे ॥४२॥ पतितासी कहीं। मोक्ष साधनाचा अधिकार नाहीं। आतां भागवतधर्म पाही। कैसा असे ॥४३॥ यज्ञपत्न्या सोडोनी पति। भगवद्भजनें पावल्या सद्गति। तैसीच गोपिकांची रीति। सर्वांप्रति ठाऊक ॥ ४४ ॥ तें वादी ह्मणे नवल वाटे। वेदबाह्य धर्म असतां नेटे। कैसा आर्यांहि मानिला हठें। आणि बौद्धादि कां निषेधिले ॥ ४५ ॥ सिद्धान्ती ह्मणे ऐक उत्तर। श्रुतिबाह्य नाहीं भागवतविचार। गोपालतापनीयादि समग्र। श्रुति निर्धार सांगती ॥ ४६ ॥ श्रुति ह्मणजे काय भगवत्प्रणीत। तें काय होती विशेष ग्रंथ। भागवतटीका भगवत्प्रणीत। यालागीं तीहि श्रुति होय ॥ ४७ ॥ श्रुतींत जो संक्षेपें बोलिला। तोचि भागवतीं विस्तारिला। यालागीं नाहीं वेगळा झाला। भागवत धर्म ॥ ४८ ॥ जरी वामतंत्र ईश्वरप्रणीत। तरी ईश्वरापरीस स्वभोगसौलभ्य त्यांत। यालागीं त्यागिले समस्त। वेदबाह्य समजोनी ॥ ४९ ॥ ज्याची कल्पना मनुष्यासहि येत। तें ईश्वरें सांगतां अनुवादचि होत। वामतंत्रांतील भोग सर्व ज्ञात। नाहीं अज्ञात विधि कोणी ॥ ५० ॥ थोडासा विधि असला अज्ञात। तरी तेवढ्याचें फळहि मिळत। एवं वेदबाह्य ईश्वरप्रणीत। कारण बोधिले त्यागावया ॥ ५१ ॥ बौद्धादि धर्म निश्चिती। ते तंव वस्तूंत विरोध करिती। आत्म्यासाचि शून्य ह्मणती। यालागी ते अनुभवेंचि त्यक्त ॥ ५२ ॥ आत्मा शून्य कळावया पाहीं। हेतु तंव सर्वथा कोणीच नाहीं। हें मी बोलिलें नानाठायीं। नाना ग्रंथीं ॥ ५३ ॥ आतां आगमेंचि मानावी शून्यता। तरी अपराध कोण वेद मानिता। वेद अनुभवायोग्य तत्वतां। ह्मणोनी शून्यपंथा त्यागिले वैदिकें ॥ ५४ ॥ वस्तुनिरूपणापुढें जाण। वेदोक्त कर्महि मानिलें गौण। यालागीं संन्यासाश्रमाकारण। अधिकार नाहीं कर्मकांडीं ॥ ५५ ॥ अधिकारभेदें बौद्धादि तंत्र। प्रमाणहि मानिती मुनीश्वर। परी भागवतधर्म स्वतंत्र। तैसा नोहे ॥५६॥ भागवत धर्माच्या ठायीं। स्वभोगबाहुल्य बोलिलें नाहीं। प्रत्युत निष्काम शेषशाई। भजन लवलाही बोलिले ॥ ५७ ॥ वेदीं विकल्पें बोलिली हिंसा। तेहि भागवत धर्मीं नाहीं मीमांसा। वैदिककर्मारिणें ईशा। विरोधहि नाहीं ॥ ५८ ॥

आतां सर्ववर्णाधिकार पाहुनी । निषेधावा जरी कोणी । तरी दुराचार सांगितलिया वांचुनी । व्यर्थ मुनि निषेधितीना ॥ ५९ ॥ महात्म्यें स्वयेंचि दयावंत । परी वचनबद्ध ह्मणोनी शूद्रा वेदीं न घेत । तेंचि वचन मिळता सर्वाधिकाराप्रत । तरी व्यर्थ कासया निषेधितील ॥६०॥ आणि भगवंत भजन सोडोन । द्यावे ह्मणतां इतराकारण । तरी ईश्वर-भक्तिपरीस सेवारागसंपन्न । होवूं हे दारूण भय मना ॥ ६१ ॥ एवं दुराचार नाहीं । तरी निषेधितील कायी । आतां दुर्विचार तोहि । भागवत धर्मीं मिळेना ॥ ६२ ॥ ईश्वराची उभयकारणता । आणि मुक्तींत जीवेशैक्यता । भागवत धर्मी विचार तत्वता । अनिंद्यचि ॥ ६३ ॥ ईतर वर्णाच्या अधिकारासाठीं । वामतंत्रहि माहात्मे साहती पोटीं । तेथ भागवत धर्म त्यागितील शेवटीं । हे तंव गोष्टी मनींहि नये ॥६४॥ एवं आचारें विचारें करून । दूषावया नाहींचि कारण । किंचिद्वेदबाह्य वाटता जाण । दूषिलेहि आहे ॥ ६५ ॥ पांचरात्रीचा विचार । जीवोत्प-त्यादि दूषी ब्रह्मसूत्र । परी भगवदभिगमनादि आचार । श्रीआचार्य शंकर न दूषिती ॥ ६६ ॥ तंव वादी ह्मणे वासिष्ठलैंगपुराणीं । वेद-मार्गास त्यागोनी । पांचरात्रीं शिरला शांडिल्यमुनि । तो अधोगति गेला ही वाणी असे ॥ ६७ ॥ सिद्धान्ती ह्मणे तेथ कथा । शांडिल्य नित्य पापें करीत होता । त्याचेंचि फळ तत्वता । यमलोक झाला तयासे ॥ ६८ ॥ परस्त्री गमनादि अनंत । शांडिल्य होता पापें करीत । यास्तव नरक भोगोनी विष्णुलोकाप्रत । भागवत धर्मेचि गेला तो ॥ ६९ ॥ आश्वलायन वाजसनेयी उच्चार करितां । तरी अनर्थ प्राप्ति तयाहि तत्वतां । बळेंचि वेद मार्ग त्यागोनी सर्वथा । पापरत द्विज झाला तो ॥ ७० ॥ यद्यपि नामें पाप जाय गहन । तरी पाप करणें हा नामापराधहि जाण । सत्ययुगीं हे अधिक प्रमाण । यास्तव दारुण फळ पावला शांडिल्य ॥ ७१ ॥ आणि पाप करोनी पुजिला श्रीपति । ऐसी भावना तयाचे चित्तीं । कीं मज पापेंहि होईल मुक्ति । ह्मणोनी श्रुति त्यागिली ॥ ७२ ॥ भोगासाठीं धर्मत्याग । तो न साहे रमारंग । ईश्वरासाठीं धर्मत्याग । तरी तयाचा पांग सकळ फेडी ॥ ७३ ॥ सुलभ जे ह्मणती भक्ति । तयाचा अर्थ नाहीं विषयासक्ति । ईश्वर मिळे शिघ्रगति । आणि विघ्नें न येती

ह्मणोनी सुलभ ॥ ७४ ॥ पुनः वासिष्ठलैंगींच आहे वचन । कीं कुमार्गे पूजेनेंहि नारायण । संतुष्ट होऊन तयाकारण । शेवटीं दिधली श्रौतगति ॥ ७५ ॥ वासिष्ठलैंग उपपुराण । तें महापुराणानुकूल प्रमाण । पांचरात्र प्रशंसा पूर्ण । भारतीं आणि पुराणीं ॥७६॥ आतां आह्मीं जो बोलिलो भागवत धर्म । तो तंव भागवत पुराणानुसार परम । तेथ पांचरात्रागम । कार्यो पुरता ॥ ७७ ॥ केवळ पांचरात्रोक्त नाहीं ह्मणोनी । संशय न घ्यावा व्यर्थ मनीं । याचा विशेष प्रकार तुजलागुनी । पुढेंहि सांगू ॥ ७८ ॥ कलिमार्जीं वर्णसंकर । भागवत धर्में होईल साचार । ऐशा अभिप्रायें बोलिलासी निर्धार । तेंहि अयोग्य ॥७९॥ कल्की अवतार झालियावरी । विष्णुभक्तीचि वाढली कुसरी । हे कल्की पुराणीं सुंदरी । शशिध्वजोक्ति ॥ ८० ॥ कल्की वर्णाश्रमधर्मस्थापक । परी भक्तींत चातुर्वर्णाधिकार देव्हांहि सुरेख । ऐसें कल्की पुराणींच श्लोक । तेहि प्रमाण ऐके ॥८१॥

भक्तस्यापि हरौ द्वैतं सेव्यसेवकवत्तदा ।
नान्यद्विना तमित्येव क च किंचन विद्यते ॥ ३९ ॥
भक्तः स्मरति तं विष्णुं तन्नामानि च गायति ।
तत्कर्माणि करोत्येव तदानंदसुखोदयः ॥ ४० ॥
नृत्यत्युद्धतवद्रौति हसति प्रैति तन्मनाः ॥
बिलुंठत्यात्मविस्मृत्या न वेत्ति कियदन्तरम् ॥ ४१ ॥
एवंविधा भगवतो भक्तिरव्यभिचारिणी ।
पुनाति सहसा लोकान्सदेवासुरमानुषान ॥ ४२ ॥
भक्तिः सा प्रकृतिर्नित्या ब्रह्मसम्पत्प्रकाशिता ।
शिवविष्णुब्रह्मरूपा वेदाद्यानां वरापिवा ॥ ४३ ॥

मुळीं पदें ऐसीं असतां । कीं देव असुर मानुषें भक्तीनें तरती । सर्व वेदांत वरिष्ठ भक्ति । सेव्यसेवकस्वरूपिणी ॥ ८२ ॥ एवं कलियुगाचें अंतीं । सत्ययुगस्थापक कल्कीची स्थीति । तेव्हां निशान गाजवी भक्ति । यालागीं धर्मी भागवतीं भय नाहीं ॥ ८३ ॥ कलीची विचित्र थोरी । भागवतीं वर्णिली नानापरी । केवळ नामस्मरणेंचि मिळे हरी । अल्पकाळ आचरितां ॥ ८४ ॥ कलि न बाधी भगवद्भक्ता । कृतादींचे लोक तत्वता । कलींत जन्म इच्छिती सर्वथा । यालागीं धर्मी

भागवता क्षीणता नाहीं ॥ ८५ ॥ हे मागाही बोलिलो तुजप्रति । पुढेंहि सांगेन नाना रीति । जन नानाविध असती । यालागीं धर्मस्थीति नाना ॥ ८६ ॥ अतिरेक न व्हावा ह्मणोन । प्रायश्चित्त झाले नामस्मरणभिन्न । ऐसे स्मृतींत निरूपण । ऐकिले बहुतीं ॥ ८७ ॥ आतां नामस्मरणेंचि मत्त होता । तरी तया हरीचि रक्षिता शिक्षिता । यालागी धर्मा भागवता । सांडूचि नये ॥ ८८ ॥ परी नामस्मरणासहि न मानुनी । बहु अधर्मी वर्तती जनी । त्यांचीच निंदा सकल वचनीं । कलीस धरोनी केली असे ॥ ८९ ॥ सत्ययुगीं धार्मिक । कलियुगीं अधार्मिक । हे दोन्ही भागवत भिन्न लोक । भगवदुपासक तंव निर्भय सदा ॥ ९० ॥ यालागीं सांडोनी सर्व आयास । भागवत धर्मीचि करावा प्रवेश । वैदिक धर्महि तयास । विरुद्ध नाहीं ॥ ९१ ॥ सत्वशुद्धि होवोनि मिळेल भगवंत । तोचि आचार सांगे धर्म भागवत । केवळ तामस राजसहि कर्म असतां ईश्वरार्थ । तरी सत्वचि उपजवी ॥ ९२ ॥ ( चूर्णिका ) परी येथ तामस न घेयावे मांसभक्षण । कीं राजस न घेयावे परस्त्री गमन । स्वभोगभाग परित्यागोन । केवळ ईश्वरार्थ तरी तामस राजस पूर्ण सात्विक होय ॥ ९३ ॥ परी ठाऊक नसतां शास्त्रस्थिति । व्याध घंटाकर्णा ऐसी भक्ति । घडतांहि होय भगवत्प्राप्ति । विचित्र स्थिति ईश्वराची ॥ ९४ ॥ परी शास्त्र कळलिया जाण । तरी बळेंचि तामस राजस कर्म करून । संपत्कालीं सात्विक अव्हेरून । नारायण भजूं नये ॥ ९५ ॥ भजतांहि जरी मिळे सद्गति । तरी काळ लागे तयाप्रति । शांडिल्यासी जाहली दुर्गति । ते सात्विक त्यागाचेंचि फळ ॥ ९६ ॥ आपत्कालीं ईश्वरार्थी । भलते करूनी भक्त तरती । परी संपत्कालीं सात्विकोपास्ति । भगवदर्थी सदा कीजे ॥ ९७ ॥ तंव वादी म्हणे हें नाहीं । संपत्कालीं राजस करोनिहि । गोपिका तरल्या लवलाही । पति सोडोनी भगवत्कामें ॥ ९८ ॥ पिता सांडोनी तरला प्रल्हाद । ह्मणोनी संपत्कालींहि विपरीत होय शुद्ध । सिद्धान्ती ह्मणे चित्त करोनी शुद्ध । उत्तर ऐके ययाचें ॥ ९९ ॥ जीवोपासना वेदीं निषिद्ध असतां । ईश्वरोत्कर्ष भावनें भजावा पिता । तो संबंध प्रत्यक्ष ईश्वरींचि होता । तरी पिता त्यागिता राजस नोहे ॥ १०० ॥ एवं पतिचेहि ठायीं उत्कर्षभाव ।

तो भगवंतचि पति झालिया स्वयमेव । राजस नाहीं स्वभाव । सात्विकचि तो ॥ १०१ ॥ आणि भगवत्साक्षात्कार प्रत्यक्ष असतां । तेथ कासयाचि काळविचार्यता । माधुर्य भक्ति करावी तत्वता । येथ नारदसूत्रहि प्रमाण असे ॥ १०२ ॥ शास्त्र असतां राजस नाहीं । आणि सात्विक कर्म जें बोलिलें कांहीं । तें उपासनेंतचि लवलाहीं । गोपिकांची तंव भक्ति होती ॥ १०३ ॥ भगवंतीं काम ठेविता । तरी स्वदेह विसर पडे तत्वतां । तैसा मांसभक्षणादि विधि करिता । न पडे कोरूं ॥ १०४ ॥ ह्मणोनी तें तामस । शास्त्र कळतां वर्जावे निःशेष । तैसे भगवत्द्वेषादि राजस । विरोधभक्तीस वर्जावे ॥ १०५ ॥ जो भगवंताविण आनाहार्तीं । न मरेल तेणें विरोध धरावा भगवंतीं । द्वेष सर्वथा नोहे भक्ति । तया होये मुक्ति हा भगवत्स्वभावो ॥ १०६ ॥ द्वेषानें जे होय उपास्ति । त्याचा परिणाम न होये ज्ञानोत्तर भक्ति । यालागीं ईश्वरीं परानुरक्ति । हें बोलिली भक्ति भागवत धर्मीं ॥ १०७ ॥ विशेष सात्विकसेवन । विधि गौणी भक्तींत जाण । परा भक्तींत प्रीतिसंपन्न । प्रेमानुसार भक्त जाणे ॥ १०८ एवं भागवत धर्म प्रकार । तुज कळो दे समग्र । वाचे गायीं आळंदीश्वर । भय विचार सोडोनी ॥ १०९ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माऊली । तियेची वंदोनी पाऊली । कविताकमळमाळ वाहिली । सप्रेम चरणीं ॥ ११० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते संप्रदाय सुरतरौ पूर्वविहारे भागवतधर्मप्रकारकथनं नाम पंचदशमं कुसुमम्

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

## अध्याय १६ वा.

जय जय सद्गुरु सर्वेश्वरा । सच्चिदानंदा करुणाकरा । भक्तवत्सला दीनोद्धारा । आळंदीपते ॥ १ ॥ अंबे तुझिये कृपादृष्टि । भगवद्रूपचि भासे सृष्टि । अद्वैतींच भजन उठी । श्रीगुरुचरणाचे ॥ २ ॥ सद्गुरुचरणांचिये महिमे । जे बोलिजे एकप्रेमें । तें सावधान हृदयीं गमे । तैसे कीजे श्रोतेजनीं ॥ ३ ॥ मागा बोलिले निरूपण । भागवत धर्म प्रकार-

गहन । तें ऐकोनी शिष्य करी प्रश्न । कर जोडून श्रीगुरूतें ॥ ४ ॥ ह्मणे स्वामीचें वचनामृत । पीतां जीव नव्हे तृप्त । यालागीं वारंवार चित्त । याचित उत्तरभातुके ॥ ५ ॥ एक संशय माझे मनीं । निष्कामा आश्रय चक्रपाणि । तरी सकामानें देव कोणी । ईश्वरावांचोनि भजावा ॥ ६ ॥ दुसरी शंका कैसें भजन । कैसें धर्माचें लक्षण । कासया धरावेत बाह्य चिन्ह । अंतश्चिन्हावांचोनि ॥ ७ ॥ अंताश्चिन्ह आंगीं असतां । बाह्यचिन्ह होती वृथा । आणि अंतश्चिन्हें आंगीं नसतां । तरी वृथा बाह्यचिन्हें ॥ ८ ॥ ऐसा ऐकोनी शिष्यप्रश्न । सद्गुरु वदती सुंदर वचन । ह्मणती सावध करी श्रवण । सर्वांगा कान करोनी ॥ ९ ॥ जरी निष्काम भक्तिविण । सर्वथा नोहे भागवतपण । तथापि सकामा कारण । एक नारायणाचि आश्रयो ॥ १० ॥ इतर देवतांची भक्ति । जे नाना नर करिती । त्यापरीस सकामहि भक्ति । श्रीहरींची अतिश्रेष्ठ ॥ ११ ॥ मुष्टिभऱ्या पोह्यासाठीं । ज्यानें कनकराज्यपटीं । द्विज बैसविला तो सांडुनी जगजेठी । पसरीजे ओटी कवणापुढें ॥ १२ ॥ शत्रूचा बंधूहि येतां शरण । तात्काळ केलें लंकादान । तो सांडुनी करुणाघन । पाहावा कोण आणिक ॥ १३ ॥ एवं भजतां मेघःश्याम । इहलोकींचे पुरविले काम । आतां परलोकहि ध्रुव मागता परम । पुरुषोत्तमें दिधला ॥ १४ ॥ ह्मणोनी सकाम जरी जाहला । तरी माधवाचि पाहिजे मजला । लेंकुराची आळ पुरवावयाला । मायचि समर्थ ॥ १५ ॥ परी निष्काम भक्तांची रीति । काळेविण भगवत्प्राप्ति । तैसी नाहीं सकामभक्ति । एथ काळ निश्चितीं लागतु ॥ १६ ॥ जेव्हां जडली निष्काम प्रीति । तेव्हांचि ज्ञान वैराग्य भक्ति । चित्तामाजीं आविर्भवति । सात्वतश्रुति हेंचि वदे ॥ १७ ॥

> शृण्वन्सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ।
> गीतानि नामानि तदर्थकानि गायन्विलज्जो विचरेदसंगः ॥३९॥
> एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ।
> हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥४०॥
> इत्यच्युतांघ्रिं भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ।

भवंति वै भागवतस्य राजंस्ततः परां शान्तिमुपैति साक्षात् ॥४१॥
( भागवत स्कं० ११ अ० २ )

कान ऐकती हरीचे गुण । श्रीहरीरूपीं जडले नयन । हरिवांचुनि एकहि क्षण । मन चिंतन करूं नेणें ॥ १८ ॥ घ्राण निर्माल्यवास पाहे । वाणी सदा मुकुंद बाहे । हात सेवेमाजीं स्वयें । मंदिरगमना पाय उत्सुक ॥ १९ ॥ एवं भगवंताविण । जया वेगळा नसे एकहि क्षण । तया भक्ति वैराग्य आणि ज्ञान । सहज जाण उचंबळती ॥ २० ॥ सकाम भक्तांची रीति । धर्म साह्यकारी पाहिजे त्याप्रति । धर्मावांचुनि सकाम भक्ति । कल्पांतींहि फळेना ॥ २१ ॥ भक्तांचें संकष्ट भगवंत । अंगे सोशी जरी समस्त । तरी हे निष्काम भक्ताविषयींच विख्यात । सकाम भक्तासी पाहिजे धर्मू ॥ २२ ॥ परी धर्माची ऐसी सोय । प्राणापर्यंत वाट पाहे । आणि ईश्वर संकटीं रक्षितु आहे । निज दासाते ॥ २३ ॥ शिबी धर्मे परिक्षिला । तो मांस देतां कंठीं प्राण आला । शेखीं धर्मफळ तयाला । धैर्येचि मिळाले ॥ २४ ॥ दामाजीसाठीं मधुसूदन । महार होवोनि पूजिला यवन । परी येथहि सकाम भक्ति पूर्ण । नव्हती विप्राची ॥२५॥ त्यानें नाहीं याचिले गोविंदा । परी चिंता पडली परमानंदा । यालागीं केला धंदा । आपणचि नफराचा ॥ २६ ॥ द्रौपदी मागे वारंवार । तिची आशा पुरविली समग्र । परी शाकपत्राविण ऋषीश्वर । नाहीं जेवविले यदुनाथें ॥ २७ ॥ तथापि संकटीं रक्षिता । द्रौपदीची भक्ति वाढती तत्वता । सोन्याची नगरी सुदाम्यास मिळता । प्रेम वाढता त्याचाही ॥ २८ ॥ अर्ध सकामासी देतां भगवंत । त्याचें निर्मळ होय चित्त । जैसा ध्रुवपश्चाताप भागवतांत । कीं मी काय व्यर्थ मागितला संसार देवा ॥ २९ ॥ ह्मणोनी धर्मसहायेंकरून । अर्ध सकामाची इच्छा होय पूर्ण । आणि निष्कामासी संकट येतां जाण । स्वयें भगवान अंगे सोशी ॥ ३० ॥ असो सकामहि जरी भगवद्भक्त । तरी त्याचे ऐसे असावे चित्त । कीं फळ मागोनहि न देतां भगवंत । तेथ कारण दैव आपुले ॥ ३१ ॥ परी फळ नाहीं मिळाले ह्मणोनी । सोडूं नये कैवल्यदानी । आतां पूर्ण सकाम तंत्र फळ न मिळतां क्षणीं । देत सोडुनी उपास्या ॥ ३२ ॥ ह्मणोनी तयासाठीं कुसरी । कर्मे निर्मिली नानापरी । अर्ध

सकाम येवो निर्धारी । भागवत धर्मी प्रवेशावया ॥ ३३ ॥ तुवां पुसिला दुसरा प्रश्न । कीं बाह्य चिन्हांचें कारण कवण । त्याचेंहि एक समाधान। सावध मन करोनी ॥ ३४ ॥ अविद्येची अगाध गति । बाह्यचिन्हें होय अहंमति । अंतश्चिन्हा अभ्यास लागती । करावया ॥ ३५ ॥ देहाच्या आंत आहे प्राण । तो आत्म्याच्या संन्निध असोन । लोक ह्मणती हा माझा प्राण । परी मी प्राण ऐसें न ह्मणती ॥ ३६ ॥ त्याहोनी बाह्य रूप नाम । तेथ लोकांस होय अहंभ्रम । मी शिवराम मी सिताराम । मी मनुष्य मी ब्राह्मण कीं ॥ ३७ ॥ एवं जवळीचे वाटे भिन्न । आणि दुरीचे होय अभिन्न । हा महिमा असे संपूर्ण । अविद्येचा ॥ ३८ ॥ मायेवरी शिवीं देतां । तरी विनोद वाटे चित्ता । परी बायकोस बाईट ह्मणता । क्रोध सर्वथा नावरे ॥ ३९ ॥ अति विचित्र माधवमाया । जे ब्रह्मादिका नये आया । लिंगेचि संस्कार उठती वाया । अलिंगीं ये उपाया अभ्यासू ॥ ४० ॥ आपुला जन्म कहीं। आपण देखिलाचि नाहीं । तथापि बाह्य बाप आई । ह्मणता गोवी तेथेंचि पडे ॥ ४१ ॥ इतर स्त्रियेस माय ह्मणता । तरी अभ्यासू लागे चित्ता । बाह्य संस्कारेंचि तत्वतां । उपजे अहंता मूढाप्रति ॥ ४२ ॥ यज्ञोपवीत घातल्याविणा । वेदाधिकार नये ब्राह्मणा । तात्पर्य न घेता बाह्यचिन्हा । अंतश्चिन्हा विलंबू ॥ ४३ ॥ विवाह तरी बाह्य संस्कार । परी तेवढ्यानेंचि पति-पत्निसंबंध थोर । कारण अभ्यासाचा स्वभाव दुस्तर । तो उपजवी अहंकार बाह्य चिन्हीं ॥ ४४ ॥ आणिक एक उपपत्ति । समाधींत अंतश्चिन्ह तीव्र होती । व्युत्थानीं ते मंद पडती । ही आहे अनुभूति सकळाते ॥ ४५ ॥ ज्ञानियासी चिन्हाविण । कर्तव्य नाहीं हें प्रमाण । परी. अज्ञानियासी बाह्यचिन्ह । महारक्षण संस्कारा ॥ ४६ ॥ अहेव पुसील कुंकुम । तरी काय तुटे पतीचा प्रेम । मग उगाचि गळसरीचा संभ्रम । गळा भार कासया ॥ ४७ ॥ अंतश्चिन्हाची दुर्लभ गति । ते वाढता अधिकारासहि खाती । जैशा समाधींत जडता वृत्ति । तरी मी ब्राह्मण कीं कोण हें न कळे ॥ ४८ ॥ परी समाधीहूनि व्युत्थानीं येतां । यज्ञोपवीत कंठीं नसता । तरी मी शूद्र ऐसीच अहंता । उपजेल तया ॥ ४९ ॥ यद्यपि लिंग नाहीं परमहंसीं । तथापि ज्ञानदशा विहित

त्यासी । चिन्ह विचार अज्ञानियासी । हे अनुपदेशी बोलिले ॥ ५० ॥ समाधींत आत्म्यैक्य वृत्ति । व्युत्थानीं येता देहाहंकृति । परी बाह्य चिन्ह असतां निश्चिती । व्युत्थानीं हरिदास्याहंकृति उपजे ॥ ५१ ॥ जे अभिमान वाहती आंगीं । आम्ही हरीचे भूषावयालागीं । ऐसे वदले कैवल्य चौरंगीं । बैसोनी तात ॥ ५२ ॥ आणिकहि प्रयोजन । विवश असता दीक्षित आपण । रक्षितपणें येती अंतश्चिन्ह । तें बाह्यचिन्ह येती कामा ॥ ५३ ॥ केवळ विभूतीच्या लेपें । दुर्जनें तरली अमूपें । तुळसीसंन्निध मरता साक्षेपें । वैकुंठदीपें तीं झालीं ॥ ५४ ॥ पिशाचादिका ओळखावया । बाह्य लिंगचि सुलभ शिष्यराया । नाहींतरी ग्रस्त काया । इच्छिती करावया प्रयत्न ॥ ५५ ॥ अंतःशुद्धि न कळे पिशाच्याप्रति । ते बाह्य चिन्हें पाहोनिचि परतती । अंतश्चिन्हें एकादियास साधती । बाह्यचिन्हें अभिमान सर्वाप्रति होय ॥ ५६ ॥ अंतश्चिन्हें निर्मळ वासना । बाह्य चिन्हें अदृष्ट उपजे जाणा । अन्यथा यज्ञ सामुग्रिविना । स्वर्ग कवणा कां न मिळे ॥ ५७ ॥ साचचि अंतश्चिन्हाविण । वृथा होती बाह्यचिन्ह । परी मृदु संवेगी असता अंतश्चिन्ह । बाह्यचिन्हें तीव्र होती ॥ ५८ ॥ केवळ अंतश्चिन्हीं लागला । तो साचचि उद्धरिला । केवळ बाह्यचिन्हीं पडला । तो बुडाला निःसंशय ॥ ५९ ॥ परी केवळ अंतश्चिन्हनिमग्न । कोणी न सांपडे योगियाविण । आणि केवळ बाह्यचिन्हीं निमग्न । तो पतित पूर्ण आम्ही ह्मणो ॥ ६० ॥ परी साधक मध्यस्थ असती । तयांची ऐसी असे स्थीति । कीं अंतश्चिन्हें मृदु असती । बाह्यचिन्हें होती तीव्र ते ॥ ६१ ॥ विष्णुभक्ति आवडे पोटीं । परी मी वैष्णव हे वाटे माळ घालिता कंठीं । यालागीं जंव ब्रह्मरूप न भासे सृष्टि । तंव लिंगें गोमटीं न उच्छेदावीं ॥ ६२ ॥ आणि कळलिया किंचिज्ज्ञान । नख केश राहती शारीरिक चिन्ह । केवळ द्वेषावे धार्मिक चिन्ह । हें कोण ज्ञान ह्मणावे ॥ ६३ ॥ पुनः बाह्यचिन्हाविण । विकारांचे न घडे नियमन । दृष्टान्त करावा श्रवण । येचिविषयीं ॥ ६४ ॥ पहिलेचि कळते स्त्रियेच्या पोटीं । कीं माझें शरीर पुरुषासाठीं । परी भलत्या पुरुषाच्या न लागावे पाठीं । ह्मणोनी गोमटी बाह्योद्वाहव्यवस्था ॥ ६५ ॥ तेसी भक्ति उमटे मनीं । परी ती अर्पावी कवण्या स्थानीं । हे इष्टनिष्ठा दावायालागुनी । नियामक-

पर्णी बाह्य चिन्हें ॥ ६६ ॥ आणिक एक उपपत्ति मोठी । बाह्यचिन्हें मिळे उपादान तुष्टी । तेणें एक अशक्ति हारपोनी पोटीं । सात्विक ईशश्रद्धा परिपाटी उपजों लागे ॥ ६७ ॥ तंव वादी ह्मणे भस्मोद्धूलनादि बाह्य-चिन्ह । गाढवा मनुष्या समसमान । सिद्धान्ती ह्मणे ऋतुकालस्त्री संगाद्यंतश्चिन्ह । मनुष्याहून पशूंतचि अधिक ॥ ६८ ॥ वादी ह्मणे बाह्य चिन्हाची । आशा बंधक होईल साची । सिद्धान्ती ह्मणे अंतश्चिन्हरूप निराशा चातकाची । काय संसाराची मोचक ॥ ६९ ॥ आह्मीं नाहीं निंदित अंतश्चिन्ह । बाह्यचिन्हाचें दावितो प्रयोजन । दोन्ही चिन्हीं सत्व-गुण । वाढवावा सज्जनीं ॥७०॥ दुसराहि गुह्य विचार । कीं बाह्यचिन्ह नसता निर्धार । तो चुकता तया पातित्यशास्त्र । झडकरी बहिष्कार घालिना ॥ ७१ ॥ बाह्यचिन्ह जयाचे आंगीं । तो सामर्थ्ये असोनी चुकता प्रसंगीं । तरी पातित्यशास्त्र तया लागीं । प्रायश्चित्ती ह्मणतसे ॥ ७२ ॥ ह्मणवोनी मी न व्हावें पतित । न व्हावे संप्रदायबहिर्भूत । ऐसी इच्छा वागवी चित्त । ते बाह्यचिन्ह बळेंचि ॥ ७३ ॥ यास्तव पूर्ण झालियावीण । निंदूं नयेत बाह्यचिन्ह । माळामुद्रादिकांच लेण । आमुच्याही संप्रदायीं ॥ ७४ ॥ परी राधिकेची तुळसी सवती । ह्मणोनी कोणी तुळसीमाळ न घालिती । तैसी सांप्रदायी रीति । आमुच्या नाहीं ॥ ७५ ॥ सवती आदिक लीला समस्त । राधा परमेश्वर रागद्वेष रहित । आपण द्वेष उगाचि भक्तींत । सांगतो निश्चित करूं नये ॥ ७६ ॥ याचेहि स्पष्टीकरण । पुढें होईल संपूर्ण । आतां कैसे भगवद्भजन । तेहि श्रवण करावे ॥ ७७ ॥ अभिगमन उपादान । पूजा स्वाध्याय आणि ध्यान । ऐसे पंचविध भगवद्भजन । भागवतधर्मी बोलिले ॥७८॥ प्रातःकाळीं उठोनी । भावे हरिमंदिरा जाऊनी । तुझा दास मी ओळखे ह्मणुनी । चक्रपाणि नमावा ॥ ७९ ॥ जो संबंध असेल तो तयाचा । उच्चार करोनी साचा । भगवन्नाम जपावे वाचा । अभिगमन या नांव ॥ ८० ॥ मग तया दास्यासाठीं । पूजासाहित्य उठाउठी । आणणें या शास्त्रपरिपाटी । उपादान ह्मणती ॥८१॥ मग स्नान आदि यथोपचार । पूजा तेचि ईज्या सुंदर । पुराणश्रवण का कीर्तनगजर । स्वाध्याय निर्धार हा एक ॥ ८२ ॥ शेवटीं सायंकाळापासुनी । एकाग्र चिंतावा

चक्रपाणि । तोचि करावा जागृतीं स्वप्नीं । या नांव योगू ॥ ८३ ॥ आतां जयांत माधूर्यसेवा । तेणें माधूर्यरंगींच योगू करावा । किंवा ब्राह्ममुहूर्तीं आश्रयावा । योगू तेणें ॥ ८४ ॥ जयासी करणें बालसेवा । तेणें योगू निशींच करावा । आणि ज्ञानाचाहि ठेवा । असावा योगीं ॥ ८५ ॥ देहत्रयविनाश करून । भगवंतीं संबंध करावा स्थापन । ऐसें अगस्तीचें वचन । म्हणोनी ज्ञान पाहिजे याळागीं ॥ ८६ ॥ एवं हरि कीर्तनींहि पूर्वरंग । मूर्ति संनिध नसतां करावा अद्वैत चांग । मूर्ति संन्निध अवघा रंग । भक्तिचा चि कीजे ॥ ८७ ॥ एवं गौणी भक्ति माझें भजन । परा भक्त स्वतंत्र पूर्ण । तया ध्यानचि गान कीं गानचि ध्यान । वर्तन पूजन तयाचे ॥ ८८ ॥ तो पूजेंताचि अनुरागें । कीं कीर्तनीं सदा रंगे । ध्यानाच्याचि पाठीं मागे । परी समाधि न भंगे तिहीं काळीं ॥ ८९ ॥ म्हणोनि गौणी भक्ति जोंवरि । निष्कामें कीं अर्ध सकामे कुसरी । बाह्यचिन्हें धरोनी देहावरी । पंचविध भगवद्भजन कीजे ॥९०॥ लालनीं नमनादिप्रधान अभिगमन । वात्सल्यांत अन्नोदकादि जाण । माधूर्यांमाजीं सम समान । दोन्ही हे होती ॥ ९१ ॥ स्वसंबंधे योगू कीजे । ज्ञान अद्वैत आश्रयिजे । हें सांगितलें आघवे सहजे । पुसिले जे त्वां ॥ ९२ ॥ येणेंचि रीति गुरु शिव भजन । परी शिव भजनीं भिन्न उपादान । जेवि बिल्व अपेक्षी उमारमण । तुळसी आवडे गोविंदा ॥९३॥ आतां उपादान पाहिजे कवणे रीति । तयाची शुद्धाशुद्ध स्थिति । धर्मशास्त्रीं यथारीति । पहावी आणि आर्षांहि वदूं ॥ ९४ ॥ इये अध्यायीं निरूपण । केले पंचविध भगवद्भजन । स्थापोनिया बाह्य चिन्ह । आश्रय दिधला सकामाहि ॥ ९५ ॥ आतां श्रीगुरुचरणकमळा । निरखोनिया हृदयडोळा । आनंदे योगू मोहळा । जीवन्मुक्तांचा ॥९६॥ वाचा नियमोनी सद्गुरुनामें । मन नियमोनी योगधर्में । अभिगमनोपादान पूजाक्रमें । इंद्रियें नियमू ॥ ९७ ॥ प्राण नियमू संयमनें । उपासना येणें मानें । संबंधाचेनि अनुगुणें । लाहू भक्ति ॥ ९८ ॥ ज्ञानापूर्वी गौणी भक्ति । तेचि ज्ञानानंतर परास्थीति । भेदभान अभेदवृत्ति । लीलया निश्चिती भासतु ॥ ९९ ॥ एक पाणि सागर तरंग । भेदामाजीं शोभला रंग । अभेद जव चांग । मुळिचाचि आहे

॥ १०० ॥ यालागीं मागणें दासपण । तें देवो आळंदीश कृपाघन । निज संप्रदाय संपूर्ण । चरणाश्रयान उद्धरो ॥ १०१ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माऊली । सियेची वंदोनी पाऊली । कविताकमळमाळ वाहिली । सप्रेम चरणीं ॥ १०२ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुकृपाप्रेरिते गद्यपद्यान्विते संप्रदाय सुरतरौ पूर्व विहारे ससामग्रिक पंचविध सद्गुरुजनवर्णनंनाम षोडशं कुसुमम्

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

## अध्याय १७ वा.

जय जय सद्गुरु सच्चिदानंदा । जय जय सद्गुरु आनंदकंदा । जय जय पूर्ण अभेदा । आळंदीपते ॥ १ ॥ स्फूर्ति देवोनि समर्था । पुढें चालवावे ग्रंथा । येणें स्तवनें ठेविला माथा । अभय करु गुरुराजे ॥ २ ॥ आतां श्रोते सावधान । मागील निके अनुसंधान । राखोनी शिष्य करी प्रश्न । कर जोडून श्रीगुरुते ॥ ३ ॥ ह्मणे जी स्वामी गोसावी । माझी विनंति परिसावी । भागवत धर्मी वरधी । शंका उपजली एक मातें ॥४॥ तुह्मीं सांगितलें निरूपण । कीं भक्ता रक्षी नारायण । केलिया एक नामस्मरण । पापाचें दहन सर्वथा ॥ ५ ॥ परी शंका वाटे माझ्या पोटीं । पुराणें शोधिता गोमटी । नरक लागला मोठ्यांच्या पाठी । क्षुल्लक तरले कांहीं कर्में ॥ ६ ॥ आंगोठा गळाला धर्माचा । मांडव्य शूळीं दिधला साचा । केवळ नरक पाहावयाचा । जनकहि झाला अधिकारी ॥ ७ ॥ ययाती स्वर्गांतुनि पावला पतन । आणि गीध तरला तीर्थसन्निध मारतां व्याधान । कोणी तुळसीमंदीर सारवोन । वैकुंठपद पावले ॥ ८ ॥ एवं नवल कथेची गति । मोठ्या मोठ्यांची ऐसी स्थीति । ब्रह्महत्याबद्ध पशुपति । नाना तीर्थी हिंडतु ॥ ९ ॥ विष्णु करताहि पाप । तया लागला वृंदेचा शाप । आणि जय विजय झाले सपदप । भगवद्विरोधी ॥ १० ॥ येथ भागवतहि असता । ऐसी गति कां झाली तत्वता । नामें अजामिळाची मुक्तता । आणि नामधारका अर्जुना कष्ट ॥ ११ ॥ ऐसा

ऐकोनिया प्रश्न । श्रीगुरुनाथ संतुष्ट होऊन । ह्मणती चित्त सावधान । ठेऊनी श्रवण उत्तर करी ॥ १२ ॥ शिव ब्रह्महत्यामुक्त्यर्थ फिरला । विष्णूस वृंदेचा शाप लागला । ही आघवीच तयांची लीला । लोक संग्रहाला बोलिली ॥ १३ ॥ आंगोठा गळाला धर्माचा । परी धर्म अंशू देवाचा । आणि आंगोठा न गळताहि साचा । तेणें नाहीं कृष्णाचा सोडिला आश्रयो ॥ १४ ॥ युधिष्ठिराचा संपूर्ण । भारतीं धर्म आविष्कारिला भागवतभिन्न । अश्वमेधादिकीं भगवद्यजन । भागवतधर्मी न बोलिले ॥ १५ ॥ आतां लोकसंग्रहार्थ अश्वमेध केला । तरी आंगोठा लोक संग्रहार्थेचि गळाला । ही आघवी तयांची लीला । परोपदेशार्थ ॥ १६ ॥ धर्मी वागावे कैसे । हे दाखविले आपैसे । जनकाचे नरक दर्शन असे । पद्मपुराणीं ॥ १७ ॥ तरी तेथाचि कथा जाण । स्वयें बोलिला सूर्यनंदन । कीं तूं न पाहतां नरक आपण । तरी पापी मुक्त होतील केंवि ॥ १८ ॥ माहात्म्याचें झालिया दर्शन । पापी उद्धरती न लागतां क्षण । अभिप्राय कीं चरती गाय निवारणाचें निमित्त करून । जन तारावया कारण जनक नेला नरक दावाया ॥ १९ ॥ गायीचेंहि माहात्म्य थोर । भागवतधर्मी निरूपिले सुंदर । तेंचि दाखविलें पवित्र । जनकनरकदर्शनें ॥ २० ॥ जनक ज्ञानी होता । ह्मणोनी नरक पहाणें लीलाचि तत्वता । एवं नारदाच्या नारदीची कथा । बोलिजे सर्वथा परोपदेशार्थ ॥ २१ ॥ आणिक आयिके उपपत्ति । संचित पापेंचि प्रायश्चित्ते जळती । जें प्रारब्धरूप असती । ते भोगावे लागती निश्चयें ॥ २२ ॥ जाति आयुष्य आणि भोग । हा बोलिला कर्मविपाकयोग । प्रारब्ध होतां यमपुरीचे भोग । भोगणें आले बहुलाते ॥ २३ ॥ आतां प्रारब्धहि असोन । देवास असतां अनन्य शरण । तरी कायव्यूह करोन । पाप भोगण स्वतः नव्हे ॥ २४ ॥ कायव्यूह करोनी पाप भोगिता । लीलाचि वाटे मुख्य चित्ता । शिवपुराणीं ऐसी वार्ता । कीं काशीस्थ मृता पापभोग कायव्यूहें ॥ २५ ॥ काशी माहात्म्यासम । नामादिकांचेंहि माहात्म्य परम । शास्त्र सांगे सप्रेम । ह्मणोनिया ॥ २६ ॥ दुर्वासापरीस अंबरीषाचें । भागवतपण अधिक साचे । लीलाकरण आधिकारिकांचें कीं अवतारांचें । इतर जीवांचे कर्मभोगाचि ॥ २७ ॥ जैसे दत्तात्रय

कुत्सित । रूपें धरिती अनंत । तरी तया कोणी काय संत । नारकी ह्मणती ॥ २८ ॥ इतर जीव त्याहुनि भिन्न । तयांचें प्रारब्ध जन्मापुरतेंचि ह्मणून । संचित दग्ध होय संपूर्ण । नामादिमहिमे ॥ २९ ॥ एवं मोठ्यांची भोगारोपवार्ता । तुज निरूपिली तत्वतां । आतां जे कर्मे क्षुल्लक दिसता । तरले तत्वता कोटी जीव ॥ ३० ॥ तरी लीला करावयाप्रति । सामान्य जीवा नाहीं शक्ति । तीर्थादि महिमांची गति । अगाध निश्चितीं बोलिली ॥ ३१ ॥ आतां जयविजयींचें पतन । तेहि सनत्कुमार अधिक भक्त ह्मणोन । हें असो परी करिता नामस्मरण । बुडाला हे कथा कोठेंचि नाहीं ॥ ३२ ॥ " नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडोन " । इत्यादि माहात्म्यांचें वचन । भागवतधर्म प्रशंसे ॥ ३३ ॥ मोठ्यासी पापभोग । तो इतर धर्मापेक्षें चांग । [illegible] होते सत्ययुग । ह्मणोनी किंचित् अधर्में भोग श्रेष्ठा ॥ ३४ ॥ कलीचा धर्म हरिकीर्तन । तेथ नाहीं तरला हें नाहींच वचन । आणि दीन जीवाकारण । धर्म तारक निश्चये ॥ ३५ ॥ संचिताची होय निवृत्ति । प्रारब्धभोग कायव्यूहप्रतीति । ह्मणोनी शरणी करावा श्रीपति । करुणानिधान ॥ ३६ ॥ धर्म नाचरिता कोटीकल्प । भोगणें लागे महत्पाप । ते हरीस शरण जाता अल्प । काळें करोनी प्रारब्ध भोगी ॥ ३७ ॥ ह्मणोनी भागवत धर्म । तुवा आश्रयावा सप्रेम । भक्तालागीं मेघःश्याम । कदा संकटी पडो नेदी ॥ ३८ ॥ जेणें पापभोगारोप वरिष्ठीं । कर्में तीं नाहीं घडली देवासाठीं । धर्म घडता स्वार्थासाठीं । वैगुण्य करी बहुसाल ॥ ३९ ॥ ह्मणोनी आलिया भोगा सादर असावे । भक्त्यर्थ देवावरी रुसावे । मग तो कृपालु स्वभावे । सांकडे आववे निवारी ॥ ४० ॥ संसाराचा स्वभाव ऐसा । बरें करिताहि दुःखठसा । ह्मणवोनि जगन्निवासा । शरण जाणें हेंचि योग्य ॥ ४१ ॥ भक्ताची नवल प्रीति । सेवावया श्रीपति । नसती उपाधि लाविती । आपुल्या आंगीं ॥ ४२ ॥ सर्वभावे भगवंत । भजावयाची बहु आर्त । यालागी उपाधि अनंत । घेती दृढ ॥ ४३ ॥ तंव वादी ह्मणे तुमच्या मतीं । निरुपाधिक पाहिजे कीं नको यति । सिद्धान्ती ह्मणे आसक्ति चित्तीं । ती नसावी निश्चिती मत माझें ॥ ४४ ॥ भगवंताविण निरु-

धिक । त्याचेंचि नांव तम देख । जैसे लोक घेती निद्रासुख । तयाते समाधि कोण ह्मणे ॥ ४५ ॥ समाधि असे एकान्तीं । परी तेथ भगवदाकार वृत्ति । एकान्तीं सारखेच सुषुप्ति । परी तमोभिभूति त्या ठाया ॥ ४६ ॥ सत्व आणि तम देखअ एका सारखे दिसती एक । शहाणे जाणती ओळख । जया विवेक उदयला ॥ ४७ ॥ पाच आणि कांच मणी । सारखे दिसता द नी । परीक्षावंत वेगळेपणीं । ओळखोनी काढिती ॥ ४८ ॥ आळसासाठीं संन्यास घेतला । तेणें कवण उपाय सिद्धीस नेला । भ साठीं विवाह केला । तोचि आवडला मजलागीं ॥ ४९ ॥ नि भोगाची नाहीं निवृत्ति । इंद्रियांचा विश्वास जंव नाहीं तंव कदापि होऊं नये यति । विवाह रीति उत्तम ॥५०॥ होऊन भक्ति न घडता । तरी आघवे जीवीत गेले वृथा । सकुटुंब भागवत होता । तरी वंशीं तरी कोणी भक्त निघेल ॥ ५१ ॥ जयाची निरपेक्ष आहे वृत्ति । तेणें अवश्य व्हावे यति । बाह्यसेवाप्रधान व्हावे गृहस्थीं । योगप्रधान यति असावा ॥ ५२ ॥ पराभक्तींत दोन्ही सम । परीं कलिमाजीं सकुटुंबाचि घ्यावे नाम । जंव न जिंकवती क्रोधकाम । तंव संसारीं राम भजावा ॥ ५३ ॥ मुख्य धरावी भगवद्भक्ति । गौण करावी प्रपंचासक्ति । अर्धक्षण राधापति । विसरूं नये ॥५४॥ विश्वास करावा जतन । सुखें करावें हरिचिंतन । लाभ अथवा हानीचा प्रश्न । आणूंचि नये मनामाजीं ॥ ५५ ॥ ठेवावा गुरुचरणीं विश्वास । लोटांगणीं संतास । लाभहानि जगन्निवास । जाणे आपणास कळेना ॥ ५६ ॥ जें जें आड येईल भगवत्सेवेस । त्याचा त्याचा करावा संन्यास । जे अनुकूल होईल हरिसेवेस । तो तो संसार वाढवावा ॥५७॥ जो सर्वथा निरपेक्ष जाहला । पराभक्तीमाजीं गेला । तो कृतकृत्य तयाला । उपदेश नाहीं ॥ ५८ ॥ परी इतरानीं हेंचि किजे । पद्मपुराणींहि बोलिले सहजे । कीं कथासाधक भोजनीं अनुरजे । परी उपवासे न विरजे कथेतें ॥ ५९ ॥ "देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प" । ऐसे बोलिले अमूप । प्राचीन महंत ॥ ६० ॥ पराभक्त जे होती । तेहि बाह्यसेवा न सांडिती । श्रीतुकाराम पूर्णस्थिति । नाहीं पंढरीप्रति सोडिले ॥ ६१ ॥ मूर्तिपूजा करोनी आधीं । मानसपूजा पावती सिद्धि । मग ती होवोनि

ज्ञानावधि । तीव्ररूपें भगवत्सिद्धि मूर्तीतहि ॥ ६२ ॥ परी मानसपूजेचा अधिकारू । तैंचि जाणावा सुंदरू । जेव्हां एकहि क्षण शार्ङ्गधरू । विसंबवेना ॥ ६३ ॥ किंवा दारिद्र्याकारण । न मिळतां सामुग्रीक धन । मानसपूजा सुखसंपन्न । सिद्धिदायक [illegible]ते ॥ ६४ ॥ किंवा आत्मनिवेदनी जे होती । तयांचें आघवें समर्पण [illegible]गवंतीं । तदा समाधींत तेचि ते होती । व्युत्थानीं तरी अर्पिती चित्ताचे [illegible]वा ॥ ६५ ॥ यालागीं तया मानससेवा । सुंदर उपाय अर्पितां भावा । [illegible] उत्तम बाह्य सेवा । चित्तठेवा अर्पणें ॥ ६६ ॥ कोणी बाह्यसेवा नि[illegible] । मानससेवा पूर्ण करोन । बाह्यसेवासामर्थ्य नाहीं ह्मणून । हे[illegible] [illegible] विविधविधी पूरी ॥ ६७ ॥ वास्तविक विचार पहातां । मानसपूजा [illegible] करितां । सारखीच तत्परता अपेक्षित आहे ॥ ६८ ॥ बाह्यपूजेवरुनी [illegible] जाता । केवळ ठवोनि तत्परता । तरले ऐसिया कथा । असती बहु ॥ ६९ ॥ स्कंदपुराणींचे संमत । व्याध बाह्यपूजाहि अविधि करीत । परी तत्पर आत्माहि समर्पीत । यालागीं भगवंत पावला तया ॥ ७० ॥ कीं मानसपूजेच्याहि नंतर । बाह्यपूजा परिणमे सुंदर । जेवि गोपबाळा मानससेवेनें कर्पुरगौर । पावोनी मग तो करी बाह्यसेवा ॥ ७१ ॥ आध्यात्मिक धारणा करून । अधिदैविका कीजे स्थान । तेचि मानसपूजेचें लक्षण । आणि अधिभौतिकाधिष्ठान बाह्यसेवेंत ॥ ७२ ॥ मानससेवेहूनि प्रतिमासेवा । किंवा भगवत्तनू संतसेवा । मज उत्तम वाटे कवणिया भावा । तेहि ऐकें ॥ ७३ ॥ मानससेवा करितांक्षणीं । जे मूर्ति ये अंतःकरणीं । ते तीव्र संवेगी होतां तरी शतगुणी । मानससेवा मी अधिक म्हणें ॥ ७४ ॥ परी काया न झिजवोनि मंचकावरुती । मूर्ख मानसपूजा करिती । हृदयीं जी भाविली मूर्ति । ती कल्पिली ह्मणती आपण ॥ ७५ ॥ ऐसियानें मानससेवा । करितां गुरूनें चपेटा द्यावा । बळेंचि करवावी प्रतिमासेवा । जे उपदेश सद्भावा लागतू ॥ ७६ ॥ लेकरास नावरे मन । परी मूर्ति जवळी नेतां तयाकारण । तो देव ह्मणोनी करी नमन । परंपरा उपदेशें ॥ ७७ ॥ उपदेशाधीन वृत्ति असतां । तरी भावना साध न कल्पितां । ते कल्पनानुभवापरीस तत्वतां । तीव्र हें अल्पहि विचारितां कळे ॥ ७८ ॥ बाह्य मूर्तीचा उपदेश । देव ह्मणतां ठसे विश्वासियास ।

आणि मानसमूर्तीचा करिता उपदेश । देव तू कल्पना करी ह्मणावे लागे ॥ ७९ ॥ साच मूर्ति कैसी मी कल्पिता । हा उगाचि संशय ये मूढ-चित्ता । आतां सर्वचि कल्पित कळले तत्वता । तरी ते ज्ञानावस्था अबोलणी ॥ ८० ॥ पुनः बाह्यपूजेचे [illegible]रण । आणखी एक असे जाण । फिरता हृदयीं मूर्ति धरून । तरी [illegible] अपमान होय ॥ ८१ ॥ स्त्रीसंग केला कीं लघुशंके गेला । तेव्हां ऐसे शिकविणें लागे चित्ताला । कीं एव्हां पाहिजे न [illegible]ला । भगवद्देह हृदयांत ॥ ८२ ॥ बाह्य मूर्तीची पाहता रीति । [illegible] अशुद्ध वेळीं आली भगवत्स्मृति । तरीं देवालयीं देव अस[illegible] ह्मणोनी चित्तवृत्ति विसरणें नलगे ॥ ८३ ॥ आतां जैसी [illegible] करून । बाह्यमूर्तीवरी श्रद्धा गहन । परी प्रेम इतका [illegible] कीं कल्पिलेपण भासेना ॥ ८४ ॥ अनुरागें हृदयींच राहे मूर्ती । दवडलियाहि न होय परती । या अनुभवा तुलसीदास वदती । ऐसी होता वृत्ति मानस सेवाचि कीजे ॥ ८५ ॥ उपदेशें तीव्र बाह्य-मूर्ति । प्रेमें तीव्र मानसमूर्ति । मिळालिया ज्ञानभक्ति । ब्रह्मरूप कायाहि ॥ ८६ ॥ अथवा दैवें बाह्यपूजा न्यून वाटे । मानसपूजाचि आवडे नेटे । तरी तिर्थस्थानीं होवोनि पैठे । सेवा कीजे ॥ ८७ ॥ आळंदीआदि इष्ट स्थानीं । जावोनी भगवंत पूजिजे मनीं । तीर्था जावे मनें करोनी । हें महाभारतीं बोलिले ॥ ८८ ॥ लवणाचा मानसयज्ञ फळला । एवं धर्माचा हा परिणाम झाला । मग भगवान तंव अंतर्यामि वहिला । तदाश्रयण मानस कां न फळे ॥ ८९ ॥ आतां अखंड हृदयीं मानस-मूर्ति । कैसी धरावी ती ते ऐक चित्तीं । बाह्य अपवित्र मानसाप्रति । अस्पष्ट हें संकल्पिजे ॥ ९० ॥ किंवा एक रहस्य उत्तम । परी प्रकाश न करावे बिनागुरुप्रेम । आधीं सद्गुरून पुसावे परम । कीं देहधाम संकोचिजे केंवि ॥ ९१ ॥ मग बाह्य कुंभकाचिया सरसा । मध्यें गगनीं मांडिजे विलासा । कीं अंतःकुंभकें अंतराकाशा । भिन्न देहस्पर्शी असोनी मांडिजे ॥ ९२ ॥ मग तेथ मी प्रह्लाद गुरु नृहरि । या लाल-नाचे परी । कीं यशोदा होवुनि पूतनारी । वात्सल्यें सेविजे ॥ ९३ ॥ कीं गोपीआज्ञें गोपिका । होवुनि हृदयीं व्रजनायका । ठेवोनिया माधुर्य-सुखा । सप्रेमें भोगिजे ॥ ९४ ॥ संन्निध असतां श्रीगुरुमूर्ति । तरी

बाह्येचि करावी ऐसी रीतें । अथवा गुरुसेवेच्या विश्रांती । समयीं कीजे ॥ ९५ ॥ संधिवळें जिंकोनी सुषुप्ति । बाह्यसेवे साजवूनी जागृती । मग परमात्म त्रिपुटीं । महाजागृति मानसपूजा ऐसी कीजे ॥ ९६ ॥ तेथ चुकतां आपला आपण । पापें [illegible] टाकावा भोगोन । पुढती पार्षद-पणें सावधान । वैकुंठ कैलासीं हरिहरां [illegible]विजे ॥ ९७ ॥ मी बद्ध ही श्रद्धा । आणि मी मुक्त हीहि श्रद्धा । तीं [illegible] लागलिया प्रेमवेधा । मुक्तता मिळे ॥ ९८ ॥ न मरता याचि देहीं । भोगें [illegible]ळें मुक्ति भोगावी ठायीं । ऐसे वदले आचार्यहि । शिवानंद लहरींत ॥ ९[illegible] ॥

सारूप्यं तव पूजने शिव महादेवेति संकीर्तने
सामीप्यं शिवभक्तिधूर्यजनतासांगत्यसंभाषणे ।
सालोक्यं च चराचरात्मकतनुध्याने भवानीपते ।
सायुज्यं मम सिद्धमत्र भवति स्वामिन्कृतार्थोऽस्म्यहम् ॥ २

याचा स्पष्टार्थ व्युत्पन्न जाणती । बहुत संस्कृत नये मजप्रति परी याचि लोकीं चान्ही मुक्ति । भगवत्सेवेंत होती अभिप्राय हा ॥ १०० ॥ आणखी एक रहस्य पूर्ण । जयाचा गुरुवचनीं विश्वास गहन । तयातें आर्थीचि पासोन । साधो शके मानस सेवा ॥ १०१ ॥ बाह्य प्रतिमेच्याहि ठायीं । भगवद्बुद्धिचि उपजे पाहीं । अस्तित्वोपदेशें लवलाहीं । मग हृदयीं कां न उपजे ॥ १०२ ॥ कर्मी पंचाग्निभावना । कीं उपास्तींत दक्षिणनेत्रस्थपुरुषभावना । योगामाजीं चक्रभावना । अस्तिभावे सांगे श्रुति ॥१०३॥ जे अस्तित्वभावें तीव्र होय । ते भावना कळता मृदुत्व लाहे । ह्मणोनी अस्तिभावेचि आहे । कुंडलिन्यादि उपदेशू ॥१०४॥ परी यातें भावनापण । ते लिहिले कळाया वेदान्त ज्ञान । आधवेचि जगत् भावना ह्मणोन । शिष्य असतां साधनसंपन्न संभवे बोधू ॥ १०५ ॥ परी नवल कलिजनांचे पिसे । सत्सेवा न करवे देहलालसे । पुस्तकें संग्रहोनी विशेषें । वेदान्त वाचती अधिकारेविण ॥ १०६ ॥ पूर्वीची तीव्र सगुणो पासना । ती वाचनेचि होय मृदुभावना । न सुटे भोगता विषय वासना । तेणें हानि जाणा दोन्हीकडे ॥ १०७ ॥ सगुण तुच्छ झाले ज्ञानें । निर्गुण हारपले संशयानें । तैं रीति या चित्तीं जाहले ठाणें । विषयाचे वा झोपेचें ॥ १०८॥ यालागीं एवढें करावें । भगवद्गुणशास्त्र ऐकावे ।

रागद्वेष आघवे टाकावे । सत्संगी असावे सर्वदा ॥ १०९ ॥ सत्संगाविण शास्त्रवचन । करिता तरी उठे अवगुण । पूर्वीची एकादी वृत्ति जाण । प्रिय असतां तेचि दृढ होय ॥ ११० ॥ व्यवहा[illegible]य पुस्तकें पाहुनी । वर्तले असते चाकरजनी । तरी निरीक्षक अधि[illegible] तया स्थानीं । नेमिले असते कासया ॥ १११ ॥ आपुल्यास [illegible]ड तैसेचि श्लोक । चित्त शोधुनि काढी देख । यालागीं सत्सं[illegible]ण सम्यक् । शास्त्र वाचणें महागर्तु ॥ ११२ ॥ ह्मणोनी अद्वै[illegible]ज्ञानाविण । सर्वथा न मानावे गुरूचें वचन । ज्ञान तंव होय [illegible]रें करून । परी तेथहि गुरुवचन स्थायि-त्वा मोदक ॥ ११[illegible] [illegible]हेंचि विद्यारण्य ध्यानदीपीं ह्मणती । ते संस्कृ-तज्ञाही प[illegible] ग्रंथीं । मानसपूजारहस्यरीति । निरोपिली येथ [illegible] ॥ विशेष प्रकार कळेल पुढें । ऐसेनि पुनरुक्ति जरी घडे । [illegible] कां अमृत वारंवार पिता फुडे । मरण जोडे कवणातें ॥ ११५ ॥ जेविलें-चि जेविता । कीं योनि भोगिलीचि भोगिता । लाज न वाटे सर्वथा चित्ता । उपदेशा पुनरुक्ता कां ह्मणणें ॥ ११६ ॥ असो आळंदीश्वर चरणीं । कविता कमळमाळ अर्पुनी । श्रीज्ञानराज माऊली हा मंत्र वाणी । जपत भजनी नांदूं सुखें ॥ ११७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते संप्रदाय सुरतरौ पूर्वविहारे भागवतधर्मनिर्णयसकथनपूर्वक बाह्यमानससेवा रहस्यादिनिर्णयो नाम सप्तदशमं कुसुमम्.

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

## अध्याय १८ वा.

जय जय सद्गुरु मनमोहना । जय जय सद्गुरु भक्तभूषणा । जय जय सद्गुरु कल्याणनिधाना । आळंदीपते ॥ १ ॥ जय जय सद्गुरो पूर्णचंद्रा । जय जय सद्गुरो विमुक्ततंद्रा । जय जय सद्गुरो सर्वेश्वरा । आळंदीपते ॥ २ ॥ तुझेनि नामें लब्धस्फूर्ति । काव्यमयचि होय क्षिति । यालागीं सावध श्रोती । श्रवणार्थी असावे ॥ ३ ॥ मागा बोलिले

निरूपण । तें ऐकोनी [illegible]करी प्रश्न । श्रीगुरूतें विनवून । ह्मणे कवण उपासन संप्रदायीं ॥ ४ ॥ पंचायतनोपासित । स्मार्तो बोलिली निरुती । संप्रदायीं कवणे रीति । कृपा करोनी मज सांगा ॥ ५ ॥ श्रीगुरु ह्मणती ऐक उत्तर । निर्णय पाहता [illegible]र । मज आवडती हरिहर । तेचि उपास्य संप्रदायीं ॥ ६ ॥ हरिहर [illegible] कृष्णमूर्ति । किंवा आळंदीपती । संप्रदायीं उपास्ति होती । परी आन [illegible]स्तिहि अविरुद्ध ॥ ७ ॥ आधीं कोणत्याहि मूर्ति । ईश्वरोपास्य सर्वांप्रति [illegible]वोपास्य नाहींच निश्चिती । हा वेदान्ती निर्णयो ॥ ८ ॥ ईश्वर पुल्लिंग [illegible]द । तो विष्णु शिवादि वाच्य प्रसिद्ध । चिति स्त्रीलिंगी शब्द । [illegible]दिदेवीवाच्य ॥ ९ ॥ मायोपहित चेतन । साकार भक्तानुग्रहाकारण [illegible] पुरुषरूपें देव आपण । देवी जाण स्त्रीरूपें ॥ १० ॥ परी देव्युपासनेंत [illegible] तो बहुधा नाहीं सात्विक प्रसंग । जो कीं असे दक्षिण मार्ग । तो [illegible]कूल सात्विका ॥ ११ ॥ देवी गणेश सूर्य शिव । आणि परमात्मा वासुदेव । हे पांचहि उपास्य तदपि शिव । कृष्णोपास्य संमत मातें ॥ १२ ॥ राधा उमा रमा गंगा । याहि येती उपास्तिचे रंगा । तथापि सर्व संबंधाभंगा । कवण अनुरागातें निरखू ॥ १३ ॥ एकापासोनी एका उत्पत्ति । हे आघवीच कल्पभेदाची रीति । जैसे धान्यमापीं दाणे तेचि येती । परी क्रम निश्चिती वेगळा त्यांचा ॥ १४ ॥ कोणे कल्पीं देवी पासोन । ब्रह्मा हरि हर समुत्पन्न । केव्हां ब्रह्मा हरि शिवापासोन । केव्हां हरि पासोन शिवब्रह्मा ॥ १५ ॥ केव्हां शिवापासोन देव्युत्पत्ति । केव्हां हरिपासोन देव्युत्पत्ति । केव्हां गणेशापासोन अवघे होती । गणेशोत्पत्ति केव्हां तैसी ॥१६॥ पुढें याचा विशेष विचार । परी उपास्य होती समग्र । तथापि कांहीं प्रकार । पुराणवाक्यें कळो ये ॥१७॥ गणेशोपासना उपपुराणीं । तैसी न वर्णिली महापुराणीं । महापुराणमूलीय उपपुराणीं । प्रमाणता असे ॥१८॥ ब्रह्मवैवर्त महापुराण । तेथ गणेशखंडी गणेशोपासन । बोलिले परी कृष्णाचि उमेस वर देऊन । गणेश जाहला ही कथा तेथें ॥ १९ ॥ अष्टमाध्यायीं ब्रह्मवैवर्तीं । गणेशखंडीं कथा पहावी श्रोतीं । आत्मा वै पुत्र या श्रुती । शिवहि गणेशू ॥ २० ॥ ह्मणोनी महापुराणें पहाता । गणेश शिव वा कृष्णाचि तत्वता । परी शिवकृष्णा-

पासना करिता । गणेशोपासना त्यांत [illegible] ॥ २१ ॥ चूर्णिकाः— गणेश मौद्गली ईश्वरत्वें करून । निरोपिलें आहे उपासन । ते तंत्र अतियोग्य संपूर्ण । परी अ[illegible] महापुराण । मूर्तित्वें गणेश शिव वा कृष्ण । यास्तव गणेशोपा[illegible] अंतर्भाव करून । उपास्य शिव-कृष्ण मत माझें ॥ २२ ॥ आतां [illegible]पास्ति सांबपुराणीं । ते ईश्वर-रूपत्वें करोनी । मान्य आहे [illegible]जलागुनी । परी मूर्तित्वें महापुराणीं विचार करूं ॥ २३ ॥ [illegible]यीं विष्णुशक्ति । ऐसी विष्णुपुराणोक्ति । द्वितीयांशीं एकादशाध्या[illegible] श्रोतीं । अवलोकावी ॥ २४ ॥ सुवर्ण केश सुवर्ण शरीर । सु[illegible]श्रु पुरुष सुंदर । आदित्यमंडळीं परिकर । दिसतु आहे [illegible] ॥ तो शिवचि ऐसें अपय्यादीक्षित । ह्मणती शिवा-[illegible]र्कत ! आतां बिष्णूचि असे सूर्यमंडळांत । ऐसी हरि-स्मृति ॥ २६ ॥

ध्येयः सदा सवितृमंडलमध्यवर्ती । नारायणः सरसिजासनसंन्निविष्टः ।
केयूरवान मकरकुंडलवान् किरीटी । हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ।

श्रीभागवतीं एकादशस्कंधीं । सत्ताविसाविया अध्यायाच्या आधीं । पूजाप्रकार उद्धवा बोधी । कृपानिधि श्रीकृष्ण ॥ २७ ॥ तेथ सांगितले मूलाधार । त्यांत एक सूर्यचक्र । स्वयें बोले शाङ्र्गधर । कीं मज पूजावे रविचक्रींहि ॥ २८ ॥ जरी बोलिले सांबपुराणीं । ब्रह्माहरिहररूपें दिनमणी । परी ते ईश्वरत्वें करूनी । मूर्तित्वें करोनी शिव विष्णु सूर्य ॥ २९ ॥ ईश्वरत्वें पाहता । स्तंभहि ब्रह्माहरिहर तत्वतां । परी मूर्तित्वें तत्वता । सूर्यमंडळीं ॥ ३० ॥ हिरण्मयवपू शंखचक्रधारी । नारायण कमलासनावरी । रविमंडळीं सर्वदा निर्धारीं । ध्यानीं आणिजे ॥ ३१ ॥ ही मूर्तीचीं विशेषणें संपूर्ण । सूर्यमंडळीं उपदेशी वचन । यद्यपि ब्रह्मा विष्णु शिव प्रकाशमान । ह्मणोनी सूर्यरूप होतील ते ॥ ३२ ॥ तथापि वन्हिहि प्रकाशमान । तयाच्या अन्वयें प्रकाश पूर्ण । आणि कोटीचंद्र सुशीतल ह्मणोन । वर्णनहि असे शिव विष्णूचें ॥ ३३ ॥ वेदीं सूर्यासचि विष्णू ह्मणती । ऐसी शंका न घ्यावी पुढती । गोपालतापनोयादि-श्रुति । विष्णुमूर्तिविषयीं प्रमाण ॥ ३४ ॥ मूर्तित्वें पाहतां विष्णुशिव । ह्मणोनी सूर्योपासनेचाहि अंतर्भाव । हरिहरोपास्तींत होय सर्व ।

वात्सल्य धरावा मा... म्हणे ॥ ३५ ॥ आतां देव्युपासना करणें । ते जरी आले योग्यपणें । तथापि सर्व संबंध खुणे । न पवे तेहि ॥३६॥ गणेशाचें ठायीं लालन । परी वात्सल्य न घडे उमेविण । माधूर्याविषयीं प्रमाण । उपलब्ध नाहीं ॥ ३७ ॥ सूर्योपासनेंत पाहतां । तैसें लालनाचि होय तत्वता । वात्सल्यमाधूर्यवार्ता । येथहि सर्वथा अप्रसिद्ध ॥ ३८ ॥ देवीच्या ठायीं लालन । घडे केवळ मातृभावनेंकरून । परी वात्सल्य माधूर्य जाण । न घडती तेथें ॥ ३९ ॥ म्हणोनी गणेशसूर्योपासन । शिवविष्णूपासनेंत अंतर्भाव करून । देवी मातृभावना करून । करावे लालन तेथ पुरें ॥ ४० ॥ देवीवरी ... करितां । तरी पति मानावे लागेल तत्वता । पतिभजनें पतिं ... आख्यायिका वेद पुराणीं ॥ ४१ ॥ यालागीं माधूर्यसंबंध ठेवणें । ... पुरुषा विणें । म्हणोनी पुरुषोपासनाचि मानणें । ... माझ्या ॥ ... आतां देवीचे ठायीं लालन । ते करावे उमा गंगा वा राधा रुक्मिणी स्मरोन । वादी म्हणे किंन्हो काळीं सेवावा कृष्ण । हें पूर्वी विधान बोलिला तुम्ही ॥ ४३ ॥ आतां सांगता लालन । देवीचे ठायीं करावें संपूर्ण । सिद्धान्ती म्हणे सावधान । ययाचें उत्तर ऐक पां ॥ ४४ ॥ स्त्री म्हणोनी मोह कांहीं । ईश्वराच्या ठायीं नाहीं । माता असता पाळिल लवलाही । आणि पिता पुरुषत्वें उपेक्षिल ॥ ४५ ॥ ईश्वर दयाळु सर्वथा । निज भक्तासी मातापिता । मी या जगताचा पिता । मी माता धाता हे गीतावचन ॥ ४६ ॥ " कृष्णस्तु कालिका साक्षात् रामस्त्रिपुर-सुंदरी "। हे तंत्र वाक्य तदर्थ ऐकावे कुसरी । श्रीकृष्णींही मातृभावना निर्धारी । लालनी साजिरी घडो शके ॥ ४७ ॥ किंवा राधादौं मातृ-भावना । लालनी करावी आवडल्या मना । तंव वादी म्हणे माधूर्य राजस जाणा । वाटे मातें ॥ ४८ ॥ सिद्धान्ती म्हणे कोणता गुण । उठेल कोणत्या गुणापासोन । हें एक जाणे नारायण । यालागीं चलावे तदुक्त मार्गे ॥ ४९ ॥ परी लालनीं स्वसंकटीं । भगवंत रक्षील ही आशा पोटीं । आणि वात्सल्यामाजीं गोमटी । तीव्र प्रतीति विश्वासा ॥ ५० ॥ केवळ आत्मनिवेदन । तेथ तंव न राहे विशेषपण । परी माधूर्यभक्तींत आत्म-निवेदन । दास्य आणि माधूर्यहि घडे ॥ ५१ ॥ आतां स्वाभिन्न भावाचि

अंत नाहीं । परी माधुर्य घडे कृष्णाचेचि ... लागीं शिवशेषशाई । उपास्य माझे ॥ ५२ ॥ इतर उपासना ... करिती । त्यांचा द्वेष न धरूं चित्तीं । परी वैकुंठपति कैलासपति । ... य मज ॥ ५३ ॥ माझे उमा-माता पिताशिव । आचार्य श्रीज्ञा... पति प्रत्यक्ष वासुदेव । बहिणी राधिकादि गोपी ॥ ५४ ॥ हेंचि ... पंचायतन । मुख्य भजावा जग-ज्जीवन । यथार्थ भक्तीची खूण ... वासरेन प्रगटली ॥ ५५ ॥ मग ते परंपरा येता । तात प्रसाद ... । कांहीं विकार नाणिता । भक्षावा सुखें ॥ ५६ ॥ तंव ... म्हणे शिवशेषशाई । उपास्य होवावया कारण कायी । केवळ शि... षशाई । उपास्य कां नव्हे ॥ ५७ ॥ आणि देवीस पति ... । आपण पतन बोलिले तत्वता । परी प्रल्हादे ... भाविली पतिता । ऐसी कथा वासिष्ठीं ॥ ५८ ॥ श्रीगुरु ...र्ती सावधान । एक शंकासमाधान । उपास्य एक ईश्वरत्वें करून । आणि शिवविष्णु तंव अभिन्न सर्वभावें ॥ ५९ ॥ ईश्वरत्वें शिवविष्णु एक । येथ प्रमाणें असती अनेक । अंतःकरणें शिवविष्णु एक । हेंहि प्रमाणें असती पैं ॥ ६० ॥ शिव जाहले विष्णुयुवति । ऐशा असती श्रुतिस्मृति । आणि विष्णु जाहले शिवयुवती । ऐशींहि असती प्रमाणें ॥ ६१ ॥ म्हणोनी शिवविष्णूची समता बहुत । निरूपिली असे अखं-डित । असे मूर्तित्वें एकता निश्चित । बोलिली आहे स्मृतींत तेहि ऐके ॥ ६२ ॥

रुद्रो नारायणश्चैवेत्येकं सत्वं द्विधा कृतम् ।
लोके चरति कौंतेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु ॥

याचा अर्थ स्पष्टचि जाण । तंव वादी म्हणे दुसरें वचन । "एको-ऽहं पंचधा जातः" हें प्रमाण । अभिन्नपंचायतनोपास्तीविषयीं ॥ ६३ ॥ सिद्धान्ती ह्मणे हें वचन । दावी ईश्वरता अभिन्न । परी रुद्र नारायण । मूर्तित्वें अभिन्न असती पैं ॥ ६४ ॥ शिवाचा श्वेतवर्ण । स्वयें सांगे स्कंद पुराण । शिवाचाचि श्यामवर्ण । ब्रह्मांडपुराण स्वयें सांगे ॥ ६५ ॥ विष्णूचाहि शुक्लवर्ण । " तत्र नारायणं देवं शुक्लवर्णं चतुर्भुजं " इत्यादि सांगती वचन । आणि कृतयुगीं हरीचें शुक्लध्यान । हें निरूपण भागवतीं एकादश स्कंधीं पंचमाध्यायीं ॥ ६६ ॥ गंगा शंकराची पत्नी । ऐसी ब्रह्मा-

भारतीं वाणी । आणि गंगा नारायणाची पत्नि । हे ब्रह्मवैवर्तपुराणीं प्रकृति खंडीं द्वादशाध्यायीं ।। ।। म्हणवूनहि पाहता । शिवविष्णु मूर्तीची ऐक्यता । किंवा ऐक्यत्वें ति भिन्नता । शिवविष्णु मूर्तीची ।। ६८ ।। त्रिनेत्र चतुर्बाव्हादि दोघामध्यें भिन्न । निल शुक्लत्वादि चिन्ह । समसमान दोघांत ।। ।। ऐसे बोलिले तुकाराम । कीं शिव आणि पुरुषोत्तम । जेवि कां अं य वाम । तैसे परम अभिन्न ते ।। ७० ।। सूर्य गणेशादिकांच्या मूर्ति । ई एक मूर्तित्वें भिन्न असती । वैकुंठपति आणि कैलासपति । ईशत्वें मूर्तित्वें अभिन्न ।। ७१ ।। आदित्य जीवता वारोनी । ईश्वर उपास्य स्थ ब्रह्मसूत्रानीं । तैसी शिवविष्णु जीवता वारोनी । ईश्वर उपास्य स्थापिला नाहीं । म्हणाल तेव्हां नव्हती शिवविष्णु मूर्ति । तरी लोपाव्या लागतील तत्वकार नृसिंहतापनीयादि श्रुति । परी भाष्य आहे तयावरुती । भगवत्पूज्यपादकृत ।। ७३ ।। यद्यपि शक्ति आणि गणपति । यांचेंहि जीवत्व निराकरोनी न स्थापिली उपास्ति । तथापि मूर्तित्वें भेदप्रतीति । बोलिली कीरू ।। ७४ ।। किंवा सत्वरजस्तमोगुण । यांचे उपहित विधि हरि त्रिनयन । गणपति मूर्ति गुणांतर्गुण । कीं चतुर्थ मूर्ति म्हणावी ? ।। ७५ ।। चतुर्थ मूर्ति म्हणता । तरी तिजविषयीं वाद तत्वता । शैववैष्णवादिकांच्या मता । पाहता शिवविष्णूच्या चतुर्थ मूर्ति ।। ७६ ।। चतुर्थ मूर्ति आहे कीं नाहीं । हे उद्घाटिजेल मूर्ति निर्णयीं । गणपति चतुर्थ मूर्ति असतां जरीहि । तरी कृष्ण गणपति झाला ही कथा नसती ब्रह्मवैवर्ती ।। ७७ ।। विठ्ठल गणपति दुजा नाहीं । तुकाराम बोलिले ईश्वरत्वें एकताहि । मूर्तित्वें भेद बोलिला ठायीं । गणोबा तो विक्राळ लाडु मोदकाचा काळ म्हणोनी ।। ७८ ।। ईश्वरत्वें उपास्यता । रुचि तेथ फळ तत्वता । परी मूर्त्युत्कर्षें पाहता । उपास्यता हरिहरा ।। ७९ ।। केवळ ईश्वरोत्कर्षे करोन । उपासनीं श्रद्धा पाहिजे गहन । आणि दोन्ही उत्कर्षाचें अधिष्ठान । तेथ श्रद्धेविण करता स्मरण फळ पावे ।। ८० ।। आतां आरंभीं गणेश पुजावा । तेणेंचि निरसे विघ्नगोवा । परी तेथहि ईश्वरत्वेंचि पुजावा । हा विधि असे ।। ८१ ।। किंवा कीर्तिमुखाच्या पुजेविण । पुजा न घे उमारमण । कीं पार्षदासी तीर्थ

न देतां जाण । विष्णुतीर्थग्रहण अ[illegible]गू ॥ ८२ ॥ तेवि शिववरें करोनी निश्चिती । आधीं गणेश पु[illegible] विघ्ननाश होती । ऐशाहि कथा असती । ह्मणोनी निर्विघ्न अस्तित्व [illegible]र्थी गणेशा भी ॥ ८३ ॥ तंव वादी ह्मणे गणेशभेद । मूर्तित्वें [illegible] कां प्रसिद्ध । परी शक्तीचा तंव अभेद । मूर्तित्वें आहे ॥ ८४ [illegible] तीन गुणांच्या तीन शक्ति । काली लक्ष्मी सरस्वती । एकचि [illegible] मूर्ति । राधा कृष्ण ही ब्रह्मवैवर्ती कथा ॥ ८५ ॥ तैं [illegible] ता म्हणे एक वचन । मी बंधुत्वें उपासी गजानन । आणि [illegible] शक्त्युपासन । इष्ट आहे मजलागीं ॥ ८६ ॥ परी माध[illegible] सर्व । तेथ न होती स्वयमेव । जयासी रुचिकर माधूर्य [illegible]यासी त्यागावी लागेल उपासना ॥८७॥ जरी अन्न ब्रह्मात्मुपास्ति। त्यागावया सांगे श्रुति । तरी तेथ अन्नादि मूर्ति । भौतिक सिद्ध ॥८८॥ अभौतिकोपहितोपास्ति त्यजिता । दोष शास्त्र सांगे सर्वथा । यास्तव जेथ सर्व संबंध येती भाविता । त्या शिवा आणि अनंता चिंतावें॥८९॥ केवळ लालनीं रुचि ज्यासी । तीहीं आराधावें शक्तीसी । तंव वादी ह्मणे मातृभावना बोलिली पुरुषीं । तैसी पतिभावना शक्तीविषयीं कां न घडे ॥ ९० ॥ तेव्हां ह्मणे सिद्धान्ती । घडेल तेणें करावी तैसी उपास्ति । अलौकिक जरी उपास्यस्थिति । तरी किंचिल्लौकिक-सादृश्य वांछी भावना ॥ ९१ ॥ पालनगुणविशिष्ट पुरुष पिता । पालनविशिष्टचि वनिता माता । एवं सदृश गुणोपसंहारें मातृता । पुरुषी तत्वता बोलिली मी ॥ ९२ ॥ मी माता हे गीतेंत वचन । तैसें स्त्रियेसी पतिभावन । येथ उपसंहारीं नाहीं सदृश गुण । आणि नाहीं वचन उपलब्धी ॥ ९३ ॥ जरी प्रेमगुणविशिष्ट पुरुष पति । प्रेमगुणविशिष्ट स्त्री युवती । तरी यांत एक भाव उपास्यत्वप्राप्ति । यास्तव सम उपास्य प्रतीति शंका न करी ॥ ९४ ॥ तंव वादीस म्हणे देवीस पत्नी । मानोनी माधूर्य करावें मनीं । प्रऱ्हादें भाविली लक्ष्मीपति । वासिष्ठीं उपशम प्रकरणीं ही कथा ॥ ९५ ॥

चलच्छशिकलापूरचारुचामरधारिणी
इयं मे पार्श्वगा लक्ष्मीः क्षीरोदकुहरोत्थिता ॥ ४५ ॥
(वासिष्ठ उपशम प्र० अ० ३१ )

याचा पदशः अर्थ पूर्ण । संस्कृतवेत्त्या कळे संपूर्ण । मी भावार्थ जाणिला संस्कृताविण । कीं प्रल्हादें लक्ष्मीस भाविले पत्नि ॥ ९६ ॥ सिद्धान्ती ह्मणे पुसिले बरवें । त्वां बहुत वाचलें नवे । परी पुढील श्लोक प्रमाण देसी स्वभावें । मागील श्लोक न जाणुनी ॥ ९७ ॥ येचि अध्यायीं चाळिसावा श्लोक । कीं प्रल्हादें आपणा भावी वैकुंठनायक । ह्मणोनी लक्ष्मीस सम्यक् । भाविले पत्नि ॥ ९८ ॥

अविष्णुः पूजयन्विष्णुं न पूजाफलभाक् भवेत् ।
विष्णुर्भूत्वा यजेद्विष्णुमयंविष्णुरहं स्थितः ॥४०॥

याचाहि अर्थ संस्कृतज्ञ जाणती । मज कळला भावार्थ तो येणें रीति । कीं विष्णु होवोनि पुजावे विष्णुप्रति । तो विष्णु निश्चितीं आहे ॥ ९९ ॥ त्वां दिधला जो श्लोक प्रमाण । त्या श्लोकाच्या पुढें दुसरें वचन । एकसष्टाव्या श्लोकीं जाऊं दे लोचन । तेथ स्पष्टम् विष्णुत्वभावन प्रल्हादाचें ॥ १०० ॥

अयं नीलोत्पलश्यामः पीतवासो गदाधरः ।
लक्ष्मीमान् गरुडारूढः स्वयमेवाहमच्युतः ॥६१॥

( वासिष्ठ उपशम प्र० अ० ३१ )

नीलकमलसम श्यामवर्ण । गदाधारी पीतवसन । लक्ष्मीसहित गरुडासन । मी नारायण प्रल्हाद ह्मणे ॥ १०१ ॥ येथ आत्मत्वें केली विष्णु भक्ति । यालागीं लक्ष्मी भाविली युवती । करोनिया देवीभक्ति । न बोलिली देवीवरुती पत्नित्वभावना ॥ १०२ ॥ पत्नित्वभावना स्वभोगासाठीं । ह्मणोनी ते नये भक्तिपरिपाटी । पतित्व भावनेचिया पोटीं । भोक्ता ईश्वर आपण भोग्य ॥ १०३ ॥ भर्ता भोक्ता महेश्वर इति । "निर्गुणं गुणभोक्तृ च" पुढती । स्वयें बोलिली जागृत्श्रुति । म्हणोनी अविरुद्ध भगवंतीं पतिभाव ॥ १०४ ॥ यद्यपि देवांस पत्नित्वभावना । भाविती सुरसुंदर्यांगुपासना । तरी त्या वर्धक रजोगुणा । देवोनी इह भोगदाना नरकीं नेती ॥ १०५ ॥ यक्षिणी न येतां धांवून । तिचें क्रोध मुद्रेनें करावे आकर्षण । तदा न येतां कपाळ दुखे दारुण । मग पावोनी मरण महानरकीं जाय ॥ १०६ ॥ इत्यादि मंत्रशास्त्रीं विधि । तेथ

वादीनें पाठवावी बुद्धि । यक्षास राजत [illegible]जती हें कृपानिधि । व्रजवर बोलिले गीतेंत ॥ १०७ ॥ तंव वादी [illegible]णे बाह्य प्रतिमासेवा । तीहि राजस हा तंत्रठेवा । तो श्लोक ए[illegible] । प्रमाण मी सांगे ॥ १०८ ॥

उपासना द्विधा प्रोक्ता [illegible] तत्र तु सात्विकी ।
यस्यां च मानसी[illegible] [illegible]शौ मुख्यतमौ स्मृतौ ॥
राजसो दक्षिणो [illegible]ः प्रतिमायां च पूजनम् ।
बाह्योपचारै[illegible] [illegible]वैस्तदा ध्यानं विशिष्यते ।

( मेरुतंत्र प्रकाश १ )

जप पूजा [illegible] । या नांव उपासना सात्विक । आणि बाह्योपचारें [illegible]तमा सम्यक् । राजस सेवा या नांव ॥ १०९ ॥ तें सिद्धान्ती [illegible]ण मजप्रति । माहित नव्हते तव तांत्रिक मति । आतां ऐके सात्वत श्रुति । एकादश स्कंधीं बोलिली जे ॥ ११० ॥

कैवल्यं सात्विकं ज्ञानं रजो वैकल्पिकं च यत् ।
प्राकृतं तामसं ज्ञानं मन्निष्ठं निर्गुणं स्मृतम् ।।२४॥
वनं तु सात्विको वासो ग्रामो राजस उच्यते
तामसं द्यूतसदनं मन्निकेतं तु निर्गुणम् ।।२५॥
सात्विक्यध्यात्मिकी श्रद्धा कर्मश्रद्धा तु राजसी
तामस्यधर्मे या श्रद्धा मत्सेवायां तु निर्गुणा ।।२७॥

( भागवत स्कं० १२ अ० २९ )

या सर्व श्लोकांचा अभिप्राय पूर्ण । कीं भगवत्सेवा श्रेष्ठ ब्रह्मज्ञानाहून । ह्मणोनिच ती निर्गुण । यांत स्थूल देवालय निर्गुण बोलिले आहे ॥ १११ ॥ जरी स्थूल देवालया निर्गुणता । तरी बाह्योपचारा केंवि रजोगुणता । पुराण विरोधी प्रमाणता । मेरुतंत्रास नाहीं ॥ ११२ ॥ अथवा देवीची बाह्य पूजा जाण । तेथें असो कां रजोगुण । कारण देवी पूजेचेंचि प्रकरण । चालले ह्मणोनी ॥ ११३ ॥ दक्षिण मार्ग तो राजस । हा देव्यागमाचाचि विशेष । बाम मार्ग तो तामस । मेरु तंत्रींच बोलिला ॥ ११४ ॥

तामसोपासनं प्रोक्तं पीठादौ बलिदानतः ।
बाममार्गे न तद्वेति तन्त्रस्य वचनं स्मर ॥

देवीची मानस पूजा [illegible] । देवीची बाह्य पूजा रजात्मक । देवीची चक्र पूजा सकाळिक । तामसें हें श्लोक बोलती ॥ ११५ ॥ विष्णूची बाह्य पूजाहि निर्गुण । ये [illegible]यीं सांगितलें भागवत प्रमाण । शिवाचीहि पूजा निर्गुण । एत[illegible] प्रमाण सूतसंहितादि ॥ ११६ ॥ या वचनें पाहता । शिववि[illegible] सेव्य तत्वतां । शक्तीस मायाप्राधान्यें त्रिगुणता । ब्रह्मप्रा[illegible]यें निर्गुणता शिव विष्णु पुरुषा ॥ ११७ ॥ यद्यपि पुं स्त्री न[illegible]क लिंग शब्द । ब्रह्मवाचक असती प्रसिद्ध । तथापि आग्रहीयासी विशे[illegible] आग्रहेंचि विवेक सांगूं ॥ ११८ ॥ बहुशः सद्वाचक नपुंसक शब्द । [illegible] चिद्वाचक स्त्रीलिंग शब्द । आनंदवाचक पुल्लिंग शब्द । बहुशब्दा[illegible]अल्पशब्दार्थसमन्वयें ॥ ११९ ॥ यद्यपि शांति तृप्ति । इत्यादि आनंद[illegible]क स्त्री शब्द असती । तथापि ह्या अंतःकरणाच्या वृत्ति । न बोलती आत्म[illegible] ॥ १२० ॥ अथवा आत्मानंदीं यांची लक्षणा । तरी आनंद शब्दाचीं शक्तीच जाणा । ह्मणोनी पुल्लिंगवाच्य ब्रह्मप्रधाना । पुरुषोपासना अतिमान्य ॥ १२१ ॥ हेंचि बोलिले एकनाथ । तो अभंग प्रमाण ऐक येथ । तेणें जाणोनी यथार्थ । संशय समस्त उच्छेदी ॥ १२२ ॥

सत् पद ते ब्रह्म चित् पद ते माया । आनंद पदीं जया ह्मणती हरी ॥१॥
सत् पद निर्गुण चित् पद सगुण । सगुणनिर्गुण हरिपायीं ॥ २ ॥
तत्सदिति ऐसे पैल वस्तुवरी । गीतेमाजीं हरि बोलियेले ॥ ३ ॥
हरिपदप्राप्ति भोळ्या भाविकासी । अभिमानियासी गर्भवास ॥ ४ ॥
अस्ति भाति प्रिय ऐसीं पदें तिन्ही । एकाजनार्दनीं तेचि झाले ॥ ५ ॥

सत् पद ते निर्गुण । याचे केवळ नाहींच उपासन । चित् पद ते सगुण । माया ह्मणोन देव्यूपास्ति ॥ १२३ ॥ आनंद तो पुरुष प्रधान । यांसचि म्हणती हरि त्रिनयन । स्पष्ट असे अर्थ आन । तंव वादी आपण बोलतु ॥ १२४ ॥ मज आशंका आली भलती । कीं एकनाथ होते मानभावमति । मानभावाच्या लक्षणस्थल महावाक्य प्रकरण ग्रंथी । ही रीति बोलिली ती ऐका ॥ १२५ ॥ "तच्छब्दें ब्रह्म बोलिजे । चिच्छब्दें माया बोलिजे । आनंद शब्दें ईश्वर बोलिजे । ब्रह्म माया ईश्वर ऐसा त्रयांश परमेश्वर एक आत" आत ह्मणजे आहे. बाकीचा अर्थ

स्पष्ट आहे. हें वचन मानभावांचा लक्षणस्थ... प्रकरणात्मक जो ग्रंथ आहे त्यांतील महावाक्यप्रकरणांत ... यांचे ग्रंथ सुंदर, सकल, भेडार वगैरे निरनिराळ्या चवदा लिपींत लिहिले असल्यामुळें, व त्यांचा प्रसिद्ध न होऊं देण्याचा उत्तम नि...णे असल्यामुळें लोकांना हीं वचनें माहित नाहींत, व त्यांना विचारले... सतां ते होय म्हणणारहि नाहींत, तरी पण माझ्या प्रमाणें शोध ... असतां हीं वचनें मिळाल्यावांचून राहणार नाहींत.

तें सिद्धान्ती ह्मणे ... मात । विरोध आहे मानभाव मतांत । महावाक्यप्रकरणीं ...लिले सत् । आणि त्यांचाचि विचार स्थलग्रंथ स्थान सांगे ॥ ... ॥ "ब्रह्म आस्त नास्त ऐसियास विषयो नव्हे"। हे वि...ळी वचन त्वा पहावे । एकनाथ तंव स्वभावें । मानभाव ...॥ १२७ ॥ याचि अभंगीं अस्ति भाति प्रिय । ऐक्यत्वें बोलिले सच्चिदानंद त्रय । मानभावमतीं तंव सच्चिदानंद त्रय । भेदें अंश बोलिले ॥ १२८ ॥ सत् तेचि चित् । चित् तेचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंदे" ॥ १ ॥ हे स्वात्मसुखीं वचन । नाथांचेचि आहे म्हणोन । नव्हते मानभाव परी या अभंगीं सच्चिदानंद भेद निरूपण । विष्णुपुरुषोपासना प्रधान बोलिले ॥ १२९ ॥ अथवा मानभाव मताचा पूर्वपक्ष करूनी । अस्ति भाति प्रिय ऐसी पदें तिन्ही । एका जनार्दनीं तेचि झाले याबाणी । स्वसिद्धान्त निर्वाणीं बोलिला ॥ १३० ॥ असो हे नाथ वाक्य संगती । पुल्लिंगवाच्य आनंद अनध्यस्त विवर्ती । शिव विष्णु म्हणोनी उपास्ति । त्यांचिच शक्तीहुनि श्रेष्ठ ॥ १३१ ॥ किंवा मेरु तंत्रवचन । सामग्री अपेक्षेनें बाह्य पूजेस म्हणो रजोगुण । फळ तंव असे समान । फलदाता भगवान् म्हणोनी ॥ १३२ ॥ ईश्वरत्वें सम पंचायतन । रुच्यनुसार करावें उपासन । मज आवडती शिव कृष्ण । तेचि विवेचन येथें केलें ॥ १३३ ॥ तंव वादी ह्मणे कवणे रीति । उपासाव्या दोन्ही व्यक्ति । व्यवस्था ऐक ह्मणे सिद्धान्ती । यथार्थ रीति

---

१ ह्मणो येथें ह्मणोच राहूं देणें. ह्मणे असें सुधरूं नये कारण त्यांत उपेक्षा अर्थ आहे.

सांगेन ॥१३४॥ पिता [illegible] पति माधव । किंवा गुरु शिव कृष्ण देव । गुरु करणें लागे सदाशि[illegible]या तातवचनें उपास्ति घडे ॥ १३५ ॥ किंवा शिवविष्णुरूप कृष्ण[illegible] । आमंत्रणविलासींही बोलिली उपपत्ति । ती उपासावी एकाचि व्यक्ति । [illegible]ी करोनी ॥ १३६ ॥ किंवा शिव-कृष्ण श्रीगुरु । हाहि बहु ग्रंथीं बोलि[illegible] विचारु । उपासावा आळंदीश्वरु । शिवकृष्णरूप ॥ १३७ ॥ अथवा पंढ[illegible] पांडुरंग । जेणें मस्तकीं धरिलें शिवलिंग । कटीं कर ठिटे उभा अभं[illegible] तो रुक्मिणीरंग भजावा ॥ १३८ ॥ तंव वादी ह्मणे तुमचा कांहीं । ए[illegible]य दिसत नाहीं । कवणे रीति संप्रदायीं । प्रवेशावें ॥ १३९ ॥ सिद्धान्त[illegible] प्रथम पासून । उपास्ति प्रकाशावया कवण कारण । अज्ञोनी उपास्ति [illegible] कवण । हे तुज कारण कां मी वदूं ॥ १४० ॥ शिव कृष्ण मज आव-डती । हे बोलिलेंचि आहे बहुग्रंथीं । वारकरी संप्रदाय विशेष स्वमार्गा-प्रति । येचि ग्रंथीं म्हणितले मी ॥ १४१ परी मधुराद्वैत विचार । मिया गुप्त प्रगट केला समग्र । म्हणोनीच नाममात्र । मम मार्ग भिन्न मूढ ह्मणती ॥ १४२ ॥ यालागीं करोनी विचार । मन्मार्गीते इच्छी अंतर । तरी कृष्णकर्पूरगौर । उपासिजती ॥ १४३ ॥ शिवींहि माधूर्य कैसे घडे । हे मार्गें बोलिले आहे रोकडे । सेवाप्रकारहि फुडे । बोलिले आणि पुढेंहि बोलूं ॥ १४४ ॥ आणखी एक ऐक रीति । दोहोंतुनि ज्याच्या चित्तीं । अतिशय आवडे एक व्यक्ति । त्यानें ऐसी वृत्ति धरावी ॥१४५॥ कन्या वडिलाची मर्यादा करी । स्वकांत पायीं पुष्टि भरी । तेवि मर्यादा आवडी एकावरी । करोनी पुष्टि करावी अजि प्रियचरणीं ॥ १४६ ॥ एवं शाळिका विष्णुरूप । लिंग तो कैलासभूप । ऐसाहि उपास्तिदीप । शिवेष्टभजकें उजळावा ॥ १४७ ॥ परी सोडूं नये एकमेका । चित्तीं हा धरावा आवांका । सर्व सांडोनिया शंका । शिव प्रजनायका भजावे ॥ १४८ ॥ इंद्रायणी आणि भागिरथी । दोन्ही मिळाल्या एकेपातीं । ते नित्य[illegible] [illegible]दो मजप्रति । वैकुंठ कैलासु ॥ १४९ ॥ तेथीळ ज्ञाने-

स्वरजननी । अखंड सद्भावें नमुनी । श्री[illegible]चरणकमळमाळ चरणीं । प्रेमें गुंफोनी वाहिली ॥ १९० ॥

इति: ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु[illegible]निश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते संप्रदाय सुरतरौ पूर्वविहारे पंचायत[illegible]सनासाम्येऽपि स्वेष्टहरिहरोपासनो-पपादनंनाम अष्टादशमं कुसुमम्

---

॥ [illegible]निश्वरमाउली समर्थ. ॥

## अध्याय १९ वा.

जय जय सद्गुरु पूर्णकामा । जय जय सद्गुरु मनविश्रामा । जय जय सद्गुरु शिष्यप्रेमा । वर्तो श्रीगुरो ॥ १ ॥ जय जय सद्गुरो सच्चिदानंदा । जय जय सद्गुरो आनंदकंदा । जय जय सद्गुरो निरस्तभिदा । आळंदीपते ॥ २ ॥ बैसोनियां माझ्या हृदयीं । ग्रंथ वदे श्रीगुरु आई । सावध होउनी सर्वही । परिसोत श्रोते ॥ ३ ॥ सच्छिष्य कर जोडून । सद्गुरूतें करी प्रश्न । ह्मणे मागील निरूपण । ऐकोन मन निवालें ॥ ४ ॥ परि भगवद्वचनगोष्टी । ऐकतां तृप्ति नोहे कुडी । तयाचि निरूपणाची परवडी । ऐकावी वाटे पुढत पुढती ॥ ५ ॥ तंव श्रीगुरु ह्मणती ऐक । तुज हरिहरोपासना सांगतों आणिक । तंव वादी ह्मणे माझी सकळिक । आधीं शंका निरसावी ॥ ६ ॥ संप्रदाय ह्मणजे कवण वर्ण । वेदमार्ग असतां जाण । तयातें प्रकटावया काय कारण । अनादि कीं सादि कृपा करोनि सांगा ॥ ७ ॥ सिद्धान्ती ह्मणे पुससी काय । वर्ण आणि संप्रदाय । शब्दार्थेंचि भिन्न होय । एक सोय तयाची ॥ ८ ॥ वर्ण ह्मणजे जन्मसंस्कारावच्छिन्न । किंवा कोणी ह्मणती गुणकर्मभेदेंकरून । संप्रदाय गुरुपरंपराख्यान । यालागीं भिन्न दोन्हीही ॥ ९ ॥ वर्णे कर्माधिकार होय प्राप्त । संप्रदाय प्रकटे मोक्षार्थ । वर्णा गायत्री मंत्रचि विहित । संप्रदायाभिमत इष्टदेवमंत्र ॥ १० ॥ मोक्षाधिकारी चारी वर्णी । तेथ संप्रदाय प्रवर्ते तिया स्थानीं । प्रकटावयालागुनी । हाचि हेतु ॥ ११ ॥ वेद असतां कां प्रकटणें । हा प्रश्नचि न शोभे अनुगुणें । कल्पानुसार साध्य

साधनें । प्रकटली अ[illegible] ॥ महाभारतीं बोलिले वचन । कीं प्रत्येक कल्पीं हरीपासोन । तें [illegible] शास्त्र संपूर्ण । त्या ऋषींते मिळतसे ॥ १३ ॥ श्रुति स्मृति पुराणें [illegible] न्याय मीमांसा आणि व्याकरणें । नारायणापासोनि निर्वाणें । सकळ [illegible] ऋषीतें मिळती हो ॥ १४ ॥

"युगान्तेऽन्तर्हितान्वेदान् [illegible] सेतिहासान्महर्षयः ।
लेभिरे तपसा पूर्वमनुज्ञाताः स्वयंभुवा" ॥१॥
(शांतिपर्वक्रम अ० २१० [illegible] ५० क्रम अ० ३७)

अर्थ स्पष्ट—शेवटीं वर्षिलां थोक होये । [illegible] युगीं व्यासयांलाहे । हे पुस्तकांचि होय । अनर्थक ऐसें ॥ १५ ॥ [illegible] स्वभाव सकळ । सर्वत्र वर्षणें नोर । तेवीं अनादि वस्तु प्रकटणें [illegible] स्वाधीण अन्यत्र दुर्निवार्य ॥ १६ ॥ ह्मणोनि धर्म ईश्वरीं लीन । [illegible] होय कल्पानुगुण । तसाचि भागवत संप्रदाय ह्मणोन । प्रगट होय ॥ १७ ॥ अथवा भागवत संप्रदायचि एक प्रकटता । आणि वेदधर्म जरी नसता । तरी देवाचा काळ व्यर्थ न जाता । सायास चुकता ऐसा वादीचा आशय जरी ॥ १८ ॥ तो आशयही समूळ वृथा । कांहीं श्रम न करितां । वेद पुराण भगवंता । श्वासापासोन उपजविणें ॥ १९ ॥ तेथ पुराणाचा अर्थ । मंत्र ब्राह्मण जरी विवक्षित । तरी छांदोग्य श्रुतींतील इतिहासशब्दार्थ । केला भारत आचार्यांनीं ॥ २० ॥ वादी ह्मणे भविष्यही सांगे श्रुति । ह्मणवोनि भारत पठलों हे संभवे नारदोक्ति । तरी व्यासगुरु नारद पुराणें सांगती । ह्मणोनि तद्युक्ति पाठ न घडे हे सिद्धान्ती ह्मणे ॥ २१ ॥ यास्तव संक्षिप्त ब्राह्मण । आणि भारतादि इतिहास तद्विस्तर पूर्ण । बृहदारण्यकभाष्यांत सांगितलें संक्षिप्त इतिहास पुराण । आणि छांदोग्यभाष्यांत विस्तृत इतिहास पुराण दर्शविलें ॥ २२ ॥ हें पुढेंही होईल स्पष्ट । आतां वेदधर्म जरी नव्हता प्रगट । तरी सर्वभावें भजन स्पष्ट । न होते हरीचें ॥ २३ ॥ वैदिक कर्मीही करून अर्पण । करावेंचि पैं भगवद्भजन । एवं वैदिक धर्म भागवत संप्रदाय हे दोन । अनादिचि आधीं ॥ २४ ॥ तंत्रादिक प्रसिद्ध मोहनार्थ । नास्तिकादि प्रसिद्ध कल्पित । यालागीं वेदधर्म आणि संप्रदाय भागवत । हे दोनचि कल्याणार्थ अनादि ॥ २५ ॥ वादी म्हणे संमोहन

तंत्राचें । पद्मपुराणीं नाम साचें । म्हणोनीचे
कीं ॥ २६ ॥ सिद्धान्ती म्हणे एक वचन ... आम्हुती । ... याच । अनादित्व स्वोक्त
प्रांत सांख्ययोगाचेंही निरूपण । अन ॥ ... र्वी भारताचें उदाहरण ।
योगादिक । अनादि हे सकळीक । तूं श्रीमत ... बोलिलें ॥ २७ ॥ सांख्य-
कल्पी वेगळा ॥ २८ ॥ अनादि अक्षरें पंचायत ... सार आविर्भाव क्रम देख । कल्पी
गटली । तैसे वेद भागवत ... धर्म कुसुम ... ती । कृतयुगींचि ॥ २९ ॥ मग प्रक-
ती सांख्ययोग । तंत्रादिक ... टती मग । पुराणाचा तंव क्रम चांग ।
साचि प्रगटे ... धी शतकोटी एक पुराण । मग अष्टादशधा
भागी सुव्यवहि ... यालागीं पुराणीं तंत्राचें प्रमाण । अनादित्वें-
कर ... नंद ॥ ३१ ॥ परि विशेष तंत्रप्रचार । कलींतचि असे
... भागवत धर्म तंव सुंदर । कृतयुगींही बोलिला ॥ ३२ ॥ येच-
विषयीं बोलिले भारत । तेंचि ऐके सावधचित्त । शांतिपर्व मोक्षधर्मांत ।
अष्टचत्वारिंशदधिकत्रिशततमाध्यायीं ॥ ३३ ॥

केनैष धर्मो कथितः देवेन ऋषिणाऽपि वा ॥ ६ ॥
एकान्तीनां च का चर्या कदाचोत्पादिता विभो
एतन्मे संशयं छिंदि परं कौतूहलं हि मे ॥ ७ ॥

जनमेजय म्हणे मुनिवरा । कर्मी आणि यतीश्वरा । जे गती मिळे त्याहोनि उदारा । भक्त जाती मनुनीतें ॥ ३४ ॥ ऐसा हा भागवत धर्म । कवणें निर्मिला उत्तम । माझा संशय हा परम । कृपा करून छेदावा ॥ ३५ ॥

"समूपोढेष्वनीकेषु कुरुपांडवयोर्मृधे ।
अर्जुने विमनस्के च गीता भगवता स्वयम् ॥८॥

वैशंपायन म्हणे राया । तूं विस्मरलासी कां या । तुझ्या पूर्वजा पार्थराया । जें युद्धीं यदुवर्यें बोलणें झालें ॥ ३६ ॥ ती मुख्य भगवद्गीता । जी उपनिषद् या वेदभारता । तेथचि या धर्माची कथा । निरोपिली तूंतें ॥ ३७ ॥ इणें वाटेल तुझिया अंतरीं । कीं गीता सांगितली द्वापारीं । तेव्हांचि धर्माची उत्पत्ति खरी । परि ऐसें म्हणूं नको ॥ ३८ ॥

"संम्मितस्सामवेदेन पुरैवादियुगे कृतः ।
धार्यते स्वयमीशेन राजन्नारायणेन च ॥ १० ॥

टीका—सामवेदेन स... सामवेदोक्तं तत्त्वमसीति वाक्यं यथाधिकारिणः सद्यः ज्ञानजनकं एवं वै... धर्मोऽपि शमादिमतां सद्यः कैवल्यहेतुरित्यर्थः ।

(... शां० प० अ० ३४८ )

श्लोकसहित टीकेचा भावार्थ— स... वेदीं तत्त्वमसि । वाक्य शीघ्र ज्ञानप्रद जीवासी । तैसा वैष्णवधर्मही सक...ळी । सद्य ज्ञानप्रद ॥३९॥ तत्त्वमसि वाक्य आपण । व्यतिरेकें आत्माका... वृत्ती करून । ज्ञानप्रद होय सकळांकारण । भागवत धर्मही तैसाची ॥ ... ॥ यथा—

" सर्व भूतेषु यः पश्येत् भगवद्भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥४५॥ "
( भाग० स्कं० ११ अ० २ )

जागृच्छ्रुतिश्च भवति— " यो मां पश्यति सर्वत्र सर्व च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति " ॥

या दोन्ही वचनांचा अर्थ । तातनाथोक्तिवरून जाणावा यथार्थ । ज्याचें निष्काम जाहलें चित्त । तया धर्म भागवत तारक ॥४१॥ किंवा " सामवेदेन संमित " या वचनीं । भागवतस्मृतित्व प्रतिषेधुनी । मूळमुळीभाव निराकरोनी । सनातनत्व यालागुनी बोलिलें ॥ ४२ ॥ व्याससमाधिभाषा भागवत । यालागीं ते सनातन समस्त । किंवा चतुःश्लोकी भागवत । बोलिलें हो का या स्थानीं ॥ ४३ ॥ हाचि ब्रह्मयाते वारंवार । धर्म उपदेशिला निर्धार । ऐसेंचि बोलिले आचार्येवर । आळंदीश्वर जगद्गुरू ॥ ४४ ॥ " ते हें कल्पादि भक्ति मिया । श्रीभागवतमिषे ब्रह्मया । उत्तम ह्मणोनि धनंजया । उपदेशिली ॥ ११३२ ॥ (ज्ञाने० अ० १८ श्लो० ६५) उत्तम ह्मणजे वेदधर्माहुनी उत्कृष्ट । आन अर्थ आहे स्पष्ट । ईश्वरीं अर्पितां पूर्त इष्ट । तरी वेदही भागवत होतु कां ॥४५॥ वेद भागवत स्वतः प्रमाण । मूळमुळीभावाचें नाहीं कारण । कोणी ह्मणेल अप्रमाण वेदबाह्य ह्मणोन । तरी भागवतबाह्य ह्मणोन वेद अप्रमाण कां न ... ॥ ४६ ॥ वेद म्हणजे काय । मंत्र कीं ब्राह्मण होय । कीं दोनचि आन नोहे । तरी हें न घडे ॥ ४७ ॥ जीवोद्धारासाठीं शब्द ।

तो तो अवघा बोलिजे वेद । आतां भा... ...देंम्हुनी विपद । ते वेदीं वेदनिर्देशवत् ॥ ४८ ॥ किंवा गोपाळ... ...नीयादि श्रुति । याचि धर्मातें बांधिती । कालाग्निरुद्रादि श्रुति । ... ...ती यातेंचि ॥ ४९ ॥ म्हणोनि शैव आणि वैष्णव । हा द्विविध ध... वैदिक स्वयमेव । तोचि चातुर्वर्ण्यार्थ विस्तृत सावेव । म्हणोनि ... ...मवेदें संमित म्हणिजे ॥ ५० ॥ संक्षेप वदती गोपालतापनीय ... उपनिषद् । म्हणोनि तो लघु वेद । सर्वांसाठीं विस्तृत सांगे भा... ...त शुद्ध । म्हणोनि सामवेदसंमित म्हणावा ॥ ५१ ॥ किंवा कलि... ...ण श्रुति । कृष्ण यजुर्वेदी नाममहिमा वदती । यालागीं वेदोक्तता ... ...ते । तो बृहत्सामस्तुतितुल्य म्हणोनि सामवेद संमित म्हणि... ...५२ ॥ आतां ऐसें वदेल कोणी । कीं मोहावया ... लागुनी । हा धर्म स्थापिला देवानीं । तरी ते म्हणणें अयोग्य ॥ ५३ ॥ पाखंडविस्तार कलींत । "कलावागमसंभवः" इत्यादि मेरुतंत्रोक्त । वाममार्गविस्तारही कलींत । आणि बौद्धादिविस्तारही कलींतचि ॥ ५४ ॥ गौतमदधीचिनारदशाप । आधवे कलीसाठींच संकल्प । यास्तव कृतयुगीं पाखंडार्थ भागवत हा जल्प । कदं नये अल्प कोणीही ॥ ५५ ॥ पाखंडबाहुल्य होय जेव्हां । तंत्रप्रादुर्भाव होय तेव्हां । न्यूनपाखंडीस्वभावा । दंडक सत्वचि ॥ ५६ ॥ आतां आग्रहचि करशील जरी । आम्ही आग्रहेंचि बोलूं तरी । वेदापूर्वीं कृतयुग निर्धारीं । भागवतधर्मचि पैं होता ॥ ५७ ॥ येविषयीं भागवत प्रमाण । आणि श्रीधराचें भाष्यही जाण । तेही सावध करी श्रवण । धरी मौन मग वादिन् ॥ ५८ ॥

आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः ।
कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥

टीका—तत्रादौ मद्उपासनालक्षण एव मुख्यो धर्म आसीत् । आचारलक्षणस्तु पश्चात् प्रवृत्तः स च एतमनुष्ठितो भक्तिहेतुरिति वर्णयितुमाह । कलादौ यत्कृतयुगं तस्मिन् । ते च तदा मां उपासत एव केवलं नान्यत् कुर्वन्ति इति वक्तुं कृतयुगनामनिरुक्तिमाह । कृतकृत्या इति । जात्या जन्मनैव । किंच विधायकाभावादपि तदानीं नान्यत्कर्मास्तीत्याह ॥ १० ॥

वेदः प्रणव एवाग्रे धर्मोऽहं वृषरूपधृक् ।

उपासते तपोनिष्ठा हंसं मां मुक्तकिल्बिषाः ॥ ११ ॥

टीका— वेद इति । धर्मश्चाहं विषयः अहमेव वृषरूपधृक् चतुष्पाद् न क्रियाविशेषो यज्ञादिः तपोनिष्ठा । मनसश्चेंद्रियाणां च ह्यैकाग्र्यं परमं तप इति वचनात् एकाग्रतया हंस शुद्धं मां ध्यायन्ति इत्यर्थः ॥ ११ ॥

त्रेतामुखे महाभाग प्राणान्मे हृदयात् त्रयी ।
विद्या प्रादुरभूत्तस्या अहमासं त्रिवृन्मखः ॥ १२ ॥

टीका— पश्चात् त्रेतायुगप्रवेशे मे वैराजरूपस्य प्राणान्निमित्तात् हृदयात्सकाशात् तस्यास्त्रय्याः सकाशात् होत्राध्वर्यवौद्गात्र त्रिवृत् त्रिरूपः ' यज्ञो वै विष्णुरिति ' श्रुतेः ॥ १२ ॥

( भाग० स्कं० ११ अ० १७ ) —

आधीं धर्म भक्तिलक्षण । उद्धवा सांगे श्रीकृष्ण । कर्म निघाले मागाहून । जेव्हां सत्वगुण खालावला ॥ ५९ ॥ कल्पाच्या आरंभीं जे युग कृत । तेव्हां एकचि हंसवर्ण विख्यात । चार वर्ण नव्हते तेथ । भेदें प्रवर्तित अखंड जे ॥ ६० ॥ तेव्हां मी धर्म होतो पूर्ण । नव्हतो पंगू क्रियालक्षण । ज्यांत प्रत्यवाय क्षणक्षण । होय उत्पन्न सर्वदा ॥ ६१ ॥ होवोनिया तपोनिष्ठ । मज निर्मळा भजत होते श्रेष्ठ । भाव कीं भगवदुपासनेंत स्पष्ट । कर्मसमुच्चय अपेक्षित नाहीं ॥ ६२ हें कर्म हें अकर्म हें विकर्म । हा वेदेंचि केला नियम । तो वेदचि होतो परम । प्रणवरूपधारी ॥ ६३ ॥ तें उपासना तरी माझें ध्यान । आणि यज्ञ तरी माझें प्रणवनामस्मरण । लोक निष्काम समाधान । सदा संपन्न मत्प्रेमें ॥ ६४ ॥ कोणी म्हणेल ही ज्ञानीस्थिती । तंव अवघेचि ज्ञानी होतील कृतयुगान्तीं । कामाभावें मैथुनप्रवृत्ति । होणार नाहीं तेथवां ॥ ६५ ॥ प्रारब्धही सत्वगुणी । आणि मुळींचेचि ज्ञानी । तेव्हां मैथुनप्रवृत्यभावें कल्पीं । पुढें सृष्टीचि न होवावी ॥ ६६ ॥ म्हणोनी हें नव्हे ज्ञानियाची स्थिती । यालागीं कृतयुगीं धर्म माझी उपास्ती । कर्मसमुच्चय द्विजप्रति । अपेक्षित नाहीं ॥ ६७ ॥ म्हणाल ब्रह्माचि रजोगुणी आपण । तेणें कैसे अवघे केले सात्विक उत्पन्न । तरी आपुला नाहीं प्राणिया गुण । दिधला ब्रह्मदेवानीं ॥ ६८ ॥ जयाचा गुणभाव जैसा । तो उत्पन्न केला तेव्हां

तैसा । ह्मणोनि कृतयुगीं हंस[illegible]कांचे वर्ण उपजविले ॥ ६९ ॥ जेव्हां क्रमें रजोगुणाची प्रवृत्ति [illegible]हां जाहली कर्मस्थिती । तंव [illegible] ह्मणे चतुर्वर्णप्रवृत्ति होती कृती [illegible]सीही पुराणवचनें ॥ ७० ॥ सिद्धान्तीं ह्मणे एक वचन । सहस्रयुग [illegible]ल्पाचें प्रमाण । स्वयें बोलिले भगवान । "सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मण" इत्यादि वचनीं ॥ ७१ ॥ त्या कल्पामाजीं युगें चारी । होती जाती बहुतापरी । परी कल्पप्रारंभी जो कृतयुग निर्धारी । तेव्हां अ[illegible]तो हंसवर्ण ॥ ७२ ॥ आणि कल्पमध्यचौकडींचे जे कृत । साम[illegible] त्यान्ही वर्ण असती तेथ । हाचि नारदपुराणार्थ । अवलंबावा [illegible]३ ॥ जैसे सांगे भागवत । तैसेचि सांगे महाभारत । [illegible]विचारकुसुमांत । बोलिले आह्मी ॥ ७४ ॥ त्रेतारंभी झाले वेद तीन । तयापासोनि यज्ञ उत्पन्न । तेव्हां धर्म क्रियालक्षण । शब्दार्थ भान स्पष्ट असे ॥ ७५ ॥ एवं कृतयुगीं नव्हता । कलियुगीं नासेल तत्वता । ऐसिया मध्यप्रवृत्ता । धर्माधर्म कवण ह्मणे ॥ ७६ ॥ आतां ईश्वरापासोन । दोन्हीही जाहले ह्मणोन । निश्वासश्रुतिविरोध नाहीं उपपन्न । एवं उत्कृष्ट प्रमाण भागवतधर्मू ॥ ७७ ॥ तो विष्णूनें शिवभक्तिरूप । आणि शिवें नारायणभक्तिरूप । स्वयें आचरिला सत्यसंकल्प । असोनीही कृतयुगीं ॥ ७८ ॥ येथोनि याचा संप्रदाय । तोही श्रवण करी स्वयें । श्लोकपदीं मुनिराय । बोलतू असती ॥ ७९ ॥

एतदर्थं महाराज पृष्टः पार्थेन नारदः ।
ऋषिमध्ये महाभागः शृण्वतोः कृष्णभीष्मयोः ॥ ११ ॥
गुरुणा च मयाऽप्येष कथितो नृपसत्तम ।
यथा तत्कथितं तत्र नारदेन तथा शृणु ॥ १२ ॥
यदासीन्मानसं जन्म नारायणमुखोद्गतम् ।
ब्रह्मणः पृथिवीपाल तदा नारायणः स्वयम् ॥ १३ ॥
तेन धर्मेण कृतवान्दैवं पित्र्यं च भारत ।
फेनपा ऋषयश्चैव तं धर्मं प्रतिपेदिरे ॥ १४ ॥
वैखानसाः फेनपेभ्यो धर्मं तं प्रतिपेदिरे ।
वैखानसेभ्यः सोमस्तु ततः सोऽन्तर्दधे पुनः ॥ १५ ॥
यदाऽऽसीच्चाक्षुषं जन्म द्वितीयं ब्रह्मणो नृप ।

यदा पितामहेनैव सोमाद्धर्मः प्र[illegible]ः ॥ १६ ॥ नारायणात्मको राजन् रुद्राय प्रददौ च तम् । ततो यो[illegible]तो रुद्रः पुरा कृतयुगे नृप ॥ १७ ॥ वालखिल्यानृषीन् सर्वान्धर्ममेतदप[illegible]न् । अंतर्दधे ततो भूयस्तस्य देवस्य मायया ॥ १८ ॥ तृतीयं ब्रह्मणो जन्म यदासीद्वाचिकं महत् । तत्रैष धर्मः संभूतः स्वयं नारायणान्नृप ॥ १९ ॥ सुपर्णो नाम तमृषिः प्राप्तवान्पुरुषोत्तमात् । तपसा वै सुतप्तेन दमेन नियमेन च ॥ २० ॥ त्रिःपरिक्रांतवानेतत्सुपर्णो धर्ममुत्तमम् । यस्मात्तस्मात् व्रतं ह्येतत् त्रिसौपर्णमिहोच्यते ॥२१॥ ऋग्वेदपाठपठितं व्रतमेतद्धि दुश्चरम् । सुपर्णाच्चा[illegible]धिगतो धर्म एष सनातनः ॥ २२ ॥ वायुना द्विपदां श्रेष्ठ कथितो [illegible]ायुषा । वायोः सकाशात्प्राप्तश्च ऋषिभिर्विघसाशिभिः ॥ २३ ॥ ततो महोदधिश्चै[illegible] वान्धर्ममुत्तमम् । अंतर्दधे ततो भूयो नारायणसमाहितः ॥ २४ ॥ यदा भूयः श्रवणजा सृष्टिरासीन्महात्मनः । ब्रह्मणः पुरुषव्याघ्र तत्र कीर्तयतः शृणु ॥ २५ ॥ जगत्स्रष्टुमना देवो हरिर्नारायणः स्वयम् । चिंतयामास पुरुषं जगत्सर्गकरं प्रभुं ॥ २६ ॥ अथ चिंतयतस्तस्य कर्णाभ्यां पुरुषः स्मृतः । प्रजासर्गकरो ब्रह्मा तमुवाच जगत्पतिः ॥ २७ ॥ सृज प्रजाः पुत्र सर्वा मुखतः पादतस्तथा । श्रेयस्तव विधास्यामि बलं तेजश्च सुव्रत ॥२८॥ धर्मं च मत्तो गृह्णीष्व सात्वतं नाम नामतः । तेन सृष्टं कृतयुगं स्थापयस्व यथाविधि ॥ २९ ॥ ततो ब्रह्मा नमश्चक्रे देवाय हरिमेधसे । धर्मं चाग्र्यं स जग्राह सरहस्यं ससंग्रहम् ॥ ३० ॥ आरण्यकेन सहितं नारायणमुखोद्भवम् । उपदिश्य ततो धर्मं ब्रह्मणेऽमिततेजसे ॥ ३१ ॥ त्वं कर्ता युगधर्माणां निराशीः कर्मसंज्ञितम् । जगाम तमसः पारं यत्राव्यक्तं व्यवस्थितम् ॥ ३२ ॥ ततोऽथ वरदो देवो ब्रह्मा लोकपितामहः । असृजत्सततो लोकान्कृत्स्नान्स्थावरजंगमान् ॥ ३३ ॥ ततः प्रावर्तत तदा आदौ कृतयुगं शुभम् । ततो हि सात्वतो धर्मो व्याप्य लोकानवस्थितः ॥ ३४ ॥ तेनैवाद्येन धर्मेण ब्रह्मा लोकविसर्गकृत् । पूजयामास देवेशं हरिं नारायणं प्रभुं ॥ ३५ ॥ धर्मप्रतिष्ठाहेतोश्च मनुं स्वारोचिषं ततः । अध्यापयामास तदा लोकानां हितकाम्यया ॥ ३६ ॥ ततः स्वरोचिषः पुत्रं स्वयं शंखपदं नृप । अध्यापयत्पुराऽव्यग्रः सर्वलोकपतिर्विभुः ॥ ३७ ॥ ततः शंखपदश्चापि पुत्रमात्मजमौरसम् । दिशांपालं सुवर्णाभमध्यापयत भारत ।

सोऽन्तर्दधे ततो भूयः प्राप्ते त्रेतायुगे पु ... ३८ ॥ नासत्ये जन्मनि पुरा ब्रह्मणः पार्थिवोत्तम । धर्ममेतं स्वयं ... हरिर्नारायणः प्रभुः ॥ ३९ ॥ तज्जगादारविंदाक्षो ब्रह्मणः पश्यतस्तदा । सनत्कुमारो भगवांस्ततः प्राधीत-वान्नृप ॥ ४० ॥ सनत्कुमारादपि च वीरणो वै प्रजापतिः । कृतादौ कुरुशार्दूल धर्ममेतदधीतवान् ॥ ४१ ॥ वीरणश्चाप्यधीत्यैनं रैभ्याय मुनये ददौ । रैभ्यः पुत्राय शुद्धाय सुव्रताय सुमेधसे ॥ ४२ ॥ कुक्षिनाम्ने स प्रददौ दिशांपालाय धर्मिणे । ततोऽप्यंतर्दधे भूयो नारायणमुखोद्भवः ॥४३॥ अंडजे जन्मनि पुनर्ब्रह्मणे हरियोनये । एष धर्मः समुद्भूतो नारायणमुखा-त्पुनः ॥ ४४ ॥ ... तो ब्रह्मणा राजन्प्रयुक्तश्च यथाविधिः । अध्यापिताश्च ... बर्हिषदो नृप ॥ ४५ ॥ बर्हिषद्भ्यश्च संप्राप्तः सामवेदांतगं द्विजम् । ज्येष्ठं नामाभिविख्यातं ज्येष्ठं सामव्रतो हरिः ॥ ४६ ॥ ज्येष्ठाच्चा-प्यनुसंक्रांतो राजानमविकंपनम् । अंतर्दधे ततो राजन्नेष धर्मः प्रभो हरेः ॥ ४७ ॥ यदिदं सप्तमं जन्म पद्मजं ब्रह्मणो नृप । तत्रैष धर्मः कथितः स्वयं नारायणेन ह ॥ ४८ ॥ पितामहाय शुद्धाय युगादौ लोकधारिणे । पितामहश्च दक्षाय धर्ममेतं पुरा ददौ ॥ ४९ ॥ ततो ज्येष्ठे तु दौहित्रे प्रादाद्दक्षो नृपोत्तम । आदित्ये सवितुर्ज्येष्ठे विवस्वान् जगृहे ततः ॥ ५० ॥ त्रेतायुगादौ च ततो विवस्वान्मनवे ददौ । मनुश्च लोकभूत्यर्थं सुतायेक्ष्वाकवे ददौ ॥ ५१ ॥ इक्ष्वाकुना च कथितो व्याप्य लोकानवस्थितः ।

( भा० शां० प० अ० ३४८ )

अर्थ संस्कृतवेत्ते जाणती । भावार्थ स्पष्ट कळूं शके सकळाप्रति । विशेष हा कीं प्रत्येक कृतयुगीं प्रवृत्ति । कल्पादौ झाली याचि धर्माची ॥ ८० ॥ मध्यें मध्यें जाहला क्षीण । तयापुढें प्रवर्तवी नारायण । एवं युगीयुगी आपण । कल्पी कल्पी प्रवर्तवी ॥ ८१ ॥ नारायणापासुनी । हा धर्म मिळे बहुताळागुनी । एवं संप्रदायकहाणी । धर्माची या ॥ ८२ ॥ '**सामवेदेन संमितं**' म्हणता । याची दाविली कर्मकांडभिन्नता । आणि ज्ञानकांडभिन्नता । तेही ऐके ॥ ८३ ॥

सहोपनिषदान्वेदान्ये विप्राः सम्यगास्थिताः ।
पठन्ति विधिमास्थाय ये चापि यतिधर्मिणः ॥ ५ ॥
तेभ्यो विशिष्टां जानामि गतिमेकांतिनां नृणाम् ॥ ६ ॥ पूर्वार्ध.

टीका—जापकेभ्योऽपि भक्तानां [illegible] गतिमाह सहेति.

( भा० शां० प० अ० ३४८ )

गृहस्थयतिधर्माहून । भक्तांची गती श्रेष्ठ मी जाणे पूर्ण । हें श्लोक पूर्वपक्ष न ह्मणावेत कोण । पृच्छकाचें ह्मणोनी ॥ ८४ ॥ याचें करोनी खंडण । वैशंपायन नाहीं वदले सिद्धान्त भिन्न । यास्तव गृहस्थयतिधर्माहुनी भिन्न । असे भागवत धर्म हा ॥ ८५ ॥ ज्ञान तंव उपनिषदाचें याचें एक । यतीच्या प्रणवजपाहुनी हा भिन्न देख । येथ सहाय सगुण रमानायक । म्हणोनी यास समर्थिलें गीताप्रमाणें पूर्वोद्धृत श्लोकीं ॥ ८६ ॥ हा जरी युगींयुगीं होय क्षीण । तरी याचे संग्राहक आचार्य आणिक मुनिजन । स्वयें नारदें संग्रहून । स्वसूत्रीं आणि पंचरात्रीं ठेविला हा ॥ ८७ ॥

नारदेन सुसंप्राप्तः सरहस्यः ससंग्रहः ।
येष धर्मो जगन्नाथात्साक्षान्नारायणान्नृप ॥ ९४ ॥
( भा० शां० प० अ० ३४८ )

भावार्थः— संग्रहित पंचरात्रीं केला । रहस्यें सूत्रीं निरूपिला । स्वामी नारदें अवलंबिला । नारायणापासुनी ॥ ८८ ॥ आणिकही संप्रदाय । याचे जाहले असती स्वयें । विष्णूनें बोधिला ब्रह्मा होय । ब्रह्मायानें नारदू ॥ ८९ ॥ नारदें व्यासा व्यासें शुका । शुकें परिक्षिता दिधला देखा । विधिपासुनी हाचि आणिका । अत्रीतें मिळाला ॥ ९० ॥ अत्रीपासुनी दत्तात्रेया । त्यापासुनी जनार्दनादिका साधुवर्या । तैसा विधिवसिष्ठशक्तिपराशरादिक्रमें करोनिया । व्यासादिकां प्राप्त हाचि ॥ ९१ ॥ शिवापासोनि उमेप्रति । शिवमुखेंचि मत्स्येंद्राचित्तीं । मत्स्येंद्रापासुनी गोरक्षाप्रति । गोरक्षपरंपरा गैनीतें ॥ ९२ ॥ गैनीपासूनि निवृत्तिराया । तेथूनि मिळाला आळंदिवर्या । तेथूनि सकळां यया । उगमू पुढती ॥ ९३ ॥ ह्मणोनि कल्पीं कल्पीं युगीं युगीं । हाचि कल्याणप्रद सकळांलागीं । तंव वादी म्हणे प्रसंगीं । भलतेंचि वदता ॥ ९४ ॥

कृते श्रुत्युक्त मार्गः स्यात् त्रेतायां स्मृतिभावितः ।
द्वापरे वै पुराणोक्तः कलावागमसंभवः ॥ १ ॥ ( रुद्रयामल तंत्र )
( आगम ह्मणजे तंत्र— अन्य अर्थ स्पष्ट आहे )

ऐसे आहे तंत्र वचन । यालागीं ३८ भगवद्भक्त । देवाचे बोलिले आहे सेवन । तरी भागवतधर्म सर्वत्रनिर्वाण केवि ? ॥ ९५ ॥ सिद्धान्ती म्हणे वैष्णवाप्रति । आगम पंचरात्र असती । म्हणोनि कलींतही भागवतधर्मस्थिती । निश्चये चाले ॥ ९६ ॥ कलींत विशेष भागवत-धर्म । येथ सात्वतश्रुति मान परम । पुराणविरोधी तंत्रप्रेम । नाहीं आम्हां ॥ ९७ ॥

कृतादिषु प्रजा राजन् कलाविच्छन्ति संभवं ।
कलौ खलु भविष्यन्ति नारायणपरायणाः ॥३८॥

( भाग० स्कं० ११ अ० ५ )

कृतादीचे लोक । कलींत जन्म इच्छिती देख । कलींत अवतरतील सुरेख । साधू म्हणोनी ॥ ९८ ॥ भक्ति राहे कल्पादिकृतीं । परी कल्प-मध्यचौकडींत कर्मप्रवृत्ति । परी कल्पादिमध्यांत्य सर्व कलींत समान भक्ति । यास्तव कल्पमध्यकृतादिप्रजा इच्छिती कलींत जन्म ॥ ९९ ॥ या वचनें तंत्रवचन बाधित । अथवा याचा आन अर्थ । देव्युपासनेविषयीं निश्चित । वचन प्रवृत्त हें असे ॥ १०० ॥ कृतयुगीं श्रुतिप्रणीत । म्हणजे कर्म विख्यात श्रौत । त्रेतायुगीं कर्म स्मार्त । विख्यात तंत्र हें सांगे ॥ १०१ ॥ द्वापरी पुराणोक्त प्रवृत्ति । कलींत देवीपूजा करावी तंत्र-रीती । आमुच्या भागवतधर्माप्रति । संपर्क नाहीं या वचनें ॥ १०२ ॥ तंव वादी म्हणे हें अनुचित । तुमचा धर्म केवी मिळेल सकळाप्रत । सिद्धान्ती म्हणे अन्यधर्म त्यागुनी समस्त । आमुचा धर्म घेयावा ॥१०३॥ तंव वादी म्हणे मेरुतंत्रीं वचन । कीं कुळ त्यागितां महाविघ्न । तेही ऐकावें प्रमाण । सांगतो स्वयें ॥ १०४ ॥

" वाममार्गो यदा दक्षं प्रविशेत्तत्सुरैस्स तु ॥ ६४ ॥
विघ्नेन पीड्यते चापि न सिद्धिमधिगच्छति ।
दक्षमार्गो यदा वामं प्रविशेत्तत्सुरास्तदा ।
लोकद्वयाद्यापयन्ति तं प्रसंति च वामिनम् ॥६५॥
तस्मात्स्वकुलमार्गं तु ज्ञात्वा कुर्य्यादुपासनम् ॥६६॥

( मेरुतंत्र प्रकाश १ )

वादीसंमत भावार्थ–[illegible] सोडूनि अन्य धर्म करितां । तरी तया भाक्षिती देवता । यालागीं [illegible]वकुलोक्ता । आचरावें ॥ १०५ ॥ सिद्धान्ती म्हणे तूं महाशाक्त । [illegible] पूर्वपक्ष करिसी तंत्रोक्त । परि भगवद्भक्तासी देवताकृत । विघ्न नाहीं बाधत सर्वथा ॥ १०६ ॥

त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः स्वौको विलंध्य परमं व्रजतां पदं ते । नान्यस्य बर्हिषि बलीन्ददतः स्वभागान् धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ १० ॥ (भाग० स्कं० ११ अ० ४)

तुज सेवितां नारायणा । सुरवर विघ्नें करिती नाना । तैसें कर्मनिष्ठा न होय जाणा । ते देवास पूजिती म्हणोनी ॥ १०७ ॥ मोक्षा जातां स्वर्ग उल्लंघून । देव रचिती नाना विघ्न । म्हणोनि श्रुति ह्मणे आपण । कीं देवाराधनतत्पर होवावें ॥ १०८ ॥

"तदिदमप्येतर्हि य एवं वेदाहं ब्रह्मास्मीति स इदं सर्वं भवति तस्य ह न देवाश्च नाभूत्या ईशते । आत्मा ह्येषां स भवति । अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुरेवं स देवानाम् । यथा ह वै बहवः पशवो मनुष्यं भुञ्ज्युरेवमेकैकः पुरुषो देवान्भुनक्त्येकस्मिन्नेव पशावादीयमानेऽप्रियं भवति किमु बहुषु तस्मादेषां तन्न प्रियं यदेतन्मनुष्या विद्युः" ॥ १० ॥ (बृहदारण्यक अ० १ ब्रा० ४)

तथापि विघ्नाचिया माथा । पाय देउनी सर्वथा । तुझें भक्त अनाथनाथा । तूं रक्षक ह्मणोनि निजात्मता पावती ॥ १०९ ॥ वरी प्रमाण जी दिधली श्रुति । ते देवतायजन सांगे अभक्त मुमुक्षुप्रति । किंवा देवतायजन भगवंती । अर्पावें हें सांगतू ॥ ११० ॥ जें अन्य देवता पूजिती । तेही अविधीनें मजचि भजती । अर्थ जागृच्छ्रुति । स्वयें द्योती गर्जोनी ॥ १११ ॥ ह्मणोनि भगवद्भक्ता । विघ्नभय नाहीं तत्वता । आणि उद्धृत केल्या वचनार्था । त्वांचि जाणिलें नाहीं ॥ ११२ ॥ वाम आणि दक्षिण । शाक्तियजन मार्ग दोन । त्यांत आपआपला सांडून । भलता भलत्यान धरूं नये ॥ ११३ तंव वादी ह्मणे दाक्षिण मार्गांत । कृष्णादि मंत्र सांगितले मेरुतंत्रांत । सिद्धान्ती म्हणे त्या मंत्रजपाहूनि भागवतोक्त । मंत्र अथवा नामचि श्रेष्ठ ॥ ११४ ॥ वैदिक जपयज्ञाहूनि श्रेष्ठ भक्ति । याविषयीं तुज दाविली भारतोक्ति । तेथ कोण पुसे तांत्रिक मंत्राप्रति । आतां

भागवतेतरधर्मत्यागार्थी प्रमाण आधिके ॥ ११५ ॥

अवैष्णवोपदिष्टश्च पूर्वमंत्रवरः हरेः ।
पुनश्च विधिना सम्यक् वैष्णवात् ग्राहयेन्मनूम् ॥ २ ॥
( पद्मपुराण उत्तरखंड-अध्या० २५४ )

जयासी नाहीं हरिभक्ति । तयाच्या मंत्रोपदेशें नाहीं गति । यास्तव त्याचा त्याग करोनि वैष्णवाप्रति । नित्य प्रणिपातीं भजावें ॥ ११६ ॥

सहस्रशाखाध्यायी च सर्वयज्ञेषु दीक्षितः ।
कुले महति जातोऽपि न गुरुः स्यादवैष्णवः ॥३॥
( पद्मपु० उत्तरखंड अध्या० २५४ )

स्वर्गकामने झाला दीक्षित । वेदसहस्रशाखा मुखोद्गत । जन्म उत्तम ब्राह्मण कुळांत । परि नसतां हरिभक्त तो नव्हे गुरु ॥ ११७ ॥

श्वपाकमिव नेक्षेत लोके विप्रमवैष्णवम् ।
वैष्णवो वर्णबाह्योऽपि पुनाति भुवनत्रयम् ॥५२॥
(पद्मपु० उत्तरखंड अ० २५२)

गोविंदचरणकमळप्रीति । न वसे ज्या मूढाच्या चित्तीं । चांडाळा सम तो ब्राम्हण जाती । नयनीं त्याप्रति पाहूं नये ॥ ११८ ॥ वैष्णव वर्णबाह्यही असतां । तरी पावन करी अवघिया जगता । तुकारामही तत्त्वतां । बोलिले ऐसे ॥ ११९ ॥

"अभक्त ब्राम्हण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥ १ ॥
वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥ २ ॥
ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरीची ॥ ३ ॥
तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥४॥
( तुका० गाथा. २४०६ )

म्हणोनि इतर देव त्यागितां । विघ्नभय न धरावें चित्ता । सुंदरदासही तत्वतां । बोलिले ऐसे ॥ १२० ॥

" होहि अनन्य भजे भगवंतहि और कछू उरमें नहि राखे ॥
देवि रु देव जहां लग है डरके तिनकूं बहि दीन न भाखे ॥
जोग अरु जज्ञ व्रतादि क्रिया तिनकूं तु नहीं सपने अभिलाखे ॥
सुंदर सूरप्रकाश भयो जब तौं कहु कौन हलाहल चाखे " ॥

पूर्णिका— तंव वादी म्हणती । श्रवण करी गा सिद्धान्ती । " यो वै स्वां देवतामतियजते प्र[illegible] देवतायै च्यवते न परां प्राप्नोति । पापीयान्भवति ऐसी आहे श्रुति । हिचा अर्थ कीं स्वदेव सांडुनी भजता अन्याप्रति । तरी उभयभ्रष्ट होवोनि नरकाप्रति जाय ॥१२१॥ सिद्धान्ती म्हणे ही श्रुति । म्हणते कीं सांडुनी श्रौत देवाप्रति । जे यक्षादि तांत्रिक यजती ॥ तयाची गती महादुःख ॥ १२२ ॥ श्रुतींत सांगितलें हरिहर यजन । शूद्रास सांगितलें पौराण यजन ॥ चांडाळास भाषांतरें करून ॥ हरिहरयजन बोळिलें ॥ १२३ ॥ ते सांडोनि विष्णुशिव ॥ पूजिती सटवाई भैरव ॥ यज्ञोपवीत सांडुनी गळा सर्व ॥ कांचमाळा घालिती ॥ १२४ ॥ प्रातःस्नान शीतभयें न करिती । आणि पुत्रासाठीं नाडागळ खेळती । ब्राह्मण असोनि पीर पूजिती । त्यास ही श्रुती निंदिते ॥१२५॥ असो एवं भगवद्भक्ता । विघ्न करूं न शकती देवता । जेणें सर्वभाव रमाकान्ता । वाहिलें असती ॥ १२६ ॥ विघ्नाचें मुख्य कारण । अनात्म पदार्थीं माझेपण । ते पदार्थचि होतां ईश्वरार्पण । तरी विघ्नाचें स्थान निमालें ॥ १२७ ॥ एवं अनन्य दासाप्रति । सर्वथा नाहीं विघ्न-भीति । परि अल्पहि असतां भगवद्भक्ति । विघ्ननिवृत्ति सांगती तात ॥ १२८ ॥ " वैं रंक एक आडलेपणें । काकुळती धाव गा धाव म्हणे । तरी तयाचीये ग्लानी धावणें । काय न घडे मज " ॥ १२२ ॥ ( ज्ञाने० अ० ८ ) तंव वादी म्हणे बोलिला पूर्वी । कीं भलताही श्रद्धाळू तरे ऊर्वी ॥ सिद्धान्ती ह्मणे त्याविषयीं तुरवी ॥ शंका कांहीं ॥ १२९ ॥ इतरत्र सत्वन्यून । यालागीं फलावधी गहन । परम सात्विक हरिहरभजन । तें शीघ्र फळद म्हणोन सांगों आह्मी ॥ १३० ॥ ह्मणोनि श्रीज्ञानेश्वरू । मायबाप करुणाकरू । तयाचें चरणीं निर्धारू । धरावी आवडी ॥१३१॥ ज्ञानराज माझी जननी । वारंवार तियेतें नमूनी । कविताकमळमाळ चरणीं । वाहिली प्रेमें ॥ १३२ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे भागवतधर्मस्थानादित्वसात्विकत्वनिर्णयेन सर्व-माहात्म्यनिरूपणंनाम ऊनविंशं कुसुमम् ।

॥ श्रीज्ञानेश्वरम समर्थ. ॥

## अध्याय प्रा‍वा.

जय जय सद्गुरू सच्चिदानंदा । जय जय सद्गुरू आनंदकंदा । जय जय सद्गुरू अभेदा अळंदीपते ॥ १ ॥ देवोनिया मज स्फूर्ति । पुढें सरते करा ग्रंथीं । वचन ऐकतांचि श्रोतीं । कृतार्थ होइजे ॥२॥ मागिल ऐकोनि निरूपण । पुढती शिष्य करी प्रश्न । ह्मणे पुढें संप्रदायविधान । स्वामी संपूर्ण वदतील ॥ ३ ॥ तें ह्मणे वादी । हें मज सांगावें आधीं । वेदभिन्न धर्माची प्रसिद्धी । युक्त नाहीं निश्चयें ॥ ४ ॥ सिद्धान्ती ह्मणे वादी ऐक । धर्म तंव हा वैदिक । संप्रदायाचि भिन्न देख । भागवत असे ॥ ५ ॥ याचे वैदिकत्व महाभारतीं । बोलिलें आहे जेणें रीती । तयाची टीका नीलकंठ ह्मणती । तेही तुजप्रति सांगेन ॥ ६ ॥

"ऋग्वेदपाठपठितं त्रिसौपर्णं चतुष्कपर्दा युवतिः सुपेशा" इत्यादि-संपूर्णलिंगकं मंत्रत्रयम् (भा० शां० प० अ० ३४८ श्लो० २१)

या टीकेचे मूलभूत श्लोक मागील अध्यायांत आले आहेतच.

इत्यादि मंत्री पाहतां । या भक्तिमार्गा वैदिकता । परी उपायें भिन्नता । बोलिली आहे ॥ ७ ॥ वादी ह्मणे मूलमूलीभाव । तुह्मी निषेधूनि सर्व । वेद भागवत स्वयमेव । प्रमाण बोलिलें ॥ ८ ॥ सिद्धान्ती ह्मणे ऐक उत्तर । जैसी स्मृति अपेक्षी श्रुतिमात्र । तैसे भागवत नापेक्षी ह्मणोनि स्वतंत्र । एवढेंच आम्ही बोलिलों ॥ ९ ॥ "औदुंबरी सर्वा वेष्टयितव्या" ही सर्ववेष्टनस्मृति । आणि "औदुंबरी स्पृष्ट्वोद्गायत" ही प्रत्यक्ष श्रुति । म्हणोनिया सर्ववेष्टनस्मृति । प्रमाण नाहीं ॥ १० ॥ तैसें नाहीं भागवत । श्रुति सांगे "अहरहः संध्यामुपासीत" । आणि भागवत सांगे भगवद्भक्तींत । कदाचित् कर्मलोपें दोष नाहीं ॥ ११ ॥ परि या भागवत वचनाचे खंडण । मागे नाहीं केले आचार्यांन । यालागीं श्रुती-सारखा स्वतःप्रमाण । भागवत धर्मू ॥ १२ ॥ धर्म तंव हा वैदिक । आणि संप्रदायभेदें भागवतधर्म सात्विक । एवं व्यवस्था सम्यक । आणिक काय पुससी ॥ १३ ॥ म्हणोनि धर्म आणि संप्रदाय एवढाचि भेद दाविला होय । कीं वैष्णवत्वा हा संप्रदाय । तंव वादी ह्मणे सोय

सांगावी ॥ १४ ॥ तुमच्या [illegible]र्यी चाऱ्ही वर्ण । करिती कीं नाहीं एकत्र भोजन । सिद्धान्ती [illegible] काय कारण । भोजन ह्मणजे मुक्ति नव्हे ॥ १५ ॥ वैष्णवमंत्रें चाऱ्ही जाती । मोक्षास अधिकारी होती । परि भोजन विवाह जासी जाती । माजीचि कीजे ॥ १६ ॥ एवं जन्मपक्षीं योजना । गुणकर्मपक्षीं दोष नाहीं भोजना । माझें मत कीं पाळितां न पाळितां जाणा । विरोध भगवद्भजना जातीचा नाहीं ॥ १७ ॥ केवळ भक्तिमात्रें करून । जरी करावें भोजन । तरी यतीकरीचेंही पाकग्रहण । त्रैवर्णिक कां न करिती ॥ १८ ॥ म्हणोनि सोडूनि आपुली जाती । अद्वैत म्हणूं नये घोटाळपंक्ति । माणिकपैंजणें कुंभकयाप्रति । नांव ठेवितां तें उत्तम कें ॥ १९ ॥ यतीच्याही करीचें भोजन । न करिती कर्मनिष्ठ ब्राम्हण । यालागीं भक्तिमात्रें करून । गोलंकार करूं नये ॥ २० ॥ तंव वादी म्हणे भजप्रति । एक स्मरोनि सांगा चित्तीं । वर्णावांचुनी होय मुक्ति । तरी वर्णजाती कासया ॥ २१ ॥ सिद्धान्ती ह्मणे जनांची रुचि । बहुधा जाहली रजाची । म्हणोनिया वर्णाची । अभिव्यक्ति कीं ॥ २२ ॥ वादी म्हणे नाममाहात्म्येंकरून । पापीही तरती संपूर्ण । तेथ वर्णाचें काय कारण । सिद्धान्ती म्हणे सकाम जन म्हणोनी ॥ २३ ॥ वादी म्हणे तरी वेद । तुच्छ जाहले प्रसिद्ध । सिद्धान्ती म्हणे नव्हे शुद्ध । कर्म अर्पितां भगवंतीं होय ॥२४॥ वादी म्हणे सकाम भक्त । उदार ह्मणे भगवंत । मग उगेंचि वेद निर्मिले येथ । सर्व भागवत संपादी ॥ २५ ॥ सिद्धान्ती ह्मणे सकाम भक्त उदार । परि त्यास काळ पाहिजे अणुमात्र । किंवा इतरदेवसहित शार्ङ्गधर । पुजावा तैं कामना पुरे ॥२६॥ हें भविष्योत्तर पुराणीं भगवान । बोलिलें नारदाकारण । तोही श्लोक ऐके प्रमाण । सार्थ तुजप्रति सांगतो ॥ २७ ॥

> अतो वै विधिना भ्रष्टाः मद्भक्ताश्च दरिद्रगाः ॥
> ये मद्भक्ताः सुरान्पूर्वं पूजयित्वा भजंति माम् ॥ ३६ ॥
> लक्ष्मीवंतश्च ते ज्ञेया भुक्तिमुक्तिपरायणाः ॥ ३७ ॥
>
> ( भविष्यपु० प्रतिसर्गप० खं० ४ अ० ११ )

माझे भक्त माझ्याआधीं । देवता पूजोनि मज भजती सुबुद्धि । ते लक्ष्मीवंत होवोनि त्रिशुद्धि । भोगमोक्ष भोगिती ॥ २८ ॥ परि कर्म

सोडोनि मजचि भजती । ते या लो[illegible]रिद्री असती । ऐसा भावार्थ धरि दरिद्रीही पावती । शेवटी भ[illegible] हें तेथेंचि वचन ॥ २९ ॥ ह्मणोनि कर्मसापेक्ष सकाम भक्ति । त्या कर्मास्तव वेदांची निर्मिती[1] । ज्ञानकांड तव सम वेदीं भागवतीं । ह्मणोनि तन्निर्मितौ शंका न घडे ॥३०॥ जनांची नानाविध गती । तैसें नानाविध मार्ग निफजती । हें मार्गेंचि सांगितलें तुजप्रति । कीं आचारप्रवर्त्ति स्वर्गकामनें ॥ ३१ ॥ वादी ह्मणे सकामास । भगवंत मिळे ते सांगा विशेष । सिद्धान्ती ह्मणे शिवहृषी-केश । पूजितां भोगमोक्ष मिळती ॥ ३२ ॥ हेही कथा भविष्य पुराणीं । याचि अध्यायीं पहावी वाचुनी । किंवा अतिनिष्ठावंत सकामालागुनी । सुदामासम चक्रपाणि । द्रव्यादि देतू ॥ ३३ ॥ परी जारिणीची मती । जेवी अपेक्षी नाना पती । तेवी सकामांची चंचळ गती । उतावेळ चित्तीं अनिवार ॥ ३४ ॥ भक्तीचे फळ जरी भोग । तरी कां इच्छावा भक्ति-योग । राजगृहीं बाळक मागतां सवेग । काय क्षोभ नव्हे तया ॥ ३५ ॥ ह्मणोनि नाना कर्मे वेदू । जनातें करी नाना बोधू । जेवी खेळ खेळती सोडोनि दुग्धू । तया माय वेधू तैसाचि लावी ॥ ३६ ॥ आतां वेदज्ञान-कांडाची रीती । कर्मानुनि सुटोनि यमादिसंपत्ति । निज प्रयत्नें साधावी गती । ते भगवद्भक्ति सहज साधी ॥ ३७ ॥ येवढाचि भागवत विशेष । कर्मे वेळू चित्तशुद्धीस । भगवत्स्मरणें तात्काळिक शुद्ध मानस । हें शंकरानंदादि सांगती ॥ ३८ ॥ निष्काम वैदिक भगवदर्पण । तरी ते भागवताचेंचि लक्षण । सकाम जरी चाऱ्ही वर्ण । तरी कर्ममार्गी भेद तया ॥ ३९ ॥ निष्काम चहूंही वर्णी सेवा । आनंदें आवडे वासुदेवा । यालागीं भगवंतठेवा । भागवत धर्मी विशेष ॥ ४० ॥ तंव वादी ह्मणे ब्राह्मणसेवा करितां । शूद्रें कां अंगिकारावी अमान्यता । सिद्धान्ती ह्मणे सेवितां गुणवंता । कवणासही आवडी ॥ ४१ ॥ अधी-तगुणीविप्रसेवापूर्ती । शूद्रानें करावी मोक्षार्थी । गुणवान ब्राह्मण निरपराधियाप्रति ॥ दुःख देती हें कदा न घडे ॥ ४२ ॥ पतित ब्राह्म-णाच्या सेवेप्रति । मोक्षार्थिया न सांगे मनूक्ति । तंव वादी ह्मणे ऐसी स्मृति । आहे एक ॥ ४३ ॥

---

१ ( निर्मिती—उत्पत्ति )

" अविद्यो वा सविद्यो वा ब्राह्मणो मामकी तनुः "

अर्थ– ब्राह्मण विद्वान् असो की अविद्वान् असो तो प्रत्यक्ष माझें शरीर आहे.

सिद्धान्ती ह्मणे हें वचन । नाहीं करीत पतितस्तवन । किन्तु सदाचारी विद्याहीन ॥ त्यास ही स्मृतें वर्णिते ॥ ४४ ॥ वादी ह्मणे हें अन्यथा व्याख्यान । "पतितोऽपि द्विजः श्रेष्ठो न च शूद्रो जितेंद्रियः " हें आहे वचन । सिद्धान्ती ह्मणे याचा स्पष्टार्थ कळला मजकारण । परि तूं अज्ञान ह्मणोनि भावार्थ नेणसी ॥ ४५ ॥ हें जन्मजातिपक्षांचें मत । परी आमुच्या विरोधी नाहीं येत । याचा अभिप्राय कीं द्विज असलिया पतित । अनुतापी तरी घेऊनि प्रायश्चित्त ब्राह्मण होय ॥ ४६ ॥ शूद्र जितेंद्रिय असला जरी । तो ब्राह्मण न होय संस्कारी । आतां सद्गुणी शूद्रांस मान द्यावा परी । ऐसीहि स्मृती असे ॥ ४७ ॥

" विद्याकर्मवयोबंधुवित्तैर्मान्या यथाक्रमम् ।
एतैः प्रभूतैः शूद्रोऽपि वार्धके मानमर्हति ॥ २० ॥

( याज्ञवल्क्यस्मृति प्रथम अ० १ गृहस्थ प्र० )

भावार्थ–विद्या वय बंधू धनें । लोकीं जेवीं द्विज मानें । शूद्रही त्याचि गुणें । मान पावे ॥ ४८ ॥ मूळीं विद्या शब्द ह्मणोन । शूद्रास कांहीं असे अध्ययन । हें असो परि द्विज भागवत्तनु विद्याहीन । तो सद्गुणी आचारवान् बोलिला ॥ ४९ ॥ आचरहीनं वेदाः न पुनन्ति । ऐसी स्वयें सांगे स्मृति । ह्मणोनि " अविद्यो वा " ही त्वदुद्धृत स्मृति । विद्यारहित सद्गुणी द्विजस्तुती करी ॥ ५० ॥

न योनिर्नापि संस्कारो न श्रुतं न च संततिः ।
कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेव तु कारणम् ॥ ५० ॥

( भार० अनुशासनपर्व० अध्या० १४३ )

भावार्थः– जन्म संस्कार श्रुति संतति । हे हेतू नाहीं ब्राह्मण्या-प्रति । शुद्ध वृत्ताचि ब्राह्मण्य द्योती । हे शिव सांगती पार्वतीते ॥ ५१ ॥ 'पतितोऽपि द्विजः श्रेष्ठः' ही स्मृति । जेवि त्वां उदाहरिली होती । तद्विरुद्ध महाभारतीं । तेंही ऐके पां ॥ ५२ ॥

कर्मभिः शुचिभिर्देवी शुद्धात्मा विजितेंद्रियः ॥

शूद्रोऽपि द्विजवत् सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत् स्वयम् ॥ ४८ ॥

( भा० अनु० अ० १४३ )

भावार्थ–जयाचें शुद्ध कर्म स्वभाव । इंद्रियनिग्रही शुद्ध मनोभाव । तो शूद्रही सेव्य स्वयमेव । द्विजाप्रमाणें ब्रह्मा ह्मणे ॥ ५३ ॥

स्वभावः कर्म च शुभं यत्र शूद्रेऽपि तिष्ठति ।
विशिष्टः स द्विजातेर्वै विज्ञेय इति मे मतिः ॥ ४९ ॥

( भा० अनु० अ० १४३ )

भावार्थ–जयाचे शुद्ध स्वभाव कर्म । तो द्विजाहूनि श्रेष्ठ परम । ऐसें माझे मत उत्तम । शिव सांगे पार्वतीते ॥ ५४ ॥ वादी ह्मणे याचि अध्यायीं । जन्मानें जाती बोलिली पाहीं । मी श्लोक सांगतो तोही । ऐकावें सुखें ॥ ५५ ॥

ब्राह्मण्यं देवि दुष्प्रापं निसर्गात् ब्राह्मणः शुभे ।
क्षत्रियो वैश्य शूद्रो वा निसर्गादिति मे मतिः ॥ ६ ॥

( भा० अनु० अ० १४३ )

अर्थ स्पष्ट– सिद्धान्ती ह्मणे हे काय सांगसी । आह्मी काय नाहीं ह्मणतो यासी । मी उदाहरिलीया श्लोकांतही शूद्रपदासी । जन्म जातीचि दाखविली ॥ ५६ ॥ जरी गुणकर्में दाविले असते वर्ण । तरी "शूद्रोऽपि" ऐसें ह्मणावयाचे नव्हते कारण । गुणें तो ब्राह्मण । चि झाला ह्मणोनी ॥ ५७ ॥ परि मी उदाहरिल्या श्लोकांचा अर्थ । कीं जन्मानें जरी शूद्र यथार्थ । तरी गुणचि कारण येथ । सेवावया ॥ ५८ ॥ आतां गुणपर वर्णपक्ष मानला जरी । त्वदुक्त श्लोकांतील निसर्ग शब्दार्थ तरी । ऐसा कीं जन्मापासुनी ज्याच्या अंतरी । स्थिर गुण तो ब्राह्मणू ॥ ५९ ॥ तूं या पुढीलचि श्लोक पाहे वाचून । कीं दुष्कर्म केलिया भ्रष्ट ब्राह्मण । म्हणोनि जन्मापासोनि स्थीर गुण । तोचि ब्राह्मण म्हणणें शक्य ॥ ६० ॥ हा आपहीया आग्रह वादू । जन्मपक्ष गुणकर्मपक्ष भेदू । परी दोही ठायीं ऐसा बोधू । कीं गुणीचि सेव्य ॥ ६१ ॥ सर्वदा सद्गुणी ब्राह्मण । मनु सेव्य सांगे म्हणून । क्वचित् शूद्र सांपडलिया सद्गुण । तरी त्यास द्यावा मान हें याज्ञवल्क्य म्हणती ॥ ६२ ॥ अथवा शूद्र ब्राह्मणा सेवितां । ब्राह्मण शूद्रा हेळसितां । तरी शूद्रांतःकरणीं उपजे दीनता । तेणें भक्ति

भगवंता मानवे ॥ ६३ ॥ दैन्यप्रिय गोविंद । हें सूत्रीं बोलिले नारद । आणि नामयाचेही प्रसिद्ध । वचन ... ॥ ६४ ॥

हीन दीन जात मोरी पंढरीके राया । ऐसा नामा दर्जी तुनें काहेकू बनाया ॥ ध्रु० ॥ टाळ विणा लेके नामा राउळमें गया । पूजा करते बम्हण उन्ने बाहर ढकाया । हीन दीन ॥ १ ॥ देवलके पीछे नामा अल्लक फुकारे । जिधर जिधर नामा उधर देवलही फिरे । हीन दीन ॥२॥ नाना वर्ण गवा उनका एक वर्ण दूध । तुम कहांके ब्राह्मण हम कहांके सूद । हीन दीन ॥ ३ ॥ मन मेरी सुई तन मेरा धागा । खेचरजीके चरणपर नामा शिंपी लागा ॥ हीन दीन ॥ ४ ॥

( नामदेव गाथा अ० २०२८ )

म्हणोनि स्मार्ती वा भागवतीं कांहीं । पक्षपातता बोलिली नाहीं । हें दोन्ही संप्रदाय लवलाही । वैदिकची ॥ ६५ ॥ यालागीं सकामें कर्मसापेक्ष भक्ति । वर्णानुसारचि करावी प्रीतीं । वादी म्हणे केवळ हरिभक्त दरिद्री होती । तरी कासया भागवती मिळावे ॥ ६६ ॥ सिद्धान्ती म्हणे भागवता । निष्कामा काय श्रीमंतता । निष्ठावंत सकामही प्रिय भगवंता । परी पळ पळ चंचला कर्मप्रवृत्ति ॥ ६७ ॥ दरिद्रिया निंदिसी व्यर्थ । जरी दरिद्री नसते जगांत । तरी पापीच राहते धनवंत । पुण्यपंथ न मिळता त्या ॥ ६८ ॥ याचक नसतां दान । दाता करील कोणाकारण । श्रीमंता जें पद वाजपेयादि करून । तें पद दरिद्रिया तीर्थस्नानमात्रें ॥६९॥

सकलभुवनमध्ये निर्धनास्तेऽपि धन्या ।
निवसति हृदि येषां श्रीहरेर्भक्तिरेका ।
हरिरपि निजलोकं सर्वथाऽतो विहाय ।
प्रविशति हृदि तेषां भक्तिसूत्रोपनद्धः ॥ ७३ ॥

( भागवतमहात्म्य अध्या० ३ )

अर्थ स्पष्ट– ऐसें आहे पुराण प्रमाण । तयाचा भावार्थ कीं जो निर्धन । परि असलिया भक्तिमान । हरिप्राप्ति त्या ॥ ७० ॥ सोडोनि वैकुंठ कैलास । देव तद्हृदयीं करी निवास । भक्तिरज्जूनें नारायणास । आणीक कांहीं नावडे ॥ ७१ ॥ निष्ठावंत सकाम सुदामा । तया दिधले कनकधामा । निष्ठावंत विभीषण रामा । नमिता हेमात्मक दिधली लंका

॥ ७२ ॥ ऐसा सांडोनि भगवंत । [? ] क भजावा कोण येथ । सर्वदा शरण अनंत । कृपानिधी एकला ॥ ७ ॥

भक्तद्रोहे भक्त्यभावे भक्तश्चातिक्रमे कृते ।
अशक्ये वा सुशक्ये वा सर्वथा शरणं हरिः ॥

( हरिहरराय शिक्षापत्र. )

अर्थ स्पष्ट- हें वल्लभमतीयाचें वचन । कां म्हणावें अप्रमाण । वादी म्हणे स्मृतिविरुद्ध म्हणून । अप्रमाण म्हणूं आम्ही ॥ ७४ ॥

श्रुतिस्मृती ममैवाज्ञे ते उल्लंघ्य प्रवर्तते ।
आज्ञाभंगी ममद्रोही मद्भक्तोऽपि न वैष्णवः ।

सिद्धान्ती म्हणे यथार्थ । कर्मत्याग करूं नये व्यर्थ । परी देवासाठीं कर्म त्यक्त । दोष नाहे सर्वथा ॥ ७५ ॥ वादी म्हणे स्मृतींत निषेधिला भक्त । सिद्धान्ती म्हणे दुसरे शास्त्र विरुद्ध वदत । त्याचा विचार तुझें चित्त । कां न करी ते सांग ॥ ७६ ॥

गुरुर्न स स्यात् स्वजनो न स स्यात् पिता न स स्यात् जननी न सा स्यात् ।
दैवं न तत्स्यान्नपतिश्च स स्यात् न मोचयेद्यः समुपेतमृत्युम् ॥ १ ॥

( भाग० स्कं० अ० ९ )

श्रीधरी टीका-- समुपेतः संप्राप्तो मृत्युः संसारो येन तम् । ततो भक्तिमार्गोपदेशेन यो न मोचयेत् स गुर्वादिर्न भवतीत्यर्थः । यद्वा यस्तं मोचयितुं न शक्नुयात् स तस्य गुर्वादिर्न स्यादिति निषेधः । ततश्च पिता न स्यादिति पुत्रोत्पत्तौ यत्नो न कार्य इत्यर्थः । दैवं देवता न स्यादिति पूजा न ग्राह्येत्यर्थः । एवमन्यदपि द्रष्टव्यम् ।

टीकेचा भावार्थ-- कर्मज्ञानाचें व्यावर्तन । करोनि म्हणती 'भक्तिमार्गोपदेशेन' । जो संसारातूनि न करी उद्धरण । तो गुरु आदि कोणीही त्यागावा ॥ ७७ ॥ अथवा भव तारावया नाहीं शक्ति । तरी बापें न कीजे पुत्रोत्पत्ति । पुरुषानें करूं नयेत युवती । युवतीनें पतीही त्यागावा ॥ ७८ ॥ रामासी वियोग करिता । भरतें त्यजिली माता । देवही त्यागावा तत्वतां । जो भवातों न तारी ॥७९॥ देवासही वाटावी लाज । पूजा घेवूं नये सहज । किंचित नाहीं हें गुज । बोलिलों आजी ॥ ८० ॥ रासाईची उपा-

(किंवा) आज्ञाच्छेदी ममद्रोही स याति नरके सदा ।

सना। सोडोनि वैष्णव झाला पित्रांराणा। म्हणोनि त्यागावया तामसोपासना। दोष नाहींच सर्वथा॥८१॥ "मातृदेवो भव पितृदेवो भव। आचार्यदेवो भव अतिथिदेवो भव"। ऐशा तैत्तिरीय शिक्षाश्रुति स्वयमेव। आणि भागवतवचन तद्विरुद्ध हें॥ ८२॥ प्रल्हादादिकांचा आचार। नाहीं निषेधिला पूर्वापर। प्रत्युत शार्ङ्गधर आणि आचार्य शंकर। मानिती गीतेंत आणि गीताभाष्यांत॥ ८३॥

"प्रल्हादश्चास्मि दैत्यानाम्" हें भगवद्गीतेंतील १० व्या अध्यायांतील ३० व्या श्लोकाचें पहिलें चरण आहे; आणि "प्रल्हादो नाम चास्मि दैत्यानां दितिवंशानां" हें त्यावरील श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे.

दोन्हीही शास्त्र प्रमाण। कोणीच नाहीं। अप्रमाण तेव्हां याची व्यवस्था पूर्ण। ऐक तुजप्रति सांगतो॥८४॥ कर्मत्याग न करावा व्यर्थ। नाममात्र होवोनि भक्त। किंवा हा श्लोक कलिव्यतिरिक्त। कलींत प्रशस्त भक्तीचि॥ ८५॥

कलिना सदृशः कोऽपि युगो नास्ति वरानने। तस्मिन् त्वां स्थापयिष्यामि गेहे गेहे जने जने॥१४॥ अन्यधर्मांस्तिरस्कृत्य पुरस्कृत्य महोत्सवान्। तदा नाहं हरेर्दासो लोके त्वां न प्रवर्त्तये॥ १५॥ त्वदन्विताश्च ये जीवा भविष्यन्ति कलाविह। पापिनोऽपि गमिष्यन्ति निर्भयाः कृष्णमंदिरम्॥ ६१॥ येषां चित्ते वसेद्भक्तिः सर्वदा प्रेमरूपिणी। न ते पश्यन्ति कीनाशं स्वप्नेऽप्यमलमूर्तयः॥ १७॥ न प्रेतो न पिशाचो वा राक्षसो वा सुरोऽपि वा। भक्तियुक्तमनस्कानां स्पर्शनेन प्रभुर्भवेत्॥ १८॥ न तपोभिर्न वेदैश्च न ज्ञानेनापि कर्मणा। हरिर्हि साध्यते भक्त्या प्रमाणं तत्र गोपिकाः॥१९॥

(भाग० माहात्म्य अ० २)

अभंग—बोलती भक्तीस सद्गुरु नारद। नको करूं खेद चित्तीं कांहीं॥ १॥ कलीच्या सारिखा युग नाहीं कोणी। सोपी चक्रपाणी भेटी जेथ॥ २॥ इतर युगांत केल्यावीण कष्ट। नातुडे वरिष्ठ गोविंद हा॥ ३॥ या युगीं केवळ नाममात्रें भेटे। तुला येथें नेटे स्थापिन मी॥ ४॥ जनिंवनिं आणि मंदिरी मंदिरी। करवीन भारी तवोत्सव॥ ५॥ अन्य कर्मालागी देईन देसोटा। दाविन वैकुंठा सोपी वाट॥ ६॥

पापीही होतील भक्तिबळें मुक्त । [...]व्रतीं समस्त यज्ञादिक ॥ ७ ॥ पतीस त्यजोनी भक्ती गोपनारी । [...]ल्या द्वापारी ब्रह्मसूख ॥ ८ ॥ कलियुग तंव त्याहुनी सुलभ । भक्तिसम लाभ नान्य येथें ॥ ९ ॥ जरी तुझी न मी करीन प्रवृत्ति । हरिदास्यवृत्ति धिक् धिक् माझी ॥ १० ॥ ज्ञानेश्वरस्वामीवचन अन्यथा । कल्पकल्प जातां तरी नोहे ॥ ११ ॥

वादी ह्मणे वैष्णव मत । आचार्यांनें निरासिले बहुत । तेव्हांचि कर्मसमुच्चित । नाम ऐसे स्थापिलें ॥ ८६ ॥ सिद्धान्ती ह्मणे वेळोवेळे । वाचाया काय फुटले डोळे । विष्णुसहस्रनामभाष्यांत सगळे । नाममाहात्म्य आचार्य वदले ॥ ८७ ॥

अवशेनापि यन्नाम्नि कीर्तिते सर्व पातकैः । पुमान्विमुच्यते सद्यः सिंहत्रस्तैर्मृगैरिव ॥ १ ॥ ज्ञानतोऽज्ञानतो वाऽपि वासुदेवस्य कीर्तनात् । तत्सर्वं विलयं याति तोयस्थं लवणं यथा ॥ २ ॥ कलिकल्मषमत्युग्रं नरकार्तिप्रदं नृणाम् । प्रयाति विलयं सद्यः सकृद्यत्रानुसंस्मृते ॥ ३ ॥ सकृत्स्मृतोऽपि गोविंदो नृणां जन्म शतैः कृतम् । पापराशिं दहत्याशु तूलराशिमिवानलः ॥ ४ ॥ सेयं वदनवल्मीकवासिनी रसनोरगी । या न गोविंद गोविंद गोविंदेति प्रभाषते ॥ ५ ॥ पापवल्ली मुखे तस्य जिव्हारूपेण तिष्ठति । या न वक्ति दिवारात्रौ गुणान् गोविंदसंभवान् । ॥ ६ ॥ सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरद्वयम् । बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनंप्रति ॥७॥ एकोऽपि कृष्णे सुकृतः प्रमाणो दशाश्वमेधावभृथेन तुल्यः । दशाश्वमेधी पुनरेति जन्म कृष्णप्रणामी न पुनर्भवाय ॥ ८ ॥ इत्यादिवचनैः श्रद्धाभक्त्योरभावेऽपि नामसंकीर्तनं समस्तं दुरितं नाशयतीत्युक्तम् । किमुत श्रद्धादिपूर्वकं सहस्रनामसंकीर्तनं नाशयतीति ।

भावार्थ— इत्यादि वचनीं श्रद्धाभक्तिरहित । बोलिले कीं नामें तरती पतित । आन सकळ स्पष्ट भाष्यार्थ । संस्कृतवेत्ते जाणती ॥८८॥ भाष्यामाजीं उद्धृत वचनें । त्याचेंही तात्पर्य एवढेंचि घेणें । वचनांचा अर्थ पंडितीं करणें । मी न जाणे संस्कृत ॥ ८९ ॥ आचार्यचि पुन्हा ह्मणती । उदाहरण घेउनी श्रुती । नामस्मरणेंचि ज्ञानप्राप्ती । आनुषंगीक।९०।

तथाच ऋग्वेदे—"आस्य जानंतो नाम चिद्विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे" इत्यादि वाक्यैर्विष्णोः नामसंकीर्तनेन सम्यक्ज्ञानप्राप्तिर्विहिता ।

श्रुतीचा अर्थ द्विज जाणती । केंवी कळेल मज शूद्राप्रति । परी भावार्थ ऐसा कळला चित्तीं कीं नामस्मरणें ज्ञानप्राप्ति श्रुति सांगे ॥ ९१ ॥ येणेंही भागवतधर्म वैदिक । बोलावें लागते ह्मणोनि आणिक। रहस्य सांगतो एक । नामस्मरणाचें ॥ ९२ ॥ मंत्रजपीं मंत्रार्थ चिंतिता। मग मातृकास्मरण त्यागोनि तत्वतां । विश्वरूपद्वारा चैतन्याभिव्यक्तता । बोलिली भारतभावदीपीं ॥ ९३ ॥

वाचिकं वाङ्निर्वर्त्यं मंत्रार्थचिंतनपूर्वकं जपं । तत्रापि मातृकास्मरणमतीत्य मंत्रार्थमात्रं ध्यायतस्तदाकारायां चित्तवृत्तौ पुनः पूर्ववद्वैश्वरूप्याधिगमद्वारा चिन्मात्रेणावस्थानम् ।

( भा० शा० प०.अ० ३४८ श्लो० १८ )

एवं मंत्रजपाची स्थिती । परी नामस्मरणाची विचित्र गती । मंत्रीं वाच्य बहु मातृका असती । नाम भगवद्वाचकचि ॥९४॥ शब्द अवघे कारणब्रह्मवाचक । परि कार्यविवक्षे झाले मातृकावाचक । नामचि राहिलें कारणब्रह्मवाचक । ह्मणोनि तेथ मातृकाविस्मरणादि विधि नाहीं ॥९५॥ ह्मणोनि अभिव्यक्त चेतन । नामेंचि होय संपूर्ण । आणि भक्तीही लाभे सगुण । ह्मणोनि श्रेष्ठ मंत्राहून तात वदती ॥ ९६ ॥

अष्टांग योगें शरीर दंडू पाहे तंव एवढें कैचें कष्ट साधन । लय लक्ष लावुनि गुरुमंत्र जपों ह्मणो तरि स्थिर नव्हे अंतःकरण । तल्लिन होउन हरिकथा आयिको ह्मणो तरि ठायींचेंचि बधिर श्रवण । उद्दंड वाचे हरि हरि ह्मणतां फुकासाठिं चुके पतन रे रे ॥ १ ॥

( ज्ञानदेव गाथा अ० २१० )

लय ह्मणजे मातृकाविस्मृति । लक्ष ह्मणजे मंत्रार्थसंपत्ति । त्याहोनि सौलभ्य नामाप्रति । हा तातोक्त्यभिप्राय ॥ ९७ ॥

"मनसा वा अग्रे संकल्पयत्यथ वाचा व्याहरति । यद्धि मनसा ध्यायति तद्वाचा वदति " । इति श्रुतिभ्यां स्मरणं ध्यानं च नामसंकीर्तनेऽन्तर्भूतम् " । ( विष्णुसहस्रनामभाष्य )

भावार्थः— मन आधीं पुढें संकल्पीं । तैसीच वाणी जल्पी । इत्यादि श्रुतीवरोनि संकल्पी । नामसंकीर्तनें स्मरणध्यान ॥ ९८ ॥ हें विष्णुसहस्रनामभाष्यवचन । स्वयें आचार्य बोलिलें आपण । बालागीं

तुवां केला प्रश्न । तो अनुपपन्न सर्व[illegible] ९९ ॥ आतां श्रीमच्छंकराचार्यांचा । शैवावैष्णवासी वाद सा[illegible] परि तेथ त्याग करविला चिन्हांचा । नाहीं नामादिकांचा करविला त्याग ॥ १०० ॥

*ततो ब्रह्मावतारस्य शिवस्योपासनं श्रुतौ ।
प्रोक्तं तस्य निरासो नो कर्तुं केनापि शक्यते ॥७०॥
भूतिरुद्राक्षयोश्चापि कर्तव्यं धारणं नरैः ।
किन्तु लिंगादिचिन्हानां धारणे मानशून्यता ॥७१॥

आचार्य म्हणती शैवाप्रत । तुम्ही ब्रह्मरूप शिवोपासित म्हटली वेदसंमत । ते मज मान्य आहे आणि रुद्राक्षभस्मही यथार्थ । धारण कीजे ॥ १०१ ॥ परी तप्तलिंगचक्रादिक । कराया प्रमाण नाहीं देख । म्हणोनि ते त्यागावें सकळिक । एवं जाहला शैववाद ॥ १०२ ॥ आतां वैष्णवासी वाद झाला । तोही पाहिजे श्रवण केला । तेथेंही सोडविलें चिन्हाला । नाहीं भक्तिला निंदिलें ॥ १०३ ॥

*भक्ता भागवताश्चैव वैष्णवाः पांचरात्रिणः ।
वैखानसाः कर्महीनाः षड्विधा वैष्णवा मताः ॥९३॥

भक्त वैष्णवांत भेद स्पष्ट । ज्ञानी आणि कर्मठ । ब्रह्मगुप्तादि कर्मठ । ज्ञानी विष्णुशर्मा ज्ञाणवी ॥ १०४ ॥ तो विष्णुशर्मा भेटतां येऊन । तया आचार्य पुसती ज्ञानलक्षण । तो म्हणाला भगवानेक शरण । ज्याच्या आज्ञेवीण तृणही हालेना ॥ १०५ ॥ ऐसें समजोनि मौनेंचि रहावें । आणिक कांहीं न करावें । आचार्य म्हणाले स्वभावे । नित्यकर्मे करा तुम्ही ॥ १०६ ॥ मग तिहीं करोनि प्रायश्चित्त । आचार्यां विनविती समस्त । आम्ही ब्राह्मण झालों यथार्थ । परी परमार्थ घडेल ते सांगा ॥ १०७ ॥

*ब्राह्मणाचार देवाः स्युरीशो विष्णुर्दिनेश्वरः ।
उमा गणपतिश्चैव तेषां पूजापरा नराः ॥१२॥
ब्रह्मार्पणधिया कामांस्त्यक्त्वा कर्म चरंति वै ।

---

* या खुणेचे सर्व श्लोक विद्यारण्यकृत शांकरविजयांवरील धनपतिसूरिकृत टीकेतून घेतले आहेत सर्ग १५ पहा.

एवं कृते नित्यकर्मण्यपले-मनसि प्रभोः ॥ १३ ॥

या श्लोकांचा भावार्थ । नित्यकर्मे ब्राह्मण्य प्राप्त । उपासना ब्रह्मार्पण बुद्धी करीत । तरीच परमार्थ आतुडे ॥ १०८ ॥ शिव शक्ति गणपती । नारायण आणि गभस्ती । नित्यकर्म करोनि प्रीती । उपासावें ह्मणती आचार्य ॥ १०९ ॥ तेणें जीव ईश्वराचा अभेद । सहजचि कळे शुद्ध । एवं कर्म करविलें प्रसिद्ध । परि भगवच्छरणत्व ज्ञान नाहीं निंदिलें ॥ ११० ॥ अभिप्राय कीं यानें ईश जाणोनि मौन ज्ञान बोलिलें । परि वाद करावया कासया आले । पथाधिरहित नाहीं जाहले । आणि ज्ञानी ह्मटलें देहातें ॥१११॥ नित्यकर्म सोडिलें । आणि जेवणें नाहीं तोडिलें । ह्मणवोनि नित्यकर्म करविलें । आचार्यांनीं ॥ ११२ ॥ जरी विष्णुशर्म्यांचें ज्ञान । निरासिलें असते आचार्यांन । तरी ईशावास्य प्रथममंत्रभाष्य संपूर्ण । ऐसेंचि वदतें आचार्य ॥ ११३ ॥ एक विष्णु सांडून । पूजविलें पंचायतन । त्याचें कारण अधिकार पाहोन । द्वेषनिवारणार्थ मज वाटे ॥ ११४ ॥ जितुकया जितुक्यासी वाद झाला । पंचदेवपूजा नाहीं कथिली तितुक्याला । ब्रम्हाद्वैतवाद मात्र कथिला । सर्वत्र सत्य ह्मणोनी ॥ ११५ ॥ हें कळेल सटिक शांकरदिग्विजय वाचितां । असो ऐसे जिंकिलें ज्ञानी भक्ता । तंव कर्मठ भक्त अवचिता । कर्मगुप्त पातला तेथ ॥ ११६ ॥

*एवं तेषु निरस्तेषु ब्रह्मगुप्तादयस्ततः । समागत्य प्रणम्योचुः स्वामिन् स्मार्तेन वर्त्मना ॥११८॥ कुर्वन्तो वयमाचार्य कर्म ब्रह्मार्पणं निग । कृत्वा वयं वसामोऽत्रेत्युक्तः स प्राह तान्गुरुः ॥ ११९ ॥ इतःपरं पंचपूजातत्पराः शुद्धमानसाः । भेदवासनया मुक्ता भवंतः स्वात्मबोधतः ॥ १२० ॥ लिंगदेहेन निर्मुक्ताः सच्चिदानंदमद्वयम् । प्राप्स्यथेति संप्रोक्ता नत्वा तं स्वस्थमानसाः ॥ १२१ ॥

अर्थ स्पष्ट—यांचा मार्ग आचार्यांनीं । नाहीं खंडिला कोणत्या वचनीं । पंचायतनपूजनीं । निवेशिलें ॥ ११७ ॥ त्याचेंही कारण द्वेष-त्याग । किंवा ते कृतयुगींचे जन्मले असतील चांग । अन्ययुगीं पंचायतनपूजाप्रसंग । होता त्या संस्कारें कथिला की ॥ ११८ ॥ एवं कर्मठ

वैष्णव जिंकिला । तंव पुढें भागवत [illegible]। आचार्य काय बोलिले तयाला । तेहि ऐका ॥ ११९ ॥

*बभूवुरथ तं प्राह समागत्य परं गुरुम् । कश्चिद्भागवतो विप्रः स्वामिन् श्रुणु मतं मम ॥ १२२ ॥ सर्वे वेदेषु यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलम् । तत्फलं नर आप्नोति स्तुत्वा देवं जनार्दनम् ॥ १२३ ॥ इत्यादि वचनाद्विष्णोः कीर्तनेऽहर्निशं रतः । शंखचक्रादिसंचिन्हैश्चिन्हितस्तुलसीगलः ॥ १२४ ॥ ऊर्ध्वपुंड्री वसाम्यत्र मुक्तिर्मम करे स्थिता । इत्युक्त आह मा चक्राद्यंकनस्य विनिंदनात् ॥ १२५ ॥ किंच मूर्तिर्भगवतश्चतुर्धा वर्तते श्रुणु । परैकाऽऽकाशरूपा स्याद्वचसामप्यगोचरा ॥ १२६ ॥ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह ' इत्यादिश्रुतिवाक्येभ्यो द्वितीया व्यूहसंज्ञिका ॥ १२७ ॥ सर्वलोकात्मिका तस्य विष्णोश्चिन्हस्य धारणम् । समर्थश्चेत्कुरुष्वाऽऽशु तप्तेनैकेन वा दृढम् ॥१२[illegible]॥ शीर्षादिपादपर्यंतं देहमंकय नाशतः । तस्य सेत्स्यति ते वैष्णवत्वं यद्दुर्लभं नृणाम् ॥ १२९ ॥ विभूतिमूर्तयस्तस्य मत्स्याद्याः परिकीर्तिताः । तप्तलोहमयीभिर्वै ताभिरंकय देहकम् ॥ १३० ॥ किमर्थं जडशंखादेः कर्तव्यं चिन्हधारणम् । विष्णुवह्लौहचक्रादेर्धारणं करु वा सदा ॥ १३१ ॥ अर्चा मूर्तेः शिलामय्याः स्वरूपेणाथवांकय । शरीरं मूढ तस्मात्त्वं कर्तव्यं चिन्हधारणम् ॥ १३२ ॥ विष्णोरिति विहायाऽऽशु पाखंडमतिमाश्रय । स्वकर्माणि फलं तेषां समर्पय परेश्वरे ॥ १३३ ॥ तेन शुद्धस्ततोऽद्वैतवादिनं गुरुमाश्रय । तस्योपदेशतो नष्टकर्मबंधो विमोक्ष्यसि ॥ १३४ ॥ नान्यःपंथा विद्यते मुक्तये हीत्युक्तं श्रुत्या तेन बोधेऽतियत्नः । कार्यो मोक्षाकांक्षिभिः शुद्धचित्तैरित्युक्तोऽसौ विप्रदेवो यतीशम् ॥ १३५ ॥ सम्यङ् नत्वा प्राह पुण्यैरनेकैः स त्वत्पादांभोजयोर्दर्शनं मे । जातं तस्मान्मां कृतार्थं कुरुष्वेत्येवं तेन प्रार्थितोऽसौ बभाषे ॥ १३६ ॥ भो विप्रदेवाऽऽशु विहाय चिन्हं कर्माणि कुर्वन्खलु कामहीनः । ब्रह्माहस्मीति विभाय त्वं मुक्तो भविष्यस्यवबोधतोऽद्धा ॥१३७॥

भागवत बोलिला विष्णुकीर्तन । आम्ही करितों रात्रंदिन । आणि शंखचक्रादि चिन्ह । धरिलें दृढ ॥ १२० ॥ तेव्हां आचार्यांनीं चिन्ह त्यागविलें । नाहीं विष्णुसंकीर्तन निषेधिलें । पंचपूजाही नाहीं बोलिले । केवळ कर्म सांगोनि केले अद्वैतोपासनापर ॥ १२१ ॥ इतर अर्थ विद्वान

जाणती । एवं भागवत जिंकिल्या वर्ग । वैष्णव ह्मणोनि एक व्यक्ति । शार्ङ्गपाणि पातला ॥ १२२ ॥

※ पुनरन्यो गुरुं प्राह शार्ङ्गपाणिरिति श्रुतः । नमो नारायणायेति मंत्रमुच्चारयन्पुनः ॥ १३८ ॥ तस्य मुद्रादिकैः शंखचक्राद्यैः सुचिन्हितः । संसारबंधनान्मुक्तो वैकुंठं वैष्णवोत्तमः ॥ १३९ ॥ गमिष्यामि यतस्तत्र तथाभूता वसन्ति तत । चिन्हस्य धारणे मानं पुराणं श्रुणु भो मुने ॥१४०॥ ये बाहुमूलपरिचिन्हितशंखचक्रा ये कंठलग्नतुलसीनलिनाक्षमालाः । ये वा ललाटफलके लसदूर्ध्वपुंड्रास्ते वैष्णवा भुवनमाशु पवित्रयंति ॥१४१॥ इत्युक्त आचार्य उवाच नैवं श्रुतेरभावात्कथनीयमत्र । अतप्तदेहो न समश्नुतेऽयं विमोक्षमेषा श्रुतिरस्ति मानम् ॥१४२॥ नैवं यतः पातकनाशनार्थं महत्तपः कृच्छ्रमुखं स्वकर्म । यद्वाऽथवा ध्यानमधीश्वरस्य प्रोक्तं श्रुतौ चिन्हमतो न कार्यम् ॥ १४३ ॥ ब्रह्मज्ञो यः सोऽश्नुते मोक्षमित्यादेर्वाक्यान्मोक्षस्य हेतुर्विबोधः । क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्तीत्यादेर्वाक्यादन्यतः संसृतिः स्यात् ॥ १४४ ॥ पुराणेषु बृहन्नारदीयादिषु निषेधनम् । दृश्यते तप्तशंखादेर्धारणस्य प्रयत्नतः ॥१४५॥ चिन्हानां धारणेनाहं भविष्यामि हरेः समः । इत्येतत्तु मनोराज्यमात्रं शूद्रो यथा नहि ॥ १४६ ॥ शिखायज्ञोपवीतादिधारणादेव स द्विजः । ब्रह्मात्मबोधतस्तस्मात्तत्प्राप्तिः श्रुतिमानतः ॥ १४७ ॥ तस्मात् ब्रह्माहमित्येवं चिंतनं सर्वदा कुरु । तेन नष्टे भिदागंधे जीव एव परः शिवः ॥१४८॥ शिवः शिवोऽहमस्मीति वादिनं यं च कंचन । आत्मना सह तादात्म्यभागिनं कुरुते भृशम् ॥ १४९ ॥ इत्युक्तं शिवगीतास्वित्युक्तो वैष्णव आह तम् । नमस्कृत्य कृतार्थोऽहं स्वामिंस्त्वदुपदेशतः ॥ १५० ॥ अधुनाऽद्वैतनिष्ठोऽहं भविष्यामीति सोऽब्रवीत् ॥ १५१ ॥ पूर्वार्ध

भावार्थ— ह्या सकलांचा भावार्थ । चिन्हत्यागाचि करविला यथार्थ । परि एक निरीक्षणीय आहे येथ । तेही समस्त ऐकावे ॥ १२३ ॥ मागें शैवासी वाद केला । तेव्हां श्रुतीचा अर्थ योग्य बोलिला । तोचि येथ संपादिला । परी विकल्प बोलिला कर्मोपासनेतें ॥ १२४ ॥ स्वकर्म किंवा भगवद्ध्यान । पापनिवृत्तीचें कारण । श्रुतींत विहित नाहीत चिन्ह । हें बोलिले परि निषेधही आढळेना ॥ १२५ ॥ बाकी बदला पुराण-

वचन । तें नाहीं मानलें आचार्यांनी । आणि बृहन्नारदीय मानलें प्रमाण । शैवचिन्ह उडविना ॥ १२६ ॥ [हे]ं स्पष्ट निषेध असतां । तरी पुराणार्थ प्रमाण न होतां । परि एक पुराण मानुनी एक उच्छेदितां । अभिप्राय सर्वथा मज कांहीं न कळे ॥ १२७ ॥ या टीकेंत बोलिले सर्व हें । अन्यत्र बोलिलें असेल कुठें । तरी असो आम्हीही तुलस्यादि-कावांचोनि रोकडे । तप्तमुद्रादी आग्रह न करूं ॥ १२८ ॥ ब्राह्मणीं तप्तमुद्रा कराव्या धारण । हें स्पष्ट सांगे पद्मपुराण । असो आमुचा आग्रहविहीन । वाद हा असे ॥ १२९ ॥ एवं वैष्णव शिकविला । तंव पांचरात्री पालटला । तो जें बोलिला । तेंहि ऐक ॥ १३० ॥

तथाऽकरोत्ततः पांचरात्रागमसुदीक्षितः । आह मुक्तित्रातिष्ठादि-मूलभूतोऽस्माद्गमः ॥ १५३ ॥ तस्मात्तदाचारो विप्रैः कार्योऽखि-लैरपि । इत्युक्तः श्रीगुरुः प्राह यदि वेदाविरुद्धता ॥ १५४ ॥ अस्यागमे तदा तस्याऽऽचारो ग्राह्यो न चान्यथा । अन्यमंत्राग्रहे तत्र वैष्णवत्वं प्रकी-र्तितम् ॥ १५५ ॥ गायत्र्या उपदेशस्तु ब्राह्मण्यायास्ति सर्वथा । एवं च वैष्णवत्वस्य मंत्र एव समागतः ॥ १५६ ॥ तदभावे न विप्रत्वं विष्णुमं-त्रशतैरपि । वैष्णवत्वं कुतस्तस्याः सत्वे ननु हरेरियम् ॥ १५७ ॥ शक्तिः शंखादिमत्वस्य श्रवणादिति चेत्तदा । रुद्रस्य शक्तिरेवास्तु चंद्रशेख-रतादिकम् ॥ १५८ ॥ श्रूयतेऽस्या यतः पंचमुखत्वादं च देहगम् । अस्तु वा सर्वसंपूज्या शुभदा परमेश्वरी ॥ १५९ ॥ ननु सूर्ये स्थितस्यास्यां प्राधान्यं तेजसो यतः । निरूप्यते ततो विष्णोः शक्तिरेव यतो हरिः ॥ १६० ॥ भानुमंडलवर्तीति वर्ण्यते तत्र तत्र ह । पंचास्तस्याऽपि नो तस्मिन्बहुरूपे विरुध्यते ॥ १६१ ॥ इति चेन्न यतस्तस्याः समुत्पत्तिर्नि-रूपिता । व्याहृतिभ्यः किलाऽऽसां तु प्रणवात्मा महेश्वरात् ॥ १६२ ॥ अस्य प्रोक्ताऽत एतस्य शक्तिर्नान्यस्य कस्यचित् । नारायणश्रुतौ प्रोक्तः स्वरकर्त्ता महेश्वरः ॥ १६३ ॥ यो वेदादौ स्वरः प्रोक्तो वेदान्ते च प्रति-ष्ठितः । तस्य प्रकृतिलीनस्य यः परः स महेश्वरः ॥ १६४ ॥ अष्टमूर्ति-महेशस्य मूर्तिरादित्य ईरित । तस्मात्तस्यैव शक्तिः सा पंचवक्त्रादिसंयुता ॥ १६५ ॥ वैष्णवेन त्वयैवं नो शिवमूर्तिर्विभावसुः । सेव्योऽतो ब्राह्मण-त्वस्य हानिरेव तवाऽऽगता ॥ १६६ ॥ तदभावोऽस्तु का हानिर्वैष्णवोऽ-

स्मीति चेत्तदा । भ्रष्टोऽसिभाषणायां जीवन्नेव मृतोऽसि भोः ॥१६७॥ ततस्तु माधवः कश्चिद्वैष्णवः प्राह तं गुरुं । तप्तं शंखादिकं धार्य लोकं प्राप्नोति वैष्णवम् ॥ १६८ ॥ पांचरात्रागमे प्रोक्तमित्येवं तस्य मानता । त्वदुक्त्या नाशमायातीत्युक्तः प्राह परो गुरुः ॥ १६९ ॥ आगमानुरक्त आचारो ग्राह्यो वेदानुकूलतः । विरोधे तस्य न ग्राह्य उक्तं चेदं स्फुटं किल ॥ १७० ॥ अतींद्रियार्थविज्ञाने प्रमाणं श्रुतिरेव हि । श्रुत्याचारमृतेऽग्राह्यताऽऽगमानां प्रसज्यते ॥ १७१ ॥ अतो वेदविरुद्धं यत्तन्मानं न कदाचन । अतो ब्राह्मणसिद्ध्यर्थं स्वकर्मनिरतो भव ॥ १७२ ॥ तेन सम्यक्विशुद्धः संस्तत्वज्ञानमवाप्स्यसि । मुक्तिस्तस्माच्च चान्यस्मादत्रार्थे त्वं श्रुतिं शृणु ॥ १७३ ॥ सर्वभूतेषु चाऽऽत्मानं सर्वभूतानि चाऽऽत्मनि । संपश्यन्ब्रह्म परमं याति नान्येन हेतुना ॥ १७४ ॥ तस्मात्पाखंडचिन्हानि विहायाद्वैतनिष्ठता । संपाद्यामोक्षसिद्ध्यर्थमित्युक्तः स च माधवः ॥१७५॥ स्वकुलग्रामदेशस्थैः सहाद्वैतपरः सदा । संध्याग्निहोत्रमुख्यानि कुर्वन्कर्माणि शुद्धताम् ॥ १७६ ॥

भावार्थ— त्यानें आगम कथिला मान । आचार्य बोलिले वेदानुकूल प्रमाण । मग नित्यकर्म तया कारण । करवून अद्वैत पैं केले ॥ १३१ ॥ येथ आदित्यादि सांगोनि शिवमूर्ति । वैष्णवभंग दाविला त्याप्रति । आणि सहस्रनामभाष्यांत स्वयेंचि वदती । विष्णुमूर्ती आदित्यादि ॥ १३२ ॥ तेव्हां हा वाद सकळिक । मज वाटे वैतंडिक । व्यर्थ वेदत्यागी पांचरात्रीक । निषेधिलें येथ ॥ १३३ ॥ नाहीं निषेधिला धर्म भागवत । एवं पांचरात्री जिंकिला निश्चित । तंव वैखानस पातला तेथ । तो बोलिला तेहि ऐका ॥ १३४ ॥

*प्राप श्रीशंकराचार्यप्रसादात्तत आगतः । वैखानसमताचारो व्यासदास इति श्रुतः ॥ १७७ ॥ उवाच भो यते ब्रह्माऽपि मत्पक्षनिवारणे । न समर्थो यतो देवः परो नारायणो मम ॥ १७८ ॥ तद्विष्णोः परमं धामेत्यादिवेदेन बोधिता । नारायणपदस्यैव श्रेष्ठता मुनिसत्तम ॥ १७९ ॥ तथा नारायणाद्ब्रह्मा जायते रुद्र एव च । इत्यादि श्रुतिभिस्तस्य कारणत्वमुदीरितम् ॥ १८० ॥ तस्मात्सेव्यः सदैवायमंतर्यामी परेश्वरः । लक्षणं तस्य भक्तस्य प्रोक्तं वैखानसे मते ॥ १८१ ॥ शंख-

चक्रपवित्रांग ऊर्ध्वपुंड्र इति प्रभो । इत्युक्तः प्राह विष्णुस्तु पालको वाऽथ ब्रह्म वा ॥ १८२ ॥ अस्तु तत्र विवादः कः परं त्वावृत्तिवर्जितम् । लभ्यते तत्वबोधेन नैव त्वन्येन हेतुना ॥ १८३ ॥ यदि त्वं विष्णुभक्तोऽसि तदा तत्प्रीतये कुरु । कर्म नैव तु तप्तानां चक्रादीनां विधारणम् ॥ १८४ ॥ प्रमाणाभावतो वेदविरुद्धे नैव मानता । आगमे विप्रतानाशो नोचेत्स्यादेव सर्वथा ॥ १८५ ॥ इत्युक्त आह तं व्यासदासः पूर्वयुगे मुने । दत्तात्रेयः परो योगी पंचमुद्राविमुद्रितः ॥ १८६ ॥ आसीत्तस्मान्महद्भिः स्वीकृतो मार्गो मुमुक्षुभिः । ग्राह्यः किंच पुराणेषु चक्रादेर्धारणं श्रुतम् ॥ १८७ ॥ अन्यथा वैष्णवत्वस्य हानिरेव समापतेत् । तस्माद्भगवतश्चिन्हं धार्यमित्युदितो गुरुः ॥ १८८ ॥ उवाच भो विवेकस्ते किमु वाक्योऽस्ति बालकाः । अपि जानन्ति मुद्राभिरंकने न प्रयोजनम् ॥१८९॥ दत्तात्रेयस्य नैवास्ति योगिनस्तत्वदर्शिनः । मुद्रयांकितदेहो दत्तात्रेयोऽस्तीति केनाचित् ॥ १९० ॥ श्रुतं नैव ततो मूढ बुद्धिं त्यक्त्वा सुखी भव । पुराणेषु श्रुतं चिन्हधारणं त्विति नोचितम् ॥ १९१ ॥ प्रऱ्हादस्य बिभीषणस्य गजराजस्य ध्रुवस्याऽऽनिलेर्द्रौपद्या व्रजवासिनां च खलु कश्चक्रांकनं रेऽकरोत् । तस्मान्मूढ मतिं विहाय सकलं पाखंडचिन्हं त्यज ब्रह्मास्मीति विभावनेन सुसुखं गच्छाऽऽशु मोक्षं पदम् ॥ १९२ ॥ अवश्यं चेत्त्वया कार्यं चिन्हानां धारणं तदा । कपोलयोर्गले चैव शेषेण गरुडेन च ॥१९३॥ अंकनं कुरु कर्मेंद्रियप्रधाने भुजद्वये । कपोलद्वितये चैव ज्ञानेंद्रियसमीपगे ॥ १९४॥ चिन्हिते पशुवद्धर्तुं योग्यो भव विबंधनः । तथा चैवं विधस्यात्र वैष्णवस्य स्वकर्मणा ॥ १९५ ॥ हीनस्य शुभ्रवस्त्राणां धारणं त्ववशिष्यते । न तु कर्माग्निहोत्रादीत्युक्तः संप्राह सद्गुरुम् ॥ १९६ ॥ स्वामींस्तव प्रसादेन सविवेकोऽस्मि नांकितः । किन्तु मे गुरुरेवाऽसीत्तथेति भगवच्छ्रुतम् ॥ १९७ ॥ ततः शुद्धाद्वयस्थं मां कुरु त्वं यतिशेखर । इति विज्ञाप्य तं भूमौ दंडवत्प्रणिपत्य च ॥ १९८ ॥ कृतांजलिं समासीनमीशन्नग्रं विलोक्य सः । करुणानिधिराचार्य प्रहसन्निदमब्रवीत् ॥ १९९ ॥ ब्रह्मैवाहं न संसारी मुक्तोऽहमिति भावय । तस्मिन्विधावशक्तस्त्वं वाक्यमेतदुदीरय ॥ २०० ॥ इत्यभ्यासपरित्यक्तद्वंद्वैषणषडूर्मिकः । विदित्वा परमात्मानं मुक्तो भवसि नान्यथा ॥ २०१॥ इति संबोधितः शिष्यः कृता-

र्थोऽहमितीरयन् । ब्रह्माहमिति संजल्पन्ययौ स्वकुलसंयुतः ॥ २०२ ॥

याचा भावार्थ पंडितानीं [illegible]न घ्यावा. मी कंटाळा आल्यामुळें लिहीत नाहीं. लिहितो ते इतकेंच कीं, येथें चिन्हांचाच विशेषेंकरून त्याग करविला आहे; आणि प्रल्हादादिकांचे उदाहरण देऊन आचार्य ह्मणाले कीं, पुराणांत मुळीं चक्रांकन सांगितलेंच नाहीं; पण ही केवळ वितंडा आहे, कारण पद्मपुराणामध्यें चक्रांकन स्पष्ट आहे, व ते ब्राह्मणांनीं करावें असेंही आहे. तेव्हां त्याला तें पुराण माहित नसल्यामुळें मोठ्यानें अशी वितंडा करणें उचित नाहीं; पण मी शांकरमती असल्यामुळें, व हे श्लोक आचार्यांचे स्वतःचे नसल्यामुळें, दुसऱ्यानें कोणी संग्रहीत केले असल्यामुळें, आचार्य असेंच बोलले असतील असें मला वाटत नाहीं; कारण ते सर्वज्ञ होते. आतां प्रल्हादादिकांनीं चक्रांकन केलें नाहीं हें खरें, पण आमचाही त्याप्रमाणेंच आग्रह आहे असें वादीनें समजूं नये. येथें विशेषेंकरून तप्तमुद्रांचा निषेध केला आहे, ह्मणून शीतल मुद्रा लावतां येणार नाहीं असें नाहीं. जावूं द्या हा वाद.

ओव्या– या वैखानसा कारण । नाहीं सांगितलें पंचदेवपूजन । केवळ सांगितलें ब्रह्माद्वैतध्यान । शक्ति नसेल तरी वाक्योच्चारणाचि बोलिले ॥ १३९ ॥

गद्य— असें आचार्यांनीं सांगितल्यावर तो मी ब्रह्म आहे, मी ब्रह्म आहे असें तोंडानें उच्चारीत आपल्या कुळासुद्धां परत गेला असें श्लोकांत ह्मटलें आहे. तेव्हां तो संन्यासी नव्हता हें निश्चित आहे. त्याला असें "ब्रह्माहम्" हें वाक्य उच्चारावयास सांगितलें असल्यास

सांसारिकक्रियासक्तं ब्रह्मज्ञोस्मीतिवादिनम् ।
कर्मब्रह्मोभयोर्भ्रष्टं तं त्यजेदंत्यजं यथा ॥

या स्मृतीचा विरोध येत नाहीं काय? कोणी स्वकुळ याचा अर्थ स्वशिष्य असा करून त्या वैखानसाला संन्यासी ह्मणतील तर आमचा कांहीं वाद नाहीं, आणि हें श्लोक दुसऱ्यानें संग्रहीत असल्यामुळें आमचा हा आरोप आचार्यावर नाहींच. याप्रमाणें वैखानसाला जिंकलें असतां नामतीर्थ नांवाचा वैष्णवापैकीं कर्महीन वैष्णव प्राप्त झालाः—

*ततं आचार्यमागत्य नामतीर्थो हि वैष्णवः । कर्महीन इदं प्राह

भोः स्वामिन् श्रुणु मे मतम् ॥ २०३ ॥ शेषेनाप्यप्रकंप्यं वै सर्वं विष्णुमयं जगत् । इत्यादेशात्ततो मोक्षं गुरुरेव प्रयच्छति ॥ २०४ ॥ तदानीं भगवंतं स गुरुः प्रार्थयते प्रभो । मच्छिष्यं निजपादारविंदं प्रापय सोऽप्यथ ॥ २०५ ॥ एवमुक्तः करोत्येव तथैव जगदीश्वरः । तस्मान्मम पुनर्जन्महेत्वभावो यतीश्वर ॥ २०६ ॥ जीवन्मुक्तोऽहमेवं वै भवन्तोपि मुमुक्षवः । कर्महीनाः सुरेशं तं विष्णुं सर्वमयं प्रभुम् ॥ २०७ ॥ समालम्ब्याञ्जसा मुक्ता भविष्यंतीति निश्चयः । एवमुक्तो गुरुः प्राह सत्यमुक्तं त्वया मतम् ॥ २०८ ॥ कर्मभ्रष्टो भवान्जीवन्मुक्त एव न संशयः । निन्द्यानिन्द्यविहीनः सन्प्रवृत्तोऽसि पिशाचवत् ॥ २०९ ॥ वेदोक्तसर्वकर्माणि कृत्वा तेषां फलार्पणम् । कर्तव्यं ब्रह्मणीत्येवं ज्ञानमार्गोऽयमीरितः ॥ २१० ॥ फलार्थं कर्मकरणं कर्ममार्गोऽस्ति तद्विधात् । भ्रष्टस्त्वं दंडनीयोऽसि विष्णुभक्तोऽपि नो भवान् । २११ ॥ न चलति निजवर्णधर्मतो यः सममतिरात्मसुहृद्विपक्षपक्षे । न जहति न च हन्ति कंचिदुच्चैः सितमनसं तमवेहि विष्णुभक्तम् ॥ २११ ॥ श्रुतिस्मृती ममैवाज्ञे ते उल्लंध्य प्रवर्तते । आज्ञाभंगी मम द्रोही मद्भक्तोऽपि न वैष्णवः ॥२१३॥ आज्ञाछेदी ममद्रोही स याति नरकं सदा । इत्यादिवचनेभ्योऽतः कर्मत्यागो न शस्यते ॥ २१४ ॥ ब्राह्मणः कर्मकुर्वीतेत्यादिवाक्यान्न कर्मणः । त्यागो देवान्तरत्यागो ब्राह्मणानां न चाग्निताहि ॥ २१५ ॥ अग्निर्देवो द्विजातीनामिति वाक्यात्ततस्तु भोः । ब्रह्मचार्यादिकैः सर्वैः कर्म त्यक्तुं न शक्यते ॥ २१६ ॥ संध्यात्रयातिक्रमदोषशांतिः कृच्छ्रत्रयेणास्ति ततो द्विजत्वम् । तत्त्यागतो नैव न कर्मणेति श्रुतिस्तु संन्यासममुष्य वक्ति ॥२१७॥ इत्युक्तोऽसौ नामतीर्थः प्रणामैः प्रीतं कृत्वा कर्मशीलो बभूव । एवं सर्वे खंडणं स्वस्वपक्षस्य श्रुत्वा ते निष्कृतिं संविधाय ॥ २१८ ॥

ह्याचाही भावार्थ समजण्यासारखा आहे. मी कंटाळल्यामुळें लिहीत नाहीं. येथें सांगावयाचें एवढेंच आहे कीं, हा वैष्णव भलतेंच बोलिला. मी कांहीं न करितां गुरूच देवाला सांगून मला मुक्त करील; असें हा बोलला असतांना आचार्यांनें रागावून त्याला कर्म करावयास लाविलें. यद्यपि मार्जारन्यायानें परमेश्वरावर सर्व भार टाकून राहावें असें सांगितलें आहे, तथापि जेवणखाणवगैरे सर्वांचाच त्याग त्या

वैष्णवानें केला नव्हता; नाहीं तर तो वाद करावयास कशाला आला असता. आतां ह्या श्लोकांत इतर देवतांचाही त्याग करूं नये असें सांगितलें आहे; परंतु हें आचार्यांच्या गीताभाष्यासीच विरुद्ध आहे.

> यान्ति देवव्रता देवान् पितॄन् यान्ति पितृव्रताः ।
> भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ॥२५॥
>
> ( भगवद्गीता अ० ९ )

शांकरभाष्य: — यान्तीति । येऽप्यन्यदेवता भक्तिमत्त्वेनाविधिपूर्वकं यजन्ते तेषामपि यागफलमवश्यं भावि कथं । यांति गच्छंति देवव्रता देवेषु व्रतं नियमो भक्तिश्च येषां ते देवव्रता देवान् यान्ति । पितॄनग्निष्वात्तादीन् यान्ति पितृव्रताः श्राद्धादिक्रियापराः पितृभक्ता । भूतानि विनायकमातृगणचतुर्भगिन्यादीनि यांति भूतेज्या भूतानां पूजका यांति । मद्याजिनो मद्यजनशीला वैष्णवा मामेव यान्ति । समानेऽप्यायासे मामेव न भजन्तेऽज्ञानात्तेन तेऽल्पफलभाजो भवन्तीत्यर्थः ॥ २५ ॥

आनंदगिरीकृतटीका:— यद्यन्यदेवताभक्ता भगवत्तत्वाज्ञानात् कर्मफलाश्रवन्ते तर्हि तेषां देवतायजनमकिंचित्करमित्याशंक्याह येऽपीति । देवतांतरयाजिनामनावृत्तिफलाभावेऽपि तत्तद्देवतायागानुरूपफलप्राप्तिध्रौव्याच्च तदकिंचित्करमित्यर्थः । देवतान्तरयाजिनामावश्यकं तत्फलमाशंकापूर्वकमुदाहरति कथमित्यादिना । नियमो बल्युपहारप्रदक्षिणप्रह्वीभावादित्यर्थः । देवतांतराराधनस्यान्तवत्फलमुक्त्वा भगवदाराधनस्यानन्तफलत्वमाह यान्तीति । भगवदाराधनस्यानन्तफलत्वे देवतान्तराराधनं त्यक्त्वा भगवदाराधनमेव युक्तमायाससाम्यात् फलातिरेकाच्चेत्याशंक्याह समानेऽपीति । अज्ञानाधीनत्वेन देवतान्तराराधनवतां फलतो न्यूनतां दर्शयति तेनेति ॥ २५॥

ह्या भाष्यांत आचार्यांनीं भगवदाराधनच उत्तम सांगितलें आहे, आणि इतर देवतांचें आराधन युक्त नाहीं असें सांगितलें आहे, व असाच आनंदगिरीनेंही अर्थ केला आहे. एवं शाक्त गाणपत्य व सौर यानांही आचार्यांनीं चिन्हांचा त्याग करावयास लाविलें. शाक्तांचा वेदार्थ संमत मानला, परंतु गणपती व सौर ह्यांच्या मूर्तीला ईश्वरत्वें करून एक मानूनही मूर्तित्वें करून जन्य मानलें आहे, व कार्यत्वास्तव त्यांना अनित्य मानलें आहे; व आतांच उद्धृत केलेल्या गीताभाष्यांत विनाय-

काला भूतांत गणलें आहे. शिवविष्णूंचें जन्यत्व या वादांत कोठेंच मानलें नाहीं. यावरून असा एक सिद्धान्त निघतो कीं, पंचायतनपूजा ईश्वरत्वें करून सर्वांस विहित असली तरी शिवविष्णूपूजाच मुख्य आहे, व उमाराधादिकांची शक्त्युपासनाही आह्माला गृहीत आहेच. शाक्त सौर गाणपत्य इत्यादिकांचे वाद आह्मी ग्रंथविस्तारभयास्तव येथें लिहीत नाहीं. ते ज्याला इच्छा असेल त्यानीं दिग्विजयाच्या टीकेंतून समजून घ्यावेत. आह्माला सांगावयाचें इतकेंच कीं, येथील हे शैववैष्णवासी झालेले वाद फारसे तत्वान्वेषणपर नाहींत, व ते तसे नसले किंवा असले तरी त्यांच्याशीं आमचा संबंध नाहीं; कारण ह्या सहाहींपैकीं आह्मी वैष्णव नाहीं. आचार्यांनांच संमत असलेला अर्थ आह्माला संमत असून जीवन्मुक्त्यर्थ हरिहरभक्ति ज्ञानोत्तर आह्मी मानतो. तुलसीमालादिकांचा आह्माला आदर आहे, तसें मुद्रादिकांविषयीं कांहींच बोलत नाहीं, व यज्ञोपवीतादि त्यागही आह्मी करवीत नाहीं; परंतु यथाशक्ति कर्म करावें, हरिकीर्तनांत विघ्न येत असेल तर ते मात्र उपयोगाचें नाहीं; आणि कर्म करण्यासारखी परिस्थिती नसेल तर हरिभक्तीनेंच मनुष्य उद्धरतो एवढेंच आमचें ह्मणणें आहे. आतां मुद्रा वगैरे धारण करणारे मनुष्य पतित आहेत कीं नाहींत याविषयीं आह्मी अगदीं उदास आहोत. श्रीमच्छंकराचार्यांनीही त्यांची पूर्वींचीं मतें स्थापविलीं, अशी कथा आनंदगिरीकृत शंकरविजयांत आहे. विजयकार आचार्यांचे प्रत्यक्ष संबंधी असल्यामुळें विद्यारण्य व सदानंद या विजयकारापेक्षां आह्माला अधिक प्रमाण आहेत. त्यानीं विजयाचे आरंभीं " नमामि शंकराचार्यगुरुपादसरोरुहम् । यस्य प्रसादान्मूढोऽपि सर्वज्ञोऽहं सदास्म्यलम् " । ज्यांच्या प्रसादानें मी मूर्खही सर्वज्ञ झालो त्या शंकराचार्यगुरुपादचरणकमलाला नमस्कार करितों, असें ह्मटलें आहे. हे पुन्हा म्हणतात " अनंतानंदगिरिरहमप्रतिहताज्ञस्य भगवतः शिष्यः स्वगुरोरवतारप्रयोजनं वर्णयामि " मी अनंतानंदगिरी नांवाचा ज्यांची आज्ञा अप्रतिहत आहे, त्या भगवंताचा शिष्य असल्यामुळें स्वतःच्या गुरूचें अवतारचरित्र वर्णन करितो. ज्या ज्या ठिकाणीं श्रीमच्छंकराचार्यांनीं विजय केला, त्या त्या ठिकाणीं हे बरोबर होते. दिग्विजयाला निघतानां कोण कोण शिष्य बरोबर

होते याविषयीं त्यानीं येणेंप्रमाणें ह[illegible] आहे.

+ अथातो ब्रह्मजिज्ञासेत्यादिव्यासंसूत्राणां व्यासमनोवृत्तितात्पर्यप्रकाशकसद्वैतभाष्यं कुर्वन् विश्वजिदिव दिक्षि दिग्वर्त्तमानानामन्तरादिजयप्रारंभमाणःपद्मपादहस्तामलकसमित्पाणिचिद्विलासज्ञानकंदविष्णुगुप्तशुद्धकीर्तिभानुमरीचिकृष्णदर्शनबुद्धिवृद्धिविरिंचिपादशुद्धानंतानंदगिरिप्रमुखैः शिष्यवरैः सेव्यमानः सर्वज्ञः श्रीशंकरभगवत्पादाचार्यश्चिदंबरस्थलात् प्रदक्षिणमार्गेण श्रीमन्मध्यार्जुनं नाम शिवाविर्भूतस्थलविशेषं प्राप "

भावार्थः— ब्रह्मसूत्राचें भाष्य करून चिदंबराहून मध्यार्जुनाला आचार्य आले तेव्हां जे शिष्य सहचारी होते, त्यांत प्रस्तुत ग्रंथकार अनंतानंदगिरी यांचे नांव आले आहे. तेव्हां त्यानीं लिहिलेले आचार्यांचें चरित्र अत्यंत विश्वसनीय मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ह्मणून माधवकृत दिग्विजयाप्रमाणें त्याचेंही निरीक्षण करून तुला यथामती सांगतो. आचार्यांच्या दिग्विजयांत पुष्कळ ठिकाणीं वितंडाच आहे, व तीही वितंडा सर्व यथार्थच आहे असें नाहीं. शैवांनी बोललेल्या वेदार्थाचा आचार्यांनी स्वीकारच केला असून तेथेंही चिन्हच मात्र सोडविलें आहे, तेव्हां त्याविषयीं माझें कांहीं म्हणणें नाहीं. अनेक मतांचे आचार्यांनीं निराकरण केलें आहे, त्याविषयींही माझें कांहीं म्हणणें नाहीं, परंतु वैष्णवमताचें निराकरण करतानां आचार्यांनीं कशी अयथार्थ वितंडा केली आहे हें मी आतां थोडेसे दाखवितो. हें मी जाणून आहे कीं, हें मोठें पाप आहे; परंतु त्याची क्षमा आचार्यांनांच मागण्यावांचून दुसरा उपाय नाहीं. निंदा करणाऱ्या नक्राचा जसा विष्णूनें उद्धार केला, नैवेद्य चोरणाऱ्या ब्राह्मण पुत्राचा ज्याप्रमाणें शिवानें उद्धार केला, त्याप्रमाणें शिवांशभूत श्रीमच्छंकराचार्यच स्वापराध करणाऱ्या माझा उद्धार करोत अशी मी प्रार्थना करतो; कारण परंपरेनें मीही त्यांचाच अनुयायी आहे, ह्मणून त्यानांच नमस्कार करून त्यांचे वैष्णवमतनिराकरणाचे किंचित् निरीक्षण करितो.

कोणी विष्णुशर्मा नांवाचा ज्ञानी भक्तवैष्णव आचार्यांपुढें आला

+ या खुणेचें सर्व गद्य आनंदगिरीकृत शंकरविजयांतील आहे.

असतां, आचार्यांनीं त्याच्या ज्ञानाचें षट्चक्रादि निरूपण विचारून खंडण केलें आहे; परंतु षट्चक्रमार्गे ज्ञानाला आवश्य आहे, असें प्रस्थान त्रय भाष्यांत कोठेंही आचार्यांनीं स्पष्ट ह्मटलें नाहीं. याप्रमाणें भक्तमता-विषयींची वितंडा सांगितली. आतां भागवतमताशीं केलेली विपरीत वितंडा सांगतो. कोणी विप्रदेव नांवाचा भागवत आचार्यांपुढें येऊन आपलें मत सांगितल्यावर आचार्य ह्मणाले, जर तूं तप्तमुद्राधारण करतोस तर नारायणाच्या मत्स्यादिक अवतारांच्या लोखंडाच्या मूर्ति करून तापवून धारण कर. याठिकाणीं मला वाटते तर्कानें आगमाचें खंडण केलें आहे; कारण तप्तमुद्रा धारण करण्याविषयीं पद्मपुराणादि वचनें प्रमाण आहेत, तशी मत्स्यादिमूर्ति तप्त करून धारणकरण्याविषयीं वाक्यें प्रमाण नाहींत. पुनः

+ किंच स्तुतिमात्रेण मुक्तिः करस्थितेति भवद्भिरुक्तं तदत्यंतासंबद्धं ब्रह्मणो वागतीतत्वेन स्तुतेर्वाग्रूपत्वेन मुक्तिः सुतरामयुक्तैव ज्ञानंविना मुक्तिर्नास्त्येव नान्यः पंथा विद्यते अयनायेति निषेधदर्शनात् ।

भावार्थः-- भगवत्स्तुतिमात्रानेंच मुक्ति हातांत आहे असें जे तुह्मी ह्मणाले ते योग्य नाहीं; कारण " ब्रह्म हें वाणीरहित असून दुसरा पंथ त्याला जाणण्याला नाहीं " या श्रुतीवरून ज्ञानानेंच त्याची प्राप्ती होणें शक्य आहे हें ह्मणणें उत्तम आहे; परंतु ज्ञान होण्याला कर्मावांचून स्तुति उपयोगी होते असा आचार्यांचाच अभिप्राय दिसतो. शिवापराधक्षमापनस्तोत्रांत आचार्य ह्मणतातः—

नो शक्यं स्मार्तकर्मप्रतिपदगहनप्रत्यवायाकुलाख्यं ।
श्रौते वार्ता कथं मे द्विजकुलविहिते ब्रह्ममार्गे सुमारे ॥
ज्ञात्वा धर्मो विचारैः श्रवणमननयोः किं निदिध्यासितव्यं ।
क्षंतव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भो श्रीमहादेव शंभो ॥

भावार्थः— क्षणोक्षणीं ज्याच्यामध्यें चुका होतात अशा प्रकारचें स्मार्त कर्म माझ्याकडून होणें शक्य नाहीं, तर मग द्विजकुलाला विहित अशा श्रौतकर्माची गोष्ट कशाला ? मी जाणून बुजून अविचारानें अधर्मच केला आहे. हे शिव ! हे शिव ! हे शिव ! माझे ते अपराध क्षमा करा. याप्रमाणें दोनदा प्रदर्शित करून कर्मावांचून स्तुतिमात्रानें भगवत्-

ष्टीचें विधान आचार्यांनीं केलें आहे. ज्ञानावांचून मुक्ति होत नाहीं हें आचार्यांचे ह्मणणें आह्मासही मान्य आहे; परंतु जीवन्मुक्तींत भक्ती पाहिजे असें षट्पदीस्तोत्रांत आचार्य स्वतः म्हणतातः—

"सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वं ।
सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः" ॥

भावार्थः—जरी भेद नाहींसा झाला तरी प्रभो! आम्ही तुझे आहोत, तूं कांहीं आमचा नाहींस. पाणी जरी एकच तरी तरंग समुद्राचा असतो, समुद्र कांहीं तरंगाचा नसतो. आतां कर्मरहित भक्तिनेंच मुक्ति होते असें आचार्यांचें मत होतें असें म्हणतां येत नाहीं. कारणः—

"मार्गावर्तितपादुका पशुपतेरंगस्य कूर्चायते ।
गंडूषांबुनिषेचनं पुररिपो र्दिव्याभिषेकायते ॥
किंचिद्भक्षितमांसशेषकवलं नव्योपहारायते ।
भक्तिः किंन्न करोत्यहो वनचरो भक्तावतंसायते ॥

असें आचार्यांनीं शिवानंदलहरींत म्हटले आहे.

भावार्थः— एका पुराणांतील कथेचा आश्रय करून श्रीशंकराचार्य देवाची स्तुती करतात. देवा! रस्त्यावर पडलेली पादुका तुझ्यावर चवरी वारण्याकरितां, तोंडांतील गुरळीचें पाणी तुझ्या स्नानाकरितां, व थोडेसे उष्टें मांस तुझ्या नैवेद्याकरितां आणणारा वनचरही तुझ्या भक्तांत श्रेष्ठ गणल्या जातो, तेव्हां भक्ती काय करणार नाहीं. पुनः शिवभुजंगप्रयात-स्तोत्रांत आचार्य म्हणतात—

पशुं वेत्सि चेन्मां त्वमेवाधिरूढः ।
कलंकीति वा मूर्ध्नि धत्से त्वमेव ॥
द्विजिव्हः पुनः सोऽपि ते कंठभूषा ।
त्वदंगीकृताः शर्व सर्वेऽपि धन्याः ॥ १२ ॥

भावार्थ—मानशील पशु मज । तोही तुज आवडे ॥ १ ॥
बैसलासी नंदीवरी । हेम परी सांडोनी ॥ २ ॥
मज ह्मणसी कलंकी । तो मस्तकीं तुझिया ॥ ३ ॥
भोगीत जो गुरुनारी । चंद्र शिरीं वाहसी ॥ ४ ॥
मज म्हणसी चाहाड । तुज रूढ भूषण ॥ ५ ॥

दोन जिभा ज्या तो फणी । कंठीं मणी तुझिया ॥ ६ ॥
जैसा तैसा हो कां कोणी । तुझें ध्यानीं निरत ॥ ७ ॥
तोचि धन्य तोचि धन्य । तोचि मान्य निगमा ॥ ८ ॥
म्हणे ज्ञानेशबाळक । शरण एक ईश्वरू ॥ ९ ॥

ओव्या:— एवं मोक्षोपायें खंडितां स्तुति । आचार्य वचनचि विरोधी होती । म्हणोनि मज वाटे भागवतमती । आचार्यांची व्यर्थ वितंडा ॥ १३६ ॥ किंवा स्तुतिमात्रेंचि मुक्ति । तेथ चुकली असो भागवतांची उक्ति । परि कर्मावांचून न घडे भक्ति । हे आग्रहोक्ति पुनर्वृथा ॥ १३७ ॥

गद्य— अनंतर कोणी शार्ङ्गपाणि नावाच्या वैष्णवानें आपलें मत आचार्यांनां सांगितलें असतां, वेदविरुद्ध पुराण प्रमाण नाहीं असें आचार्यांनीं सांगून त्याच्या तप्तमुद्रेचें खंडण केलें; परंतु श्रीमच्छंकराचार्यांनीं श्रीचक्राचे स्थापन केलें आहे, असें याच दिग्विजयांत ६५ व्या प्रकरणांत अनंतानंदगिरी म्हणतात. तेव्हां वेदविरुद्ध पुराण प्रमाण नाहीं तर वेदविरुद्ध तंत्र प्रमाण कसें? चक्र उपनिषदांत सांगितलें म्हणून जर प्रमाण असेल तर गोपालतापनीयोपनिषदांत कांहीं वैष्णवोपासनाही सांगितल्या आहेत. पुनः आचार्य शार्ङ्गपाणि वैष्णवास म्हणाले केवळ नामस्मरणानें वैकुंठ प्राप्ति होते, ती होत असेल, परंतु ती अनित्य आहे; तथापि कर्मावांचून केवळ नामस्मरणानेंच ज्ञानप्राप्ति होते असें आचार्यांनींच आपल्या विष्णुसहस्रनामभाष्यांत म्हणून ठेविलें आहे. त्याचा विचार मी याच ग्रंथांत नाममाहात्म्यविचार करतानां केला आहे. सगुण परमेश्वरालाही प्राप्त झालेला पुरुष खालीं पडत नाहीं, तर शेवटीं मुक्त होतो, असें चवथ्या अध्यायाच्या चवथ्या पादांतील जगद्व्यापारवर्ज्याधिकरणांत आचार्यांनीं म्हटलें आहे. त्याचा व येथील आचार्योक्तीचा विरोध आहे. याप्रमाणें वैष्णवमताशीं केलेली ही वितंडा विपरीत आहे. आतां पांचरात्राशीं केलेली वितंडा विपरीत आहे हें सांगतो. नंतर कोणी पांचरात्री वैष्णव आचार्यांनां आपलें मत सांगू लागला असतां गायत्रीमंत्रावांचून विष्णुमंत्रजप निरर्थक आहे असें आचार्यांनीं त्याला सांगितलें; परंतु वेदाचा ज्यानां अधिकार नाहीं असे पतितही विष्णुनाम-

स्मरणानें उद्धरतात, असें आचार्यांनीं विष्णुसहस्रनामभाष्यांत पुराणवचनें देऊन सिद्ध केलें आहे. पुनः गं ]त्री शिवाची शक्ति आहे विष्णूची नाहीं, ह्मणून शिव मुख्य आहे विष्णु नाहीं, असें या वैष्णवानां आचार्यांनीं ह्मटलें असून शिवादिकही विष्णूच्या विभूती आहेत, असें विष्णुसहस्रनामभाष्यांत आचार्यांनींच ह्मटलें आहे, तेव्हां हाही परस्परविरोध आहे. याप्रमाणें पांचरात्रमताशीं केलेला वाद विपरीत वितंडारूपच झाला आहे. याप्रमाणें पुष्कळ मताशीं केलेला आचार्यांचा वाद विपरीत वितंडारूपच आहे असें ह्मणण्याला प्रत्यवाय नाहीं; कारण भूतवेताळमताचें खंडण करतानां ब्राह्मणांनीं भूतांचें पूजन करूं नये, हें या दिग्विजयाच्या ५१ व्या प्रकरणांत ह्मटलें आहे; आणि गीतेचें भाष्य करतानां "विनायकचतुर्मातृकाभगिन्यादीनि" असें ह्मणून आचार्यांनीं गणपतीला भूतांच्या पंक्तीला बसविलें आहे; आणि पुनः पंचायतनपूजा सांगतानां गणपतीपूजा करावी, ह्मणून कित्येक लोकांनां आचार्यांचा उपदेश आहे असें आनंदगिरीच या शंकरविजयांत सांगतात.

विप्राणां दैवतं शंभुः क्षत्रियाणां च माधवः ।
वैश्यानां तु भवेद्ब्रह्मा शूद्राणां गणनायकः ॥

हा श्लोक मनूचा म्हणून आनंदगिरीनें आपल्या शंकरविजयांत घेतला आहे. असें असतां आचार्यांनीं पंचायतनपूजन सांगतानां गणपतीपूजन ब्राह्मणानां कां सांगितलें, याचें समाधान आनंदगिरीनें केलें नाहीं, हें आश्चर्य आहे. याप्रमाणें सिद्धमताचें खंडण करतानां आचार्यांनीं देह चिरजीवी करणें व्यर्थ आहे असें सांगितलें आहे; आणि हें ब्रह्मदृष्टीनें सत्यही आहे; परंतु यांत आचार्यांनीं आपल्या गुरूशींच विरोध केला आहे; कारण आचार्यांचे गुरू जे गोविंदपूज्यपाद, ते आपल्या एका रसावरील ग्रंथांत म्हणतातः—

इति धनशरीरभोगान्मत्वाऽनित्यान् सदैव यतनीयम् ।
मुक्तौ सा च ज्ञानात्तच्चाभ्यासात्स च स्थिरे देहे ॥

धन शरीर भोग अनित्य आहेत, असें समजून मुक्तीचा प्रयत्न करावा. मुक्ति ज्ञानानें होत असून ज्ञान अभ्यासानें होते. अभ्यास देह चिरंजीवी झाल्यानेंच होतो असें ह्मटलें आहे. याप्रमाणें पुष्कळ

मताशीं बोलतानां आचार्यांची वितंडा व्यर्थ झाली आहे, ह्मणून त्या सर्व मतांची वितंडा कशी व्यर्थ झाली आहे हें आह्मी दाखवीत बसत नाहीं; केवळ वैष्णवमताशीं वितंडा करतानां ती कशी व्यर्थ झाली हें आह्मी सांगत आहों. याप्रमाणें पांचरात्री वैष्णवासी अयथार्थ वितंडा झाल्यावर कोणी वैखानसमताचा वैष्णव आचार्यांपुढें येऊन आपलें मत सांगूं लागला असतां आचार्य त्याला म्हणाले: बरें असो. पालनकर्ता सर्वव्यापक विष्णु असो किंवा परब्रह्म असो त्याशीं आह्माला काय कर्तव्य आहे ? सर्व देवांचें आयतन परब्रह्मच आहे, अशी बृहदारण्यक श्रुति असल्यामुळें विष्णुपर वेदाचा अर्थ झाला तरी आमची कांहीं हानि नाहीं, असें बोलून प्रणवाचा अर्थ आचार्यांनीं सांगितला तो येणेंप्रमाणें:—

+ स मायायतन एव। उत्पन्नस्य प्रणवस्यार्णाः अकारोकारमकाराः परो बिंदुः तस्मात् मकारः तस्मादुकारः तस्मादकार इति प्रवृत्तिक्रमः। निवृत्तिक्रमस्तु अकार उकारे लीयते। उकारस्तु मकारे मकारो बिंदौ बिंदुरजायां सा परब्रह्मणि इति व्यवस्थितिः। एवंभूतः प्रणवोऽथ रुद्र-विष्णुब्रह्माणः लयस्थितिसृष्टिकर्तारः तेषां मेरुशिखरेषु लोका वर्तंते। ते तु तत्तदुपासकानां प्राप्याः सगुणत्वादनित्यत्वाच्च। यः सोऽहं ब्रह्मास्मी-त्यात्मानमद्वितीयं वेद तस्य पुनः संसारप्राप्तिर्नेति किल सिद्धान्तः।

भावार्थ:— तो परमात्मा मायेचा आश्रय आहे. उत्पन्न झालेल्या ॐकाराची तीन अक्षरें आहेत. अकार, उकार, मकार. याच्या पलीकडे आहे बिंदु. त्या बिंदुपासून मकार, मकारापासून उकार आणि उकारा-पासून अकार. याप्रमाणें उत्पत्तिक्रम समजावा. लयाचा क्रम असा कीं, अकार उकारामध्यें लीन होतो, उकार मकारामध्यें, मकार बिंदुमध्यें, बिंदु प्रकृतिमध्यें, आणि प्रकृति परब्रह्मामध्यें लीन होते. मी संपूर्ण वेद पढलो नसल्यामुळें, व शूद्रप्राय जातित्वास्तव मला वेदाचा अधिकारही नसल्यामुळें, पंडितानां संमत नसलें तरी या आचार्य वाक्याला श्रुति-विरुद्ध ह्मणण्याला मला कोणता प्रत्यवाय आहे ? कारण ॐकाराचे चारच पाद मांडुक्योपनिषदामध्यें सांगितलें आहेत, आणि चवथा पाद अद्वैत परब्रह्मस्वरूप सांगितला आहे; परंतु येथें प्रणवाचे सहा पाद होतात.

पांच पाद कोठें ना कोठें तरी ऐकलें आहेत. वस्तुतःच अल्पश्रुत अशा माझ्या ऐकण्यांत सहा पाद नाहींत. बरें प्रकृतीचा परब्रह्मांत लय होतो ह्मणजे प्रकृती परब्रह्मापासून झाली आहे काय ? तसें मानल्यास

जीवेश्वरौ विशुद्धा चित्तथा जीवेशयोर्भिदा ।
अविद्या तच्चितेर्योगः षडस्माकमनादयः ॥

या अनादि षट् पदार्थरूप सिद्धांताची व्यवस्था कशी ? प्रकृतीची उत्पत्ति व लय जर परब्रह्मापासूनच होत असतील तर मुक्ताला पुनः बंध होण्याचा कोणता प्रत्यवाय आहे ?

वादी उवाच— कोणावरही तुटून पडणें हा तुमचा स्वभावच आहे. प्रणवाचें लयचिंतन जें सांगितलें आहे, तें कांहीं परब्रह्माच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान करून देण्याकरितां नव्हे, तर ध्यानाकरितां सांगितलें आहे. ध्यानामध्यें जशाचा तसाच पदार्थ असावा लागतो हा नियम नाहीं; ह्मणून प्रणवाचें सहा पाद सांगितलें तर काय झालें ?

सिद्धान्ती उवाच—मला आजपर्यंत तूं केवळ नास्तिकच वाटत होतास; परंतु तूं शांकरमती आहेस असें आतां मला वाटूं लागलें. या एकापुढें एक असलेल्या दोन पंक्तींतच परस्पर विरोध आहे. तो असा कीं, उत्पत्तिक्रम सांगतानां बिंदु आणि अकार उकार मकार असें चारच पाद सांगितले, आणि लयक्रम सांगतानां त्याच्यापुढें सहा पाद सांगण्याचें कारण काय ? मांडुक्यश्रुतींत जर चारच पाद सांगितले आहेत, तर मग सहा पादांचा उपयोग काय ? ध्यानाविषयीं जर आग्रह नसेल तर ब्रह्मसूत्राच्या शांकरभाष्यांत वैदिक ध्यानापेक्षां योगियांच्या ध्यानाची निकृष्टता कां सूचित केली आहे ? परंतु असें मी विचारणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घास घेणें आहे, ह्मणून सोडून देतो; पण उत्पत्तिस्थितिलय करणाऱ्या ब्रह्मविष्णुमहेशाचें ब्रह्मलोकवैकुंठकैलास-संज्ञक स्थानें मेरुशिखरावर आहेत, आणि ते अनित्य आहेत, असें आचार्यांचें ह्मणणें आहे, तर "ब्रह्मलोकमभिसंपद्यते न स पुनरावर्तते" या श्रुतीला अनुसरून "अनावृत्तिः शब्दात्" या सूत्राचें भाष्य करितानां आचार्यांनीं ब्रह्मलोकापासून अपुनरावृत्ति कशी प्रतिपादिली आहे ? पुनः शिवानंदलहरींत मी शिवगण होऊन कैलास केव्हां

पाहीन ? ही इच्छा दर्शविली आहे, तो श्लोक येणेंप्रमाणें:—

> कदा वा कैलासे कनककमलसौधे सहगणै
> र्वसन् शंभोरग्रे स्फुटघटितमूर्धांजलिपुटः ॥
> विभो सांब स्वामिन् परमशिव पाहीति निगदन्
> विधातॄणां कल्पान्क्षणमिव विनेष्यामि सुखतः ॥ २४ ॥

याप्रमाणें वैखानसमताशीं वितंडा झाली आहे. आतां कर्महीन-मताचा नामतीर्थ संज्ञक कोणी वैष्णव येऊन आपलें मत सांगूं लागला असतां आचार्य त्याला ह्मणाले, कर्मावांचून विष्णुभक्तींत अधिकार नाहीं याविषयीं—

> न चलति निजवर्णधर्मतो यः । सममतिरात्मसुहृद्विपक्षपक्षे ॥
> न जहति न च हंति केचिदुच्चैः । सततममुं तमवेहि विष्णुभक्तम् ॥

हा विष्णुपुराणांतील श्लोक प्रमाण दिला आहे; परंतु याच्या विरुद्ध अजामिळाची कथा याच विजयांत ३४ व्या प्रकरणांत प्रमाण घेतली आहे. तेव्हां येथेंही विपरीत वितंडाच झाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें पुष्कळ मताशीं वाद करतानां आचार्यांनीं थापाथापी केली आहे असें मला वाटते. या शंकरविजयाचें निरीक्षण करतानां मजकडून भाषा विनयरहित लिहिल्या गेली आहे त्या अपराधांची आचार्यांनाच अनेक नमस्कार करून मी क्षमा मागतो.

वादी उवाच— ज्याला कांहीं येत नाहीं त्याच्याशीं असा वाद करणें उचित नाहीं. तुमच्याकडूनही असें होण्याचा संभव आहे.

सिद्धान्ती उवाच— तसें एकवेळच माझ्याकडून होण्याचा संभव कां ? अनेक वेळ होण्याचा संभव आहे, कारण मी जीव आहे; परंतु आचार्य ईश्वर होते. त्यांनीं अशा प्रकारची वितंडा करणें उचित नाहीं.

वादी उवाचः— अशा तुमच्या ह्मणण्यानें तर आचार्य आप्त ठरणार नाहींत. बरें तसें मानावें तर मध्यार्जुनानें अद्वैतच सत्य आहे असें लिंगांतून निघून प्रत्यक्ष बाहू उभारून आचार्यांना सांगितलें असा इतिहास याच विजयाच्या चवथ्या प्रकरणांत सूचित केला आहे.

सिद्धान्ती उवाच— केवळ चमत्कारानें आप्तत्व येते असा तुझ्या ह्मणण्याचा आशय आहे, तो सम्यक् नाहीं; कारण ज्या ज्या धर्माचा

जेव्हां विजय झाला तेव्हां तेव्हां त्या त्या आचार्यांनीं चमत्काराच्या केलेल्या कांहीं कथा प्रसिद्ध आहेत. जैन धर्मांतही शिवाच्या लिंगांतून जैनमूर्ति काढून शिवकोटी राजाचा समंतभद्रानें पराभव केला अशी कथा आहे. या सर्व कथांचं रहस्य असें आहे कीं, चमत्कार हे समाधींत होत नसून नेहमीं व्युत्थानांत होत असतात. "ते समाधावुपसर्गाः व्युत्थाने सिद्धयः" असें पतंजलीचें योगसूत्र आहे. सिद्धी समाधीमध्यें विघ्न असून व्युत्थानामध्येंच त्यांचा चमत्कार वाटत असतो, असा त्याचा अर्थ आहे. समाधि सर्वांचा एकच प्रकारचा असून व्युत्थानकर्म वासनांच्या योगानें अनंत आहे. त्यामुळें यथासत्वबल न्यूनसत्वाच्या पुरुषानां अनेकाकडून अनेक चमत्कार दिसत असतात; परंतु हें सत्व-बलही शुद्ध नसते. केवळ पोराकरितां हपापलेल्या रांडा थोड्याशा चमत्कारानें झोटिंग भूतादिकांनां अनुसरलेल्या आपण पहातो; आणि कांहीं पढतमूर्ख मनुष्येंही तसें करितात. या चमत्कारिक लोकानां यःकश्चित् बुद्धीनेंही फसवितां येते. चमत्कारी भस्मासुराला आपल्याच माथ्यावर स्वतःचा हात ठेववून विष्णूनें भस्म करविलें, अशी कथा स्कंदपुराणांत आहे. समोरून युद्धामध्यें अजिंक्य असणाऱ्या वालीला पाठीमागून बाण मारून रामानें फसविलें आहे. पुनः कथासरित्सागरांत अशी एक कथा आहे कीं, कोणी कर्पुरिका नांवाची मुलगी विवाह करीत नव्हती. त्याचें कारण असें लिहिलें आहे कीं, ती पूर्वजन्माची हंसिनी असून पुत्र मरण पावला असतां तिच्या पतीनें, सोड पुत्र चल मजबरो-बर, असें म्हटल्यामुळें पुरुष निष्ठुर असतात असा तिचा समज झाला होता; व शेवटीं मला पुढील जन्मीं या जन्माची स्मृति राहो, अशी प्रार्थना करून शंकरासमोर तिनें प्राण दिला होता. त्या पूर्वजन्माच्या स्मृतीनें पुरुष निष्ठुर असतात या समजुतीनें ती विवाह करीत नव्हती. ही गोष्ट तिची मागणी करणाऱ्या नरवाहनदत्तानें ऐकून घेऊन नंतर तिला मिळविण्याकरितां एक युक्ति रचली. ती अशी कीं, नरवाहनदत्त वेड्याप्रमाणें होऊन, हे हंसिनी! हे हंसिनी! असें म्हणूं लागला. हे शब्द कोणत्या तरी रीतीनें कर्पुरिकेच्या कानावर घातले. तेव्हां कर्पुरिकेनें त्याविषयींचा शोध करून नरवाहनदत्ताच्या प्रधानास हा

काय ह्मणतो असें विचारलें. तेव्हां तूं हंसिनी आहेस, व हा कामदेव असून पूर्वी सुखार्थ हा हंसयोनींत येऊन तुझ्याशीं संगत झाला होता. तो प्रेमामुळें आतांही तुझाच निदिध्यास करीत आहे असें प्रधानानें उत्तर दिलें. त्यामुळें आपल्याला पुष्कळ धिःकार करून मी पुरुषावर व्यर्थ निष्ठुरपणाचा आरोप केला असें ह्मणून शेवटीं नरवाहनदत्तास शरण गेली; व नरवाहनदत्तानें तिच्याशीं विवाह केला. याप्रमाणें सामर्थ्यवती अशा तिला नुसत्या चतुराईनेंच फसविलें. देव असुर मानव यामध्यें चमत्कारी लोकांनां आपल्या चतुराईनें फसविल्याच्या पुष्कळ कथा दाखवितां येतील. स्वतः श्रीमच्छंकराचार्यांवर देखील अभिनवगुप्ताचार्यांनें अभिचार केला असतां त्याची बाधा आचार्यांनां होऊन पद्मपादाचार्यांनें तिचें निवारण केलें. तात्पर्य चमत्कार हें आप्तलक्षण व्यभिचारी आहे.

वादी उवाच— मग धर्माला आधारच राहिला नाहीं, कारण युक्तीही अनंत आहेत; आणि चमत्कारीही आप्त होऊं शकत नाहींत, तेव्हां श्रद्धा ठेवावी कोणावर.

सिद्धान्ती उवाच— जीवानें केलेल्या चमत्कारांतच हा दोष असून ईश्वरशक्तीमध्यें हा दोष येत नाहीं. केवळ जीवाच्या कर्मानेंच मुक्ति मानणारे जैनप्रभृतिलोकच अशा रीतीनें फसतात. परमेश्वराच्या वाक्यावर व तदनुसारी वाक्यावर विश्वास ठेवणारे लोक फसत नाहींत. सर्वच धर्मवादी आपल्या आगमाला परमेश्वरप्रणीत म्हणत असल्यामुळें निश्चित कोणता, ही शंका योग्य नाहीं; कारण परमेश्वरावरच निष्ठा ठेवणारा कल्पित उपायानें देखील तरतो. याविषयीं भक्तमालेंत अनेक कथा आहेत.

> सर्वागमानामाचारः प्रथमं परिकल्पितः ।
> आचारप्रभवो धर्मः धर्मस्य प्रभुरच्युतः ।
> योगो ज्ञानं तथा सांख्यं विद्याः शिल्पादि कर्म च ।
> वेदाः शास्त्राणि विज्ञानमेतत्सर्वं जनार्दनात् ॥

असें महाभारतांत म्हटलें आहे. सदाचारी पुरुषानां सर्व धर्माचा अधिकार आहे, असा या श्लोकावरील आचार्यांच्या भाष्याचाही आशय

आहे; म्हणून परमेश्वरनिष्ठेविषयीं आगमव्यभिचारशंका येत नाहीं.

वादी उवाच— मग आर्यांनीं म्लेच्छधर्माचा अंगिकार करावा कीं नाहीं ? व वैदिकांनीं वाममार्गाचा अंगिकार करावा कीं नाहीं ? सर्वच मार्ग जर परमेश्वरनिष्ठ आहेत, तर कोणताही मार्ग कोणीही स्वीकारल्यास प्रत्यवाय नाहीं.

सिद्धान्ती उवाच— हा तुझा प्रश्न अत्यंत मूढपणाचा आहे. एक धर्म सोडून दुसरा धर्म करण्याच्या संबंधात आर्य म्लेंच्छादिकांच्या गोष्टी पाहिजेत कशाला ? केवळ आर्यांना व त्यांतही वैदिकांनां देखील स्वशाखा सोडून परशाखेचें कर्म करण्यास आह्मी सांगत नाहीं. कर्मपरिपाकानें, पूर्ववासनेनें आणि संबंधी लोकांच्या शिक्षणानें ज्याला ज्या मार्गांत तीव्र संवेग होतो, तोच मार्ग त्याला हितावह आहे. " मनःप्रीतिकरः स्वर्गो नरकस्तद्विपर्ययः " असें विष्णुपुराणांत ह्मटलें आहे. ह्मणून मनाच्या तीव्र संवेगानें ज्याला ज्या मार्गांत परमेश्वरसाक्षात्काराचा सोपान मिळतो, त्यानें त्या मार्गाचा परित्याग केला असतां चित्त संशयी होऊन भावनासंवेगरहित परतंत्र असा तो पतित होतो. जीवाचें दैव अनंत असल्यामुळें एका जन्माच्या प्रयत्नानें तें दूर करतां येणें शक्य नाहीं. हे सर्वथा प्रयत्नवाद मानणाऱ्या वसिष्ठाचार्यांनां देखील संमत आहे. परमात्मा सर्वकर्मसाक्षि असल्यामुळें थोड्याशा प्रयत्नानें देखील तो मिळतो. याविषयीं तात ह्मणतात.

आणि जेव्हांचि कां भक्ति । दिधली आपुली चित्तवृत्ति ।
तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं ॥ ९५ ॥

( ज्ञाने० अ० १२ )

समर्थही स्वतः ह्मणतात—

उपेक्षा कदा रामरूपीं असेना । जिवा मानवा निश्चयो तो दिसेना ।
सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥

( मनाचे श्लोक )

प्रभो ! शरण आलियावरि नव्हा कधीं वाकडे ।
ह्मणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवाकडे ।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरे ।

घनांबु न पडे मुखीं उघडल्या ता पाखरे ।

असें मोरोपंताचेंही ह्मणणें आहे.

ओव्या— सांडोनि एका वासुदेवा । आना देवतांची करितां सेवा । तरी क्षणोक्षणीं गोवा । प्रमादांचा ॥ १३८ ॥ कामुकाचिया परिसी । सेवा करावयासी । जगतीं समर्थ विशेषीं । कोणीच नाहीं ॥ १३९ ॥ ह्मणोनि देवता कां अन्य जीव । सेव्य न होती हा स्वभाव । सेवकासी सर्व । प्रमाद घडती सहजची ॥ १४० ॥ स्वामीसी वासना अनंत । सेवकाचे दोन हात । तेथ पुरवावया समर्थ । होईल कवणू ॥ १४१ ॥ तैसा परमेश्वर नोहे । जो सर्वसंपन्न आहे । परि प्रेमाचीच पाहे । वाट एक ॥ १४२ ॥ यास्तव तो सेव्य तो धनी । आन सेवा प्रमादखाणी । मडकियांतील घुसळितां पाणी । कैं समुद्रावांचोनि रत्न मिळे ॥ १४३ ॥

भाष्य— समानेऽप्यायासे मामेव न भजंते अज्ञानात्तेन ते अल्पफलभाजो भवंतीत्यर्थः (भ० गी० अ० ९ श्लो० २५)

ऐसें वदले आचार्य । कीं मी आणि देवतासमुदाय । भजतां आयास समान होय । तरी जन मज न भजती अज्ञानें ॥ १४४ ॥ ह्मणोनि तयाचें सकळ । अंतवंत होय फळ । कीं माता सांडोनि मूर्ख दुर्बळ । मकरीक्षीर इच्छी ॥ १४५ ॥ एवमाचार्यांचाचि भाषण । आणि वैष्णवासी आचार्य बोलिले आपण । कीं सह अग्नि देवतेचें पूजन । ब्राह्मणीं करणें अवश्य ॥ १४६ ॥ याप्रमाणें येथेंही एक थापाथापी झाली आहे. ह्मणोनि परमेश्वरनिष्ठा । सर्वांसचि पाववी प्रतिष्ठा । यालागीं भगवद्भक्तवरिष्ठा । आप्त ह्मणिजे ॥ १४७ ॥ आचार्य भगवद्भक्त । येथ शंका नाहीं किंचित् । ते प्रत्यक्षचि भगवंत । उमानाथ अवतरले ॥ १४८ ॥ तिहीं विपरीत वितंडा केली । ऐसी माझी बोली । शंकरविजयवाक्यें झाली । परि बुद्धिस्थ नोहे ॥ १४९ ॥ याचि शंकरविजयांत । ऐशा कथा विख्यात । कीं खंडिली मतें समस्त । आचार्यांनीं स्थापविली ॥ १५० ॥ तेही घेवोनि प्रमाण । तुज ऐकवूं निरूपण । जेणें संशय परिहरण । होईल तुझा ॥ १५१ ॥ सकळांसी अद्वैत । समानचि नोहे प्राप्त । ह्मणोनि पुनरपि रचावें खंडिले द्वैत । हें आचार्य चित्ता मानवलें

॥ १५२ ॥ मग शैव वैष्णव सौर शाक्त । गाणपत्य आणि कापालिक मत । स्थापविलें दिग्विजयार्थ । पाठवूनि स्वशिष्य ॥ १५३ ॥ आज्ञा दिधली कापालिकासी । शैवादिमत खंडावयासी । तैसेंच परस्पर मत खंडावयासी । आज्ञा दिधली स्वशिष्या ॥ १५४ ॥ परि तया सर्व मताचार्यासी । निश्चयें केले संन्यासी । आणि पुढती धरविलें चिन्हासी । तप्त मुद्रादिक ॥ १५५ ॥ ययाचें हेंचि कारण । कीं निगमागमविरोध अप्रमाण । जे जे मिळतील जन । तयालागून उपदेश करविला शिष्यहस्तें ॥ १५६ ॥ त्यांत स्थापविलें वैष्णवमत । तेचि प्रकरण सांगू येथ । इतर प्रकरणें अतिविस्तृत । नाहीं लिहीत निज ग्रंथीं ॥ १५७ ॥

+ ततः परमगुरुस्त्रैगुण्यान् कलियुगमनुजान् दृष्ट्वा शैवानंतरं वैष्णवमतं च कल्पनीयमिति विचार्य्य तत्सुत्रंधशेषवायुसत्यजातौ लक्ष्मणहस्तामलकौ स्वान्तरंगशिष्यौ युवयोराशयं वदतामिति । तौ परमगुरुचरणारविंदयुगलं सद्भक्त्या उत्तमांगेन नत्वा कृतांजली इदमूचतुः । स्वामिन् ! भवदुपदेशात् अचिंत्यमव्यक्तमनंतरूपं सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म सर्वकारणं तदेवाहमिति ज्ञानसिद्धावपि मदीयं चेतः सर्वदा श्रीनारायणचरणाब्जव्याप्तमिव वर्त्तते । स एव ब्रह्मेति सहस्रप्रमाणसंभूतः सिद्धान्तोऽस्मदीयः । एवं शिष्यवरवचनं निशम्य पुनरवादीत् परम गुरुः । समीचीनम् लक्ष्मणहस्तामलक युवां ब्रह्मचारिणौ किल मतकल्पनाय स्वीकुरुतम् इति तावत्यंतसंतोषचित्तौ तदानीमेव परमगुरूपदेशवशात् संन्यासिनौ भवतः स्म । ताभ्यां वंदितपादः परमगुरुर्दयांबुधिरिदमाह । विष्णुमतं षड्विधभेदविराजितं सकलमनुजमोहकरं द्विपंचमुद्रालिंगनारायणाष्टाक्षरमंत्रोपदेशमूलं दृष्टिसृष्टिदोषवर्जितं कल्पयतम् । एवं षड्विधं कर्म विभेदेन वैष्णवमतं कृत्वा दिग्विजयं कुरुतम् । पुनरागतयोर्भवतोः सत्यमिव तद्भविष्यतीति । एवमाज्ञप्तौ मतकारणत्वादाचार्यौ लक्ष्मणहस्तामलकौ कांचीनगरक्रमात् पूर्वापराशाद्वयमवलंब्य परमगुरुमनुदिनं स्मरंतौ दिग्विजयं चक्राते । स हि पूर्वभागे लक्ष्मणाचार्यः किल दिग्विजयं कृत्वा कांश्चिद्ब्राह्मणादीन् सच्छिद्रोर्ध्वपुंड्रधारणशंखचक्रांकभासुरभुजयुगलान् कृत्वा बहुशिष्यसमेतः पुनरावृत्य परमगुरुचरणं नत्वा तदनुज्ञावशात् मतविजृंभणहेतुकं भाष्यादिग्रंथचयमकरोत् । हस्तामलकस्तु भूमध्यात् पश्चिमखंडादिग्विजयं कृत्वा

पंचमुद्रांकविराजितान् भगवदष्टाक्षरमंत्रजपासक्तान् कांश्चिद्ब्राह्मणादीन् कृत्वा रजतपीठादिस्थलेषु कृष्णादिदेवप्रतिमां कृत्वा मतं विज्ञापयितुम् पुनः परमगुरुं प्राप्य दृष्ट्वा तदानीं कांच्यां परमगुरुं शंकराचार्यं नत्वा तत्पाद-युगले स्वकृतं विज्ञापयामास ।

भावार्थः—– लक्ष्मण हस्तामलका बोलावुनी । आचार्य पुसती तुमची श्रद्धा कवणिये स्थानीं । तेव्हां ते ह्मणाले नारायणीं । श्रद्धा आमुची अतिदृढ ॥ १५४ ॥ मग आचार्यीं बरवें ह्मणितलें । तया दिग्वि-जया पाठविलें । तिहीं तप्तचक्रादि चिन्हीं केले । जे जे जन मिळाले ते वैष्णव ॥ १५९ ॥ वैष्णवमतखंडणसमर्थी वेदविरुद्ध । ह्मणोनि तप्तच-क्रादि चिन्हें त्यागविली प्रसिद्ध । तेचि पुढती निगमविरुद्ध । चिन्हें घेव-विली विप्रादिकां ॥ १६० ॥ शंकरविजय अवघा वाचितां । हा सहज अर्थ कळेल चित्ता । जयाचा अधिकार जेथ होता । तो तिहीं तत्वतां पाळावा ॥ १६१ ॥ जयाची श्रद्धा जेथ । ते न निवटे यत्नें बहुत । यालागीं परमेश्वरश्रद्धावंत । निज यत्नेंचि व्हावें ॥ १६२ ॥ परि येथ रहस्य एक । कैसे ओळखावे देवताभजक । कवण्या उपासनें सुख । पावती ते ॥ १६३ ॥ ऐसा संशय न धरावा । मन्निरूपणें दूर करावा । जो पूर्वजन्मीं आघवा । केलाचि आहे ॥ १६४ ॥ नसतां अंतरीं निष्काम भक्ति । ईश्वरनिष्ठा न धरवे चित्तीं । जया प्रतिदिनीं शतदेवतासक्ति । विषयप्रीति ह्मणोनी ॥ १६५ ॥ तयांची कोण इष्ट देवता । ऐसे कवण आहे निर्धारिता । जया कनक आणि कान्ता । जन्मवरी पूज्य ॥ १६६ ॥ ह्मणोनि तया सकामा । आह्मी न कळवूं हरिप्रेमा । आतां इष्टदैवताचिया कर्मा । तेहि ऐके ॥ १६७ ॥ केवळ कर्मकांडीं पाहतां । जेथ जो विपाकें जन्मला तत्वतां । तेंचि कर्म तया पथ्य । सुखदायक ॥ १६८ ॥ ब्राह्म-णवंशीं जन्मला । आणि पारधी करूं लागला । तो तया कर्मे पावला । सुख हें नोहे ॥ १६९ ॥ आतां अहिंसादि सात्विक । आघवियाचि पूज्य देख । परि रागद्वेषरहित सम्यक् । चित्त जयांचें ॥ १७० ॥ यत्नें राग-द्वेषनिवृत्ति । होऊं शके जया हातीं । तयाही सात्वतधर्मप्रतीती । सुख-दायक ॥ १७१ ॥ परि रागद्वेषाची मूळें । चित्तीं दृढली सगळें । आणि यत्नाच्याही बळें । न निवटती ते ॥ १७२ ॥ तयांचिया कर्में । मुक्ति

भगवन्निष्ठाधर्मे । ह्मणोनि सद्गुणें अथवा जन्में । वर्णधर्मे कीजे निष्ठा ॥ १७३ ॥ जया विषाची संवय जाहली । तया तैसीच पाहिजे औषधी केली । तैसी जया जे वृत्ति भली । तया तेथुनीचि पाहिजे प्रकटविली निष्ठा ॥ १७४ ॥ मेरुतंत्रीं येविषयीं वचन । ते तुज सांगूं प्रमाण । स्वयें बोलिलें उमारमण । उमेस विश्वतारणहेतू ॥ १७५ ॥

दैवात्कदाचिद्विप्रोऽपि धूर्तमंत्रैः प्रतारितः ।
दैवेन मलपो जातस्तस्योद्धारो मयोच्यते ॥ ११६ ॥
त्यजेत्स वैदिकं कर्म तुलसीं नैव संस्पृशेत् ।
चांडालो वा तुरुष्को वा यः कश्चित्कौलमास्थितः ॥
तस्यैव संगः कर्तव्यो नान्यविप्रस्य कुत्रचित ॥ ११७ ॥
( मेरुतंत्र प्रकाश २० )

भावार्थः— "पुण्यः पुण्येन कर्मणा भवति पापः पापेन कर्मणा" ही श्रुति । सांगे दैवाची विचित्र गती । कीं अवश्य भुक्ति । कृतकर्मी ॥ १७६ ॥ वादी ह्मणे तुह्मी यत्नवादी । दैव प्रशंसिता आधीं । तरी हे स्वग्रंथविरोधी । होईल साच ॥ १७७ ॥ सिद्धान्ती ह्मणे यत्नसामर्थ्य असतां । दैव प्रशंसणें वृथा । येवढाचि यत्नवाद तत्वतां । मान्य आह्मां ॥ १७८ ॥ यत्नवादींच आग्रह धरितां । तरी श्वानासही यावा स्वयंपाक करितां । कीं मकरा मत्स्या वेद पढवितां । कवणू आहे ? ॥ १७९ ॥ शिवरात्रीस शिवालया समोर मेला । ह्मणवोनि तिर्यक् योनींतूही राज जन्मा आला । हा इतिहास प्रश्नोत्तरखंडीं बोलिला । परि दैवचि ययाला प्रमाण ॥ १८० ॥ दैवें आलिया विपरीत स्थिती । तया जे अंतःकरणें अनुकूळ न होती । तयासचि प्रयत्नोपदेशप्रवृत्ति । येरा नाहीं ॥ १८१ ॥ दैवें भलतिया मार्गी गेला । अंतरीं पश्चाताप जाहला । मरणादि प्रायचित्तें तयाला । आहे निष्कृती ॥ १८२ ॥ दैवें भलत्यामार्गी जाय । अंतरीं पश्चातापही होय । परि मरणादिप्रायश्चित्तीं वाटे भय । तया तंत्रमार्गे निष्कृती ॥ १८३ ॥ दैवें भलत्या मार्गी गेला । आणि रागही तेथ उपजला । तयालागीं उद्धार बोलिला । तो रागचि अर्पितां भगवंतीं ॥ १८४ ॥ दैवें राक्षस योनींत आला । आणि मनुष्यमांसे भगवंत पूजिला । तो तेणेंचि प्रसन्न होय तयाला । जेवीं घंटाकर्णे पूजिला

भगवंतू ॥ १८५ ॥ आतां दैवें याति जन्मीं जरी । ब्राह्मण फसवोनि नेला वामाभीतरीं । पुढें तयाचे संगती निर्धारीं । मद्यपी जाहला ॥ १८६ ॥ मद्यपानीं राग उपजे । धुंद उतरलिया चित्त विरजे । ऐसियासी तेणेंचि पूजे । पूजावा धर्मू ॥ १८७ ॥ शिवो नये तुळसी । नमूं नये ब्राह्मणासी । महार मांग तुरुक यवनासी । धरावी संगती ॥ १८८ ॥ जो जो वाममार्गी भला । तोचि तेणें पाहिजे पूजिला । मरणावांचोनि पाहिजे नाश्रयिला । दक्षिण मार्ग ॥ १८९ ॥ जिहीं फसवोनि नेले । ते फसविणारचि फसले । जयालागीं फसविलें । तो भगवन्निष्ठेनें तरेचि ॥ १९० ॥ पतितांची संतती । धर्म आहे तयाप्रति । परि जे स्वयें पतीत होती । ते पावती महानरक ॥ १९१ ॥ चांडाल योनींत धर्मव्याध । स्वधर्मे पावला सिद्धि विशद । बळें चांडाळ झाले द्विज जे प्रसिद्ध । ते महानरकीं पचले कीं ॥ १९२ ॥ भलताही मार्ग धरावा । तरी निश्चय ऐसा करावा । हाही मेरुतंत्रीं आघवा । बोलिला भावो ॥ १९३ ॥

> सर्वकर्मविहीना ये वर्णाश्रमविवर्जिताः ।
> कौले वा वाममार्गे ते भुक्तिमुक्त्योश्च भाजनम् ॥ ६४ ॥
> निंदंतु बांधवास्सर्वे त्यजंतु तु सुतादयः ।
> जना हसंतु तां दृष्ट्वा राजानो दंडयंतु वा ॥ ६५ ॥
> रोगदारिद्र्यदुःखाद्यैः पीडितोऽप्यनिशं त्वहम् ।
> लक्ष्मीस्तिष्ठतु वा यातु न मुंचामि पथस्त्विमान् ॥ ६६ ॥
> एवं यस्य दृढा भक्तिस्स वामे सिद्धिमाप्नुयात् ।
>
> ( मेरुतंत्र प्रकाश १९ )

भावार्थः—जे सर्वकर्मविवर्जित । वर्णाश्रमविरहित । वाममर्गी ते समस्त । भोगमोक्ष पावती ॥ १९४ ॥ निंदोत अवघे बांधव । पुत्रादिक सोडोनि जावोत सर्व । पिशुन हंसोत कां सगर्व । होवोनिया ॥ १९५ ॥ राजे दंडोत अवघे मिळोनी । सुखें प्राण जावोत निघोनी । परि हा मार्ग निर्वाणीं । न सोडी मी ॥ १९६ ॥ ऐसी जयाची दृढ भक्ति । तोचि सिद्धि पावे वामपंथी । एरव्हीं मद्यमांसाचिया पंक्ती । वैसावें हा विधि नोहे ॥ १९७ ॥ एवं दैवें जो वाम मार्गीं गेला । तोही ऐसिया रीती

तरला । रागी असोनि किंचित् पश्चाताप झाला । तोही वामीं बोलिला अधिकारी ॥ १९८ ॥

अधिकारो न मे जातः समस्त ब्रह्मकर्मणां । इहलोके परत्रापि कथं लप्स्याम्यहं सुखम् ॥ ४४ ॥ अंधश्च यः परद्रव्ये परस्त्रीषु नपुंसकः । परापवादे यो मूको नित्यमित्थं विचारयेत् ॥ ४५ ॥ तस्यैव ब्राह्मणस्यात्र ब्राह्मणत्वाधिकारिता । अब्राह्मणास्तु ये केचिन्मांसे मद्ये रता वयम् ॥ ४६ ॥ कथं लभामहे मोक्षमिति चिंतापरायणाः ॥ पूर्वोक्तलक्षणैर्युक्तास्तेऽपि शिष्याः प्रकीर्तिताः ॥ ४४ ॥ ( मेरुतंत्र प्र० १० )

शब्दार्थ स्पष्ट आहे— आतां भावार्थ सांगतो.

राग आणि पश्चाताप । मिळोनि जो आचरी पाप । तो वाममार्गी संकल्प । सिद्धि पावे ॥ १९९ ॥ उत्तमाते न निंदी । आपुलें निंद्याचरणही न त्यागी त्रिशुद्धी । तो वाममार्गी सिद्धी ॥ पावे हें सत्य ॥२००॥ दुराचार न सोडवे । तरी प्रगट करितां बरवे । परि गुप्त करोनी न भ्रष्टवावें । आणिक लोक ॥ २०१ ॥ जे वैदिक मार्गी असती । तेही स्वस्त्रियेशीं सुखमैथुन करिती । गाई ह्मैशीसी संग करिती । हें म्यां प्रत्यक्ष देखिलें॥२०२॥ रागाची गति अतिविचित्र ॥ न देखे सुपात्र कुपात्र । रागें पुरुषा पवित्रापवित्र । नेणवे कांहीं ॥ २०३ ॥ जे रागी तंव होती । आणि किंचित् ईश्वरभजनेच्छा चित्तीं । राग विषयांचा रोधूं न शकती । अमर्याद ॥ २०४ ॥ वैदिक मार्गापासोनि भ्रष्टले । शेवटीं अनुताप पावले । प्रायश्चित्त घेवों न शकती वहिले । मरणभयें ॥ ३०५ ॥ तया मूर्खांते कवण्याही रीती । मिळावया सुपथीं । तंत्रमार्ग पशुपती । बोलते जाहले ॥ २०६ ॥ शिवतत्वविवेकीं सांबपुराणवचन । अपय्यादीक्षित घेवोनि बोलिलें प्रमाण । त्याचाही आशय ह्माचि ह्मणोन । निरूपू तुज ॥२०७॥

"श्रुतिभ्रष्टः श्रुतिप्रोक्तप्रायश्चित्ते भयं गतः ।
क्रमेण श्रुतिसिद्ध्यर्थं मनुष्यस्तंत्रमाश्रयेत् ॥ १ ॥
धर्मशास्त्रे पुराणे च प्रोक्तंहि मरणांतिकम् ।
प्रायश्चित्तं मनुष्याणां पापिष्ठाणां सुदारुणम् ॥ २ ॥
भयं दुर्बलचित्तानां मरणे जायते भृशम् ।

तेषामेवाभिरक्षार्थं खल्वहं तंत्र(?)कवान्" इति

( शिवतत्वविवेक श्लो० ४७ )

भावार्थ—वेदमार्गापासोनि भ्रष्टला । किंचित् पश्चात्ताप जाहला । परि देहासक्तीस नाहीं मुकला । ह्मणोनि वैदिक प्रायश्चित्त न घे ॥२०८॥ स्मृतींत आणि पुराणांत । वेदभ्रष्टा प्रायश्चित्तें मरणान्त । भय उपजे जया तेथ । तिहीं तंत्रपंथ आश्रयावा ॥ २०९॥ या अवघियाचें हेंचि कारण । कीं रागें करूं नये कांहींच सेवन । कोणत्याही प्रकारें करून । नारायण मिळवावा ॥ २१० ॥ नाना रागाची विचित्र गती । रागें उन्मत्त जे होती । तया भलतियाचि संवयी जडली । त्या सांगता चित्तीं ये कंटाळा ॥ २११ ॥ वैदिक मार्गाच्या दृष्टीन । वामपंथ वाईट असेल पूर्ण । परि लोकांच्या विषयप्रीतीहून । वाईट नाहीं हें सत्य ॥ २१२ ॥ लोकांची उन्मत्त रागगती । किंचित् सांगतो निश्चिती । कंटाळू नये महंती । वस्तुस्थिति म्हणोनि ॥ २१३ ॥ कित्येक श्वान पशु भोगिती । परस्पर गुदमैथुन आचरिती । कित्येक स्त्रियांचे पोट फोडूनि छिद्र करिती । मग आचरती मैथुन ॥ २१४ ॥ तेथ नेत्रमुखादि द्वारें । कोण पाहती कोण्या विचारें । नाना योनीनपुंसकप्रकारें । दिधलें हे ॥ २१५ ॥ कित्येक परशुक्र भक्षुनी । पश्चात् प्रवर्तती मैथुनीं । आणि ह्या संवयी बहुतेकालागुनी । प्रत्येक ग्रामीं वाटती गज ॥ २१६ ॥ तथापि धर्मनिष्ठ । या संवयीपासूनि वेगळे अचाट । परि जे वरिवरि धर्मनिष्ठ । ते तंव ह्या संवयी आचरिती ॥ २१७ ॥ मीही ऐसा पापी नसेल । ऐसा निश्चय कोण करील । हें असो यांतूनि सोडवील । नारायण तैंचि खरे ॥२१८॥ येवढी रागाची दुर्गम गती । त्यास वेद शिकवावें कोणे रीती । कोणे रीति धर्मप्रवृत्ति । सांगावी तया ॥ २१९ ॥ जयांचे वेद भांडण । मांसचि जयांचे मिष्टान्न । जया पीयूष मद्यपान । सदा ध्यान स्त्रियांचें ॥ २२० ॥ जो मोकळा चारी पायीं । जया प्रतिबंध कोठेंचि नाहीं । ऐसे वाढूं देतां मही । तरी उत्तमासही उपद्रव ॥ २२१ ॥ कामुकांचिया नगरीं । वेश्यापुरा नसतां बाहेरी । तरी कैसिया कुलीन नारी । राहतील सांगे ॥ २२२ ॥ शौचकूप बाहेरी नसतां । तरी घराचीच अवश्य भ्रष्टता । तेवीं मूर्खांची न करितां व्यवस्था । आपत्ति सर्वथा टळेना

॥ २२३ ॥ जे दुसरिया नांव ठेविती । ते तैसेचि गुप्त आचरिती । वेश्येगृहीं उघड न जाती । आणि भ्रष्टविती भगिन्यादि ॥ २२४ ॥ ऐसियालागीं तंत्रपंथ । कोण ह्मणूं शके व्यर्थ । निंदूं नये यथार्थ । कोणताही मार्ग ॥ २२५ ॥ माझें तंत्र ऐसे आहे मत । जे उघड स्वीकारिती वामपंथ । तयांसी नमस्कारितां निश्चित । दोष नाहीं ॥२२६॥ परि जे राहूनि वैदिक पंथीं । गुप्त वामाचार करिती । तयासी संभाषण करितां निश्चिती । दोष लागे सर्वथा ॥ २२७ ॥ गाय प्रत्यक्ष गू खातां । तिची न हारपे पवित्रता । परि पितृवीर्य पीईल माता । तरी ती अपवित्र होतसे ॥ २२८ ॥ तैसा जो जेथ अधिकारी । तेणें प्रगट वागावें तियेपरि । घोटाळा करूं नये धर्माभीतरी । कोणेही वेळे ॥ २२९ ॥ एकवेळ चुकलिया प्रायश्चित्त घ्यावें । पुनः कुकर्म न करावें । हें न होईल तरी सुखें शिरावें । प्रकट तंत्रमार्गी कोण्याही ॥ २३० ॥ जया व्याभिचार न सोडवे । तिहीं मोकळे न फिरावें । वामचक्रीं घसावें । कोण्या तरी ॥ २३१ ॥ परि येथ रहस्य एक । अत्यंत रागियासी दंड देख । किंचित् रागी आणि अनुतापी सम्यक । परि प्रायश्चित न घेववे त्या तंत्रमार्ग ॥ २३२ ॥ तया पतितांची जी संतती । तयास तंत्रमार्गे अतिनिष्कृति । परि सद्गुण मार्ग अंगिकारितां निश्चिती । येच जन्मीं निष्कृती तया ॥ २३३ ॥ जो ये जन्मीं पतित जाहला । आणि तंत्रमार्गी शिरला । नरक भोगुनी तयाला । तंत्रोक्त गती ॥ २३४ ॥ जे चौपाई मोकळे वागती । वैदिक वा तांत्रिक नाचरिती । ते नरक भोगोनिया जाती । कीटकादि योनी ॥ २३५ ॥ पतितांची संतती । जाये ज्या ज्या तंत्रपंथीं । त्या त्या तंत्रांत सांगितली जे गतीं । ते मिळे तयाप्रति नरक न भोगितां ॥ २३६ ॥ माझें ऐसें आहे मत । परस्त्रीगमन महापाप होत । महत्तर पाप निश्चित । मद्यपान तें ॥ २३७ ॥ हिंसा पाप महत्तम । याचें कारणही ऐका परम । परस्त्रीगामिया न मिळे धर्म । परि कामसुख या लोकींचे ॥ २३८ ॥ मद्यपानी पुरुषाप्रति । धर्म ना अर्थ ना कामसंपत्ति । हिंसक तंव सकळाप्रति । तिरस्कार्य ॥ २३९ ॥ जेणें जेणें रागद्वेष वाढे । तयाचेंचि नांव पाप फुडे । जेणें जेणें रागद्वेष मोडे । त्या नांव पुण्य ॥ २४० ॥ ऐशा रागियाही कारण । करणें लागे

अवश्य रक्षण । समर्थीं चोरासीही देउनी वेतन । राज्य रक्षणें लागे चतुरातें ।। २४१ ।। ऐसिया रक्षणकार्यीं । अपवित्रातें पवित्राठायीं । भावना करणें लवलाही । आगमावीण नोहे ।। २४२ ।। चोरही जरी जाहला । तो प्रसंगें रायाच्या उपयोगा आला । तरी वृत्ति देणें तयाला । रायावीण कवण करी ।।२४३।। तेवीं जे गेले मोकाळिया वाटा । ह्मणी उठविलील उत्तमांची प्रतिष्ठा । ह्मणोनी तयासी ईश्वरनिष्ठा । लाविली पाहिजे ।।२४४।। ते लावावया कारण । अपवित्र वस्तूसी पवित्र भावन । ते तंव नोहे आगमावीण । तर्कें करून सर्वथा ।। २४५ ।। आगमाचें हेंचि लक्षण । अधिकतरविज्ञानवत्प्रेरण । यालागीं सकल आगमनिर्माण । कर्ता प्रमाण ईश्वरू ।।२४६।। म्हणोनि कोणाचीही निंदा । न करणें ही महामर्यादा । सकळांमाजीं शुद्धा । ठेवावी प्रीती ।। २४७ ।। प्रीतीचिया योगेंकरून । आज्ञा भंगू नयेचि जाण । निजनिजागमाज्ञा वचन । मानावें प्रमाण सर्वथा ।। २४८ ।। अत्यंत झाली मायेची प्रीती । म्हणोनि करूं नये तियेची कामपूर्ती । समर्याद पुष्टि भक्ति । आज्ञापूर्वक प्रीति सुखदात्री ।। २४९ ।। एवं सकळही आगमांचा । कर्ता परमेश्वरचि साचा । यालागीं कोणीच कोणाचा । निषेधूं नये पंथ ।। २५० ।। संकेत समजावया कारण । अवघे धार्मिक मिळून । तयांचें करूनि चार वर्ण । सांगतों समाधान तुजप्रति ।। २५१ ।। नाना आगमांच्या प्रवृत्ति । भगवत्सागरीं एक होती । ऐसें जाणोनि जो धरी शांती । न पाहे निश्चिती जनबोला ।। २५२ ।। स्वमार्गकथित धर्माचा आदर । येणेंचि लावावलें अंतर । येर न देखे प्रकार । जन बोलांचा ।। २५३ ।। तो वर्ग बोलिजे ब्राह्मण । आतां ऐका क्षत्रियाभिधान । स्वधर्मीं निष्ठा ठेवी दारुण । आणि परासी आरंभी वाग्युद्ध ।। २५४ ।। मंडण खंडण नाना युक्ति । प्रमाण प्रमेय पदार्थीं । परि जयीं पराजयीं मित्रताचि निश्चिती । तो क्षत्रियवृत्ती ओळखावा ।। २५५ ।। समयापुरतें मंडण खंडण । वाद संपता बंधूसमान । द्वेषें न मळे अंतःकरण । क्षत्रियप्रमाण हेंचि कीं ।। २५६ ।। स्वधर्मनिष्ठा ठेवीत । परासही धर्म शिकवित । दुसरिया धर्मांतीलही संग्रहीत । बरवें म्हणूनी ।। २५७ ।। तो वैश्यवर्ग ओळखावा । जैसा वाग्भटें आघवा । केला आहे बरवा । बौद्धमतांतीलही

मंत्रसंग्रह ॥ २५८ ॥ कां उत्पलाचार्ये प्रत्यभिज्ञाशैव । तिहीं बौद्धमत-वचनेंही अनुकूल घेतली सर्व । ऐसिया धार्मीक वर्गा वैश्यभाव । व्यंग्यार्थें मी म्हणे ॥ २५९ ॥ जया ईश्वर आहे वाटे चित्तीं । परि कामनेचीच सदा विनंती । क्षणोक्षणीं आगमप्रवृत्ति । कामनेसाठीं ॥ २६० ॥ जो कांता मिळावी म्हणून । करी सुरसुंदरीचें साधन । आणि पुत्र मिळावा म्हणून । पुत्रकामेष्टी करी ॥ २६१ ॥ आयुष्यकामना दृढ पोटीं । म्हणोनि सौरागमांतील अर्घ्यप्रदानपरिपाटी । धन मिळवावया-साठीं । कुबेर पूजी ॥ २६२ ॥ ऐसा नाना आगमीं चाळविला । नाना कामनाही भरिला । गुरुपूजा करितां करितां जयाला । सर्व पौर्णिमा आषाढी ॥ २६३ ॥ वर्षाचे तीस मंत्रगुरु । प्रत्येक पौर्णिमेस त्यांचाचि करू । ऐसा आगमचाळक वर्ग शूद्र । म्हणितला प्रिया ॥ २६४ ॥ निष्ठा नाहीं कोठें । सकळागमखंडण मोठें । तर्कें आहाळला चोहटें । तो वर्गवर्ण चांडाळ ॥ २६५ ॥ जो चारी पायीं मोकळा । जेथ निष्ठेची सर्वथा अवकळा । तो धर्मचोर म्हणावा सगळा । सगळीं गिळिजे ॥ २६६ ॥ जो एवढा झाला नास्तिक । जया न शके बांधूंही चार्वाक । अर्थकाम सोडूनि सम्यक । भलतेंचि करी ॥ २६७ ॥ आस्तिक ज्ञानी म्हणजे मोक्षमार्गी । मुमुक्षु म्हणजे धर्ममार्गी । आस्तिक म्हणजे त्रिवर्गी । धर्मअर्थकामीं सम ॥ २६८ ॥ चार्वाक म्हणजे सोडोनि धर्म । योग्य सेवणें अर्थकाम । हा दंश सुचविला सुगम । चार्वाकदर्शनीं माधवाचार्यें ॥ २६९ ॥ परि अयोग्य अर्थकामाची प्रवृत्ति । जया चोरीवांचुनी नाहीं धनप्राप्ति । मुखमैथुनादिकावीण प्रीती । कामी तृप्ती नोहे ज्याची ॥ २७० ॥ तो आस्तिका नास्तिकाही निंद्य । शतजन्म न जाये तद्बुद्धिमांद्य । जयाचें नांवही निंद्य । मानती माहात्मे ॥ २७१ ॥ एवं रूढ प्रसिद्ध चार वर्ण । त्यांचा स्वमतें व्यंग्यार्थ दिधला करून । केवळ समजावया कारण । जेवावया नाहीं ॥ २७२ ॥ तथापि या विवेचनीं । रहस्य ओळखावें सज्जनीं । तिन्ही कांडीं सम अंतःकरणीं । वागणें तो पंथ उत्तम ॥ २७३ ॥ हा सिद्धान्त घेवोनी । तुम्ह पारखू परिक्षुनी । तेणें भागवत धर्माची करणी । श्रेष्ठ कैसी कळेल ॥ २७४ ॥ मार्ग जो कां पशुयाज्ञिक । तेथ पशुद्वेष कर्मकांडीं उपजे सम्यक । उपा-

सना आणि ज्ञान सात्विक । ह्मणोनि हा मार्ग पूर्वैककांडविषमवृत्ति ॥ २७५ ॥ आतां जो कां वामपंथ । तेथ कर्म उपासना सत्वरहित । महानिर्वाणादितंत्रीं ब्रह्मज्ञान यथार्थ । म्हणोनि हा पंथ पूर्वद्विकांडविषमवृत्ति ॥ २७६ ॥ श्रौत पांचरात्र श्रौत पाशुपत । कर्म उपासना सात्विक तेथ । ब्रह्मज्ञान नाहीं यथार्थ । म्हणोनि हे पंथ उत्तरैककांडविषमवृत्ति ॥ २७७ ॥ अश्रौत पांचरात्र अश्रौत पाशुपत । उपासना सात्विक निश्चयें तेथ । ज्ञानकर्म अयथार्थ । यालागीं हे पंथ आद्यंतकांडविषमवृत्ति ॥ २७८ ॥ आतां बौद्धार्हत मार्ग देख । जयाचे करणें अहिंसक । परि नाहीं उपास्य ईश ना ब्रह्मज्ञान सम्यक । म्हणोनि हे निश्चक उत्तरद्विमार्गविषमवृत्ति ॥ २७९ ॥ जो चारी पायीं मोकळा भला । तो नरपशु त्रिकांडविषमवृत्ति बोलिला । एवं मार्गपरिचय दाखविला । कांडविषमवृत्तिसंज्ञेनें ॥ २८० ॥ आतां कांडसमवृत्ति संज्ञा करोनी । मार्ग दाखवितो विवंचोनी । उपासना ज्ञान न मानी जैमिनी । ह्मणोनि तन्मार्ग पूर्वैककांडसमवृत्ति ॥ २८१ ॥ जे कां होतीं म्लेच्छमतें । ते निश्चयें मानिती ईश्वरातें । परि ठाव नाहीं कर्मज्ञानातें । म्हणोनि ते मध्यकांडसमवृत्ति ॥ २८२ ॥ निरीश्वर सांख्यपंथी । ह्मणावेत आद्यंतकांडसमविषमवृत्ति । आणि सेश्वरसांख्य ज्या योगी म्हणती । ते पूर्वद्विकांडसमवृत्ति म्हणावे ॥ २८३ ॥ जैमिनीस अनेक शब्दांचें । संज्ञाकरण पाणिनीयांचें । तेवी मार्ग समजावयाचें । मम संज्ञाकरण अल्प चिन्ह ॥ २८४ ॥

गद्यः— ज्या आगमाच्या आधारानें जे मार्ग निघाले असतील, त्यांचाही त्या त्या आगमाच्या आश्रयानें मत्कृतसंज्ञेनें निर्देश करावा; अथवा पूर्वकांडैकदेशविषमवृत्ति, द्विकांडैकदेशविषमवृत्ति इत्यादि संज्ञा कराव्यात; परंतु मत्संज्ञास्मृति नष्ट होईल असें करूं नये.

ओव्या— येणेंचि अंगुलीनिर्देशें । मार्ग ओळखिजे गुणविशेषें । आतां भागवत धर्माचें सरिसें । नामरूप सांगूं ॥ २८५ ॥ कर्म नाहीं हिंसक । उपासना सात्विक । ब्रह्मज्ञान सम्यक । केवलाद्वैत ॥ २८६ ॥ ह्मणोनि भागवतपंथी । आह्मी त्रिकांडसमवृत्ति । येणें निष्ठा दाखविली कुणी । निज मार्गाची ॥ २८७ ॥ भागवत ह्मणजे नोहे पंचरात्र ।

श्रीमद्भागवत महापुराण पवित्र । याचाही विशेषार्थप्रकार । आगम-निरूपणीं सांगेन ॥ २८८ ॥ वादी ह्मणे हें असो । तुह्मां देखिला अतिसो । कीं धर्ममार्गाविपर्यी नसो । द्वेष कोणाचा ॥ २८९ ॥ तें असेलही यथार्थ । परि माझें संशयी चित्त । कीं गतीचा विचार येथ । करावा कैसा ॥ २९० ॥ सर्वांसीच एक गती । कीं सर्वांच्याचि नित्य गती । येथ कळेना वस्तुस्थिती । आहे कैसी ॥ २९१ ॥ सिद्धान्ती ह्मणे पुशिलें उत्तम । तुझा अभिप्राय मिया जाणिला दुर्गम । कीं नित्या-नित्याचा परम । विरोध आहे ॥ २९२ ॥ सर्वांच्याचि गती । जरी कां नित्य होती । तरी व्यापकता सर्वांप्रति । घटों न शके ॥२९३॥ व्यापक होतां समग्र । सर्वांचा होईल संकर । अल्प होतां निर्धार । सावयत्र आणि कार्यरूप ॥ २९४ ॥ कार्यत्वेंचि अनित्य । एवं तुझी शंका सत्य । परि अविद्या तोंवरी नित्य । संसार हा ॥ २९५ ॥ सत्य मिथ्या द्विविध जाण । वस्तुतंत्राचें प्रकार दोन । सत्य वस्तु ब्रह्म पूर्ण । सकार्याऽज्ञान मिथ्या वस्तु ॥ २९६ ॥ मिथ्यासी पृथक् सत्ता नाहीं । म्हणोनि अधिष्ठानसत्ताप्रतीत पाहीं । अन्य सत्तेचिया ठायीं । अनिर्वाच्य तें ॥ २९७ ॥ अधिष्ठान सत्प्रतीति । येथ न ह्मणावी अन्यथाख्याति । अन्यत्व नाहीं म्हणोनि निश्चिती । अन्यसत्ताभासही तो अनिर्वाच्य ॥ २९८ ॥ तया अनिर्वाच्य सत्तेची नियती । भावनाशक्ति आणि वस्तु-शक्ति । अथवा समष्टिव्यष्टिस्वरूपें निश्चिती । अर्थ तयांचा ॥ २९९ ॥ भावनाशक्तीचा होय जय । तोंवरी वस्तुशक्तीचा पराजय । भोगें वस्त्व-धीन भावना होय । तेणें गति लाहे परतोनी ॥ ३०० ॥ एवं गती आणि आगती । सकामा निश्चयें होती । जें भावनाही वस्तुशक्ति । संस्काररूप ह्मणोनी ॥ ३०१ ॥ कोणत्याही मार्गीं पूर्ण । सकामा न चुके गमनागमन । दरिद्र भोगनिष्ठाकारण । ठेविलेंचि आहे ॥ ३०२ ॥ स्वयें कीटक कोश करिती । मग आपण बद्ध होती । कीं शुक प्रेमें येसे नळिकेवरती । तो आपण बांधे प्रेमसंकल्पें ॥ ३०३ ॥ नवल सकाम षट्पद । जे संकल्पकिंजल्कबद्ध । आतां निष्काम आचरो प्रसिद्ध । कोणीही धर्म आपुला ॥ ३०४ ॥ तया वासनानिरोधाची संवय । ह्मणोनि प्राप्तभोगीं वैराग्य होय । तेणें दुःखरूप निश्चयें । फळ हें जग

॥ २०५ ॥ परि अवचट निरालंबीं पडे । मग अनालंबनें विक्षेप घडे । ध्यान शून्यक्षणीं मोडे । समाधिसाक्षीसिंहहाके ॥ २०६ ॥ तथापि अवचिता कळला । तरी पूर्ण पुन्हें पहुडला । सत्संगोपदेशें परतला । तरी अवचट एखादा ज्ञानें पावला मोक्षसुख हें घडे ॥ २०७ ॥ एवं परत्रब्रह्म धर्मसंकेतू । सच्छिष्य निवडाया उपदेशप्रांतू । उघडा आहे ह्मणोनी भागवतू । धर्मू प्रसारिजे ॥ २०८ ॥

वादी उवाच— भागवत मतांत तुह्माला सर्वांचा समावेश कसा करितां येतो, हें मला थोडेसे सांगा; कारण वामागमांत "विष्णोर्नाम न गृह्णीयात्" इत्यादि स्पष्ट वचनें आहेत.

सिद्धान्ती उवाच— भागवत धर्मांत समावेश करणें आमचा दोन प्रकारचा आहे, सांसर्गिक समावेश आणि आरोपित समावेश. आगमांआगमांचा असलेला भेद त्यांच्या विरोधास कारण न होणारा असेल, अशांचा समावेश भागवत धर्मांत करणें सांसर्गिक ह्मटला आहे. जसें— पाशुपत व पांचरात्राचे एकीकरण. याचा विशेष विचार उत्तरार्धांत आगमनिर्णयांत करीन. सध्यां तूं दिङ्मात्र ज्ञानलेश पुरे हो. आश्रय देऊन कल्पनाबलानें समावेश करणें याला आरोपित ह्मणतात. तो समावेश सर्व मार्गांचा आह्मी भागवत धर्मांत करितो. त्यांतून बौद्धादि मार्गांचा पुढें याच प्रकरणांत सांगू, आणि वाममार्गांचा मागें सांगितला आहे; आणि पुनः विचारल्यामुळें येथेंही थोडासा सांगतो. वाममार्गी पुरुषांना भागवत धर्मांत घेणें माझ्या हातून शक्य नाहीं, पण वाममार्गी स्त्रियांना मात्र श्रीकृष्णपतिदृष्टि सांगून भागवत धर्मांत घेतां येते. व्यभिचारिणी स्त्रियांचे ठिकाणीं अनेक दोष आहेत; तरी धान्याला मिळणाऱ्या विष्ठेच्या सोनखताप्रमाणें धर्मदृष्टीनें त्यांच्या ठिकाणीं एक मोठा गुण आहे, व व्यभिचारी पुरुषाचे ठिकाणीं त्याच्या उलट धर्मदृष्टीनें एक मोठा दोष आहे. तो हा कीं, व्यभिचारिणी स्त्रियांची आपल्या जारावर जी प्रियबुद्धि असते ती किंचित् उत्कृष्ट असते, आणि व्यभिचारी पुरुषाची आपल्या जारिणीवर जी प्रियबुद्धि असते ती स्वापेक्षया किंचिन्निकृष्ट असते. यद्यपि वाममार्गांत व्यभिचारी पुरुषांनीं स्त्रियांचे ठिकाणीं देवीबुद्धि करावी असें लिहिलें आहे; तथापि

त्याबरोबर स्वतःचे ठिकाणीं शिवबुद्धि करावी हेंही लिहिलें आहे. तसें न केलें तर व्यभिचारि पुरुषाकडून मातृगमन होणेंही संभवनीय आहे. यद्यपि व्यभिचारिणी स्त्रीकडूनही पितृगमनादिक संभवनीय आहे, तथापि स्वतःचे ठिकाणीं देवीबुद्धि न करितां गम्याचे ठिकाणीं शिवबुद्धीनें सोनखतांत असलेल्या गुणाप्रमाणें त्यांच्या उत्कृष्ट भावनेची धर्मदृष्टीनें हानी होत नाहीं. याची परिक्षा तांत्रिकानां ठाऊक असेल, तूं त्यानां विचार; पण ह्या माझ्या मतामुळें "तमेव परमात्मानं जारबुद्ध्यापि संगताः" या वाक्याचा अर्थाभास करून तदन्वयें वाममार्गी स्त्रियानां कृष्णपतिबुद्धीनें भागवत धर्मांत प्रविष्ट करतां येते; पुरुषानां करितां येत नाहीं. यांतील रहस्य हें कीं, अशा रीतीनें वाममार्गी स्त्रियानां भागवत धर्मांत आरोपित समाविष्ट केले असतां, त्या सकाम असल्यास शंभर जन्मानीं तरी पूर्ण भागवत होतील; आणि चुकलों समजून निष्काम असल्यास एक दोन जन्मानेंच होतील. तीव्र संवेगानें कोणी याच जन्मीं होईल, तो स्वयं भागवत आहे, त्याचेविषयीं आमचे कांहीं ह्मणणें नाहीं; पण वाममार्गी पुरुषानां भागवतधर्म सकाम असल्यास त्या त्या आचारांचे व त्या त्या कर्मांचे लोक भोगून ज्ञान न मिळाल्यास कांहीं कल्पाने क्रमानें भागवत धर्मी होतां येईल; आणि निष्काम असल्यास स्त्रियापेक्षां अधिक जन्म लागतील. आतां "विष्णोर्नाम न गृण्हीयात्" या तुझ्या ह्मणण्याचा आशय असा दिसतो कीं, एका ठिकाणीं तुह्मी नाममाहात्म्य सांगितले, तर तंत्रांत त्याचा संकोच कसा ? याचे उत्तर असें आहे कीं, तांत्रिकांनां द्वेष असेल. शिवनाम व देवीनामाविषयीं तर नाहीं. ? किंवा रागी तांत्रिक जबरदस्तीनेंच नामापराध करतील, ह्मणून त्यांच्या करितां विष्णुनामाचा निषेध सांगितला आहे; अथवा तुझें ह्मणणेंच सम्यक् नाहीं, कारण वाममार्गी पुरुषानें मद्यानें विष्णूचें तर्पण करावें असें मेरुतंत्रांत वचन आहे.

विष्णोरप्यर्चनं कुर्यात्तर्पणं सुरया पुनः ।
अविप्रः सौख्यमाप्नोति प्रेत्य ब्रह्मणि लीयते ॥ ११३ ॥
( मेरुतंत्र प्रकाश २० )

हेंच तें वचन होय. याचा अर्थ स्पष्ट आहे; परंतु या वचनावरून विष्णुयागाचा वाममार्गीयानां अगदीं द्वेषच सांगितला आहे, असें ह्मणतां येत नाहीं. या वचनाचें रहस्य मात्र वेगळें आहे, तेंही प्रतारण होऊं नये ह्मणून तुला सांगतो.

ओव्या— श्लोकीं आहे "अविप्र" पद । तें वर्णोपलक्षक प्रसिद्ध । "सर्वं ब्राह्ममिदं जगत्" हें भारत वचन शुद्ध । आधार यासी ॥ ३०९ ॥ ह्मणोनि जन्मसिद्ध पिशाच राक्षसादि जाती । तिहीं मद्यमांसादिकीं अर्चावा रमापती । " वयं यदान्नाः पितरस्तदन्ना " ही श्रुति । प्रमाण मानोनि ॥ ३१० ॥ हरिवंशीं घंटाकर्णें । कृष्ण तोषविला विप्रमांसदानें । हेंही इतिहासीं येणें । पिशाचादि भक्ती प्रमाण केलें ॥ ३११ ॥ व्याधें मृगमांस वाहोनि शिव प्रसन्न केला । ह्मणोनि द्विज गायत्री सोडोनि पारधी शिकला । तरी तो निश्चयें नरका गेला । ऐसें जाणे ॥ ३१२ ॥ एवं येणें उपलक्षणें । आरोपित समावेश भागवती करणें । परी भागवतनिष्ठा आह्मा करणें । न स्वीकारणें अन्यानिष्ठा ॥ ३१३ ॥ आमुचा उपदेश नायकतां । स्वनिष्ठाचि दृढ धरितां । तरी आह्मीही तयाचा सत्वतां । न करूं द्वेष ॥ ३१४ ॥ पशूचें शृंग पक्ष्याचीं पंखें । मनुष्यालागीं न मिळती नेखें । ह्मणोनि काय पक्षी निशंकें । लुंचावें तिहीं ॥ ३१५ ॥ हा शारीरक अधिकार स्वभावसिद्ध जैसा । धर्माधिकारही बौद्ध[1] तैसा । ह्मणोनि कोणाच्याही निष्ठेपा । पात्र न होवावें ॥ ३१६ ॥ एवं आर्यधर्मपद्धती पाहतां । हा सांगितली व्यवस्था । आतां उपास्य इष्ट देवता । ओळखावी कैसी ते सांगूं ॥ ३१७ ॥ जयाचे ऐकोनिया गुण । जयासी रस होय उत्पन्न । ती देवता पूर्वजन्मीं पूर्ण । पूजिली तयानें जाणावी ॥ ३१८ ॥ रसशास्त्रीं वासना दोन्ही । प्राक्तनी आणि इदानींतनी । त्यांत जयाते वासना प्राक्तनी । तयातें रस उत्पन्न गुणवर्णनें ॥ ३१९ ॥ काव्यरस आणि भक्तिरस । ऐसे प्रकार दोन विशेष । सामान्या उपजे काव्यरस । तो पूर्वजन्मविषयसंस्कारें ॥ ३२० ॥ विशिष्ट भजक जे होती । तया तत्तद्रसावच्छिन्न उपजे भक्ति । संबंधीं कार्यें ही प्रतीति । येवोंचि लागे ॥ ३२१ ॥ ऐकोनिया भगवद्गुण । जया संबंधाचें

[1] बुद्धिसिद्ध.

न होय भान । तो केवळ विपर्यास समजोन । देवतासंपन्न न ह्मणावा ॥ ३२२ ॥ जयासी वासना इदानींतनी । तो उपासक होय तत्संगें करोनी । एवमधिकार ओळखोनी । उपदेशिती माहात्मे ॥ ३२३ ॥ नवल आहे वासनेची गति । स्थायीभाव गुप्त असती । ते विभावानुभावसहचारीविण प्रकट न होती । आणि वासनास्थिति जाय भलतीकडे ॥ ३२४ ॥ कोणासी दैवें गुरु अन्य मिळत । आणि प्राक्तनी वासना अन्य होत । तो दीक्षा त्यागोनिही निश्चित । मिळतां निमित्त तद्भक्तिवश होय ॥ ३२५ ॥ अतिभगवान श्रीरामोपासक । वृंदावन पाहतां कृष्णभक्त देख । पिपाजी असतां देव्युपासक । वैष्णव जाहला सत्संयोगें ॥ ३२६ ॥ देवाची आहे विचित्र गती । परि त्याची एक निकी स्थिती । केलिया कर्माची अवश्य प्राप्ति । याळागीं निराश भगवत्पथीं न व्हावें ॥ ३२७ ॥ रस नाना ऐकोनी । उत्पन्न होय निर्वाणी । भगवंतीं अर्पणिया लागुनी । बुद्धि जयाची ॥ ३२८ ॥ तोचि तयाचा उपासक । ह्माचि निश्चय सम्यक । आणखी परीक्षा एक । पहावी दृढ ॥ ३२९ ॥ जयाचें ऐकोनिया गुण । सात्विक भाव होती उत्पन्न । तयाचें पूर्वी केलें पूजन । निश्चयें करून ओळखावें ॥ ३३० ॥ जयाचें केलिया ध्यान । लक्षचि राहे आपुलें मन । जैसें करितां केशव नारायण । तैसें कर्तव्यवत् होय तें अपूजित ॥ ३३१ ॥ काव्य ऐकोनियाही निगुती । जेथ उपजोनी रसमूर्ति । वाटे संबंध असावा मजप्रति । तैं देवतासंपत्ती ओळखावी ॥ ३३२ ॥ ऐकतां वाल्मिकीरामायण । ढळढळा रडती अवघे जण । परि त्यांत जया वाटे मी रामसहाय करीन । तो रामोपासक ओळखावा ॥ ३३३ ॥ रस उत्पन्न झालिया सरसा । ह्मणे माझा उपयोग होवावा जगन्निवासा । तो तया मूर्तीचा अपैसा । उपासकु ॥ ३३४ ॥ शिवाची ऐकोनि सारिपाटकथा । जयाच्या जेणें जिंकावे वाटे चित्ता । तो उपासक तत्वतां । तयाचा होय ॥ ३३५ ॥ परि यांत एक रहस्य रीती । ऐसिया उठतां गुप्त वृत्ति । जो झांकोनि आनंद मानी चित्तीं । तो उपासक निश्चितीं तयाचा ॥ ३३६ ॥ देवाओखी देवळा गेला । ह्मणोनि तिकडेच लागला । कोणता तरी देव पाहिजे पूजिला । ह्मणोनि पूजी तो उपासक नोहे

॥ ३३७ ॥ माझी सकळा विनंती । चित्तास फसवूं नये निश्चिंती । हरिविजय ऐकतां आवडे कृष्णमूर्ति । तरी गुरूपदिष्ट ह्मणोनी मल्हारी पूजूं नये ॥ ३३८ ॥ यद्यपि गुर्वाज्ञा प्रमाण । तरी हा विधी तयाचिकारण । जया गुरू श्रेष्ठ वाटे ईश्वराहून । तया गुर्वाज्ञा तेचि देवता ॥ ३३९ ॥ परि जयानें देवासाठीं गुरु केला । तंव देव नावडता सांपडला । त्यानें जेथें रस उत्पन्न झाला । तेथेंचि जावें ॥ ३४० ॥ गुरू सोडितां पाप पूर्ण । परी रस अपलापणें त्याहूनि कठिण । मग दुर्धर रस होतां उत्पन्न । नरकही अंगिकारून रसाकडेचि जाय ॥ ३४१ ॥ मज अनुभव ऐसा चित्तीं । बाळपणापासोनि आवडे कृष्णमूर्ति । परि एका गुरूनें मजप्रति । दत्तात्रेयमंत्र दीधला ॥ ३४२ ॥ तो कंटाळा वाटे जपतां । मग भावना करावी लागे चित्ता । कीं मोक्षासाठीं हाचि तत्वतां । उपयोगी आह्मां ॥ ३४३ ॥ मोक्ष होवावा ह्मणून । मंत्र जपावा माळ घेवोन । इतुक्यांत कृष्णगीत ह्मणतां एखाद्या स्त्रीन । जप ध्यानसहित सुटून जात होता ॥ ३४४ ॥ किटकिट करोनि शेवटीं । गुरुपासोनि धरिली दूर वाटी । परि ज्ञानेश माता कृपावंत मोठी । ती धांवोनि गोमटी रक्षिती झाली ॥ ३४५ ॥ कित्येकांची नवल गती । साधनचतुष्टय नसतां चित्तीं । मोक्ष मिळावा ह्मणून निश्चिती । गुरु करीत सुटती भडाभड ॥ ३४६ ॥ तेथ कोण कोणाची देखे देवता । एक मंत्र करंड्यांत होता । तो हळदीकुंकू ह्मणोनि तत्वतां । वाटिती सकळां ॥ ३४७ ॥ एवं अधिकार नसतां मोक्षवेडे । बळेंचि नागविती भलतीकडे । ह्मणोनि गुण ऐकोनि जो आवडे । तोचि आधीं भजावा ॥ ३४८ ॥ विठ्ठल भजतां तुकाराम । स्वप्नीं गुरु मिळाले बाबाजी उत्तम । जयासी गुरु न वाटे पुरुषोत्तम । तेणें ईश्वर भजनाआधीं गुरू न कीजे ॥ ३४९ ॥ जया सकळ देवतावरता । गुरु श्रेष्ठ वाटे तत्वतां । तो आजचि मुक्तीचिया माथा । अधिकारी जाहला ॥ ३५० ॥ परि ऐसी गुरुभक्ताची प्रशंसा ऐकोनी । बळेंचि गुरू श्रेष्ठ मानी उपास्यरस दाबोनी । तो समर्थोक्त पढतमूर्खस्थानीं । जाउनी बैसे ॥३५१॥ माझिया मित्रामाजीं बहुत । कुलदेवताभिन्न कृष्णरसासक्त । कांहीं निरूपणेंचि त्यांत । तैसे जाहले ॥ ३५२ ॥ ज्या रसाचें जें दैवत । तयाचा रस

उत्पन्नीं होय दृष्टान्त । येणेंही उपास्यभाव यथार्थ । कळों लागे ॥३५३॥ कोणी दत्तात्रेय उपासिती । आणि श्रृंगार रस आवडे चित्तीं । समजावें कीं ययास निश्चिती । उपास्य व्यभिचार जाहला ॥ ३५४ ॥ श्रृंगार आणि करुण । येथ उपास्य ओळखणें कठिण । रसासरिसा जो होय अर्पण । तो तदुपासक ओळखावा ॥ ३५५ ॥ अद्भुतरसाचिया ख्याती । देवता ओळखतां होय भ्रांती । इतर रस संशय निश्चिती । उपजविती देवतेचा ॥ ३५६ ॥ ह्मणोनि श्रृंगार करुणा आणि शांती । या तिहींचि रसें ओळखो ये पूर्वोपास्ति । आतां मंत्रशास्त्राची रीती । तेही ऐक ॥ ३५७ ॥ आदि अंतीं सुसिद्ध । जयाच्या नांवे मंत्र विशद । तो तया देवतेचा प्रसिद्ध । उपासकु ॥ ३५८ ॥ योगशास्त्राची ऐसी रीती । मुद्रा करितां प्रथम स्थिती । जो वर्ण मोही योगियाप्रती । तो तद्देवता-उपासक ॥ ३५९ ॥ एवं उपासक ओळखावें कैसें । हें सांगितलें आपैसें । योगवासिष्ठीं प्रमाण असे । इयेविषयीं ॥ ३६० ॥ एक अग्नि-उपासक विपश्चित । मृग जाहला अयोध्येंत । तो समोर आणविला निश्चित । श्रीरामें वसिष्ठांच्या ॥ ३६१ ॥ राम ह्मणे यासी बोधावें । वसिष्ठ ह्मणती सर्वथा नव्हे । यासी अग्निदर्शन करवावें । आधीं प्रेमें ॥ ३६२ ॥ हा अग्निउपासक ह्मणोनी । अग्निप्रवेश करील ये क्षणीं । मग पूर्वीचें मनुष्य शरीर पावोनी । बोधयोग्य होईल ॥ ३६३ ॥ पुढें तैसेंचि जाहलें । यालागीं इष्ट सोडितां नव्हे भले । जे इदानींतनी वासनावंत वहिले । ते उपदेशप्रसंगें उपदेशकमती होती ॥ ३६४ ॥ जया प्राक्तनी वासना पूर्ण । ते माहात्मा मिळतांही कलंकल्लल । तयाच्या उपदेशाचा अर्थ पूर्ण । आपुलिया मतानुसार ओढिती ॥ ३६५ ॥ म्हणोनि जेथ दृढ श्रद्धा जयाप्रति । ते दृढ करावी तैसियाचि रीती । रसें मंत्र वा योगें निश्चिती । ओळखोनिया ॥ ३६६ ॥ येथ आपुलाचि अनुभव सांगतो नवीन । दिवस झाले दोन तीन । मज सुरतेचा गृहस्थ येवोन । भेटला होता ॥ ३६७ ॥ तो वैष्णव आहे पूर्वीचा । ऐसा भाव मज जाहला साचा । परि आतां उपासक आहे आनाचा । कामनेस्तव ॥ ३६८ ॥ सकाम दैवत जे होती । ते क्षणोक्षणीं व्यभिचरती । मग पूर्वजन्माची गती । कवण देखे ॥ ३६९ ॥ जे सर्वदा सकाम । त्यांचा

तंव कोठेंचि न बैसे प्रेम । जें आधीं सकाम आणि सुखरवा देखिलिया होती निष्काम । तयाचे तेंचि उपास्य होय पुढील जन्मीं ॥ ३७० ॥ एवं सांगितली रीती । परि हरिहरोपासक जे होती । ते परस्परा पावती । रामकृष्णोपासकही तैसेची ॥ ३७१ ॥ एवं दोन्ही मार्ग जन्मजन्मीचे । ओळखणें सांगितलें साचे । ज्ञानमार्गें एकत्व सकळाचें । ह्मणोनि ओळखण अप्रयोजक ॥ ३७२ ॥ ज्ञानोत्तर भक्तिमार्गी । कोठें उपास्तीचिये प्रसंगीं । आणि आह्मा तंव चित्त चौरंगी । श्रीगुरु गोविंद आवडती दोघे ॥ ३७३ ॥ ह्मणोनी आचार्यांही जे केलें । ज्याचें मत त्या करवीं स्थापविलें । ते सर्व संमतचि ज्ञाहलें । माहात्मया ॥ ३७४ ॥ तथापि हरिहरमत । आह्मीं ह्मणो भागवत । आणि केवलाद्वैताश्रित । प्रमाण यास्तव ॥ ३७५ ॥

वादी उवाच— मी पुष्कळसा भागवत होत चाललो, पण तुह्मी चिन्हावर आग्रह धरीत नाहीं तर आचार्यांनीं तरी चिन्ह सोडविण्याचा आग्रह कां केला होता हा एक, व कलीमध्यें देवी आणि गणपती दोनच उपास्य आहेत हा दुसरा, आणि दहा हजार वर्षें झाली असतां कलीमध्यें विष्णु राहणार नाहींत असें मेरुतंत्राचें वचन आहे हा तिसरा, आणि ह्मणून कलीमध्यें हरिहरोपासनाही वैकल्पिक आहे हा चवथा, असें मला चार संशय आहेत.

सिद्धान्ती उवाच— यज्ञोपवीतादिकांचा त्याग करून तप्तमुद्रादि चिन्हानें विशेष सत्वादृष्ट उत्पन्न होत नाहीं. ज्यानां वैदिक चिन्हांचा अधिकार नसेल त्यांनीं इतर चिन्हें धारण करावी असा आचार्यांचा अभिप्राय होता. कलींत देवी आणि गणपतीच उपास्य आहेत, व विष्णूची १०००० वर्षें झाल्यानंतर स्थिती नाहीं ही वचनें विशेषेंकरून तंत्रांतील आहेत. पुराणविरोधी तंत्र प्रमाण नाहीं हें मी तुला पुष्कळदां सांगितलें आहे; अथवा ही वार्ता एखाद्या दुसऱ्या कल्पांतील समजावी, आणि मेरुतंत्रांत असें ह्मटले आहे कीं, १०००० वर्षें झाल्यावर लोक विष्णूला भजणार नाहींत; तेवढ्यावरून विष्णूची स्थिती नाहींसी होईल असें नाहीं. श्रीमद्भागवत व नारदपुराणादिकांचा विचार केला असतां कलीमध्यें हरिहरभक्तीच तारक आहे, आणि भविष्योत्तर पुराणाचा

विचार केला असतां कलीच्या युगांत मध्यें मध्यें विष्णूचा आविर्भावही झाला आहे असें दिसून येते. कल्कीपुराणावरून कलीच्या अंतीं बीजरूपानें विष्णुसंकीर्तन दिसून येते. तेव्हां वैष्णव धर्माचा कलीमध्यें क्षय होईल या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या विषयाचें निरूपण आणखी पुढेंही करूं. आतां हरिहरभक्ति कलीमध्यें वैकल्पिक नाहीं हेंही तुला सांगतो. नारदीयपुराणांत विष्णुशिवाचें नाम जो घेतो त्याला कली बाधत नाहीं असें सांगितलें आहे, आणि श्रीमद्भागवतांत परीक्षितीनें कलीचा नाश केला नाहीं याचें कारण कलीमध्यें भगवद्भक्ति विशेष वाढेल हें सांगितलें आहे, व पद्मपुराणांतही तसेंच सांगितलें आहे; ह्मणून कलीमध्यें शिवविष्णुभक्ति वैकल्पिक नाहीं.

वादी उवाच— अहो! पण कमलाकरभट्टांनीं आपल्या ऋग्वेदीय आन्हिकामध्यें पंचायतनापैकीं एक, किंवा पांचही देव संप्रदायानुसार पुजावे असें ह्मटलें आहे. तेव्हां हरिहरोपासना वैकल्पिक नसून सर्वच कलिजनांनां सारखीच लागू आहे असें कसें ह्मणतां ?

सिद्धान्ती उवाच— अरे! पण निर्णयसिंधूही कमलाकरभट्टांनीं केला आहे ना ? तो तूं कसा पाहिला नाहींस ? त्याच्या तृतीय परिच्छेदांतील आन्हिक प्रकरणांत "तत्रापि कलौ हरिहरयोः पूजा प्रशस्ता" असें ह्मटलें आहे. तूं संस्कृतवेत्ता असल्यामुळें ह्याचा अर्थ तूं जाणतोच आहेस, आणि "चतुर्विंशतिमतव्याख्यानादि" ग्रंथांत—

न विष्ण्वाराधनात्पुण्यं विद्यते कर्म वैदिकम् ।
तस्मादनादिमध्यांतं नित्यमाराधयेद्धरिम् ॥
अथवा देवमीशानं भगवन्तं सनातनम् ।
प्रणवेनाथवा रुद्रगायत्र्या त्र्यंबकेन वा ॥
तथोन्नमः शिवायेति मंत्रेणानेन वा यजेत् ॥

ही कूर्मपुराणाची वचनें घेतली आहेत; व ह्यांत विष्णूचें किंवा शिवाचेंच आराधन सांगितलें आहे. या वचनांचाही अर्थ स्पष्ट आहे, आणि त्याच प्रमाणें हेमाद्री आणि कमलाकरान्हिकादि ग्रंथांत "तत्रापि च कलौ नित्यं पूजयेद्धरिशंकरौ" हें नृसिंहपुराणांतील वचन घेतलें आहे. तेंही कलिविषयक पंचायतनपूजेचें आवश्यकत्व निराकरण करीत आहे. पुनः चतुर्वि-

शतिमतव्याख्येतील आन्हिक प्रकरणाच्या देवपूजाप्रस्तावामध्यें "तत्रापि कलौ हरिहरयोः पूजा प्रशस्ता" इत्यादि वचनांनीं भट्टोजीदीक्षितांनीं निर्णय केला आहे. जीं वचनें एकाच्याच उपासनेची बोधक आहेत, तीं तत्तत्संप्रदायपर आहेत; परंतु सर्वांनां हरिहराचीच उपासना विहित आहे. हा विषय पुढेंही आणखी सांगू.

वादी उवाच— ही माझी शंका सध्या निवृत्त झाली, परंतु आपण सांगितले कीं, वैदिक चिन्हें विशेष सत्वोत्पादन करितात, हें मला पटलें नाहीं; कारण जडानां सत्वोत्पादनाची तरी काय शक्ति आहे. दुसरें सत्वपदार्थाविषयींही निरनिराळ्या प्रकारचे वाद आहेत. कल्किपुराणांत सांगितलें आहे कीं, विष्णूचा नैवेद्य ह्मणजे सात्विक आहार समजावा.

" उच्छिष्टमवशिष्टं वा पथ्यं पूतमभीप्सीतम् ।
भक्तानां भोजनं विष्णोर्नैवेद्यं सात्विकं मतम् ॥४६॥
इंद्रियप्रीतिजननं शुक्रशोणितवर्धनम् ।
भोजनं राजसं शुद्धं आयुरारोग्यवर्धनम् ॥४७॥

(कल्किपुराण अध्याय ११)

अर्थ स्पष्ट— ह्या श्लोकांत जें अन्न राजस सांगितलें आहे, त्यालाच गीतेंत सात्विक म्हटलें आहे.

" आयुः सत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्द्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥८॥

(गीता अध्या० १७.)

याप्रमाणें आणखी पुष्कळ सात्विक पदार्थाविषयीं व त्याच्या लक्षणाविषयीं विवाद असून त्याच्या फलाविषयींही विवाद आहे. गीतेच्या सतराव्या अध्यायांत " यजन्ते सात्विका देवान " असें सांगितलें असून " यान्ति देवव्रता देवान् " असें नवव्या अध्यायांत म्हटलें आहे; आणि " सत्वाद्धर्मो भवेद्वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः " असें भागवतांत म्हटलें असून त्याचा अर्थ सत्व वाढल्यानें माझी भक्ति उत्पन्न होते असा आहे. तुम्ही सर्वांसच भागवद्धर्म उपदेश करूं पाहतां तर सर्वच सात्विक अन्न मिळणार तरी कसें ?

ओव्या–सिद्धान्ती ह्मणे एक उत्तर । गुण जडाचेचि धर्म समग्र । " गुणाः प्रकृति संभवाः " हें शार्ङ्गधर । बोलिले स्वयें ॥ ३७६ ॥ कोणापासोनि सत्व कैसें । वाढे हें ईश्वर जाणतसे । सकळ मायेचा स्वामी विशेषें । तोचि म्हणोनी ॥ ३७७ ॥ जीव जाणतां गुणसंक्रम । तरी तो झाला असतां सर्वज्ञोत्तम । यालागीं गुणवृद्धिकर्म । परमेश्वरोक्तशास्त्रेंचि कळे ॥३७८॥ पुरुष कर्म करी जेव्हां । गुण दोन परिणामें वाढे तेव्हां । मनोभावा आणि देवा । निर्मितुंचि ॥ ३७९ ॥ मनोभाव जीवा कळती स्पष्ट । परि ईश्वरासचि कळे अदृष्ट । जरी वासनेहून अदृष्ट । फलदाते भिन्न नसते ॥ ३८० ॥ तरी सुखासाठीं परस्त्रीगमन । करितां न होता नरक दारुण । स्वयेंचि दुःखामाजीं पतन । कवण वांछी ॥ ३८१ ॥ वासनासंवेग होता तीव्र । तेचि कर्म हा भागवत विचार । परी तेथ ही मानसजपादिवत् क्रिया प्रकार । विवक्षित आहे ॥ ३८२ ॥ वासनेनें अदृष्ट होत । परी वासना अदृष्ट नव्हे निश्चित । जेवीं बीजातूनि वृक्ष उपजत । परी बीज वृक्ष वेगळाले ॥ ३८३ ॥ एवं मानसकर्मे उपजे अदृष्ट । तेवीं वैदिककर्मेही उपजे स्पष्ट । नाहींतरी तीर्थव्रतादि कटकट । ह्मणावी लागेल ॥ ३८४ ॥ सात्विक आहारादिसेवनें करून । प्रथम सात्विक वासना उपजोन । मग अदृष्ट उपजे पूर्ण । हें सावधान धरीं चित्तीं ॥ ३८५ ॥ तुलसीमालादिकें करून । प्रथम अदृष्ट होय उत्पन्न । तेणें निरसोनियां विघ्न । पुढें वासना उपजती ॥ ३८६ ॥ भगवद्यजनीं पाहतां । दोन्ही युगपत् उपजती तत्वतां । गीतादिकांचा विरोध दाविला होता । त्यांचाही परिहार आतां ऐके ॥ ३८७ ॥ सत्वाचे प्रकार दोन सम्यक । सूक्ष्म आणि वैकारिक । शुद्ध सूक्ष्म मिश्र वैकारिक । भारतश्लोक मान येथ ॥ ३८८ ॥

> "कामं देवा ऋषयश्च सत्वस्था नृपसत्तम ॥ ७८ ॥ उत्तरार्ध
> हीनाः सत्वेन सूक्ष्मेण ततो वैकारिकाः स्मृताः" ॥ ७९ ॥ पूर्वार्ध
> ( महाभारत शांतीपर्व मोक्षधर्म अध्या० ३४८ )

भावार्थ— ऋषि देव सात्विक असती । परि सूक्ष्म सत्व नाहीं त्यांचे चित्तीं । ह्मणोनि वैकारिक ह्मणिजेती । अन्यगुणसंस्पर्शे ॥ ३८९ ॥ यास्तव गीतेंत सांगितला आहार । तो वैकारिक सत्वपर । किंचिद्राज-

सत्व निर्धार । कल्किपुराण त्यातेंचि ह्मणे ॥ ३०९ ॥ तो वैकारिकचि आहार जेव्हां । भगवन्नैवेद्य होय तेव्हां । सूक्ष्म सात्विक स्वभावा । प्राप्त होय ॥ ३९१ ॥

चूर्णिका— मांसादिकांचें करावया व्यावर्तन । त्वदुधृत कल्किपुराण श्लोकीं "पथ्यं पूतं" इत्यादि पदें उपलभ्यमान । जे हरिवंशी कथा कीं कृष्णास ब्राह्मणमांस दे घंटाकर्ण । परि ते नाहीं स्विकारिलें भगवंतान । गीतेंत जरी तामस सांगितलें उच्छिष्ट अन्न । तरी तें समजावें विष्णुनैवेद्यभिन्न । आणि किडे पडले शिळा नैवेद्य होवोन । तरी तेथ इच्छा न होय उत्पन्न । तो भगवदुच्छिष्ट न राहतां कृम्युच्छिष्ट होय ह्मणून । त्याचें करावया व्यावर्तन । विष्णु उच्छिष्ट असून । त्याची चिळस न येतां इच्छा झाली पाहिजे उत्पन्न । तोचि सात्विक हें सांगावया कारण । "अभीप्सितं" हें पद श्लोकीं ॥ ३९२ ॥ किंवा प्रसादाचा अनादर । न करावा हें "अभीप्सित" पद द्योती समग्र । घंटाकर्णाचा होता स्वाभाविक मांसाहार । त्याच्या प्रेमाचाचि देव करी अंगिकार । अंतर्यामीं अर्पण तव कोणताही होय आहार । ह्मणोनि सात्विका सात्विकचि आहार । सेव्य याचा पुढें सांगू विचार । आतां गुणफलविरोधपरिहार ऐके ॥ ३९३ ॥

ओव्या— ज्या सत्वें देवास जाणोनि मिळती । तें वैकारिक सत्व ओळखे चित्तीं । ज्या सत्वें उपजे भगवद्भक्ति । तें सूक्ष्म सत्व ओळखावें ॥ ३९४ ॥ या दोहोंसचि मिश्र आणि शुद्ध म्हणोन । विवेक चूडामणींत सत्वभेद केलें वर्णन । भागवत एकादशस्कंधीं स्थानादिकांचे जें निर्गुणपण । बोलिले ते सूक्ष्मसत्वाभिप्रायें करून जाणावें ॥ ३९५ ॥

चूर्णिका— आणिक तुझा प्रश्न । कीं अधर्म्यासचि भागवतधर्म केवीं होईल मान्य । सर्वही सात्विक नाहीं ह्मणून । तरी त्याचेंही एक समाधान । सामर्थ्य आहे आम्हाकारण । धर्में हें विश्वचि नियमावया लागून । जे केवळ सामान्य नीती सांगून । एखाद्यावरी विश्वास ठेवा ह्मणती बळें करून । त्यांच्यांताचि मतें होती भिन्न । कोणी नास्तिक होती स्वार्थी नीती सोडून । कोणी म्हणती विश्वास कां ठेवावा विचारा-

धीण । परी आम्ही सांगतो श्रुतियुक्तिअनुभवान । ह्मणूनि प्रमाण आमुचें मानी ॥ ३९६ ॥

ओव्या— जेथ आह्मी नाहीं वदत युक्ति । तेथ इतरासही श्रद्धे-वीण नाहीं गती । जेथ आह्मी वदतो युक्ति । तेथ इतर ह्मणती विश्वा-सेंचि जावें ॥ ३९७ ॥ श्रद्धा तीव्र ज्याची जेथें । ते निष्काम असतां जन्मांतरी पावतील अस्मद्धर्मातें । आणि मृदुश्रद्धेचें परमार्थइच्छिते । उपदेशें येतील मद्धर्मी ॥ ३९८ ॥ येथ त्यांची विचारें श्रद्धा होईल तीव्र । मग ते चाऱ्हीवर्ण अथवा वर्णेतर । बाह्यभक्ति करतील जरी निर्धार । तरी वासना शुद्ध होईल परी निर्विघ्नकर दैव उपजेल जन्मांतरीं ॥ ३९९ ॥ अंतर्भक्ति करतील कोणी । तरी तया वासना दैवशुद्धि याचि जन्मीं दोन्ही । द्विजा तव वैदिक धर्म पाळोनी । भागवत धर्म पाळितां ये ॥ ४०० ॥ धर्म अधर्म विधर्म । हें भविष्योत्तरपुराणीं बोलिले परम । वैदिक भागवत ह्मणिजे धर्म । आन धर्म अधर्म तो ॥ ४०१ ॥ धर्म तो होय देवाचा । अधर्म होय दैत्यांचा । विधर्म दोघाही न माने साचा । जो नरकाचा दायकू ॥ ४०२ ॥ धर्में सुखरूप सुरालय । अधर्में सुखरूप पाताळ होय । विधर्में मिळे यमालय । भगवद्भक्त वेगळा होय या तिहींहुनी ॥ ४०३ ॥ हें भविष्योत्तर-पुराणीं । प्रतिसर्ग पर्वणी । चतुर्थखंडी पाहुनी । घ्यावें अकरावें अध्यायीं ॥ ४०४ ॥

गद्य— मला थोडासा परधर्मविचारही करणें भाग पडणार आहे; परंतु तो मी प्राचीन आर्यग्रंथानुसारच करणार आहे. येवढ्याकरितां प्राचीन लेखन रीति सोडून आधुनिक रीतीला अनुसरून हा ग्रंथ लिहिला आहे असें कोणी ह्मणूं नये एवढी विनंती आहे.

ओव्या— आतां जगाचा पाहतां विचार । पांच धर्म मोठे भूवर । मनुष्य कल्पित इतर । धर्मांतर बहुत असती ॥ ४०४ ॥

चूर्णिका— आर्यधर्म, बौद्धधर्म, ईशपुत्रधर्म, पार्शीधर्म, आणि माहमदीधर्म, आर्यधर्म वेदभागवत । भेदें करून सकळा विश्रुत । आणि बौद्धधर्म तदागमें करून जाणती समस्त । निरूपिला आहे सूतसंहितेंत । किंवा मत्कृत मधुरमाधुकरींत पहावा ॥ ४०६ ॥ गुरुंडांचा ईशपुत्रधर्म ।

भविष्योत्तरपुराणीं त्याचें वर्म । तोही श्लोक परम । ऐक तुजप्रति सांगतो ॥ ४०७ ॥

" विकटान्वयसंभूता गुरुंडा वानराननाः ।
वाणिज्यार्थमिहायाता गौरुंडा बौद्धपंथिनः ॥ ७२ ॥
ईशपुत्रमते संस्थाः तेषां हृदयमुत्तमम् ॥ ७३ ॥

( भविष्योत्तरपुराण प्रतिसर्गपर्व चतुर्थखंड अध्या० २२ श्लोक ७२-७३ पूर्वार्ध. )

( भवि० प्रतिसर्ग प० खं० ४ अ० २२ )

याचा भावार्थ स्पष्ट समग्र । परि हें श्लोक पाश्चात्यपर । बौद्धांतूनि ईशपुत्रधर्म निघाला । हें आतां ही बहुलोक बोलती बोला । बौद्धांच्या जातकाचा मेळ पडला । स्वधर्मासि ह्मणती तेचि लोक ॥ ४०७ ॥ ईशपुत्रधर्मांत जी कथा । कीं सृष्टीचा प्रलय झाला होता । तेव्हां देवानें न्यूह नावेंत बैसविला होता । न्यूह म्लेच्छ होता । परि म्लेच्छ शब्दास नाहीं निंद्यता । हीचि भविष्यपुराणीं प्रतिसर्गपर्वणि प्रथमखंडी चौथे अध्यायीं कथा । तेथील एखादा श्लोक आतां । सांगतो ऐक ॥ ४०८ ॥

सदेहस्वर्गमायातो मोक्षधर्मपरायणः ।
आचारश्च विवेकश्च द्विजता देवपूजनम् ॥ ४१ ॥
कृतान्येतानि तेनैव तस्मात् म्लेच्छ स्मृतो बुधैः ।
विष्णुभक्त्याग्निपूजा च ह्यहिंसाच तपोदमः ॥ ४२ ॥
धर्मान्येतानि मुनिभिर्म्लेच्छानां हि स्मृतानि वै ॥ ४३ ॥

वादी उवाच— हेंच जर म्लेच्छधर्म असतील तर आर्यांचा व म्लेच्छांचा भेद तो काय असणार ?

सिद्धान्ती उवाच— आहे तर नाहीं कसा ? आह्मी पूर्वीच सांगितले आहे कीं, भागवतधर्म हा सर्वांना सारखा लागू आहे. प्रमाण घेतलेल्या श्लोकांत जे म्लेच्छांचे धर्म सांगितले, ते भागवतरूप आहेत; कारण त्यांत विष्णुभक्ति आहे, आणि ह्याच अध्यायांत न्यूह ज्याला आतां गुरुंडी भाषेंत नोहा ह्मणतात, तो कसें ध्यान करीत होता हें ह्याच अध्यायांत पुढे सांगितले आहे.

" न्यूहः स्मृतो विष्णुभक्तः सोऽहंध्यानपरायणः ।
एकदा भगवान् विष्णुस्तत्स्वप्ने तु समागतः ।। ४७ ।।

या न्यूहाची सोहं इत्यादिकें करून निर्गुण उपासना व विष्णु-भगवान स्वप्नांत आले होते इत्यादिकें करून सगुणोपासना द्योतित केली आहे. ही कथा संपूर्ण पहावयाची असल्यास हा अध्याय वाचून पहावा. याप्रमाणें या म्लेंच्छ धर्माचें व भागवत धर्माचें जरी साम्य असले तरी सध्याचे ईशपुत्रमत थोडेसे बौद्धधर्मासी व थोडेसे यवन धर्मासी मिश्र झालें आहे. बौद्धांतून निघाले आहे हें मागे लिहिलेल्या श्लोकांत आलेच आहे. आतां यवनमताचें लक्षण काय आहे तें थोडक्यांत ऐक.

ईश्वरः कारणं यत्रादृश्योऽस्ति जगतः सदा ।।३०३।। उत्तरार्ध
श्रुतिस्मृतीविना धर्माधर्मौ स्तस्तश्च यावनम् ।
श्रुत्यादिभिन्नधर्मोऽस्ति यत्र तद्यावनं मतम् ।। ३०४ ।।

हा श्लोक शुक्रनीतींत चवथ्या अध्यायांत आहे. जगाचें कारण व नेहमीं अदृष्य असा एक ईश्वर आहे. असें ते मानतात. यांचें धर्म व अधर्म श्रुतिस्मृतिरहित आहेत, ह्मणजे श्रुतींत ज्याला अधर्म ह्मटलें आहे त्याला हे अधर्मच ह्मणतील असा कांहीं नियम नाहीं. यांचा आचार भविष्योत्तर पुराणांत जसा सांगितला आहे, तो थोडक्यांत सांगतो:—

महमदश्च तैः सार्धं सिंधुतीरमुपाययौ ।। १९ ।।
पैशाचं देहमास्थाय भोजराजं हि सोऽब्रवीत ।। २४ ।।
ईशाज्ञया करिष्यामि पैशाचं धर्मदारुणम् ।
लिंगच्छेदी शिखाहीनः स्मश्रुधारी स दूषकः ।।२५।।
उच्चालापी सर्वभक्षी भविष्यति जनो मम ।
विना कौलं च पशवस्तेषां भक्ष्या मते मम ।।२६।।
मुसलेनैव संस्कारः कुशैरिव भविष्यति ।
तस्मान्मुसलवंतो हि जातयो धर्मदूषकाः ।।२७।।
( भविष्यपु० प्रतिसर्गप० खं० ३ अ० ३ )

ह्याचा अर्थ एखाद्या भाषांतरांतून पाहून घ्यावा. मला कंटाळा आल्यामुळें लिहीत नाहीं. वाटल्यास कोणी कोठून समजून घ्यावा.

सांगावयाचें इतकेंच कीं, सध्याचे ईशपुत्रमत यवनमतांत वर्ज्य केलेलें कौलमांस वर्ज करीत नाहीं. तेव्हां अशा प्रकारच्या या म्लेच्छधर्माशी व आर्यधर्माशी भेद आहेच. वर जे म्लेच्छाचें भागवतधर्म सांगितलें त्या धर्मानें तुकाराममहाराज जसें वैकुंठास गेलें तसा तो म्लेच्छराजाही स्वर्गाला गेला, परंतु तुकाराममहाराज निस्पृह असल्यामुळें वैकुंठाला गेले, व त्यानें राजधर्म पाळल्यामुळें थोड्याशा रजोगुणामुळें त्याला स्वर्गाला जावें लागलें, असा मी निर्णय करितो. आतां ईशपुत्रमत गुरुंडामध्यें आहे ते गुरुंड ह्मणजे कोण हें तुला कळण्याकरितां त्यांच्या भाषेचें मी भविष्यपुराणांतून उदाहरण देतो.

रविवारे च सन्डे च फाल्गुने चैव फर्वरी ।
षष्टिश्च सिक्सटी ज्ञेया तदुदाहारमीदृशम् ॥ ३७ ॥
( भवि० प्रति० प० खं० १ अ० ५ )

वादी उवाचः—या अध्यायांत महाराष्ट्रभाषेलाही म्लेच्छ ह्मटलें आहे.

सिद्धान्ती उवाचः—ह्मटलें असो; परंतु तेथील लोक वेदभागवतानुकूल असल्यामुळें अनार्य नाहींत. आतां पार्शिकासंबंधी माहिती सांगतो. "पार्शिकांस्ततो जेतुं" इत्यादि श्लोकांत पार्शिकांचें नांव प्राचीन अर्वाचिन काव्यांतून आढळते. मेरुतंत्रांत त्याविषयीं असें ह्मटलें आहे.

श्रीदेव्युवाच— कचिद्दक्षं कचिद्वामं कचित्सौरं च शांभवम् ।
ऊर्ध्वाम्नायं कचिद्दक्षमुत्तरं पश्चिमं कचित् ॥ १ ॥
ऊध आम्नायकं चापि गाणपत्यं च वैष्णवम् ।
पारसीकं कचिद्बौद्धं पाखंडं च कचित् कचित् ॥ २ ॥
तत्तत्प्रकरणे स्तौषिकचिन्निन्दसि तं पुनः ।
कचिन्निर्दैवतं मार्गं वेदान्तं वैदिकं कचित् ॥ ३ ॥
द्वीपधर्म्मान्खंडधर्म्मान्कुलधर्म्मान्कचित्कचित् ।
देशधर्म्मान्कालधर्मान् जातिधर्मान् कचित् कचित् ॥ ४ ॥
तंत्रोक्तमिदं तंत्रं प्रसन्नश्चेन्ममोपरी ।
तदा तत्वं मम ब्रूहि निःसंदेहा च मां कुरु ॥ ५ ॥
( मेरुतंत्र प्रकाश १० )

हा देवीचा शंकराला प्रश्न आहे, आणि श्लोकांचा अर्थ स्पष्ट

आहे. यांत इतरधर्मांबरोबर पाशुपतधर्माचें नांव घेतलें आहे, व तो धर्म शिवकृतच आहे असें दाखविलें असतां आधुनिक रीतनुसारी होईल ह्मणून मी लिहीत नाहीं. त्याविषयीं विचार अलोकव्याख्यानमालेंत करीन. आतां बौद्धासंबंधी थोडक्यांत माहिती सांगतो. "सर्वं शून्यं शून्यं, सर्वं दुःखं दुःखं, सर्वं स्वलक्षणं स्वलक्षणं, सर्वं क्षणिकं क्षणिकं, अशा त्यांच्या चार भावना आहेत. त्यांचा विशेष सर्वदर्शनसंग्रहांतून पाहून घ्यावा. बुद्धदेव हा परमेश्वराचा अवतार आहे हें भागवतादि-पुराणांत स्पष्ट आहे, परंतु बौद्धलोक बुद्धाला अवतार समजत नाहींत. एक जैनधर्मही बौद्धाला थोडासा अनुकूल व थोडासा निराळा आहे. हे दोन्हीही धर्म अहिंसेला आचार समजत असून, बौद्धधर्म मेलेल्या पदार्थांचे मांस खाण्यास मना करीत नाहीं, व जैन करतो. आर्हतराजापासून जैनधर्म निघाला आहे अशी भागवतांत कथा आहे, आणि सुतसंहितेच्या यज्ञवैभवखंडांत बौद्धधर्माहून त्याला उत्कृष्ट मानलें आहे. आतां मनुष्य-कल्पितही कांहीं धर्म आहेत. ते उत्कृष्ट पूजेवर अवलंबून आहेत, जसें वऱ्हाडांतील दिवाळीच्या गाण्यांत "चवरा गोंड्याची सावली । असी तिफन माउली" याप्रमाणें गहु पेरणाऱ्या तिफणेची अन्नदात्री ह्मणून स्तुती केली आहे, व तिफणीपेक्षां गाईला वरिष्ठ मानलें आहे. "शेवटी ओवाया ओवाया । फूला चंवेलीच्या माया । घाला भिवरीच्या गया । लागा माऊलीच्या पाया" ह्या सर्व अशुद्ध भाषेंत ळकाराचा यकार अपभ्रंश झाला आहे. याप्रमाणें आश्विन शुद्ध १५ चे दिवशीं मातीची पुतळीं करून पुजतानां मुली गाणी ह्मणत असतात. "चळना भुलाई लगना जावू" इत्यादि त्यांची गीतें आहेत. ह्या गाण्यांची भाषा अत्यंत निरर्थक असून त्याला यमकें मात्र असतात; जसें "मोरयालें आल्या शेंगा । घाल व पोरी पिंगा" परंतु गीत गातानां त्यांच्या मनांत एक देवीभावना असते. आसरा ह्मणून कांहीं सात देवी आहेत. त्यांचा त्या भुलाईवर आरोप करतात. हा प्रकार सर्व वऱ्हाडांत प्रसिद्ध आहे. असाच इतर देशांतही असतो. ह्यांत श्रेष्ठ धर्म कोणता हें मी प्रथम सूतसंहितेंत सांगितलें तसें सांगून नंतर त्यांनां भागवत कसें करावें हें सांगतो—

स्वमनीषिकयोत्पन्नो निर्मूलोऽधर्मसंज्ञितः ।
श्रद्धया सहितो यस्तु सोऽपि धर्म उदाहृतः ॥ १३ ॥
( सूतसंहितायज्ञवैभवखंड अ० २० )

अर्थ स्पष्ट– ह्या धर्माला धर्म ह्मणण्याचें कारण, आपल्यापेक्षां कांहीं तरी विशेष आहे अशी कल्पना आहे, एवढेंच आहे. केवळ नास्तिकापेक्षां यांच्यांत श्रद्धा असते. जड तिफण वगैरेचे ठिकाणीं पूज्यभाव ठेवणें यांत कांहीं तरी देहाहून भिन्नवृत्ति धरावी लागते. नास्तिकांनां ती मुळींच धरावी लागत नाहीं, ह्मणून हा धर्म आहे.

वादी उवाचः– अहो ! सूतसंहितेंत चार्वाकधर्माला देखील थोडेसे बरें मानलें आहे.

सिद्धान्ती उवाचः— केवळ देहावर बुद्धि ठेवून कुठें श्रद्धा न ठेवून इच्छेस वाटेल तसें वागणाऱ्या मनुष्यापेक्षां व्यवहारचातुर्य तरी त्यानें येते, इतक्याच पुरते बरें मानलें आहे. किंवा छांदोग्यांतील विरोचनाप्रमाणें देहाला जरी ब्रह्म समजले तरी भूचरीमुद्रेनें त्याचें ध्यान करून, किंवा दर्पणयोगानें ध्यान करून आलोकयोगांत जातां येईल, असा हा देहात्मभावनेचा थोडा उपयोग असल्यामुळें, चार्वाकधर्माला बरें ह्मटलें आहे; परंतु त्यांतील तत्वज्ञान दूषित आहे. त्यापेक्षां या मनुष्यकल्पित धर्मांत विशेष श्रद्धा आहे ह्मणून तो विशेष आहे. ज्या धर्माचा आचार अज्ञातसिद्ध असून सत्ववर्धक आहे, आणि तत्वज्ञान अबाधित असून धर्माचा व तत्वज्ञानांचा मेळ आहे, आणि तसीच परंपरा अविच्छिन्न कायम ठेवण्याचा ज्या धर्मांतील आचार्यांचा उद्योग झाला आहे, तो धर्म उत्तम गणल्या गेला आहे. तसा एक श्रौतधर्म आहे हें ह्या सूतसंहितेंत श्लोक क्रमानें सांगतात:—

निर्मूलोऽपि स्वबुद्ध्यैव कल्पितोऽपि महर्षयः ।
देवताराधनाकारो धर्मः पूर्वोदिताद्वरः ॥ १४ ॥

निर्मूल ह्मणजे ज्याला शास्त्रप्रमाण नाहीं असा. देवताकार ह्मणजे तिफणीपेक्षां कोणी तरी देव निराळा आहे अशा समजुतीचा. विष्ठामूत्रादि सर्वच निकृष्ट समजतात, ह्मणून त्याला कोणी देव मानीत नाहींत. शिश्नांबुकरत्यादिकांस "मूत्रपानं शिवेनोक्तम्" इत्यादि मलमूत्राचे खाणें

पिणें लिहिलें आहे, ते देव मिळण्याचे साधन समजून लिहिलें आहे; ईश्वर समजून लिहिलें नाहीं. ह्यांनां देखील भागवत करण्याची रीती मी मागें एका कुसुमांत सांगितली आहे.

देवताराधनाकारान्निर्मूलाद्बुद्धिकल्पितात् ।
धर्माच्छ्रेष्ठः समाख्यातः समूलो धर्म आस्तिकाः ॥ १५ ॥

समूल म्हणजे विशेष पुरुषानीं घालून दिलेला असा; परंतु तो पुरुषही रानटी लोकांतलाच विशेष समजावा. हा धर्म पिशाचपूजादिरूप असतो; परंतु तंत्रोक्त पिशाचपूजा समजूं नये. त्या पुरुषानें घालून दिलेली पिशाचपूजा समजावी.

समूलेषु च धर्मेषु बुद्धागमसमन्वितः ।
धर्मः श्रेष्ठ इति प्रोक्तो धर्मतत्वविशारदैः ॥ १६ ॥
बुद्धागमोदिताद्धर्मादर्हागमसमीरितः ।
धर्मः श्रेष्ठ इति प्रोक्तो धर्मतत्वविशारदैः ॥ १७ ॥

अर्थ स्पष्ट— बुद्धधर्माहून जैनधर्माचे श्रेष्ठतेचें कारण आतां सांगितलें आहेच.

" अर्हागमोदिताद्धर्मात्प्राजापत्यागमोदितः । धर्मः श्रेष्ठ इति प्रोक्तः सर्वधर्मार्थवेदिभिः ॥ १८ ॥ प्राजापत्यागमे प्रोक्ताद्धर्माद्विद्विदांवराः । मया श्रेष्ठ इति प्रोक्तो धर्मो विष्ण्वागमोदितः ॥ १९ ॥ विष्ण्वागमोदिताद्धर्मादशेषादस्तिकोत्तमाः । शैवागमोदितो धर्मो वरिष्ठो नैव संशयः ॥ २० ॥ शैवागमोदितो धर्मो द्विधा पूर्वमुदीरितः । अधःस्रोतोद्भवस्त्वेक ऊर्ध्वस्रोतोद्भवोऽपरः ॥ २१ ॥ अधःस्रोतोद्भवाद्धर्मादूर्ध्वस्रोतोद्भवः परः । कामिकादिप्रभेदेन स भिन्नोऽनेकधा द्विजाः ॥ २२ ॥ अधः स्रोतोद्भवो धर्मो बहुधा भेदितस्तथा । ऊर्ध्वस्रोतोद्भवाद्धर्मा स्मार्ता धर्मा महत्तराः ॥२३॥ स्मार्तेभ्यः श्रौतधर्माश्च वरिष्ठा मुनिसत्तमाः । तेषां शाखादयः श्रेष्ठास्तेषां भस्मावगुंठनम् ॥ २४ ॥ रुद्राक्षधारणं चापि शिवाद्याख्याभिभाषणम् । शिवलिंगार्चनं भक्त्या शिवोऽहमिति भावना ॥ २५ ॥ शिवज्ञानैकनिष्ठस्य शुश्रूषा च विशिष्यते । तेषां वेदान्तवाक्यानां तात्पर्यस्य निरूपणम् ॥ २६ ॥ वरिष्ठं सर्वधर्मेभ्यो ज्ञानं मोक्षैकसाधनम् । ज्ञानान्नास्ति परो धर्म इति वेदार्थनिर्णयः ॥२७॥ ( सूतसंहिता–यज्ञवैभवखंड–अ० २०)

अर्थ संस्कृतवेत्या पंडितांना माहित आहे, व मलाही माहित आहे, परंतु कंटाळा आल्यामुळें लिहीत नाहीं; व अर्थ स्पष्टहि आहे. येथें विष्ण्वागम ह्मणजे नारदपंचरात्र किंवा भागवत समजूं नये, तर दुसरें कर्महीनाद्यागम समजावें. याचा विशेष विचार पुढें सांगेन. अथवा सूतसंहिता शिवपुराण असल्यामुळें विष्ण्वागमाला न्यून सांगितलें आहे. असें विष्णुपुराणांत शिवालाही न्यून सांगितलें आहे. भागवतांत ज्ञानसमुच्चित विष्णुभक्ति व सूतसंहितेंत ज्ञानसमुच्चित शिवभक्ति मुख्य सांगितली आहे, ह्मणून अवांतर विरोध असला तरी मुख्यतः विरोध नाहीं. ह्याचाही विशेष विचार पुढें सांगेन. हे जे सर्व धर्म सांगितले ह्या सर्व धर्मांत हें असेंचे असेंच राहिल्यास, मनुष्यकल्पित धर्मांतील पुरुष प्रारब्धविशेषावांचून त्याच क्रमानें जात आहे असें गृहीत केलें तर, वैदिक धर्मांत येण्याला त्याला कल्पासारखा काळ लागेल, व इतर धर्माला युगासारखा लागेल; आणि बौद्ध जैन तांत्रिक धर्मांना जन्मांतर लागेल. हा सर्व काल वैदिकधर्मयोग्यता येण्याचा आहे; कारण ज्या धर्मांत ईश्वर नाहीं, त्या धर्माला प्रथम ईश्वरवादी व्हावें लागतें. हा विचार असो. संक्षेपानें ह्या सर्व धर्मांचा असा विचार करितां येईल. अदृष्ट व वासना धर्मानें उत्पन्न होत असतात; हें आम्ही मागें सांगितलें आहे. अदृष्ट बाह्यचिन्हानें उत्पन्न होत असून नीति वगैरे अंतश्चिन्हानें वासना उत्पन्न होत असतात. देहाश्रित धर्मानें बहुशः अदृष्ट होत असतें व अंतःकरणाश्रित धर्मानें बहुशः वासना होत असतात. हा क्षुल्लक आणि साधारण असा नियम आहे. ह्याचें मुख्य तत्व तर अंतःकरणाच्या तीव्र गुणसंक्रमणांत आणि तीव्र क्रियेंत आहे. आत्मा शुद्ध, बुद्ध, नित्य मुक्त आहे. कांहीं धर्मांत देहचिन्ह उत्तम आहेत, व अंतःकरणचिन्ह मलिन आहेत, त्यांचे देहचिन्ह उत्तम केले पाहिजेत. कांहीं धर्मांत अंतःकरणचिन्ह उत्तम आहे तर देहचिन्ह मलिन आहेत. कोठें निरात्मवाद आहे तर कोठें संशयवाद आहे. ह्या सर्व धर्मांची एकता ईश्वरप्राप्तिनिष्ठारूपानें एका श्लोकानें आर्यमाहात्म्यांनीं केली आहे. तो श्लोक हाः—

यं शैवा समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदांतिनो ।
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ॥

अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः ।
सोऽयं वो विदधातु वाञ्छितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥

ह्यांत वैदिक अवैदिक मतांचा समन्वय झाला आहे. अर्थ स्पष्ट आहे. बौद्धांतील अंतःकरणचिन्हें उत्तम आहेत; परंतु निरात्मवाद व निरीश्वरवाद ह्या दोनमुळें वैदिक धर्माशीं ह्याचा भेद आहे. त्यांत शून्यवादाचा व वेदांतांतील ब्रह्मवादाचा थोडासा समन्वय योगवासिष्ठकारांनीं केला आहे.

वादी उवाचः-- वेदांती लोक आपल्या दृष्टीनें सर्वांचाच समन्वय करून घेतात, परंतु ते ते धर्मवेत्ते मानतात काय ?

सिद्धान्ती उवाचः-- कांहीं विचारी मानतातच. कथासरित्सागरांत नागार्जुन हे भगवान बुद्धाच्या गतीला गेले असें स्पष्ट ह्मटलें आहे.

अकार्यं मा कृथा राजन्नशोच्यो ह्येष ते सखा ।
नागार्जुनोऽपुनर्जन्मा गतो बुद्धसमां गतिम् ॥ ५३ ॥
( रत्नप्रभालंबकतरंग ७ )

त्या बौद्ध नागार्जुनानें देखील शून्यवादाचा व वेदान्तांतील ब्रह्मवादाचा समन्वय थोडासा मानला आहे.

" सर्वालंबनधर्मैश्च सर्वतत्वैरशेषतः ।
सर्वक्लेशाशये शून्यं न शून्यं परमार्थतः " ॥
( स्पंदप्रदीपिकेंत नागार्जुनाच्या ग्रंथांतून घेतलेला श्लोक )

अर्थ स्पष्ट-- याप्रमाणें नागार्जुनाचे ह्मणणें असून " आलोकमालकार" बौद्धाचेंहीं ह्मणणें असेंच आहे.

विरुद्धत्वात्तमोवृत्तेर्नावकाशं ददाति या ।
साऽवस्था काप्यविज्ञेया मादृशा शून्यतोच्यते ॥ १ ॥
न पुनर्लोकरूढ्यैव नास्तिक्यार्थानुपातिनि ।

अर्थ स्पष्ट-- भगवान बुद्धानें एकाच तत्वाचा बोध केला असून शिष्यांच्या बुद्धिभेदामुळें त्याचे चार प्रकार झाले, असें स्वामीविद्यारण्य सर्वदर्शनसंग्रहांत ह्मणतात. बुद्धानें जो धम्मपदादि ग्रंथांत नीतिबोध केला आहे, तो संपूर्ण आर्यधर्मांत पूर्वींच संग्रहीत आहे. असा पंक्त्यनु-

सार मेळ पाहून देखील दाखविणें शक्य आहे. ह्याप्रमाणें जैनधर्माच्या "समयसारांत" वेदांताच्या ब्रह्माचा समन्वय झाला आहे.

"उदयति न नयश्रीरस्तमेति प्रमाणं क्वचिदपि च न विद्मो याति निक्षेपचक्रम्
किमपरमभिदध्मो धाम्नि सर्वंकषेऽस्मिन्ननुभवमुपयाते भाति न द्वैतमेव" ॥

ह्याचा स्पष्ट अर्थ मला ठाऊक आहे, परंतु तो करून देण्यास जैनशास्त्राचें नयनिक्षेप इत्यादि पदार्थांचे ज्ञान करून द्यावें लागेल. त्यानें ग्रंथ फार वाढेल ह्मणून समाधींत आत्मप्रत्यय असून द्वैत कांहीं भासत नाहीं, एवढा भावार्थच सांगतो. पूर्वी म्लेच्छराजानें पाळलेले भागवत धर्म जर कोणी पाळील तर, तो याच जन्मांत आमचा उपदिष्ट होण्यास पात्र होईल. ईशपुत्र धर्माला भविष्यपुराणांतील न्यूहाचाराच्या द्वारानेंही उत्तम गती आहे. बौद्धांनीं बुद्धाला विष्णूचा अवतार समजलें पाहिजे. त्याविषयीं मेरुतंत्रांत असें सांगितलें आहे:—

" अथातः संप्रवक्ष्यामि बौद्धमंत्रं महाफलम् । सभ्यत्वान्न द्विजातीनामधिकारोस्ति कर्हिचित् ॥ १३१४ ॥ वाममार्गरता विप्रा कुंडका जातिविच्युताः । हीना वैदिकसंस्कारैः प्रमादान्म्लेच्छतां गताः । गोलकाश्च तथा जात्या कायस्थादय एव च ॥ १३१५ ॥ बौद्धं विष्णुं समारभ्य भुक्तिं मुक्तिं प्रयान्ति ते । पतितानामयं मंत्रः संप्रोक्तः शरणप्रदः ॥ १३१६ ॥ नमो भगवते बुद्ध संसारार्णवतारक । कलिकालादहं भीतः शरण्यं शरणं गतः ॥ १३१७ ॥ आद्यैः पदैश्चतुर्भिश्च चरणद्वितयेन च । षडंगविधिराख्यातः सर्वेण व्यापकं चरेत् ॥ १३१८ ॥ पद्मे पद्मासनस्थं च ऊर्वोर्न्यस्तकरद्वयम् । गौरं मुंडितसर्वांगध्यानस्तिमितलोचनम् ॥१३१९॥ पुस्तकासक्तहस्तैश्च नानाशिष्यैश्च शोभितम् । इंद्रादिलोकपालैश्च ताम्रवर्णाम्बरावृतम् ॥ १३२० ॥ यवं ध्यात्वा यजेत्पद्मे द्वात्रिंशद्दलसम्मिते । कर्णिकायां षडंगानि दले शिष्यान्यजेत्क्रमात् ॥ १३२१ ॥ मीनांकं ललितां वीरं योगिनीं ज्ञानदायिनीम् । सर्वज्ञं सुगतं बुद्धं पार्श्वनाथं तथागतम् ॥ १३२२ ॥ चार्वाकं धर्मराजं च जिनं पद्मावतीं तथा । कामिनीं च महामायां श्रीकृष्णं च विनायकम् ॥ १३२३ ॥ समन्तभद्रं वर्त्मर्षिं निधिचंद्रं मनोहरम् । षडभिज्ञं दशबलं शास्तारं श्रीधनं क्षयम् ॥१३२४॥ दंडिनं मुंडिनं क्रान्तं श्रावकं लोकपोषणम् । तद्बाह्ये भूपुरे दिक्दान्तदस्त्राणि

च पूजयेत् ॥ १३२५ ॥ वर्णलक्षं जपेन्मंत्री होमयेच्च घृतौदनम् । तुळसीमिश्रतोयैश्च भगवंतं प्रतर्पयेत् ॥ १३२६ ॥ परस्य दुःखकरणं मनसापि न चाचरेत् । एवं तु वर्तमानस्य वाक्सिद्ध्यादि प्रजायते ॥१३२७॥ राजानो वशगास्तस्य नाशं यान्ति ह्युपद्रवाः । भूतप्रेतादिपीडायां महाभयदभये तथा ॥ १३२८ ॥ ( मेरुतंत्र प्रकाश २६ )

ह्या सर्व श्लोकांचे रहस्य इतकेंच आहे कीं, सकाम पुरुषानें बुद्धानें सपरिवार पूजन करावें, निष्काम बौद्धानें केवळ हा मंत्रच जपावा, व बुद्धाचें ठिकाणीं विष्णुभावना करावी. आह्मीही बुद्धाला देव समजून नमस्कार करितो, तसा बौद्धही करतील तर या जन्मीं ते भागवत असून जन्मांतरीं ते पूर्ण भागवत होतील. वाममार्गी लोकांनाही बौद्धमार्गानेंच जी गती सांगितली आहे, त्याचे कारण त्यांत अंतःकरणधर्म उत्तम आहेत हेंच आहे. यद्यपि बौद्धमार्गापेक्षां वाममार्गाला आर्य थोडेसे विशेष मानतात, त्याचें कारण तत्वज्ञानदृष्टीनें तो निरात्मवादा इतका किंवा स्याद्वादा इतका वेदासी विरूद्ध नाहीं, परंतु आचारदृष्टीनें बौद्धाचारच त्यापेक्षां उत्तम आहे असें मी ह्मणतो, कारण

मद्यं मासं च मीनं च मुद्रा मैथुनमेव च ।
एते पंचमकारास्युर्मोक्षदा हि युगे युगे ॥

इत्यादि भयंकर प्रकार बौद्धधर्मांत नाहींत. बौद्धानां जर आर्यधर्मांत येण्यास जन्मान्तर लागेल असें कोणाचे ह्मणणें असेल तर, वाममार्गियांनांही ते लागलेंच पाहिजे असें मी ह्मणतो. यवनमताचा व आर्यमताचा समन्वय करण्याचा प्रयत्न पंजाबांत नानकानें, हिंदुस्थानांत कबिरानें व महाराष्ट्रांत शेखमहम्मद यानीं केलेला आहे तो असा—

राम रहिमा करिमा केशव अलख नाम सब एकहि है ॥
जिस्को तुम बिसमिल्ला कहते वोहि विष्णु हमारा है ॥ १ ॥
( कबीर )

हक्कला इलाहा इल्ला । हजरत महम्मद रसुलल्ला ॥
या दोहों चरणांत पाहिजे ओळखिला । ईश्वर विश्वरूपें ॥ ६६ ॥
लाइला याची टीका अवधारा । नामरूपा वेगळा ईश्वर सारा ॥
तेणें शीघ्र भवनदीचा फेरा । चुकेल बापा ॥ ६७ ॥

मुसलमान कहे जिकिर भुलानद । मऱ्हाठे ह्मणती कथेचा आनंद ॥
परि दोही भाषांचा भेद । ईश्वर अल्ला जाणे ॥ ६८ ॥
ईश्वर ह्मणजे विश्वंभर । झगडाचा नोहे ओळखा जाहिर ॥
त्यापासून असंख्य अवतार । रामकृष्णादि जन्मले ॥ ६९ ॥
अल्ला ह्मणजे अलिफ न्यारा । बाहुनही निशिदिनी अवधारा ॥
एकला एक जीवका प्यारा । गुफर रहिम ॥ ७० ॥

( शेखमहम्मदकृत योगसंग्रामप्रसं० १८ )

याप्रमाणें कर्मपंथानें येण्याकरितां अदृष्टकारणत्वास्तव जन्मांतरानेंच इतरांनां येता येते. भक्तिपंथांत तत्व मान्य करील तर कोणालाही येण्याचा अधिकार आहे. विश्वामित्राप्रमाणें तीव्र तप करून ब्राह्मण्य जसें याच जन्मांत मिळविणें सुलभ आहे, त्यापेक्षां तीव्र भगवद्भक्ति करून याच जन्मांत ईश्वर मिळविणें अधिक सुलभ आहे. कारण तपानें ब्राह्मणपणा मिळविण्यास योगसूत्रांत सांगितल्याप्रमाणें जात्यंतरपरिणामाची जशी आवश्यकता आहे, तशी ईश्वर मिळविण्यास नाहीं. जेवण्याचा व लग्नाचा मात्र आग्रह करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कारण त्याला क्रमिक सात्विक अदृष्टाची आवश्यकता आहे. गुणकर्मवर्णपक्षांत कांहीं हा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. ते कांहींही असो. व्यर्थ जन्मवर्णपक्षाचा चित्तक्षोभ करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. शिवाय ज्यांनां कर्मवाद मान्य आहे, त्यांनां अदृष्टजन्य जात्यधिकार मान्य असलाच पाहिजे; पण गुणकर्मवादाचीही शास्त्रांत वाक्यें असल्यामुळें तोही असूं शकतो. आह्मी वर्णकुसुमांत तातांच्या वाक्यावरून जो जन्मपर निर्णय केला आहे, त्याच वाक्यांचा अर्थ गुणकर्मपरही करतां येतो; परंतु ह्या संशयांत आह्माला शिरून कांहीं करावयाचें नाहीं. गुण हे सेव्य आहेतच, व अदृष्टाप्रमाणें जन्म होतोच. तेव्हां आर्यलोक कोणाच्या हातचे जेवीत नाहींत, तर दुसऱ्यानें पाहिजे असल्यास त्यांच्या हातचे जेवूं नये, परंतु हठानें मात्र आर्यांनां जेवावयास लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्यांत उच्चनीचतेचा किंवा द्वेषाचा मुळींच भाग नाहीं. केवळ धर्माची आज्ञाच तशी आहे. जातीवादानेंच आह्मी दुसऱ्याला आपल्या जातींत जबरदस्तीनें घेत नाहीं. याचें कारण उच्च-

नीचभाव किंवा द्वेष नसून ज्या ज्या धर्माचे जे लोक असतील त्यांनी त्यांनी आपला धर्मच तीव्रश्रद्धेनें पाळावा, ह्मणजे जन्मांतरीं किंवा स्वर्गांत त्या सर्वांचा मेळ होईल. आज एक व उद्यां दुसरा अशा प्रकारचे धर्मांतर करीत सुटूं नये. कोणत्याच धर्मावर जर तीव्र श्रद्धा नसेल, व सर्वच धर्मांवर जर मृदु श्रद्धा असेल तरी त्यानें आपापल्या धर्मांतच राहावें असें आह्मी ह्मणतो; परंतु इतकेंच कीं, जसें आह्मी कोणाचा धर्म मोडण्याची मनानेंही इच्छा करीत नाहीं, त्याप्रमाणें आमचाही धर्म मोडण्याची कोणी इच्छा करूं नये एवढीच विनंती आहे. आतां ज्याची इतर सर्वमतावर मृदु श्रद्धा असून, आमच्या उपदेशानें भागवत धर्मावर तीव्र श्रद्धा होईल तर, त्यानीं भोजनादि स्थानीं ऐक्य न करितां भजनादिस्थानीं खुशाल आमच्याशीं ऐक्य करावें; व भोजनादि स्थानीं ऐक्य करण्याचा आग्रह असल्यास जगन्नाथप्रसादाविषयीं थोडासा असूं शकतो. वर्णाचें तत्व कोणतेंही असले तरी व्यर्थ समाजक्षोभ करण्याची आमची इच्छा नाहीं. याप्रमाणें प्राचीन आर्यमतांस अनुसरून सर्व धर्मांचा हा समन्वित विचार मी केला आहे. आतां सर्वथा स्वभोगाचा व स्वाहंकराचा परित्याग करून, तीव्रभक्तीनें सर्वच भगवंताला अर्पण करील तर, कोणतेंही कर्म भागवतधर्मांत अंतर्भूत होतें हें आह्मी वारंवार प्रतिपादिलेंच आहे. आतां कोणी मग असें ह्मणेल कीं, तुह्मी सर्व धर्मांना आपल्याकडे ओढूं पाहतां, तसें त्या धर्मांत कां जात नाहीं ? तर आह्मी कोणाला ओढीत नाहीं हें आतांच सांगितलें आहे; व आमच्या धर्मांत सर्व धर्मांची तत्वें संकलित झाली असल्यामुळें, तीं सर्व आह्माला प्राप्तच आहेत, त्यामुळें कोणापासून समजून घेण्याचीही अपेक्षा नाहीं.

वादी उवाच– अहो ! एवढा समन्वय केला त्यापेक्षां पुराणादिकांना क्षेपक मानलें असतें ह्मणजे झालें असतें.

सिद्धान्ती उवाचः— तशानें ज्याला जें आवडत नाहीं ते तो क्षेपक मानेल व सर्व अव्यवस्था होईल. जरी पुराणादि ग्रंथांत कोठें कोठें क्षेपकाभास होतो, त्याचा कायव्यूह विचारानें समन्वय होत असल्यामुळें, व ते पुराणऋषि आणि आचार्य दिव्यदृष्ट्यादिसामर्थ्येंकरून अस्मद्विशिष्ट असल्यामुळें त्यांच्या आकाराने [illegible] आह्माला

भाष्य आहे; परंतु आम्हाला विचारीत असणाऱ्या आमच्यापेक्षांही न्यून दिसत असणाऱ्या तुझ्यासारख्या वादींचा क्षेपकवाद घेऊन आम्ही आपली स्वधर्मनिष्ठा कां दवडावी ? हेंच श्रीशांकरमताचें सहिष्णुत्व आहे; व त्याच मताचे आम्ही भागवत आहोंत. " मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजन्ते " इत्यादि वाक्यांनीं त्यांनीं मधुराद्वैत गुप्तरूपानें दाखविलें असल्यामुळें, श्रीभगवत्पूज्यपादचरणाचा वियोग निमिषभर सहन करण्याची आम्ही इच्छा करीत नाहीं. यद्यपि भविष्यपुराणांत रामानुजांनीं शंकराचार्यांनां जिंकिलें असें आहे, तथापि ते ज्ञानपक्षांत नसून उपासनापक्षांत लिहिलें आहे. तेव्हां उपासनेची प्रशंसाच त्या आख्यायिकेचा अर्थ आहे; किंवा अन्यकल्पांतील ती कथा आहे. या कल्पांतील शंकराचार्य व रामानुजांच्या ऐतीह्य काळांचा मेळ नाहीं. भविष्योत्तरपुराण वाचून पाहिल्यास अनेक कलियुगाची माहिती एकदम दिली आहे असें दिसून येईल, व महाभारतांतर्गत शांतिपर्वांतील मोक्षधर्म वाचून पाहिल्यास व्यासांनां मागच्या पुढच्या हजारों कल्पाचें ज्ञान आहे हें दिसून येईल. तेव्हां भलत्याच एखाद्या शंकराचार्यांचा व रामानुजांचा वाद भविष्यपुराणांत सांगितला आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. किंवा शिवविष्णु पुराणांची परस्परनिंदा जशी विधेयस्तुत्यर्थ आहे, त्याचप्रमाणें शंकराचार्य शंकराचा अवतार प्रसिद्ध असून, रामानुजही शंकराचार्य अवतार असें भविष्यपुराणांत सांगितलें आहे. तेव्हां आपलाच आपण शिष्य व आपलाच आपण गुरु, आपल्यांतच आपली जीत व आपल्यांत आपली हार ती काय होणार ? महादेवाला आपलें सामर्थ्य दाखवावें ह्मणून योगिनींनी पार्वतीला शाप देऊन तिला शिजवून महादेवाला खावूं घातलें अशी कथा वासिष्ठांत आहे.

अस्मानुमापतिर्देवः किं पश्यत्यवहेलया ॥ २७ ॥
प्रभावं दर्शयामोऽस्य पुनर्नास्मांस्त्वसौ यथा ।
दृष्टमात्रमहाशक्तिः करिष्यत्यवधीरणम् ॥ २८ ॥
इति निश्चित्य ता देव्यो विवर्णवदनांकिकाम् ।
उमामेव वशीकृत्य प्रोक्षयामासुरादृताः ॥ २९ ॥

( योगवा० निर्वाणप्रकरण पूर्वार्ध अध्या० १८ )

इदुरोदनतां यातामीक्ष्याय प्रियामुमाम् ।
भोजनाय महामाया देव्यस्ताः शूलपाणये ॥७॥
( निर्वाणप्रकरण अध्या० १९ )

आपला आपल्यांत शाप संभवनीय नाहीं, ह्मणून ही केवळ शक्तीची लीला आहे, असा आशय मूळकारांनीं व टीकाकारांनीं तेथेंच दाखविला आहे.

त्याप्रमाणें रामानुज व शंकराचार्य दोघेही एकाचेच अवतार असल्यामुळें ही केवळ त्यांची लीला झाली आहे असें मी म्हणतो. पुन्हा त्यांचा जो वाद झाला आहे, तो सर्वशास्त्रामध्यें शिव श्रेष्ठ आहे, कीं विष्णु श्रेष्ठ आहे, अशा प्रकारचा झाला आहे; विशिष्टाद्वैत व केवलाद्वैत याविषयीं त्यांत चकार शब्द देखील नाहीं. ह्याविषयीं माझ्या म्हणण्याची सत्यता पटण्याकरितां भविष्यपुराणान्तर्गत प्रतिसर्गपर्वाच्या चतुर्युगखंडांतील चतुर्थखंडाच्या चवदाव्या अध्यायांतील श्लोक ८९ पासून १२३ श्लोकापर्यंत विषय पहावा. ग्रंथविस्तरभयास्तव मी येथें लिहीत नाहीं. आतां कोणी आग्रहच करील तर त्याला माझाही असा आग्रह आहे कीं, हे शंकराचार्य कोणी शैव असतील, किंवा रामानुज तरी निराळे असतील, कारण आमच्या शंकराचार्यांनीं शैवालाही जिंकिलें होतें, अशी शांकरदिग्विजयांत कथा आहे, व रामानुज हे शेषाचे अवतार होते असें विशिष्टाद्वैती लोकांच्या प्रपन्नामृतांत ह्मटलें आहे. तेव्हां आग्रहानें ह्मण किंवा अनाग्रहानें ह्मण, भविष्यपुराणाच्या वादाशीं व केवलाद्वैत विशिष्टाद्वैतवादासी कांहीं संबंध नाहीं; ह्मणूनच तुह्मी दुसऱ्याच्या मतांत कां जात नाहीं, या तुझ्या विचारण्यांत रामानुजमताचा आह्मी स्वीकार करावा असें जें इंगित होतें, तें अर्थातच ह्या उत्तरानें तुला सोडून दिलें पाहिजे. ह्याप्रमाणें वादीनें शिष्यत्वाला प्राप्त होऊन थोडें मौन धरिलें असतां सिद्धान्ती ह्मणतात, प्रथमपासून या २० व्या कुसुमांत प्राचीन आर्यग्रंथांना अनुसरून सर्व जगांतील धर्मांचा व आर्यधर्मांतील अंगांचा समन्वयपूर्वक व अभीष्टतापूर्वक यातदस्फूर्त्यनुसार, किंवा ती संपूर्ण स्फूर्ति हृदयांत सांठविता आली नसल्यास यथाशक्ति ह्मणा, मी संपूर्ण विचार केला आहे. मनुष्य नित्य चुकीला पात्र आहे.

श्रुतिविरुद्ध स्मृति देखील प्रमाण होऊं शकत नाहीं, तेथें माझें वाक्य प्रमाणच झालें पाहिजे असें मी कोण्या तोंडानें ह्मणूं; परंतु मला माहित नाहींत अशा वासुदेवानंदादि कांहीं माहात्म्यावांचून दुसऱ्या सर्वाविषयीं स्वामी तुलसीदास महाराजांनीं म्हटलेलें वचन मी येथें लिहून ठेवतोः—

एहि पै जो कोइ करि है शंका। सो मोहिते अति जडमति रंका ॥

ओव्याः— आतां स्वसंप्रदायविशेष। पूर्वाधर्तीं सांगूं सुरस। कीं नियम इच्छीणारास। पुढील गती ॥ ४०९ ॥ वचनें यथाशक्ति अनुकरावें। ग्रंथवचन अप्रमाण न धरावें। पंडित्य तरी परिहरावें। असले विरोध ॥ ४१० ॥ धर्मद्वेष करूं नये। धर्मांतर करूं नये। समाजक्षोभ करूं नये। कांहीं केल्या ॥ ४११ ॥ अहमनधिकारिणि कूटार्थोपदेष्टा स्यामिति। प्रतिज्ञा करावी गुरुआज्ञापुरती। कूटार्थोपदेशरीती। तीही सांगू ॥ ४१२ ॥ जैसे कां कलिमत्त। भलते मागती वेदोक्त। तें तयासी निश्चित। ऐसें ह्मणावें ॥ ४१३ ॥ ते ह्मणती आह्मी ब्राह्मण। तया ह्मणावें तुह्मी साचचि ब्राह्मण। कल्पादौ कृतयुगीं ब्राह्मण। सर्वाचि होते भारतवचनीं ॥ ४१४ ॥ परि तुमचा संस्कारलोप झाला। प्रायश्चित्त केले पाहिजे तयाला। यास्तव थोडासा संस्कार जयामध्यें उरला। त्यांचाचि पक्ष उचलावा ॥ ४१५ ॥ पतित झालिया बहिनी। सर्व कूळ सांडिती काय कोणी। तेविं समसंस्कार पतित असलिया मनीं। तरि व्यक्तिद्वेषें जातिद्वेष न करावा ॥ ४१६ ॥ आपणचि संस्कार सोडिले। याकरितां पाहिजे प्रायश्चित्त केलें। तयासाठीं पाहिजे आणले। गुणाचि आधीं ॥ ४१७ ॥ ह्मणोनि व्यक्तिद्वेषें ब्राह्मण्य न द्वेषावें। प्रथम एवढेंचि करावें। इत्यादि वचनीं चाळवावें। लिंगधारण न करितां ॥ ४१८ ॥ हा सर्वथा कूट उपदेश नाहीं। परि अर्धकूट पाहीं। ऐसेचि भेसंड्यादौ लवलाही। करावें सकळ ॥ ४१९ ॥ रोगी आणि ह्मातारा। नपुंसक तिसरा। चवथा समाधिस्थ वरा। हिमालयस्थ मात्र ॥ ४२० ॥ हे चवघे वेगळे करोनी। सर्व माझिया संप्रदायजनीं। विवाह करावा निश्चयें करोनी। संन्यास कदा घेऊं नये ॥ ४२१ ॥ जयास वाटे ब्रह्मचर्य पाळावें। त्यानेंही लग्नचि करावें। अपत्य झालियाही असावें। गृह तोंवरी स्त्रीसवेंचि ॥ ४२२ ॥ स्त्रीगमन असूं द्यावे अधीन। परी

न रहावें स्त्रियेवीण । चित्ताचा विश्वास धरून । मत्संप्रदायींकीं वागूं नये ॥ ४२३ ॥ प्रयत्नाचा विश्वास धरावा । परि मनाचा विश्वास न करावा । मजविषयींही पाळावा । हाचि नियम ॥ ४२४ ॥ मीही प्रवर्तलिया परस्त्रीगमनीं । तरी निरोधावें मजलागोनी । परि जाऊं नये सोडोनी । मम मार्गातें ॥ ४२५ ॥ गोरक्षें मत्स्येंद्रा पद्मिनीपासूनि सोडविलें । परि नाथसंप्रदाया नाहीं त्यजिलें । तैसें मियाही विपरीत केलें । तरी मज दंडावें मत्संप्रदायींकीं ॥ ४२६ ॥ संप्रदायिक कोणी चुकतां । तरी माझा दंड साहावा सर्वथा । एवं गुरुशिष्यव्यवस्था । पुढेंही क्रमावी ॥ ४२७ ॥ परि सोडूं नये संप्रदाय । अज्ञानाश दुःखद होय । चित्त रक्षायाची धरावी सोय । हा निश्चय सांगतो मी ॥४२८॥ मज पूर्वी स्त्रीगमनादि पापें घडलेसीं । हें स्मरोनि सांगतो तातांप्रति । परि पुढें न घडावेत हा चित्तीं । निश्चयही आहे ॥ ४२९ ॥ हें नाहीं सांगत निरहंकार होवोनि । सांगत आहे चित्ताची काहणी । ह्मणोनि सावध रहावें सकळांनीं । मजविषयीं स्त्रियांनीं विश्वासूं नये ॥ ४३० ॥ एवं विश्वास न धरावा । परि मार्गही न सोडावा । कारण संप्रदाय माझा बरवा । श्रीकृष्णभक्तिवर्धक ॥ ४३१ ॥

> परस्त्रीतें ह्मणता माता । चित्त लाजवितें चित्ता ॥ १ ॥
> काय बोलोनिया तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ २ ॥
> धर्मधारिष्ट गोष्टी सांगे । उष्टया हातें नुडवी काग ॥ ३ ॥
> जे जे कर्म वसे अंगीं । ते ते आठवे प्रसंगीं ॥ ४ ॥
> बोले तैसा चाले । तुका ह्मणे ते अमोल ॥ ५ ॥
>
> (तुकारामगाथा अभं० ३०६०)

या अभंगांतील बहुतेक पहिले । चरण माझेठायीं सत्यत्वा आले । आतां प्रक्रिया यांतूनि जे बोले । ते आणिजे ध्यानीं ॥ ४३२ ॥ जयांची माझेठायीं वात्सल्य भक्ति । तिहीं कुमार्गी जातां निरोधावें मजप्रति । आणिक कुमार्गी जातां निश्चितीं । निरोधीन मीही तया ॥ ४३३ ॥ या रोधारोधींत शिष्य वा गुरू मरो । किंवा जग हें आघवें सुधरो । परि संप्रदाय सदा अनुकरो । मजसहित ममानुयायी जन ॥ ४३४ ॥ मनुष्याचार्जी पाहतां । मज सत्यचि नाहीं कोणी शिकविता । ग्रंथ

वाचवोनि तत्वतां । लिहिला अर्थ हेही सत्य ॥ ४३५ ॥ परंतु अचाट माझी बुद्धि । वाचकालही न कळे जो विधि । तो आकळूनिया आधीं । समन्वयी ठाके ॥ ४३६ ॥ कांहीं अर्थातही वाचक मज मिळाले । मज परीस संस्कृत शिकले । परि तिहीं वाचिता अर्थ सांगितले । निर्भ्रम त्याचि तद्ग्रंथींचें ॥ ४३७ ॥ एवढाचि मज ग्रंथी विशेष । परऱ्ही वाचकोपकार निःशेष । संशय राहूं नये कवणास । यास्तव तात स्मरोनि लिहिले हें ॥ ४३८ ॥ रूपावळीची पूर्ण विभक्ति । गुरुपदसाक्ष ठाउकें नाहीं मजप्रति । परि महाभाष्यांतीलही विरोधाविरोध गति । महाराष्ट्रभाषेंत सांगूं शके ॥ ४३९ ॥ ही मज मती कैसी मिळाली । ते तातकरणी तातासचि भली । बहुकाय जिहीं मज किंचित् विद्या शिकविली । तेही त्या शिष्य केले स्वबुद्धीनें ॥ ४४० ॥ धर्म विचाराच्या ठायीं । मज भ्रम नुपजे सर्वथा कहीं । गुणदोष विचार महंतांचाही । सत्यवतिकुमरासम पुढें ठाके ॥ ४४१ ॥ मनुष्यांत जे जे गुरू केले । तेथ माझें समाधान नाहीं झाले । चतुराक्षरी देवूनि अंगिकारिलें । ताते एवढें मात्र सत्य ॥ ४४२ ॥ इतुका उनाड असूनि पोटीं । तातें अंगिकारिलें शेवटीं । येणेंचि विश्वास हृदयसंपुष्टीं । कीं मधुराद्वैत चालवील प्रभु ॥ ४४३ ॥ जो गलितकुष्टें प्रवर्तला आत्मघाता । तयासी अश्विनीकुमार भेटले अवचिता । तरी कोण न अनुमानील चित्ता । कीं ययाचा झाला आतां अभ्युदय ॥ ४४४ ॥ जैसे माझे अपराध अनंत । परि शेवटी उपदेशी तात । येणेंचि विश्वासिलें चित्त । मधुराद्वैत अक्षय माझे ॥ ४४५ ॥ वाचकीं वाचूनि दाखविले । गुरुकृपाबुद्धि त्या अर्थ लिहिलें । ह्मणूनि अप्रमाण झालें । न ह्मणावे कोणी ॥ ४४६ ॥ श्रीतुकारामांचीही ऐसीच उक्ति । ते प्रमाण सांगू श्रोतियाप्रति । सावधान होवोनि चित्तीं । अभंगरीती ऐकावी ॥ ४४७ ॥

“ याती शूद्र वैश्य केला वेवसाय । आदि तो हा देव कुळपूज्य ॥१॥
नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुह्मी संतीं ॥२॥
संवसारें जालों अतिदुःखें दुखी । मायबाप सेखी क्रमिलीया ॥३॥
दुष्काळें आटिले द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥४॥
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखें । वेवसाय देखे तुटी येतां ॥५॥

देवाचे देऊळ होतें ते भंगलें । चित्तासी जें आलें करावेसें ॥६॥
आरंभी कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासी चित्त आधीं ॥७॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥८॥
गाती पुढें त्यांचे धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनिया ॥९॥
संतांचे सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥१०॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनी ॥११॥
वचन मानिलें नाहीं सुहृदांचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥१२॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमत ॥१३॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥१४॥
यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥१५॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १६ ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १७ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १८ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥ १९ ॥
भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥ २० ॥
तुका ह्मणे माझें सर्व भांडवल । बोलविलें बोल पांडुरंगें ॥ २१ ॥

( तुकारामगाथा ४०४९ )

या अभंगांत "संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप सेखीं क्रमिलीया ॥ कांहीं पाठ केली संतांची उत्तरे । विश्वासें आदरें करोनिया ॥ सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियले नाहीं बहुमत ॥ मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिलें चित्तीं विठोबाचे ॥ निषेधाचा कांहीं पडला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविले " इत्यादि असलेल्या तुकाराममहाराजांच्या गोष्टी व माझी स्थिती समान आहे, परंतु मी तुकाराममहाराजांसारखा माहात्मा नाहीं, तथापि तुकाराममहाराजांच्या चरणरजाच्या लक्ष्यांशा इतकी तरी माझी कविता प्रमाण आहे. ज्याला तो रजाचा लक्ष्यांश प्रमाण आहे त्याला माझी कविताही प्रमाण असलीच पाहिजे. थोडीशी कांहीं त्यांनीं संतांची उत्तरें पाठ केली होती, मीही कांहीं जणाकडून वाचून घेतलें. या दिग्दर्शना-

वरून माझ्या स्थितीचें अनुमान करावे. बुद्धिस्वातंत्र्य सर्वांचे आहे. याप्रमाणें माझी पारमार्थिक व सांसारिक स्थिती आहे. त्यांत मागें झालेल्या सांसारिक चुकांचीही सर्वांनीं क्षमा करावी. कांहीं कारणामुळें प्रतिनिधीला कोठून व्यवहारी भाषा शिकण्याचा प्रसंग आल्यास त्या शिकविणाऱ्यानें संघभंगक होऊं नये; उलटा व्यवहार जसा आपण अर्पण केला आहे, त्याप्रमाणें व्यावहारिक विद्याही अर्पण केल्या आहेत असें समजावें; किंवा अभिमान सुटतच नसल्यास "अथवा विद्यया विद्या" अशी तरी कल्पना करावी. चांगदेव ज्यांच्यापासून प्रथम योगादिक शिकले, तेच गुरु पुढें त्यांचे शिष्य झाले. याचा विशेष विचार उत्तरार्धांत दीक्षासमयीं गुरुशिष्यनिर्णयांत करीन.

ओव्या:— मागें जाहले ते गेले । पुढें मज सांप्रदायिकीं पाहिजे सांभाळिले । आणि सियाही[1] तयासी रक्षिले । पाहिजे प्रसंगें ॥ ४४८ ॥ अथवा सातावरी विश्वास । मी ठेवून राही एकांतास । जनीं परी संप्रदायास । प्रेरावें सज्जनीं ॥ ४४९ ॥ वाटेल तो करावा यत्न । शक्य तितुकें करावें धेनूपालन । न होईल तरी मासी पण । धेनुरक्षणसमाजा देत जावा ॥ ४५० ॥ अथवा संभवेल तेवढें । अवश्य देयावें फुडें । जेवणापूर्वी रोकडें । धेनुग्रास घावें ॥ ४५१ ॥ संस्कृतभाषाशब्दपंडित ॥ बुद्धीवीण वाद करूं नये किंचित् । वादीं सुलभ कळेल अर्थ । ऐसें कीजे ॥ ४५२ ॥ माझें ऐसें आहे मत । कीं समाज मूर्ख आणि पंडित । एक ब्रह्मज्ञानी मात्र विशेषगत । अथवा योगी ॥ ४५३ ॥ धुपट निघते ह्मणून । अग्नि आहे हें ह्मणती स्त्रियाही आपण । आणि "पर्वतो वन्हिमान् धूमत्वात्" हें पंडितांचे वचन । यांत विशेष काय ? ॥ ४५४ ॥ जो ब्रह्मज्ञानी झाला । जेणें षडरीसमुदाय रोधिला । तोचि एक विद्वान भला । येर ते मूर्ख ॥ ४५५ ॥ केवळ शब्दमात्र पाठ ह्मणती । आणि अर्थ तंव सर्वथा नेणती । ऐसा बहुतासी मजप्रति । पडला प्रसंग ॥ ४५६ ॥ तयासी अर्थ विचारितां । ते धातूचि विचारिती तत्वतां । ह्मणोनि वाद करिता । स्वभाषेंत सार्थ करावा ॥ ४५७ ॥ कित्येक लेखी उत्तर न देती । केवळ शब्दाशब्दीं वाद करिती । ऐसि-

---

[1] रुपया.

याची वात्सल्याची मती । व्यर्थ प्रसक्ति करूं नये ॥ ४५८ ॥ भांडा-ळाच्या समोरून । न जाणें हेंचि भलेपण । ऐसाचि अनुभव पूर्ण । तुकारामादिकांचाही ॥ ४५९ ॥ "वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा इतरांनीं वाहवा भार माथा" । एवढी जयाची विद्वत्ता । तेही कंटाळले तत्वता । भांडाळवोलीं ॥ ४६० ॥

पाखंड्यांनीं पाठीं पुरविला धुमाळा । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥ १ ॥
कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥ २ ॥
न कळे तें मज पुसती छळुनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ ३ ॥
तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक मज ॥ ४ ॥
तुका ह्मणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वाद्कांशी ॥ ५ ॥
( इंदिराप्रेस कॉपी० अभं० १०५ )

एवढी आपुली कर्मकथा । सांगितली याचि अर्था । कीं संपूर्ण समाधी साध्य नसतां । मध्यम मार्गें चालावें ॥ ४६१ ॥ भगवीं करोनिया छाटी । भिक्षा मागूं नये तंबाखूसाठीं । आवडी भजाच्या जगजेठी । तो उपेक्षील हें पोटीं आणूंचि नये ॥ ४६२ ॥ एवं परस्त्रीसंबंधीही व्यवस्था । इतर स्थानीं तत्वतां । आपुली किंचित् जाणीव न मिरवितां । मानावें सर्वथा मम वचन ॥ ४६३ ॥ ज्यास अनुयायी होणें । तेणें ऐसें साच करणें । संन्यास आगमादि रक्षणें । तेही सांगू ॥ ४६४ ॥ संन्यासाची इच्छा होता । तरी आपुली काष्ठ प्रतिकृती करूनि तत्वता । तयासी संन्यास देऊनी पुजावी सर्वथा । संन्यासागमरक्षणार्थ ॥ ४६५ ॥ पुढें मल्लदेवापि येती स्पष्ट । तेव्हां तया निगमपुराणांश न दिसावा नष्ट । ह्मणोनि निगमपुराणें रक्षणीं कल्पितादि सुप्रतिष्ठ । उपाय करावे ॥ ४६६ ॥ परि अशक्तें तदाचार न घेयावा । साच पुतळा करूनि पुजावा । मंत्रांश तुह्मीं न देयावा । निगमपुराणांचा ॥ ४६७ ॥ ग्रंथाध्ययन करितां बरवें । पवित्रापवित्र विभागावें । लौकिक संस्कृत शिकवावें । चतुर्वर्ण स्त्रीपुरुषा ॥ ४६८ ॥ पैसंडीतें मानूं नये । भेसंडीतें सांडूं नये । चरणचारी सोय । करील जाणी ॥ ४६९ ॥ भिक्षावरीही भिस्त करावी । ईश्वर आणि गुरुकास धरावी । निज सद्गुणेंचि सभ्यता समजावी । गद्दोपचिति गणाभी विधर्मी सोज्या ॥ ४७० ॥ विस्फोट अंगीचा

फोडावा । तेवी सधर्मी कुहकी दंड्या । अधीनकमानदाने न गणावा । सुसभ्यपणा ॥ ४७१ ॥ भेसंडीचिया अर्थी । गुरू करावे शिवसूता । तेथ पापाची वार्ता । कवण ह्मणे ॥ ४७२ ॥ परि मात्र ते आपदीं । सदा वा असावी सद्बुद्धि । धरिजे अन्नालागी संधी । पेसंडीसी करूं नये ॥ ४७३ ॥ आपुला घराऊ करावा । पराचा घराऊही सोडावा । विरोदा अवश्य जोडावा । आधुले घराऊ मिळणी ॥ ४७४ ॥ तगाचि एककार करूं नये । अति जातीहावेही भरूं नये । नाम केल्यावीण मरूं नये । भेसंडीत कांहींतरी ॥ ४७५ ॥ स्त्रीयाचरी उत्तम प्रेम करावा । परि विश्वास कधीं न धरावा । विधर्मी श्रीमान् नम्रावा । स्वाम्युपदेशे ॥ ४७६ ॥ परकर विनणें शिकावें । ते मोतिया ऐसे करावे । धर्में अंगुष्ठा उद्धरावें । विरेखपणें आपदीं ॥ ४७७ ॥ भेसंडीते विखे । धर्मास्तव हिंसा केधि ओळखे । संतोषात येणें सुखे । ह्मणावेत शिवकृष्ण ॥ ४७८ ॥ कूटार्थोपदेशे ऐसे । जया तयाचे उपास्ये । मधुराद्वैतवेषें । रंगवावें ॥ ४७९ ॥ रंगवितां आपुले झाले । तरी ते कृष्णीं मिळवावे भले । नातरी सरस्वतीसी आणिले । एवढे पुरे ॥ ४८० ॥ परि भेसंडी मोडेल ऐसा । परधर्म करूं नये ह्रिरासा । गदचय प्रति सारसा । पेसंडीविशेषा उपाय कीजे ॥ ४८१ ॥ जैसी होती कामी । ते निश्चयें कचानुगामी । तेवि सुखदुःखान्त्या ऊर्मी । आत्मप्रार्मी त्यजाव्या ॥ ४८२ ॥ औषधीसिद्धि जयाकडे । योगभाष्यकृत् वदती रोकडे । ते वैधोनि संपादूनि पुढे । शावें बळ धडफुडे गुरुदान ॥ ४८३ ॥ जो उपाधि आपुली निवारी । तो शत्रूही जावा मोक्षपुरी । ऐसा आशिर्वाद कुसरी । देत जावा ॥ ४८४ ॥ विशेष एकनयनागर्मी मिळे । येथ दिशामात्र उजळे । बहुत करावे सोहळे । हरिहरमंदिरादिकांचे ॥४८५॥ नैय्यायिक प्रत्यक्षखंड वाढवावा । तेणें योगभाष्यवचनभाग अनुभवावा । ऐसाचि व्यवहार करावा । धर्मनिष्ठ होवुनी ॥ ४८६ ॥ बुद्धिमान बुद्धिमती । कराव्या प्रीतिविवाहस्थिती । ह्मणजे वेद पुराणविधि करावा निगुती । परि विशेष छत्तीसगुणादि पाति पहूं नये ॥ ४८७ ॥ कुरूप सद्गुणी कामिनी । तरी ते सोडूं नये निर्धाणी । दुर्गुणी सुरूप ह्मणोनि । अंगिकारूं नये ॥ ४८८ ॥ पिकदाणीच्या रूपासाठीं । सांडूं नये धन-

रक्षक लोहपेटी । अति सुरूप आणि कर्कशा पाठी । लावूं नये ॥ ४८९ ॥ जेणें शरीराचा होय चुरा । ऐसा जुना व्यापार नाहीं बरा । आणि पतिपत्निप्रेम मोडे साजिरा । ऐसा नवा व्यापार करूं नये ॥ ४९० ॥ शिक्षक अनुभवी जुनाचि पहावा । वृषभ किंवा शिष्य उत्तम नवा । विचारें आळस भरूं न द्यावा । शरीरामाजीं ॥ ४९१ ॥ देहशक्तीनें मनस्थैर्य न सोडावें । लागटपणें मित्र न जोडावें । घरीं आळिवा न दवडावें । सज्जन पुरुषा ॥ ४९२ ॥ प्रसंगीं औषध होय विष । ह्मणोनि निरुपयोगी न ह्मणावें कवणास । परंतु योजना करणें बुद्धीस । आपुल्या शिकवावें ॥ ४९३ ॥ आपण परतंत्र होऊं नये । दुजिया परतंत्र करूं नये । स्वातंत्र्याहंकारें भरूं नये । थाडवांडस ॥ ४९४ ॥ एकांतीं स्त्रियेसी प्रेम करावा । परि एरव्ही आज्ञेनें उपदेश करावा । योग्य मंत्र न निवारावा । स्त्रियेचा वा लेंकुराचाही ॥ ४९५ ॥ संस्कृत स्वभाषा राजभाषा तिन्ही । आपण शिकाव्या आणि शिकवावी गृहिणी । कन्या शिकवाव्या मातेकडूनी । आणि लहानपणीं पुत्रही ॥ ४९६ ॥ अधिक आल्याविण बोलूं नये । गुण कोणाचा सांडूं नये । कार्याविण बोलूं नये । सार्गी घर्म कोणाचेंही ॥ ४९७ ॥ कला बहुत शिकावी । योग्य उपयोगा आणावी । परि कलोपयोगाधीन न करावी । वृत्ति कदा ॥ ४९८ ॥ सुयंत्र हळ नाहीं । ह्मणोनी शेत न सांडावें कहीं । ईर्षा असावी कारणाविषयीं । फलाविषयीं नसावी ॥ ४९९ ॥ रुक्माबाई करिते उत्तम पक्वान्न । ह्मणोनि राधाबाईनें न न्यावें चोरून । स्वयंपाक मात्र उत्तम सिजवून । अधिक ईर्षेनें शिकावा ॥ ५०० ॥ व्यसन लागूं देऊं नये । परि व्यसनसाक्ष सोडूं नये । दंभाचारें होऊं नये । विख्यात जगीं ॥ ५०१ ॥ पोट भरावयासाठीं । जरी विद्यापरिक्षा दिधल्या कोटी । तरी कार्यकर्त्यानें तयापाठीं । जाऊंचि नये ॥ ५०२ ॥ मल्याचें वचन खंडूं नये । भांडाळासी तंडूं नये । चातुर्य तंत्र सोडूं नये । कुंटिणीचेंही ॥ ५०३ ॥ मग्न अंतरी असावें । तेणें जनीं उदास दिसावें । महत्कार्य न पुसावें । कळल्यावरी बहुतातें ॥ ५०४ ॥ क्षुल्लक कार्याचिया वादीं । क्षुद्र गुंतवावें त्रिशुद्धि । आपण संक्षेशवावी बुद्धि । महत्कार्यीं ॥ ५०५ ॥ जे कां आळशी तमोगुणी । विश्वासतील आपुल्या वचनीं । तयासी

करावें रजोगुणी । करोनि उपाय मळताही ॥ ५०६ ॥ जे कां रजोगुणी वेडी । तयासी योजावी भेसंडी । जे शांत रजोगुणी फुढी । तयासी करावें सत्वनिष्ठ ॥ ५०७ ॥ तीव्र संवेगिया क्रम नाहीं । क्रम मध्यमार्थेचि पाहीं । ओळखोनी ठेवावे उपायीं । जेथींच्या तेथ ॥ ५०८ ॥ कोणासी अपाय करूं नये । परि आपणाही अपाय होऊं देऊं नये । सामोरावीण धरूं नये । मागें द्वेष निकामी ॥ ५०९ ॥ विष्ठेतूनिही सोनखत घेती । मधार्थी माशांचेही ओक सेविती । तेवी नीचानीच सत्कार्यार्थी । ओळखूं नये ॥ ५१० ॥ धर्मनिष्ठ ह्मणोनि । दीक्षित पशु चिरणें शिकती कसायापासुनी । तेवीं आत्मोपकारक विद्या गुणी । कोठूनिही शिकाव्या ॥ ५११ ॥ सर्वांस गुह्य सांगूं नये । सुहृदाजवळी चोरूं नये । दुर्बळ सुहृदा सोडूं नये । गौरविल्यावीण ॥ ५१२ ॥ आपुलें पाहोनि बरवेंपण । जयाचें उगेंचि आनंदे मन । आपुलें ऐकोनि बाइटपण । जयास उगाचि खेद होय ॥ ५१३ ॥ तो उत्तम सुहृद ह्मणावा । श्रेष्ठ पित्याहूनिही गणावा । तो ईश्वरेंचि पाठविला समजावा । उपकारार्थ ॥ ५१४ ॥ समानशीलव्यसनें करून । जयाचें सख्य तो मध्यम पूर्ण । जो वश केला उपायें करून । तो सुहृद गौण समजावा ॥ ५१५ ॥ यशस्वी सद्वृत्तिकारण । समजावें हें मज ईश्वराज्ञाप्रेरण । चुकीं द्यावें परंतु करावें अनुमान । सयशाचें चातुर्यबुद्धि ॥ ५१६ ॥ मलमात्र टाकोनि देती । परी गुदमलीन ह्मणोनि कापून न ठेविती । तैसी नीचसंगेंही स्वार्थरीति । नीच त्यजूनि अवलंबावी ॥ ५१७ ॥ अचतुर गुरू करूं नये । अधीनकमालसाहसें भरूं नये । उगें कठिण तत्व बोलूं नये । भिकारियासीही ॥ ५१८ ॥ द्यावें मूटभर दाणे । परि प्रेम करावा सहस्रवचनें । जरी आपणा नाहीं देणें । तरी कवणाकडूनि देववावें ॥ ५१९ ॥ नास्तिकही जरी जाहला । तरी भिकारी तयाच्या उपयोगाला । परि आंगणावांचोनि नाहीं भला । अंतर्गृहांत आणितां ॥ ५२० ॥ आपणा कळली जरी सत्य वाट । तरी गर्वें वृद्धां निषेधूं नये स्पष्ट । व्यवहारीं सर्वांसचि कष्ट । सर्वांसचि सर्वोपयोग प्रसंगें ॥ ५२१ ॥ परोत्कर्ष पाहोनि हसूं नये । कार्यार्थ देवावरी बसूं नये । गोड व्याख्यानें फसूं नये । नुसुधे कोणाच्या ॥ ५२२ ॥ जिहीं भनंस केला आपुलें ।

निश्चयें हित केले । दैवें आपणां तद्गुण फेडणें आले । तरी नम्रचि बोलावें ॥ ५२३ ॥ ईश्वर आहे सर्वकर्ता । हें सत्य परी आळस न धरावा चित्ता । समजावें कीं मजकडूनि सुकार्य करविता । तोचि आहे ॥ ५२४ ॥ राखावया आपुले सांगाती । उपयोगा आणावे कोप आणि शांती । विकोपा जातां समानस्थिती । तटस्थ होऊनि अन्य गुप्तपथीं रिघावें ॥ ५२५ ॥ बोबडे बोबडे बोलुनी । बाळें रंजवावीं प्रसंगानीं । ओळखावी तन्मुखें सुकरणी । तद्वृद्धांची ॥ ५२६ ॥ ब्रह्मचारी असावें । उपासी वनीं न वसावें । लोकांत वेश्यागामी दिसावें । परि आत्मनिष्ठ असावें निष्कलंक ॥ ५२७ ॥ वनांत चोर भेटतां । तें सर्वस्व नसलीही साधुत्वाची वार्ता । प्रसंग पाहोनी तत्वता । आणावी अंगीं ॥ ५२८ ॥ निष्कामाविण होऊं नये यती । समाजावीण जाऊं नये तीर्थी । सुजन भेटलिया उगेचि प्रती । होऊनिया बैसूं नये ॥ ५२९ ॥ जयाचा बहुत द्वेष करिती । ऐशा एकाकडे उघड जाऊं नये प्रीती । सर्वा नीतिमाजी मुख्य नीति । धर्म राखोनि निजलोकस्थिति सांभाळू ॥ ५३० ॥ कांटेरा मार्ग काढूं नये । उगेंचि स्त्रियेस ताडूं नये । शिष्य कल्पांतीं जोडूं नये । आळशी आणि गोडभाषी ॥ ५३१ ॥ परदेशीं भिकेस लाजूं नये । स्वदेशीं भीक मागूं नये । भीक न मिळे तेथ भंगू नये । द्रुमपाहुणेरही ॥ ५३२ ॥ ऊन असतां उगेचि वस्त्र घेऊं नये । पाऊस येतां उगेंचि घर सोडूं नये । धर्मावीण रिकामे बैसूं नये । प्रसंग नसतां ॥ ५३३ ॥ दैवें झालिया रोगप्राप्ति । तरी भंगू न द्यावी चातुर्यवृत्ति । आचरोनी बाळवृत्ति । सहस्र मातृबुद्धया युवती रंजवाव्या ॥ ५३४ ॥ जो आपुलिया प्रश्नी । उत्तर देईल विचार करोनी । तयाच्या कर्तृत्वानुगुणी । विचार अधिक करावा ॥ ५३५ ॥ आपुल्या भेटीस न येतां । कवणाचा शब्द ऐकूं ये अवचिता । तो आपणासंबंधीं निवडतां । तद्विचार तत्वतां प्रथम कीजे ॥ ५३६ ॥ धार्मिक कीर्तनें करावीं । भगवदवतारचरित्रें वर्णावीं । निर्गुणें चाळू नये बरवीं । वेडी वाकुडी धर्मभोळी ॥ ५३७ ॥ जयाचा विषय सुटला नाहीं । तेणें सगुण उच्छेदूं नये कहीं । जयाचें स्तनपान सुटलें नाहीं । तेणें मायेसी सोडितां महामृत्यु ॥ ५६८ ॥ जयाचें जिकडे आग्रही मन । तया तिकडेचि द्यावें अनुमोदन । जो बाळ

शिकूं इच्छी व्याकरण । तया बळेंकरून गणित शिकवूं नये ॥ ५३९ ॥ जो आपणाआधीन नाहीं । तया आणूं नये स्वविषयीं । परि आपुला अर्थ जो तद्विषयीं । तो तन्मुखेंचि साधावा ॥ ५४० ॥ जो कां असे पौराणिक । तया पुसूं नये गृहसुखदुःख । त्याच्या पुराणांतूनि सम्यक । पूर्वजनकृतदुःखहर चातुर्य शिकावें ॥ ५४१ ॥ गुरूजवळ स्वानुभव वदावा नम्रवाणी । शिष्यास शिकवावा आज्ञावचनीं । सुहृदा शिकवावा गौरवोनी । स्त्रियेस विश्वासरहित प्रीतिवचनीं शिकवावा ॥ ५४२ ॥ मूर्खाळाशीं दंडावें । अर्धवटासी न तंडावें । पुंडासी योग्य भांडावें । वचन न खंडावें चतुरगुरूचें ॥ ५४३ ॥ प्रासंगिक बुद्धिमांद्यें गुरू अवलिप्त । तरी क्षमा करूनि साधावा आन पंथ । सदा बुद्धिमांद्यें गुरू अवलिप्त । तरी व्यवहारी त्याग करावा ॥ ५४४ ॥ लाडका शिष्य आज्ञा मोडी । तरी तया मानावें मध्यसुहृज्जोडी । भांड स्त्रियेसी उद्यांचि दावूनि गोडी । करवावी रोकडी आजची क्रिया ॥ ५४५ ॥ आपण स्वयातीसी भांडूं नये । आणि तियेचिवरी अवलंबूं नये । परयाती नम्र होतां उगवूं नये । मागील द्वेष तियेवरी ॥ ५४६ ॥ अहित कोणाचें करूं नये । परी शठासी सारल्य धरूं नये । संतप्रीतिवीण करूं नये । क्षणही रिते अंतर ॥ ५४७ ॥ राजद्वेष करूं नये । सत्कर्मासाठीं मरूं नये । प्रगट लेखी राजाज्ञा नसतां मारूं नये । दीन जनांसी ॥ ५४८ ॥ सलक्षण विद्वान् जे होती । त्यासवें सदा सरळ असावें चित्तीं । अर्धलक्षण जे विद्वान् असती । त्यासवें उदासवृत्ति स्वकार्य करावें ॥ ५४९ ॥ निर्लक्षण आणि बुद्धिमंत । सावध रहावें न स्वीकारितां तत्पंथ । जे कुलक्षण आणि विद्यावंत । ते ते अत्यंत निरीक्षावें ॥ ५५० ॥ विद्वान् आणि पोटभरू सर्व । तयांचा मूर्खांकरवीं करावा पराभव । संस्कृताभिमानियासी वाद सर्व । लोकां कळेल त्या भाषेंत करावा ॥ ५५१ ॥ वेदान्तावीण अन्य शास्त्रीं । शब्द घोकूं नये जिव्हातंत्रीं । योगावीण अन्य शास्त्रीं । ध्यानतंत्रीं होऊं नये ॥ ५५२ ॥ वेदपौराणविधिवीण । पूर्वमीमांसा करूं नये मान्य । द्रव्यगुणक्रियासंयोगविभागोपयोगावीण । न्यायवैशेषिकांतून आत्मसाधन घेऊं नये ॥ ५५३ ॥ भाषार्थ कळतां कौमुदीवरूनी । व्यर्थ फोगाफिकुत्पत्तींत शिरूं नये बहुजनीं । त्या त्या शास्त्राची उभारणी ।

मात्र कोणी तरी रक्षावीं ॥ ५५४ ॥ जावयाचें नसतां कार्यापाठीं ।
सहस्र जोशी मिळवावे मुहूर्तासाठीं । दृढ मनोत्साह असतां पोटीं । [illegible]
पुसावी गोष्टी ईश्वरासची ॥ ५५५ ॥ दैवें प्रयत्न सोडूं नये । [illegible]
भगवन्निष्ठा मोडूं नये । आंगीं सामर्थ्य असतां पळपळ दवडूं नये ।
भगवंत सारथी कामनेपुढें ॥ ५५६ ॥ जेवूं घालतां चाळवूं नये । [illegible]
शिकवितां लाडवूं नये । स्वछिद्र पाहणाऱ्यास वळवूं नये । [illegible]
पाठवुनी ॥ ५५७ ॥ जा हें स्पष्ट बोलूं नये । यावयासी विसंबूं नये ।
प्रेमावांचूनि ठेवूं नये । रुसवा कोठें ॥ ५५८ ॥ विटतां [illegible]
नये । उग्याचि गप्पा झोडूं नये । साधू होऊनि जोडूं नये । [illegible]
शिष्य ॥ ५५९ ॥ अलौकिक शक्ति बोलूं नये । अतिलौकिक [illegible] नये ।
कीर्तीमागें लागूं नये । वृथा अपकीर्ति साहूं नये देखत डोळा ॥ ५६० ॥
घरीचें कार्य संपलें असतां । आज्ञाधारक अधिक माणसें घरांत [illegible] ।
तयासी धर्मविद्येचें सामर्थ्य नसतां । शिकवावें जोडे शिवणें [illegible]
बैसवूं नये ॥ ५६१ ॥ जया जया पदार्थांची । घरीं आवश्यकता [illegible] ।
त्या त्या पदार्थ सोप्या वस्तूची । शोधणी सांधणी करावी ॥ ५६२ ॥
न मिळे तरि उगेचि बैसावें । शक्ति तरी आधी आणिका शिकवावें ।
मग तयापासोनी शिकावें । किंवा प्रथमचि होवावें सहाध्यायीं ॥ ५६३ ॥
निश्चयें माझिया संप्रदायीं । द्वाड एक तो जो रिकामा राही । ज्ञानीं वा
धर्मीं वा सुखार्थ स्वपरदेहीं । श्रमत जावें ॥ ५६४ ॥ याचा विशेष
आघवा । एकानयनागमीं बरवा । येथ दिङ्मात्र सरतां कणवा । श्रीगुरु-
रूचिया ॥ ५६५ ॥ एक ब्रह्म तोचि नयन । जयाचा तन्मुखें निरूपण ।
तो एक नयनागम पूर्ण । सदुपदेशविधायक ॥ ५६६ ॥ पुढती ऐसें
आयकावें । जे गौण मित्र तयांचें वित्त न घेवावें । घेतले तथापि न
लावावें । कोण्याहि कार्या ॥ ५६७ ॥ जे वित्त तव थोडे देती । आणि
कार्याची उतावेळ करिती । रोगें दाटला तरी तया हातीं । औषधही न
घ्यावें ॥ ५६८ ॥ आपण झालिया संन्यासी । जो आपणाबरोबर निघे
काशी । तयाचें वित्त घ्यावें कार्यासी । आणि आपणही तत्कार्यासी
झटावें ॥ ५६९ ॥ विवाह केलियावरी । इच्छा नसतां वर्षत्रयभरी ।
स्त्रीसंग न करावा परी । बाह्य ब्रह्मचारी होऊं नये ॥ ५७० ॥ एक

गणिकाभोगीं तरले । परि बहिर्येनि मानसभोगीं बुडाले । उपयोगासी आणितलें । तें तैसेंचि कीजे ॥ ५७१ ॥ पूर्व वा मध्यम वयांत । रसायन सेवणें अति उचित । वृष्य घेतलियावीण निश्चित । स्त्रीसंग करूं नये ॥ ५७२ ॥ वृष्योत्पन्नवीर्य स्त्रियेते द्यावें । अन्नोत्पन्न वीर्यें शरीर पोषावें । ओज कदा घटों न द्यावें । स्त्रीसंगानें ॥ ५७३ ॥ कोंडूनिया श्वासोच्छ्वास । उगेचि करूं नये उपवास । जोंवरी जाहला नाहीं विशेष । हिमवन्निष्ठ ॥ ५७४ ॥ संसाराचे बुद्धिबळें । खेळावें आलिया खेळे । करावें प्रयत्न सुमेळें । हर्ष डोहळे सांडोनी ॥ ५७५ ॥ नवें तत्व शोधावें । परि जुन्यासी न विरोधावें । स्वव्यापकतेंत रोधावें । परावे सकळ ॥ ५७६ ॥ जंव जंव होवावें उदास । तंव तंव वाढवावा हर्ष । द्रव्यें पुजावें साधु वा दास । परि आपण दरिद्रास अनुभवावें ॥ ५७७ ॥ शरण गेला असेल ईशा । तरी वृथा नाहीं कवणाची आशा । सांडियेल्या आपुली कोण दशा । ह्मणोनिया चिंतू नये स्वप्नींहि ॥ ५७८ ॥ संकटीं मार्ग शोधावा । योग्य कोणीही बोधावा । आग्रह न निरोधावा । कवणाचाही ॥ ५७९ ॥ नीच करूं नये मान्य । धनहावें विकूं नये धान्य । वृद्धा कन्या देऊनि जघन्य । ह्मणवूं नये ॥ ५८० ॥ परधर्मी उपसर्ग लागे । ऐसें स्वधर्मांतील निंद्य सोडावें आंगें । परि परधर्मनिंद्याग्रहप्रसंगें । स्वधर्मनिंद्याग्रहत्याग अनुचित ॥ ५८१ ॥ अथवा परधर्मनिंद्य प्रतिबंधावें । स्वधर्मनिंद्य न बोधावें । परमार्थी व्यवहारीं प्रबोधावें । जन नाना उपायें ॥ ५८२ ॥ मिलित द्रव्याचें भाग च्यार । करूनि करावा व्यहार । संप्रदायधर्मा एक भाग सुंदर । समर्पावा ॥५८३॥ दोन भागांचा करावा व्यय । येथ प्रसंगें वर्तणें उचित होय । दैविक लौकिक संप्रदाय । रक्षिजे तो उपाय भलताही कीजे ॥ ५८४ ॥ तापवूनि पितां नीरें । कोणा न होती आरोग्यकरें ? । तेवीं ससोंडे द्वारें सविवर घरें । मघा आणि आतांही ॥ ५८५ ॥ जयाच्या घरीं न एकही सुपुष्ट गाय । तो न ह्मणावा गृहीतमत्संप्रदाय । तेणें ह्मवली आपुली माय । जो गोपालभक्त असोनि गाई न सेवी ॥ ५८६ ॥ जे कां विश्वासू चाकर । तया लिहिणें शिकवावें परिकर । मग वृक्षपश्वायुर्वेद सुंदर । शिकवावा तया ॥ ५८७ ॥ संप्रदायिकीं आवडी करूनी । शक्य त्या

औषधी लावाव्या आणुनी । ना तरी दुर्मिळ वा सुलभ उपवनी । एक दोनी तरी लावाव्या ॥ ५८८ ॥ वैदिक आणि नीति । व्यवहारीं अवश्य आणावें हातीं । ब्रह्मज्ञान योग भक्ति । हे परमार्थी आश्रयावे ॥ ५८९ ॥ तोंडी नसों वाच्या शिवी । मना पाडूं नये गोवी । जेथिल्या तेथेंचि भोवी। करूं नये ॥५९०॥ महोत्सव करूनि चांगें। जन लावावें सन्मार्गें । आपण कामूं नये आंगें । द्रव्य असतां जवळी चिमूटभरही ॥ ५९१ ॥ ऐसें दृढ करावें मन । कीं शरीरचि होऊनि आपण । शक्य ते आघात करी सहन । परि देह उपाधि वाढवून शिरवूं नये ॥५९२॥ जयाचा द्रव्यव्यय थोडा । जो कोणा न घाली मोडा । हलुहलु थंडीत बैसे उघडा । परि दशपदरी पासोडा आंगीं नघे ॥ ५९३ ॥ जया दंभलोभादि त्याज्य । मिळावें ह्मणूनि न वांछी आज्य । तत्तुल्यत्वीं सुरालयसाम्राज्य । इंद्राहूनि सुखी तो ॥ ५९४ ॥ वित्त आपुलें उडवावें । काळिज शुळीं चढवावें । मृत्युपासोनि सोडवावें । स्वदीन सज्जनातें ॥ ५९५ ॥ जो आपुलिया कुटुंबवृत्ति । धार्मिक राहे आग्रहस्थिती । तयाते जातां स्वकार्यपथीं । मंत्र निश्चिती पुसों नये ॥ ५९६ ॥ एक मयूर एक आणिक । विषहारक विषपरीक्षक । पक्षी सुहृद् करावें सम्यक । भोजनसमयीं ॥ ५९७ ॥ स्वागमीं ब्राह्मण असावें । धर्मक्षोभकवाग्वादीं क्षत्रिय होवावें । जडविद्याविषयीं असावें । वैश्य सदा ॥ ५९८ ॥ प्रसंगीं व्यंग्य शूद्रपण घेयावे । अपर वर्णी नातळावें । ब्राह्मणादि व्यंग्यार्थ आघवे । पहावें इयेचि कुसुमींचे ॥ ५९९ ॥ जया जे जे वर्णव्यंग्यवृत्ति । घेतली तेणें ते पाळावी निगुती । व्यंग्य ब्राह्मणी असावें गृहीं बहुती । अथवा तीर्थी थानंदें ॥ ६०० ॥ उपदेशावें भाविक जन । व्यंग्य क्षत्रियीं उपदेशावें तर्कनिपुण । व्यंग्य वैश्यीं प्रवासाकारण । सोसावे कष्ट ॥ ६०१ ॥ प्रासंगिक व्यंग्य शूद्रीं । पुरवावी सामुग्री । एवं बाह्यप्राधान्यपूर्वक तत्व निर्धारीं । सांप्रदायिक ॥ ६०२ ॥ आतां व्यंग्यवर्णकर्म । कैसा कवण उपदेशधर्म । तोही लिहितो स्वबुद्धिसम । तो त्वां सप्रेम ऐकावा ॥ ६०३ ॥ संप्रदायान्हिक झालिया । इतर प्रसंगीं आतळलिया । सेवासमय नसलिया । उपदेशादिकर्म करावें वर्णी ॥ ६०४ ॥ भगवत्सेवा मार्ग पहिला । दुजा राजमार्गयोगू भला । तिजा तो आहे ठेला । यथागुरुमार्ग ॥ ६०५ ॥

जे व्यंग्य ब्राह्मण मत्संप्रदायीं । प्रेमें प्रश्न लिहावे तिहीं । वृत्तिरहस्याचिया ठायीं । ओळखोनिया ॥ ६०६ ॥ वृत्तिरहस्य जें जें उपटे । तें गुरुमुखें करावें गोमटें । किंवा गुरुविरोधा वाटे । तरी न न्यावें ॥६०७॥ तयाचें कांहीं उदाहरण । लिहितों व्यंग्यब्राह्मणाकारण । जनिष्यमाण उत्तरविस्तारीं पडुपण । आधींच मिळविलें असेल जिहीं ॥ ६०८ ॥ निश्चयें ध्यानवृत्ति अवलंबावी । ध्यानेंचि भूमिका शोधावी । खरता सांडूनि मृदुता आणावी । आणि संवेगें देयावी तीव्रता तियेतें ॥ ६०९ ॥ प्रतिभूमिभूमी अनंत । ध्याननिष्ठाचि जय पावत । ध्याननिष्ठा गुरूही मिळत । न शोधितांही ॥ ६१० ॥ शब्दविकल्पें अर्थविकल्पें । ध्यानीं चढावें सिद्धसंकल्पें । अर्थाचेनि अनपलापें । करावी शुद्धी ॥ ६११ ॥ सर्व देव सकळ असुर । मृदुध्यानीं विघ्न करावया तत्पर । तेथ मताभिलाषविचार । भलताचि करविती ॥ ६१२ ॥ ह्मणोनि परमात्मा सर्वाभूतीं । येणें नमावी आघवी क्षिती । मंगलाचरण संप्रदायरीति । करोनिया ॥ ६१३ ॥ भगवन्निष्ठेवीण । जो अर्थनिश्चयें करी ध्यान । अत्यंत सच्छील असावें त्यान । परि नये विघ्न हें आह्मी निश्चयें न बोलों ॥ ६१४ ॥ नृगा गोदान करितां विघ्न झालें । तैसें भरतावरीही आलें । परि भरतजन्मींही साधिलें । उपास्य त्यानें ॥ ६१५ ॥ नृगासी जी जाहली स्मृति । ते भगवद्दर्शनोपष्टब्धपुण्यफलप्राप्ति भरताचीही निष्ठा निश्चिती । रागें जाहली होती चंचळ ॥ ६१६ ॥ धर्मी चुकलिया अनंत अधोगती । भगवन्निष्ठेंत चुकलिया अधोगति शिक्षेचिपुरती यालागीं भगवन्निष्ठाध्यानमती । ते देती विघ्नमाथां चरण ॥ ६१७ ॥ ज्ञानिया भगवन्निष्ठा आदि अंतीं । जिज्ञासूंची भगवन्निष्ठा व्हावया प्राप्ति । यालागीं आमुची ध्यानप्रवृत्युक्ति । सन्निष्ठ जिज्ञासू व्यंग्यब्राह्मणातें ॥ ६१८ ॥ त्याही ध्यानाचें उदाहरण । हें कीं एवंविध निरीक्षण वृत्तीचें होय व्युत्थान । कवणेपरी ॥ ६१९ ॥ उदयजालिया वृत्ति उमटे प्रमाणप्रमेयसंपत्ति । तरी निरोधितां तिजेप्रति । निमेल कीं रे ॥ ६२० ॥ मी उपाधिविनिर्मुक्त । हें सविकल्पविवेक दशा विख्यात । मज न कळे हा सौषुप्त । भावचि शुद्ध ॥ ६२१ ॥ दोहींविगळी तूष्णीस्थिती । हो का समाधि निगुती । परी तियेतें कवणे रीती । आकळावें

॥ ६२२ ॥ वृत्तीचा लय होतां कारणीं । अवश्य लाहे सुषुप्तपणीं । ह्मणोनि निरोधाचिया अनुगुणी । होवावें जरी ॥ ६२३ ॥ तरी ज्ञान झालियावरुती । काय न राहे सुषुप्ति । प्रारब्धावष्टब्ध तिजप्रति । ह्मणतांही नये ॥ ६२४ ॥ प्रारब्ध विक्षेप साधी । आवरण तव ज्ञानेंचि बाधी । सुषुप्तींत आहे प्रसिद्धी । आवरणाचीच ॥ ६२५ ॥ लेशाविद्यामतांत । नवीन प्रक्रिया रचोनी यथार्थ । सावरणविक्षेपप्रारब्धरोधित । परि तें आवरण न होत मुक्तिप्रतिबंधक ॥ ६२६ ॥ दृढ ब्रह्मज्ञान जाहलें । तें साचाचि न जाये मोकलिलें । जरी सुषुप्तींत कारणीं मन निमालें । तरी जागें तेणेंचि स्वज्ञानें ॥ ६२७ ॥ ह्मणवोनि ती ज्ञानवृत्ति । जोंवरी झाल्यातें सुषुप्ति । तोंवरी पावे अभिभूती । परि लय न पावे ॥ ६२८ ॥ साधर्म्यवैधर्म्यकार्यकारणीं । तें घटो शके अवस्था तिन्ही । देहाद्यहंताविसदृश आवरणी । आणि मज न कळे इत्यादि सादृश्यता ॥ ६२९ ॥ मज न कळे ही सादृश्यता कहीं । जागेपणीं ब्रह्मज्ञानिया नुमटे कांहीं । ह्मणोनि विसदृश लवलाही । विज्ञानवृत्ति अज्ञानाच्या ॥ ६३० ॥ विक्षेपसदृश आवरणविसदृश देहाद्यहंता । यद्यप्युपजे साच पंडिता । परि तियेसही विज्ञानवृत्ति पाहतां । विसदृश सर्वथा पैं भासे ॥ ६३१ ॥ आहे अपरोक्ष प्रतीती । ह्मणोनि ब्रह्मज्ञान नोहे आवृती । विक्षेप नोहे ब्रह्मप्रतीती । भेदाभावास्तव ॥ ६३२ ॥ जें अत्यंत विसदृश जया । कारणकार्यत्व नोहे तया । आणि वृत्तित्वजातित्वें उपाया । गणतां न ये ॥ ६३३ ॥ कारणभिन्न विसदृश व्यक्ति । जैं कां व्यापो शके जाती । तैं फलहानी तियेचे हातीं । किंचिन्न होय ॥ ६३४ ॥ नैय्यायिका अनित्यनित्यद्रव्यवृत्ति । मान्य आहे द्रव्यत्वजाती । तेणें जातित्वें अनित्यत्व नित्यद्रव्याप्रति । सर्वथाही घटेना ॥ ६३५ ॥ अथवा हो कां जात्यधिकृत लीनवृत्ति । परि चिदनुभवापलाप न साधे सुषुप्तीं । ह्मणोनि जागेपणीं विसदृशवृत्ति । अहंब्रह्मस्थिती प्रतिपादी ॥ ६३६ ॥ एवमत्यंताविद्याविसदृशत्वहेतू । ब्रह्मज्ञान लीन न पावे सुषुप्तीआंतू । हाचि काढी सिद्धान्तू । आपुलेनि बळें ॥ ६३७ ॥ प्रारब्धवशें अभिभव जाहला । तरी अभिभवें भय नाहीं तयाला । आणिकही हेतू भला । सांपडे येथ ॥ ६३८ ॥ इतर अज्ञानी जागे होती । तैं इदंप्रवाहमात्रप्रतीती । अहं-

प्रत्यभिज्ञाप्राप्ति । तैसीच होय ॥ ६३९ ॥ इदंप्रवाह जरी नसतां । तरी भलतिये वेळीं विच्छिन्न न होतां । ह्मणोनि नियामकनियम्यतत्वतां । सुषुप्त्युत्थ जगत्प्रवाह हा ॥ ६४० ॥ ॥ निजोनि उठतां ज्ञानी । तया वृत्ती जे उमटे ब्रह्मपणी । तद्विच्छेदक वैसदृश्य नाहीं ह्मणोनि । प्रत्यभिज्ञापणीचि ती उमटे ॥ ६४१ ॥ यद्यपि कार्यव्यप्रतें अभिभव । मंदज्ञानिया होय ठाव । तथापि स्मरलिया भाव । अनुच्छिन्न प्रत्यभिज्ञात्वें ॥ ६४२ ॥ सृष्टिप्रत्यभिज्ञारुखा । नव्या नव्या फुटती शाखा । ह्मणोनि ब्रह्मविद्या सर्वथा विसदृश देखा । तीस सकार्याज्ञानआवांका नव्हे ॥ ६४३ ॥ इत्यादि जें करणें ध्यान । यचेंचि नांव गा मनन । एर परशास्त्रपक्षादिकांचे अनुरोधन । त्या नांव मनन उपचारू ॥ ६४४ ॥ श्रवण केलियाचा मृदु अनुभव । हेंचि मननाची मुख्य ठेव । श्रुतार्थाचा मध्यानुभव । निदिध्यास तो ॥ ६४५ ॥ श्रुतार्थ तीव्र अनुभविजे । आंगें आपण तो होइजे । या नांव गा बोलिजे । साक्षात्कारू ॥ ६४६ ॥ वादी ह्मणे शिष्याप्रति । येथ आमची न चले गती । परि आणखी विचारी स्वामीप्रति । जेणें होईल आह्मांवरुती पीयूषवृष्टि ॥ ६४७ ॥ तें शिष्य ह्मणे भगवंता । हें तव उत्तरविस्तारकथा । परी अनुरोधें आलिया हाता । आह्मी न सोडूं ॥ ६४८ ॥ तरी केलें जें कां श्रवण । त्याचें साधक बाधक युक्त्या मनन । ऐसें जे कां आहे वचन । तयाचा कवण अर्थ कल्पावा ॥ ६४९ ॥ तदा श्रीगुरू ऐक ह्मणती । त्रिविध आहे अधिकारीस्थिती । उत्तम मध्यम कनिष्ठ रीती । बोलिली ऐसी ॥ ६५० ॥ हिरण्यगर्भजनकाऐसा । जो मुक्त होय श्रवणासरिसा । तो अधिकारी आपैसा । उत्तम ह्मणावा ॥ ६५१ ॥

" कानांवचनाचिये भेटी । सरिसाचि पैं किरीटी ॥
वस्तू होउनी उठी । कवणी एक जो ॥ ९९१ ॥

( ज्ञाने० अ० १८ श्लो० ५० )

एवं हृदयार्कवचनप्रकाशें । जाणावें श्रुतिचक्षुषें । आतां मध्यमाधिकारीही आपैसे । तातचि वदती ॥ ६५२ ॥

" परि बोखड घेतलेंवो । काय लागे आपला ठावो । कां उदयजताचि दिवो । मध्यान्ह होय ॥ ९९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वोलटें । बीजही पेरिलें

गोमटें । तरि आलोट फळ भेटे । परि वेळे की गा ॥ ९९९ ॥ जो हला मार्ग प्रांजळ । मिनला सुसंगाचाही मेळ । तरि पाविजे वांचूनि वेळ । लागेचि कीं ॥ १००० ॥ ऐक्याचें एकपण सरे । जेथ आनंदकणही विरे । कांहींचि नुरोनि उरे । जें कांहीं गा ॥ १००५ ॥ तिये ब्रह्मीं ऐक्यपणें । ब्रह्मचि होऊनि असणें । तें क्रमेंचिकरून तेणें । पाविजे पैं ॥ १००६ ॥ ” ( ज्ञाने० अ० १८ श्लोक ५० )

इत्यादिवचनीं मध्यम श्रोता । लाहे अधुनोक्तमननाधवश्यकता । तोचि व्यंग्य ब्राह्मण तत्त्वतां । बोलिला येथ आह्मी ॥६५३॥ जो उत्तम आमुचें संप्रदायीं । तो सद्गुरूचि तया नियम नाहीं । दीप लावितांचि क्षणीं पाहीं । दीपत्व जया ॥६५४॥ मध्यम व्यंग्य ब्राह्मणा आगमनिष्ठा । तो आधींचि पावला तर्ककाष्ठा । यालागीं साधकबाधकयुक्ति प्रतिष्ठा । कायसी तेथ ॥ ६५५ ॥ म्हणोनी श्रुतार्थमृद्वनुभवमनन । हें प्रागनुक्त परी आह्मी केलें लक्षण । आतां कनिष्ठाधिकारी आगमफळनिष्ठ पूर्ण । परि उपायांशीं महाभ्रांत ॥६५६॥ तयानें करितां श्रवण । असंभावनादि उठती गहन । यालागीं वाद जल्प वितंडा घेऊन । साधकबाधक युक्ती मनन करावें तेणें ॥ ६५७ ॥ तो व्यंग्यक्षत्रिय बोलिला । परापासोनि संप्रदायरक्षणाधिकार तयाला । अधमाधम तो अधिकारी बोलिला । जो शंकासमाधानमात्रें सुखी ॥ ६५८ ॥ आगमीं आहेत युक्ति । ह्मणोनि निष्ठा जयाचे चित्तीं । तो अधमाधमाधिकारी ह्मणती । व्यंग्यवैश्यस्थिती पावे जो ॥ ६५९ ॥ शंकाही समाधान झालिया । निष्ठा यथार्थ नुपजे जया । अनधिकारी ह्मणिजे तया । व्यंग्य शूद्रातें ॥ ६६० ॥ सद्गुरुभाषण आगमोक्ति । व्यंग्यब्राह्मणभाषण स्मृति । विवरण व्यंग्यक्षत्रियोक्ति । व्यंग्यवैश्योक्ति सुभाषितें ॥ ६६१ ॥ एवं सांप्रदायिकवचनप्रमाणव्यवस्था । कोणी गेलिया आनपथा । तत्पक्षविक्षेप सर्वथा । ब्राह्मणें वारावा निजवचनीं ॥ ६६२ ॥ करणेंचि आलें बहु भाषण । तरी विशेष वादाचेंचि कारण । अथवा द्यावें अनुमोदन । परि जल्पवितंडाप्रमाण अवलंबू नये ॥ ६६३ ॥ जया नाहीं ध्यानस्थिती । अध्ययननिष्ठे लढविती युक्ति । ते व्यंग्यक्षत्रिय तयाप्रति । जल्पवितंडाअधिकारू ॥६६४॥ परि नैय्यायिकीं जे व्यर्थ निग्रह बोलिले । जे समयजयक मात्र जाहले ।

ते मी मान्य नाहींत केले । कुत्सित ह्मणोनी ॥ ६६५ ॥ केवळ पठन्मूर्खदुर्जनाप्रति । ते निग्रह आणोत विपत्ति । परि शहाणे ऐसा निग्रह न करिती । मान्यनिग्रहेंचि साधिती परविजय । ६६६ ॥ ते दर्शननिर्णयीं उत्तरविस्तारीं । निःशेष बोलेन निर्धारीं । व्यंग्यवैश्यकर्म मार्गे सुविचारी। येचि अध्यायीं बोलिले ॥ ६६७ ॥ उत्तरविस्तार अदीक्षिता । मी अगम्य करीन तत्वतां । यालागीं पूर्वविस्तारीं दाविली व्यवस्था । दिङ्मात्राध्ययनपथारोहका ॥ ६६८ ॥ कां अदीक्षितही हटें । उत्तरविस्तार वाचोत नेटें । परि तेथील रहस्य तया न प्रकटे । जें अभ्यासवाटे बोलेन मी ॥ ६६९ ॥ यालागीं येथ पावुनी । उत्तरविस्तारीं चढती मुनि । ऐसी प्रथम प्रौढसिद्धान्तबोलणी । पूर्वविस्तारीं होते करणें ॥ ६७० ॥ आणिक एक ऐकावें । दीक्षित न होतां बरवे । बीजग्रंथ न लिहावें । भलतेनी कदा ॥ ६७१ ॥ एरव्हीं सांप्रदायीकगुरुआज्ञा घेऊनी । मधुराद्वैत विवरावें सुखेंकरूनी । परि मद्ग्रंथविरोधपणीं । नाणावे ते ॥ ६७२ ॥ सबीज अभ्यासितां मधुराद्वैत । यथार्थ आचरितां मदुक्त । तरी स्वपरसंसारपरमार्थ । सुखाचे होती ॥ ६७३ ॥ अवताराचिया आशा । आळस धरूं नये मानसा । धीर सोडूं नये सहसा । अलौकिकपुरुषा दूर असतां ॥ ७४ ॥ जो धर्मकार्यकर्ता महंत । तिहीं अतिअलौकीक करूं नयेत अर्थ । अतिलौकिकेंही चित्त । करूं नये ॥ ६७५ ॥ अतिलौकिक आचरितां । तरी लोक न लेखती सर्वथा । पालखीस लाविलें जडभरता । रहुगणरायानें ॥ ६७६ ॥ अति अलौकिकें करितां चमत्कृती । तो दूर असतां अनुयायी शिथिल होती । ह्मणोनि श्रीकृष्णादि ईश्वरही करिती । लोकानुकूल लीला ॥ ६७७ ॥ श्रीराम आणि श्रीकृष्ण । वसिष्ठ संदीपना शरण । पुत्राकारणें अनुष्ठान । हें लोकोपायदर्शन निश्चयें ॥६७८॥ वास्तविक तंव पाहतां । निष्ठानुसार परमेश्वर कर्ता । एरव्हीं तो अलिप्त सर्वथा । सर्वाठायीं ॥ ६७९ ॥ पुनः पुनः हेंचि कथन । योगी रोगी क्लीब जरठ वर्जोन । आणिकांनीं करावें लग्न । ब्रह्मचर्यपण किंवा संन्यासग्रहण करूं नये ॥ ६८० ॥ कन्या न मिळे जयाकारण । आणि कामें रोगसंप्राप्तदीन । तेणें करावें वेश्यासेवन । परि कुलांगना भ्रष्ट करूं नये ॥ ६८१ ॥ ज्ञातगुप्त कुलटा होती । सद्गमनही तेचिरीती । प॰

प्रसिद्धी करितां निश्चिती । लाजूं नये ॥ ६८२ ॥ कन्या [illegible] । जो वेश्यागमन करी तत्वतां । तो सांप्रदायीक सर्वथा । ह्मणूं नये ॥ ६८३ ॥ स्वस्त्रीगमनाचें नियम । ते वेश्यागामियासीही [illegible] । परि [illegible] करूं नये परम । आणि रोगीही वेश्या नावलंबावी ॥ ६८४ ॥ [illegible] स्त्रिया विधवा आदि करून । त्यांही कदापि करूं नये परपुरुषगमन । केलिया तरी पूर्ण । संप्रदायांतून त्यजाव्या ॥ ६८५ ॥ अत्यंत उद्भवलिया कामवृत्ति । तरी चर्मगर्भी श्रीकृष्णमूर्ति । संयोगें समानंदप्राप्ति । अवलंबावी ॥ ६८६ ॥ सर्वांमाजी उत्तम । निःशेष निरोधावा काम । नाहीं तरी इतुके नियम । पाळावें स्त्रीपुरुषीं ॥ ६८७ ॥ जो गेसंजीनें निघाला । तो सखीकही गणिकार्ह झाला । तरि थोडें प्रायश्चित घावें तयाला । परि संप्रदायांतून काढूं नये ६८८ ॥ जया जयाची आहे बुद्धि । तया शिकवावें संस्कृतादि । अथवा कार्यप्रसंगीं । घेऊनि औषधी ब्रह्मचर्य रक्षावें ॥ ६८९ ॥ मज जें जैसें वाटलें । तें मी साच येथ लिहिलें । मनीं नाहीं रक्षिलें । कपट करूनी ॥ ६९० ॥ निःशेष जाईल जगांतील अनीति । तरी लग्नही न करावें निश्चिती । परि वेश्यागमनीं दाखवुनि तिरस्कृती । परांच्या कुलयुवती भ्रष्टवूं नये ॥ ६९१ ॥ नंगे गोसावी जे होती । ते स्नान करितां उपस्थ लांबविती । तैसी करूं नये इंद्रियविकृती । ब्रह्मचर्यार्थी ह्मणवोनि ॥ ६९२ ॥ ज्या बलात्कारें भ्रष्टविल्या । त्या सर्वथा भ्रष्ट नाहींत झाल्या । योग्य प्रायश्चित्त दिधलिया । पतिव्रता होती ॥ ६९३ ॥ रागयोगें विषयभोग । याचेंचि नांव पाप चांग । इच्छा नसतां विषयभोग । तरी तें पाप नव्हे पापफळ ॥ ६९४ ॥ कित्येक स्त्रिया नामरक्षणीं । बलात्कारें भ्रष्टविता कोणी । प्राण देती तेचिक्षणीं । ते अति अनुचित करणी मी ह्मणे ॥ ६९५ ॥ स्वयें पातक न करितां । दुजियानें करविता । तैं प्राण देणें पातक तत्वतां । हे शंकरानंद वदलें आत्मपुराणीं ॥ ६९६ ॥ पश्चात्ताप झाला जयासी । तया तारक असतां हृषीकेशी । प्राण देणें महापापासी । मूळ कां करावें ? ॥ ६९७ ॥ केवळ दिधल्यानें प्राण । पापनिवृत्ति नव्हे जाण । पाप सुटावयाकारण । केला पाहिजे निज संकल्प ॥ ६९८ ॥ पति असतां व्यभिचारिणी भली । आणि पति मरतां सती गेली । तेवढ्यानें पापनिवृत्ति झाली । हें कोण मूर्ख ह्मणे

॥ ६९९ ॥ महानिर्वाणतंत्रांत । सती जाणें पाप ह्मणती उमानाथ । तोही श्लोक प्रमाण येथ । देवोनि सांगू ॥ ७०० ॥

भर्त्रासह कुलेशानी न दहेत्कुलकामिनीम् ॥ ७९ ॥ उत्तरार्ध.
तव स्वरूपा रमणी जगत्याच्छन्नविग्रहा ।
मोहाद्भर्तुश्चितारोहाद्भवेन्नरकगामिनी ॥ ८० ॥
( महानिर्वाणतंत्र उल्लास १० )

भावार्थः— शिव ह्मणती गिरिनंदिनी । पतिसह जाळूं नये कामिनी । अवघ्या स्त्रिया भवानी । स्वरूप तुझें ॥ ७०१ ॥ कोणी मोहेंकरूनिया नारी । चढतां पतिचितेवरी । अवश्य जाय यमपुरी । रौरवदुःख भोगावया ॥ ७०२ ॥ श्लोकीं "मोहात्" ऐसें पद । तयाचा अभिप्राय हाचि शुद्ध । कीं पातिव्रत्ययोगसिद्ध । नाहीं जी ज्याहूनी ॥ ७०३ ॥ तीस सहगमन महापाप । रागें करूं नये धर्म्यहिंसासंकल्प । पति तारक हा खटाटोप । महामूर्ख बोलती ॥ ७०४ ॥ पातिव्रत्यधर्म स्त्रियांसी । परि समजलें पाहिजे पति हृषिकेशी । ईश्वरावीण उपास्यत्व नाहीं कवणासी । हा निश्चयेसी ब्रह्मसूत्रसिद्धांतू ॥ ७०५ ॥ कित्येक मोठें अनुचित करिती । पति मेलिया गळफास लावोनि मरती । न भजतां उमापति रमापति । व्यर्थचि मरती बापुडीं ॥ ७०६ ॥ महाभारतादिग्रंथीं । उत्तम बोलिलें जाणें सती । ते महापतिव्रतास्त्रियाप्रति । ज्या अग्नि नसतां जाळूं शकती पतिध्यानोत्थ योगानळें देहा ॥ ७०७ ॥ जेथ जेथ दंभ मात्र वाढे । तेणें तेणें अधर्म जोडे । वरी वेश्यागमन निषेधणें फुडे । आणि अंतरीं रोकडे फिरंग विस्फोट ॥ ७०८ ॥ ऐसें सर्वथा न करावें । सत्य तेंचि बोलावें । सत्यानेंचि तरती आघवे । उत्तम जन ॥ ७०९ ॥ व्यासाचें सत्य केवढें दुर्धर । सांगूनि आपुल्याचि मातेचा व्यभिचार । मी आहे धिवरिणीकुमर । हें आपणचि साचार बोलिलें ॥ ७१० ॥ दुसऱ्याचा प्राण जाय । ऐसें सत्य बोलूं नये । परमार्थी चाळवूं नये । सर्वथाही कवणातें ॥ ७११ ॥ प्रतिनिधी गृहस्थचि होवावा । वेश्याठाव तेणें न धरावा । वृद्ध प्रतिनिधी असतां बरवा । तरी ब्रह्मचारी रहावें तेणें ॥ ७१२ ॥ संन्यासी प्रतिनिधी करितां । तया नमस्काराधिकार नाहीं तत्वतां । म्हणोनि कृष्णसेवक गृहस्था । अधिक

मानूं मत्संप्रदायीं ॥ ७१३ ॥ प्रतिनिधी गणिका राखी । तरी तया दूर करावें संप्रदायिकीं । साक्षा अथवा कोणाचाही वंश शेखी । प्रतिनिधी करूं नये ॥ ७१४ ॥ अधीत आणि मधुराद्वैतनिष्ठ । तो प्रतिनिधी समजावा चोखट । जोंवरी वर्णासी पृथग्वाट । तोंवरी चतुर्वर्णभिन्न प्रतिनिधी करूं नये ॥ ७१५ ॥ प्रतिनिधीनें न भोगावी महंती । सदा सेवाका विश्वपति । अथवा सेवेस ठेवूनि आन शुद्ध व्यक्ति । असलिया शक्ति नजगम समन्वयलेखनकार्य करावें ॥ ७१६ ॥ मधुराद्वैतविरुद्ध लिहितां । तरी तो संप्रदायी नव्हे तत्वतां । येथ मूलत्व तातग्रंथा । आणि मद्ग्रंथा भाष्यत्व लेखावें ॥ ७१७ ॥ येथ जे लिहिली समाजव्यवस्था । ते मीचि नियमिली सर्वथा । त्याचा दोष माझिया माथा । आळंदीनाथा बोल नाहीं ॥ ७१८ ॥ जो आधीं आपण व्यभिचारी । आणि पुढेंही वृत्ति न सुधारी । तेणें व्यभिचारिणी होतां त्याची नारी । तरी त्याग सर्वथा करूं नये ॥ ७१९ ॥ याहूनि विपरीत असतां । त्यागावी व्यभिचारिणी वनिता । परि या कूटव्यभिचारिया तत्वतां । महादीक्षाधिकार संप्रदायीं नसे ॥ ७२० ॥ न शिकवावा बीजयोग । न शिकवावी सेवा अंतरंग । केवळ भसंध्यादिकार्योपयोग । म्हणून लघुदीक्षेनें संप्रदायी करावा ॥ ७२१ ॥ एवं गृहस्थ पुरुष आणि नारी । दोघेही असती व्यभिचारी । तरी वाचावया ज्ञानेश्वरी । अधिकार नाहीं तयातें ॥७२२॥ जयास अनुताप जाहला । जेणें दुष्कर्मपरित्यागनिश्चयो केला । तो कोणी ही अधिकारी बोलिला । संप्रदायीं येथ ॥ ७२३ ॥ संन्याशासी सेवाधिकार नाहीं । हें वैदिकामहास्तव बोलिलों पाहीं । भागवतधर्मे तंत्र संन्यासीही । शुद्ध आणि सेवानिष्ठ तरी प्रतिनिधी होऊं शके ॥ ७२४ ॥ हा विषयो वहुठायीं आला । पुनःही पाहिजे विस्तारिला । म्हणोनि म्हणती पुनरुक्त केला । कोणी ऐसें ॥ ७२५ ॥ अनुवादावांचूनि जे उक्ति । तयाचें नांव पुनरुक्ति । अनुवादक वा अभ्यासपर वाक्याप्रति । पुनरुक्ति म्हणणें अशास्त्र ॥ ७२६ ॥ इतुकेंही करोनी । दोष देणें आहे जयालागुनी । तयासाठीं नाहीं मद्वाणी । निर्मिली होय ॥ ७२७ ॥ लोकांच्या शब्दासाठीं । सांगूं नये असत्य गोष्टी । तंव वादी होणे नसतां अधिकारकोटी ! तत्व सांगूं नये हे शास्त्राज्ञा ॥ ७२८ ॥ सिद्धान्ती

म्हणे येथ जाण । निःशेष शास्त्राज्ञा प्रमाण । ते शास्त्राज्ञाचि सत्य म्हणोन । सत्यत्व तेथ ॥ ७२९ ॥ एरव्हीं आपुलें चित्त चोरितां । तयाचें नांव असत्यता । म्हणोनि मी आपुलिया मता । प्रमाणसहिता स्पष्ट करीं ॥ ७३० ॥ सुखें हो कां पुनरुक्ति । परि सांगतो त्रिवर्गप्रतिपत्ति । आचरितां मिळोनि भगवद्भक्ति । तरी तिन्ही वर्ग होती मोक्षसाधक ॥ ७३१ ॥ भक्तिरहित वेदान्ती । वैराग्यावांचोनि नाहीं गती । भागवतधर्मी त्रिवर्गीयाप्रति । वैराग्यस्थिती भक्तिबळें ॥ ७३२ ॥ म्हणोनि त्रिवर्ग कैसें सेवावें । हें सांगत आहे बरवें । जें भारतीं बोलिलें स्वभावें । अभ्युदयनिःश्रेयसहेतू ॥ ७३३ ॥

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ॥
यस्मिन्नेतत्कुले नित्यं त्रिवर्गस्तत्र वर्धते ॥
यदा भर्ता च भार्या च परस्परवशानुगौ ॥
तदा धर्मार्थकामानां त्रयाणामपि संगमः ॥
( भारत वनपर्व अ० १८० )

जेथ कांत आणि कान्ता । वर्तती एकचित्ता । जेवि समुद्रावांचोनि सरिता । नेणती गती ॥ ७३४ ॥ सरितेनें समुद्र पूर्ण । समुद्रें सरितांचें उपगमन । परी सरितेसचि गोडपण । समुद्राहूनी ॥ ७३५ ॥ तेवी पतिवांचोनि आणिक नेणे । ते पतिहून पतिव्रता धन्य मी म्हणें । धर्मअर्थकाम अनुगुणें । मिळती तेथ ॥ ७३६ ॥ धर्म तो सत्याचा । अर्थ तो सत्यासत्याचा । काम तो असत्याचा । बिढार होय ॥ ७३७ ॥ ऐसें तिन्ही हे पुरुषार्थ । परस्परविरोधी यथार्थ । परी स्त्रीपुरुष संतुष्ट जेथ । तेथ ते मिळती ॥ ७३८ ॥ पति आसक्त धर्माच्या ठायीं । स्त्रियेस पतिवीण प्रिय नाहीं । तरी धर्मअर्थकाम तिन्हीही । एकाचि तेथ ॥ ७३९ ॥ संपत्तींत समान सुखवाटा । विपत्तींत एक वाटा दोघांचा पुरवठा । तेथ धर्मअर्थकाम आन वाटा । जातील केवी ॥७४०॥ म्हणोनि स्त्रियांचें मुख्य रक्षण । परस्पर असणें प्रेमसंपन्न । एरव्हीं बंधनादि उपाय दारुण । ते अयोग्य म्हणती जयमंगल ॥ ७४१ ॥ येथ चार्वाकांचे मत । कीं धर्म न सेवावा किंचित । कामचि सेव्य अखंडित । पुनर्जन्म नाहीं म्हणोनी ॥ ७४२ ॥ हें बोलणेंचि अप्रमाण । काम

सर्वांसचि न मिळे समान । "धर्माविरुद्ध भूतेषु कामोऽस्मि" हें वचन । हरीचेंही आहे ॥ ७४३ ॥ म्हणोनि काम मिळणें योग्यस्थिती । त्यास पाहिजे पूर्वधर्मकृति । अर्थही सेवावा तेणेंचि रीति । आपुल्या यत्नें ॥ ७४४ ॥ कित्येकांचे ऐसे मत । कीं आपण यत्न न करावा किंचित । ईश्वर आणूनि देईल अर्थ । सर्व कांहीं ॥ ७४५ ॥ ईश्वर यांचा जावाई । कीं हे ईश्वराचे व्याही । जे आंगीं प्रयत्न नाहीं । आणि शेषशायी अपेक्षिती ॥ ७४६ ॥ जो ईश्वरप्रेमें वेडा जाहला । रात्रीदिवसाचा आठव जिमाला । तेणें प्रभूवरी रुसवा धरिला । तरी तो शोभे ॥ ७४७ ॥ परि जेवावया पाहिजे सकाळीं । आणि सूपकार व्हावा वनमाळी । ऐसी आळसियाचिया हृदयकमळीं । इच्छा सदा ॥ ७४८ ॥ सर्व आहे ईश्वर-कर्ता । हें तयासचि शोभे बोलतां । जयाचा विषय सर्वथा । नारायण ॥ ७४९ ॥ जयाचे हरिगुणावीण । रिते न होती पळभरही श्रवण । जयाचे पाहूं न शकती लोचन । हरिचरणावीण आणिका ॥ ७५० ॥ निंदा आणि स्तुती । या दोन्ही न रिघती हृदयप्रांती । एक परमात्मा सर्वांभूतीं । पाहतचि जो ॥ ७५१ ॥ निंदावचन ऐकतां । खेद नसोनी हर्षचि वाटे जयाच्या चित्ता । ह्मणे मजवरी उपकार भगवंता । क्षणोक्षणीं करिशी तूं ॥ ७५२ ॥ माझे ठायीं दोष सत्य । ते उघडोनी तूंचि दाविसी यथार्थ । म्हणोनि निंदकासही अचुंबित । नमस्कारचि घाली ॥ ७५३ ॥ ऐकतां आपुली स्तुती । तरी ते रिघोंचि नेदी चित्तीं । ह्मणे स्तव्य एक विश्वपती । येर आघवे अल्पज्ञ ॥ ७५४ ॥ पाषाणयोनींत गेला । तैं म्हणे मी पायरी होईन शिवालयाला । एवं उच्चनीचत्वाचा हारपला । भाव जयाचा ॥ ७५५ ॥ ज्या बंधमोक्षाची चिंता । आघवीच वाटे मिथ्या वार्ता । एक प्रिय मानिलें भगवंता । येर फळसाधन चित्ता येऊंचि नेदी ॥ ७५६ ॥ तयाचा सर्वकर्ता गोविंद । येथ अन्यथा नाहीं एक शब्द । आमुचा तव प्रबंध । याहूनि भिन्न ॥ ७५७ ॥ आम्हा घडिभरी आवडे सगुण । घडिभरी आवडे निर्गुण । निंदितो भोळ्या भाविकाकारण । आणि स्त्रियांचे वचनीं दृढ श्रद्धा ॥ ७५८ ॥ ऐकतां श्रीहरीचें गुण । प्रेमजळें न भरती नयन । मूर्ति पाहतों याचिकारण । शिल्पकार कैसा म्हणोनी ॥ ७५९ ॥ निंदा आणि स्तुती । याची

चित्तांत सर्वदा वस्ती । आणि आळस द्वाड मात्र चित्तीं । जोडला एक ॥ ७६० ॥ जेवावयासी पाहिजे आधीं । कार्य करावया मत्सरी बुद्धि । ऐसियास कृपानिधी । नाहीं परमात्मा ॥ ७६१ ॥ म्हणोनी ऐसेंही करितां । यत्नें अर्थ मिळवितां । प्रेमें अर्पावा भगवंता । तरी तेणें भक्तिही साधे ॥७६२॥ कोणाचें ऐसें मत । कीं ईश्वरार्पणीं दोष बहुत । ते तर्क करिती येथ । कीं कृष्णार्पण सर्व घडेना ॥ ७६३ ॥ देह करितां कृष्णार्पण । जरी देहामाजीं विण्मूत्र पूर्ण । तरी तयाचाही विभागी कृष्ण । जाहला म्हणावा ॥ ७६४ ॥ ऐसें जें बोलणें केलें । ते बोलतांचि फोल झाले । धूर्तपणीं मात्र ठकविलें । जना सकळा ॥ ७६५ ॥ ईश्वरार्पण करितां अंग । तरी त्याचा तोचि जाणे उपयोग । अर्पकबुद्धीचा नाहीं लाग ; प्रथम समाधान हें ॥ ७६६ ॥ ईश्वर चेतन सर्वांभूतीं । तोचि ध्येय जीवाप्रति । जीवासी देहीं अत्यंत प्रीति । ती जावया भगवंतीं अर्पावा देह ॥ ७६७ ॥ पूर्वपक्षीनी प्रश्न केला । कीं देह अर्पितां विण्मुत्रविभागी देव झाला । तरी थापटूनि विचारावें पूर्वपक्षीला । कीं विण्मूत्र भरित देहीं तुझी कां प्रीति ॥ ७६८ ॥ मलिन देहीं तूं प्रीतिवंत । येथ लाजेना तुझें चित्त । भगवंत तव मलरहित । तया अर्पितां मल स्पर्शेना ॥७६९॥ आणिक एक समाधान । जें जें करावें भगवदर्पण । तें तें आपुलिया सुखाचें कारण । येथ भगवद्वचनप्रतीती ॥ ७७० ॥

नैवात्मनः प्रभुरयं निजलाभपूर्णो मानं जनादविदुषः करुणो वृणीते ॥
यद्यज्जनो भगवते विदधीत मानं तच्चात्मने प्रतिमुखस्य यथा मुखश्रीः ॥११॥
( भागवत स्कं० ७ अध्या० ९ )

भावार्थः— परमात्मा स्वयं परिपूर्ण । तो पूजा न इच्छी अज्ञान्यापासून । परि आपुलियाचि कार्याकारण । जन करिती पूजा ॥७७१॥ दर्पणीं शोभा पाहणें । तरी आधीं मुखास स्वच्छ करणें । तैसें जीव प्रतिबिंबा आनंद देणें । तरी तो आधीं समर्पणें बिंब भगवंतीं ॥ ७७२ ॥ जो जो अर्पिला विषय । तो तो भगवत्संयोगें सात्विक होय । मग तेणेंचि कैवल्यठाय । उमगे चित्तीं ॥ ७७३ ॥ म्हणोनि शनैः शनैः तरी । अर्थ मिळवोनि पूजावा हरी । धर्मनिष्ठा परोपकारी । योजूनि अर्थ ॥ ७७४ ॥ आतां कित्येकांचें मत । कीं काम सेवूं नये किंचित । धर्मचि करावा

यथार्थ । किंबा अर्थ जोडावा ॥ ७७५ ॥ हें एक ह्मणणें गोमटे । आणि एक ह्मणणें अत्यंत खोटे । धर्म करावा नेटपाटे । येथ ना कवण ह्मणे ॥ ७७६ ॥ जो नित्यधर्मी रिघाला । धर्मोचाचि जाहला । तयालागीं काम उपदेशिला । नाहीं कोणी ॥ ७७७ ॥ सर्वथा काम निरोधूनी । धर्म साधणें हें सनत्कुमारादि योगियांची करणी । अथवा अत्यंत भगवत्प्रेमावेशेंकरूनी । कामस्मृतीचि नाशे ॥ ७७८ ॥ परि जया नित्य नाहीं ऐसी स्थिती । तयाचें काम निरोधणें शशशृंगोक्ति । यालागीं विवाह करावा प्रीति । संन्यासाग्रह धरूं नये ॥ ७७९ ॥ ह्मणो औषधादि उपायें । नपुंसक होवावें स्वयें । तरी तया अधिकार नोहे । वेदशास्त्रांचा ॥ ७८० ॥ नीति ह्मणजे कवण भाव । मानससशक्त्न कीं सत्स्वभाव । आद्यपक्षीं मृदुसंवेग सदैव । तीव्र संवेग नव्हेल कदा ॥ ७८१ ॥ अंत्यपक्षीं पशूंच्या ठायीं । मोक्ष असावा सहज पाहीं । ह्मणाल कीं सर्वनीति पशूस नाहीं । तरी सर्वनीतिमंत मनुष्यही नसे ॥ ७८२ ॥ ह्मणोनि परमेश्वरीं । चित्त ठेवावें आयुष्यभरी । आणि तद्भक्तीत विघ्नकारी । कार्य निर्धारी करूं नये ॥ ७८३ ॥ एरव्ही आग्रह मात्र उरे । जयाचा कामक्रोध निःशेष मुरे । तिहीं भिक्षे फिरावी घरें । संन्यासचौबारें घेउनी ॥ ७८४ ॥ ऐतरेयशांकरभाष्य पाहतां । स्त्रीवीण धनसंग्रहणीं अधिकार नाहीं गृहस्था । पुत्राचेंही धन तत्वतां । स्त्रीवांचोनि मागूं नये ॥ ७८५ ॥ ह्मणोनि स्त्री जयास नाहीं । तो संन्यासावांचोनि प्रेतदेही । संन्यास घ्यावया लवलाही । दृढ वैराग्य पाहिजे ॥ ७८६ ॥ इंद्रियें देतील भरंवसा । मनाचा संकल्प नुरे ऐसा । तरी अस्मत्संप्रदायींही संन्यासा । निषेध नाहीं ॥ ७८७ ॥ परि हें लक्षामाजीं एके । कां कठिण सहस्रा पाठिराखे । ह्मणोनि सर्वसंमत मी ह्मणे निके । कीं विवाहचि कीजे ॥ ७८८ ॥ स्वयें बोलिले भगवंत । कीं बरिबरी आचार दावित । आणि मनीं कामाचें स्मरण करीत । तो आचार अवघा मिथ्या ॥ ७८९ ॥

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥
( गी. अ. ३ श्लो. ६ )

ययाचा अर्थ तात वदती । तो पाहूनि घ्यावा महामती । आणिकही

तांची उक्ति । प्रमाण येथ ॥ ७९० ॥ " ह्मणोनि अतिशय विषय सेवावा । ऐसा बोधू नोहावा । कां सर्वथा निरोधावा । हेही नको " ॥ ३४८ ॥ ( ज्ञानेश्वरी अ० ६ )

" ज्याचे मन नाहीं लागले हातासी । तेणें संसारासी त्यागूं नये " । ऐसें श्रीतुकारामाचेंही वचन होय । बळें काम निरोधितां सोय । उपजती व्याधी ॥ ७९१ ॥ यालागीं यथाविधी काम सेवावा । तेणें पुरुषास तंव कामचि मिळे बरवा । स्त्रियेस मात्र आघवा । कामेंही मिळो शके धर्म ॥ ७९२ ॥ पतीस मानुनी भगवंत । पुरवितां पतीमनोरथ । तरी कामेंचि स्त्रियास धर्म मिळत । जैसे विषांतूनि अमृत मिळे वैद्या ॥७९३॥ अथवा काम परमेश्वरीं । योग्य योजितां निर्धारीं । तया कामाचीच होय बोहरी । हें उत्तरविस्तारीं विशेष बोलूं ॥ ७९४ ॥ द्रौपदीसत्यभामासंवाद । महाभारतीं वनपर्वीं प्रसिद्ध । तेथ पतिव्रताधर्म बोलिलें विशद । आणि मीही बोलेन पतिव्रताचारितामृतीं ॥ ७९५ ॥ तें आघवेचि वाचुनी । धर्म साधोत कामिनी । परि भागवतधर्म वरिष्ठ त्याहीहुनी । साक्षाद्भगवत्संबंधास्तव ॥ ७९६ ॥ आतां अयोग्यकामाचें सेवन । ते तंव सर्वथा निषिद्ध पूर्ण । स्वयें बोलती वात्सायन । कीं रक्षाया प्राण सेवावी परदारा ॥ ७९७ ॥ परी तेथ पारदारिकाधिकरणीं । बोलिले कीं परदारा मिळवावी तिचें शील भ्रष्टवुनी । हें मान्य नाहीं मजलागुनी । जरी ऋषिप्रोक्त ॥ ७९८ ॥ आतां त्याचि अधिकरणांत । सांगितली अयत्नसाध्यस्त्रियांची मात । त्या वचनाची मात्र येथ । व्यवस्था सांगतो ॥ ७९९ ॥ तंव वादी ह्मणे हें मग सांगावें । आधीं मद्वचन अवधारावें । स्त्रिया भ्रष्ट असती स्वभावें । तेथ पतिव्रता नच कोणी ॥ ८०० ॥ सिद्धान्तीह्मणे हें तुझें मत । गर्ह्य आहे अत्यंत । हें अवलंबिता तुझी माताचि निश्चित । नित्य व्यभिचारिणी होईल कीं ॥ ८०१ ॥ माझें मत आहे ऐसें । कीं स्त्रीपुरुष विकारी सारिखाचि असे । वासनारोधें मोक्ष उमसे । दोघांसही ॥ ८०२ ॥ स्त्रियांचीं निंदा महाभारतीं । आणि बृहत्संहितेंत स्त्रियांची स्तुती । यावरुनी समानता सर्वांप्रति । सुखें मी ह्मणे ॥ ८०३ ॥ कामशास्त्र विचारोनी पाहतां । तरी स्त्रिया भोगव्यावृत्त स्वभावता । तो आधीं विचार सांगोनि सत्वतां ।

मग अयत्नसाध्य विचार सांगू ॥ ८०४ ॥

" तत्र व्यावर्तनकारणानि-- पत्यावनुरागः । अपत्यापेक्षा । अतिक्रान्तवयस्त्वम् । दुःखाभिभवः । विरहानुपलम्भः । अवज्ञयोपमंत्रयत इति क्रोधः । अप्रतर्क्य इति संकल्पवर्जनम् । गमिष्यतीत्यनायतिरन्यत्र प्रसक्तमतिरिति च । असंवृताकार इत्युद्वेगः । मित्रेषु निसृष्ट भाव इति तेष्वपेक्षा । शुष्काभियोगीत्याशंका । तेजस्वीति साध्वसम् । चंडवेगः समर्थोवेति भयं मृग्याः । नागरकः कलासु विचक्षण इति व्रीडा । सखित्वेनोपचरित इति च । अदेशकालज्ञ इत्यसूया । परिभवस्थानमित्यबहुमानः । आकारितोऽपि नावबुध्यत इत्यवज्ञा । शशो मंदवेग इति च हस्तिन्याः । मत्तोऽस्य माभूदनिष्टमित्यनुकम्पा । आत्मनि दोषदर्शनान्निर्वेदः । विदिता सती स्वजनबहिष्कृता भविष्यामीति भयम् । पलित इत्यनादरः । पत्या प्रयुक्तः परीक्षत इति विमर्शः । धर्मापेक्षाचेति" ।

( कामसूत्र-पारदारिकमधिकरणम् )

भावार्थः— वात्सायनऋषींनीं स्वतः स्त्रियांनां धर्माधर्म कांहीं नाहीं हें-"न स्त्री धर्ममधर्मंचापेक्षते । कामयत एव" । या सूत्रानें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. आणि या प्रकरणांत स्त्रिया धर्मामुळें परपुरुषाला वश होत नाहींत; असें सांगत आहेत. एकापाठीं एक असलेल्या या दोन प्रकरणांत ऋषीच्या तोंडून एकदम विरोधी वाक्यें निघावींत हें आश्चर्य होय. या सूत्रांचा विरोध स्त्रीपुरुषसमता अंगिकारिली असतां दूर होतो. टीकाकारांनीं न्यूनाधिक संख्येनें याचें समाधान केलें आहे. वास्तविक पाहतां स्त्रियांनां परपुरुषाच्या स्वाधीन न होण्याला पुष्कळ प्रतिबंध आहेत. तितके पुरुषाला नाहींत. ते प्रतिबंध वात्सायनमुनि सांगतात.

ओव्या— अत्यंत प्रीति पतीचे ठायीं । किंवा बाळासी स्तन पाजणें पाहीं । इत्यादि अनेक लवलाहीं । आणि धर्मप्रतिबंध उत्तम ॥ ८०५ ॥ म्हणोनि स्त्रिया पुरुषाप्रति । सर्वथा वश न होती । पातिव्रत्यउत्तमस्थिती । येणेंचि रक्षण ॥ ८०६ ॥ पतीचि स्त्रियांचें तप । पतीचि स्त्रियांचा जप । मोक्षेच्छा नाहीं तोंवरी स्वर्गसंकल्प । पतीचि स्त्रियांचा ॥ ८०७ ॥ इतर सूत्रार्थ स्पष्ट आहे. आतां अयत्नसाध्या स्त्रियांचें

निरूपण । करावया हेंचि कारण । कीं स्त्री वश नोहे प्रेमाविण । उपाय अनंत केलिया ॥ ८०८ ॥

"अयत्नसाध्या योषितस्त्विमा । अभियोगमात्रसाध्याः । द्वारदेशावस्थायिनी । प्रासादाद्राजमार्गावलोकिनी । तरुणप्रातिवेश्यगृहे गोष्ठीयोजिनी । सततप्रेक्षिणी । प्रेक्षितापार्श्वविलोकिनी । निष्कारणं सपत्न्याधिविन्ना । भर्तृद्वेषिणी विद्विष्टा च परिहारहीना । निरपत्या । ज्ञातिकुलनित्या । विपन्नापत्या । गोष्ठीयोजिनी । प्रीतियोजिनी । कुशीलवभार्या । मृतपतिका बाला । दरिद्रा बहूपभोगा । ज्येष्ठभार्या बहुदेवरका । बहुमानिनी । न्यूनभर्तृका । कौशलाभिमानिनी भर्तुर्मौर्ख्येणोद्विग्ना । अविशेषतया लोभेन । कन्याकाले यत्नेन वरिता कथंचिदलब्धाभियुक्ता च सा तदानीं समानबुद्धिशीलमेधाप्रतिपत्तिसात्म्या । प्रकृत्या पक्षपातिनी । अनपराधे विमानिता । तुल्यरूपाभिश्चाधःकृता । प्रोषितपतिकेति । ईर्ष्यालुपूतिचोक्षक्लीबदीर्घसूत्रकापुरुषकुब्जवामनविरूपमणिकारग्राम्यदुर्गंधिरोगिवृद्धभार्याश्चेति । ( कामसूत्रं पारदारिकमधिकरणं )

टीकाः— अयत्नसाध्या योषितस्त्विति वक्ष्यमाणाः । अभियोगमात्रसाध्या इति या अभियोगमात्रमपेक्षते नाधिकं ता अयत्नसाध्या इत्युच्यन्ते । द्वारदेशावस्थायिनीति पुरुषदिदृक्षया द्वारदेशेऽवस्थातुं शीलं यस्याः सा चपलाभियोगमात्रसाध्या । प्रासादादिति प्रासादमारुह्य राजमार्गावलोकिनी । राजमार्गे हि पुरुषाणां संनिधानात् । सतरुणेति सतरुणाः पुमांसो यत्रेति प्रातिवेश्यगृहे यत्रत्याभिः स्त्रीभिर्गोष्ठीयोजिनी सा चापल्यं द्योतयति । सततप्रेक्षिणीचेति या सततं प्रेक्षते सा तस्य साध्या । प्रेक्षितेति नायकेन पार्श्वविलोकिनी या पार्श्वमवलोकयति किमन्येन दृष्टास्मीति सापि चापल्यं कथयति । निष्कारणमिति या तु दौःशील्यादिकं विनेति सपत्न्याधिविन्नायुक्तामर्षात्परपुरुषमिच्छति । भर्तृद्वेषिणी गुणवंतमपि भर्तारमनिच्छन्ती विद्विष्टाचेति भर्ता यां द्वेष्टि द्वे अपि चंचले परिहारहीना निष्परिहारा परिहार्येषु सा स्वभावत एव व्यभिचारिणी । निरपत्या भर्तुरपत्यमपश्यंती परानुपैति । ज्ञातिकुलनित्या ज्ञातिगृहे सदावस्थिता स्वातंत्र्याद्भिन्नवृत्तिः । विपन्नापत्या भर्तुर्यद्यदपत्यं तत्तद्विपद्यत इति परपुरुषापेक्षाफलाभावाद्वा । गोष्ठीयोजिनी स्वगृहे सखीगृहे वा चापल्यं

सूचयति प्रीतियोजिनी येनसह प्रीतिं योजयति तस्य साध्या । कुशीलवभार्या नटनर्तकादीनां भार्या वेश्याप्राया: । मृतपतिका बालेति बाला च या विधवा सा तारुण्ये निषद्यमाना शीलं खंडयति । दरिद्रा बहूपभोगान्वितं दातारमभिगच्छति । ज्येष्ठभार्या बहुदेवरका प्रायशो देवरैरेव व्युत्पादिता । बहुमानिनी न्यूनभर्तृकेत्यात्मनि बहुमानो यस्या: । न्यूनश्च भर्ता सा न तत्र रमते । कौशलाभिमानिनी कलानां परिज्ञानाभिमानो यस्या: सा भर्तुर्मौर्ख्येण मूर्खत्वेनोद्विग्ना नियतं तत्कुशलमन्विष्यति । अविक्षणतया भर्तुरुद्विग्ना विक्षिप्ता लोभेन भर्तुरुद्विग्ना स्वयमलुब्धा न तत्र रमते । कन्याकाल इति कन्यावस्थायां यत्नाशायकेन वृता कथंचित् दैवयोगात्त न लब्धा सत्यन्येनोढेत्यभियुक्ता तदानीं यत्र तस्येच्छा सा तस्य साध्या । पूर्वानुरागात् । समानबुद्धिरिति नायकेन तुल्या बुद्ध्याद्यस्य यस्या: सा तस्य साध्या । तत्र बुद्धिर्विषयेषु । शीलं स्वभाव: । मेधाविद्याकलासु ग्रहणशक्ति: । प्रतिपत्तिरनुष्ठानम् । सात्म्यं देशसात्म्यं प्रकृतिसात्म्यं च । प्रकृत्येति स्वभावेन यं प्रति पक्षपातो यस्या: सा तस्य साध्या । अनपराध इति दोषं विना भर्त्रावमानिता परिभूता न तत्र सज्जते । अन्यमिच्छति । तुल्यरूपाभिश्चाध:कृतेति समानप्रतिपत्तिभि: सपत्नीभिर्न्यक्कृता विरागादन्यमिच्छति । प्रोषितभर्तृका ब्रह्मचर्येण भग्ना कथमन्यान्नेच्छेत । यो निष्कारणमीर्ष्यते तस्य भार्या विटैश्चिरमपहृतैव । पूति: शरीरसंस्काररहित स्तस्य भार्या कश्मलत्वाद्विमुखी भवति । चोक्षो जातिविशेषस्तद्भार्या वेश्याप्राया । क्लीबो नपुंसक: । द्वयोरपि भार्या परस्यैव । कुब्जवामनयोर्विरूपयोरप्युपादानं वैरूप्यभेदप्रकर्षणार्थम् । द्वयोरपि भार्या खंडितशीला । मणिकारो मणीनां संस्कर्ता । तद्भार्या सदैव हट्टचारिणी खंडितशीला । ग्राम्यभार्या नागरकस्यायत्नसाध्या स्यात् । दुर्गंधि: शरीरे यस्य दुष्टो गंध: स उद्वेगकर: । रोगी यो दीर्घरोगयुक्त: । वृद्धो व्यवायाक्षम: । एषां भार्या व्यभिचारिण्य: ” ॥

भावार्थ:— अयत्नसाध्या स्त्रिया दोन प्रकारच्या आहेत. भ्रष्टशीला, आणि भ्रश्यमानशीला. भ्रष्टशीला ता कुलटा किंवा वेश्या म्हटल्या जात. आणि भ्रश्यमानशीला अयत्नसाध्या म्हटल्या जात. जिचे शील भ्रष्ट झाले आहे अशा स्त्रिया संयोगानें वेश्यागमनानेंच होणारे

पातक होते. दुसरें होत नाहीं. आणि भ्रश्यमानशीला जी आहे, तिचें शील आपणच प्रथम भ्रष्ट केलें असतां तिच्या संयोगानें पारलौकिक भयंकर पातक होते. जी भ्रष्टशीलाही नाहीं व भ्रश्यमानशीलाही नाहीं, अशा स्त्रीकडे तर पापदृष्टीनें पाहिल्याची सुद्धां याच जन्मांत फळें भोगावीं लागतात. जिचें शील भ्रष्ट झालें आहे व जिनें प्रायश्चित्त केलें नाहीं, अशी स्त्री कर्मादिकांचे ठायीं अनर्ह असल्यामुळें वेश्याधर्मावांचून दुसरा धर्म करील तर ती महापापिणी होते. अथवा प्रायश्चित्त करून शुद्ध होऊन धर्मिणी होऊं शकते. भागवतधर्मांत प्रायश्चित्तावांचून केवळ पश्चात्तापानेंच वाईट काम सोडून देईल तर ती मुक्त होते. वाम भेसंडीत वाईट काम करीत असतानां देखील ती मुक्तच आहे; असें कोणी ह्मणतात. आह्माला त्याचें काय करावयाचे आहे ? इतकाच या सूत्राचा भावार्थ आहे. बाकीचा अर्थ टीकाकारांनीं स्पष्ट केला आहे.

ओव्या—धार्मिका धर्मांचि उत्तम पोटीं । सुसमाजभेसंडीसाठीं । तयाची अर्थवत्ता गोमटी । तेही सांगू ॥ ८०९ ॥ जया भेसंडी मात्र करणें । तेणें आपद्धर्म अवलंबणें । प्रारब्धानुसार भोगणें । क्रिया सकळ ॥ ८१० ॥ पाप नाहीं भुकेल्या अन्नचोरा । पाप नाहीं भेसंडिस्थ व्यभिचारा । अनृतीं पाप नाहीं परा । वाचवितां ॥ ८११ ॥ पाप नाहीं आततायीमोचनीं । नवल प्रारब्धाची करणी भगवंत एक अंतरीं धरूनी । प्रारब्ध निवटाया यत्न कीजे ॥ ८१२ ॥ अर्जुन पुरुष असूनि नारी । जाहला राया विराटघरीं । असत्यैश्वर्यीच्या दासवाचा हरी । पाठ देउनी पळाले यवना ॥ ८१३ ॥ मामे भाचे देवळासाठीं झाले जैन । बहिरंभट सत्य शोधाया झाला यवन । मृत्युंजय शेखमहमदादि आपण । असोनि मुसलमान हिंदु जाहले ॥ ८१४ ॥ कच देवगुरुनंदन असोनी । शरण गेला शुक्रचरणीं । अगाध आहे दैवाची करणी । यास्तव देशकाळ धरोनी धर्माधर्म ॥ ८१५ ॥ जो अंतःकरणें वैदिक । तया बळें जरी भ्रष्टविती तांत्रिक । तरी तो महात्मा निष्कलंक । आपुल्या वैदिक गतीतें पावे ॥ ८१६ ॥ शरीरावयव छेदितां । कृत्रिम दीक्षा अवलंबितां । पुढती शुद्धदीक्षा घेतां । प्रायश्चित्त तयातें ॥ ८१७ ॥ ज्या भगवद्दीक्षेनें यवन । शेखमहमदादि जाहलें भक्तिसंपन्न । त्या भगवद्दीक्षेनें भागवता-

यसाधकाकारण । प्रायश्चित्त नव्हे हें अति अनुचित ॥ ८१८ ॥ जैसे कां व्यवहारनटें । सोंगमात्रें न येती बापपेठे । तैसे नाना धर्म नटे । सोंगमात्रें पापपेठे न येती ॥ ८१९ ॥ आत्मदृष्टीनें पाहतां । सकळधर्मांसी मिथ्यता । यालागीं हेंचि साधणें महत्ता । धर्माधर्मावेगळें होावें ॥ ८२० ॥ दैवतीं उपासकें प्रेम धरावा । दैवतें उपासकसमुदाय रक्षावा । सर्वथा अभिभवूं न द्यावा । परोपासकें ॥ ८२१ ॥ यथाशक्ति परोपकार । करणें हें उत्तम फार । गृहस्थांचें तीर्थ सुंदर । भिकारी हे ॥ ८२२ ॥ अगाध परमेश्वराची लीला । मुंगीसही मिळे कण सगळा । तेथ मी एक दाता वेगळा । हा अभिमान मात्र ॥ ८२३ ॥ एकानें निश्चय केला । कीं मी न दे कांहीं कवणाला । तरी काय दुसरा कोणी तयाला । देणार नाहीं ॥ ८२४ ॥ ह्मणोनि ऐसें चित्तीं धरावें । कीं भिकारियांनीं मज पुण्यसमय मिळवूनि दिधला हें बरवें । यालागीं अंतरीं नमस्कारावें । प्रेमें तया ॥ ८२५ ॥ जे धर्मछलक आणि कुमती । सामर्थ्य आणि गृहस्थी । ऐसें असोनीहि भिक्षा मागती । त्यासी मुष्टिधान्यही देऊं नये ॥ ८२६ ॥ उत्सव करावा जेव्हां । तिथे जेवावयास बोलवावें तेव्हां । चौथा बोलावणें नाहीं बरवा । व्यर्थ वित्तव्ययीं ॥ ८२७ ॥ प्रथम बोलवावा निर्मत्सर विद्वान ब्राह्मण । दुसरा बोलवावा मूर्खही परी परोपकारसंपन्न । तिसरे बोलवावे दरिद्री ब्राह्मण । शूद्र वा चांडाल यवन कोणीही होतू ॥ ८२८ ॥ मत्सरी आणि पंडित । त्यासी संगती धरूं नये किंचित । मूर्खही निर्मत्सरी यथार्थ । सांगाती करावें ॥८२९॥ ऐसी असावी भगवत्प्रीति । जेणें कळवळा उपजे सर्वांभूतीं । अंतःकरणाची धांव निरुती । सामर्थ्यापरौता जाऊं द्यावी ॥ ८३० ॥ सकलधर्मसमन्वय करावा । किंवा कोणताही धर्म उपसर्गरहित योग्य राखावा । धर्मघोटाळा होवों न द्यावा । इकडे ना तिकडे ॥ ८३१ ॥ विवाहित कन्येस आंदण देतां । भूषणाग्रह करूं नये तत्वता । औषधी आंदण द्याव्या उचिता । अथवा कन्येच्या पुत्रशिक्षणार्थी करावें प्रतिज्ञापत्र ॥ ८३२ ॥ करावें सकळ धर्मांचें अध्ययन । तयाचेंही सांगतो लक्षण । जीवप्रयत्न ईश्वरानुमोदन । कर्मानुसारें करून सुखदुःख ॥ ८३३ ॥ परातें बोल सर्वथा नाहीं । ईश्वरत्व मिळविणें मुक्ति पाहीं । हें धरोनिया

हृदयीं । वैदिकधर्माभ्यास करावा ॥८३४ ॥ आपुलेंचि केलें आपणा फळे । निर्वाण तंव अद्वैत ब्रह्मचि उगळे । हें हृदयीं धरोनि भोकळे । बौद्धधर्माध्ययन कीजे ॥ ८३५ ॥ अंबरीषाची कथा । लक्षीं धरोनिया तत्वतां । महामदपंथ आणि ईशपुत्रपथा । अभ्यासिजे ॥ ८३६ ॥ सदुपदेशार्धकूटकीं । अंतर्भावना कीजे निकी । हें भविष्यपुराणानुसार-विशेखी । बोलिलें मिया ॥ ८३७ ॥ कबीर आणि नानक । तसलबूकादि सकळिक । तयाचा काढूनि कलंक । निष्कलंक कीजे अर्धकूटकीं ॥ ८३८ ॥ संप्रदायकुसुममधु । पाजूनि पुष्ट कीजे बहुधर्मबंधु । सन्यो-पदेशार्धू । विसरूं नये ॥ ८३९ ॥ आनंदमार्गी मानभाव । इत्यादि मराठी पंथही सर्व । तत्तन्मंत्र दावोनि सावेव । उपदेशार्ध कीजे ॥ ८४० ॥

हे वादिन् ज्या ज्या पंथांना आपले तत्व प्रसिद्ध होण्याचा निषेध वाटत नाहीं त्या त्या पंथांचा अभ्यास करण्यास कांहीं अडचण येत नाहीं; परंतु निरनिराळ्या लिपींत अक्षरें लिहून ठेवून ग्रंथ न देण्या-विषयीं ज्या पंथांचा निश्चय आहे त्या पंथाचा अभ्यास करण्याची अड-चण पडते. असें वऱ्हाडामध्यें मानभाव, आनंदमार्गी, लालपंथ इत्यादिक आहेत. त्या सर्व पंथांचा लहानपणी त्या त्या पंथाच्या गुरूजवळून मी अनुग्रह घेऊन अभ्यास केला आहे. तो सत्यशोध करण्याकरितांच केला. परंतु मी आपल्या पूर्वपुण्यानें व अंतःस्फूर्तीनें शेवटीं पुराणोपबृंहित वैदिकधर्मातच स्थिर झालो. गुरूशीं विरोध केल्यामुळें झालेल्या पातका-बद्दल मी तातांचा अनुग्रह मिळेपर्यंत पश्चात्ताप करीत होतोच. वैरागी व नंगे गोसावी यांच्याही धर्माचा सूक्ष्म अभ्यास त्या त्या गुरूजवळून मी केला. ह्या धर्मांत कूटार्धोपदेश होणें फार सुलभ आहे. या धर्मांचे गुरुमंत्र माहित असले म्हणजे झालें. मानभावाच्या पंथाचेही पांच नांवें आहेत. ते पाठ ह्मणून मी उपदेशी आहे असें ह्मटल्यास कोणी नाहीं म्हणू शकत नाहीं. ते पांच नाम येणेंप्रमाणें:— १ द्वापरीं श्रीकृष्ण-चक्रवर्तीगोसाव्याचे चरण शरण किंवा सर्वज्ञाचे चरण शरण. २ सह्या-द्रीसिरी दत्तात्रयप्रभु गोसाव्याचे किंवा सर्वज्ञाचे चरण शरण. ३ द्वारा-वती श्रीचांगदेव राऊळ गोसाव्याचें किंवा सर्वज्ञाचे चरण शरण. ४ सिद्ध-पुरीं श्रीगुंडम् राऊळ सर्वज्ञाचे किंवा गोसाव्याचे चरण शरण. ५ प्रति

ह्यानीं श्रीचांगदेव राऊळ गोसाव्याचे किंवा सर्वज्ञाचे चरण शरण. 'गोसाव्याचें' हे सर्व पंथांत पूर्वी असून कारंजकरबुवा वगैरेंनीं "सर्वज्ञाचे चरण शरण" हे नवीन घातले आहे. आतां या पंथाचें थोडेसें तत्वज्ञान सांगतो. आचारस्थळ, विचारस्थळ व लक्षणस्थळ अशी तीन स्थळें मिळून या पंथाचे शास्त्र बनलें आहे. ते एक प्रकारच्या लिपींत लिहिलेलें असून त्याच्यात एकंदर चौदा लिपी आहेत. यांत पुष्कळ तत्व वेदान्तासी जुळणारे असून द्वैतवाद असल्यामुळें पुष्कळ वचनांचा अर्थ ते द्वैतपर करितात. यांच्या उत्पत्तीचा इतिहास विलक्षण असल्यामुळें लिहीत नाहीं व त्याची आह्माला आवश्यकताही नाहीं. समाजांतील स्त्रीपुरुषांची नीति समाधानकारक नाहीं. यांच्यांत जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर हे चारच पदार्थ मानतात. त्यांत जीव अविद्येनें बद्ध असून ज्ञानानें व देवाच्या भक्तीनें तो मुक्त होतो. देवता ह्या नित्यबद्ध आहेत. जडपदार्थ तेवढा प्रपंच समजावा. परमेश्वर सर्व देवतांच्या वर असून तो जीवाकरितां मायामयशरीर धारण करून अवतार घेत असतो. यांच्या लक्षणस्थलाचे नव भाग आहेत त्याचाच विचारस्थळांत विशेष विचार आहे. आचारस्थळांत वागण्याचे नियम सांगितले आहेत. या स्थळावर यांच्यातील पंडितांनीं लिहिलेले मोठे मोठे व्याख्यानरूप ग्रंथ आहेत. त्याला बंद ह्मणतात. त्याच्यातील प्रकरणें घेऊन आपल्याला थोडासा या पंथाचा विचार करावयाचा आहे. हीं प्रकरणें लहान लहान असून याचे बंद मोठे मोठे आहेत. पैकी प्रथम प्रकरण पूर्वी समजल्या जाते ते येणे प्रमाणेः—

सृष्टीमध्यें कवणे करणें मुचिजेना एके परमेश्वरेवीन तोच परमेश्वर निरवयव निराकार सावयव साकार होय. अवतरे, आपुलें संन्निधान दे. ते दास्यमोचक परमेश्वरावांचून कोणत्याही उपायानें सृष्टीमध्यें मुक्तता होत नाहीं. तो परमात्मा निराकार असून साकार रूपानें अवतार धारण करून आपल्या भक्तांनां आपल्या संन्निध नेतो. येवढ्याकरितां त्याची भक्तीच मुक्ति देणारी आहे. आतां तो परमेश्वर कोण ? याचा निर्णय अन्यव्यावृत्तिनामक प्रकरणांत केला आहे तो येणेंप्रमाणेः— कर्मभूमीच्या देवता होत, पर परमेश्वर न होत.

अष्टदेवयोनीच्या देवता होत, पर परमेश्वर न होत. अंतराळीचे गनगंधर्व देवता होत, पर परमेश्वर न होत. स्वर्गीचे इंद्रचंद्रादि देवता होत, पर परमेश्वर न होत. कैलास वैकुंठीचे हरिहर ब्रह्मादिक देवता होत, पर परमेश्वर न होत. क्षीराब्धीचा शेषशय्या देवता होय, पर परमेश्वर नव्हे. अष्टभैरव देवता होत, पर परमेश्वर न होत. विश्वरूप देवता व्हय, पर परमेश्वर नव्हे. चैतन्य देतवा व्हय, पर परमेश्वर नव्हे, चैतन्यापर परमेश्वर तो देव श्रीचक्रधर सकळ जीवांते रक्षिता होय. उद्धरितां होय. अर्थ— चैतन्य ह्मणजे एक माया आहे. विश्वरूप ह्मणजे विराटस्वरूप याचें गुह्य काय ते हेंच. ह्या शास्त्राचा अभ्यास करून अर्धे मानभाव झालेल्या शहामुनीनें सिद्धान्तबोधांत याची थोडीसी माहिती दिली आहे. या ग्रंथांत पंधराव्या अध्याया पर्यंत शिव विष्णु इत्यादि देवतांचे खंडण असून सोळाव्या अध्यायापासून ते तिसाव्या अध्यायापर्यंत मानभावधर्माच्या तत्वांचें उत्तम प्रतिपादन केले आहे. ग्रंथकार अर्धवारकरी असल्यामुळें पुढच्या पन्नास अध्यायापर्यंतच्या ग्रंथांत मानभाव पंथ वारकरी पंथांत ओढल्या गेला आहे. मानभावपंथाची सत्य माहिती आजपर्यंत कोणालाही नाहीं. ह्मणून मी लिहिलेली माहिती खोटी वाटण्याचा पुष्कळांनां संभव आहे. माझें ह्मणणें खरें वाटण्याकरितां त्यांचा अनुग्रह घेऊन त्यांच्या शास्त्राचा अभ्यास करावा ह्मणजे कळेल. एकनाथांनीं या पंथावर एक पद केलें आहे. तुकाराममहाराजांनीं " शिवूं नये निळी । वस्त्रें पांघुरती काळी " ॥ १ ॥ या वचनानें त्यांचा स्पष्ट निषेध केला आहे. आणखी संतांनीं यांच्याविषयीं असें ह्मटलें आहे.

" एकी धरूनी उफराटी काठी । झोळी बांधिती नागबंध गांठी ॥
देवा निंदिती पूजिती खापरखुटी । घरोघरी हिंडती पोटासाठीं ॥
माझ्या हरिबा तूं नारायणा । मायबापा तूं बंधू सज्जना ॥
काय वर्णू मी तुझिया गुणा । केले दंडवत तुझिया चरणा " ॥ माझ्या ॥

यांचे युगधर्म, विद्यामार्ग, संहारण, संसरण, महावाक्यनिर्वचन, अस्तिपर आणि उद्धरण अशी आणखी प्रकरणें आहेत. पण त्या सर्वांची येथें आवश्यकता नाहीं. आनंदमार्ग म्हणून वऱ्हाडांत एक पंथ आहे. या पंथाचा इतिहास समाधानकारक नसल्यामुळें लिहित नाहीं. या पंथाचेही

पांच नाम आहेत. ते येणें प्रमाणें:— १ आनंद निजबोध जीवातारक शाहादत्तप्रभु. २ देवदत्त सत्यसामर्थ परस्वामी जीवउद्धरी स्वयंब्रह्म. ३ दत्तप्रभु दयानिधि शरण वज्रपंजरू ४ निर्गुण निराकार निराश्रय शब्दारहित दत्तात्रे स्वयंब्रह्म. ५ आनंदमात्रा निःशब्दरहित. मानभावपंथास कांहीं थोडासा शास्त्रीयपणा आहे. तो या पंथास मुळींच नाहीं. या पंथांत पूर्णपद्धती ह्मणून एक संस्कृत ग्रंथ आहे. चित्प्रकाश, ज्ञानदीप, सारविचार इत्यादि कांहीं प्राकृत ग्रंथ आहेत. सिद्धान्त, परसिद्धान्त ह्मणून आणखी कांहीं गुह्य ग्रंथ आहेत. या मध्यें सृष्टिपाठ ह्मणून मानभावाच्या अन्यव्यावृत्ति नांवाच्या प्रकरणाप्रमाणें एक प्रकरण आहे. त्यांत विशेष कांहीं नाहीं. मानभावानीं जशा दहा पायऱ्या केल्या आहेत, तशा यांनीं त्रेचाळीस पायऱ्या केल्या आहेत. आणि "कर्मभूमीच्या देवता होती, परात्परआनंद देव न होती. अशी सारखी मालिका सुरू केली आहे. बेचाळिसाव्या पदावर दत्तात्रे असून शेवटल्या पदावर आनंद ठेवला आहे. दत्तात्रेय तीनदेवांचा अवतार आहे; असें पुराणातलें ह्मणणें हे खोटे समजतात. या पंथांत सात वेद मानले असून भलतेंच कांहीं मानले आहे. मानभावपंथ गीतेला तरी मानतो, पण हा पंथ कोणत्याही हिंदूच्या पूर्वग्रंथाला आगम असें समजत नाहीं. कांहींही असो. या पंथांत शिरून असा कूटार्थोपदेश करता येतो कीं, दहा किंवा त्रेचाळीस पायऱ्या कां? जितक्या पायऱ्या कराल तितका तो परमेश्वर अभक्ताला दूर आहे; आणि भक्ताला जवळ आहे. सर्वव्यापकत्व घेऊन यांचे खंडण करितां येते. हें सर्व कांहीं उपदेशकाच्या चातुर्यावर अवलंबून आहे. हे लोक पुराणातल्याच विष्णुशिवाच्या कथा घेऊन पुराणवचनानेंच त्यांची निंदा करितात. मानभाव मूर्तिपूजक असून आनंदमार्गी मूर्तिपूजा मानीत नाहींत. मानभाव कृष्णाला मानीत असून आनंदमार्गी एकट्या दत्तात्रेयाला मानतात. व साकार मानतात. माझी माहिती ज्यांना खोटी वाटेल त्यानी त्या पंथांत शिरून अनुग्रह घेऊन अनुभव घ्यावा. आनंदमार्गांत कर्मसृष्टि, विकारसृष्टि, दिव्यसृष्टि, ब्रह्मसृष्टि, निरालंबसृष्टि अशा पांच सृष्ट्या कर्मभूमीपासून मानभावांच्या दहा पायऱ्यापर्यंत कर्मसृष्टि, पुढें प्रत्येकसृष्टि दहा

दहा पायऱ्यांची असून पांचवी व शेवटली सृष्टी तीन पायऱ्यांची आहे. पहिल्या पायरीचे नांव अमृतार्णव-दुसऱ्या पायरीचे नांव शुद्धलक्षण. तिसऱ्या पायरीचे नांव विज्ञान. त्यांतील शुद्धलक्षणपदावर दत्तात्रेय राहतो. व विज्ञानपदावर आनंद राहतात. हा पंथ आपल्या सृष्टया, चार देहावर बसविण्याचे किंवा डोळ्यांतील रंगावर बसविण्याचे चाळे आतां करूं लागला आहे. मानभावपंथाची अंतर्माहिती पण त्यांच्या भाषेनें नव्हे, अशा प्रकारची सिद्धान्तबोधांतून मिळूं शकते. पण त्यांचे ह्मणणें असे असते कीं, हा सिद्धांतबोध आमच्या मताचा आहे खरा, पण याहीपेक्षां खरे रहस्य शास्त्रांत आहे. आमचा उपदेश घेतला ह्मणजे कळेल. शास्त्र ह्मणजे आचारस्थळ, विचारस्थळ, व लक्षणस्थळ हे वर सांगितलेले ग्रंथ होत. मच्चिन्हित पुरुषानें यांचे गुरुमंत्र ह्मणून दाखवून आह्मी उपदेश घेतला आहे असें सांगून त्या त्या मतांचे अध्ययन करून कूटार्थोपदेश करणें सुलभ आहे. अचिन्हपुरुष मंत्रपूर्वक चिन्हनिष्ठित झाल्यावर उगाच चिन्हत्याग करून अकूटोत्तर चिन्ह धारण करील तर पतित होतो. असा आर्य अनार्य व मिश्र इत्यादि सर्व आगमांचा सिद्धान्त आहे. अपरित्यक्त स्वचिन्हाच्छादनपूर्वक सकूटोत्तरचिन्हधारण-प्रतिषेधाभाव यावद्भगवत्सेवा समावेश गृहीतकामावेश वा यावत्तावन्म-त्संप्रदायनिष्ठा आहे. मानभावमतांत १०८ चंदनाच्या मण्याची गाठी असते. आणखी गुळगुळीत केलेले चापट दगड पितळेनें एकत्र बांधून एका माळेंत ओंवलेले असतात. व कांहीं मोकळेही असतात. ती माळा किंवा ते दगड हातावर घेऊन उलट सुलट कपाळाला लावतात. वर सांगितलेले पांच नाम ह्मणून चंदनाची माळ जपतात. त्याला गाठी-आठवण ह्मणतात. आनंदमार्गी मतांत सुताच्या गाठीच्या १२८ मण्यांची माळ असते. तेही पांच नाम ह्मणून ती जपतात. ती गाठ मला येत नाहीं. ती त्यांच्याकडूनच कोणीतरी शिकलें पाहिजे. लालपंथाचा अंतर्भाव थोडासा मानभावांत व थोडासा आनंदमार्गातच होतो. असे आणखी पुष्कळ प्रकारचे धर्म आहेत. मी सांगितलेल्या पद्धतीनें ते जाणून घ्यावेत.

"श्रद्धामयोयं पुरुषो योयच्छ्रद्धः स एव सः"

भगवद्गीता.

या जागृत् श्रुतीवरून धर्माधर्म अंतःकरणाचेच धर्म आहेत देहाचे नव्हेत. सांख्यसूत्रही असेंच आहे.

" तत्कार्यधर्मादिः "

( अध्या० २ सूत्र० १४ )

भावार्थः— धर्मादिकही बुद्धीचेंच कार्य आहेत.

मद्दीक्षासंस्कृतानां जलपानानें अन्नमय मन आणि आपोमय प्राण श्रुतींत सांगितले असल्यामुळें अर्थातच हे दोन्ही मद्दीक्षासंस्कृत झाल्यावर सकूटोत्तरदीक्षा तद्राधिका होत नाहीं.

ओव्याः— नानाउपायेंकरून । दीनपक्षचि घ्यावा आपण । श्रीमद्भागवतीं वचन । आहे ये विषयीं ॥ ८४१ ॥

ब्राह्मणः समदृक् शांतो दीनानां समुपेक्षकः ।
स्रवते ब्रह्म तस्यापि भिन्नभांडात्पयो यथा ॥

श्री. भागवत.

भावार्थः— ब्राह्मण तपस्वी समदर्शी शांत । आणि दीनातें उपेक्षित । तरी तयाचें तप होय व्यर्थ । फुटक्या भांड्यातूनि गळत दूध जैसें ॥ ८४२ ॥ दयेचीं लक्षणें उत्तम । स्वयें बोलिले तुकाराम । नोहे निष्ठांचा दयाधर्म । त्यावर्तोनि ॥ ८४३ ॥ भूक लागली व्याघ्रासी । ह्मणूनि नेऊं देणें गायीसी । ऐसी दया करितां निश्चयेंसी । पतन न चुके ॥ ८४४ ॥

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दलन कंटकांचें ॥ १ ॥
पाप त्याचें नांव न विचारी नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ २ ॥
धर्मनीतीचा हा ऐक वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

( इंदिराप्रेस अभं० ३२९० )

भूत ह्मणजे प्राणिजात । जे निष्पाप आणि दुर्जनपीडित । तयांचा पक्ष रक्षणें यथार्थ । या नांव दया ॥ ८४५ ॥ सपापही अनुतप्त । तयासी आश्वासनें उद्धरीत । तीही दया गाईत । बोलतासी ॥ ८४६ ॥ ईश्वर दुर्जनाही मारीत । फळ दे सज्जनासिसमान । याळागीं तद्दयाळुत्वावरी जाण । आक्षेप नसे ॥ ८४७ ॥ परी जीवाची

दया पुण्य वाढवी । आणि कंटकहननीं पाप न जोडवी । इतुकीच शक्य बरवी । तयालागीं ॥ ८४८ ॥ न विचारितां नीति । रायें करणें ते पाप निश्चितीं । असारातें सार ह्मणती । अधर्मपणें ॥ ८४९ ॥ यालागीं धर्म कोण अधर्म कोण । हे भगवदुक्त आणि कळे संतमुखेंकरून । धर्म रक्षावयाचि भगवंताकारण । अवतार घेणें ॥ ८५० ॥ "यतोऽभ्युदय-निःश्रेयसःसिद्धिसधर्म" इति । वैशेषिकसूत्रीं कणादोक्ति । तेथ मोक्षाची तव ज्ञानेंचि प्राप्ति । अभ्युदय मात्र मिळे धर्में ॥ ८५१ ॥ कर्म आणि अन्यदेवताउपासन । दोन्ही करितां समुच्चयेंकरून । ते समाप्त होवी एकवटून । अभ्युदयीं ॥ ८५२ ॥ कर्मप्रधान ईशोपासन । तेथ कर्म-समाप्त फळ देऊन । अवशिष्ट राहे ईश्वरोपासन । तेणें भोगान्तीं वैराग्य होय ॥ ८५३ ॥ कर्माचें अपूर्व उपजे नियती । उपासनेचें अपूर्व भगव-त्कृपावृत्ति । यद्यप्यनादि आहे ती । तदप्यभिमुख होय उपासका ॥८५४॥ कर्मोपास्ति दोन्ही सकाम । तें मिळे वैकुंठादि धाम । कैवल्य तव मिळे परम । जीवेशैक्यज्ञानमात्रें ॥ ८५५ ॥ हे विशेष बोलिजेल उत्तर-विस्तारी । येथ अपेक्षा धर्माचीच परी । यद्यपि सकामाचारीं । निषेध बोलिला ॥ ८५६ ॥ तेथ परलोककामना निषेधिली । परमहंसा तंव इहलोककामनाही प्रतिषेधिली । निष्कामकर्मे वेदें बोलिली । गृहस्था-साठीं ॥ ८५७ ॥ गृहस्थें ऐहिक उच्छेदितां । तरी निष्काम कर्मोप-देशचि होय वृथा । ऐहिकोच्छेदें विरक्ति उपजतां । प्रव्रज्याधिकारू ॥ ८५८ ॥ यालागीं निष्कामकर्मोपदेश गृहस्था । तोही बोलिला पाहिजे अविरक्ता । जे अविरक्तासीच गृहस्थता । इतरा न्यासु म्हणोनी ॥८५९॥ अविरक्त असोनि गृहस्थ । ऐहिकोच्छेदील यथार्थ । तरी आळसें भर-लिया तयाचें चित्त । भीक निश्चित चुकेना ॥ ८६० ॥ समाधिसामर्थ्य आंगीं नसतां । निश्चलपणाचा उपदेश ठसतां । तरी झोपेवाचोनि सर्वथा । आन फळ मिळेना ॥ ८६१ ॥ तेवीं दृढ वैराग्य नसतां शरीरीं । ऐहिक यत्न न करितां भिकारी । तो करंटा देखिलिया निर्धारीं । सचैल कीजे ॥ ८६२ ॥ तुळसीमाळा घालोनि कंठीं । स्त्रीपुत्र सोडोनि उपासापोटीं । वारकरी होवोनि पंढरीवाटीं । पाहुणचार झोडीत निघे ॥ ८६३ ॥ तो देवाचा ऋणाईत । तयाचे निश्चयें उपटावे दांत । जयासी संसार वाटे

अनृत । तरी तेणें भोगा द्यावी तिलांजुळी ॥ ८६४ ॥ भोगाभिलाषा अंतःकरणी । आणि यत्न न करितां खाय बैसोनी । वरी धर्मवार्ता वदे मुखानी । तो महापातकी सहला ॥ ८६५ ॥ हरगौरिजत्पृष्टीं देह न मिळवितां । मलविसर्जन होय वृथा । तेवीं भोगआशा अंतरीं असतां । भोगपोषकता न सोडी ॥ ८६६ ॥ मन एकाग्र करितां येणे झोंप । यास कवण ह्मणे उजळला सत्वदीप । तेवीं आळसी त्यजी देशकाला-नुसार यत्नसंकल्प । तें तयाते पाप चुकेना ॥ ८६७ ॥ आंगीं सामर्थ्य असतां कांहीं । भोगाशाही असोनि देही । जो बैसे आणोनि देईल शेषशाई । तो एक पापी ॥ ८६८ ॥ सामर्थ्यही हरीनेंचि दिधले । ते योग्यस्थळीं नाहीं योजिलें । आणि निर्लज्ज देवास अधिक मागों लागले । महा पातकी ते ॥ ८६९ ॥ पात्रावरी वाढिलें न खाय । उगेंचि अधिक मागे तरी तो चोर होय । तेवीं यत्नसामर्थ्य देवें दिधलेंचि आहे । तें न योजितां मागे तो करंटा ॥ ८७० ॥ दुसरियाची पाहूनि युवती । लेंकरूं तेचि जरी मागे मायेप्रति । तरी लाड पुरविणें रोगप्रवृत्ति । लेंकराप्रति घातक ॥ ८७१ ॥ तेवीं देवदत्त आंगीं सामर्थ्य असतां । सकाम मूढांचे लाड हरीनें पुरवितां । तरी वासना न शमेल सर्वथा । आणि जन्ममरण चुकेना ॥ ८७२ ॥ कित्येक ऐसें ह्मणती । कीं ईश्वर आहे सर्वशक्ति । तरी वासना पूरवूनि आह्माप्रति । मोक्षही द्यावा ॥ ८७३ ॥ यांचा प्रश्न पर्यायेंकरून । ऐसाचि आक्षेप करी गहन । कीं देवें सृष्टि करूं नये उत्पन्न । तरी हें पृच्छकें जाऊन सांगावें देवा ॥ ८७४ ॥ देव सर्वज्ञ आणि सर्वशक्ति । तो सृष्टिव्यवस्थेंतचि निश्चिती । चेतनार्णवीं एकात्मवृत्ति । सर्वज्ञ सर्वशक्ति कायसा ? ॥ ८७५ ॥ पाण्या-हूनि पदार्थ भिन्न । तयासचि ओलेकोरडेपण । एकार्णवाचि असतां पूर्ण । भिजाविणेंपण ते वाव ॥ ८७६ ॥ तेवीं सर्वज्ञत्व आणि सर्वशक्तिमत्ता । यया विक्षेपशक्त्युपष्टब्धचेतनावच्छिन्नता । ब्रह्मज्ञानमात्रें सर्वज्ञता । अनंगीकृत आह्मा ॥ ८७७ ॥ यद्यपि प्रारब्धोपष्टब्धविक्षेपशक्ति । आव-रणनिवृत्तमुक्ताही प्रति । तथापि तूलावरणादि संप्रतिपत्ति । मुक्ताते असे ॥ ८७८ ॥ ईश्वरीं सकलावरणविप्रतिपत्ति । ह्मणोनि भगवत्सर्वज्ञता विक्षेपाभिमुखवृत्ति । आणि तेचि सर्वशक्ति । जो विक्षेपशक्तिविलासू

॥ ८७९ ॥ अथवा हरिसृष्ट्यनुरोधें । जीवापेक्षिक ईश्वरबोधें । जीवयाचनाअविरोधें । सार्वज्ञसर्वशक्तिमत्ता ॥ ८८० ॥ ह्मणोनि जीवयाचनाप्रेरणी । इच्छा भगवदनुशासनी । यथाशक्ति संदांतःकरणी । धर्मूचि कीजे ॥ ८८१ ॥ धर्म करावा निष्काम । अर्थ वाढवावा पूजादिनियम । कामें पूजावा आत्माराम । जो घनःश्याम करुणाब्धी ॥ ८८२ ॥ त्रिवर्ग परमेश्वरीं अर्पितां । तरी आपणचि होय वर्ग चवथा । हें न होय तरी धर्मार्था । आश्रयावें ॥ ८८३ ॥ युगायुगाच्या ठायीं । संपद्धर्म आपद्धर्म असती पाहीं । कैसे तेही । सांगू तुज ॥ ८८४ ॥ कृतयुगीं संपद्धर्म भला । जो चतुष्पादलक्षणी बोलिला । आपद्धर्म तैंचा बोलिला । जैं शंखासुरें पीडिला वेदभागू ॥ ८८५ ॥ त्रेतायुगीं संपद्धर्म पूर्ण । पुरूरवादींचे यज्ञविदान । बलियादिकांचा जय गहन । आपद्धर्म तैंचा ॥ ८८६ ॥ रावणाकरवीं पीडिलें ब्राह्मण । तैंचा आपद्धर्मचि जाण । कंसादिकांचे धर्मपीडण । आपद्धर्म द्वापरी तो ॥ ८८७ ॥ भगवत्सेवा संपद्धर्म । द्वापरीचा हा सुगम । कलीचा दानसंपद्धर्म । आपद्धर्म प्रगट बहू परपीडणीं ॥ ८८८ ॥ परी भागवतधर्माची नवलगती । तो समान संपत्ती आपत्ती । तेचि सांगू यथारीती चारी युगींचे ॥ ८८९ ॥

वादीः— तुकारामबोवांच्या खुंटी प्रमाणें आपलें ह्मणणें हें सर्वांत विशेष काय असतें कोण जाणे ? आपण हा भागवतधर्म काय सांगता ? मन्वादिकांनीं जो धर्म सांगितला आहे तोच मुख्य वेदोक्त आहे. कारण त्याला वेदाची अनुमती आहे. " यन्मनुरवदत्तत्सर्वमेव भेषजं " हें श्रुतिवाक्य मनूक्तधर्माविषयीं प्रमाण आहे. तेव्हां मनुधर्माहून पृथग्भागवतधर्म असा कोणता आहे काय ? आणि त्याची चारी युगांत प्रतिष्ठा झाली आहे काय ?

सिद्धान्तीः— होय. मनूक्तधर्माहून भागवतधर्म निराळा असून तो वेदांत गुप्तरूपानें सांगितला असून उपनिषदांत साधारण प्रगटरूपानें सांगितला आहे. गीतेंत तो त्याहीपेक्षां प्रगट रूपानें सांगितला असून श्रीमद्भागवतांतही त्याचा पूर्ण विस्तार झाला आहे. वेदांत हा गुप्तधर्म कसा होता हें आम्ही महाभारताच्या आधारानें पूर्वी सिद्ध केलें आहे. येथें आतां पुनः विचारलेस म्हणून मानवधर्माहून त्याची व्यावृत्ति करून सांगतो.

अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरेऽपरे ।
अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥८५॥
तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते ।
द्वापरे यज्ञमेवाहुर्दानमेकं कलौ युगे ॥ ८६ ॥

मनुस्मृति अध्या. १ श्लोक ८५।८६

भावार्थ– कृतत्रेताद्वापारकलीचे । धर्म वेगळे वेगळे साचे । कृतीं तप श्रेष्ठ श्रेष्ठत्व ज्ञानाचें । त्रेतायुगीं ॥ ८९० ॥ येथ कुल्लकभट्ट आणि मेधातिथी । तपाहूनि मनोनिग्रहजन्य ज्ञान कनिष्ठ ह्मणती । हें ज्ञान न कळे गजप्रति । जे त्रेतायुगीचा धर्म होय ॥ ८९१ ॥ यज्ञोपयोगी कर्माचें ज्ञान । तो तव द्वापारीचा धर्म जाण । कुल्लकभट्ट ह्मणती हें आत्मज्ञान । तरी ते तपाहून कनिष्ठ कैसे ॥ ८९२ ॥ तपाहूनि कनिष्ठ आत्मसंवित्ती । तें कोपेल " ज्ञानादेव तु कैवल्यं " ही श्रुति । श्रुतीहूनी स्मृति । प्रमाण नाहीं ॥ ८९३ ॥ परंधर्म आत्मज्ञानातें । मनूचि बोलिले निरुतें । तपाहूनि कनिष्ठ म्हणतां तयातें । स्ववचनविरोधू ॥ ८९४ ॥ यालागीं विज्ञानभिक्ष्वादि समर्थी । मनुहूनि अधिक मानिल्या सेश्वर-श्रुति । आम्हींही तदंशानुगामी अल्पमती । हरिपदावलंबी ॥ ८९५ ॥ द्वापरीचा धर्म याग । केवळ दानधर्मे तरता ये कलियुग । असो आपणा विवरणांग । काज काय ? ॥ ८९६ ॥ हें जे मनूनें सांगितले धर्म । याहूनि वेगळे भागवतधर्म । जे बोलिले असती परम । श्रीमद्भागवतीं ॥ ८९७ ॥ भागवतधर्म द्विविध । मिश्र आणि शुद्ध । अन्यागमोक्ति भागवतोक्ति सिद्ध । मिश्र बोलिजे ॥ ८९८ ॥ केवळ भागवतीं बोलिले । ते शुद्ध पाहिजेत म्हणितले । जे प्राधान्यें करून ठेविलें । संपदी आपदी समत्वें ॥ ८९९ ॥ कृतयुगीं शमदमादिकीं । नारायणाते यजिजे पुरुखीं । ते मूर्तिही सुंदर निकी । शुक्लवर्ण ॥ ९०० ॥ त्रेतायुगीं हरि रक्तवर्ण । यजन करिती यज्ञेंकरून । द्वापरीं वेदपंचरात्रेंकरून । यजन करिती ॥ ९०१ ॥ कलींत केवळ तंत्रविधी । भगवद्याजन करिती सुबुद्धि । परि हे भागवतधर्म त्रिशुद्धि । बोलिले मिश्र ॥ ९०२ ॥ शुद्धभागवत-धर्माचें लक्षण । परमप्रेमें हरिकीर्तन । संतसेवा भगवत्पूजन । आवडे त्या विधीनें ॥ ९०३ ॥ कलींत पंचरात्रादिविधानापरीस । हरिकीर्तन

आवडे हरीस । हें एकनाथ बोलिले विशेष । ते प्रमाण ऐके ॥ ९०४ ॥
नवव्यूहअर्चन स्थिति । सात्वतां ज्या नव मूर्ती । त्यांत वासुदेव प्रथम स्थिति । एक व्युत्पत्ति नवांची ॥ २४४ ॥ वासुदेव संकर्षण । अनिरुद्ध आणि प्रद्युम्न । हयग्रीव नारायण । वराह वामन नरसिंह ॥ २४५ ॥ हे नवव्यूहांची व्युत्पत्ति । यां माजी मी प्रथममूर्ति । येर आठही माझ्या विभूती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २४६ ॥ .... पूर्णांशें ब्रह्मस्थिति । वासुदेव मी आदिमूर्ती । लीलेनें तारिले नेणों किती । तेथील निजभक्ति उद्धवार्जुनीं नांदे ॥ २४७ ॥

एकनाथी भागवत अ० १६

मनु म्हणती त्रेतायुगीं ज्ञान । आणि त्रेतायुगीं यज्ञ सांगती भागवतादि-पुराण । येथ अनिर्धारें पुराणवचन । कर्षी चित्ता ॥ ९०५ ॥ शुद्ध जे भागवतधर्म पूर्ण । ते चहुयुगीं समान । कृतयुगीं प्रल्हादकीर्तन । प्रसिद्धची ॥ ९०६ ॥ त्रेतायुगीं शबरीबिभीषणादि । द्वापरीं उद्धव श्वपच वाल्मीक्यादि । कलीमाजीं आचार्यसंतमांदी । कीर्तनविधायक ॥ ९०७ ॥ भगवन्निष्ठेनें आपद्धर्म । एकचि फळ देती सप्रेम । म्हणोनि संपदीं आपदीं सम । भागवतधर्म ॥ ९०८ ॥ कृतयुगीं आपत्ती । असुरांची प्रबलस्थिती । त्रेतायुगीं आपत्ती । आसुरीजनांची ॥९०९॥ द्वापरीं आपत्ती आपसांत कलह । कलींत आपत्ति व्यक्तिदाह । परि सर्वाठायीं निःसंदेह । भागवतधर्म तारक ॥९१०॥ यालागीं जे जे करणें ते ते देवासाठींचि होणें । तरी येणेंचि गुणें । भागवतप्राप्ति ॥९११॥ श्रीकृष्णासाठीं होवोनि महार । आनंदे राखावें द्वार । उच्चनीचादि सोडोनि प्रकार । भागवतधर्म तैं लाभे ॥ ९१२ ॥ ते भागवतधर्म कैसे कवण । तेही सांगतो सप्रमाण । सविकार वा निर्विकार मन । भगवंतीं अर्पण पैं कीजे ॥ ९१३ ॥ इतर धर्मांचें लक्षण । देव मिळे ससाधन । भागवतधर्मांचें लक्षण । कीं देवार्थ-करण निःसाधनही साधनची ॥ ९१४ ॥ ह्मणोनि देवें सामर्थ्य दिधलें । तितुक्यांत पाहिजे संतुष्ट राहिलें । यावत्सामर्थ्य मिळवूनि वाहिलें । पाहिजे देवा ॥ ९१५ ॥ आणिक एक सांगतो रीति । चारी युगें मनुष्याहातीं । हे बोलिलें महाभारतीं । कीं राजाधीन काल ह्मणोनी ॥ ९१६ ॥ आणि कालाधीन सकलकांहीं । हेंही बोलिलेचि पाहीं ।

याचा अर्थ कीं भागवता नाहीं । काळभय ॥ ९१७ ॥ ज्या ज्या काळीं जे जे साधन । तेणेंचि भेटे नारायण । इतर धर्म लोप संपूर्ण । पावती अकाळीं ॥ ९१८ ॥ श्रीमहाभारतीं भीष्माचार्य । पुसतां पंडुकुलवर्य । बोलिले तें सकळ आर्य । ऐकोंत प्रेमें ॥ ९१९ ॥

युधिष्ठिर उवाचः—यदि घोरं समुद्दिष्टमश्रद्धेयमिवानृतम् ।
अस्ति स्विद्दस्युमर्यादा यामहं परिवर्जये ॥ १ ॥
संमुह्यामि विषीदामि धर्मो मे शिथिलीकृतः ।
उद्यमं नाधिगच्छामि कदाचित्परिसांत्वयन् ॥ २ ॥

भीष्म उवाचः—नैतच्छ्रुत्वागमादेव तव धर्मानुशासनम् ।
प्रज्ञासमवहारोऽयं कविभिः संभृतं मधु ॥ ३ ॥
बव्ह्यः प्रतिविधातव्याः प्रज्ञा राज्ञा ततस्ततः ।
नैकशाखेन धर्मेण यत्रैषा संप्रवर्तते ॥ ४ ॥

टीकाः— यदि महद्भिरपि घोरं कर्म कर्तव्यत्वेन समुद्दिष्टं यदश्रद्धेयमिवानृतमिव च तर्हि दस्यूनामकार्यकारिणामपि मर्यादा काचिदस्ति इतोऽधिकं दस्यूनां न कर्तव्यमिति ॥ १ ॥ अस्मिंश्च कृत्ये कर्तव्ये संमोहादिकं प्राप्तोऽप्यात्मानं सांत्वयन् अप्युद्यममध्यवसायं नाधिगच्छामि एतान् धर्मान् कर्तुमहं न शक्नोमीत्यर्थः ॥ २ ॥ एतदागमादेव श्रुत्वा तव धर्मानुशासनं मया कृतमिति नास्ति किंतु प्रज्ञायाः समवहारः निष्ठा कल्पितेयमित्यर्थः । एतदग्निहोत्रादिवद्विधेयं न अपि तु कविभिरकरणे महांतं दोषं पश्यद्भिः कल्पितमिति भावः ॥ ३ ॥ ततस्ततः कोकिलवराहवृकसिंहादिभ्यः शिक्षित्वा यत्र यासु प्रज्ञा स्वनुष्ठेयासु एषा तव बुद्धिः ऐकशाखेनैकदेशिनाधर्मेणोपलक्षिता न संप्रवर्तते ताः प्रज्ञाः बव्ह्यः प्रतिविधातव्याः संति ॥ ४ ॥

सटीक श्लोकांचा भावार्थः— युधिष्ठिर ह्मणे महाराजा । तुह्मी देशकाल पाहोनि सांगितले धर्मकाजा । त्यांत करूं नये त्याही पैजा । कराव्या ह्मणोनी सांगितल्या ॥ ९२० ॥ जरी महंती ऐसें उपदेशावें । तरी विमतिमंती काय करावें । मायेनें बाळासी प्रतारावें । तरी कवणा करावें शरण तेणें ॥ ९२१ ॥ ह्मणोनि माझिया ठायीं । आपलें बोलणें थारत नाहीं । तें भीष्म ह्मणती गा सर्वही । अवधारी मुख्य ॥ ९२२ ॥

तुज जें सांगितलें धर्मज्ञान । तें आघवेंचि जाण वेदापासून । माहात्म्यांनीं अनुभवून । जें मधु शोधून काढिलें ॥ ९२३ ॥ तें मी सांगत आहे तूतें । न धरावें वचनमात्रें आग्रहधर्मातें । देशकाल पाहोनि तयातें । आश्रयावें गा ॥९२४॥ हा तव झाला श्लोकभावार्थ । परि ते श्लोक आहेत ज्या अध्यायांत । तयाचा अर्थ कीं मूर्ख शुकवत । धर्मशास्त्र पढोनी वृथा अर्थ निंदिती ॥९२५॥ आपण प्रतिग्रहासाठीं निघती । आणि दातिया दानधर्म उपदेशिती । स्वयें कावळा न तोषविती । उच्छिष्ट हस्ते ॥ ९२६ ॥ एक प्रसंगानुसार आचरितां । धर्मशास्त्रशब्दाविपरीत आचरण पाहतां । मर्म न ओळखोनि तत्वतां । मूर्ख प्रामण्य करिती त्यावरी ॥ ९२७ ॥ हे विद्याविक्रयीं महा असुर । यांचे वैभव परश्राद्धधूम्र । यालागीं देशकालानुसार । आप्तमुखें सदाचार ओळखावा ॥ ९२८ ॥ एवं सोडोनियां ही श्रुति । आपत्कालीं भलतेचि धर्म होती । भागवतधर्म नाहीं तैशा रीती । सर्वकाळ भगवंती उपजे निष्ठा ॥ ९२९ ॥ न सांपडतां उत्तम घृत । वैदिकयज्ञ न होय किंचित । भक्तीनें समर्पितां भगवंत । संतोषे पत्रपुष्पफलतोयें ॥ ९३० ॥ जोंवरी आपणा पाहिजे भोजन । तोंवरी संपद्धर्मे वा आपद्धर्मान । श्रुतिपुराणगमें वा वन्हिजागमान । भेसंडी करून पूजावा हरी ॥ ९३१ ॥ जया कर्म केलियावीण । न गमे एकही क्षण । आणि सविकार सदा मन । नियमित धर्मकर्म न घडे ॥९३२॥ नियमें न होय भगवत्सेवा । तिहीं अंतरीं भगवंत धरावा । भेसंडीत श्रम करावा । जीवांपाड ॥ ९३३ ॥ त्या श्रमाचें फळ । व्हावया नवसावा घननीळ । कीं हे भेसंडी सकळ । अर्पीन तूतें ॥ ९३४ ॥ मग तिया भेसंडीकरितां । स्वामीचरित्रीं अनुकरितां । पातक नाहींच तत्वतां । हें मी शपथ सांगे ॥ ९३५ ॥ वृंदा असोनि पतिव्रता । भेसंडीस्तव हरि झाला भोगितां । भेसंडीस्तव नक्षत्रसुता । आगम निर्माण करणें झालें ॥९३६॥ देव भक्तांचा मात्र साहकारी । जान नेणे मित्र वैरी । उत्तम वाईट निर्धारी । न जाणे देवो ॥ ९३७ ॥ उत्तम असेल भक्त । वाईट भक्त तया छळित । तेव्हां उत्तमाचेंचि साह्य करित । परी वाईटाही रक्षित हेळामात्रें ॥ ९३८ ॥ सनत्कुमारभक्तांचा पक्ष घेवोनी । जयविजय रक्षिले तीन जन्मांनी । परी नाहीं यमसदनी । जाऊं दिले ॥ ९३९ ॥

भक्तावीण कोणी । उत्तमही अभाळिया खाणी । तेथ भक्तांचि लागोनी । रक्षी देवो ॥ ९४० ॥ सृष्टिपक्षीं हरि सहाकारी देवब्राह्मणांचा । वस्तुपक्षीं सहाकारी भक्ताचा । भक्तिरहित विरोध असतां देवअसुरांचा । तैं देवपक्ष रक्षी ॥ ९४१ ॥ भक्तिरहित विप्र आणि आन । भांडती तैं रक्षी देव ब्राह्मण । भक्तांपुढें नारायण । आघवे टाकून रक्षी दासा ॥ ९४२ ॥ कृतयुगीं देवापरीस । प्रल्हादवचनास्तव जगन्निवास । नृसिंह होवोनि असुरांस । विदारिलें ॥ ९४३ ॥ शबर्यादि भक्तापेक्षें करून । विप्रा श्रीराम मानी न्यून । हें त्रेतायुगींचें भक्तरक्षण । भक्तमाळेंत बोलिलें ॥९४४॥ द्वापरीं यज्ञपत्न्याहातीं । जिंकिले त्यांचेचि पती । एवं वरतुलो भक्त रक्षी विश्वपती । देवादिरक्षा आनुषंगिक ॥९४५॥ आणिकही दुर्वासादिप्रति । देवें दाखविली प्रतीती । यालागीं भक्ताचिया अनुगती । नारायणू ॥९४६॥ भक्ताचेनि नांवें । क्रोधें परस्पर शापिलें जयविजय भूदेवें । परी नाहीं उपेक्षिलें माधवें । नेलें वैकुंठीं ॥ ९४७ ॥ मग देवासाठीं भेसंडी करितां । प्रसंगीं वात्सायनसूत्रोपदेश वा अजलजोपदेशा अवलंबितां । फळ भगवंतीं समर्पितां । केविं न तारी नारायणू ॥ ९४८ ॥ निश्चय कीं आपण न भ्रष्टावें । भ्रष्टलिया पुनः तरी न भ्रष्टावें । पुनः बळेंचि भ्रष्टलिया तरी न सोडावें । माधवचरण ॥ ९४९ ॥ भेसंडींत शक्ति । ह्मणोनी विकाररोधी नसो आसक्ति । भेसंडीवीण चालक चित्तीं । तयासी संप्रदायांतून त्यजावें ॥ ९५० ॥ भगवंतीं अर्पीया भेसंडीफळ । जेणें जेणें आंगीं येईल बळ । ते महापापही हो कां प्रबळ । पुण्य समजावें ॥ ९५१ ॥ पिकाची आवडी जयाच्या पोटीं । तेणें विष्ठाही संग्रह करावी गोमटी । तेवीं पापही करितां भगवंतासाठीं । पुण्याहूनि वरिष्ठ ते ॥ ९५२ ॥ प्रसंगीं अरण्य करावें नगर । प्रसंगीं शिवालय वेश्येचें घर । प्रसंगीं संन्याशाचें मंदिर । विवाहस्थान करावें ॥ ९५३ ॥ सकाळीं ब्राह्मण दुपारीं यती । सायंकाळीं गृहस्थ भिकारी नक्षत्रनाथु रातीं । सर्वकाळ माध्र चित्त भगवंतीं । ऐसा पापी इहपरत्र सुख पावे ॥ ९५४ ॥ सकळ साधूंसी नमावें । कोणाच्याही झोळियांत रमावें । वृश्चिकभळावरी धमावें । भ्रमर जैसा ॥ ९५५ ॥ एवं दाखविलें दिङ्मात्र । एकनयनागमीं दावीन सर्वत्र । परि शिष्यापासोनि स्वतंत्र । रक्षावें आपणा ॥ ९५६ ॥ काम

रोधितां क्रोध वाढे । क्रोधें देहबळ बिघडे । यालागीं भेसंर्दीत बळ वाढे । तो तो बिकार असो दीजे ॥ ९५७ ॥ अतिकामें क्षयरोग । तेणें अ‍ल्पेचि आटती योग । यालागीं भगवंतीं फळ अर्पितां येईल चांग । ऐसा विकारमार्ग धरावा ॥ ९५८ ॥ जे जे माझिया संप्रदायांत । दीक्षा घेऊं इच्छितील समस्त । तिहीं माझ्या चरणीं ठेवूनि हात । आपलें पूर्वपापपुण्यकृत्य सांगावें ॥ ९५९ ॥ मग तया कृत्यानुसार । पाहोनि तयांचा अधिकार । मद्ग्रंथांतूनि सुंदर । तैसाचि मार्ग उपदेशावा ॥ ९६० ॥ नाना रूपकालंकारें । वासनावेश्या जिंकावी त्वरें । भरावें अंतरें बाहेरें । कृष्णसाम्राज्य ॥ ९६१ ॥ वेश्याप्रियता मिळवावी । परि वेश्या प्रिया न करावी । मग मित्रओळख काढावी । तिजपासुनी ॥ ९६२ ॥ एवं परमार्थे रूपकें । आघवेंचि बोलिले निके । निरूपावें कौतुकें । होते जे मज ॥ ९६३ ॥ तें आघवें येथ फळलें । विशेष उत्तरविहारीं होईल बोलिलें । येणें बोलें उपलक्षिलें । पाहिजे सबाह्य वर्तन ॥ ९६४ ॥ आतां सकळा विनंती । आवडी भजावें शिवयदुपती । शंका सोडोनि शुद्ध चित्तीं । आळंदीपती आठवावा ॥ ९६५ ॥ वारंवार जनि मरण । यालागीं करावा भगवंत शरण । तयाचेंचि करावें नामस्मरण । मग लाभहानी नारायण सर्व जाणें ॥ ९६६ ॥ दैवें आल्यागेल्याचा कांहीं । हर्षविषाद न धरावा हृदयीं । शिव गोविंद शेषशाई । सद्गुरुआई नमावी ॥ ९६७ ॥ द्रुमाचा पूर्वविहार संपला । उत्तरविहार आरंभिला । येथ श्रद्धावंतीं लाग केला । पाहिजे दृढ ॥ ९६८ ॥ नाना संसारीं श्रमूनी । आले इया नंदनवनीं । सुरतरूछाये बेसोनी । घेतलें सुख ॥ ९६९ ॥ ते हे पूर्वविहारें फावले । आतां उत्तरविहारीं विशेष सामावले । तेहीं पाहिजे अवलंबिलें । गुरुचरणविश्वासें ॥ ९७० ॥ सद्गुरुराय कृपाळू असतां । मग ग्रंथपूर्तीची काय चिन्ता । जेणें वानराहातीं सत्वता । सेतू बांधोनि जिंकिली लंका ॥ ९७१ ॥ लेखक वाचक श्रोते समस्त । भावें भजावा सद्गुरुनाथ । तरोंचि उत्तरविहारींचे धर्म भागवत । कळतील हें दंडवत करोनि सांगे ॥ ९७२ ॥ हा पूर्वविहार कनकभूषण । त्यावरी उत्तरविहार जडणार रत्न । रुचिर लेवुनी सभाग्य सज्जन । जीवन्मुक्ति लक्ष्मीसंपन्न होतील जनीं ॥ ९७३ ॥ सकामा मिळो

भुक्ति । निष्कामा मिळो मुक्ति । प्रेमळा सज्जना शिवहरिभक्ति । मिळो भीतोक्तिकरुणेनें ॥ ९७४ ॥ तातविश्वासें माझें हृदय । सांग कां इच्छिलें सर्व होय । ळळे पुरवी ज्ञानेश्वरमाय । वंदिलें पाय तियेचे ॥ ९७५ ॥ हा ग्रंथपूर्वविहार सर्वथा । प्रीती पावो आळंदीनाथा । सप्रेम चरणीं ठेविला माथा । कविताकमळमाळ अर्पोनी ॥ ९७६ ॥ अये ! आळंदीवल्लभे जननी । तुझेचि नांव येऊं दे वाणीं । तूंचि राहे ध्यानीं मनीं । जागृतीं स्वप्नीं अखंड ॥ ९७७ ॥ तूं अद्वैतत्वें देहीं विदेही । तूं प्रियपतित्वें सदा हृदयीं । तूं मातृत्वें रक्षिसी अंतर्बाही । ज्ञानेश्वरगुरुआई कृपाळे ॥ ९७८ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे सर्वधर्मसंकलनपूर्वक संप्रदायविशेषनिष्ठादिवर्णनन्नाम विंशतितमम् कुसुमम् ।

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

## अध्याय २१ वा.

ॐनमो जी आचार्या । सच्चिदानंदा गुरुवर्या । आळंदीवल्लभा प्रतापसूर्या । ज्ञानेश्वरा जी ॥ १ ॥ तुह्मी माउलीपरी पाळितां पाम्हा । तरी उणें काय मनमोहना । कल्पद्रुमतळवटीं घणा । वांछी कवणू ॥२॥ अविवेचिया वनीं । जे फिरती जीवपणीं । तया चैतन्यालागुनी । साकार जननी जहालीस ॥ ३ ॥ तरी आतां पुढें ग्रंथ । माये चालवी अघटित । जेणें संतोषतील संत । श्रोते समस्त आनंदती ॥ ४ ॥ मागील नाममहात्म्या ऐकोन । सच्छिष्य पुसे कर जोडोन । ह्मणे स्वामी ज्याचें स्मरण । करावें तो ईश कवण ह्मणिजे ॥ ५ ॥ तैं श्रीगुरू बोलती वाणी । भलतेंचि पुससी नेणोनी । तो परमात्मा कवणालागोनी । अगोचर आहे? ॥ ६ ॥ जैसे गोचिडासी गाईचें दूध । न मिळे परी गाय गोचर सिद्ध । तैसा मूढा न मिळे परमानंद । परी सत्तारूपें गोचर तो ॥ ७ ॥ यालागीं गोचीडपणा सांडी । आंगीं वत्सपणा मांडी । वृथा माहात्मयासी न तंडी । लावी भंडी हरिनामीं ॥ ८ ॥ ऐसें सद्गुरूचें समाधान । ऐकोनि शोभलें

वादीचें मत । ह्मणे भोळिया शिष्याकरण । ईश्वर सांगोन भोंदिता कीं ॥ ९ ॥ ईश्वर आहे येथ काय प्रमाण । सिद्धान्ती ह्मणे काय शब्दाचा अर्थ कवण । निषेध कीं कुत्सित कीं वितर्क कीं प्रश्न । चहुंतूनि एक आधीं सांगें ॥ १० ॥

गद्यः— 'काय' शब्दाचे अर्थ चारही होतात. एकाद्याचा निषेध करावयाचा असल्यास, "तेथें जाऊन काय अर्थ आहे" असें आपण ह्मणतो. त्याचप्रमाणें एकाद्याची निंदा करावयाची असल्यास " काय हा विचित्र मनुष्य आहे ! " असेंही आपण ह्मणतो. त्याचप्रमाणें एकादा विकल्प करावयाचा असल्यास, " हें काय तेच आहे कीं दुसरें आहे " असें ह्मणतो; आणि एकादी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा असल्यास " हें काय आहे " असेंही आपण ह्मणतो ! तेव्हां क्रमानें ' काय ' शब्दाचे अर्थ निषेध, निंदा, वितर्क व प्रश्न असें होतात. पैकीं वादीच्या ह्मणण्यांतील ' काय ' शब्दाचा अर्थ प्रथम असेल, तर ईश्वराचें ठिकाणीं प्रमाण नाहीं असेंच त्यांनीं ह्मटलें ह्मणावयाचें; पण प्रतिज्ञामात्रानें साध्यसिद्धि होत नसते, ह्मणून वादीनें कांहीं हेतुही द्यावयाला पाहिजे होते ते दिले नाहींत. एवढ्याकरितां वादीच्या म्हणण्यांत न्यूनदोषत्व आहे; व वादी निग्रहीत झाला आहे. आतां 'निंदा' हा दुसरा अर्थ जर वादीनें उच्चारलेल्या ' काय ' शब्दाचा असेल तर तो अत्यंत अनुचित आहे, कारण प्रमाण आणि निंदा हे दोन्ही विरुद्ध आहेत. आतां ' प्रमाण ' शब्दाचा गौण अर्थ करून ईश्वरास्तिक्यप्रमाणाभासाला निंद्य समजेल तर प्रमाणाभास कोठेंही निंद्यच आहे; आणि प्रमाण शब्दाचा मुख्य अर्थ करील तर निंद्य समजतां येत नाहीं. याप्रमाणें वादीनें उच्चारलेल्या 'काय' शब्दाचा तिसराही अर्थ सम्यक् नाहीं; कारण ईश्वर आहे याविषयीं हें प्रमाण आहे कीं दुसरें प्रमाण आहे ? असें वादीनें उच्चारावयास पाहिजे होतें, पण तसें उच्चारलें नाहीं, ह्मणून वादी न्यूनत्वदोषानें निग्रहस्थानाला प्राप्त झाला आहे. आतां चवथा अर्थही वादीच्या ' काय ' शब्दाचा असल्यास कांहींतरी जाणून घेण्याची इच्छा वादीला आहे, आणि ते काय जाणून घेण्याची इच्छा आहे तर प्रमाण. तेव्हां प्रमाणसामान्य जाणून घेण्याची इच्छा आहे कीं प्रमाणविशेष जाणून घेण्याची इच्छा आहे ?

पैकीं प्रथमपक्षीं प्रमाणसामान्य जाणून घेण्याची इच्छा असल्यास प्रमाण हेंच उत्तर आहे, कारण सामान्य प्रमाणाचें नांव प्रमाणच आहे; आतां विशेष प्रमाण जर पुसत असशील तर विशेष प्रमाण हें उत्तर आहे.

वादी उवाच:— वा: ! वा: ! थंडीचें औषध कोणतें असें विचारणाऱ्याला औषध हें उत्तर देण्यासारखेंच आहे. पण हें भाषण उन्मत्ताप्रमाणें आहे, कारण सामान्य गोष्ट पुसणाऱ्याला माहीतच असते, ह्मणून विशेषच त्याला सांगावें लागतें.

सिद्धान्ती उवाच—औषधाची गोष्ट क्रियाविशेषांत मोडते, आणि प्रमाणाची गोष्ट ज्ञानविशेषांत आहे; ह्मणून वादीनें दिलेला दृष्टान्त विषम आहे; व ज्या ग्रंथांतून घेतला तो वाचस्पतिकृत सारोद्धार मिथ्यालापी आहे. कारण प्रश्नोत्तर ज्ञानालाच आश्रय घेऊन होतात; किंवा औषध हा प्रमेयाचा प्रश्न आहे. त्याला श्रुतिप्रमाणें "अग्निर्हिमस्य भेषजं" असें उत्तर देतां येईल. परंतु येथें प्रमाणाचाच प्रश्न आहे. ह्मणून तो बरोबर नाहीं ह्मटलें असतां प्रमेयाच्या दृष्टीनें आम्हाला वादीनें अडवूं पाहणें योग्य नाहीं. प्रमाणसामान्य जर वादीला ठाऊक आहे तर त्याचे विशेष ठाऊक असलेच पाहिजे. कारण जातिव्यक्तीचा समवायसंबंध आहे. आतां अनुमानविषयक जर जिज्ञासा असेल तर तेंच आह्मी उत्तर देऊं; किंवा वादी जर म्हणेल, मला संशय आहे तर मग त्यानें शिष्य होऊन आमची सेवा करावी. पुढें त्याचा संशय आह्मी दूर करूं. वादी विप्रत्तिपत्ति आणणारा होत असतो, संशय काढणारा होत नाहीं. संशय काढणारा शिष्य होत असतो. विरुद्धपक्ष सत्य आहे असें म्हणणें याला विप्रत्तिपत्ति म्हणतात; आणि वादी समजूनच आह्मी प्रश्नांतर्गत उत्तर दिलें आहे; आणि तें प्रमाणाविषयीं व वादीचा निग्रह करण्याविषयीं बरोबरही आहे. येथें शंकरमिश्राचार्य काय ह्मणतात ते पहा:—

"यं प्रकारं प्रमाणत्वादि गृहीत्वा प्रश्नं वाक्यं प्रवर्तते तमेव प्रकारमादायोत्तरवाक्यमपि प्रवर्तनीयम्" (परिच्छेद ३, खंडण टीका.)

अर्थ:— जसा यक्ष तसा बळी. याप्रमाणें जसा प्रमाणादि घेऊन वादी प्रश्न करितो तशा प्रकारचेंच प्रमाणादि घेऊन उत्तर देणें उचित आहे.

मध्यस्थ उवाचः— अहो! पण असें उत्तर देणें वादीला मोहकारक आहे सरळ नाहीं. शंकरमिश्रांनीं खंडनटीकेंत असें उत्तर वादीच्या मोहाकरितां आहे असें ह्मटलें आहे; ते आपणास ठाऊक असलेंच पाहिजे. आपण कृपाळू आहां ह्मणून वादीला सरळ उत्तर द्यावे असें मला वाटते.

सिद्धान्ती उवाचः— वादीनें आपल्या शब्दाचा अर्थ ज्याप्रमाणें स्पष्ट केला नाहीं, त्याप्रमाणें जगताचा कर्ता कोणी तरी असला पाहिजे, घटादिकाप्रमाणें जगत् कार्यरूप आहे, ह्मणून "स एव विश्वस्य भवान् विधत्ते" इत्यादि अनुमानशब्दप्रमाणांचा मीं प्रत्यक्ष निर्देश केला नाहीं, पण पर्यायानें सांगितलेंच आहे. तथापि आपल्या ह्मणण्याप्रमाणें मी प्रगट सांगेन. त्यानें आपलें काय ह्मणणें आहे ते कळवावे. वादी पुनः तेच ह्मणून अन्यानिग्रहस्थानापन्न होतो.

ईश्वर आहे येथ कांहीं। मज वाटे प्रमाण नाहीं। सदा संशय लवलाही। माझिया चित्तीं येत असे ॥ ११ ॥ तैं सिद्धान्ती वदे वचन। मलतें बोलतां चपेटा देईन। तूं पुससी आधीं प्रमाण। कीं संशय पुससी ॥ १२ ॥ प्रमाणाच्याठायीं। तुज निश्चय आहे कायी। कवण प्रमाण विषायीं। बोलिले तुवां ॥ १३ ॥ ह्मणसी प्रत्यक्षचि एक प्रमाण। तरी प्रमाता प्रत्यक्ष नाहीं ह्मणोन। प्रमात्याचें नसतेपण। तैं प्रमाण कासया ॥ १४ ॥ प्रमाता मी ह्मणसी। तरी प्रमाण भिन्न कीं अभिन्न तुजशी। आद्यपक्षीं तूं स्वाश्रया येसी। अंत्यपक्षीं वदसी इष्ट आह्मां ॥ १५ ॥ आतां प्रमाणहेतुस्तव प्रमाता। साध्य मानिसी नेणता। तरी नाहीं राहिला अनुमाता। तेणें अनुमानता अनुपपन्न ॥ १६ ॥ भिन्नपक्षीं इष्टापत्ति। शब्द तव मान्यचि नाहीं तुजप्रति। अथवा नास्तिकागम मानसी चित्तीं। तरी आस्तिकागम वारावया कवण हेतु? ॥ १७ ॥ तंव वादी ह्मणे माझ्याठायीं। ऐसा संशय सदा राही। कीं आगम ते लवलाही। बोलती भिन्न ॥ १८ ॥ तयामाजीं प्रमाण कवण। जरी युक्ति मानावी प्रमाण। तरी नाना जनाची बुद्धि भिन्न। अनुभवा तंव आह्मां कारणचि नाहीं ॥ १९ ॥ तैं सिद्धान्ती ह्मणे प्रत्यक्ष नाहीं। तें तें अभाव न घडे कहीं। वादीगोचर अभाव नाहीं। असदन्यकोटी

नसे ह्मणोनी ॥ २० ॥ सता ना अनिर्वाच्य पदार्थी । कोटीद्वय दिसे पाहतां । असदंशीं अवलोकितां । कोटीद्वयप्रवेश नसे ॥ २१ ॥ कोटीद्वय मानसी जरी । ईश्वराभावांशीं आग्रह कां तरी । तद्भावांश जाणोनि अंतरीं । सुखिया होई ॥ २२ ॥ किंवा एक पद गोचर । तदर्थाभाव न दिसे अणुमात्र । खपुष्पादि पदें समासगोचर । ह्मणोनि तदर्थाभाव कल्पितां ये ॥ २३ ॥ दृष्टसंबंधात्यंताभाव । साधावया न्यायादि उपाव । परि अदृष्ट सच्छद्वार्थाभाव । साधायाची हांव धरूं नये ॥ २४ ॥ ह्मणसी डित्थादि शब्दाप्रति । सर्वथा अर्थाची अनुपपत्ति । तरी ही अनादि प्रवृत्ति । कीं विवक्षा चित्तीं अभावाची ॥ २५ ॥ आद्यपक्षीं कोटिद्वय नाहीं । ह्मणोनि त्वदर्थ मान्य आह्माही । ईश्वरभाव कोटिवादियाही । आहे ह्मणोनि डित्थादिवदर्थाभाव नव्हे ॥ २६ ॥ द्वितीयपक्षीं तुह्मी विवक्षा । तरी आमुची कां न होय विवक्षा । सर्व शब्द देती हरिशिक्षा । हें मागाचि आह्मी बोलिलों ॥ २७ ॥ आगम असती भिन्न भिन्न । ह्मणोनि संशय घेसी दारुण । परि आगम आहे कीं नाहीं प्रमाण । सांगे तूतें ॥ २८ ॥ आगम प्रमाणचि जंव नाहीं । तरी संशय कां घेसी आगमाविषयीं । सकळ आगमचि तुझे ठायीं । अप्रमाण झाले ॥ २९ ॥ एखादा आगम घेवोन । दुसरा मानिसी अप्रमाण । तरी दुसरा आगम सप्रमाण । काय ह्मणोन खंडिसी ? ॥ ३० ॥ सकळ आगमांचे निरीक्षण । करितां दिसे हेंचि कारण । चोदना आणि भव्यपण । लोकाधिकतरविज्ञानवज्जन्यता ॥ ३१ ॥ अधिकतरविज्ञानवत्ता । असलियाविण न घडे चोदकता वा भव्यता । अत्यंत अनुवादकता । अप्रशंसनीय ॥ ३२ ॥ यद्यपि आगमाच्या ठायीं । अनुवादकता दिसे कांहीं ; ते दृष्टान्ते सर्वही । लोकां कळावी ह्मणोनी ॥ ३३ ॥ यद्यपि करोनि अध्ययन । जीव होती संपन्न । तथापि समाध्ययनीं विशेष मतिमत्पण । अलौकिकानुग्रहावीण नव्हे ॥ ३४ ॥ किंवा श्रमसाध्य मतिमत्पण ह्मणतां । तरी श्रमसाम्येऽपि दिसे विशेषता । एकाते विचारीं शीघ्रता । एकाते तेथ प्रमादू ॥ ३५ ॥ यालागीं अध्ययनजन्य सकळ । ज्ञान हें तंव निमित्त केवळ । उपादान प्रबळ । अंतःकरण तेथ ॥ ३६ ॥ यद्यपि वेदांताच्या ठायीं । शब्दातोंचोनि अपरोक्ष नाहीं । तथापि आत्मा-

कार लवलाही । अंतःकरणवृत्ति उपजे ॥ ३७ ॥ जया वेदान्तमतामाझारी । मननिदिध्यासन श्रवणसहाकारी । तेथ कर्तृतंत्रवृत्ति आत्माकारी । शब्दसहकारी बोलिली ॥ ३८ ॥ वस्तुतंत्र आत्माकारवृत्ति । ते शब्दोत्पन्न श्रवणांगी वादीही ह्मणती । मननिदिध्यासना देती । कर्तृतंत्रत्वास्तव अंगता ॥ ३९ ॥ वाचस्पत्यादि वेदान्तमतांत । आत्मप्रमेचें कारण चित्त । श्रवणसहकारी अंग होत । अंतःकरणज्ञानोपादानीं तेथ विवादचि नाहीं ॥ ४० ॥ म्हणोनि सकळांचें ज्ञान । अध्ययनसाध्य मानणें होईल गौण । तथापि अध्ययननिमित्ताधीण । अभिव्यक्त नोहे ॥ ४१ ॥ यद्यपि श्रीकृष्णादिकांचें अध्ययन । ते लोकमर्यादामात्रपाळन । जीवामाजीं समाध्ययन । असतां मतिमत्पण विषम दिसे ॥ ४२ ॥ तें अध्ययनसंपाद्य नाहीं । यालागीं अनुग्रहिता अन्य ते ठायीं । तो अनुग्रहिता लवलाही । अधिकतरविज्ञानवान् म्हणिजे ॥ ४३ ॥ म्हणसी अधिकतरविज्ञानवंत । जरी उपजती विश्वाआंत । परि विश्वज्ञानही यथार्थ । अन्य जन पाहोनि न सांगती ॥ ४४ ॥ तेंचि पाहोनि विश्वज्ञान । एखादा निर्मी शास्त्र आपण । एवं ज्ञानाचें कारण । निरीक्षणही नोहे ॥४५॥ ज्ञानाचें कारण निरीक्षण असते । तरी समनिरीक्षणीं लौकिकशास्त्रसिद्धान्त सकळां स्फुरते । आतां केवळ विचारशक्तीतें । ज्ञानकारण न म्हणिजे ॥ ४६ ॥ ज्ञानकारण विचारशक्ति । असतां एक जो तर्क निर्मिती । त्यांत व्याभिचार अन्य दाविती । विषम विचारशक्ति यास्तव ॥ ४७ ॥ म्हणोनि ज्ञानाचें मुख्य कारण । अदृष्ट म्हणावें जरी आपण । तरी अदृष्टासी आगमप्रमाण । आगम तव मतें लौकिकपुरुषजन्य ॥ ४८ ॥ लौकिकपुरुषा स्वसमभ्रांति । संभवे म्हणोनि ज्ञानकारणादृष्टानुपपत्ति । ऐसी जाहलिया चक्रिकापत्ति । अधिकतरविज्ञानवत्ता चित्तीं मानावी ॥४९॥ ते अधिकतरविज्ञानवत्ता । स्वतःसिद्धचि मान्य होता । तेंचि ये तत्प्रणीता । आगमा प्रामाण्य ॥ ५० ॥ आस्तिक नास्तिक धर्म कोणी । जेथ पारलौकिकप्रवृत्ति निर्वाणी । तेथ तेथ चोदनावाणी । दिसतु आहे ॥५१॥ आणि जें जें सुखाचें साधन । तेथ भज्यताही दिसे संपन्न । किंवा जें चोदनास्थान । तेथही भज्यता दिसे ॥ ५२ ॥ देहात्मवादी चार्वाका धन्य म्हणती । स्वभावसृष्टीतें अद्यापि पूजितां दिसती । पूज्यबुद्धि तव

आहे वृत्ति । अंतःकरणघटक ते ॥ ५३ ॥ अंतःकरण तोडून । तिये करितां न ये निवारण । यालागीं कोणी कोठेंतरी स्थापन । करिती पूज्यबुद्धीचें ॥ ५४ ॥ आतां चोदना आहे जया मती । आणि परलोकप्रवृत्ति । ते वैदिक अवैदिक जरी असती । आगम तरी तेथ अलोक पुरुष मानिला ॥ ५५ ॥ सुखिया हा लोक उत्तम वाटे । दुःखिया तोचि वन्हिमय थाटे । ह्मणोनि परलोकेच्छा नाहीं नेटें । न ह्मणवे कवणा ॥ ५६ ॥ आणि इच्छासाफल्य जंव नाहीं । तरी दुःखीसुखिया युद्ध सदाही । मग समाधानाभावें लवलाही । मोडेल विश्वव्यवस्था ॥ ५७ ॥ दुःखिया जिंकावया कारण । परलोकआमिष दाविती सुखी जन । ह्मणावें तव ऐहिकसुखाचाही पूर्ण । निषेध करिती परत्रबोधक शास्त्रें ॥ ५८ ॥ ह्मणोनि परलोकप्रवर्तक चोदना । तेथ पुरुषा अलोकपणा । हें सकळ आगमनिरीक्षणा । करितां दिसे ॥ ५९ ॥ आणि उदयनाचार्येही आपण । "न्यायकुसुमांजलीत" वदती हें वचन । तेंचि घेवोनि प्रमाण । सांगू तूतें ॥ ६० ॥

"यं कमपि पुरुषार्थमर्थयमानाः, शुद्धबुद्धस्वभाव इत्यौपनिषदाः, आदिविद्वान् सिद्ध इति कापिलाः, क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टो निर्म्माणकायमधिष्ठाय संप्रदायप्रद्योतकोऽनुग्राहकश्चेति पातंजलाः, लोकवेदविरुद्धैरपि निर्लेपः स्वतंत्रश्चेति महापाशुपताः, शिव इति शैवाः, पुरुषोत्तम इति वैष्णवाः, पितामह इति पौराणिकाः, यज्ञपुरुष इति याज्ञिकाः निरावरण इति दिगम्बराः, उपास्यत्वेन देशित इति मीमांसकाः, यावदुक्तोपपन्न इति नैयायिकाः लोकव्यवहारसिद्ध इति चार्वाकाः, किंबहुना कारवोऽपि यं विश्वकर्म्मेत्युपासते, तस्मिन्नेवं जातिगोत्र प्रवरचरणकुलधर्म्मादिवदासंसारं प्रसिद्धाऽनुभावे भगवति भवे सन्देह एव कुतः" ? (न्यायकुसुमांजली प्रथमः स्तबकः)

प्रकाशटीकाः— यं कमपीति । यं कमपि मोक्षादिकं स्वाभिमतं पुरुषार्थमर्थयमानाः, यमीश्वरमुपासते मननविषयीकुर्वन्तीत्यौपनिषदा इत्यादौ सर्वत्र संबंधः । शुद्ध एको द्वितीयाभावात् । बुद्धः स्वप्रकाशज्ञानात्मकः । द्वितीयाभावेन परप्रकाश्यत्वानुपपत्तेः । एतदुभयं वेदान्तिसाधारणम् । आद्यीति आद्यो प्रथमतो विद्वांश्चिद्रूपः स्वभावतश्चेतनो । न तु

प्रकृतिवच्चेतनोपरागादौपाधिकं चैतन्यं तस्येत्यर्थः । सिद्धो नित्यो, न तु बुध्यादिवत् साध्यः । तेन कूटस्थनित्यो, न तु प्रकृतिवत् परिणामीनित्य इत्यर्थः । एतच्च सकलक्षेत्रज्ञसाधारणत्वान्न परमात्मनोत्कर्षाभिधायकमित्यन्यथा व्याख्येयम् । आदौ सर्गादौ विद्वान् । सिद्धो योगर्द्धिसम्पदुत्पादिताष्टविधैश्वर्यसम्पद्युक्त इत्यर्थः । यथोक्तं तत्वकौमुद्यां वाचस्पतिमिश्रैः, सर्गादावादिविद्वान् भगवान् कपिलो महामुनिर्धर्म्मज्ञानैश्वर्य्यसंपन्नः प्रादुर्बभूवेति स्मरंतीति । क्लेशेति । अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाः क्लेशाः । कर्म धर्म्माधर्म्महेतुर्भावनासाध्यं यागहिंसादि । विपाको जात्यायुर्भोगाः । फलपर्य्यन्तमाशेरत इत्याशया धर्म्माधर्म्माः । तैरपरामृष्टोऽसम्बद्ध इत्यर्थः । शरीरैकनिष्पाद्यवेदादिनिर्म्माणार्थं कायो निर्म्माणकायः । सम्प्रदीयते गुरुणा शिष्यायेति संप्रदायो वेदः । स चानादिरेव भगवता द्योत्यते । भगवतश्चादृष्टाभावेऽपि तच्छरीरसाध्यघटादिजन्यभोगजनकास्मदाद्यदृष्टैरेव तन्निष्पाद्यते । अनुग्राहको घटादिनिर्म्माणे शिक्षाद्वारेत्यर्थः ॥ लोकेति ॥ लोकविरुद्धैः सर्प-दहनधारणादिभिः, वेदविरुद्धैर्दारुवनद्विजवधूविध्वंसनैरुपलक्षितः । इत्थम्भूतलक्षणे तृतीया । सोऽयमित्थम्भूतोऽपि निर्लेपः पापरूपलेपरहित इत्यर्थः करणे वा तृतीया । वेदविरुद्धहेतुक-भोगजनकविशेषगुणरहित इत्यर्थः । स च सुखं दुःखं धर्म्माधर्म्मौ चेति । मिथ्याज्ञानसलिलावसिक्तायामात्मभूमौ कर्म्मबीजं धर्म्माधर्म्मांकुरमारभते, न तु तत्वज्ञाननिदाघनिपीतसलिलतयोषरायामितिभावः । स्वतंत्रो जगत्कर्त्ता । शिवो निस्त्रैगुण्यः । पुरुषेषूत्तमः सर्व्वज्ञत्वात् । पितामहो जनकस्यापि जनकः । यज्ञे प्रधानमिज्यं यज्ञपुरुषः । सर्वज्ञः क्षणिकसर्वज्ञः । निरावरण इति । आवरणमदृष्टमविद्यास्वकर्म्मोपार्जितं च शरीरमस्य नास्तीत्यर्थः ॥ उपास्यत्वेनेति ॥ वेदोपनिष्टोपास्यभावः कश्चिन्मंत्रादिरित्यर्थः ॥ लोकेति ॥ यथा लोके व्यवह्नियते चतुर्भुजाद्यपेतदेहवान्, नत्वदृश्य इत्यर्थः । यावदुक्तेति । यावदुक्तेषु यदुपपन्नं युक्तिमत्सर्वज्ञत्वादि, तेनोपपन्नः संपन्न इति मध्यमपदलोपी समासस्तत्पुरुषः । यावदुक्तेषु उपपन्नः प्रामाणिको धर्म्मो यस्येति बहुव्रीहिर्वा, न तु यावद्भिरुक्तैरुपपन्नः सहित इत्यर्थः । अद्वैताद्यनंगीकारेण यावद्यथा व्याख्यातार्थस्य नैयायिकैरनंगीकारात् । यद्वा सन्देह एव कुत इत्युपसंहारात् सर्वाण्येव दर्शनान्येकार्थपरतया व्याख्यायन्ते । शुद्धो

दोषहीनबुद्धस्वभावो घटादिभिन्नत्वे सत्यौपाधिकचैतन्यरहितः आदौ सर्गादौ विद्वान् ज्ञानवान्, सिद्धो नित्यः। संप्रदायप्रद्योतको वेदं प्रणीय सर्गादिसमुत्पन्नाध्यापकः, अनुग्राहकः कुलालादिकृतेऽपि घटादौ सहकारीत्यादिक्रमेण। नचैवमैकमत्येन दर्शनभेदानुपपत्तिः। फलैकमत्येऽपि प्रकारभेदात् सर्वथा विरोधाभावे विचारोपयोगिसंशयस्याप्यभावप्रसंगात्। यद्यपि मीमांसकानीश्वरसांख्यमतेनेश्वरे संप्रतिपत्तिः, तथाप्युपास्यत्वेन धर्म्मिणि संप्रतिपत्तिरस्त्येव। कारुः शिल्पी। विश्वं सर्वमुत्पत्तिमत् कर्म्म कार्य्यं यस्य स तथा। जातिर्ब्राह्मणादि। गोत्रं काश्यपादि। ऋषय एव यज्ञे व्रियमाणाः प्रवराः। चरणं शाखा। अनुभावोऽसाधारणं कार्यं वेदादि अत एव भवत्यस्मादिति भवः। तथा च, जातिगोत्रादिवत् संसारमभिव्याप्य श्रुत्यादि प्रमाणसिद्धे परमात्मनि न सन्देहोऽतस्तत्रेश्वरे किं निरूपणीयमित्यर्थः।

सटीक मूळाचा भावार्थः— आपआपल्या मतांत सांगितलेला मोक्षादिक पुरुषार्थ मानणारे कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें परमेश्वराची उपासना करितात. जसें:—ज्याला अज्ञानाचा कलंक नाहीं, व जो एकच आहे. ज्याच्या व्यापकतेमध्यें किंवा सामर्थ्यामध्यें दुसरा जोडीचा कोणी नसल्यामुळें परप्रकाशतेची कल्पनाही ज्याच्या विषयीं करितां येत नाहीं; असा स्वप्रकाश आणि सकलबंधनापासून मुक्त. यद्यपि सर्व पदार्थ अविद्याकल्पित आहेत, तथापि जीवईश्वराचा भेद अनादि असून तद्भेदास्तव त्याची नित्यमुक्तताही अविद्येनें अनादीच कल्पित आहे. स्वप्नांतील पर्वताचे ठायीं स्थिरता व स्वप्नांतील मेघादिकांचे ठायीं क्षणिकता जशी निद्राकल्पित आहे, तद्वत् संसाराचे ठायीं सादिता आणि वैदान्तिक षट्पदार्थांचे ठायीं अनादिता अविद्याकल्पितच आहे; आणि पूर्व पूर्व अविद्येचा कल्पक उत्तर उत्तर अविद्येचा कल्पक होतो; ह्मणून सर्व पदार्थ जरी प्रातिभासिक आहेत, तथापि बिंबभूत परमेश्वर किंवा शुद्धब्रह्म दृष्टिसृष्टिवादांत ईश्वर होतो, तो मुक्तस्वभाव आहे. याचा विशेष विचार अन्य ग्रंथांत करीन. हें मुख्य वेदान्तमत आहे. आतां सांख्यमत सांगतो. ज्ञानस्वरूप, प्रकृतिप्रमाणें

कोणाच्या संगानें ज्याला ज्ञान प्राप्त नाहीं असा स्वतःसिद्ध, आणि सर्वदा विकाररहित ईश्वर सांख्य मानतात.

पूर्वपक्षी उवाचः— अहो ! हें लक्षण सांख्यामध्यें असलेल्या क्षेत्रज्ञ पुरुषाविषयींचे आहे; परमेश्वराविषयींचे नाहीं.

सिद्धान्ती उवाचः– असूं दे. निरीश्वरसांख्यामध्यें देखील आगमसिद्ध कांहीं अंश आहे, एवढेंच आम्हाला सांगावयाचें आहे. याचा विशेष तुझा उत्तरपक्षी सांगेल.

उत्तरपक्षी उवाचः–हे पूर्वपक्षिन् ! तुला समजावें म्हणून दुसरेंही एक लक्षण करितां येईल. सृष्टीच्या आरंभीं योगवृद्धिसंपत्तीनें प्राप्त झालेलें आहे संपूर्ण ऐश्वर्य ज्याला, तो आदिविद्वान् सिद्ध सांख्यांत अभिमत आहे. " कपिलस्य सहोत्पन्नानि धर्मो ज्ञानं वैराग्यं ऐश्वर्यमिति " असें पंचशिखाचार्यांचें सूत्र असून, कपिलाच्या बरोबरच धर्म ज्ञान वैराग्य ऐश्वर्य उत्पन्न झाले असा त्याचा अर्थ आहे; आणि सांख्यतत्वकौमुदींत वाचस्पतीही " सर्गादावादि विद्वान् भगवान् कपिलो महामुनिर्धर्मज्ञानै-श्वर्यसंपन्नः प्रादुर्बभूवेति स्मरन्ति " ( कारिका ४३ ) असें म्हणतात. याचा अर्थ, सृष्टीच्या आरंभीं धर्मज्ञानैश्वर्यादिसंपन्न कपिलमहामुनि उत्पन्न झाले अशी स्मृति आहे, असा आहे. यद्यपि ऐश्वर्यांत वैराग्य व्हावें म्हणून उत्कृष्ट भव्यता ईश्वराची सांख्यांना मान्य नाहीं, तथापि तत्कृतचोदना मान्य आहेच; आणि म्हणूनच त्यांनां कापिल असें म्हटलें आहे. कपिलाचें ऐश्वर्य त्यांनां मान्य आहे हें आतांच सांगितलें.

सांख्यदर्शन प्रथमाध्यायाच्या द्विनवतितम सूत्राच्यावर जी भाष्यें आहेत त्यांचा थोडक्यांत सार सांगतो. प्रथम सूत्रावर स्वतःचा अभिप्राय सांगतो. सन्निकर्षजन्यच प्रत्यक्षाचें लक्षण मानल्यास ईश्वराचे नित्य ज्ञानावर प्रत्यक्षाचें लक्षण न गेल्यामुळें, त्याची अव्याप्ति होते, म्हणून ईश्वरच नाहीं असें मानणें भाग पडते; अशी शंका आली असतानां कपिलाचार्य समाधान करितात– " ईश्वरासिद्धेः " ( सांख्यदर्शन अध्या० १ सूत्र ९२ ) " सिद्धाविश्वरो गुरुः कापिले " हें एक सूत्र " मित्रे चर्षौ " या सूत्राप्रमाणें व्याकरणांत नवीन करून घालावें असें वाटतें. त्याचा अर्थ सांख्यशास्त्रांत 'सिद्धि' शब्द पलीकडे असतां ' ईश्वर ' शब्द

दीर्घ होतो; व या नियमान्वयें सूत्राचा अर्थ 'ईश्वर सिद्ध होतो' असा आहे. सन्निकर्षोत्पन्नप्रत्यक्षज्ञानाची व्यक्ति जरी अनित्य आहे तरी जाती नित्य असल्यामुळें ईश्वराचे प्रत्यक्षज्ञानप्रत्यक्षत्व जातिमत् मानलें असतां अव्याप्ति होत नाहीं. दुसरे, भाष्यकार विज्ञानभिक्षु असें म्हणतात कीं, या सूत्रांत ईश्वराचा प्रतिषेध केला आहे खरा; परंतु तो एकदेशीच आहे, वास्तविक नाहीं; कारण ईश्वर हा कपिलाभिमत आहे. तसें नसते तर "ईश्वराभावात्" असें सूत्र केलें असते. "ईश्वरासिद्धेः" असें सूत्र करण्याचें कारण नव्हते. जातीस अनुलक्षून परमेश्वराच्या प्रत्यक्षासही लक्षण लागू पडत असल्यामुळें अव्याप्ति होत नाहीं. तिसरें, भाष्यकार असें ह्मणतात, मानसप्रत्यक्ष अवश्य मानलें पाहिजे, तें जर न मानलें तर ईश्वर सिद्ध होणार नाहीं, असा या सूत्राचा अर्थ आहे. वृत्तिकार अनिरुद्धाचार्यांचे असें मत आहे कीं, न्यायमतोक्त ईश्वराचेच यांत निराकरण केलें आहे. स्वतः माझेंही मत असें कीं, "स एव विश्वस्य भवान् विधत्ते गुणप्रवाहेन विभक्तवीर्यः" या श्लोकांत कपिलानें ईश्वराचें प्रतिपादन केलें असून भागवतामध्यें आणखी भक्तियोगही सांगितला आहे. यद्यपि "सनकश्च सनंदश्च तृतीयश्च सनातनः । आसुरीः कपिलश्चैव वोढुः पंचशिखस्तथा । इत्येते ब्रह्मणः पुत्रा सप्त प्रोक्ता महर्षयः" या स्मृतिप्रमाणें ब्रह्मदेवाचे पुत्र कपिल व भागवतावरून देवहूतीचे पुत्र कपिल असें दोन कपिल उपलब्ध होतात; परंतु ते दोन्ही कपिलरूपच अवतार आहेत असेंही भागवतावरून कळते. शिवाय पुनः "ऋषिं प्रसूतं कपिलं यस्तमग्रे ज्ञानैर्बिभर्ति जायमानं च पश्येत्" अशी श्वेताश्वतर श्रुति असून "सिद्धानां कपिलो मुनिः" अशी जागृच्छ्रुतिहि आहे. या जागृच्छ्रुतीचें भाष्य करतानां आचार्यांनीं "उत्पत्तित एव अधिगतपरमार्थानां" असें ह्मटलें आहे. तेव्हां जन्मतः सिद्ध असलेले कपिल अन्यथावक्ते होणार नाहींत. शांकरभाष्यांत यद्यपि आचार्यांनीं कपिलाचा निषेध केला आहे; तरी तो निरीश्वरवादी सांख्यांच्या अभिमान्यावर आक्षेप आहे असें समजावें. कारण निषेध केलेल्या सूत्रभाष्यवाक्यांत स्पष्ट निर्देश नाहीं असें झाल्यास तसें व तसें झाल्यास असें अशी नुस्ती वितंडाच त्यांत आहे. शिवाय भागवताला आह्मी भाष्यापेक्षया आगमत्व समजतो, कारण

आचार्यांचे आजेगुरू जे गौडपादाचार्य[१] त्यानीं आपल्या उत्तरगीतेच्या टीकेंत त्याचा उल्लेख केला आहे. ह्मणूनही सांख्यांतील ईश्वरप्रतिषेध यथार्थ नाहीं, तर ऐश्वर्यामध्यें देखील वैराग्य व्हावें यासाठीं प्रौढीवाद मात्र आहे. अथवा वेदान्तदृष्टीनें पाहतां वाच्यांशप्रतिषेधमात्र आहे. याप्रमाणें सांख्यांत भक्तियोगाची सिद्धि करून आतां योगाचें मत सांगतो.

अविद्यादि पांच क्लेश, धर्माधर्म, जन्म, आयुष्य, सुख, दुःख आणि त्यांच्या वासना याहून जो रहित, भक्ताकरितां आणि उपदेशसंप्रदाय प्रगट करण्याकरितां जो शरीर धारण करितो, तो परमेश्वर होय असें योगी ह्मणतात. सर्पधारण व वन्हिधारणादिक लोकविरुद्ध कर्मे करून आणि दारुवनाद्विजवधूवधादिक वेदविरुद्ध कर्मे करूनही ज्याला त्या कर्मांचा लेप लागत नाहीं असा स्वतंत्र परमात्मा आहे असें महापाशुपत ह्मणतात. त्रिगुणरहित आहे असें शैव ह्मणतात. त्रिगुणरहित चतुर्थमूर्ति असा पुरुषोत्तम आहे असें वैष्णव ह्मणतात. ब्रह्मदेवाचाही पिता आहे असें पौराणिक ह्मणतात. यज्ञपुरुष आहे असें याज्ञिक ह्मणतात. आवरणरहित आहे असें जैन ह्मणतात. उपास्यरूपानें निर्देश केल्या जाणारा असें मीमांसक ह्मणतात. सर्व जगत्कार्याचा कर्ता आहे असें नैय्यायिक ह्मणतात. लोकव्यवहारानें सिद्ध असें चार्वाक ह्मणतात. बहु काय सांगावें, शिल्पशास्त्री देखील विश्वकर्मा समजून ज्याची उपासना करितात, त्या परमेश्वराविषयीं संशय कसा उत्पन्न होणार ? यद्यपि जैन, सांख्य, मीमांसा, चार्वाक या मतांत ईश्वर नाहीं, तथापि त्यांत ईश्वरत्वशक्ति ज्यांत आहे ती शक्ति ग्रहण केली असून तीही अनादि ग्रहण केली आहे. उपास्यत्व ज्याचा धर्म आहे असा कांहीं धर्मी पूर्वमीमांसांतही सांगितला आहे; आणि आवरणरहित सर्वज्ञता जैनानीं मानली आहे; व तीही जन्य मानली नाहीं तर प्रतिबंधक्षयानें प्रगट होणारी अशी मानली आहे. ह्मणून तिची प्रतिबंधाच्छादित अनादिता मोडते असें ह्मणतां येत नाहीं. चार्वाक राजाच ईश्वर आहे असें ह्मणतात, व ते प्रत्यक्षप्रमाणवादी असल्यामुळें पूर्व जन्म व कर्म मानीत नाहींत, तेव्हां लोकव्यवहारसिद्ध व अल्पप्रयत्नानें राजाचे ठिकाणीं

असणारा स्वतःपेक्षां विशेष तो नास्तिकांचे ठिकाणीं पूज्यबुद्धि उत्पन्न करून देणारा असल्यामुळें, उपास्यतावाच्छिन्न धर्मित्वास्तव ईश्वरकोटींत अंतर्भूत होतो. याप्रमाणें परमेश्वराचे ठिकाणीं आगमविरोध नाहीं, तसा त्याचे ठिकाणीं अनुमानविरोधही नाहीं.

वादी उवाच-- अहो! तो तुमचा ईश्वर बद्ध आहे कीं मुक्त आहे ? पहिल्यापक्षीं रागद्वेषादिक त्याला असल्यामुळें तो आमच्या सारखाच होईल, आणि ईश्वराला रागद्वेषादिक आहेत याविषयीं तो आपल्या भक्तावर कृपा करतो, व अभक्तांचा नाश करितो इत्यादि पुराणवचनें प्रमाण आहेत. दुसऱ्यापक्षीं त्याच्याकडून सृष्टिकर्तृत्वादिक होणार नाहींत.

सिद्धान्ती उवाच--रागादिक दुःखमूळ आहेत हा तुझा बद्ध ह्मणण्याचा आशय आहे; पण रागादिकांचे कार्य दुःख आहे, असा नियम नाहीं. केवळ राग किंवा द्वेष हा दुःखमूलक नाहीं, तर रागद्वेषापासून उत्पन्न झालेले धर्माधर्म उपाधि दुःखमूलक आहेत. जीवांचे सर्व राग सफल होत नाहींत, ह्मणून त्याला दुःख होते; आणि द्वेषापासून नरकप्राप्ति होते ह्मणून दुःख होते. ईश्वराला कोणी ईश्वर नाहीं, ह्मणून नरकप्राप्ति त्याला संभवत नाहीं; आणि सर्व इच्छा सफल होतात ह्मणून राग निरर्थक नाहीं. याप्रमाणें सर्वसमर्थ अशा परमेश्वराचे ठिकाणीं रागद्वेष असले तरी बंधक नाहींत.

वादी उवाच--अहो! पण जैनमतांत रागी परमेश्वराची निंदा केली आहे.

सिद्धान्ती उवाच--- अरे ! स्तुतिनिंदावाक्यानीं क्रियेचा निषेध होत असतो, वस्तूचा होत नाहीं. शिवाय जैनमतांतही अर्हताला अनंतशक्तिमत्ता, अनंतदयालुता मानली आहे. अनंतशक्तिमत्ता असूनही लोकांनां नुसता उपदेशच कां करितो ? त्यांचे दुःख एकदम कां दूर करीत नाहीं ? असें जैनपंडितास विचारले असतां, तो रागी नाहीं म्हणून असे ते उत्तर देतात.

" सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ।
यथास्थितार्थवादी च देवोऽर्हत्परमेश्वर " इति निश्चयालंकारे
( विद्यारण्यकृत सर्वदर्शनसंग्रह. )

परंतु सामर्थ्य असून उदासीन राहणें व नुस्ती उपदेशापुरतीच स्या दाखविणें हेंही सामर्थ्यरक्षकपणाचें चिन्ह असून भलेपणाचें चिन्ह नव्हे. तात्पर्य, आमच्यावर जो ते प्रश्न करितात तो त्यांच्यावरही येतो. जेथें दोष व दोषाचें परिहार सारखेच असतात, तेथें एकानें दुसऱ्यास प्रश्न विचारणें योग्य नाहीं. आतां दुसऱ्यापक्षीं परमेश्वराला मुक्त मानलें, तरी त्याचे सान्निधीनें प्रकृतिमध्यें किंवा परमाणूंत किंवा मायेमध्यें क्रिया उत्पन्न होऊन सृष्टि होऊं शकते; व जे परमेश्वराला मुक्त मानतात ते तसे मानतातही. तर्कानें प्रश्न करणाऱ्या तुला आम्ही तर्कानेंच उत्तर देण्यास समर्थ आहों हें पक्के समज.

वादी उवाच— अहो ! ईश्वर अल्पज्ञ आहे कीं सर्वज्ञ ? पहिल्यापक्षीं तो आमच्या सारखाच होईल, व दुसरा पक्ष तर सिद्ध होत नाहीं; कारण सर्वज्ञ अशा परमेश्वराला ज्ञानोत्पत्ति होणें दुर्घट आहे, त्याच्या ज्ञानांत त्रिपुटी नाहीं म्हणून.

सिद्धान्ती उवाच–परमेश्वर अल्पज्ञ आहे असा आम्हाला स्वीकार नाहीं. रामकृष्णादिकांची अल्पज्ञता भक्तप्रशंसनार्थ व लीला मात्र आहे. त्यांचे गुरुगृहीं गमनही लोकांनां उपदेशार्थ आहे, म्हणून ते अल्पज्ञ नाहींत. अज्ञानें कोणाचेही गुरुगृहीं गमन लोकोपदेशार्थच होईल असें वादी म्हणेल तर, तसें झाल्यास आमची कांहीं हानी नाहीं. कारण ज्याला सर्व व्यवहार लोकोपदेशार्थ करतो असें वाटते असा माहात्मा ईश्वरच आहे असें आम्ही म्हणतो; पण तसा माहात्मा आहे कोठें ? आतां दुसरा जो तुझा पक्ष, तोहीं बरोबर नाहीं. कारण परमेश्वराच्या ब्रम्हज्ञानांत जरी त्रिपुटी नसली तरी सर्वज्ञेंत त्रिपुटी आहे. त्रिपुटी न मानली तर, परमेश्वराला सर्व ज्ञान अहंग्रहरूपानें होईल व अमुक जीवाला अमुक फळ द्यावें हें तर इदमाकारज्ञानावांचून संभवनीय नाहीं. सर्वात्मत्वज्ञान व सर्वज्ञता हे दोन्ही भिन्न आहेत. सर्वात्मज्ञानामध्यें मी कर्ता, मी दाता, मी भोक्ता इत्यादि ज्ञानाची उत्पत्ति होत नाहीं. मी जीवरूप आहे, मी कर्मरूप आहे, व मी कर्मफलरूप आहे अशा ज्ञानानें ज्ञेयत्व, दातृत्व संभवत नाहीं. जीवाहून परमात्मा भिन्न आहे हें "कर्मकर्तृव्यपदेशात्" इत्यादि सूत्रांत व त्याच्या भाष्यांत बादरायणाचा-

यांनीं व भगवत्पूज्यपादाचार्यांनीं सांगितलें आहे. ह्मणून त्याचे सर्वज्ञते-मध्यें त्रिपुटीची सिद्धि होते. जीवानेंच ईश्वर कल्पिला असल्यामुळें जीवालाच तो आपल्याहून निराळा भासतो, व कर्मफलदाताही भासतो, वास्तविक त्याच्या ज्ञानांत त्रिपुटी नाहीं अशी मूर्ख शंका काढीत असतात, ते अदृष्टवेदान्ती असल्यामुळें त्यांच्याशीं बोलून आह्मांला कांहीं करावयाचें नाहीं; पण जीवकल्पितच जर ईश्वरता असेल तर त्याची तादात्म्यसर्वज्ञता घेऊन जीवाला आपले कर्मफल सिद्ध करतां येत नाही; ह्मणून त्याचे ज्ञानाचे ठिकाणीं त्रिपुटी जीवानें कल्पिली असलीच पाहिजे.

वादी उवाच–तरी पण या आपल्या ह्मणण्यावर एक प्रश्न येतो कीं, त्रिपुटी मानल्यास मध्यें देश मानल्यावांचून ज्ञेयज्ञातृभाव घडणार नाहीं; आणि मध्यें प्रदेश असल्यास ईश्वर अव्यापक होईल.

सिद्धान्ती उवाच– हा प्रश्न मुळींच येत नाहीं. कां ह्मणाल तर प्रदेश अविद्याकल्पित आहे ह्मणून. अविद्याकल्पितवस्तू अर्थक्रियाकारीच होत असते. अधिष्ठानाचे ठिकाणीं अधिक्षेपादि धर्म संपादन करीत नाहीं. अधिक्षेपादि धर्म संपादन करण्याकरितां समसत्ता विवक्षित असते. बिंबभूत परमेश्वराची सत्ता दृष्टिसृष्टिवादांत देखील व्यावहारिक वा पारमार्थिक आहे, आणि अविद्याकल्पित प्रदेशादिकांची सत्ता प्रातिभासिक आहे, ह्मणून प्रातिभासिक प्रदेशादिकानें परमात्मा परिच्छिन्न होत नाहीं, व त्याची वृत्तिनिष्ठ सर्वज्ञताही कायम राहते.

वादी उवाच— अहो! पण कल्पित ह्मणून देखील त्रिपुटीची व्यवस्था लागत नाहीं, कारण कांहीं गोष्टी मनास देखील कल्पितां येत नाहींत, जसें पुत्रापासून पित्याची उत्पत्ति, समभान लहान पदार्थामध्यें समभान मोठ्या पदार्थाचा समावेश इत्यादि; आणि ज्या गोष्टी मनास कल्पितां येत नाहींत त्या जगांतच नाहींत.

सिद्धान्ती उवाच–तूं युक्तिवादानें अगदीं वाहवत असेल ह्मणून बहकून भलते भलते बोलतोस. ज्या गोष्टी मनाला कल्पितां येत नाहींत, त्या गोष्टी अविद्येलाही कल्पितां येत नाहींत असें तूं ह्मणूं नकोस. कारण मनाचें ध्यान पूर्वसंस्कारानुरूप असल्यामुळें पूर्वसंस्काराविरुद्ध

मनाला कांहीं कल्पितां येत नाहीं. अविद्या ससंस्कार पदार्थाची कल्पक असल्यामुळें तिला सर्व पदार्थ कल्पिता येतात, व ह्मणूनच तर्कानें अघटित वाटणाऱ्या वस्तूंचीही ती कल्पना करिते. हे तिचे अघटित-घटनापटुत्व वेदांतांत प्रसिद्ध आहे. पुत्रापासून पिता उत्पन्न कसा होतो हे कोटी तर्कानें जरी सिद्ध होत नसले तरी अविद्यावृत्तीच्या अनुभवानें सहज सिद्ध होते. कारण स्वप्नामध्यें उत्पन्न होणारा पिता पुत्रापासूनच होत असतो, व त्याचे ठिकाणीं पितृत्वभ्रांति भगवति अविद्या संपादन करीत असते. स्वप्नजागृत्तुल्यता तर योगवासिष्ठादिग्रंथ मुक्तकंठानें प्रतिपादित आहेत, आणि त्याविषयीं मुक्तिप्राचूर्यही दृष्टिसृष्टिनिरूपण करतानां अन्य ग्रंथांत सांगेन. जडपदार्थांमधील परस्पर कार्यकारणभाव सत्य आहे असें मानणाऱ्यालाच जें मनानें कल्पितां येते, ते खरे असें मानावें असें वाटते, व त्यालाच तर्क खरा वाटतो. अपर पदार्थांचे ठायीं पूर्वत्वभ्रांति व क्षणिक पदार्थांचे ठायीं क्षणिकत्व भ्रांति स्वप्नपदार्थांचे ठायीं दृष्ट आहे. लहान वस्तूमध्यें मोठ्या वस्तूचा समावेश होत नाहीं हेंही ह्मणणें बरोबर नाहीं. कारण अल्प अशा कंठावच्छिन्न देशाचे ठिकाणीं सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ति होते. स्वप्न मिथ्या आहे असें कोणी म्हणेल तर ते वेदान्तीच म्हणूं शकेल, इतरांस ह्मणतां येणार नाहीं. कारण स्वप्नाचा कर्ता परमेश्वर आहे असें वेदान्तावांचून इतर मतांत सांगितलें आहे, व जीव आहे असें वेदान्तांत सांगितलें आहे. परमेश्वरजन्य कार्य मिथ्या संभवनीय नाहीं, असा आक्षेप इतर मतावर प्रश्न करतां येतो; आणि वेदान्ती तर स्वप्नदृष्टान्तानें सर्व व्यवस्था लावतात. प्रमाणप्रमेयादि व्यवस्था जशी जागृतींत आहे, तशी स्वप्नांतही आहे. स्वप्नांतील कुंभारही कपालसंयोगानेंच घट करतो, ह्मणून परमाणुसंयोगानें कार्याचा आरंभ मानणाऱ्या नैय्यायिकांचीही उपजीवीका उपजीवक मायेवर संभवते. स्वप्नांतील दुधापासून दही हा परिणाम होतो, ह्मणून सांख्याच्या परिणामाची उपजीविकाही मायेनें होते. "न स्वप्नदृष्टान्तसमो उपायोऽस्त्यात्मदर्शने" स्वप्नदृष्टान्तासारखा आत्मज्ञानाला दुसरा उपाय नाहीं, असें विज्ञानभिक्षूंनीं आपल्या सांख्यसारांत म्हटलें आहे. आणि—

" गुणानां परमं रूपं न दृष्टिपथमृच्छति ।
यस्तु दृष्टिपथं प्राप्तं तन्मायैव सुतुच्छकम् ॥
आरंभपरिणामाभ्यां पूर्वं संभावितं जगत् ।
पश्चात्काणादसांख्याभ्यां युक्त्या मिथ्येति निश्चितम् " ॥

अशा वार्षगण्यस्मृति आहेत. स्मृत्यर्थः— ओव्याः— गुण अदृश्यचा जाण । दृश्य ते माया तुच्छ पूर्ण । आरंभपरिणामवादें करोन । न्यायसांख्यांत बोलिले जग ॥ ६१ ॥ ते पुढती युक्त्या मिथ्या दाविले । ह्मणवोनि अवघेचि वेदान्तोपजीव्य भले । विवर्तवादी तंव अवलंबिले । स्वप्नचि जगत ॥ ६२ ॥

गद्यः— स्वप्नांतील कल्पित प्रदेश स्वप्नद्रष्ट्याला ज्याप्रमाणें परिच्छिन्न करीत नाहीं, त्याप्रमाणें ईश्वराचे ठिकाणीं उत्पन्न झालेले प्रदेश ईश्वराला परिच्छिन्न करीत नाहींत. आतां अविद्येला आश्रय चेतनच पाहिजे, जड असूं शकत नाहीं; कारण अविद्या जड व जडकारण[1] अशी अनुभवसिद्ध आहे ह्मणून.

वादी उवाचः—अहो ! स्वस्कंधारोहण व वंध्यापुत्र इत्यादि स्वप्नांत कां दिसत नाहीं ? आणि आंधळ्याला रंगाचे ज्ञानही स्वप्नांत होत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— वंध्यापुत्र व स्वस्कंधारोहण पदार्थ कल्पितां येत नाहींत, या नियमाची सिद्धीही अविद्येनेंच आहे; किंवा जडपदार्थांचे ठिकाणीं कार्यकारणभाव नसल्यामुळें, सर्व स्त्रिया वंध्या आहेत; ह्मणून वंध्यापुत्रच सर्व आहेत. एक भगवति अविद्याच पुत्रवती आहे. स्वस्कंधारोहणही उत्तरस्वरूपावच्छिन्न अभिमानावच्छेदकतेनें स्वाप्रस्वमरण दर्शनवत् होऊं शकते. याप्रमाणें आकाशपुष्प, शशशृंगही पुष्पत्व व शृंगत्व जातिविशेषें करून अविद्या कल्पूं शकते.

वादी उवाचः— आकाशाला कोणतेही पुष्प लावले, व सशाला कोणतेही शिंग लावले तरी हे आकाशाचे पुष्प व हे सशाचे शिंग असें ज्ञान निश्चयानें होणार नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— जाईला पुष्प पाहून व गाईला शिंग पाहून

---

१ जडाचे कारण.

हें जाईचें पुष्प आहे व हें गाईचें शिंग आहे असा निश्चय होण्याला येथें तरी काय नियामक आहे? प्रत्यक्षप्रमा किंवा इतरव्यावृत्ति हे तर स्वप्नकल्पित आकाशपुष्प व शशशृंगाचे ठायींही आहेत. कारण तेथें प्रत्यक्षप्रमात्व आहे, व अवयवत्व विशेषेंकरून इतरव्यावृत्ति हे दोन्ही स्वप्नांत दिसूं शकतात. आतां जागृत्प्रत्यभिज्ञापरंपरा जशी जातिकुसुम-गोशृंगादिकांचे ठिकाणीं आहे, तशी स्वाप्नपरंपरांतर्गत प्रत्यभिज्ञाही आकाशकुसुम व शशशृंगादिकांचे ठिकाणींही आहे. भूतयोनिशरीरा-दिवत् शरीरदीर्घीकरणानंतर शरीराचे ठिकाणीं सामान्य अभिमान ठेवून, शरीरखंडाचे ठिकाणीं विशेष अभिमान स्थापित करून, स्वस्कंधारोहण ध्यानानें देखील करतां येते. समप्रमाण एका शरी-राचें स्वस्कंधारोहण देखील अविचारित भ्रमांत भासते. आतां आह्मांला अशा प्रकारचे स्वप्नच पडलें नाहीं असें कोणी ह्मणेल तर, तूं माझ्याशीं प्रश्न करण्याला अयोग्य आहेस असें मी म्हणतो. अथवा मला पडले असें म्हणून मी आपला वाद खुशाल दृढ करितो. वादीनें निघून जावें. यांत माझी कांहीं हानि नाहीं. आंध-ळ्याला रूपाचें ज्ञान तर स्मृतीमध्यें भासत असते, व ते मानसप्रति-योगीरूप असल्यामुळें अवधानावांचून दृग्गोचर होत नाहीं, असा त्रिपुरा-रहस्याचा आशय आहे; आणि स्वप्नांत ज्याला देवतानुग्रह होतो त्या आंधळ्याला अकस्मात् डोळे येऊन स्वप्नांतील रूपही दिसते, व जागृ-तींत ती दृष्टी नष्टही होते. आतां असंभव ह्मणून कांहीं नाहीं असें मात्र आमचें म्हणणें नाहीं; पण असल्यास तोही अविद्येच्या नियमानेंच आहे. जे जे पदार्थ अविद्याकल्पित आहेत, ते ते अविद्यानियामक होऊं शकत नाहींत, हा कांहीं तर्क नव्हे; तर अनुभव आहे.

वादी उवाचः— पण तुह्मी ईश्वराचें अस्तित्व व परलोकाचें अस्तित्व, मनांत येत नाहीं ते कोठेंच नाहीं असा न्याय घेऊन, पुष्कळ वेळा सिद्ध केलें आहे; तेव्हां त्या ग्रंथाशीं व तुमच्या तादृश बोलण्याशीं विरोध येत आहे.

सिद्धान्ती उवाचः— अरे! आमच्या म्हणण्याचा तुला अर्थ सम-जला नाहीं. जे कोठेंच नाहीं ते मनानें कल्पितां येत नाहीं असें आमचें

म्हणणें बरोबर आहे; पण अविद्येलाही कल्पितां येत नाहीं असें मात्र म्हणत नाहीं. कारण पुत्रापासून पिता उत्पन्न होतो, हें मनांत देखील आणतां येत नाहीं. पण स्वप्नांत आपला पिता आपणापासून उत्पन्न होतो, व त्याचेठिकाणीं आपलें पितृत्व निश्चित असतें हें आपण पाहतो. शशशृंगाप्रमाणें अविद्येला शून्यही कल्पितां येते, म्हणून आमची नास्तिकता सिद्ध आहे असें कोणी नास्तिक म्हणेल तर तो कुबुद्धि खुशाल म्हणो. अविद्याकल्पित नास्तिकता असल्यानें आमची काय हानि आहे ? आमचें अधिष्ठान कायम आहेच, कारण निरधिष्ठान अविद्या जागृत्स्वप्नादि कोणत्याही अवस्थेंत अनुभूत नाहीं. अविद्या व अधिष्ठान मानणाऱ्या आह्मास शशशृंगाप्रमाणें नास्तिकता मनाला कल्पितां येत नाहीं, हें आमचे पूर्वग्रंथांचे ह्मणणें सिद्ध आहेच. ह्मणून परमात्मा आहे व त्याच्या ज्ञानांत अविद्यात्मक त्रिपुटीनें तो सर्वज्ञही आहे, न्यायमकरंदनामक केवलाद्वैतग्रंथांत असें ह्मटलें आहे. या ग्रंथावर चित्सुखाचार्यांची टीका असल्यामुळें हा भगवत्पूज्यपादसमकालीन ग्रंथ अत्यंत प्रमाण आहे, व जसें न्यायमकरंदग्रंथांत ह्मटलें आहे, तसें इतर सर्व ग्रंथांतही ह्मटलें आहे. परंतु न्यायमकरंदाचें वचन अधिक स्पष्ट असल्यामुळें, ते येथें प्रमाणार्थ लिहितोः—

" यत्पुनः सर्वज्ञस्य ब्रह्मणः कथमविद्याश्रयत्वं अविद्यावान् सर्वज्ञ इति प्रतिषेधादिति । तत्राविद्यावत्त्वैव सर्वज्ञत्वमिति ब्रूमः । सर्वंहि यो जानाति स सर्वज्ञः तिस्रश्चात्र विधाः संभवन्ति । प्रमाणतो वा सर्वं जानीयात् भ्रांत्या वा स्वभावसिद्धया वा प्रज्ञया । न तावत्प्रामाणिको भेद इत्युक्तं । न च भ्रांतिरनाविद्यस्येत्यपि स्वरूपप्रज्ञयाऽपि नान्तरेणाविद्यामशेषार्थसंगतिरसंगत्वात् । असंगोऽह्ययं पुरुष " इति च श्रुतिः । न चान्तरेणाविद्यामस्ति संबंध इत्युपपादितम् । अतः सर्वज्ञताऽविद्यावत्तामाक्षिपत्येव परमात्मनो न प्रतिक्षिपति । एवं चाविद्यावान् सर्वज्ञ इत्यसिद्ध एव विप्रतिषेधः (न्यायमकरंद-अविद्याश्रयत्वालोचन-पान ३२३)

भावार्थ ओव्याः— सर्वज्ञ आणि अविद्याश्रय । हे दोन्ही विरुद्ध होय । ऐसें स्वामी बोलतां स्वयें । सर्वज्ञ अविद्येचा आश्रय सिद्धान्ती ह्मणे ॥ ६३ ॥ सर्वज्ञ ह्मणजे सर्व जाणे । ते तंव नोहे

भेदाविणें । भेदसत्यता मोडिली वेदान्तानें । ह्मणोनि प्रमाणे न घडे सर्वज्ञता ॥ ६४ ॥ स्वरूपें सर्वज्ञता नोहे । कीं असंगत्वहानि होये । भ्रांतीनें सर्वज्ञता ह्मणतां सोय । अविद्येची ॥ ६५ ॥ ईश्वरासी ह्मणतां भ्रांति । तरी विरुद्ध वाटेल सकळांप्रति । परी हानिकर आहे आवरणभ्रांति । ते आह्मी ईश्वरा न ह्मणो ॥ ६६ ॥ ईश्वराचेचि अविद्ये करून । जीवाचे सिद्ध प्रमेयप्रमाण । "अध्यासं पुरस्कृत्य सर्वे प्रमाणप्रमेयव्यवहारा" ऐसें वचन । आचार्यांचेही ब्रह्मसूत्रभाष्यीं ॥६७॥ प्रमाणे ईश्वरा सर्वज्ञता । जरी कोणी होय मानता । तरी शीतोष्णादि स्पर्शज्ञाने व्याकुलता । मानावी लागेल तयातें ॥ ६८ ॥ अनुमान आणि आगम । परमेश्वरज्ञानांत अनागम । जे अगोचर देशसंभ्रम । नाहीं म्हणोनि तयाते ॥ ६९ ॥ आतां प्रत्यक्षज्ञान एक जरी । ते प्रमाणप्रमा न ये तरी । दुःखत्वा प्रमेयत्व येता अवसरी । येईल परमेश्वरी सर्वज्ञता ॥ ७० ॥ माया न स्पर्शे मायावंता । जरी सर्वज्ञाधार अनध्यस्तविवर्तता । तरी मायोपहितता । विरुद्ध नाहीं ॥ ७१ ॥ स्वाप्नवन्मायाकल्पितप्रदेशे । त्रिपुटीही घडे विशेषे । हे मांडुक्यकारिकेंत बोलिली असे । गौडपादाचार्यी वैतथ्यप्रकरणीं ॥७२ ॥ सर्वज्ञासी प्रदेशे। परिच्छेदविशेषे । ऐसें ह्मणोनि खंडिलें असे । ब्रह्मसूत्रभाष्यांत पाशुपततार्किका ॥ ७३ ॥ परि ते तार्किक पशुपती । आकाशदेशा सत्यता देती। सत्यदेशे ईश्वराप्रति । सत्यपरिच्छेद घडे हे बोलिले आचार्य ॥ ७४ ॥ एवं ज्यांचे मत । आचार्यांनीं केले खंडित । ते ते सत्य होते मानीत । यालागीं तयांचे चरणीं पाषाणपतन नोहे ॥ ७५ ॥ पूर्वी मी भाष्यांतील आक्षेप काढून । वेदान्ताभिमानियासी करीत होतो भाषण । कीं कोणी-उत्तर द्यावें भाष्य समजून । परि अविद्येचि मान डोलवीत होते ॥ ७६ ॥ यास्तव मज आले कळोन । कीं ज्ञान नोहे सद्गुरुरहित शास्त्र वाचोन । अविद्यावच्छिन्नसर्वज्ञा घडोन । त्रिपुटी असोन हानि न घडे ॥ ७७ ॥ स्वप्नीं जीवही सर्वकर्ता । आणि तोचि व्यवस्थापिता । परि उपदेष्टा नोहे तत्वता । आवृत ह्मणोनी ॥ ७८ ॥ स्वप्नी निर्मी आघवे । आणि

---

१ ढोरकी.

मिया निर्मिलें न ह्मणवे । स्वनिर्मितेंव्याघ्रेंचि पावे । आपण भय ॥ ७९ ॥ ह्मणोनि स्वप्नीं प्रसंग पडलिया । गुरु ते निर्मी वेगळिया । परि स्वप्नव्यवस्थे तया । अविद्याचि करी ॥ ८० ॥ अग्नीची उष्णता जलाची शीतता । हे जीवचेतननिष्ठ निद्राचि कल्पी तत्वता । परी स्वोपदेष्टृत्व नये कल्पिता । आवरण ह्मणोनी ॥८१॥ ईश्वर स्वयें वेदोपदेश करी । यालागीं शास्त्रयोनी तो निर्धारी । सर्वज्ञत्व साचारी । ह्मणोनी तया ॥ ८२ ॥ स्वप्नकल्पित गुरु सर्वज्ञ जैसा । निद्रोपष्टब्ध अविद्याप्रत्ययठसा । केवळ अविद्यासत्वें तैसा । सर्वज्ञ ईश्वरू ॥ ८३ ॥ कल्पित परी ध्यानजन्य नोहे कल्पित । यालागीं अनादीचि उपहित । एवं सर्वज्ञता घटत । परमेश्वरातें ॥ ८४ ॥ तंव वादी ह्मणे ईश्वर सर्वकर्त्ता । तरी आह्मास सदनादिकांचे श्रम कां वृथा । तैं सिद्धान्ती म्हणे साहीं आतां । उत्तरशस्त्रघाय माझे ॥ ८५ ॥ येरव्ही सर्वज्ञतेच्या ठायीं । तुझा आक्षेप न घडे कांहीं । सर्व जाणे येथ त्वांही । जाणले कैसे ॥ ८६ ॥ सर्व ठावें असतां तुजची । तंव तुझी जी गती तीच सर्वज्ञाची । मग वाउगी प्रश्नाची । खटपट कासया ॥ ८७ ॥ तुज सर्वत्व सर्वथा न कळे । तरी आक्षेपा कांहीं न मिळे । आणि अंशत: तुज सर्वज्ञता कळे । तरी अंशत्वभ्रम सोडोनि सुखी होई ॥ ८८ ॥ आतां ईश्वरशक्ति कीं अल्पशक्ति । ऐसी जी वादीची उक्ति । उत्तर कीं अल्पशक्ति । कोणीच न ह्मणे ॥ ८९ ॥ तंव वादी ह्मणे सर्वशक्ति । असतां साधावी आपुली मृती । सिद्धान्ती ह्मणे शक्ताधीन शक्ति । तेथ स्वनाशरीती आक्षेप न ये ॥ ९० ॥ एरवीं परमात्मया कहीं । स्वशक्तिविषयीं शंकाही नाहीं । जो करूनि पाहील कांहीं । भलतेचि ऐसे ॥ ९१ ॥ आतां तेणें आपुलें वैभव । तुज दर्शवावे अपूर्व । तरी तेवढा देव । हुरळला नाहीं ॥ ९२ ॥ अल्पप्राप्ताचेंचि लक्षण । करी आपुलें प्रदर्शन । सर्वप्राप्तक्रिया करून । उगाचि राहे ॥ ९३ ॥ आतां दु:ख तरी तुह्मातें । साच न पुसोनि येते । दु:खाच्या करणातें । अदृष्टशक्ति मानाल कीं ॥ ९४ ॥ तीं अदृष्टशक्ति परमेश्वरू । तुह्मा पापीया भयंकरू । एरव्हीं करुणासागरू । शरणागता ॥ ९५ ॥ आतां ऐसे वाटेल तूतें । देव जो भजे तयाते । रक्षी मारी आणिकाते । तरी तो विषमू ॥ ९६ ॥ तरी तैसेंही नाहीं । जो मोक्ष देत वैरियाही ।

परी इतर जीवासी भांडतां लवलाही । मात्र तो तुह्मा पापी ह्मणे ॥९७॥ दुर्बळासी दुर्बळें भांडण । करितां दिसे मातलेपण । ईश्वरासी दैत्यांचें भांडण । तें कल्याणार्थ जाहलें ॥ ९८ ॥ आतां शब्दप्रमाणीं शंका तुज । तरी स्ववैरियाही परमात्मा मोक्ष दे सहज । ऐसें अनुमानहेतुक बीज । आहे अधर्मी हें मानी ॥ ९९ ॥ अगा असुर जे होती । ते ईश्वरा द्वेषिती । तरी सत्ताद्वेष तयाचे हातीं । न घडेचि कीरू ॥ १०० ॥ चितिद्वेषही न घडे जाण । आनंदद्वेषाचें नाहींच कारण । ह्मणौनि विरोध-भक्तीचे असंभावन । सदा निर्गुणीं ॥ १०१ ॥ साकार ईश्वर दैत्यीं झुंजविला । तरी शिव प्रसन्न करूनि विष्णु द्वेषिला । किंवा प्रथम शिव प्रसन्न करूनी शिव द्वेषिला । भस्मासुरादिकीं ॥ १०२ ॥ रावणासी तंव भवानी दिधली । ते मग नारायणें सोडविली । आपुलिया वरें शिव विधि वनमाळी । आपणा बांधोनि करिती लीला ॥ १०३ ॥ स्वभक्तही पर-पीडक । ईश्वरें दैत्य पराभविले त्रिपुरादिक । शेवटी तयातें सुरेख । मोक्षही दिधला ॥ १०४ ॥ आतां आपसांतील भांडण । न देवोनि निर्माण करावें होते आह्मा कारण । ऐसे ह्मणसी तरी निर्वाण । दगड केलेचि आहाती ॥ १०५ ॥ तैसे अवघेचि करावें । ऐसे तरी कवणाचे अधीन मानावें । कदाचित् अन्यकल्पीं स्वभावे । तैसेही होईल ॥१०६॥ कितीही विरोधी परस्पर कार्य होता । तरी मानावी लागेचि मूळसत्ता । सत्ताचि प्रतिषेधिता । तरी घटना ना शंका दोनही न होती ॥ १०७ ॥ आतां स्वदुःखाची आन उपाधि । तो परमेश्वर कां न निषेधी । ऐसे ह्मणाल तरी तो आन उपाधि । दृष्ट कीं अदृष्ट ॥ १०८ ॥ प्रथमपक्षीं पाहिजे कारण । ते तंव परिशेषी नोहे ईश्वरावीण । द्वितीयपक्षीं अदृष्ट मानतां जाण । तुज मानावे प्रमाण लागेल शाब्द ॥ १०९ ॥ मग वेद प्रमाणें व्यवस्था केली । तेचि कां गा नव्हे भली । अवैदिकशब्द प्रमाण मिथ्याबोली । तथापि तेथही निरूपिली ईशकृपाळुता वा सर्वकर्तृता ॥ ११० ॥ दुःखद उपाधि मानतां अदृष्ट । तरी ईश्वर तयातें नाशील हेंही स्पष्ट । परि तया नाशाचे नियमही अदृष्ट । ईशोपदेशेंचि जाणावें ॥१११॥ 'मद्भयाद्वाति वातोऽय'मिति । किंवा 'तेषामहं समुद्धर्ता' ही उक्ति । मानोनि भयें अथवा प्रीती । आगमोक्त श्रीपति स्मरावा ॥ ११२ ॥

वादी म्हणे सर्वशक्ति ईश्वरू । तरी तो स्वतंत्रू कीं परतंत्रू । स्वतंत्रू तरी अकळा निर्धारू । मुक्त कां न करी ॥ ११३ ॥ परतंत्रू तरी होय जीव । सिद्धान्ती म्हणे ऐक भाव । परमात्मा स्वतंत्राचि सावेव । परि मुक्ति स्वभाव जीवाचाही ॥ ११४ ॥ मुक्ति म्हणोनि स्थान असते ; तरी परमात्मया स्वतंत्र देतां येते । परि स्थानें होती समस्ते । मृत्युमये ॥ ११५ ॥ जीव अहंकारादि उपाधि टाकुनी । आपणचि मुक्त होय म्हणूनी ; उपदेशमात्रेंचि तयालागुनी । प्रेरणें योग्य ॥ ११६ ॥ आतां स्वतंत्रासी तुवां । कवण हेतु नियम करावा । कीं तेणें जन आघवा । मुक्त करावा म्हणोनी ॥ ११७ ॥ मुक्त करिताही प्रश्न । तैसाचि येईल मागाहून । कीं स्वेच्छे ईश्वरबंधन । कां न करी ॥ ११८ ॥ यालागीं कवण्याही पांखी[1] । प्रश्न वेडाचि होय शेखीं । उत्तरसंभावना निकी । तैसे पुसिजे ॥ ११९ ॥ आतां उत्तर न मिळे म्हणोनि तत्वतां । म्हणावी ईश्वरकुंठितता । तरी तुज प्रश्न करितां न ये सर्वथा । हें कां न म्हणावें ॥ १२० ॥ जबगदड उच्चारितां । तया जैसी न ये प्रश्नता । तैसी न ये गा प्रश्नता । तव वाक्यातें ॥ १२१ ॥ स्वतंत्रें तुझिये इच्छे अनुसरिजे । तरी परतंत्रचि होइजे । तुझिया इच्छेविरुद्ध चालिजे । तैं स्वतंत्रताचि अधिक ॥ १२२ ॥ येथ कांहीं नैय्यायिक । जल्पती ऐसे निष्टंक । कीं ईश्वरीं सुखदुःख- । स्वरूपयोग्यता असे ॥ १२३ ॥ तया मिथ्याज्ञान नाहीं । म्हणोनि धर्माधर्म नुपजती कांहीं । धर्माधर्माभावें लवलाही । सुखदुःख नुपजती ॥ १२४ ॥ एरव्हीं सुखदुःख स्वरूप-योग्यता । परमेश्वरातें असे सर्वथा । हेंही बोलणें होय वृथा । असतां नसतां सारखें म्हणोनी ॥ १२५ ॥ ईश्वर विभु सर्वसंयोगीं । तयातें अन्यदेशीय मिथ्याज्ञान नुपजे कां प्रसंगीं । तेणें धर्माधर्मसेळे सुखदुःख उपरागी । कां न चले तो ॥ १२६ ॥ अथवा हो कां भलतैसेपरी । सुखदुःख नाहींत ईश्वरीं । आणि स्वतंत्रता तत्र निर्धारी । तद्विषयक राहे ॥ १२७ ॥ अमुक केलेंचि पाहिजे या कर्तव्यें बद्धता । तेणें कदापि न घडे स्वतंत्रता । यालागीं तुझे प्रश्न सर्वथा । न

१ पक्षीं.

येतीचि ते ॥ १२८ ॥ तंव वादी म्हणे स्वतंत्र आणि दयाशील। ह्मणोनि आह्मातें उद्धरावें हा आक्षेप केवळ। न्यायी ह्मणतां क्षमाचि प्रबळ। केली न पाहिजे भक्तांचीही ॥ १२९ ॥ सिद्धान्ती ह्मणे ऐक उत्तर। मी सुखी मी दुःखी हा जीवांहकार। पदार्थस्वभाव नाहीं निर्धार। सुखदुःखाचा ॥ १३० ॥ शूर मरणींही रवावेशें सुख। मानती हा विशेख। गोचिडाते दुग्धीं दुःख। रुधिरीं सुख वाटतू ॥ १३१ ॥ एवं अविवेचिया हातीं। सांपडलिया जीवपंक्ति। भलतिया रागद्वेष-प्रांती। फिरती ते गा ॥ १३२ ॥ तेणें कोठें सुख कोठें दुःख। हा निर्णयू अप्रयोजनक। यालागीं न्याय निष्टंक। प्रवर्ते ईश्वरीं ॥ १३३ ॥ एक जीव आन जीवाचे दुःखें। सुख मानिती आपुल्या सौख्यें। तेथ ईश्वरें सर्वरक्षकें। कवणा अवलंबिजे ॥ १३४ ॥ सकळही रक्षावे जंव। तंव ते दयाचि होय न्यायस्वभाव। तुझिया वृत्तीस ये निग्रहभाव। ह्मणोनि न्याय ह्मणसी तूं ॥ १३५ ॥ जैसे आपसांत लेकुरें भांडता। सकळांसी समजावी माता। तें मातृदयाचि तत्वतां। शिक्षासम भासे। ॥ १३६ ॥ एरव्ही तयामाजीं कांहीं। द्वेष तंव सर्वथा नाहीं। यालागीं न्यायदया लवलाही। भेदू न पडे ॥ १३७ ॥ हे आघवे गुणसंक्रमण। स्वभाव आणि पराभवन। तेणें दयान्यायादि विंदान। उमटतूचि आहे ॥ १३८ ॥ दया सत्वगुणाचा स्वभाव। परि तो सात्विका साक्षात् सुखप्रभव। राजसा तामसा सुखोद्भव। कालांतरीं दयेनें ॥ १३९ ॥ रजस्तमाचा निग्रह करितां। सत्वासीचि ये आकस्मिक न्यायता। रजस्तमें सत्वनिग्रह करितां। तरी अन्यायता ती ह्मणावी॥१४०॥ ह्मणवूनि न्याय आणि दया। गुणसामानाधिकरण्य दोहीं यया। तेवि अन्याय आणि न्यायदया। परस्पर यथागुण वैय्यधिकरण्य ॥ १४१ ॥ गुरु शिष्यातें निग्रहिता। तरी द्वेष उपजे तयाच्या चित्ता। ह्मणसील कीं गुरूच्याही चित्ता। उपजे द्वेषू ॥ १४२ ॥ तरी आभासे येथ संशयो नाहीं। परि तो नसे स्वार्थफलावसायी। जरी होईल स्वार्थफलावसायी। तरी गुरु नव्हे वैरी तो ॥ १४३ ॥ स्वार्थफलावसायी नाहीं द्वेष। ह्मणोनीच क्षमा होय अपराधास। फलेच्छु तव कणिकनीतीस। सर्वदाच अवलंबिती ॥ १४४ ॥ स्वार्थ परित्यागिल्यावीण। कदापि नव्हे क्षमाप्रदान। लोक

मानाच्या भिडेकरून । जैं लोकसाधारणही क्षमा करिती ॥ १४५ ॥ तेथही अणु स्वार्थनाशू । यालागीं स्वार्थपर्यवसायी नसे सात्विक द्वेषू । सर्वसत्वाधिष्ठान जगन्निवासू । तयाचा यमरूप भासू पापिया ॥१४६॥ जो पापिया चंद्रार्कवरी गांजिता यम । तो एवढेही क्षमा करी घेतलिया निज-नाम । हे गुणसामानाधिकरण्य परम । केवढे पहावें ॥१४७॥ मध्यस्थ म्हणे ऐसे जरी । तंव पाप करावें गाडाभरी । वदत जावें चुकलो हरी । आणि करी-तांचि जावी महापापें ॥१४८॥ सिद्धान्ती ह्मणे सुखें करावें । परी या रणीं पाहोनि मरावें । भलतेही होईल स्वभावें । कालवशें ॥ १४९ ॥ जेव्हां चुकलो ह्मणाल तुम्ही । तैं निश्चयें क्षमा करील स्वामी । पुनः प्रवर्तता पापकर्मीं । तैं निश्चयें निग्रह करीलचि ॥ १५० ॥ दंड उगारिता कुतरें । जितुका वेळ फिरे माघारें । तितुका वेळ दंडही करे । लवलाचि जाय ॥ १५१ ॥ पुढती कुतरें येता । उगारणें लागे तत्वतां । तुह्मा पळपळ पापकारीयांची व्यवस्था । तैसीच भगवंता पडेल करणें ॥ १५२ ॥ ऐसे ईश्वरासी झुंझतां । जरी पापप्रवृत्तींत देह पडेल अवचिता । तरी यमलोकाची दुर्धरव्यथा । तुमचिया ताता चुकेना ॥ १५३ ॥ अथवा झुंझता झुंझता । देह पडेल क्षमा मागता । तरी होळी सकळ संचिता । होईल सर्वथा निःसंशय ॥ १५४ ॥ ह्मणोनि ऐसे न झुंजावें । मागि-लिया प्रवृत्तीतें त्यजावें । क्षमा मागोनि मग अक्षय भजावें । जीवेंभावें भगवंता ॥ १५५ ॥ मध्यस्थ ह्मणे झुंजण्यापुरती । आह्मासीचि स्वतंत्रता कां दे श्रीपती । खदखदा हांसोनि बोले सिद्धान्ती । संशयनिवृत्ती करी-तची ॥ १५६ ॥ ह्मणे इतुकी स्वतंत्रता दिधली । तरी प्रभुदयाळुता तुह्मी आक्षेपिली । जरी ते नसती दिधली । तरी दांत खादले असते साच ॥ १५७ ॥ अत्यंत परतंत्र ह्मणजे तुह्मीच नसते । तरी तंव एक बरवे होते । परी तुह्मी आहा हे तुह्मासीचि दिसते । ह्मणोनि अणु कैवल्य वस्तुमूळ ॥ १५८ ॥ जरी नसतीच तुम्हा स्वतंत्रता । तरी दया-लुत्वप्रश्न कोण पुसता । आतांचि मी उत्तर देतो म्हणोनि तत्वतां । बैसणें तुमचे येथ झाले ॥१५९॥ नातरी पुसतांक्षणीं । जरी हाणितो थांपडोनी । तरी काय केले असते निर्वाणी । सांगा तुम्ही ॥१६०॥ सशक्त म्हणोनि मज निग्रहाल । तरि हा दृष्टान्त विषम होईल । परतंत्र जीव अशक्त सकल ।

यालागीं सशक्त ईश्वरीं प्रश्न पुसो न शके ॥ १६१ ॥ ह्मणोनि किंचित् स्वतंत्रता । प्रभुनें दिधली तुमच्याच हिता । परी नीच हो पुढती दया- लुता । गर्वें आक्षेपिता तयाची ॥ १६२ ॥ तंव वादी ह्मणे सर्वशक्ति । तेणें त्यागवावी जीवाहंकृती । तैं हांसोनि म्हणे सिद्धान्ती । कवणेरीती ते सांगे ॥ १६३ ॥ बळें कीं उपदेशें कीं योगें । जीवगर्व सोडवावें श्रीरंगें ! आद्यपक्ष मानितां प्रसंगें । न्यायचि घडे ॥ १६४ ॥ बळें सन्मार्गें लावणें । याचि नांव न्याय म्हणणें । दुसरा पक्ष मानितां क्षणें । नायिके जीव ॥ १६५ ॥ वेदशास्त्र आणि पुराणें । भाष्य वार्तिक विवरणें । काव्य वाक्य भाषण प्रमाणें । ईश्वरानें निर्मिली ॥ १६६ ॥ आणि मध्यें मध्यें साधूजन । उपदेश करिती क्षण क्षण । परी मूर्ख जीव कामना- पन्न । नाइकती वचन अणुमात्र ॥ १६७ ॥ आतां योगें वश करोनि जरी । जीवासी अनहंकार करावें तरी । हा पक्ष उत्तम नोहे निर्धारी । तिसराही ॥ १६८ ॥ जीवासी योगें स्ववश करितां । तरी बुडेल जीवाची स्वतंत्रता । किंबहुना अत्यंत स्ववश करितां । येईल जडता जीवाते ॥ १६९ ॥ मग जडाची केवी मुक्ति । केवि तया ईश्वरऐक्य- स्थिती । जड अविद्याकार्येचि अविद्यानिवृत्ति । होईल कैसी जडाची मग ॥ १७० ॥ ह्मणोनि वस्तुस्वभावें ईश्वर बद्ध । ऐसा कोणी आणितां वाद । तरी ईश्वर विवर्तेचि वस्तु प्रसिद्ध । यालागीं ईश्वरस्वभावचि आघवा ॥ १७१ ॥ बळेंचि दुःखी पडतां । म्हणोनि अडचण जीवाचे माथा । जरी कोणी पाडिता । तरी शब्द येता त्यावरी ॥ १७२ ॥ येथ जैन आशंकिती । कीं विद्वान् मध्यस्थचि राहती । ईश्वर कर्ता तरी जीवाप्रति । युगपत् मुक्त करी न कां ? ॥ १७३ ॥ तरी हा स्वपक्ष दोष म्हणोनि । अर्हतसर्वशक्तिही अभिभवें आक्षेपानीं । वीतराग म्हणता तयालागुनी । तरी आम्ही ईश्वरा रागी कैं म्हणो ॥ १७४ ॥ ह्मणाल रागी नसोनि केवि सर्वकर्ता । तरी आह्मी ह्मणो जीव याचिता ह्मणोनि फलदाता । जैसी जैन आपुलिया अर्हता । स्थापनाप्रतिबिंबे पुण्यदाता मानितू ॥ १७५ ॥ तयाचाचि अपमान करितां । कीं अतदाकारें स्थापिता । पाप मानिती तत्वतां । धर्मव्यभिचारें ॥ १७६ ॥ तत्वार्था- धिगमादिग्रंथीं । हा स्थापनानिक्षेप बोलिला आर्हती । अनुग्रहाची वांछा

करिती । जयाचिपासून जैनजन ।। १७७ ।। समंतभद्रोपाख्यानीं । जीन चतुर्मुखबिंब निघाले मूर्तीतूनि । सुदर्शनशेटी सुळी देतांक्षणीं । अर्हंते वाचविले तयातें ।। १७८ ।। इत्यादि जैनग्रंथीं कथा प्रसिद्ध । तैसा ईश्वरासी याची जीव शुद्ध । तेणें कर्मफळ प्रसिद्ध । सहज पावे ।। १७९ ।। अरिहंत प्रतिबिंबे सर्वदाता । ईश्वर सन्निधानें सर्वकर्ता । एथ जैनाची आशंका वृथा । जिनदृष्टान्तेचि ।। १८० ।। कर्मानुसारेचि मिळे फळ । तरी अर्हंतभजनीं कां आदर प्रबळ । नमोकार जपादि सकळ । पाहिजे कासया ।। १८१ ।। "ॐनमोऽर्हते ॐनमोऽर्हतृभ्यः नमोऽर्हताणं नमो सिद्धाणं नमो आर्य्याणं नमो वौज्झाणं नमो लोईसव्व-साऊणं नमो अर्हतृभ्यः नमो सिद्धेभ्यः नमो आर्येभ्यः नमो वौद्धेभ्यः नमो लोके सर्वसाधूभ्यः" इत्यादि मंत्रोक्ति । उग्याचि होतील गा निश्चिती । या मंत्राविण कर्मसंपत्ति । निष्पन्न जरी ।। १८२ ।। आतां इया मंत्राविण । सत्कर्मसंपत्ति अनिष्पन्न । तरी वैदिक ईश्वरसंन्निधान । कवण कारण प्रतिषेधाया ।। १८३ ।। अर्हंत पुण्यफळाचि दाता । पापाचें फल आन दाता । तरी अरिहंताची शक्ति असतां । निवारण कां न करी ।। १८४ ।। राग नाहीं ह्मणोन । नाहीं करीत निवारण । तरी आपुल्या शक्तिरक्षणीं पूर्ण । राग कां होय ।। १८५ ।। ऐसिया वीत-रागापरीस । जनोद्धारक रागचि उत्तम विशेष । असो आमुचिया पापफलास । द्यावया यम आनाचि ।। १८६ ।। आमुचिया ईश्वरासी पाहतां । क्रोधभयादिपापही आचरितां । तो मुक्तचि हें तत्वतां । ह्मणो-नियां दयाळू ।। १८७ ।। गुणनिधि विप्रनैवेद्य चोराया आला । तो चिंधोटीं पाजळतां देवें कुबेर केला । उपमन्यु दुग्ध मागावया बैसला । तंव तया दिधला क्षिराब्धीं ।। १८८ ।। क्रोधें संतापला ब्राह्मण । वक्ष-स्थळीं ह्याणिला चरण । तो वागवी श्रीवत्सलांछन । ह्मणोनिया ।।१८९।। कंसासी भयें निदिध्यास लागला । तो तेणेंचि पैं गा मुक्ति नेला । पुत्रनामें उद्धरिला । अजामिळ तो ।। १९० ।। मारूं आली पूतना-राक्षसी । तें जननीची गती दिधली तियेसी । स्त्रीयाचक जालंदरासी । शिवें मिळविलें ज्योतिरूपीं ।। १९१ ।। आपुलें ऐक्य इच्छितां । इंद्र जैसा विघ्न करी स्वर्ग मागतां । तैसा ईश्वर नाहीं विघ्नदाता । ह्मणोनी

दयार्शील ॥ १९२ ॥ स्नेह करितां कवणेही रीती । गौण न मानी आपुल्याप्रति । पार्थधुरे झाला सारथी । यालागीं दयामूर्ति भगवंत् ॥ १९३ ॥ मग जे सौहृद अत्यंत प्रेमें । भजती आपुलिया मनोधर्मे । तयांचिया सुखाची वर्मे । वाखाणीजती कवणे ॥ १९४ ॥ यद्यपि विरोधही भक्ति । पाविजे पैं भगवंतीं । तथापि आपुलियाचि द्वेषवृत्ति । इहलोकीं न मिळे सुख ॥ १९५ ॥ आणि सौहृदे सेवितां गोविंदा । तरी ऐहिकाचिपासूनि परमानंदा । जीव चढे येथ मुधा । संशयो न घेयावा ॥ १९६ ॥ ह्मणोनि कवण्याही दृष्टि । परमात्मा दयाळूचि निश्चिती । परी तयावरीच पाहिजे वृत्ति । लाविली जीवे ॥ १९७ ॥ दुसरिया जीवास अपाय करूनी । मग ईश्वरदयाळुता विश्वसी मनीं । तरी तेथ मात्र मोक्षदानी । यमाकरवी उपजवी न्याय ॥ १९८ ॥ "दैत्यांनीं द्वेषिला हरी । तेहि पावले मोक्षपुरी । परि भक्तद्वेषी बुडाले अघोरी । कल्पांतवरी दुरात्मे" । ऐसे बोलिले महिपतिराय । ते भगवत्कृपेचि प्रमाण होय । जीवन्मुक्ति तव स्वयें । प्रेमभक्तीनें ॥ १९९ ॥ स्तन्यालागीं द्वेषी कां रडे । तरी ते क्षमा मायेपुढें । येर बाळासह भांडता रोकडे । न्यायचि उपजे ॥ २०० ॥ तैसे जीव पक्षपाती । भगवन्न्यायें दुःखी होती । ईश्वर भजतां कोण्याही वृत्ति । सुफळ हे भगवंती बोलिले ॥ २०१ ॥ बळे उपदेशे वा योगें । निग्रहे न्याये कां जडताप्रसंगे । म्हणोनि उदासीन राहोनि अंगे । शरण आलिया उद्धरी ॥ २०२ ॥ एरवी तरी पाहतां । जीवपापासम दुःख नाहीं तत्वता । तेहि एक दयालुता । केलीचि देवें ॥ २०३ ॥ जीवाचा काम अनंत । वासना इच्छी परघात । ऐसे असोनि अल्प प्रायश्चित्त । पापनिवर्तक निर्मिलें ॥ २०४ ॥ जीवकामरूप पापांच्या पुढें । यमगृहही होय थोडे । सात नरकही भीती रोकडे । महापापिया ही कथा पुराणीं ॥ २०५ ॥ स्वर्ग आणि नरकास्थिती । आघवीच मनाची प्रीती । हे बोलिले आहे निश्चिती । विष्णुपुराणीं ॥ २०६ ॥

"मनःप्रीतिकरः स्वर्गो नरकस्तद्विपर्ययः ।
नरकस्वर्गसंज्ञे वै पापपुण्ये द्विजोत्तम ॥ ४६ ॥
वस्त्वेकमेव दुःखाय सुखायेर्ष्यागमाय च ।

कोपाय च यतस्तस्माद्वस्तु वस्त्वात्मकं कुतः ॥ ४७ ॥
तदेव प्रीतये भूत्वा पुनर्दुःखाय जायते ।
तदेव कोपाय यतः प्रसादाय च जायते ॥ ४८ ॥
(अंश २ अ० ६)

टीका— तदेवं हरिभक्तिरूपं सुलभं सर्वेषां सर्वप्रायश्चित्तमुक्तम् । इदानीं विदुषामेव योग्यं ब्रह्मज्ञानात्मकं सर्वप्रायश्चित्तमुररीकृत्य ब्रह्मव्यतिरिक्तस्य पूर्वोक्तस्य स्वर्गनरकतत्संपादनादिसर्वप्रपंचस्य मिथ्यात्वमाह । मनः प्रीतिकरः स्वर्ग इत्यादि सार्धैः पंचभिः । मनः प्रीतिकरः इति । तद्विपर्ययः मनोदुःखकरः अतः स्वप्रगतमनःप्रीतिदुःखकरवस्तुवत्स्वर्गनरकौ मिथ्यैवेतिभावः । मिथ्याभूतस्वर्गनरकहेतुत्वात्पापपुण्ये अपि मिथ्यैवेत्याशयेनाह । नरकेति ॥ ४६ ॥ आयुर्वै घृतमिति तत्साधने साध्यवदुपचारात्पापपुण्ये एव नरकस्वर्गसंज्ञे इत्युक्तम् । सुखसाधनानां स्रक्चंदनादिवनितादीनामप्यसत्यत्वमाह । वस्त्वेकमेवेति । वस्तु स्रक्चंदनादि वस्त्वात्मकं नियतस्वभावं कुतः । देशकालभोक्तृभेदेनानियतस्वभावत्वान्न परमार्थतस्सुखदुःखसाधनं किंचिदस्तीत्यर्थः ॥ ४७।४८ ॥

भावार्थ—अभंग १.

सुख दुःख दोन्ही मनाचें कारण । वस्तुधर्म पूर्ण न होती ते ॥ १ ॥
चंदन ग्रीष्मांत सुखमय भासे । हेमंतीं तो दिसे दुःखमय ॥ २ ॥
पतिव्रता नारी आनंदाची खाणी । ते होता जारिणी दुःखदात्री ॥ ३ ॥
आळंदीवल्लभचरण सुखाचे । आन सर्व खाचे दुःखमय ॥ ४ ॥

अभंग २.

पाप पुण्य दोन्ही मनाचे कारण । वस्तुधर्म पूर्ण ते न होती ॥ १ ॥
स्वस्त्रिये त्यागितां आंगीं पाप लागे । भोगे पाप जोडे परस्त्रीच्या ॥ २ ॥
हिंसा करितांना पाप जोडे थोर । युद्धहिंसे शूर पुण्यवंत ॥ ३ ॥
विधिनिषेध ते शब्दाचे रोकडे । साधिकार फुडे आगमही ॥ ४ ॥
पुण्याचे ते फळ एक ज्ञानेश्वर । आन पुण्य सार पापाचाची ॥ ५ ॥

अभंग ३.

स्वर्ग नरक हे मनाचे कारण । वस्तुधर्म पूर्ण न होती ते ॥ १ ॥
बळीसी तो स्वर्ग नाहीं आवडला । अवघा दान केला शिवप्रीती ॥ २ ॥

धर्मासी नरक झाला सुखरूप । बंधूंच्या अमूप भेटीस्तव ॥ ३ ॥
ज्ञानेश्वरस्वामीचरणावांचून । आघव्याचि मनकपिचेष्टा ॥ ४ ॥

ओवी-- एवं सुख दुःख दोन्ही । स्वयें जीवचि आपणा मानी । तथापि निजजनमानीं । मानी देवो प्रायश्चित्त ॥ २०७ ॥ ह्मणोनि दयालु शेषशाई । येथ अणुमात्र संशयो नाहीं । स्वयें तुलसीदासही । बोलिले ऐसे ॥ २०८ ॥

जो पैं हरिजनअवगुण गहते । तौं सुरपतिकुरुराजबालिसो कत हठि बैर बिसहते । जो पैं हरिजन ॥ धृ० ॥ जों जपयज्ञयोगव्रतवर्जित केवल प्रेम न चहते । तौं कत सुरमुनिवर विहाय ब्रजगोपगेह बसि रहते । जो पैं हरिजन ॥ १ ॥ जों जंह तंह प्रण राखि भक्तको भजनप्रभाव न कहते । तौं कालि कठिन कर्ममारग जड हम केहि भांति निबहते । जो पैं हरिजन ॥ २ ॥ जो सुतहित लित नाम अजामिलके अघ अमित न दहते । तौं यमभट शासति हर हमसे वृषभ खोज खोज नहते । जो पैं हरिजन ॥ ३ ॥ जो जगविदित पतितपावन अति बांकुल विरुद न वहते । तौ बहुकल्प कुटिल तुलसीसे सपनेहु सुगति न लहते । जो पैं हरिजन ॥ ४ ॥ ( विनयपत्रिका पद ९०. )

ओव्या—– जंव श्रीहरी करुणाघन । लक्षिता दासाचें अवगुण । तरी जीव अवगुणनिधान । न होते तरण तयाचे ॥ २०९ ॥ नरक जिंकोनि स्वर्ग दिधला । परी पारिजातकार्थ इंद्र झुंजला । तथापि अनेक वेळ तयाला । अभयाचि दिधले ॥ २१० ॥ हठें झुंजला अर्जुन । परी तयाचेंचि सारथ्य करी आपण । वालीते सुगतिप्रदान । दिधली सुखें ॥ २११ ॥ जप यज्ञ तप योग । सोडोनिया कर्म सांग । वर्जोनि मुनि-संघ आणि स्वर्ग । गोकुळीं श्रीरंग गोपीगृहीं खेळे ॥ २१२ ॥ जरी भक्तांचा भजनप्रभाव । स्वयें न वाखाणिता देवराव । सिद्धीस न येतां गर्व-। पण दासांचा ॥ २१३ ॥ तरी कठिण कलियुगीं आमुचा कैसा । निर्वाह होता सहसा । जरी पुत्रनाम घेता जगन्निवासा । धांवणे न घडते अजामिलार्थ ॥ २१४ ॥ तरी आमुच्या नाकीं घालोनि वेसणी । यमदूत झोडते आह्मालागुनी । जंव भक्तरक्षकविरुद चरणीं । न बांधती देव ॥ २१५ ॥ तंव तुलसीदास ह्मणती आह्मासारिखे । कुटिल स्वप्नां-

तर्‍ही न भोगते सुखे । हे पद्करतिया वचन प्रशंसामात्र निके । परी सुरतरूकर्तिया साचची ॥ २१६ ॥ ह्मणोनि कृपाळु भगवंत । स्वयें ऐसेचि भागवत । तेंही वचन प्रमाणार्थ । ऐके आतां ॥ २१७ ॥

अहो बकी यं स्तनकालकूटं जिघांसया पाययदप्यसाध्वी ।
लेभे गतिं धात्र्युचितां ततोऽन्यं कं वा दयालुं शरणं व्रजेम ॥२३॥
( भागवत स्कं० ३ अ० २ )

अर्थ स्पष्टः–ययाचा विशेष अर्थ । मागां बोलिलाचि आहे समस्त । कीं पूतनेही मातृगतिदायक जो भगवंत । त्यावांचूनि कोण सेवावा ॥२१८॥ जयाची रुची जेणेंरीती । प्रभु तैसाचि होय तयाप्रति । हेही एक स्थिती । करुणेचीच ॥ २१९ ॥ आतां भयें आश्रयणीं होय वैरी । तरी भय कोणमाने धरावे अंतरीं । प्रेम कां धरूं नये निर्धारी । स्वर्गसुखदाते ॥ २२० ॥ येणें ईश्वराश्रयेंकरून । उन्मत्त होतील आघवे जन । तरी आपसांत मरोत उन्मत्त होऊन । परी लयाधारण परमात्माचि ॥ २२१ ॥ येणेंही आणि जगदुपादानें । भगवंतीं करुणा केणें । आगमोपदेशीं नाहीं उणे । सर्वगुरू तो ह्मणोनी ॥ २२२ ॥ "स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदादि"ति । पातंजलसूत्रोक्ति । ह्मणोनि अहेतुक दयामूर्ति । परमेश्वरू ॥ २२३ ॥ तंव शिष्य शंका करी येथ । कीं गुर्ववज्ञा शिष्य पतित । ईश्वर निजावज्ञाही उद्धरीत । यालागीं श्रेष्ठ सद्गुरूहूनि ॥२२४॥ श्रीगुरु ह्मणती ऐक उत्तर । निश्चयें वेदान्तानुसार । तुझिया मताचा अंगिकार । आह्मीही निश्चयें पैं केला ॥ २२५ ॥ परी ईश्वरसामान्यचैतन्यगताविद्या । सद्गुरूदीपावीण न निरसे आद्या । एवं एकसुखएकन्यूनवेद्या । येणें पडे ॥ २२६ ॥ ईश्वरी दया अधिक दिसे । सद्गुरुसामर्थ्य विशेष भासे । ह्मणवोनि गुरुईश्वरा अभेद उल्लसे । सुखप्रद साधका ॥२२७॥

जयाचेंनि कृपासलिले । जीवु हा ठावोवरी पाखाळे ॥
जे शिवपणही वोविळे । आंगीं न लवी ॥ ११ ॥
( अमृतानुभव अ० २ )

एवं तातवचनश्रुति । नितान्त गुरुवारिष्ठ बोलती । भगवद्दयाचि तयारीति । बोलिली तियेचि ग्रंथीं ॥ २२८ ॥

शिवाशिव समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमी ॥

घेपे दीजे एके आह्मी । ऐसें केलें ॥ ६३ ॥
आह्मी निखळ मा तुझे । वरी लोभें ह्मणसी माझे ॥
हें पुनरुक्त साजे । तूंचि ह्मणूनी ॥ ६५ ॥

(अमृतानुभव अ० ९)

एवं सद्गुरुवरिष्ठता । आणि भगवद्दयालुता । एकेपातीं सुखार्थी । बैसविली ॥ २२९ ॥ एवं शिष्यशंका निमालिया । प्रकृतभाव अनुसरलिया । विशेष निरूपणीं पुढलिया । अवधान होवावें ॥ २३० ॥ ह्मणूनि सर्वशक्ति आणि दयावंत । तुझिया इच्छेसम जरी नाहीं वर्तत । तरी स्वतंत्रचि भगवंत । आणि समर्थ असोनि त्वदिच्छान्वयें वर्तत तरी दयालुचि ॥ २३१ ॥ आतां तूंचि हें वदावें । त्वदिच्छानुसार देवें । सांग कवणेपरी वागावें । संसारकामुका ॥ २३२ ॥ तुझिया तंव मनीं । संसारकामना अनुदिनीं । तेथ सदैव संसारप्रदानीं । होवावें काय ईश्वरें ॥ २३३ ॥ तरी संसाराचा दुःखस्वभाव । तो जरी केलिया सुखस्वभाव । तरी मोक्षचि होईल सावेव । मग संसार राहे कोणीकडे ॥ २३४ ॥ संसारचि जंव नाहीं । तंव जीवेश कल्पना कायी । संसारी तंव तुह्मी । स्वयेंचि बद्ध ॥ २३५ ॥ मोक्षीं अभेद संसारी भेद । भेदबद्धा दुःख शुद्ध । वादी ह्मणे देव सिद्ध । पापक्षमा कां न करी ॥ २३६ ॥ सिद्धान्ती ह्मणे करावी कैसी । तूंचि सांग आह्मासी । पापप्रवृत्ति निरोधे क्षमा विशेषी । कीं पापप्रवृत्ति करूनि करावी क्षमा ॥ २३७ ॥ आद्यपक्ष मानितां । तरी दुःखें पापप्रवृत्ति रोधावी तत्वता । तें दयेसीचि न्यायशब्दता । देणें घडे ॥ २३८ ॥ सुखें रोधावी पापप्रवृत्ति । तरी ते सज्जनाचि उपदेश ऐकती । इतर सर्वथा नायकती । मूर्ख जीव ॥ २३९ ॥ हें पूर्वीच अनेक वेळ बोलिले । ह्मणोनि न्यायें अथवा दयेनें वहिले । जीव सन्मार्गी लाविले । स्वसुखार्थे भगवंतें ॥ २४० ॥ आतां पापप्रवृत्ति वाढवोन । पापक्षमा करावी पूर्ण । तरी देवाते कारण कवण । पापप्रवृत्ति बाढवावया ॥ २४१ ॥ वाढवितां पापप्रवृत्ति । तरी दुजिया जीवाची कां न वाढवावी पुण्यप्रवृत्ति । एकाचा उपमर्द श्रीपती । कवण्या रागें करील ॥ २४२ ॥ राग तंव ईश्वरास नाहीं । आणि भक्तार्थ राग जरी कल्पिलाही । तरी कोण तयासी पाही । दंडदाता उरे

॥ २४३ ॥ अभक्तासी तेणें कां न दंडावें । हे तुवां कां ह्मणावें । जरी तुज वाटे हरीनें तुझें ऐकावें । तरी तुवां न ऐकावें तयाचें कां ॥२४४॥ तो जरी दयालु होय । तरी तूं कां जाहलासीं निर्दय । तुझें मन जरी निरिच्छ होय । तरी देवासी आशा कवणाची ॥ २४५ ॥ तूं जरी म्हणसी मी समर्थ । तरी हें विश्व पाळी समस्त । नाहीं तरी निश्चित । दुःख भोगे आवडी ॥ २४६ ॥ देव न मानिसी उन्मत्ता । तरी तुज आली कंटकता । कां रोगचि तूं तत्वतां । विश्वासीया ॥ २४७ ॥ तया तुज निवारावया । वैद्य होणें यादवराया । उगी वटवट करिसी कासया । आणि करविसी मम करवीं ॥ २४८ ॥ चाल निघ येथूनि भांडा । नातरी चपेटे फोडीन तोंडा । आह्मासी तव व्रजराजविंडा । वांचूनि आधार आन नाहीं ॥ २४९ ॥ आतां फळें देतो कर्मानुसार । ह्मणोनि देव ह्मणावा परतंत्र । परी संसारींच कर्मानुसार । फल देतो गोविंद ॥ २५० ॥ जैसे स्वयें बाळ खेळतां । तरी योग्य खेळणें दे माता । आणि स्तनपान मागतां । भेद न करी ॥ २५१ ॥ तैसा संसारीं कर्मफलदाता हरी । भक्तांचा कर्मविपाक न गणी अंतरीं । हे त्रिपुरारहस्यीं हेमलेखा सुंदरी । बोलिली आहे ॥ २५२ ॥ तेहि येचि ग्रंथी । प्रसंगे ओळखिजे श्रोतीं । ह्मणवूनि स्वतंत्र दयालु विश्वपती । संशय निश्चितीं येथ नाहीं ॥ २५३ ॥ अत्यंत जीवातें परतंत्र करोन । जरी सुख देता भगवान । तरी ते होते दुःखाचिसमान । आणि न ये हा प्रश्नही आह्मावरी ॥ २५४ ॥ जीवेश्वर ब्रह्म जीवेश्वरभेद । अविद्या आणि तियेचा संबंध । हे अनादि मानतो प्रसिद्ध । पदार्थ सहा आह्मी ॥२५५॥ तेथ प्रतिबिंबापेक्षिकबिंबभूती । उपलब्ध अनुकूल शक्ति । येर सर्व मायावर्ती । बद्धपणें ॥ २५६ ॥ जैसा केवलान्वयी अनुमानीं । व्यतिरेकदृष्टान्त न सांपडे कोणी । कां कार्यलिंगक अनुमानीं । कारणक ते ॥ २५७ ॥ तैसे आविद्यक दृष्टान्ते अविद्या साधितां । शंका नयेचि गा सर्वथा । यालागीं स्वाप्नप्रतिबिंबापेक्षीं जेवि स्वाप्नगुरुत्व चिंतता । तेवि सर्वगुणसंपत्ति भगवंता जीवसुखार्थ ॥ २५८ ॥ तंव वादी ह्मणे ईश्वर अनेक कीं एक । सिद्धान्ती ह्मणे तो निश्चयें एक । जरी ईश्वर मानिलें अनेक । तरी अभिप्राय भिन्न होतील त्यांचे ॥ २५९ ॥ मग एके

अग्नीस उष्ण करावें । दुजियानें शीत कल्पावें । तेणें जगद्विरोधप्रसंग आघवे । पडतील येवोनि ॥ २६० ॥ वादी ह्मणे बहुत कीडे मिळोन । जैसे एक कार्य करिती निर्माण । तैसे बहुत ईश्वर मिळोन । जगन्निर्माण कां न घडे ॥ २६१ ॥ सिद्धान्ती ह्मणे हांसता हांसता । तुज लाज न वाटे शंका करिता । बहु कीडे मिळूनिही एक कार्य करितां । एक कीडा कार्यांशमात्रचि करी ॥ २६२ ॥ एक कार्य करिती बहु कीडे मिळोन । ईश्वराचे तंव समर्थ मन । तेणें संघाधीन । कां व्हावें ॥२६३॥ शहाणा म्हणोनि संघाधीन होणें । जरी बहु ईश्वर मिळोनि एक कार्य करणें । तरी गौरवदोष कासया घेणें । लाघवें मानणें एक ईश्वर बरें ॥ २६४ ॥ वादी ह्मणे ईश्वर व्यापक कीं अव्यापक । प्रथमपक्षीं भक्तासी साक्षात्कार कां विशेख । द्वितीयपक्षीं युगपत् तिन्ही लोक । उत्पन्न केवि करील तो ॥ २६५ ॥ सिद्धान्ती ह्मणे ईश्वर व्यापक । परी भक्ताची सत्वोपाधि देख । यालागीं प्रगटतां विशेख । होय तेथ ॥२६६॥ जैसा प्रभातें व्यापक दिनमणी । परी वन्ही उपजवी भेटतां सूर्यकांत-मणी । तैसा व्यापक परमात्मा भक्तांत:करणीं । प्रगट दिसे भक्तिस्व-भावें ॥ २६७ ॥ तंव वादी ह्मणे व्यापक देव । तरी कैसा निमित्त-कारणभाव । जगदुपादान ह्मणतां सर्व । क्षोभतील नैय्यायिकादि ॥२६८॥ सिद्धान्ती ह्मणे ऐक वचन । संयोगाचें उपादान । नैय्यायिकी बोलिले दोन । तेवि वेदान्ती उभयकारण गोविंद ॥ २६९ ॥ निरवयव सांश माया । निरवयव गुणांशी प्रधान मान्य सांख्यिया । निरवयव परमाणु बहुत मान्य नैय्यायिका या । आणि तदुपहित विभुत्व सकला मान्य ॥ २७० ॥ विभु परमेश्वर परमाणुयोगें । कीं विभु परमेश्वर प्रकृति-संयोगें । कां व्यापक ईश्वर मायायोगें । निमित्तोपादान घडे ॥ २७१ ॥ ह्मणोनि न्याय सांख्य वेदान्त । आयताचि घेती एक सिद्धान्त । मिथ्या ज्ञानजन्य धर्माधर्म समस्त । मान्य नैय्यायिकाही ॥२७२॥ अविवेकजन्य पुण्यपाप । सांख्यही मानिती अमूप । अध्यासजन्य पुण्यपाप । वेदान्ती ह्मणती ॥२७३॥ मिथ्याज्ञान अविवेक आणि भ्रांती । तीनही शब्द एकचि अर्थी । या लागीं न्यायसांख्यवेदान्तीं । यथार्थ भेद उपजेना ॥ २७४ ॥ भोग्य भोगसाधन भोगायतनें । हे भोगार्थ धर्माधर्माचे कारणे । ते धर्मा-

धर्म उत्पन्न होती मिथ्याज्ञानें । तरी मिथ्याज्ञानजन्य अवघे ॥ २७५ ॥ एवं नैय्यायिक बळेचि वेदान्ती । तरी सहज अविद्याजन्य कां न ह्मणावे प्रीति । अविद्या बाधी प्रतिबिंबाप्रति । यालागीं बिंबभूतीं उभयकारणता उपपन्न ॥ २७६ ॥ आणि अविद्या कल्पी अंतर्यामिता । परमार्थसूक्ष्मीं प्रातिभासिक स्थूलता । यालागीं परांचिया जीवांतर्यामी भगवंता । विरोधू नसे आमुचा ॥ २७७ ॥ सान हृदयाकाशी महत्स्वप्नब्रह्मांडाकाश । जैसें सूक्ष्म नाड्याकाश आधार स्वप्नस्थूलाकाशास । तैसा ईश्वर अंतर्यामी प्रातिभासिक जीवास । विरोध निःशेष येथ नाहीं ॥ २७८ ॥ तंव वादी ह्मणे ईश्वर सर्वकर्त्ता कीं अल्पकर्त्ता । आद्यपक्षीं आह्मा गृहादिकांचे श्रम कां वृथा । द्वितीयपक्षीं आमुच्यासारखी जीवता । न सोडी तया ॥ २७९ ॥

सिद्धान्ती उवाचः— परमेश्वरावर आक्षेप करणारा तूं नास्तिक आहेस असें वाटते. नास्तिक तीन प्रकारचे आहेत. १ प्रत्यक्षवादी, दुसरे अनुमानवादी व तिसरे आगमवादी. लोकायत हे प्रथम, बौद्ध दुसरे, व आर्हत तिसरे. यापैकीं कोणता नास्तिकांचा पक्ष घेऊन तूं पूर्वपक्ष करितोस ?

वादी उवाचः— मी आपल्या बुद्धीस अंकुश ह्मणून मुळींच देत नाहीं. मला जेव्हां ज्याचा पक्ष वाटला तेव्हां तो पक्ष घेऊन आक्षेप करणार.

सिद्धान्ती उवाचः— तर आह्मीही जसे होईल तसें हातानें, तोंडानें, खेटरानें, उत्तर देणार. परमेश्वर सर्वकर्ता आहे याविषयीं आमचा विवाद नाहीं. याविषयीं समाधान सांगतो. जी गोष्ट जीवाला करतां येत नाहीं, तिचाच कर्ता कोणी तरी साधावा लागतो. घटाचा कर्ता कुंभार, पटाचा कर्ता कोष्टी, व घराचा कर्ता वाढी, वगैरे प्रसिद्ध आहेत. ह्मणून जे जे कार्य आहे त्याला कर्ता अवश्य पाहिजे. या न्यायानें पृथिव्यादि जगताचा कोणी कर्ता अवश्य असला पाहिजे. जर कर्त्यावांचून पृथिव्यादिक उत्पन्न होतील तर घटपटादिक पदार्थही कर्त्यावाचून उत्पन्न झाले पाहिजेत, पण तसें होत नाहीं.

वादी उवाचः— विद्युदादिक पदार्थांचा कोणी कर्ता दिसत नाहीं,

ह्मणून पृथिव्यादिकांचाही कोणी कर्ता नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— दृष्टवस्तूवरून अदृष्टाची सिद्धी करावी हा यौक्तिक नियम असल्यामुळें, विद्युदादिक पृथिवीपर्वतादिकाप्रमाणें अदृष्टपक्ष्यांतच येतात; ह्मणून विद्युदादिकांचा दृष्टान्त देणें योग्य नाहीं. बरें तंतुवाय, कुलाल किंवा शिल्पी यानांही स्वस्वकार्य करण्याचें सामर्थ्य परमेश्वरप्रेरणेनेंच होते, असें आह्मी ह्मणतो. अन्यथा आंधळा कोष्टी, खुळा कुंभार, लंगडा वाढी कांहीं करूं शकत नाहीं. ईश्वरावांचून कर्म कांहीं करूं शकते याविषयींचे पुढें खंडण येणार आहे. तेव्हां कोठें स्वतः, कोठें जीवद्वारा असें ईश्वराचें कर्तृत्व दिसते. प्रथम आह्मी तुझ्या तर्काचा मात्र परिहार करितो.

वादी उवाचः— अहो! जर ईश्वर जगत्कर्ता आहे तर तो सशरीरी आहे कीं अशरीरी आहे? सशरीरी असल्यास त्याचे शरीर नित्य आहे कीं जन्य आहे? पहिल्यापक्षीं अव्यापक होईल, व दुसऱ्यापक्षीं एका ईश्वराला उत्पन्न करणारा दुसरा व दुसऱ्याला तिसरा अशी अनवस्था होते; व दुसरा पक्षही युक्त नाहीं, कारण अशरीरी कर्ता कोठेंही दृष्ट नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— नित्य सशरीरी कर्ता मानल्यासही अव्यापकपणाचा दोष येत नाहीं; कारण व्यापक व अव्यापक हे दोन्ही देशाचे अपेक्षेनें तूं ह्मणतोस, परंतु अल्पनाडीदेशांत ब्रह्मांडासारख्या देशाची कल्पना जीवाला देखील करतां येते. मग आमच्या सर्वशक्ति परमेश्वरानें तुझ्या ह्मणण्याप्रमाणें अव्यापक ह्मटलें तरी तशा शरीराच्या अल्पदेशांत अनंत ब्रह्मांडाची देशसहित रचना केल्यावर त्या रचनेंत जन्मलेला तूं परमेश्वराला अव्यापक ह्मणण्याला समर्थ होत नाहींस. कारण कार्य कारणाचा अभिभव करीत नसते. ही नित्यशरीरतेची गोष्ट झाली; पण जन्यशरीर मानून देखील दोष येत नाहीं. कारण परमेश्वराचें शरीर परमेश्वरानें स्वतः उत्पन्न केलें व जीवही आपले शरीर आपल्या मायेनें उत्पन्न करूं शकतो. या अनुभवाला जसा आत्माश्रयदोष बाधक नाहीं, त्याप्रमाणें भगवच्छरीरअनुभवालाही आत्माश्रयदोष बाधक नाहीं. अनुभवाहून भिन्नयुक्तीचे ठिकाणींच दोषाचा विचार

करावा लागतो. जसा अन्योन्याश्रय दोष आहे खरा, पण बीजवृक्षाचा अन्योन्याश्रय अनुभवजन्य असल्यामुळें दोष नाहीं; व दोष म्हटल्यास त्याचा परिहारही पण नाहीं. ज्याचा परिहार नाहीं त्याला दोष म्हणतां येत नाहीं, व ज्याचा बाध नाहीं त्याला भ्रम म्हणतां येत नाहीं.

वादी उवाचः– अहो जगताच्यापूर्वी एकटाच परमेश्वर होता कीं दुसरे कांहीं होते ? एकटा परमेश्वर होता तर तो हे जगत् स्वतःच झाला कीं आपल्याहून भिन्न निर्माण केले ? स्वतःच झाला म्हणाल तर सुखदुःख सर्व परमेश्वरच झाला म्हणावयाचा; आणि आपल्याहून भिन्न निर्माण केले असें म्हणाल, तर तो सर्वव्यापक असल्यामुळें त्याच्याहून रिक्त जागाच असणें संभवनीय नाहीं. किंवा आपल्या शक्तीनें त्यानें हें निर्माण केले, असें म्हणाल तर ती शक्ति परमेश्वरासी भिन्न आहे कीं अभिन्न आहे ? पुनः ती शक्ति चेतन आहे कीं जड आहे ? पुनः नित्य आहे कीं अनित्य आहे ? अशी अनेक प्रश्नपरंपरा तुमच्या माथ्यावर येऊन आदळते.

सिद्धान्ती उवाचः– ही प्रश्नपरंपरा सर्वांच्या माथ्यावर येऊन आदळते, कारण हा स्वपक्षदोष आहे. जेथें दोष व परिहार सारखेच असतात, तेथें एकानें दुसऱ्यास प्रश्न विचारणें योग्य नाहीं. प्रत्यक्ष दिसते ते कसे ? प्रमाणप्रमेय समकालीन आहे कीं तेथें कालाची उत्पत्ति होते ? पूर्वी चार भूतांचा संयोग होऊन जे चैतन्य उत्पन्न होते ते काय त्याच्याशीं भिन्न होते कीं अभिन्न होते ? अभिन्न होते तर मग जड व चैतन्य म्हणण्यांत अर्थ काय ? भिन्न मानल्यास ते जड कीं चेतन ? पुनः नित्य कीं अनित्य ? आणि जडाहून चेतन भिन्न मानल्यास नास्तिकवाद कसा सिद्ध होतो ? तसा तो नित्यचैतन्य मानल्यासही सिद्ध होत नाहीं; आणि अनित्य चेतन मानल्यास त्याची उत्पत्ति सिद्ध झाल्याशिवाय नाश सिद्ध होणार नाहीं. त्याची उत्पत्ति मानल्यास ते उत्पत्तिपूर्वी सत् होते कीं असत् होते ? पहिल्यापक्षीं नास्तिकवाद सिद्ध होत नाहीं, व दुसऱ्यापक्षीं एकवेळ असत् हें सद्रूपानें उत्पन्न झाले तर पुनःही कशावरून उत्पन्न होणार नाहीं ? म्हणून पुनर्जन्म सिद्ध होत असल्यामुळें, नास्तिकवाद सिद्ध होत नाहीं. आतां

पुनः उत्पन्न होणार नाहीं याविषयीं साधक प्रमाण वादीपाशीं नाहीं. पण एक वेळ असद्रूपानें उत्पन्न झाले असेल तर पुनः कशावरून उत्पन्न होणार नाहीं, असें तुझ्या मताला बाधकप्रमाण तर प्रतिवादी जवळ आहे, म्हणून नास्तिकवाद सिद्ध होत नाहीं. प्रमाणावांचून जर वाद सिद्ध करतो म्हणशील तर सर्व वादी आपआपला वाद सिद्ध करतील. याप्रमाणें तूं आम्हाला केलेले प्रश्न तुझ्यावरही येतात. तूं जो त्याचा परिहार करशील तोच आमचाही आहे.

वादी उवाचः— अहो ! पण एका चैतन्याचा अभाव झाल्यावर पुनः तेच उत्पन्न होईल कशावरून ? दुसरे होईल. दुसरे खुशाल उत्पन्न होवो, त्याबद्दल आमचा कांहीं वाद नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— अरे ! भावाचे ठिकाणीं एक दोन तीन चार अशी संख्या राहते, अभावाचे ठिकाणीं राहत नाहीं. अभाव सर्वदा एकच असतो. प्रतियोगीभेदानें किंवा अधिकरणभेदानें त्याचा भेद होतो. म्हणून अभावांतून आलेली वस्तु पुनः तीच तीच आली असली पाहिजे. एवढ्याकरितां तेच चैतन्य पुनः उत्पन्न होते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वादी उवाचः—या तुमच्या तर्काला बाधक तर्क विद्यमान आहे, कारण घटाचा ध्वंस झाल्यावर तोच घट उत्पन्न होतो, असें तुम्हालाही म्हणतां येणार नाहीं; आणि तसें मानल्यास युगपत् अनंत घटाची अनुपपत्ति होईल. चैतन्यही अनेक पुरुषाचे ठायीं अनेक आहेत, म्हणून ध्वस्तचैतन्य पुनः उत्पन्न होते हें म्हणणें सम्यक् नाहीं; आणि घटाचा ज्याप्रमाणें मृदादिकाचे ठायीं प्रागभाव तुम्ही म्हणता, त्याप्रमाणें चैतन्याचाही चार भूतांचे ठिकाणीं आम्ही प्रागभाव मानतो.

सिद्धान्ती उवाचः— ध्वंसाला नैय्यायिक जसें सादि व अनंत मानतात, तसें आम्ही मानीत नाहीं; कारण ते युक्तीनें सिद्ध होत नाहीं. घटध्वंसाधिकरण कपालांची कांहीं दिवसानीं माती झाल्यावर पुनः तीच माती कुलालाचे हातीं सांपडल्यास त्यापासून जो घट होईल तो पूर्वीचा नाहीं म्हणण्याला काय प्रमाण आहे. त्या मृदापन्नघटध्वंसाधिकरणकपालाचेठायीं अन्य भविष्यत् घटाचा प्रागभाव कल्पण्यांत गौरव आहे; व

पूर्वघटोत्पत्ति कल्पण्यांत लाघव आहे. यद्यपि दैवयोगानें ती माती कुंभाराचे हातीं येईलच किंवा येणारच नाहीं असा निश्चय सांगतां येत नसल्यामुळें संशय शेष राहतो, तथापि अभर्जितमृदुत्पन्न घटाचे ठायीं किंवा धात्वादुत्पन्न घटाचे ठायीं आम्हाला आमचें म्हणणें प्रत्यक्ष करून दाखवितां येतें; तसें तुला तुझें म्हणणें प्रत्यक्ष करून दाखवितां येत नाहीं, म्हणून ध्वस्तचैतन्य पुनः उत्पन्न होण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. हे लोकायतबंधो ! तुझेच बंधू दुसरे बौद्ध आहेत ते आमच्या पक्षाचे नसूनही पंचस्कंधाचा ध्वंस झाल्यानंतर कर्मानें पुनः त्याचा मेळ होऊन जन्म होतो असें ते मानीत असतात. तेव्हां तुमच्या तुमच्यांतच भांडण असल्यामुळें तुझें मत समीचीन नाहीं.

वादी उवाचः— अहो ! आम्ही चार्वाक प्रत्यक्षप्रमाणावांचून इतर कोणतेच प्रमाण मानीत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— वा ! फार चांगलें बोललास. मग तर मला तुझें म्हणणेंच ऐकूं येत नाहीं, असें मला स्पष्ट म्हणतां येते. कारण मला तुझें म्हणणें ऐकूं येते असें मानण्याला तुजपाशीं कांहीं प्रत्यक्ष प्रमाणच नाहीं; आणि तूं नाहींस असें मला स्पष्ट म्हणतां येते. कारण तूं आहेस हें सिद्ध करून देण्याकरितां तुजपाशीं कांहींच प्रमाण नाहीं.

वादी उवाचः— अहो ! पण तुमचे कान मला प्रत्यक्ष दिसतात, व तुम्ही मला प्रत्यक्ष दिसता, म्हणून मीही तुम्हाला प्रत्यक्ष दिसलो पाहिजे; आणि मला तुमचा शब्द ऐकूं येतो, म्हणून तुम्हालाही माझा शब्द ऐकूं येत असला पाहिजे.

सिद्धान्ती उवाचः— कान झोंपेतल्या मनुष्याचेही दिसतात व बहिरे मनुष्याचेंही दिसतात. पण त्यानां शब्द ऐकूं येत नसतात. दुसरे मला ऐकूं येते म्हणून तुम्हाला ऐकूं येत असलें पाहिजे हे प्रत्यक्ष नव्हे, याला अनुमान म्हणतात. शिवाय चार भूतांच्या मेळापासून, मादकद्रव्यापासून जसा मद उत्पन्न होतो तसें, चैतन्य उत्पन्न होते हेंही अनुमानच आहे, प्रत्यक्ष नव्हे; आणि आत्म्याचा ध्वंस झाल्यावर तो ध्वंस अनंत राहतो, याविषयीं प्रत्यक्ष कांहीं नाहीं; कारण प्रत्यक्षप्रमाण अनंत भूतभविष्यत्कालिक विषय करीत नाहीं तर ते वर्तमानकालालाच

विषय करीत असते. अथवा तुझ्या आत्म्याचा भविष्यत् ध्वंस होईल तेव्हां होवो, पण सध्या जो तुझा आत्मा उत्पन्न झाला आहे तोही भूतापासूनच उत्पन्न झालेला आहे; तेव्हां त्या भूतांचे ठिकाणीं त्याचा काय प्रागभाव होता कीं ध्वंस होता ह्मणतोस? प्रथमपक्ष मानल्यास तुला नैय्यायिकमताचा स्वीकार करावा लागेल, व आह्मी त्याचे उत्तर दिलेच आहे; आणि द्वितीयपक्ष स्वीकारशील तर ध्वंसापासून उत्पन्न झाला जो तुझा आत्मा, तो पुनःही कशावरून उत्पन्न होणार नाहीं, हा प्रश्न तुझ्यावर येतो. अमुक पदार्थाचा अशा प्रकारचा स्वभाव आहे, व तो तिन्ही कालीं तसाच राहणार हा निश्चय प्रत्यक्षजन्य नाहीं; तर अनुमानजन्य आहे. ह्मणून प्रत्यक्षप्रमाणानेंच सर्व व्यवस्था लागत नाहीं.

वादी उवाचः— पण तिन्हीकाळीं अमुक गोष्ट निश्चित राहील हें तुह्माला तरी कसें सांगतां येते?

सिद्धान्ती उवाचः— आह्माला सांगतां येवो वा न येवो, पण तुला प्रश्नच करितां येत नाहीं; कारण तूं प्रत्यक्षवादी आहेस, व तिन्ही काल कोणाला प्रत्यक्ष नाहींत. यास्तव 'तिन्ही कालीं' अशाप्रकारचा शब्द तूं उच्चारणें व्याघातास्पद आहे.

वादी उवाचः— प्रत्यक्षप्रमाण दोन प्रकारचे आहे. लौकिक व अलौकिक. यद्यपि लौकिकप्रत्यक्ष सन्निहितदेशकालावच्छिन्न वस्तूलाच विषय करीत असते, तथापि अलौकिकप्रत्यक्ष असन्निहितदेशकालावच्छिन्न वस्तूला विषय करिते. जसें घटव्यक्तीस विषय करणारे प्रत्यक्ष लौकिक असल्यामुळें, सन्निहितदेश व वर्तमानकालावच्छिन्न घटालाच ते विषय करिते; परंतु घटत्वजातीस विषय करणारे प्रत्यक्ष अलौकिक असल्यामुळें, असन्निहितदेशकालावच्छिन्न घटत्वजातीस ते विषय करिते, कारण "एकत्वे नित्यत्वे सत्यनेकसमवेतत्व" हे जातीचे लक्षण ठरलेले आहे. ह्मणूनच जाती, भूतभविष्यत्वर्त्तमानसमीप सर्व घटाचे ठिकाणीं राहते. आतां भूतभविष्यत् घटाचें, वर्तमानघटत्व अनुमापक आहे असेंही ह्मणतां येत नाहीं; कारण वर्तमानघटत्वाला हेतुदृष्टान्ताप्रमाणें साध्यभिन्नत्व नाहीं, तर भूतवर्त्तमानभविष्यत् घटत्व मिळून एकच जाती आहे. तसें जातीचें ज्ञान, शब्दप्रमाणजन्यही नाहीं. कारण परोक्ष

पदार्थाचे ठिकाणीं शाब्दप्रमाणाची प्रवृत्ति होते, आणि घटत्वजाती तर प्रत्यक्षघटाचे ठिकाणींही राहते. सन्निहितदेशकालावच्छिन्न, घटावरचे घटत्व प्रत्यक्ष असून असन्निहितदेशकालावच्छिन्न घटावरचे घटत्व, अनुमान करितां शब्दप्रमाणगम्य आहे असाही एक पक्ष काढतां येणार नाहीं, कारण घटत्वैकत्वच त्याला बाधक आहे. ह्मणून घटत्व प्रत्यक्षच आहे व ते अलौकिक आहे. त्याप्रमाणें आत्मध्वंसही अलौकिकप्रत्यक्षगम्य असून त्रिकालाबाधित आहे असें आह्मी ह्मणू शकतो.

सिद्धान्ती उवाचः—– हें ह्मणणें योग्य नाहीं. कारण याविषयीं बाधक प्रमाण दाखविलें आहे. शिवाय अभाव, अलौकिकप्रत्यक्षगम्य कोणी मानीत नाहींत, आणि जे जे अलौकिकप्रत्यक्षगम्य असते त्याचें अधिकरण उत्पत्तिविनाशवान् असते; आणि ते स्वतः उत्पत्तिविनाशवान् नसते. जसें घटत्व. पुनः जी जी वस्तु अलौकिकप्रत्यक्षगम्य असते ती ती वस्तू केवळ भविष्यत्कालावच्छिन्नच नसते; जसें घटत्वजाती केवळ भविष्यत् घटाचे ठिकाणींच राहते असें नाहीं, तर भूतघटाचे ठिकाणींही राहते; आणि तूं दिलेले उदाहरण सामान्यलक्षणसन्निकर्षापैकीं जातिसंबंधी सन्निकर्षाचेच आहे. तेव्हां ज्ञानलक्षणअलौकिकसन्निकर्षाचा व योगजलक्षणअलौकिकसन्निकर्षाचा, तूं नास्तिक असल्यामुळें, तुझें ठिकाणीं अंगिकार नाहीं, हें साहजिकच आहे. जातिप्रत्यक्षाप्रमाणें अलौकिकसामान्यप्रत्यक्षगम्य जर आत्मध्वंस मानशील, तर तुझा पूर्वीचा ध्वंस तुला मानला पाहिजे, व सध्यांही तुझा ध्वंस तुला मानला पाहिजे. कारण जातिप्रमाणें तो एकच असला पाहिजे; व तसें मानल्यास आतां जसा तूं उत्पन्न झालास, तसा पुनः होशील हा प्रश्न येतो. ज्ञानलक्षणअलौकिकप्रत्यक्ष तर तुला मानतां येत नाहीं, कारण त्याचे योगानें त्रैकालिक आत्मध्वंसाची सिद्धि होणें शक्य नाहीं; आणि योगजअलौकिकप्रत्यक्षही मानतां येणार नाहीं, कारण योग यमनियमादिधर्मसाध्य आहे, व धर्म तुला नास्तिकाला मान्य नाहीं. शिवाय ज्या अलौकिकप्रत्यक्षज्ञानानें आत्मध्वंस सिद्ध करूं पाहतोस, त्या अलौकिकप्रत्यक्षानेंच अतींद्रियआत्म्याचे ठिकाणीं आत्मत्वजातीही सिद्ध होत नाहीं. ह्मणून तुझें हें प्रमाण तुला व्याघातास्पद

आहे; आणि ध्वंस विशेषणतासंबंधेकरून अलौकिकप्रत्यक्षाचा विषय आहे? किंवा अनुपलब्धिप्रमाणाचा विषय आहे? अलौकिकप्रत्यक्षाचा विषय कोणीही त्याला मानीत नाहीं; आणि काल विभु असून एक आहे, ह्मणून त्याचे ठिकाणीं कालत्वजाति मानतां येत नाहीं. भूतत्व भविष्यत्व इत्यादि उपाधि आहेत. त्या सर्व तुला प्रत्यक्ष नाहींत. एवढ्याकरितां अलौकिकप्रत्यक्षगम्य सहकारी तिन्ही काल तुला मानतां येणार नाहींत. तात्पर्य जातीप्रमाणें अलौकिकप्रत्यक्ष घेऊनही तुझें नास्तिकत्व सिद्ध होत नाहीं. शिवाय देहांत चैतन्य आहे हें मानसप्रत्यक्ष जसें तुजपाशीं प्रमाण आहे, तसें माझा देह आहे हे देहभिन्नप्रमाणाविषयींही मानस-प्रत्यक्ष सर्वांजवळ आहे. आतां या ज्ञानाला जर तूं भ्रम ह्मणशील तर तुझ्याही ज्ञानाला आह्मी भ्रम ह्मणतो. शिवाय आमच्या देहभिन्नआत्म-मानसप्रत्यक्षाला स्वप्नादिजन्य अनुमान सहकारी आहे, आणि तुझ्या देहात्ममानसप्रत्यक्षाला चाक्षुषप्रत्यक्षादि कांहीं सहकारी नाहीं. उलटे देहभिन्नआत्ममानसप्रत्यक्ष प्रतिपक्षरूप आहे, आणि अनुमानादिके करून बलवत् झालें आहे. पुनः स्वप्नादिकांचे ठिकाणीं देहाहंताभ्रम जसा उत्पन्न होतो, तसा देहममताभ्रम होत नाहीं; तर तो केव्हांही विचारजन्य असतो; ह्मणजे देह माझा आहे हें ह्मणण्याला थोडासा विवेक लागतो; ह्मणून मी देह आहे हें ज्ञानच भ्रमरूप असूं शकते. माझा देह आहे हें ज्ञान भ्रमरूप असूं शकत नाहीं. यद्यपि ममत्वज्ञानही अध्यास आहे, तथापि वेदान्तबाध्य आहे, लोकायतबाध्य नाहीं. लोकायतमतच उलटे देहममत्वाध्यासबाध्य आहे. याप्रमाणें त्वां आह्माला केलेले प्रश्नही तुझ्यावर येतात, व तुझें मतही सिद्ध होत नाहीं. शिवाय आत्मा स्थायी न मानल्यास अकृताभ्यागम व कृतप्रणाशादि दोष तुझ्या मतावर येतात. पुनः अमुक गोष्ट सत्य हें सिद्ध करण्याला प्रत्यक्षप्रमाण पुरे नाहीं; कारण जेवढ्या क्षणावर प्रत्यक्षाची व्याप्ति होते, तेवढ्या क्षणांत भ्रमजप्रत्यक्षही होऊं शकते. आतां अबाधितप्रत्यक्षानें भ्रमजप्रत्यक्ष बाधित आहे, असें तुला म्हणतां येणार नाहीं; कारण हे प्रत्यक्षबाधित आहे असें ज्ञान प्रत्यक्षानें होत नसून मनानें होते. मानसप्रत्यक्ष तुला ग्रहण करतां येत नाहीं, देहाहून भिन्न आत्मा व मन इत्यादि मानीत नाहींस ह्मणून. हे

मूर्खे लोकायतबंधो ! तुला समजून देण्याकरितांच बुद्धि, सुख, दुःख, इच्छा इत्यादि आत्म्याचें गुण नैय्यायिकाला मानावे लागले आहेत. कारण देहाहून आत्मा निराळा आहे हें मानण्याची तुला संवय नसल्यामुळें तुह्मा लोकायतांनां निर्विकार आत्म्याची प्रतिपत्ति होणें दुर्घट झालें आहे. ह्मणूनच अध्यस्त इच्छादिकांचा देखील आत्म्याचे ठिकाणीं गुणत्वरूपानें व्यवहार स्थापित करून इच्छाद्वेषादिविकारसहित आत्म्याला देहाहून पृथक् करून भगवान् अक्षपाद व भगवान् कणादाचार्यांनीं दाखविलें.

न्यायसूत्र– " इच्छाद्वेषप्रयत्नसुखदुःखज्ञानान्यात्मनोलिंगं. "

इच्छा, द्वेष, प्रयत्न, सुख, दुःख, ज्ञान हे आत्म्याचें लक्षण आहे; अथवा आत्म्याला कळविणारे अनुमान आहे, यावर स्वकृतभाष्य.

इच्छादीनां बहुवचनात् आत्मनश्चैकवचनात् तद्गुणाभिन्नत्वमात्मन उपलक्ष्यते । ते च गुणा खल्वनित्या बहुषु न्यायग्रंथेषूक्ताः । तस्मात् तद्व्यतिरिक्ते आत्मनि सिद्धेऽपि तदेकत्वप्रतिपादनं दुर्जनतोषन्यायात् चार्वाकसंबोधनमेव न तु प्रतारणम् इति द्वितीयोऽर्थः तत्र आद्येन प्रत्यक्षवादि संबोधनम् ।

सूत्रांत इच्छादिकांचे बहुवचन असून आत्म्याचें एकवचन आहे. यावरून इच्छादिकांहून भिन्न त्यांचा आश्रय आत्मा भिन्न आहे असा आशय दाखविला आहे. ' लिंग ' शब्दाचा अर्थ ' लक्षण ' आणि ' अनुमानाचा हेतू ' असे दोन होतात. पैकीं प्रत्यक्षवादीला प्रत्यक्षानें पटवून देण्याकरितां ' लक्षण ' हा लिंग शब्दाचा अर्थ घेणें सूत्रकारास विवक्षित आहे, आणि प्रत्यक्षवाद्याचा अनुमानांत प्रवेश करून देण्याकरितां अनुमानअवयवप्रकारही ' लिंग ' शब्दाचा अर्थ सूत्रकारास विवक्षित आहे.

पूर्वपक्षीः– तर मग नैय्यायिकांनीं यथार्थ न सांगतां आह्मा चार्वाकाशी प्रतारणाच केली म्हणावयाची ? माहात्मेही जर प्रतारणा करितात तर आम्ही नास्तिक बरे. वरवर चांगलेपणा दाखवून आंत वाईट वागणारे हे ऋषी ढोंगी आहेत. मळमळित सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य उत्तम, असें आमचे सत्यप्रतिज्ञांचे मत आहे.

उत्तरपक्षी:— व्यभिचारिणीच्या पुत्राला किंवा वेश्यापुत्राला जसें बापाचे महत्व वाटत नसते, तसें नीचांनो ! तुम्हाला ऋषींचे महत्व वाटत नाहीं. निर्विकार आत्म्याची तुम्हासारख्या नीचांनां प्रतिपत्ति होत नाहीं हें आम्ही वरच सांगितलें. लहान लेंकराकारितां बाप असंस्कृतभाषेनें बोलला असतां, जसें गौण होत नाहीं, तर उलटें बालाचें रंजन करणारा होतो, तद्वत् तुह्मा बालांचे रंजन करण्याकारितां वेदान्ती व सांख्यापेक्षां आपल्याकडे लहानपणा घेऊन भगवान् अक्षपादाचार्य व कणादाचार्य या माहात्म्यांनीं तुम्हाला देहाभिन्न आत्मप्रतिपत्ति करून दिली आहे. परंतु तुम्ही त्यानें संतुष्ट होत नाहीं. वाल्मिकीरामायणांत जाबालीला जे श्रीराम बोलले तेंच तुम्हाला योग्य आहे असा माझाही आतां निश्चय झाला आहे. पुनः अक्षपादाचार्यांनीं व कणादाचार्यांनीं, हे इच्छादीक गुण अनित्य सांगितले आहेत, नित्य सांगितले नाहींत. तेव्हां त्या गुणांचा नाश झाला असतां आत्मा निर्विकार तसाच राहतो, असा सांगण्याचा त्यांचा सूक्ष्म आशय सिद्ध होत नाहीं काय ?

वादी उवाच:— आशय कोणताही सिद्ध होवो, पण तेवढ्यानें आत्मा जड मात्र सिद्ध होतो; आणि तसेंच कांहीं वेदान्ती, नैय्यायिक आत्मा जड मानतात, असें म्हणणारे आहेत.

“ प्राभाकरास्तार्किकाश्च प्राहुरस्याचिदात्मताम् ॥
आकाशवत् द्रव्यमात्माशब्दवत्तद्गुणश्चितिः ” ॥ ८८ ॥

पंचदशी चित्रदीप श्लो. ८८

भावार्थ:— प्रभाकरनामक भट्टमीमांसकांचा एक शिष्य होता. त्यानें गुरूपेक्षां जरा निराळ्या रीतीनें आपलें मत स्थापन केलें. त्याच्या अनुयायांनां प्राभाकर म्हणतात. तार्किकन्यायशास्त्राचा अभ्यास करणारे नैय्यायिक यांचे असें ह्मणणें आहे कीं, आत्मा हा द्रव्य आहे, अर्थात् तो आकाशाप्रमाणें जड असून गुणवान् ह्मणजे गुणाचे अधिष्ठान आहे. आकाशाचा शब्द जसा विशेषगुण आहे, तसाच चैतन्य त्याचा विशेषगुण आहे. या आमच्या ह्मणण्याला आह्माला इष्ट असलेले अनुमानप्रमाणही आहे. कोठें ह्मणाल तर पहा. आत्मा हे द्रव्य आहे, कारण ते गुणवान् आहे. जे जे गुणवान् असते ते ते द्रव्य अशी व्याप्ति आहे. याला

दृष्टान्त आकाशाचा आहे. अकाश शब्दगुणवान् असल्यामुळें, द्रव्य आहे असें सिद्ध होतें. त्याचप्रकारें आत्म्याचा प्रकार आहे. या अनुमानानें आत्मा द्रव्य आहे असें सिद्ध झाल्यानंतर जे जे द्रव्य ते ते अचित् अशा व्याप्तीवरून त्याच्या अचिद्रूपाची सिद्धी होते. सारांश आत्मा अचित् आहे. (पंचदशी, बापट भाषांतर). एवं वेदान्तवाक्य-मतानेंही तर नैय्यायिक आत्म्याला जड मानणारे आहेत. तर मग जडापासून जड आत्म्याची उत्पत्ति होते असें मानणाऱ्या आमचा निषेध कां करितां ?

सिद्धान्ती उवाचः— श्लोकांत तार्किका असें पद आहे. ते गौतम किंवा कणादऋषीला अनुसरून नसून त्यांचे मत न समजून अंगिकार करणाऱ्याला अनुसरून आहे; किंवा "आनंदो विषयानुभवो नित्यत्व-मिति संति धर्माः अपृथक्त्वेऽपि चैतन्यात्पृथगिवावभासंते" अभिव्यक्त-ज्ञानाची संपादक वृत्ति आहे असें ह्मटलें आहे; आणि सर्वव्यापक चेतन ज्ञान नसून वृत्तिमत् चेतनच ज्ञान आहे, व चैतन्याचे ठिकाणीं ज्ञानत्वव्यवहारसंपादक वृत्ति आहे असें अद्वैतकौस्तुभ व वृत्तिप्रभाकरादि वेदान्तग्रंथांत ह्मटलें आहे. तेव्हां अभिव्यक्तज्ञानरहितत्वच नैय्यायिकाचे जडसाम्यत्व घेतल्यास वेदान्ताचा व न्यायाचा समन्वय होतो. याप्रमाणें ईश्वराचे ठिकाणीं सुखदुःख उत्पन्न होण्याची समवायसंबंधेंकरून जी स्वरूपयोग्यता नैय्यायिक सांगतात, ती देखील अनुप्रवेशरूप जीवपरंपराद्वारा संभवनीय मानली, तर वेदान्ताशीं विरोध येत नाहीं; ह्मणजे परमेश्वराला जर अविद्येचा संबंध होईल तर सुखदुःख त्यालाही होतील, पण त्याला मिथ्याज्ञान नसल्यामुळें, धर्माधर्म उत्पन्न होत नाहींत, ह्मणून सुखदुःख होत नाहीं, असें ह्मणतात. ह्मणूनही मिथ्याज्ञानाला अविद्या ह्मणण्याला आह्मी विशेष प्रत्यवाय समजत नाहीं, ह्मणूनही न्यायाचा व वेदान्ताचा समन्वय आहे. यद्यपि मुक्तींतही विभुत्व व विभु आत्म्याचें नानात्व विशेषाच्या व्यावर्तकत्वावरून न्यायमतांत सिद्ध आहे, तथापि तो विशेष इच्छादिलिंगसाध्य आहे, आणि ते लिंग तर अनित्य आहे, ह्मणून मुक्तींत विभु आत्म्याचे नानात्व सांगणें बालतोषणमात्रच असल्यामुळें वेदान्ताचा व नैय्यायिकांचा विरोध नाहीं. तात्पर्य, वेदा-

न्ताचा आश्रय करून तुला आपल्या नैय्यायिकशत्रूवर घाव घालतां येणार नाहीं. शिवाय तुझ्याशीं प्रसंग पडल्यावर आपसांत भांडणारे हे न्यायवेदान्तादि शास्त्रें एक होत असतात, हें तुला माहीत नाहीं. यद्यपि आत्मपुराणांत विधिमुखप्रत्ययीवाक्यापेक्षां निषेधमुखप्रत्ययी वाक्यांची वरिष्ठता दाखवितानां, तुझ्या मताचा आश्रय करून पूर्वपक्षाला अडविलें आहे, तथापि तेथें तुझ्या मताचे बाधकतर्केही दाखविले आहेत; आणि आपल्याला व पूर्वपक्षाला इष्ट आहेत असें ह्मटलें आहे, व तुझी उपेक्षा करून अधिक्षेप केला आहे; ह्मणून तुला वेदान्ताचा आश्रय करितां येत नाहीं.

मध्यस्थ उवाचः— अहो ! तुह्मी तत्पद ईश्वराची सिद्धि करीत असतां, ह्या मध्येच त्वंपद जीवाचा विचार चालविला आहे, अशानें विषयान्तर होत आहेना.

सिद्धान्ती उवाचः— विषयांतर होते खरे, पण काय करावें, या नास्तिकानीं त्वंपदजीवाचेच बाहुल्यत्वेंकरून त्वंपदजीवाचाच तिरस्कार दाखवून, त्यावरूनच तत्पदईश्वराची थोडीशी असिद्धि दाखविली आहे. ह्मणून त्वंपदजीवाची सिद्धि करतानांच त्यांच्या मताची परीक्षा करून, किंवा त्यांच्या मताची परीक्षा करतानां आवश्यक तेवढी त्वंपदाची सिद्धी करून तत्पदईश्वराविषयीची परार्थानुमिती साधणें आह्माला भाग पडते. आणखी अशानें दुर्मतहृदयभंजननामक ग्रंथ जो मला करावयाचा आहे, त्याचेही कार्य भागल्यास माझे श्रम राहतील इकडे मी पाहतो. शिवाय नास्तिकानें दिलेले प्रत्यक्षप्रमाण त्वंपदजीवाचाच विशेषेंकरून आश्रय करिते, तत्पदईश्वराचा नाहीं; परंतु हे आश्रयाला जाणत नाहींत. ज्या इंद्रियांच्या भरंवशावर यांचे प्रत्यक्ष आहे, ती इंद्रिये देखील अतींद्रियच आहेत, हे चरकाचार्यांचे ह्मणणें देखील यांनां समजत नाहीं. आकाशाचे ठिकाणीं नीलिमेप्रमाणें प्रत्यक्षाभासाचाच यानीं आश्रय केला आहे. कारण विचार करणें देहभिन्नमनावांचून संभवत नाहीं. ह्मणून या लोकायतांचे ह्मणणें अगदीं असंगत आहे.

शिष्य उवाचः— भगवन् ! माझेंही मत असेंच आहे, परंतु सूतसंहितेंत चार्वाकमत देखील शंकरानेंच निर्माण केलें आहे, असें

सांगितलें असून, तर्कानें त्याचे खंडण करूं नये असा त्याचा निषेधही केला आहे; आणि हे मत बृहस्पतिप्रणीत आहे असें अन्यपुराणांत ह्मटलें आहे. तेव्हां या मताला आगमत्व येत नाहीं काय ? नाहीं तर शंकर व बृहस्पति अनाप्त ठरतील.

श्रीगुरू उवाचः— तूं सच्छिष्य असल्यामुळें आगमरक्षक प्रश्न करणें तुला उचितच आहे. परंतु माहात्म्यानीं जे चार्वाकदर्शन निर्माण केलें आहे, त्याचा आशय असा आहे कीं, धर्मपुरुषार्थाला मुकणारे मूर्ख मोक्षपुरुषार्थाला तर मुकणार, परंतु अर्थकामाला देखील मुकणार. उन्मत्त व दुःखी होऊन भलतेच करीत फिरणार. ह्मणून त्यांच्यावर दया करण्याकरितां अर्थकामपुरुषार्थ निश्चित धरून ठेवावे, ह्मणजे आपल्या देहाला सुखदुःख होतात, तसे दुसऱ्याचेही देहाला होतात, इतका तरी धर्म व सामाजिक प्रेम साधतां येईल, अशा आशयानेंच माहात्म्यानें चार्वाकदर्शन केलें आहे. स्वामीविद्यारण्यही सर्वदर्शनसंग्रहांत असेंच ह्मणतातः—

प्रायेण सर्वे प्राणिनस्तावत् "यावज्जीवं सुखं जीवेन्नास्तिमृत्योरगोचरः । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः" इति लोकगाथामनुसंधाना नीतिकामशास्त्रानुसारेणार्थकामावेव पुरुषार्थौ मन्यमानाः पारलौकिकमर्थमपन्हुवानाश्चार्वाकमतमनुवर्त्तमाना एवानुभूयन्ते"

भावार्थः— बहुधा सर्व प्राणि नीतिशास्त्राला अनुसरून नीतिशास्त्रान्वयें अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ मानून, मरण आले नाहीं तोंपर्यंत सुखानें वाचावे; मेल्यागेल्यावर कोण कोणाचे असें ह्मणत असतात. ते सर्व चार्वाकदर्शनाचा अनुभवच घेत आहेत इति. पुनः दुःखी होण्यापेक्षां इहलोकचे तरी सुख भोगावे ही तरी त्या माहात्म्यांची या मूढावर दयाच आहे, आणि इहलोकच जर साधावयाचा आहे तर तेवढ्याच करितां धर्माचेमागे लागणें ठीक नाहीं. धर्माचें फळ याहून कांहीं उच्च आहे. इहलोक तर अर्थकामानें देखील साधू शकतो. पुनः तमोगुणापेक्षां रजोगुण बरा आहे असें श्रीमद्भागवतांत स्पष्ट ह्मटलें आहे. "ये उंबरा पड तोंडांत–असल माझा हरी देईल खाटल्यावरी" इत्यादि मुक्ताला शोभणारी वाक्यें त्यांचे अवलंबन बद्धानें केले असतां,

आलस्यजनक होऊन तमोगुणाला वाढवितात; त्यापरीस रजोगुण तरी थोडासा बरा. हा चार्वाकदर्शन निर्माण करण्यांत शंकराचा आशय होता. शिवाय अनेक पुराणांनीं, अनेक वादियानीं परलोकदृष्टीनें चार्वाकमताची निंदाही केली आहे. याप्रमाणें बालरंजन करण्याकरितां निर्माण केलेल्या दर्शनामुळें शंकरादिकांना अनाप्तत्व येत नाहीं; आणि मुक्तदृष्टीनें पाहिल्यास तर अनाप्तत्व मुळींच नाहीं. कारण त्यानीं चार्वाकदर्शन करण्यामध्यें देखील प्रमाद केला नाहीं, कारण श्रीमच्छंकराचार्यांनीं अपरोक्षानुभूतींत असें ह्मटलें आहे कीं,

> यथैव मृन्मयो कुंभो तद्वत् देहोऽपि चिन्मयः ।
> आत्मानात्मविवेकोऽयं मुधैव क्रियते बुधैः ॥६९॥

भावार्थः— अन्वयानें देहही चैतन्यस्वरूप असल्यामुळें, मूर्ख व्यर्थच आत्मानात्मविवेक करितात. यथेष्टाचरण जरी जीवन्मुक्तीस विरोधी आहे, तरी ते विदेहमुक्तीस प्रतिबंधक नाहीं; व प्रारब्धानुसार वागणाऱ्या ज्ञानियाच्या व्यवहारांत नियमही नाहीं. मग त्याला लोक पूज्य मानोत, किंवा न मानोत. अशा फलदृष्टीनेंच चार्वाकमताचा व वेदान्ताचा समन्वय आहे, व वर सांगितलेल्या अत्यंत मूर्ख लोकाकरितां अर्थशास्त्राशीं व कामशास्त्राशीं समन्वय होतो; परंतु मध्यस्थानीय साधकाकरितां उपयोगीं असलेल्या साधनाशीं त्याचा समन्वय नाहीं. ह्मणूनच अगदीं पूर्ण नसलेल्या किंवा अगदीं मूर्ख नसलेल्या या वादीनें हे चार्वाकमत स्वीकारून प्रत्यक्षप्रमाणाचा आश्रय करणें अगदीं पतनास कारण आहे, असें आह्मी ह्मणतो. पूर्णांची तरी बद्धाप्रमाणें चार्वाकमतावर उपजीविका नाहीं, तर ते मिथ्या असल्यामुळें त्याच्या तत्वज्ञानाशीं व प्रारब्धाशीं विरोध करीत नाहीं इतकेंच.

शिष्य उवाचः— भगवन् मला आपल्या ह्मणण्याचा अर्थ उत्तम कळला.

वादी उवाचः— तुला समजलें असो, पण आह्मी प्रत्यक्ष व अनुमान अशी दोन प्रमाणें मानून देखील भूतवादी लोकायत राहूं शकतो.

सिद्धान्ती उवाचः— भूतवाद दोन प्रकारचा आहे. प्राचीन व

अर्वाचीन; पण त्यांत देखील चेतनपरमात्मा सिद्ध होतो हें तुला अजून समजलें नाहीं. प्रथम तर हा भूतवाद वेदान्ताशीं विरुद्ध येणें कठिण आहे; कारण स्वप्नामध्यें ज्याप्रमाणें युगपत् घटही दिसतो, व कपाल-निर्मित घटही दिसतो, त्याप्रमाणें अग्निजन्य किंवा वायूजन्य जल व जलतत्व हे दोन्ही या सृष्टींत युगपत् दिसणें अगदीं संभवनीय आहे. मग ते या गोलकावर दिसो किंवा अन्य गोलकावर दिसो, व योगियाला तसे जलादिक निर्माणही करितां येतात. सर्व पदार्थ एका भूताच्या शक्तीचा विशेषपरिमाणरूप आहे असें ही कांहीं भूतवादी ह्मणतात. त्यांच्या मतांत उष्णता, प्रकाश इत्यादि सर्व गतीचाच परिमाण आहे, पण याविषयीं कांहीं युक्ति नाहीं; कारण त्वाच्प्रत्यक्षज्ञान उष्णता व चाक्षुषप्रत्यक्ष प्रकाश हे गतीचाच परिमाण कसे होतात याविषयीं युक्ति सांगतां येत नाहीं. पूर्वपश्चाद्भावित्व हा नियम येथें लागू पडत नाहीं, कारण यास अन्य उपाधि सांपडते; अथवा असे मानलें तरी अनेक भूतवादांत प्रमाणपूर्वक मिश्रणाची अपेक्षा आहे, आणि प्रमाणाला बुद्धीची अपेक्षा आहे, ह्मणून येवढे मोठे प्रमाणपूर्वक जगद्रूप मिश्रण करणाऱ्या बुद्धिवान् परमेश्वराची ‘ दृष्टाददृष्टसिद्धि ’ या न्यायानें अपेक्षा आहे; आणि एकभूतवादांत व्यवस्थित पदार्थ निर्माण करण्याकरितां एकभूतत्वोपहित बुद्धिमच्चेतनाची एकभूत जड असल्यामुळें अपेक्षा आहे. आतां जडालाच जर बुद्धिमत्ता देणें असेल, तर कोणत्या ना कोणत्या दृष्टीनें ईश्वर मानणें या भूतवाद्यांच्या गळीं येते; आणि जला-दिकानां वायवादिजन्यत्वही निश्चित होत नसल्यामुळें, किंचित् युगपत् प्रतीयमानत्वच जलादिकांचे सिद्ध होते; व ते स्वप्नाप्रमाणें असल्यामुळें अर्थातच वैदान्तिक मायाकार्यवादाशीं या भूतवादाचा समन्वय होतो. याप्रमाणें भूतवाद घेऊनही ईश्वराचा अधिक्षेप करितां येत नाहीं. हा भूतवाद श्रीमद्भगवत्पूज्यपादांनीं श्वेताश्वतरभाष्यांत दाखविला असून, त्याचे कारण परमात्मा आहे असें सिद्धही केलें आहे; आणि चार्वाक-शास्त्राचा मुख्य शत्रू जे न्यायशास्त्र तत्संबंधी कुसुमांजलिग्रंथांत लोका-यतानाही किंचित् ईश्वरप्रतिपत्ति माहात्मा उदयनाचार्यांनीं सांगितली आहे. तेव्हां आमच्या पक्षाला मिळाल्याशिवाय लोकायतांनां कोणतीही

गती नाहीं. अनेक इंद्रियांच्या ज्ञानाला जाणणारा एक मी आहे, ह्मणून इंद्रियात्मवाद सिद्ध होत नाहीं. इंद्रियसंस्काराहून अहं भिन्न प्रतीत होतो, ह्मणून एकेंद्रियात्मवादही सिद्ध होत नाहीं. या एकेंद्रियात्मवादाची परीक्षा आह्मी अलौकिकव्याख्यानमालेंत केली आहे ती पहावी. प्राण जड व प्रत्यक्ष आहे, व त्याहून भिन्न अहं हा मानसप्रत्यक्ष आहे, ह्मणून प्राणात्मवादी चार्वाकांचे मत समीचीन नाहीं. स्वप्नांत हृदय अन्य व अहं तोच असतो. शिवाय देहाहून अहं भिन्न आहे याविषयीं मानसप्रत्यक्ष आहे, इत्यादि अनेक कारणावरून हृदयात्मवादी चार्वाकांचे मतही समीचीन नाहीं. मन हें चंचल असल्यामुळें, व त्याच्या वृत्ति असतानां व नसतानां अहंची सिद्धि असल्यामुळें, मनात्मवादी लोकायतांचे मत असिद्ध आहे. याप्रमाणें जीवाची सिद्धि होत असल्यामुळें, व त्याला स्वतः अनिष्टभोगाची इच्छा नसल्यामुळें, आणि प्राण्यांनां गर्भापासून सुखदुःख दिसत असल्यामुळें, पूर्वजन्मीं केलेले कर्म व त्यांचा फल देणारा ईश्वर याची सिद्धी सिद्ध आहे.

वादी उवाचः—— अहो ! हा लोकायतपक्ष समीचीन नसो, पण प्रत्यक्ष व अनुमान हीं दोन प्रमाणें मानून ईश्वराला मानणारे नास्तिक आहेत. त्यांचा मी आश्रय करून तुमच्याशीं भाषण करितो.

सिद्धान्ती उवाचः——पण हीं दोनच प्रमाणें मानून ईश्वराला मानणारे आस्तिक वैशेषीक आहेतच, हें उत्तम ध्यानांत असूं दे. ह्मणून ईश्वरास्तिकत्व केवल आगमप्रमाणावर आहे, व ते न मानले ह्मणजे झाले, असा आमचा तुला उपहास करतां येणार नाहीं. कणादोक्त वैशेषीक दर्शनाच्या प्रशस्तपादभाष्यांत आगमप्रमाणाचा अनुमानांत अंतर्भाव करून ईश्वराची सिद्धी केली आहे. याचा सविस्तर प्रकार मी प्रमाणनिर्णयांत करीन. आतां प्रत्यक्ष व अनुमान हे दोन प्रमाणें मानून ईश्वराला मानणारे माध्यमीकादिक बौद्ध आहेत, त्यांच्या पक्षाचा आश्रय करून तुला जे काय बोलावयाचे असेल ते सुखानें बोल. आमचाही उत्साह तुझा अधिक्षेप करण्याला प्रत्यही वाढतच आहे.

वादी उवाचः— चार्वाकाच्या मतांत पुनर्जन्म नाहीं, ह्मणून अकृताभ्यागमादि दोष येतात; पण बौद्धाच्या मतावर ते येत नाहींत. कारण

कर्मबलानें पंचस्कंदाचे एकत्र होणें याला ते पूर्वजन्म मानीत असतात. हें सर्व जगत् क्षणिक असून शून्यावरच ते अविद्येनें कल्पित आहे; ह्मणजे वस्तुतः ते शून्यच आहे, पण सत् असें भासते. जसा रज्जुसर्प मुळींच नसून भासतो, तसें हे जगत् नसून उत्पन्न झाले आहे, याला कारणही कांहीं नाहीं; कारण बीजादि कारण नष्ट झाल्यावरच अंकुरादि कार्याची उत्पत्ति होत असते हें अनुमानानें सिद्ध आहे. आतां व्याप्तिज्ञान दुर्घट असल्यामुळें अनुमानप्रमाण नाहीं असें चार्वाकास ह्मणतां येणार नाहीं; कारण धूमवन्हीचा सहचार अन्वयव्यतिरेकानें निश्चित आहे. धूम असल्यास अग्नि असतो हा अन्वयसहाचार व अग्नि नसल्यास धूम नसतो हा व्यतिरेकसहचार दोन्ही लोकांत प्रसिद्ध आहेत. पुनः अनुमान अप्रमाण आहे असे चार्वाक नुस्ते वाक्य उच्चारतो, कीं त्याला कांहीं कारण सांगतो ? पहिल्यापक्षीं उन्मत्तप्रलाप हा दोष त्याच्यावर येतो, आणि दुसऱ्यापक्षीं त्या कारणाची सिद्धि आह्माला अनुमानानेंच करून द्यावी लागत असल्यामुळें अनुमानप्रमाणाचा आश्रय करणें अवश्य आहे, हें मला उत्तम समजलें.

सिद्धान्ती उवाचः– अनुमानप्रमाण तूं चार्वाकाला मान्य करावयाला लावले, हे तूं आपले उत्तम कर्तव्य केलेस, व ते आह्मालाही संमत आहे; पण त्या बरोबर भलतेही कांहीं बोललास ते संमत नाहीं. जो तूं शून्यवाद अंगिकार केला तो समीचीन नाहीं. कारण तुझे हे शून्य काय असत् आहे कीं अभावरूप आहे ? असताचे निराकरण आह्मी वर केल्यामुळें, व असताची उत्पत्ति किंवा प्रतीति होत नसल्यामुळें, आणि भ्रांति देखील निरधिष्ठान राहूं शकत नसल्यामुळें, असत्स्वरूप शून्य, तदाश्रित अविद्या, व तत्संपादित हे तिन्ही घटूं शकत नाहींत.

मध्यस्थ उवाचः– तुह्मी ही अविद्याकल्पित वंध्यापुत्राची उत्पत्ति सांगितली आहे, तर अविद्याकल्पितच शून्याची उत्पत्ति मानण्याला वादीला कोणता प्रत्यवाय आहे ?

सिद्धान्ती उवाचः– मुळींच नाहीं. अविद्याकल्पितच शून्य ह्मणेना बापडा. आमची त्यांत काय हानी आहे. तेवढ्यानें अविद्येचे अधिष्ठान शून्य होऊं शकत नाहीं, वर ते चेतन आहे एवढेंच आमचें ह्मणणें आहे.

" सदेवासतो भिन्नं न त्वसत्सतोऽभिन्नमिति "

( सिद्धान्तदर्शन प्रपाठ १ सूत्र १३ टीका निरंजनभाष्य )

अर्थः– सत् हेंच असताहून निराळे आहे, असत् कांहीं सताहून निराळें नाहीं; कारण भावाभाव सदसत्पदार्थ सर्व ब्रह्माचे ठायीं अविद्येनें कल्पित आहेत, असें आमच्या निरंजनाचार्यांनीं ह्मटले असल्यामुळें, साधिष्ठान अविद्याकल्पितशून्य मानून वादी संतुष्ट होत असेल, तर तो सुखानें होवो अशी आह्मी वांछा करितो; पण तसें जर वादी मानत नसेल, तर शून्यावर जगत् उत्पन्न होणें शक्य नाहीं; कारण कारणावांचून कार्य मानल्यास सर्व लोकांच्या व्यवहाराचा बाध होईल. कारणापासूनच सर्व वस्तु उत्पन्न होतात, असा अतीतकालानुभव सर्वांस आहे. यद्यपि भविष्यत्कालीं अमुक कारणापासून अमुक कार्य होईल असा निश्चय सांगतां येत नाहीं, तथापि हा संशय उपाधिजन्य आहे. कारण जर निरुपाधिक असेल, अथवा समभावरूप असेल, व अप्रतिबंधक सामग्री असेल, तर कार्य निश्चयानें झालेंच पाहिजे. आतां अशी सामुग्री सर्वत्र मिळेल कशावरून ? असें वादी ह्मणेल तर वादीचें दैव, पण त्यावरून कार्यकारणाचा नियम बाधित होत नाहीं. प्रतिबंधाभावनिश्चयास वादीचे अज्ञान सुखानें कारण असो, तेवढ्यानें संशयवाद सिद्ध होत नाहीं. अथवा भविष्यत्संशयवादीच्या मतांत वर्त्तमानज्ञानच मनुष्याला असूं शकते, भविष्यत्ज्ञान होत नाहीं, असा निश्चय उपपन्न होतो; पण भविष्यत्कालाच्या ज्ञानावांचून भविष्यत्कालाचा निषेध अनुपपन्न आहे. आतां हेंही तुह्मी आतांच म्हणता असें जर वादी ह्मणेल, तर वादीचा शब्द निघाल्यानंतर दुसऱ्याक्षणीं आमच्या कानावर ऐकूं येतो, त्याअर्थीं त्याचे वर्त्तमानत्व भविष्यदन्वयी आहे; आणि आह्माला ऐकूं येतील अशा आशयानें वादीनें उच्चारले आहेत, त्याअर्थीं त्यानीं भविष्यत्क्षणाचा अंगिकार केलाच आहे; नाहींपेक्षां वादीचे शब्द आह्माला ऐकूंच येत नाहींत असें खुशाल ह्मणतां येते. आतां तिन्ही कालाचा अंगिकार करून, त्याच्या आश्रयाचा अंगिकार करणार नाहीं, तर कालत्रयविषयिणी वृत्ति करणाऱ्या वादीचे ठिकाणीं व्याघातादि दोष प्राप्त होतात. ह्मणून विनाकारण कार्य उत्पन्न होते अशाविषयीं संशयवाद

उत्पन्न करणें देखील चुकीचें आहे. विनाकारणच जर कार्य उत्पन्न होत असेल, तर मनुष्यांनीं तृप्तीकरितां अन्नाचा आश्रय करूं नये. आपल्या मनांतली गोष्ट दुसऱ्याला समजून देण्यांत वाणीचा आश्रय करूं नये. किंबहुना उष्णताजन्य दुःख निवारण्याकरितां छायेचा आश्रय करूं नये. याप्रमाणें सर्व लोकांची प्रवृत्ति व्यर्थ होऊं पाहते. "प्रतिबंधाभावे सति नियतपूर्वपश्चाद्भावः कारणकार्यनियमः" असा आमचा सिद्धान्त आहे. कपालाच्या नंतर घटाचें दर्शन होतेही, पण तें नियत होत नाहीं. कपालसंयोगानंतर घट दिसत नाहीं, पण प्रतिबंध आल्यानें. कोणताही प्रतिबंध न आल्यास कपालसंयोगानंतर घट अवश्य दृग्गोचर होतोच; ह्मणून आह्मी केलेले लक्षण निर्दुष्ट आहे. शिवाय एकल्या ईश्वराविषयीं शक्ति भिन्न आहे कीं अभिन्न आहे, नित्य आहे कीं अनित्य आहे? इत्यादि प्रश्न असदाश्रित अविद्या मानणाऱ्या नास्तिकावरही येतात, ह्मणून असत्पक्ष मानणारा शून्यवाद बरोबर नाहीं. आतां अवशिष्ट जो दुसरा पक्ष, शून्य अभावरूप आहे व त्यापासून जगत् आहे, असें जर वादी ह्मणेल तर तेही अयोग्य आहे; कारण कोणता कारणाभाव वादी कार्यकारण मानीत आहे? अत्यंताभाव, प्रागभाव, प्रध्वंसाभाव, कीं अन्योन्याभाव? प्रथमपक्ष समीचीन नाहीं. कारण अत्यंताभाव सर्वत्र सुलभ असल्यामुळें सर्वत्र सर्व कार्यांची उपलब्धी झाली पाहिजे. तसें मानलें ह्मणजे कारणव्यापार निष्फल होतो. नाकापासून गुदद्वाराची व आकाशापासून उपस्थाची उत्पत्ति कोणीही मानीत नाहीं. द्वितीपक्षही समीचीन नाहीं. कां ह्मणशील तर कारणाचा प्रागभावच असिद्ध आहे. प्रागभाव मानणारे जितके कांहीं वादी जगांत आहेत, ते सर्व प्रागभावाला प्रतियोगी कार्य मानतात, कोणी कारण मानीत नाहींत. पुनः अनधिकरणकप्रागभाव अनुपपन्न आहे. पुनः प्रागभावाला कारण ह्मणणाऱ्या वादीनें त्याला प्रागभावत्वेंकरून कारणत्व आहे किंवा विशिष्टप्रागभावत्वेंकरून कारणत्व आहे हेही आह्मांला सांगितले पाहिजे. पैकीं प्रथमपक्ष चुकीचा आहे. कारण सर्वांचे प्रागभावत्व सर्वकारणांत आहे. ह्मणून कोणत्याही कारणापासून कोणत्याही कार्याची उत्पत्ति झाली पाहिजे. हा दोष येऊं नये म्हणून विशिष्ट प्रागभावाला कारणत्व आहे, हा पक्ष जर

वादी अंगिकार करील, तर तसेंही त्याचें ह्मणणें हास्यास्पद आहे. कारण तसें करणें म्हणजे कार्याच्याच प्रागभावाचा अंगिकार करणें आहे, कारणाचा नव्हे; पण कसेंही असो, तो प्रागभाव कार्योत्पत्तीच्यापूर्वी नाश पावतो किंवा कार्योत्पत्तिसमकाळीन किंवा कार्योत्पत्तिनंतर नाश पावतो ? आद्यपक्ष समीचीन नाहीं. कारण पूर्वीच नाश झालेला प्रागभाव कार्याची उत्पत्ति करूं शकणार नाहीं, आणि कारणावांचून कार्योत्पत्ति मानणाऱ्यावर जे दोष येतात, ते सर्व वादीला कंठस्नान घालतात. कारणाचा अभाव जेव्हां कारण मानला तेव्हांच वादीनें कारणावांचून कार्योत्पत्ति मानण्याची प्रतिज्ञा सोडून दिली आहे, आणि विशिष्ट प्रागभाव कारण मानल्यानें, तर ती अगदींच नाहींसी झाली आहे; कारण असताचे ठिकाणीं विशेषत्व संभवनीयच नाहीं, म्हणूनच नैय्यायिकांनीं अभावाला पदार्थ म्हणजे अभिधेय मानलें आहे; आणि सप्तमसंख्येचे त्याचे ठिकाणीं स्थापन केलें आहे. वैय्याकरणानीं अभावाला बौद्धार्थत्व मानलें आहे, आणि वेदान्तियांनीं अनुपलब्धिप्रमाणगोचर भावरूप अविद्याकल्पित अनिर्वचनीयत्व मानलें आहे. एवं अभावाला सर्वथा असद्रूप कोणीच मानीत नसल्यामुळें, अभावकारणसिद्धीनें वादीला असत्कार्यत्वप्रतिज्ञा स्थापित करतां येत नाहीं. आतां हा भ्रष्टप्रतिज्ञ वादी कार्योत्पत्तिसमकालीन प्रागभावाचा नाश होतो, असा मध्यमपक्ष अंगिकार करील, तर तेंही युक्त नाहीं, कारण युगपत् दोन पदार्थांचें भान चित्तामध्यें होत असतें; पूर्वपश्चाद्भावीपदार्थांचें होत नाहीं. एवढ्याकरितां वादीनें अंत्यपक्ष अंगिकार केल्यासही त्याचा मूर्खपणाच सिद्ध होतो, कारण कार्योत्पत्तिनंतर नष्ट होणारा प्रागभाव एकत्वविशिष्ट आहे किंवा अनेकत्वविशिष्ट आहे ? एकत्वविशिष्ट मानशील तर तो आतां नष्ट झाला आहे कीं विद्यमान आहे ? पैकीं प्रथमपक्ष संभवत नाहीं, कारण सर्वकार्यांचे कारण जो प्रागभाव तो जर आतां नष्ट झाला आहे तर इदानींतन घटादिक कार्यें उत्पन्न होऊं नयेत, आणि तीं होतात हा तर सर्वांचा अनुभव आहे. याप्रमाणें दुसरा पक्षही योग्य नाहीं, कारण कार्योत्पत्तिनंतर जर तो प्रागभाव नष्ट झाला नाहीं, तर तो आतां केव्हां होणार ? मृत्तिकादिकाप्रमाणें तो घटादिभावकार्यांत अभावरूप असल्यामुळें अनुगतही नाहीं,

तेव्हां तो कार्याहून अन्यच असला पाहिजे, आणि तसा प्रागभाव अर्थातच कार्याचें कारण होत नाहीं. पुनः वादीस असें विचारतो कीं, पुढें हा प्रागभाव नष्ट झाल्यावर जगत् उत्पन्न होईल कीं होणार नाहीं ? प्रथमपक्ष वादी अंगिकार करील, तर असंगत आहे, कारण सर्व पदार्थांचें कारण जो एक प्रागभाव तो जर नष्ट झाला तर जगत्कार्योत्पत्ति होणार नाहीं. नष्ट झालेल्या कारणापासून जर कार्योत्पत्ति होईल तर नष्टकुलालापासून कुलालोत्पत्ति व नष्टवीर्यापासून पुत्रोत्पत्तिही झाली पाहिजे, आणि तुझीही उत्पत्ति नष्टमातेपासूनच असली पाहिजे. पुढें जर कारणावांचून कार्योत्पत्ति होईल तर आतांच तंत्वादिकारणावांचून पटादिकार्योत्पत्ति कां दिसत नाहीं ? आतां न दिसो, पण पुढें तसें होईल असें वादी म्हणेल, तर त्याविषयीं त्यानीं कांहीं युक्ति सांगितली पाहिजे, पण तशा युक्तीचाच मुळीं अभाव आहे. कारण प्रागभावाच्या एकत्वास्तव जाति संभवत नाहीं; म्हणून तो नष्ट झाल्यावर प्रागभावत्वजात्यवच्छिन्न प्रागभावध्वंसजन्य भविष्यत्जगत्कार्यही संभवनीय नाहीं. एक प्रागभाव नष्ट झाल्यावर जगत् उत्पन्न होणार नाहीं. असाच दुसरा पक्ष स्वीकारणें वादीला हितावह नाहीं. कारण शून्यभावनेनें शून्यमय होण्यास वादीनें मुक्ति मानली आहे, पण विनाकारण जर जगताच्याच बंधाचा नाश होईल तर 'सर्वं शून्यं शून्यं' या भावनेचा उपदेश व त्याचें आचरण हे सर्व निरर्थकच होतील, किंवा विनाकारण नाश मानल्यास विनाकारण उत्पत्तिही होईल, व मग वादीचे सर्व निर्वाणप्राप्तसुगत बद्ध होतील. एवढ्याकरितां अनेकत्वविशिष्टप्रागभाव कारण आहे, म्हणजे अनेकप्रागभाव कारण आहेत, हा दुसरा पक्ष वादी अंगिकार करील, तर पुनःही तो आमच्या युक्तिशस्त्रापासून मुक्त होत नाहीं. कारण स्वरूपानें कोणी प्रागभावाचा भेद मानीत नाहींत, तर प्रतियोगीच्या भेदानेंच प्रागभावाचा भेद सर्व वादी मानीत असतात. जसा घटाभाव पटाभाव हा अभावाचा भेद प्रतियोगी भेदानें मानल्या जातो, तसा प्रागभावाचाही भेद प्रतियोगीभेदानेंच मानला पाहिजे. आतां प्रागभावाचाही प्रतियोगी काय कारण आहे कीं कार्य आहे ? प्रथमपक्ष संभवत नाहीं; कारण प्रागभाव मानणारे वादी त्याला अनादि मानतात. अनादिपदार्थांचे कोणी कारण संभ-

वत नाहीं. कारण, कारण हे जर पूर्वी असलेल्या अभावापासून उत्पन्न होईल, तर ते कार्य होईल, आणि उत्पन्न होणार नाहीं तर ते कारण अनादि होईल. अनादीचा प्रागभाव संभवत नाहीं, अथवा कारणाचा प्रागभाव या शब्दाला कांहीं अर्थच नाहीं. म्हणजे त्या शब्दाचे अर्थाचे ठायीं अविद्याकल्पित असत्व आहे. याप्रमाणें आह्मी आपल्या पूर्व म्हणण्याचें रक्षण केले. आतां अनादिकारण नष्ट झाल्यावर प्रागभाव उत्पन्न होऊन कार्य होईल म्हणावें तर तेही युक्त नाहीं. कारण अशा उत्पन्न झालेल्या अभावाचे ठिकाणीं प्रागभावत्वच नाहीं, तर उलट प्रध्वंसाभावत्व आहे. कारण जे जे अभाव वस्तूच्या नाशानंतर उत्पन्न होतात, ते ते सर्व प्रध्वंसाभाव होत, असें सर्व वादी म्हणतात. आतां त्या ध्वंसाभावालाच प्रागभाव हें नांव ठेविलें तरी त्यापासून कार्य संभवनीय नाहीं. कारण नाम ठेवल्यानें वस्तूचें कार्य उत्पन्न होत नसते. जसें नखाला सूर्य नांव ठेवल्यानें जगत्प्रकाशक होत नाहीं. शिवाय प्रध्वंसाभाव अनेक आहेत, त्यापासून कार्योत्पत्ति झाल्यास तो सान्त होईल, अथवा अभाव कायम राहिला तर कार्योत्पत्तीचें कारण त्या अभावाहून भिन्न दुसरें मानावें लागेल. आतां त्या अभावाचा प्रतियोगीपणा कार्याचे ठिकाणीं राहतो, असें जर वादी म्हणेल तर कारणाचा अभाव कारण आहे ही आपली प्रतिज्ञा वादीनी पूर्वी पर्यायानें सोडली होती, ती आतां प्रत्यक्षच सोडली आहे. अथवा कारणावांचून उत्पत्ति मानण्यामध्यें जे दोष सांगितले तेही सर्व वादीच्या मतावर येतात. पुनः निर्लज्ज वादी जर कार्याचा प्रागभाव कारण आहे असें ह्मणेल, तर प्रागभावत्वजाती कारण आहे कीं, प्रागभावव्यक्ति कारण आहे असें आह्मी त्याला विचारतो. पैकीं प्रागभावत्वजातिकारणाचे पूर्वीच प्रसंगानें खंडण होऊन चुकलें आहे. आतां वैय्यक्तिक प्रागभाव कारण आहेत हेंही वादीस ह्मणतां येत नाहीं. कारण प्रतियोगीवैशिष्ट्यावांचून अभावाची व्यक्ति सिद्ध होत नाहीं; आणि विशेषणज्ञानावांचून विशिष्टत्व सिद्ध होत नाहीं. सर्व वादी विशिष्टज्ञानाला विशेषणजन्यच मानतात. विशेषणरहित विशिष्टज्ञान कोणीही वादी मानीत नाहीं. तूं जर विशेषणरहित विशिष्टज्ञान मानत असलाच तर ते आह्माला सिद्ध करून दाखीव; ह्मणजे त्याचे

खंडण करण्याला आह्मी सज्ज आहोंच. विशेषणजन्य विशिष्टप्रागभावाचें ज्ञान तुला मानतां येत नाहीं. कारण कार्य उत्पन्न झालें नसल्यामुळें तें विशेषण होत नाहीं. ह्मणून प्रागभावाचे ठिकाणीं कार्यविशिष्टत्व येत नाहीं. विशेषणत्व वर्त्तमान असते हा नियम आहे.

वादी उवाचः— वंध्यापुत्रादिकांप्रमाणें असद्विशेषण घेऊन कार्य-विशेषणजन्यकार्यविशिष्टप्रागभावाचें ज्ञान आह्मी मानूं शकतो.

सिद्धान्ती उवाचः— खरे बोललास. मानणें कशाचेही शक्य आहे पण होणें शक्य नाहीं. आतां मानण्याला देखील सूक्ष्म प्रतिबंध आहेत ते तुला माहीत नाहींत, तर नसोत. प्रकृतस्थळीं वंध्यापुत्र जसा तुमच्या मतांत अत्यंत असत् आहे, तसें घटादिकार्य अत्यंत असत् आहे. त्या घटादिकार्यविशिष्टप्रागभावापासून जर तुह्मी घटाची उत्पत्ति मानणार, तर वंध्यापुत्राचीही उत्पत्ति तुह्माला मानली पाहिजे. किंवा संसाराचे ठिकाणीं निर्वाणाचीही उत्पत्ति मानली पाहिजे, तसें मानले ह्मणजे तुमचे निर्वाणबोधक शास्त्रोपदेश व्यर्थ होतील.

मध्यस्थ उवाचः— बालराजाला ज्याप्रमाणें यवनदशेंतील भावी राज्याचा संबंध ग्रहण करून लोक राजा असें विशेषण देत असतात, त्याप्रमाणें भावी कार्योत्पत्तीचें ग्रहण करून कार्यविशिष्टत्व प्रागभावालाही देतां येणें शक्य नाहीं काय ?

सिद्धान्ती उवाचः— मुळींच शक्य नाहीं, कारण राजपुत्र जसा यौवनदशेंत राहतो, तसा तो प्रागभाव कार्योत्पत्तिनंतर राहत नाहीं; ह्मणून कार्यविशिष्टत्व प्रागभावाला देतां येत नाहीं. यद्यपि दृष्टिसृष्टिवादान्वयें राजपुत्राचेंही बाल्ययौवनशरीर भिन्न असते, तथापि अहंअधिकरणकभ्रांतिजैकत्वप्रत्यभिज्ञा यावदविद्या सर्व पुरुषांनां होत असते; तशी कार्योत्पत्तिनंतर प्रागभावाची कोणत्याही अंशानें प्रत्यभिज्ञा होत नाहीं. अथवा भ्रांतीनें प्रागभावाची प्रत्यभिज्ञा मानल्यास वादीच भ्रांत आहे असें सिद्ध होईल.

वादी उवाचः—मी असे मुळींच ह्मणत नाहीं, पण कार्योत्पत्तिनंतर प्रागभाव राहतो, व ह्मणून त्याचे विशिष्ट ज्ञान आह्मास घेतां येते असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः-- तुझें हृदय निश्चयानें तमोग्रस्त झालें आहे. त्याचा आधीं उत्तम धर्मानुष्ठानानें विनाश कर. अरे! सर्व वादी कार्योत्पत्तिनंतर प्रागभावाचा नाश मानीत असतात. जर कार्योत्पत्तिनंतरही प्रागभावाचा नाश मानीत नाहींस, तर मग त्या प्रागभावाला दुसरें कांहीं नाशक राहणार नाहीं, आणि त्यामुळें प्रागभावाला नित्यत्व येईल. नित्यत्व आणि प्रागभावत्व हे परस्परविरुद्ध आहेत, कारण कसे ते पहा. कार्याच्यापूर्वीं आपल्या उपादानकारणामध्यें असणाऱ्याला प्रागभाव म्हणतात, आणि कालत्रयीं नाश न पावणाऱ्या वस्तूला नित्य म्हणतात. किंवा मीमांसकाच्या निष्क्रियविभुपदार्थसंयोगाप्रमाणें तूं नित्यप्रागभावाचा अभ्युपगम करशील तर, मीमांसकापेक्षां तुझा अभ्युपगम निकृष्ट ठरणार आहे. प्रतियोगीवांचून तूं सध्यां अनेक प्रागभावाला कारण मानण्याचा पक्ष घेतला आहेस. पण नित्यप्रागभावाचे ठिकाणीं अनेकत्व संभवणार नाहीं कारण प्रतियोगीचे भेदावांचून प्रागभावाचा भेद होत नाहीं. पण त्या प्रागभावाला भिन्न करणारा प्रतियोगीरूप उपाधि नित्य मानतां येत नाहीं, कारण "प्रागभावप्रध्वंसाभावाप्रतियोगित्वं नित्यत्वं" असें नित्याचें लक्षण सर्व तर्कवादीयांनीं केलें आहे. जो जो पदार्थ नित्य असतो तो तो प्रागभाव व प्रध्वंसाभाव यांचा प्रतियोगी नसतो. जसा आत्मा. ज्याचा अभाव होतो त्याला प्रतियोगी ह्मणतात. ह्मणून नित्य प्रागभावाचा भेद करणारा प्रतियोगीरूप उपाधि नित्य कधींच असूं शकणार नाहीं. आतां त्या अनित्यप्रतियोगीरूप उपाधीनें नित्यप्रागभावाचा भेद होतो असेंही म्हणतां येत नाहीं. कारण अनित्यप्रतियोगीच्या योगानें जर नित्य प्रागभावाचा भेद होईल तर, अनित्यप्रतियोगीचा नाश झाल्यावर प्रागभाव रहात असल्यामुळें, त्याला प्रध्वंसाभावरूपता प्राप्त होईल; मग प्रध्वंसाभावाची पृथक् कल्पना व्यर्थ होईल. पण हें मानणें तुला इष्ट नाहीं; कारण प्रध्वंसाभाव कार्याचे विरोधी मात्र असतो, कारणरूप नसतो; आणि कारणाच्या प्रध्वंसाभावाचे पूर्वी खंडण केलें आहे. या सर्व विवेचनावरून कार्याचा किंवा कारणाचा प्रागभावमात्ररूप जे शून्य, तें जगाचें कारण होऊं शकत नाहीं हें सिद्ध झालें.

वादी उवाचः--- पण मी पूर्वी बीज नष्ट झाल्यावरच अंकुर उत्पन्न

होतो असें उदाहरण दिलें होते, त्या उदाहरणावरून तुह्मी कारणाच्या प्रध्वंसाभावाला शून्य कां समजलां नाहीं ?

सिद्धान्ती उवाचः—तुझ्याइतकी माझी बुद्धि मूर्ख नाहीं ह्मणून; पण याही तुझ्या ह्मणण्याचें खंडण मी पूर्वी केलें आहे, हें तरी तुझ्या कोठें ध्यानांत आहे ? अरे कारणाच्या ध्वंसाला जर कार्याचे कारण मानशील तर त्यालाही प्रागभावत्व येऊन अनित्यत्वही येईल. किंवा बीजादिकांचा ध्वंस नियमेंकरून अंकुरादिकाला कारण नाहीं, कारण जठराग्निपचनादिकानेंही बीजादिकांचा ध्वंस होतो, परंतु त्याठिकाणीं अंकुरादिकांची उत्पत्ति होत नाहीं. पुनः ध्वंस अनंत असल्यामुळें, प्रागभावाप्रमाणें कोणत्याच कार्याचे तो नियतकारण होऊं शकत नाहीं. तसें झाल्यास निंबबीजाच्या पोटीं आम्रवृक्षादिकांची उत्पत्ति तुला मानली पाहिजे, आणि पुरुषवीर्याचे पोटीं गजादिकांची उत्पत्ति मानली पाहिजे. यद्यपि कचित् गर्भांतून सर्पादिकांची उत्पत्ति दृष्ट आहे, ती बीजध्वंसजन्य नसून अदृष्टविशेषजन्य आहे. अशा प्रकारची प्रत्यक्ष झालेली गोष्ट माझ्या अदृश्यदीपिकेंत लिहिली आहे; पण ध्वंसाभावाला कारण मानणाऱ्या तुला कर्मवैचित्र्य देखील मानतां येत नाहीं. म्हणून कर्मबलानें नष्ट झालेल्या पंचस्कंधाचे एकीभवन होऊन पुनर्जन्म होतो असें ही तुला म्हणतां येत नाहीं. किंवा बीजादिकांच्या अभावाला कारण मानणाऱ्या तुझ्या मतांत बीजादिकाला कारणत्वच नाहीं, म्हणून अकारणरूप अभावाला कारणत्व सांगणारे तुझें वचन " मम माता वंध्या " या वचनाप्रमाणें व्याघातानें दूषित आहे. ज्या वस्तूची सिद्धि करण्याकरितां बोलावें, त्याच वस्तूचा बाध बोलण्यानेंच होणें याचे नांव व्याघात आहे. किंवा कारणाभावाला कारण मानल्यास त्या कारणाभावाचा अभावही कारणरूप होईल. याप्रमाणें तुझ्या मतांत कारणाभावरूप कारणाची अनवस्था होते. आमच्या मतांत बीजादिकांचा नाश अंकुरादिकास कारण होत नाहीं, किंतु बीजादिकांतील पार्थिव अवयवच अंकुरादिकांचे आरंभक होतात, किंवा बीजांत असलेलेच अंकुरादिक प्रगट होतात, किंवा बीजावच्छिन्नचेतनस्थअविद्याच अंकुरादिकांनां उत्पन्न करिते. याप्रमाणें न्याय, सांख्य व वेदान्तानुसार व्यवस्था आहे, आणि स्वप्रत्ययाप्रमाणें त्याचा विरोधही नाहीं. तात्पर्य

कारणाचा किंवा कार्याचा प्रध्वंसाभावही शून्याला समजून जगत्का[illegible] म्हणतां येत नाहीं. याप्रमाणें अन्योन्याभावालाही जगत् समजून शू[illegible] म्हणतां येत नाहीं, कारण अन्योन्याभाव घटादिकार्याचे ठिकाणीं [illegible] आहे, आणि अन्योन्याभावाला जर तूं शून्य समजत असशील त[illegible], संसारांतच तुला निर्वाण प्राप्त होईल; व मग बौद्धशास्त्राचा अभ्यास व्यर्थ होईल. किंवा अत्यंताभावाला जर तूं शून्य समजत असशील तर, त्याचे पूर्वी खंडण केलें आहे. अथवा कारणाच्या अत्यंताभावाला शून्य समजतोस किंवा कार्याच्या अत्यंताभावाला शून्य समजतोस असें आम्ही विचारतो. प्रथमपक्ष समीचीन नाहीं, कारण बीजादिकांचा अत्यंताभा[illegible] सर्वत्र सुलभ असल्यामुळें सर्वत्र कार्योत्पत्ति झाली पाहिजे, आणि दुस[illegible] पक्षही समीचीन नाहीं. कारण सत्कार्यवादांत लांकूड छिलून जसें त्या[illegible] असलेलेच पुतळीचे अवयव स्पष्ट करावे लागतात असें म्हटलें आहे, तसें तुम्हा असत्कार्यवाद्यानां म्हणतां येणार नाहीं. कारण लांकडाला छिलून पुतळीचे असत् अवयव स्पष्ट करणें अशक्य आहे, म्हणून कारक-व्यापारच तुमच्या मतांत व्यर्थ होतो; आणि कारकव्यापारावांचून जर कार्योत्पत्ति मानावयाची आहे तर, वंध्यापुत्राची उत्पत्ति झाली पाहिजे, ती होत नाहीं.

मध्यस्थ उवाचः— अहो ! असत्कार्यवाद तर नैय्यायिकांचा आहे; व वादीनें सध्या बौद्धांचा आश्रय केला आहे, तेव्हां वादीच्या मतावर असत्कार्यवादाचा आरोप करून खंडण कसें करता ?

सिद्धान्ती उवाचः– बौद्ध असत्कार्यवादी आहेत असें गौडपादा-चार्यांनीं आपल्या सांख्यकारिकेच्या भाष्यांत म्हटलें आहे. “ बौद्धादीनां असत्कार्यम् ” पण इतका भेद आहे; नैय्यायिक कारण सत् असून कार्य असत् मानतात, व बौद्ध कारण व कार्य दोन्ही असत् मानतात.

वादी उवाचः— ते कांहीं असो. असत्कार्य मानल्यास जसा कारकव्यापार व्यर्थ होतो, तसें सत्कार्य मानल्यासही कारकव्यापार व्यर्थ होतो.

सिद्धान्ती उवाचः– येवढ्याचकरितां आम्ही कार्य अनिर्वचनीय मानतो.

वादी उवाच:– अनिर्वचनीयें कार्यांतही कारकव्यापार व्यर्थच होतो, कारण अनिर्वचनीयकार्य भ्रमानें एकदम भासत असते.

मध्यस्थ उवाच:– वादीचें म्हणणें अगदीं सम्यक् आहे असें मला वाटतें.

सिद्धान्ती उवाच:– जी अविद्या अनिर्वचनीय कार्याला भासविते, तीच अविद्या कारकव्यापारालाही भासविते. ज्याप्रमाणें स्वप्नांत कांहीं घट एकदम भासतात, व कांहीं कुलालकृतकपालसंयोगजन्य भासतात, त्याचप्रमाणें कांहीं कार्य कारकव्यापारजन्य व कांहीं कार्य युगपत् भासतात. यद्यपि असें मानल्यानें कोठें घटादिकांचे युगपत्भानही झाले पाहिजे, पण होत नाहीं; आणि तसेंच सर्वांनां अविद्या शरण असल्यामुळें, पुत्राकरितां नारीगमन किंवा तृप्तिकरितां भोजन इत्यादि लोक प्रवृत्तीचा लोप अनिर्वचनीयकार्यवादांतही होतो, तथापि या दोषाचा परिहार असा आहे कीं, ईश्वराधिष्ठितअविद्याजन्य कार्य असल्यामुळें सर्वथा भगवदेकशरणानां पुत्राकरितां नारीगमन किंवा तृप्तीकरितां भोजनाची अपेक्षा नाहीं असें आम्ही स्पष्ट म्हणतो. " आदौ पुत्र पश्चात् भार्या " अशाविषयीं एका ऋषीची कथा प्रसिद्ध आहे, व ध्यानसमाधीवर नुस्ते उपजीविका करणारेही देवनीकाय योगशास्त्रांत सांगितलें आहेत; तेव्हां भगवदेकनिष्ठांचे ठायीं हे सर्व संभवनीय आहे. परंतु तेवढी ज्यांची निष्ठा नाहीं, त्यांनां कार्याकरितां कारकव्यापाराचा आश्रय करावा लागतो. त्याच्याकरितां अविद्याकारणाचे ठायीं मोक्षपर्यंत कार्य सत् आहे, असा सांख्याचा आश्रय करून आह्मी वेदान्ती ह्मणतो, आणि नैय्यायिकांचा आश्रय करून ब्रह्मदृष्टीनें असतही ह्मणतो; पण अधिष्ठानाचा अपलाप करीत नाहीं.

शिष्य उवाच:—महाराज ! मला थोडेसे कांहीं विचारावयाचे आहे. भगवन्निष्ठांनां जर भोजनावांचून तृप्ति व नारीवांचून पुत्रप्राप्ति होते असें आपण ह्मणतां, तर मग परमेश्वराला कष्ट देऊं नये असे जे भक्तश्रेष्ठाचें ह्मणणं तें कसें खरें होईल ? याविषयीं एक ऐतिह्य प्रसिद्ध आहे. एक ज्ञानी व एक भक्त रस्त्यानें जात असतां दोघांलाही एक वाघ दिसला. तेव्हां ज्ञानी ह्मणाला त्या वाघांतही जर परमेश्वर आहे, तर मग मी

पळून कां जावें? भक्त ह्मणाला आपल्यांतही परमेश्वर आहे, व त्यानें पळण्याचे सामर्थ्य दिले असतां, पुनः त्या दयाळु परमेश्वराला कां त्रास द्यावा? या ऐतीह्यावरून भक्तश्रेष्ठांचे ठिकाणीं कारकव्यापाराची प्रवृत्ति दिसते.

श्रीगुरू उवाचः— तूं विचारले हें फार चांगले केलें. जे निष्काम भगवद्भक्त आहेत, त्यांचा जगमिथ्यात्वनिश्चय पूर्वीच झाला असल्यामुळें, किंवा त्यानां श्रमावांचून विषय मिळालेच पाहिजेत अशी अपेक्षा नसल्यामुळें, ते कारकव्यापाराचा आश्रय करितात; आणि प्रेमावांचून इतर सामर्थ्यांची अपेक्षा करीत नाहींत. यद्यपि सनत्कुमारादि माहात्मे सामर्थ्यवान् आहेत, तथापि तो त्यांचा जन्मच सामर्थ्यमूलक आहे. मनुष्याच्या वाणीसामर्थ्याप्रमाणें त्यांचेही ते सामर्थ्य स्वाभाविक आहे. ह्मणून मुद्दाम ते प्रारब्ध समजून त्याच्या त्यागाचीही ते अपेक्षा करीत नाहींत. याप्रमाणें भूतलावरती व्रजगोपीप्रभृति भक्तांनीही स्वाभाविक वाणी-सामर्थ्याचा त्याग करून पशुजन्माची अपेक्षा केली नाहीं, आणि भगवन्निष्ठेचे फळ ह्मणून देवत्वाचीही अपेक्षा केली नाहीं; पण सकामभगवन्निष्ठ जर तेवढी दृढ निष्ठा ठेवील तर त्याला कारकव्यापाराची अपेक्षा लागणार नाहीं, एवढें आमचें ह्मणणें आहे; पण तो सकामभक्त देखील कामनेकरितांच भक्ति करणारा समजूं नये, तर भक्तिमध्यें कामनेचा आग्रह राहिलेला असा समजावा. जसा सुदामदेव. तात्पर्य, सत् किंवा असत् कोणतेही कार्य माना, ते विशेष कसें मानलें पाहिजे हे आह्मी वेदान्तनिरूपणांत सांगू; पण भगवंताचा प्रतिषेध करणारा शून्यवाद अंगिकार करतां येत नाहीं. पुनः सर्व प्रतिषेध करणाऱ्याचाही प्रतिषेध होत असल्यामुळें प्रतिषेधाचाही प्रतिषेध होतो, ह्मणून शून्यवादियाला प्रतिज्ञाच करतां येत नाहीं. आतां सताचें ठिकाणीं जे आह्मी जगत्कर्तृत्वादिक धर्म मानतो, तेच जर तूं शून्याचे ठिकाणीं मानून आमचे सारखे ते शून्य स्थायिक मानशील, तर मग ईश्वर तुझ्या गळीं आलाच. अथवा हे वादिन्! तुझ्या शून्याविषयीं काय प्रमाण आहे? ते कोणी जाणले आहे कीं नाहीं? प्रथमपक्षीं शून्य साक्षिभास्य होऊन व्यर्थ होईल, आणि द्वितीयपक्षीं अप्रमाण होईल. पुनः जगत्कारणशक्ति भिन्न

आहे कीं अभिन्न आहे? इत्यादिक प्रश्न जे तूं आह्माला केले होते ते शून्यवादावरही येतात. आतां कार्य भासते, पण शून्यावर कसें होते हें सांगतां येत नाहीं, असें ह्मणशील तर सद्ब्रह्मावर असे भासते असें ह्मटलें ह्मणजे आमच्या वेदान्ताचा स्वीकार झाला.

शिष्य उवाचः—भगवन् श्रीहर्षाचार्यांनीं आपल्या खंडणखंडखाद्य-ग्रंथांत असताचेच कारणत्व प्रतिपादन केलें आहे, ते येणें प्रमाणें:—

"किं च—अंतर्भावितसत्वं चेत्कारणं तदसत्ततः।
नान्तर्भावितसत्वं चेत्कारणं तदसत्ततः॥

तथाहि अंतर्भूतसत्वं यदि कारणत्वं तदा स्वविशिष्टे स्ववृत्तिरंशतः स्वाश्रयत्वमापादयति"॥

यावरील श्रीशंकरमिश्राची टीकाः—असतः कारणत्वमुपपाद्य सतः कारणत्वं खंडयति— किं च इति। कारणे सत्ता विशेषणम् उपलक्षणं वा? यदि विशेषणम् तदा सत्तायामपि कारणत्वमित्यायातं। सत्तायां च न सत्तेत्यसदेव कारणं प्राप्तम्। तत इति। सत्ताविशिष्टे कारणत्वाभ्युपगमा-दित्यर्थः। उपलक्षणत्वे त्वसदपि कारणं प्राप्तं सत्तायाः कारणकोटिबहि-र्भावात्। तत इति। सत्ताया उपलक्षणत्वाभ्युपगमादित्यर्थः। यद्वा कारण-मित्युभयत्र भावप्रधानो निर्देशः। तथा च सत्तायां कारणत्वं वर्तते न वा? इति विकल्पार्थः। आद्ये सदपि कारणं, सत्तायाः सत्ताविरहेणासत्वात्। द्वितीये सत्तायाः सदाकारानुगतप्रत्ययोऽपि न जननीय इति तन्मात्रप्रमा-णिकायाः सत्तायाः विलोपे सर्वकारणमसदेवेति प्राप्तम्। यद्वा कारणं=कारणत्वं अंतर्भावितसत्वं=व्यापकीभूतसत्वं? न वा?। तथा च कारणत्वं सत्ताव्याप्यं? न वा? इति विकल्पार्थः। आद्ये सत्तायां सत्तानिवृत्त्या कारणत्वमपि निवर्तते इति अनुगतप्रत्ययजनकत्वाभावात् प्रमाणाभावेन सत्ताविलोपे सर्वकारणमसदेव प्राप्तम्। अन्त्ये सत्तामपहायापि कारणत्वं वर्तते इति त्वयैवासत्कारणमभ्युपेतमित्यर्थः। वार्तिकार्थं प्रपंचयति—तथा-हीति" (प्रथमपरिच्छेद)

भावार्थः—कारणाचे ठिकाणीं असलेली सत्ता विशेषण आहे कीं उपलक्षण आहे? प्रथमपक्षीं सत्तेचे ठिकाणींही कारणत्व येत आहे, आणि सत्तेचे ठिकाणीं सत्ता ह्मणणें विरुद्ध आहे, ह्मणून कारणत्व हे

असत्त्व असलें पाहिजे. दुसऱ्या पक्षीं तर कारण असत् आहे हें निश्चितच होतें, कारण सत्ता उपलक्षण झाल्यामुळें कारणकोटीहून निराळें ठरतें, ह्मणून याप्रमाणें सत्वाचा अंतर्भाव केला तरी ह्मणजे उपलक्षण मानलें तरी, किंवा सत्वाचा अंतर्भाव न केला तरी ह्मणजे उपलक्षण न मानलें तरी, कारण असतच ठरतें. वर्तमानकालीनस्वरूपप्रविष्ट असून जे व्यावर्तक असतें त्याला विशेषण ह्मणतात, आणि जें स्वरूपबहिर्भूत असून वर्त्तमानव्यावर्तक असतें त्याला उपाधि ह्मणतात, व उपलक्षणही असेंच आहे; पण स्वरूपबहिर्भूत असून तें विद्यमान असतांही व्यावर्तक असतें व अविद्यमान असतांही व्यावर्तक होतें. स्वतः सत्तेला कारण मानतां येत नाहीं, ह्मणून विशेषण किंवा उपलक्षण आहे असेंच मानलें पाहिजे. सर्वत्रसर्वकार्यप्रसंग येत असल्यामुळें किंवा कारकव्यापाराचें वैयर्थ्य येत असल्यामुळें स्वतः सत्तेला कारण मानतां येत नाहीं. ह्मणून तिला कारणाचें विशेषण किंवा उपलक्षणच ह्मणावें लागतें, आणि तसें मानलें ह्मणजे कारण असत् हें ठरतें; कारण खंडणखंडखाद्यांत पूर्वपक्षित्वेंकरून नैय्यायिकांचा स्वीकार आहे, आणि नैय्यायिकाला अनिर्वचनीयपदार्थ मान्य नाहीं; ह्मणून सद्भिन्नत्वास्तव कारणाचे ठिकाणीं असत् प्राप्ति होते, असा फलितार्थ त्याला समजून देतां येतो; किंवा या श्लोकाचा असा अर्थ करावा. कारणत्व हे सत्ताजातिव्याप्य आहे किंवा नाहीं ? प्रथमपक्षीं सत्ता अधिकरणकसत्ता असूं शकत नसल्यामुळें, म्हणजे सत्तेचे ठिकाणीं दुसरी सत्ता आहे असें म्हणतां येत नाहीं, कारण सत्ता एकच आहे म्हणून, किंवा सत्तेचे ठिकाणीं सत्तेची निवृत्ति दृष्टीस पडत असल्यामुळें, कारणत्वही निवृत्त होतें, ह्मणजे असत् होतें; आणि दुसऱ्यापक्षीं सत्ताजातिव्याप्यत्व वादी मानत नसल्यामुळें, कारणाला सत्ता रहित स्वतः असत् मानतो असें सिद्ध होतें; किंवा सत्कारणाचे ठायीं सत्तार्थ आहे किंवा सत्तेचे ठायीं सत्कारणत्व आहे असें ह्मटलें असतां आत्माश्रयदोष येतो.

पूर्वपक्षीः— अहो ! सत्ताविशिष्टदंडादिकारणाचे ठिकाणीं सत्ता दिसतेच ना ? मग आत्माश्रयदोष कसा ?

उत्तरपक्षीः— जसा स्वतःचे ठिकाणीं स्वतः राहतें ह्मणण्यांत

आत्माश्रय आहे, तसा स्वविशिष्टाचे ठिकाणीं स्व राहते ह्मणण्यांतही आत्माश्रय आहेच.

शिष्य उवाचः– हा या वाक्याचा भावार्थ आहे, शब्दार्थ नाहीं. सम्यक्शब्दार्थ पंडितांनीं करून घ्यावा. अथवा येथें माझा भावार्थ चुकला असेल, तरी माझ्या पुढील साध्याला घातक नाहीं इतकेंच माझें सांगणें आहे. तात्पर्य या वाक्यावरून असताला कारणत्व अर्थात् शून्यवाद सिद्ध होत नाहीं काय ?

मध्यस्थ उवाचः– अरे ! या प्रश्नाचे उत्तराकरितां तूं उगीच गुरुमहाराजांना श्रम कशाला देतोस ? मीच याचे उत्तर सांगतो. खंडण-खंडखाद्यग्रंथाचे वाचस्पतिमिश्रानें खंडणोद्धारग्रंथांत खंडण केलें आहे. त्यांत तूं उदाहरलेल्या वाक्याचेही खंडण आले आहे. ते येणेंप्रमाणें.

“ मैवं नहि सर्वेषां कारणानां महासामान्यरूपा सत्तास्माभिरुपेयते प्रतिबंधकाभावादेरपि मया कारणत्वोपगमात् । तथा च तामादाय विकल्प्य यत् खंडणं तच्छलम् । अथ स्वरूपसत्तामेव स्वकारणानां मन्यसे इति तामेवाहं विकल्पयामीति ब्रूषे तदपि न स्वरूपसत्तया हि वस्तुत्वमनलीकत्वं प्रमाणगम्यत्वं वा तच्च धर्मिविशेषणम् । स्वरूपसत एवोक्तरूपस्य मया नियतपूर्ववर्तित्वलक्षणकारणत्वोपगमात् । इयं च स्वरूपसत्ताधर्मिण्यन्याकारणत्वे चान्येति क्वात्माश्रयः ” ।

भावार्थः—हें ह्मणणें सम्यक् नाहीं, कारण सर्वकारणांची परसामान्यरूपसत्ता आह्मी अंगिकार करीत नाहीं, तर प्रतिबंधकाभावाला देखील कारणत्व मानतो. ह्मणून कारणाची महासामान्यसत्ता आह्मी नैय्यायिक मानतो असें समजून त्याविषयीं विकल्प करून खंडण करणें छल आहे.

पूर्वमानीः—अरे पण स्वरूपसत्ता तरी तूं कारणाचे ठिकाणीं मानतोस ना ? तिलाच आह्मी विकल्पून खंडण करितो.

उत्तरमानीः—पण तसें मी कोठें मानतो. स्वरूपसत्तेनें वस्तुत्व, अनलीकत्व, प्रमाणगम्यत्व धर्मीविशेषण आहे; पण ही स्वरूपसत्ता ज्याची आहे त्याचे कार्यापूर्वी नियमानें असणें मात्र मी कारणत्व ह्मणतो. म्हणजे स्वरूपसत्ता ही एक धर्मीचे ठिकाणीं आहे, आणि कारणत्वाचे

ठिकाणीं अन्यसत्ता आहे; कारण कारणत्वही उक्तलक्षणाचे होते. तर आत्माश्रय कसा असणार ? स्वव्यावर्तकविशेषानें याची व्याख्या समजावी.

सिद्धान्ती उवाचः—आपण मध्यस्थ आहां, तेव्हां आपणाशी सच्छिष्याला उत्तमच समजून दिले पाहिजे. खंडणखंडखाद्य अद्वैतग्रंथ आहे. याचें खंडण वाचस्पतिमिश्रानें केले आहे खरे, परंतु ते सम्यक् झाले नाहीं. खंडणखंडखाद्याची योग्यता अद्वैतवादांत मोठी आहे. स्वामीविद्यारण्यानीं देखील पंचदशींत त्याची प्रशंसा आहे. हा ग्रंथ वैतंडिक आहे, पण त्याचे खंडण तितके वैतंडिक झालें नाहीं. आतां खंडणोद्धाराचेही खंडण मला करावयाचे आहे, परंतु मी केव्हां तरी करीन. प्रस्तुत तुह्मी उदाहरलेले वाक्य योग्य नाहीं हें मी दाखवितो. कारण सत्तेचा जो भेद झाला आहे तो विशेषानें झाला आहे असें ह्मटल्यास त्याला स्वतःलाच व्यावर्तक व्हावें लागेल. विशेष हे निःसामान्य आहे आणि कारणत्व सामान्य आहे. आतां अपेक्षाबुद्धीनें, अल्पबहुत्वानें त्याचा भेद केल्यास इतके पदार्थ सत् आहेत असे श्रद्धावत्व सिद्ध होते, यौक्तिकत्व सिद्ध होत नाहीं, पण अशा प्रकारचा सत्तेचा भेद उपाधिवांचून संभवत नाहीं. अभावाच्या एकत्वास्तव त्याचा भेद जसा उपाधीनें होतो, त्याप्रमाणें सत्तेच्या एकत्वास्तव त्याचाही भेद उपाधीनेंच झाला पाहिजे. नाना पदार्थ सत् आहेत हे प्रत्यक्षप्रमाणानें सिद्ध करणें कठिण आहे, आणि कितीही झालें तरी प्रत्यक्ष तिन्ही कालाला व्यापक नसल्यामुळें तत्पूर्वक अनुमानानें देखील ते सिद्ध होत नाहीं; अथवा कारणत्वादि अपरसामान्य किंवा विशेष महासामान्यसत्तेहून भिन्न आहेत कीं अभिन्न आहेत ? प्रथमपक्षीं त्याहून पृथक् व व्यावृत्त अशी महासामान्यसत्ता ईश्वरावांचून गोचर होणार नाहीं, किंवा ईश्वराचे ठिकाणींही राहणार नाहीं, कारण ईश्वराचे ठिकाणीं देखील द्रव्यत्व अपरसामान्य आहे; ह्मणून त्याहीपेक्षां परसामान्यसत्ता अन्यत्र राहिली पाहिजे, आणि तसें मानल्यास ते ईश्वरादिक विभुद्रव्य होणार नाहींत. आतां परसामान्यसत्ताही त्यांतच मानल्यास द्रव्यत्वादिक जातीहून आणि द्रव्यत्वादि व्यक्तीहून तिचे पृथक्त्व उपलब्ध होत नाहीं. ह्मणून

त्तेची कल्पना करणें व्यर्थ आहे. किंवा सर्व अपरसामान्यवान् पदार्थांचे ठिकाणीं असल्यामुळें परसामान्याचा भेद केल्यास अपरसामान्याचा परसामान्यसत्तेहून भेद करतां येणार नाहीं; ह्मणून महासामान्यान्यसत्तेची कल्पना करणें व्यर्थ होईल. एवढ्याकरितां स्वरूपसत्ता घेऊनच खंडणखंडखाद्यकारांचा विकल्प सिद्ध होतो. ईश्वरच महासामान्यरूप समजून त्या सत्तेचा उपाधीनें भेद मानल्यास इतरकारणत्वादिकांचे ठिकाणीं असत्यत्व स्थापन होते. अथवा ज्या विशेषानें नानासत्तेची व्यावृत्ति होते ते विशेष सत् आहे कीं असत् ? प्रथम पक्षीं सत्तेच्या एकत्वप्रत्ययानें त्यांचे निःसामान्यत्व जाऊन विशेषत्व नाहींसे होते; आणि द्वितीयपक्षीं तद्व्यावर्तसत्तेचे मिथ्यात्व सिद्ध होते. अथवा कारणत्व सत्तेची विशेषानें व्यावृत्तीच होत नाहीं; कां ह्मणाल तर विशेष हा नित्यद्रव्यवृत्ति आहे, अन्यवृत्ति नाहीं, आणि वाचस्पतीनें (खंडणोद्धारकारानें) तर प्रतिबंधकाभावालाही कारणत्व मानलें आहे. विशेष अभाववृत्ति होत नाहीं. अभावाचें खंडण आह्मी आतांच केलें आहे. अभावाला सत्ता नाहीं ह्मणून कारणत्वाचे ठिकाणीं धर्मीसत्तेहून भिन्न सत्ता आहे हें खंडणोद्धाराचे ह्मणणें व्याघातदूषित आहे. अथवा कारणत्वसत्ता जन्य आहे कीं जनक आहे ? असें आह्मी या न्यायपोशिंद्या सारोद्धारकाराला विचारतो. पैकीं आद्यपक्ष समीचीन नाहीं; कारण सत्तेचे जन्यत्व काय सत्तेपासून कीं असत्तेपासून ? पैकीं प्रथमपक्ष अंगिकारल्यास उपाधीवांचून सत्तेची भेदसिद्धि होत नसल्यामुळें कारणत्वाला असत्व येते. अथवा जन्यसत् कारण ह्मणतांच येत नाहीं, त्याला कार्यत्व येते ह्मणून. असत्तेपासून जन्य सत्ता मानल्यास खंडणोद्धारकारांच्या बोलण्यांत वदतो व्याघात होतो, व शेवटीं कारणत्व असत् सिद्ध होते. ह्मणून आतां दुसरा पक्ष जी जनकसत्ता तीही कारणाचे ठायीं मानतां येत नाहीं. जनक व कारण एकच असल्यामुळें आत्माश्रयदोष येतो ह्मणून, किंवा जनकसत्ता कारणाची मानल्यास कार्याचा जन्मसत्तेनें चरितार्थ झाल्यामुळें पृथक् महासत्ता मानणें व्यर्थ होईल. किंवा अभावाला या न्यायपोशिंद्यानें कारणत्व मानलें आहे व त्याचे ठिकाणीं जनकसत्ता संभवतच नाहीं. अभावकारणाचे ठिकाणीं जर सत्ता आहे

तर ती काय भावरूप आहे कीं अभावरूप आहे ? प्रथमपक्ष संभवत नाहीं. कां म्हणाल तर अभावाचे ठिकाणीं भाव आहे हें ह्मणणें व्याघातदुष्ट आहे. संख्या जरी अभावाचा आश्रय करिते, तरी ते षट्पदार्थांच्या व्यावृत्तिरूपउपाधिद्वारा करिते, किंवा प्रतियोगीरूपउपाधिद्वारा करिते स्वत: करीत नाहीं. दुसरा पक्ष मानल्यास आत्माश्रयदोष येतो. यद्यपि उपाधिद्वारा देखील असताचा आश्रय होत नसल्यामुळें अभावाच्या असत्वाचे आह्मी पूर्वी निराकरण केले, तथापि त्याला अनिर्वचनीयअविद्याकल्पितत्व सांगितलें, पण नैय्यायिकाला तर भावविजातियत्व मानावें लागते ह्मणून आमच्या बोलण्यांत विरोध नसून सारोद्धारकाराचे मात्र उत्तम खंडण केलें आहे. ते मी आपल्या बुद्धीनेंच नवीन केल्यामुळें त्यांत झालेल्या चुकांची पंडितांनीं सुधारणा करून मज लेंकराचे कौतुक करावें. शिवाय विद्यासागरीआदि टीकामध्यें माझ्या म्हणण्यापेक्षां निराळें लिहिलें आहे, तेंही पहावें. हे मध्यस्थाच्या म्हणण्यावर समाधान सांगितलें. पण एवढ्यानें शून्यवाद मात्र सिद्ध होत नाहीं. कारण अद्वैतसिद्धींत हाच असत: साधकत्ववाद मिथ्यात्वानुमानविचारांत घेतला आहे, आणि खंडणखंडखाद्यांतही प्रमाणादिविचारांत आला आहे. अशा प्रकारचे सत्तानानात्व जर वादी सिद्ध करील, तर त्याचे स्वप्नही साध्य होईल; कारण अशा प्रकारचा सत्ताभेद स्वप्नांतही आहे, पण त्याचा बाध होतो; आणि जागृत्नानासत्तेचाही श्रुतीनीं बाध सांगितला आहे. ह्मणून सत्ताभेदाला अविद्याच कारण आहे, आणि आविद्यक जे व्यावहारिकसत्व तेच साधक होते पण परमार्थत: सत् नसते हेंच असत: बाधकत्व आहे असें अद्वैतसिद्धिकारानें ह्मटलें आहे ते येणेंप्रमाणें:—

" वस्तुतस्तु ज्ञाताज्ञातसाधारणं व्यावहारिकं सत्यमेव साधकत्वे तंत्रम् । वस्तुतस्तु साक्ष्यप्यज्ञानोपहित एवाज्ञानादिसाधकः । स च व्यावहारिक एव । अनुपहिते न परमार्थसदाकारेण तस्यासाधकत्वात् । व्यावहारिकसत्वमेव सर्वत्रसाधकतायां प्रयोजकमिति स्थितिः ।

( अद्वैतसिद्धि प्रथम परिच्छेद )

भावार्थः— वस्तुतः व्यावहारिकसत्वच साधक आहे, पारमार्थिक नाहीं. साक्षि देखील अज्ञानोपहित असल्यासच साधक होतो, म्हणून

येथें साक्षी व्यावहारिकच आहे, कारण उपाधिरहित शुद्धपारमार्थिकसत्व कशाचेंच होऊं शकत नाहीं; म्हणून व्यावहारिकसत्वच साधक आहे, आणि साधकत्वाला व्यावहारिकसत्वच पुरे आहे; पारमार्थिकसत्वाची अपेक्षा नाहीं. याच अभिप्रायानें खंडणखंडखाद्यांत असतःकारणत्व उपपादिलें आहे, आणि सत्कारणाचे खंडण केलें आहे. असें न मानल्यास " सदेव सोम्येदमग्रआसीत् " इत्यादि श्रुतीशीं व त्यावरील भगवत्पूज्यचरणभाष्याशीं खंडणखंडखाद्याचा विरोध येईल. आतां अद्वैतसिद्धीचे तरंगिणींत खंडण केलें आहे, तर तिचेही गौडब्रह्मानंदादि ग्रंथांत खंडण आहेच; पण अनुभवानें अद्वैतवादाचे अंतस्त्व आणि इतरांचे बाह्यत्व हेंच अद्वैतभिन्नमंडणाला अधिक्षेपक पुरे आहे. शिवाय शुष्क शब्दवाद सोडून या जन्मांत व अनेक जन्मांत अद्वैतभिन्नमतांचे खंडण करण्यास मी सज्जही आहे.

शिष्य उवाचः— महाराज ! योगवासिष्ठांत व इतर ग्रंथांत ब्रह्मवादांत शून्यवादाचाही किंचित् समावेश केला आहे, आणि सूतसंहितेंत किंचित् बुद्धागमाला आश्रय दिला आहे; तेव्हां त्यांचा शून्यवाद निष्फळ कसा ? शिवाय बुद्धाला जसे आपण परमेश्वराचा अवतार मानतो, तसें इतर मानत नाहींत; तेव्हां परमेश्वराचे ठिकाणीं विप्रलिप्सा कशी संभवते ?

श्रीगुरू उवाचः— वत्स ! श्रवण कर. अहिंसादि धर्म सत्ववर्धक असल्यामुळें उपकारकच आहेत, आणि शिवाय " निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं । सदयहृदयदर्शितपशुघातं । केशवधृतबुद्धशरीर जय जय देव हरे " ॥ असें जयदेवस्वामींनीं ह्मटलें असून, कर्मकांडाची फक्त निंदा केली, ज्ञानकांडाची नाहीं असें त्यावरील एका टीकाकारानें ह्मटलें आहे. स्वामी विद्यारण्यांनीं तर आपल्या सर्वदर्शनसंग्रहांत " यद्यपि भगवान् बुद्ध एक एव बोधयिता तथापि बोद्धव्यानां बुद्धिभेदात् चातुर्विध्यं " असें स्पष्ट ह्मटलें आहे. आतां शून्याचा अर्थ देखील बौद्धग्रंथांत नागार्जुनादिकानीं असा उत्तम करून ठेवला; तो येणेंप्रमाणेंः—

सर्वालंबनधर्मैश्च सर्वतत्वैरशेषतः ।
सर्वक्लेशाशयैः शून्यं न शून्यं परमार्थतः ॥

अर्थः—जगांतील सर्व धर्म व धर्मी, क्लेश आणि वासना यांनीं ते रहित आहे ह्मणून शून्य ह्मणावयाचे, असत् आहे ह्मणून शून्य म्हणावयाचे नाहीं. याप्रमाणें बौद्धदर्शनसहकारी नागार्जुनाचें वचन असून आलोकमालानामक ग्रंथांत असेंच ह्मटले आहे.

विरुद्धत्वात्तमोवृत्तेर्नावकाशं ददाति या। सावस्था काप्यविज्ञेया मादृशा शून्यतोच्यते ॥ न पुनर्लोकरूढ्यैव नास्तिक्यार्थानुपातिनी ॥

अर्थः—विरुद्ध अशा तमोवृत्तीला जे अवकाशच देत नाहीं अशी जी असदवस्था ती शून्यशब्दाचा अर्थ आहे. अत्यंत असत्पणा किंवा अत्यंत अभाव असा लोकांत रूढ असलेला शून्याचा अर्थ आह्मी घेत नाहीं. याप्रमाणें कूर्मपुराणांत अभावयोगही सांगितला आहे. याप्रमाणें विचार केला असतां चार्वाकदर्शनासारखा शून्यवादही वेदान्तोपजीव्य आहे, तथापि हे जीवन्मुक्तांच्या मौनास हेतु असो, परंतु वैदिकांनां स्वतंत्र मोक्षदायक नाहीं, एवढेंच आमचें ह्मणणें आहे.

वादी उवाचः—"यत्सत्तत् क्षणिकं लयोत्पत्तिमत्वात् विद्युदादिवत्" जें आहे तें क्षणिक आहे, त्याची उत्पत्ति लय होत असल्यामुळें, बीज किंवा मेघपटलादिकाप्रमाणें. ह्या अनुमानानें जगत् क्षणिक असल्यामुळें अर्थातच कोणी त्याचा कर्त्ता आहे असें सिद्ध होत नाहीं, कारण कर्त्ता उपादानाचे पूर्वी असावा लागतो.

सिद्धान्ती उवाचः—या क्षणिकत्वाचेंही प्रस्थान शेवटीं शून्यवादांतच असल्यामुळें, शून्यवादावर जे आह्मी दोष दिले, ते सर्व क्षणिकवादावरही येतात. ह्या क्षणिकवाद दोन प्रकारचा आहे. (१) बाह्य पदार्थ आहेत पण ते क्षणिक आहेत (२) आणि विज्ञान क्षणिक आहे व बाह्यपदार्थ मुळींच नाहींत. त्यापैकीं तूं कोणत्या क्षणिकपक्षाचा आश्रय करतोस ?

वादी उवाचः—मी क्षणिकविज्ञानपक्षाचा आश्रय करितो. मी आहे अशा प्रकारचा जो प्रत्यय हे आलयविज्ञान, आणि नीलपीतघटपट इत्यादि आकाराचे होणारे प्रवृत्तिविज्ञान. ही दोन्ही विज्ञानें आंतर असून, बाह्य म्हणून पदार्थ कांहीं नाहीं. स्वप्नामध्यें जसें विज्ञान भासते, तसें जागृतींतही सर्व विज्ञानच भासते. प्रवृत्तिविज्ञान हे नाना आका-

याचे होत असून, आलयविज्ञान क्षणिक आहे, पण याची एकसारखी धारा राहून प्रवृत्तिविज्ञानाचा उच्छेद होणें याला आह्मी मोक्ष म्हणतो.

सिद्धान्ती उवाचः—हें तुझें ह्मणणें सम्यक् नाहीं. तुमच्या मतामध्यें विज्ञानच जर सर्व आहे, तर आंतर आणि बाह्य असा देशभेद तरी आला कोठून? पदार्थ तर देहाच्या अपेक्षेनें बाहेर भासतात, पण तुमच्या मतांत देशभेदच सिद्ध होत नसल्यामुळें आंतरविज्ञान बाहेर भासूंच शकणार नाहीं. तसेंच तुमचें हें विज्ञान क्षणिक असल्यामुळें त्याला शिष्याला उपदेशही करतां येणार नाहीं, कारण शिष्याच्या कानावर गुरूचा शब्द जाईपर्यंत अनेक क्षण होतात. आतां बुद्धगुरूच्या तोंडांतून निघून शिष्याच्या कानावर शब्द जाईपर्यंत अनेक सजातीय शब्द उत्पन्न होतात, अशी शब्दाची धारा मानणें तुम्हाला इष्ट होणार नाहीं, कारण सजातीयत्व किंवा सादृश्यत्व हेंही क्षणिक असल्यामुळें पूर्वक्षणिकाचा नाश झाल्यावर ते उत्तरक्षणिकाशीं संबद्ध होणार नाहीं. आतां क्षणिक अधिष्ठानाचे ठिकाणीं सादृश्याचा किंवा सजातीयत्वाचा स्थीरत्वभ्रम होतो असेंही म्हणतां येणार नाहीं, कारण ते क्षणिकपदार्थही तुमच्या मतांत भ्रमानेंच भासत आहेत.

वादी उवाचः—पदार्थाचें ज्ञान होते, याहून अन्यपदार्थ आहे असें निश्चित नाहीं, आणि त्याला कांहीं प्रमाणही नाहीं, म्हणून पदार्थाचें ज्ञानच पदार्थ आहे असें म्हटलें पाहिजे.

सिद्धान्ती उवाचः—अरे पदार्थाचें ज्ञानच पदार्थ आहे असें म्हणणाऱ्या तुलाही आम्ही असें विचारितो कीं, ते ज्ञान पदार्थानुकूल होते किंवा ज्ञानानुकूल पदार्थ भासतात. पहिल्यापक्षीं ज्या पदार्थाचा संस्कार होतो असा कांहीं पदार्थ तुला मानला पाहिजे, व त्यानें विज्ञानवादाची हानी होते; आणि दुसऱ्यापक्षीं घटाचें ज्ञान पटाकार व पटाचें ज्ञान घटाकार होणें संभवनीय असल्यामुळें लोकव्यवहाराचा लोप होईल. पुनः क्षणिक पदार्थाचें ठिकाणीं जन्मावांचून दुसरा व्यापारच संभवनीय नसल्यामुळें, भविष्यत्प्राप्यपदार्थाची किंवा भूतपदार्थाची स्मृति तुमच्या ठिकाणीं अनुपपन्न होईल. पुनः क्षणिकविज्ञान उत्पन्न करणारी भ्रांती निराधिष्ठान असल्यामुळें, ती एकवेळ नष्ट झाल्यावर पुनः उत्पन्न होणार

नाहीं, असा नियम तुम्हाला करतां येणें शक्य नसल्यामुळें, प्रवृत्तिज्ञानाचा सर्वथा उच्छेद होऊन आलयविज्ञानधारारूप जो मोक्ष तोही होणार नाहीं. अथवा आलयविज्ञान क्षणिक आहे हें म्हणण्याला तुमच्या जवळ कांहीं प्रमाणच नाहीं, कारण दोन अहंची स्मृति कोणालाही उपपन्न नाहीं. पुनः सर्व विज्ञानरूप असल्यामुळें, व विज्ञान क्षणिक असल्यामुळें, पूर्वघटाकारविज्ञान नष्ट झाल्यावर पटाकारविज्ञानाचे कालीं पूर्वविज्ञानाची स्मृति होणेंच संभवनीय नसल्यामुळें वर्त्तमानक्षणिकविज्ञान प्रत्यक्षच होईल, तसें झालें म्हणजे अर्थातच प्रतिज्ञाकारविज्ञान हेत्वाकार विज्ञानक्षणीं अनुपपन्न होईल, आणि याचप्रमाणें साध्यक्षणीं हेत्वाकार विज्ञान अनुपपन्न होईल, आणि दृष्टान्ताकारक्षणीं साध्याकारविज्ञान अनुपपन्न होईल. तात्पर्य तुझ्या मतांत अनुमानप्रमाण संभवणारच नाहीं; आणि त्यामुळें जे जे आहे तें ते क्षणिक आहे असें म्हणणाऱ्या तुझें बोलणें माझी माय वंध्या आहे असें म्हणण्याप्रमाणें व्यर्थ आहे. पुनः विज्ञान क्षणिक आहे असें म्हणण्यांत विज्ञानभिन्नकालाला तुला अंगिकार केला पाहिजे. आतां विज्ञानच क्षणिकादिक आकाराचे होते असें म्हणशील तर साध्य व साधक एकच होत असल्यामुळें आत्माश्रयदोष येतो. हे वादिन् तुझें जें म्हणणें कीं, स्वप्नांत जसे एकच विज्ञान ग्राह्यग्राहकप्रत्ययानें भासते तसेंच जागृतींतही भासते. या तुझ्या म्हणण्याचें नैय्यायिक खंडण असें करितात–स्वप्न हे स्मृति आहे, आणि बाह्य पदार्थ उपलब्धही आहेत. स्मृति आणि प्रत्यक्षज्ञान यामध्यें पुष्कळ फरक असतो. एकादी गोष्ट आपण पाहतो, आणि एकाद्या गोष्टीचे स्मरण करितो, तितकाच भेद जागृतींत व स्वप्नांत आहे. पुनः स्वप्नातले विषय प्रतिदिवशीं नष्ट होत असतात, आणि जागृतींत विषय कधींच नष्ट होत नाहींत. हा जो जागृतींत व स्वप्नांत असलेला मोठा भेद तुझ्या ध्यानांत आला नाहीं. आतां वेदान्तीही तुझ्या मताचें खंडण कसें करितात, तें सांगतो ऐक.

" वैधर्म्याच्च न स्वप्नादिवत् " (ब्रह्मसूत्र अ० २ पा० २)

या सूत्रावर आचार्यांनीं नैय्यायिकांच्या मताला अनुसरून भाष्य केलें आहे, कारण स्वप्नाला स्मृति म्हटलें आहे म्हणून. आनंदगिरीनें

परलोकाविषयीं स्वप्न प्रत्यक्षप्रमाण आहे, असें बृहदारण्यकाच्या टीकेंत म्हटलें आहे. आतां वेदान्ताला अनुसरून या सूत्राचें भाष्य असें आहे.

" स्वप्नादिवत् विज्ञानं न भवितुमर्हति । कुतः । वैधर्म्यात् । प्रसिद्धं हि वैधर्म्यं विज्ञानस्वप्नयोः । विज्ञानं किंलक्षणकं तवाभिमतम् । स्वाप्नपदार्थास्तु यावत्स्वप्नं स्थिरा भवन्ति । स्वप्नेऽपि बाह्यान्तरभेदोऽस्त्येव । पुनश्च साधिष्ठाना स्वप्नभ्रांतिर्भवति । तव विज्ञानभ्रांतिस्तु निरधिष्ठाना । स्वप्नः क्षणिकइत्येव न नियमः । प्रत्युत क्षणमात्रकालेऽपि स्वप्ने द्वादशवर्षादीनां भानं प्रसिद्धम् । एवं मायादावप्यूहनीयम् । तस्मान्न विज्ञानं स्वप्रादिवत् दृष्टान्तवैषम्यात् । श्रीमच्छंकराचार्यैः जागृत्स्वाप्नसाम्यमुपपादितम् संध्यधिकरणे । तच्च व्यावहारिकसत्वमात्रपरमितिचेत् प्रातिभासिकतयाऽप्युभयोः साम्यं मांडुक्यकारिकायाः वैतथ्यप्रकरणे प्रतिपादितम् भगवत्पूज्यपादचरणैः । " स्वप्नमाये यथा दृष्टे गंधर्वनगरं यथा । तथा विश्वमिदं दृष्टं वेदान्तेषु विचक्षणैः " । भाष्यम्:—यदेतद्द्वैतस्यासत्वमुक्तं युक्तितस्तदेतद्वेदान्तप्रमाणावगतमित्याह । स्वप्नश्च माया च स्वप्नमाये असद्वस्त्वात्मिके असत्यौ सत्यौ सद्वस्त्वात्मिके इव लक्ष्येते अविवेकिभिः । यथा च प्रसारितपण्यापणगृहप्रासादस्त्रीपुंजनपदव्यवहाराकीर्णमिव गंधर्वनगरं दृश्यमानमेव सदकस्मादभावतां गतं दृष्टम् । यथा च स्वप्नमाये दृष्टे असद्रूपे तथा विश्वमिदं द्वैतं समस्तमसत् दृष्टम् । केत्याह । वेदान्तेषु "नेहनानास्ति किंचन"। इंद्रो मायाभिः " । आत्मैवेदमग्र आसीत् । ब्रह्मैवेदमग्र आसीत् " । द्वितीयाद्वै भयं भवति " । न तु तद्वितीयमस्ति । " यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत् " इत्यादिषु । विचक्षणैर्निपुणतरवस्तुदर्शिभिः पंडितैरित्यर्थः । तमःश्वभ्रनिभं दृष्टं वर्णबुद्बुदसंन्निभं नाशप्रायं सुखाद्धीनं नाशोत्तरमभावगम् " इति व्यासस्मृतेः " । एवं अद्वैतसिद्धावप्याहुर्मधुसूदनाचार्याः । विद्यारण्यस्वामिनोऽप्याहुः पंचदश्याम् ।

भावार्थः— विज्ञान हे स्वप्नादिकांप्रमाणें असल्यास योग्य नाहीं कां ? दोघांचेही धर्म सारखे नाहींत म्हणून. स्वप्नांतले व तुझ्या विज्ञानांतले वैधर्म्य प्रसिद्ध आहे. कसे ते पहा. तूं मानलेले हे विज्ञान क्षणिक आहे, आणि स्वप्नांतले पदार्थ स्वप्न असेपर्यंत स्थिर असतात. स्वप्नामध्यें देखील हे पदार्थ बाह्य व हे पदार्थ आंतर असा भेद दिसत असतो.

ह्मणून नाथांनीं " स्वप्नीचा देह होय ज्ञान । त्या देहासी आहे मनपण " असें ह्मटलें आहे. पुनः स्वप्नभ्रांतीला अधिष्ठान आहे, तुमच्या भ्रांतीला कांहीं अधिष्ठान नाहीं. स्वप्न क्षणिक असें तुह्माला निश्चयानें ह्मणतां येणार नाहीं, कारण थोडा वेळ दिसलेल्या स्वप्नांत देखील बारा बारा वर्षांचा भ्रम होत असतो. याप्रमाणें मायादिकांतही समजावें. तुह्मी दिलेला दृष्टान्त विषम असल्यामुळें विज्ञान हे स्वप्नाप्रमाणें आहे असें ह्मणतां येत नाहीं. श्रीमत् शंकराचार्यांनीं देखील याच ग्रंथांत तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या अधिकरणाच्या भाष्यांत जागृत जगत् व स्वप्न साम्य प्रतिपादन केलें आहे, पण ब्रह्मज्ञानपर्यंत जगत् राहते व स्व प्रतिदिवशीं नष्ट होत असते, असें तेथेंच ह्मटलें असल्यामुळें, तेथें सत्तात्रयवादानुसार व व्यावहारिकसत्वमात्र दाखविलें आहे, असें ह्मणशील तर दोन्ही प्रातिभासिक आहेत, असें देखील मांडुक्यकारिकाभाष्यांत शंकराचार्यांनीं सांगितलेंच आहे. कारिकेसहित त्यांचे भाष्याचा अर्थ सांगतो.

कारिका अर्थ–ओव्या—स्वप्न आणि माया । कां गंधर्वनगरीची छाया । जैसे देखलीया । देखणें मात्र ॥ २८० ॥ तैसें विश्व हें आघवे । नाहींच तंव स्वभावें । परि दिसे कां संभवे । तो अविद्याविलासू ॥२८१॥

भाष्याचा अर्थः—एवं सांगितलीया युक्ति । देवमायेनी रूपप्रतीती । ब्रह्मीं नाहीं नानात्वभ्रांति । इत्यादि श्रुतिप्रमाणशत ॥ २८२ ॥ असतां नाशप्राय । नाश झालिया अभावचि होय । ऐसी व्यासस्मृतिही आहे । प्रमाण येथ ॥ २८३ ॥ एवं अद्वैतसिद्धींत आणि पंचदशींत । बोलिले विद्यारण्यमुनि आणि मधुसूदनपंडित । यास्तव स्वप्नादिकांसमान न ह्मणावा येथ । विज्ञानवाद व्यर्थ तुवां ॥ २८४ ॥ ब्रह्मोत्तरखंडी शारदेचे स्वप्न । पूर्वजन्मभ्रतारसुख संपूर्ण । एवं आगमेंही स्वप्नासमान । विज्ञान जाण सर्वथा नव्हे ॥ २८५ ॥ आतां अवघेचि विज्ञान जगी । वासना कवणा होईल तरी । यालागीं आलयविज्ञानपुरी । वासना नोवरी मिरवूं न शके ॥ २८६ ॥ बाह्यार्थाची वृथा वल्गना । तव विज्ञानवासना कायसी विज्ञाना । संबंधचि नाहीं तव निर्वाणा । जाईल कवण बुद्धाच्या ॥ २८७ ॥ मग बुद्धोपदेश झाला व्यर्थ । आणि तूं योगाचार

ष्य तयाचा उन्मत्त । तुजसी प्राप्त । होवावें कोणी ॥ २८८ ॥ तंव शिष्य ह्मणे भगवंता । बुद्धविज्ञानवादेंही कचित् पाहतां । जिंकिले आहे भेदपथा । जाणारियातें ॥ २८९ ॥ श्रीगुरु ह्मणती ते हो का तैसे । तेथही अनादिब्रह्म मानिलें असें । इतर कार्यप्रपंच विलसे । क्षणभंगसम ॥ २९० ॥ हे बोलिले स्वामी मधुसूदन । अद्वैतसिद्धींत संपूर्ण । ते बुद्धही तोषावा ह्मणोन । वेदान्तानें ॥२९१॥ (चूर्णिका) अधिष्ठानेंकरून । विज्ञानवादांतही ईश्वर उपपन्न । कां आलयविज्ञानजातित्वेंकरून । तत्प्रेरक परमात्मा उपपन्न । एवं विज्ञानवादेंकरून । ईश्वराधिक्षेप घडेना ॥२९२॥ खरे हो कां ऐसे । भिन्नाभिन्नादिपक्षपिसे । प्राप्त होय स्वपक्षदोषे । विज्ञानवादियासी ॥ २९३ ॥ किंवा यावत् दृष्टि तावत् सृष्टि । आह्मी मानितो स्थैर्यपुष्टि । यालागीं क्षणिकविज्ञानमयसृष्टि । वेदान्ती या गोष्टी न करिती ॥ २९४ ॥

वादी उवाच:— अहो विज्ञानवादाचे तुह्मी तर्कानें खंडण केलें आहे, पण आह्माला तरी तो निश्चयानें संमतच आहे असें मात्र नाहीं. बाह्यपदार्थ प्रत्यक्ष आहेत असेंही आम्ही मानण्याला नाहीं म्हणत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः—शास्त्राणि यत्र गच्छन्ति तत्र गच्छन्ति ते नराः
मतयो यत्र गच्छन्ति तत्र गच्छन्ति वानराः ॥ १ ॥

नर शास्त्रानुसार चालतात व वानरे बुद्धि जाईल तिकडे जात असतात. तुझ्या निश्चयाविषयींही श्लोकाचा उत्तरार्ध प्रमाण आहे; पण बाह्यपदार्थप्रत्यक्ष मानलें, तरी ते क्षणिक असल्यामुळें, विज्ञानपक्षांतील क्षणिकत्वावर आलेले सर्व दोष याही पक्षावर येतात. सर्वच बाह्यपदार्थ प्रत्यक्ष मानल्यास तुझ्या पणज्याचा पणजाही तुला प्रत्यक्ष मानावा लागेल; आणि तसा तर कोणास अनुभव नाहीं.

वादी उवाचः— तर मग सर्व बाह्यपदार्थ अनुमेय आहेत असें ह्मणण्याला हरकत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— तसें मानलें ह्मणजे तुझा देहही तुला अनुमेय मानावा लागेल. हें अनुभवविरुद्ध आहे, आणि तुला बाह्यपदार्थ अनुमेय आहेत असें सांगताही येणार नाहीं; कारण तुझा शब्द एक-

णाऱ्याला अनुमेय आहे असें तुला मान्य करावें लागत असल्या तूं बोलत आहेस या विषयींच तुला हेतु सांगावा लागेल; आणि तो देखील शब्दानेंच सांगावा लागेल, याप्रमाणें विकलता होते. पुनः बाह्यप्रत्यक्षवादी व बाह्यानुमेयवादी या सर्वांना आम्ही असें म्हणतो कीं, आंतर व बाह्य यावांचून कांहीं पदार्थ शेष आहे किंवा नाहीं ? आहे म्हणाल तर प्रतिज्ञा हानि होते, व नाहीं म्हणाल तर या नाहींपणाला आंतर किंवा बाह्य कोठेंतरी स्थापावा लागतो. नाहींपणा आंतर म्हट-ल्यास बाह्य पदार्थ सर्व आहेतच असें होईल, आणि नाहींपणा बाह्य म्हटल्यास सर्वच पदार्थ आंतर आहेत असें होईल; पण असें झाल्याने पहिल्यापक्षीं ज्यांनां ईश्वर दिसला नाहीं अशांना तो ईश्वर बाह्यपदार्थ असल्यामुळें सत्य मानावा लागेल, आणि द्वितीयपक्षीं ज्यांच्या मनांत ईश्वराविषयीं श्रद्धा आहे, ती आंतर असल्यामुळें सत्य आहे म्हणून, तिचा विषयही सत्य मानावा लागेल. तसें झाले म्हणजे ईश्वराचा आंत-रसत्यपदार्थांमध्यें अंतर्भाव होईल. आतां ईश्वराविषयींचा लोकांस भ्रम होतो असें म्हणतां येणार नाहीं, कारण तो काय बाह्यपदार्थावर होतो कीं आंतरपदार्थावर ? प्रथमपक्ष सुसंगत नाहीं; कारण भ्रमाला अधिष्ठान अज्ञात असावें लागते, आणि तुझ्या मतांत तर प्रत्यक्ष किंवा बाह्यपदार्थ सर्व ज्ञात आहेत; आणि द्वितीयपक्षही योग्य नाहीं, कारण आंतरपदार्थ कांहीं अज्ञात आहेत असें मानल्यास, ज्ञात जे आंतर बुद्ध्यादिक त्याहून ते निराळेच असले पाहिजेत; आणि तसें ते निराळे झाले म्हणजे वेदांताच्या आत्म्यांत अंतर्भूत होतात. वेदान्ताच्या आत्म्यावर ईश्वराचा भ्रम झाला म्हणशील तर आम्हाला इष्टापत्तीच आहे. कारण वेदान्ताच्या आत्म्यालाच आम्ही ईश्वर मानीत असल्यामुळें, परमेश्वराविषयींचा लोकास भ्रम नाहीं असें आम्ही स्पष्ट म्हणतो. आतां नाहींपणा यावर जर परमेश्वराचा भ्रम झाला आहे असें म्हणशील, तर परमेश्वराचाच नाहींपणावर भ्रम व्हावा, आणि जगाचा होऊं नये याला काय नियामक आहे ? प्रत्यक्षत्व व अनुमेयत्व भ्रमाचेही ठिकाणीं असूं शकते. शुक्तिरजतादिभ्रम प्रत्यक्ष आहे; व परस्वप्नादिभ्रम ओसणणें आदिहेतुस्तव अनुमेय आहे. नाहींपणावर भ्रम होतो असें

मा त्यास मागें शून्यवादावर आणलेले सर्व दोष तुझ्या मतावर येतात. शिवाय बाह्यप्रत्यक्षवादी व अनुमेयवादी सर्वास्तित्ववादी बौद्ध म्हणून समजल्या जात असून, त्यांचा मुख्यतः समुदाय हा सिद्धान्त आहे. तो सूत्रकारभाष्यकारांनीं खोडून काढला आहे तो येणेंप्रमाणें.

" समुदायउभयहेतुकेऽपि तदप्राप्तिः " ॥१८॥

(ब्रह्मसूत्र अ० २ पा० २)

भाष्यम्:—तत्र ये सर्वास्तित्ववादिनो बाह्यमांतरं च वस्त्वभ्युपगच्छन्ति भूतं भौतिकं चित्तं चैत्तं च तांस्तावत्प्रतिब्रूमः । तत्र भूतं पृथिवीधात्वादयः । भौतिकं रूपादयश्चक्षुरादयश्च । चतुष्टये च पृथिव्यादिपरमाणवः खरस्नेहोष्णेरणस्वभावास्ते पृथिव्यादिभावेन संहन्यन्त इति मन्यन्ते। तथा रूपविज्ञानवेदनासंज्ञासंस्कारसंज्ञकाः पंचस्कंधाः । तेऽप्याध्यात्मं सर्वव्यवहारास्पदभावेन संहन्यन्त इति मन्यन्ते । तत्रेदमभिधीयते । योऽयमुभयहेतुक उभयप्रकारः समुदायः परेषामभिप्रेतोऽणुहेतुकश्च भूतभौतिकसंहतिरूपः स्कंधहेतुकश्च पंचस्कंधीरूपः तस्मिन्नुभयहेतुकेऽपि समुदायेऽभिप्रेयमाणे तदप्राप्तिः स्यात्समुदायाप्राप्तिः । समुदायभावानुपपत्तिरित्यर्थः । कुतः समुदायिनामचेतनत्वात् । चित्ताभिज्वलनस्य च समुदायसिद्ध्यधीनत्वात् । अन्यस्य च कस्यचिच्चेतनस्य भोक्तुः प्रशासितुर्वा स्थिरस्य संहन्तुरनभ्युपगमात् । निरपेक्षप्रवृत्त्यभ्युपगमे च प्रवृत्त्यनुपरमप्रसंगात् । आशयस्याप्यन्यत्वानन्यत्वाभ्यामनिरूप्यत्वात् । क्षणिकत्वाभ्युपगमाच्च निर्व्यापारत्वात्प्रवृत्त्यनुपपत्तेः । तस्मात्समुदायानुपपत्तिः । समुदायानुपपत्तौ च तदाश्रया लोकयात्रा लुप्येत ॥ १८ ॥

भाष्यार्थः—त्यापैकीं बाह्य व आभ्यंतर वस्तु सत्य मानणारे जे सर्वास्तित्ववादी त्यांच्या मताचे आह्मी प्रथम खंडण करितो. भूत व भौतिक ह्याला बाह्य आणि चित्त व चैत्त याला ते आंतर समजत असतात. त्यापैकीं भूत ह्मणजे पृथ्वी अप् तेज व वायु आणि भौतिक ह्मणजे रूपादिविषय आणि चक्षुरादिक इंद्रियें. पृथ्वी अप् तेज व वायु ही चारच महाभूतें असल्यामुळें पृथिव्यादि परमाणूही चार प्रकारचेच आहेत. खर ह्मणजे काठिणपणा, स्नेह उष्णता, व चलन हे त्यांच्या त्यांच्या परमाणूचे स्वभाव आहेत, व हे परमाणु सृष्टिसमयीं एकत्र

होत असतात. त्याप्रमाणें रूपस्कंध विज्ञानस्कंध वेदनास्कंध संज्ञास्कंध व संस्कारस्कंध असें पांच स्कंध आहेत, हेच आध्यात्म होत. हे एक झाले असतां जगांतील सर्व व्यवहाराचा पाया होतात. ह्या बौद्धाच्या मतासंबंधानें आमचें असें ह्मणणें आहे. दोन भिन्न भिन्न कारणांनीं युक्त असा दोन प्रकारचा समुदाय बौद्धानां अभिमत आहे. परमाणु ज्यांचें कारण आहेत असा भूतभौतिकसंहतिरूप एक प्रकारचा समुदाय, आणि स्कंध ज्याचें कारण आहे असा पंचस्कंधरूप समुदाय. दोन कारणांनीं युक्त असलेला हा दोन प्रकारचा समुदाय जरी बौद्धानां अभिमत आहे तरी त्याची अप्राप्तिच आहे. त्याची अप्राप्ति ह्मणजे समुदायाची अप्राप्ति, समुदायाचा अभाव होईल असा अर्थ. कशावरून ? समुदायी जे परमाणु ते अचेतन आहेत ह्मणून. चित्तसंज्ञक जे अभिज्वलन ते समुदायसिद्धीवर अवलंबून आहे. समुदाय घडवून आणणारा दुसरा कोणी स्थिर चेतन असेल ह्मणावें, तर भोक्ता अथवा शास्ता असा कोणीच स्थिर चेतन बौद्ध मानीत नाहींत. समुदायरूप बनण्याकडे परमाणूंची स्वतंत्रच प्रवृत्ति होते ह्मणावें, तर ती प्रवृत्ति कधींच न थांबण्याचा प्रसंग येणार. आशयही अन्य आहे किंवा अनन्य आहे हे कांहींच सांगतां येत नाहीं. क्षणिकत्व मानल्यामुळें तो व्यापाररहितच ठरत असल्यामुळें त्याची प्रवृत्तीच संभवत नाहीं. ह्मणून परमाणूंचा व स्कंधांचा समुदायच होणें शक्य नाहीं; व समुदाय शक्य नसल्यामुळें समुदायावर अवलंबून असलेली लोकयात्राच लुप्त होऊं लागेल. ॥ १८ ॥

" इतरेतरप्रत्ययादिति चेन्नोत्पत्तिमात्रनिमित्तत्वात् "

(ब्रह्मसू० २।२।१९)

यद्यपि भोक्ता प्रशासिता वा कश्चिच्चेतनः संहन्ता स्थिरो नाभ्युपगम्यते तथाप्यविद्यादीनामितरेतरकारणत्वादुपपद्यते लोकयात्रा तस्यां चोपपद्यमानायां न किंचिदपरमपेक्षितव्यमस्ति । ते चाविद्यादयोऽविद्या संस्कारो विज्ञानं नामरूपं षडायतनं स्पर्शो वेदना तृष्णाउपादानं भवो जातिर्जरा मरणं शोकः परिदेवना दुःखं दुर्मनस्तेत्येवंजातीयका इतरेतरहेतुकाः सौगते समये क्वचित्संक्षिप्ताः निर्दिष्टाः क्वचित्प्रपंचिताः । सर्वेषामप्ययमविद्यादिकलापोऽप्रत्याख्येयः । तदेवमविद्यादिकलापेऽपि परस्परनिमित्तनैमि-

क्रमभावेन घटियंत्रवदनिशमावर्तमानेऽर्थाक्षिप्त उपपन्नः संघात इतिचेन्न तस्मात् उत्पत्तिमात्रनिमित्तत्वात् । भवेदुपपन्नः संघातो यदि संघातस्य किंचिन्निमित्तमवगम्येत । नत्ववगम्यते । यत इतरेतरप्रत्ययत्वेऽप्यविद्यादीनां पूर्वपूर्वमुत्तरोऽत्तरस्योत्पत्तिमात्रनिमित्तं भवद्भवेन्नतु संघातोत्पत्तेः किंचिन्निमित्तं संभवति । नन्वविद्यादिभिरर्थादाक्षिप्यते संघात इत्युक्तम् । अत्रोच्यते । यदि तावदयमभिप्रायोऽविद्यादयः संघातमंतरेणात्मानमलभमाना अपेक्षन्ते संघातमिति ततस्तस्य संघातस्य निमित्तं वक्तव्यम् । तच्च नित्येष्वप्यणुष्वभ्युपगम्यमानेषु आश्रयाश्रयिभूतेषु च भोक्तृषु सत्सु न संभवतीति उक्तं वैशेषिकपरीक्षायां । किमंग पुनः क्षणिकेष्वणुषु भोक्तृरहितेषु आश्रयाश्रयिशून्येषु वाभ्युपगम्यमानेषु संभवेत् । अथायमभिप्रायोऽविद्यादय एव संघातस्यनिमित्तामिति कथं तमेवाश्रित्यात्मानं लभमानाः तस्यैव निमित्तं स्युः । अथ मन्यसे संघाता एवानादौ संसारे संतत्यानुवर्तंते तदाश्रयाश्चाविद्यादय इति तदापि संघातात्संघातान्तरमुत्पद्यमानं नियमेन वा सदृशमेवोत्पद्येतानियमेन वा सदृशं विसदृशं वोत्पद्येत । नियमाभ्युपगमे मनुष्यपुद्गलस्य देवतिर्यग्योनिनारकप्राप्त्यभावः प्राप्नुयात् । अनियमाभ्युपगमेऽपि मनुष्यपुद्गलः कदाचित् क्षणेन हस्तीभूत्वा देवो वा पुनर्मनुष्यो वा भवेदिति प्राप्नुयात् । उभयमप्यभ्युपगमविरुद्धम् । अपि च यद्भोगार्थः संघातः स्यात्स नास्ति स्थिरो भोक्तेति तवाभ्युपगमः । ततश्च भोगो भोगार्थ एव स नान्येन प्रार्थनीयः । तथा मोक्ष मोक्षार्थ एवेति मुमुक्षुणा नान्येन भवितव्यम् । अन्येन चेत्प्रार्थ्येतोभयं भोगमोक्षकालावस्थायिना तेन भवितव्यं । अवस्थायित्वे क्षणिकत्वाभ्युपगमविरोधः । तस्मादितरेतरोत्पत्तिमात्रनिमित्तत्वमविद्यादीनां यदि भवेद्भवतु नाम न तु संघातः सिध्येत् । भोक्त्रभावादित्यभिप्रायः ॥ १९ ॥

भाष्यार्थः—जरी भोक्ता अथवा शासनकर्ता म्हणून कोणी समुदाय घडवून आणणारा स्थिर चेतन बौद्ध मानीत नाहींत, तरी अविद्यादि परस्परांचे कारण असल्यामुळें लोकयात्रा शक्य आहे, आणि ती लोकयात्रा जर शक्य आहे, तर दुसऱ्या कशाचीही अपेक्षा असण्याचे प्रयोजन नाहीं. अविद्या, संस्कार, विज्ञान, नामरूप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाति, जरा, मरण, शोक, परिदेवना,

दुःख व दुर्मनस्ता हे व अशाच जातीचे परस्परांनां कारणीभूत असलेले पदार्थ सुगतांच्या दर्शनामध्यें कोठें संक्षेपानें कोठें सविस्तर सांगितले आहेत. सर्वही वाद्यांनां हा अविद्यादिकलाप संमत आहे. सारांश अशा रीतीनें परस्परकार्यकारणभावानें हा अविद्यादिकलाप एकसारखा रहाटगाडग्याप्रमाणें फिरत असल्यामुळें, जो मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असा समुदाय शक्यच आहे, असें जर बौद्धांचे ह्मणणें असेल, तर ते बरोबर नाहीं. कशावरून ? केवल उत्पत्तीचेच निमित्त कारण असल्यावरून, संघाताचे जर कांहीं निमित्त उपलब्ध होत असेल, तर संघात शक्य होईल, परंतु संघाताचे निमित्तच उपलब्ध होत नाहीं; कारण अविद्यादिकामध्यें जरी परस्पर कार्यकारणभाव संभवनीय असला, तरी पूर्वपूर्व उत्तरोत्तर उत्पत्तीचे मात्र निमित्त कारण ठरेल; परंतु संघात उत्पन्न होण्याला मात्र कांहींएक निमित्तकारण संभवनीय नाहीं. अविद्यादिकांच्या अस्तित्वावरून संघाताचें अस्तित्व मानल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, असें बौद्धाचे ह्मणणे आहे, परंतु यावर आह्मी असें ह्मणतो, अविद्यादिक संघाताशिवाय अस्तित्वांत येणेंच शक्य नसल्यामुळें, त्यांच्या अस्तित्वाला संघाताची अपेक्षा आहेच, असा जर बौद्धांचा अभिप्राय असेल, तर त्या संघाताचे निमित्तकारण त्यांनीं निर्दिष्ट करणें अवश्य आहे. ते निमित्तकारण अणु, नित्य आहेत असें मानलें असतांही, आणि अदृष्टाला आश्रयभूत भोक्ते मानले असतांनाही संभवत नाहीं, असें वैशेषिक मत निरीक्षण करतानां सांगितलेंच आहे; तर क्षणिक व भोक्ते जे जीव त्यानी रहित ह्मणजे अर्थात संघातकर्तृरहित असें जर अणु बौद्ध मानीत आहेत, तर संघात बनण्याचे निमित्तकारण संभवणार कोठून ? आतां अविद्यादिकच संघाताचे निमित्तकारण होत, असा जर बौद्धांचा अभिप्राय असेल, तर ज्या संघातामुळें अविद्यादिकांची उत्पत्ति होणार त्या संघाताच्याच उत्पत्तीचे निमित्तकारण ते होतील कसे ? आतां अनादिसंसारामध्यें प्रवाहरूपानें संघात एकामागून एक येत असतात, व अविद्यादिक त्याच्या आश्रयाला असतात, असें जर तुह्मी बौद्ध समजत असेल, तर एका संघातापासून दुसरा संघात नियमानें तरी उत्पन्न होत असला पाहिजे. नियमानें उत्पन्न होत असल्यास तो सजा-

तीयच उत्पन्न होईल. परंतु अनियमित रीतीनें उत्पन्न होत असल्यास, उत्पादकसंघाताहून तो विजातीयही उत्पन्न होईल. नियमानें उत्पन्न होत असतो असें मानावयाचें असल्यास मनुष्यदेहाला देव, पशु व नरक-संबंधी प्राण्यांचे शरीर कधींच प्राप्त व्हावयाचें नाहीं असें ठरणार. बरें संघात नियमानें उत्पन्न होत नसतो असें मानल्यासही मनुष्यशरीर कदाचित् क्षणामध्यें हस्ती होऊन, क्षणांत देव अथवा मनुष्य बनतें, असें ठरूं लागेल, परंतु हे दोन्ही प्रकार तुह्मा बौद्धांच्या मताला विरुद्ध आहेत. शिवाय ज्या ज्या भोगाकरितां संघात झालेला असेल, तो भोक्ता स्थिर नसून क्षणिक आहे असें तुह्मी बौद्ध मानीत असता, तेव्हां भोग हा भोगाकरितांच आहे, दुसऱ्यानें भोगाची अपेक्षा धरतां उपयोगी नाहीं असें ठरेल, व त्याचप्रमाणें मोक्षही मोक्षाकरितांच असून मोक्षाशिवाय इतर कोणी मुमुक्षु आहे असें मानतांच येणार नाहीं. भोग व मोक्ष हे दोन्ही इच्छिणारा कोणी दुसरा आहे असें जर मानलें, तर भोगकाल व मोक्षकाल ह्या दोन्ही कालामध्यें तो विद्यमान असणें अवश्य आहे; परंतु दोन्ही कालामध्यें तो असतो असें मानल्यास, "सर्वच कांहीं क्षणिक आहे" ह्या मताला विरोध येतो. ह्मणून अविद्यादिकामध्यें पर-स्परांच्या उत्पत्तीचें निमित्तकारण परस्पर असणें शक्य असेल तर असो, पण तेवढ्यानें मात्र समुदायसिद्धि होत नाहीं; कारण भोक्ता नसल्यामुळें ॥ १९ ॥

शिष्य उवाचः— भगवन् आपल्यामध्यें भागवतांत बुद्धाला परमेश्वराचा अवतार ह्मटलें असून, सूतसंहितेत व मेरुतंत्रांत पतितानीं त्याच्या मताचा स्वीकार करावा असें सांगितलें आहे, तेव्हां हे कसें ?

श्रीगुरू उवाचः— बुद्ध परमेश्वराचा अवतार आहे याविषयीं कोणाचाच विवाद नाहीं. त्यांतील अहिंसादि क्रिया विरोधीही नाहींत. शून्यवादाचा व विज्ञानवादाचा पूर्वी समन्वय केला आहे, आणि सर्वा-स्तित्ववाद, मूर्खांच्या मोक्षप्रवृत्तीला वाढविणारा आहे, किंवा शून्यावरील भ्रमपक्षानें, वेदान्ताचा पर्याय असून, इतरथा तो न्यायाचा पर्याय आहे; परंतु अनधिकारी पुरुषांनां मोहामुळें हें समजत नाहीं. बाह्य क्षणिका-स्तित्ववाद कसा तरी दृष्टिसृष्टिवादांत अंतर्भूत होतो, व आंतरपदार्थक्षणिक-

वादांत जाति मानावी लागते; व जाति क्षणिक मानतां येत नसल्यामुळें सत्ता मानावी लागते, व अशा रीतीनें बौद्धांच्या मतांत सद्वाद सिद्ध होतो; किंवा सर्वप्रत्ययक्षणिकांत कालप्रत्ययही क्षणिक असल्यामुळें, कालावर अवलंबून असणारें क्षणिकत्वच सिद्ध होत नाहीं, आणि काल नित्य मानल्यास जे कालाला ईश्वर मानतात त्यांच्या मताचा बौद्धमतांत कसातरी प्रवेश होतो. प्रत्युत आह्मी जे बुद्धाला परमेश्वर समजतो तसें बौद्ध समजत नाहींत. ह्मणूनच आह्मी त्यांचे मत निग्रही मानतो. अथवा सर्वच अविद्यामय असल्यामुळें शून्यास ब्रह्म मानल्यास व जडांत कार्य करण्याचे सामर्थ्य चेतनच आहे असें मानल्यास बौद्ध मताचा व वेदान्तमताचा विरोध येत नाहीं, आणि सर्वास्तित्ववादावरही मागें केलेले नित्यानित्यत्व भिन्नाभिन्नत्वाचे प्रश्न येतातच; ह्मणून स्वपक्षदोष आहे. —इतिबौद्धमतपरीक्षणम्—

वादी उवाच:— तथापि विवसनसमयांत हा स्वपक्षदोष नाहीं, ह्मणून त्याचाच आश्रय करून आह्मी ईश्वराचा अधिक्षेप करूं.

सिद्धान्ती उवाच:— हें मात्र खऱ्यासारखें आहे, कारण हे जैनदर्शन मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत कोणालाच समजत नाहीं, पण तें समजून घेण्याला प्रथम आमचें सैनदर्शन समजून घेतले पाहिजे ते येणें प्रमाणें आहे:—मुक्तीची सर्वास वांछा असली तरी ज्याठिकाणीं मुक्तीचा अभाव आहे, आणि ज्यारूपानें आहे तद्रूप ती नसली पाहिजे. अवच्छेदपक्षानें कालविरोधित्व प्राप्त झाले असतां देशविरोधित्व प्राप्त होत नाहीं, ह्मणून देशकाल एकच आहे; परंतु प्रतिअवयवावच्छेदकत्वास्तव त्यांचे विषमसामानाधिकरण्य आहे. विषमसामानाधिकरण्य नाहीं, श्रुतींत आकाशाची उत्पत्ति सांगितली आहे ती भिन्नत्वावांचून होत नाहीं ह्मणून. वरच्या अपेक्षेनें धर्म धर्मी होत असतो. याप्रमाणें धर्मीधर्मांचा अव्यवच्छेद झाला म्हणजे पक्षत्व व साध्यत्व इत्यादि आरोपित धर्मांचेही धर्मित्व पक्षानें ग्रहण होते. तथापि जातिविशेषेंकरून धर्मांचे अनाश्रियत्व सिद्ध होत असल्यामुळें त्याच्या मुख्य प्रमेयत्वाशीं विरोध येत नाहीं. या प्रमाणें जडचेतनपदार्थांतील जे जे धर्म असतील ते अनाश्रित होऊन बुद्धीनें जसे द्रव्याचे गुण पृथक् होतात तसें होऊन जीवादिकधर्मी-

मत्याग केल्यावर शेष राहिलेले एकत्र धर्मच भोक्ताभोग्य होऊन येताचा वाच्य अर्थ होतात. ते धर्म अनाश्रित करण्याला हाताला रा) म्हप वगैरे बांधून प्रथम देह अनाश्रित करावा, व नंतर आफूची आ.न झोपेंत जीवधर्मी झाकून टाकल्यावर थोडेथोडे शुद्धींत राहून ते .द्धतीनें जीवाचे धर्म वेगळे काढावे, आणि इतर वासनांचा परित्य केल्यानें जडाश्रित होऊं नये. जडाश्रित न झाले ह्मणजे मरण [illegible] म्हणूनच जन्म नाहीं. जीवाश्रित नाहीं झाले म्हणजे वेदान्ताची [illegible]क्षा नाहीं. जागृति नाहीं ह्मणून भूताप्रेतांची व्यावृत्ति होते. धर्म आहेत ह्मणून शून्य नाहीं. बाह्यविलास नाहीं ह्मणून विज्ञान नाहीं. द्रव्याची अपेक्षा नाहीं ह्मणून जैन नाहीं, तर सर्व लोकांच्या अनुभवाला येणाऱ्या धर्माला अनाश्रित करून आकाशामध्यें नित्य झोप घेणें याचेंच नांव मोक्ष आहे. याप्रमाणें हे सैनदर्शन त्वां अध्ययन केले नाहीं, त्याचें प्रथम अध्ययन कर.

मध्यस्थ उवाचः—वादीमोहनाकरितां तुह्मी हे सैनदर्शन निर्माण केले आहे, हेंच एकाद्यानें खरें समजून पुढें सैनदर्शन निर्माण करणारा कोणी उत्पन्न न होवो ह्मणजे झाले. सैन्य शब्दातला यकार काढून सर्वलोकानुभवसिद्ध असें हे सैनदर्शन निर्माण केलें आहे. सैन ह्मणजे युद्धादिव्यापाररहित लोक. हा त्या यकार गाळण्याचा अर्थ आहे. चार्वाकादिवादही दैत्यमोहनाकरितांच निर्माण केले आहेत, परंतु बिचाऱ्या वादीचे समाधान करणें आपले कर्तव्य आहे. हे सैनदर्शन केवळ त्यांच्या उपहासार्थ आहे. एवढ्याकरितां वादीच्या मतांत काय दोष असेल ते दाखवून स्वसिद्धान्त निवेदन करणेंच समर्थास उचित आहे.

सिद्धान्ती उवाचः—वादीला जैनदर्शन जर समजले आहे, तर मग आमचे सैनदर्शनही समजलेच पाहिजे; परंतु आपण म्हणता म्हणून हा उपहास सोडून देऊन वादीशीं योग्य भाषण करूं. हे वादिन् तुझ्या मतांत प्रत्येक पदार्थ सदसत्स्वरूप आहे. इतर भंग त्याचे सहायक आहेत. एक पदार्थ कोणत्या तरी अपेक्षेनें सत् आहे, आणि कोणत्या तरी अपेक्षेनें असत् आहे; पण हें म्हणणें योग्य नाहीं. कारण सत् व असत् आदि विरुद्ध धर्म एकाच पदार्थाचे ठिकाणीं संभवनीय नाहींत. तसेंच

नित्यत्व व अनित्यत्वही एकाच पदार्थाचे ठिकाणीं संभवनीय नाहीं.

वादी उवाचः—अहो ! वेद म्हणणें ब्राह्मणाच्या अपेक्षेनें पुण्य आहे, आणि शूद्राच्या अपेक्षेनें पाप आहे, त्याप्रमाणें एकच वस्तू सदसदादिविरोधरूप म्हणतां येण्यास काय हरकत आहे ?

सिद्धान्ती उवाचः— पाप व पुण्य दोन भिन्न पदार्थ आहेत, आणि ते एका वस्तूपासून उत्पाद्य आहेत. ते कारण क्रिया आहे, वस्तु नाहीं, आणि तुझ्या मतांत तर विरोधी धर्मांचा आश्रय वस्तू आहे, ह्मणून तुझा दृष्टान्त विषम आहे. शिवाय वेद म्हणण्यानें शूद्राना पाप होते, इत्यादि विधानें वचनगोचर आहेत, आणि त्याविषयीं कुत्सितवचनगोचर विवादही आहे, पण घटादि प्रत्यक्ष पदार्थही सदसदादिविरोधी धर्मांचे आश्रय आहे असें तुझें ह्मणणें असल्यामुळें, व त्या पदार्थाविषयीं विवाद नसल्यामुळें, तूं दिलेला दृष्टान्त विषम आहे. शिवाय " क्रिया हि विकल्प्यते न वस्तु " असा न्याय असल्यामुळें वस्तूचे ठिकाणीं सत्वासत्वादि विकल्प संभवनीय नाहींत.

वादी उवाचः— नरसिंहआकारामध्यें जसें नरत्व व सिंहत्व एके ठिकाणीं असते, त्याप्रमाणें कोणतीही वस्तु विरोधीधर्मांचा आश्रय आहे असें आह्माला म्हणतां येते.

सिद्धान्ती उवाचः— तेथें देशभेदास्तव विरोधाभाव आहे, म्हणजे ऊर्ध्वभाग सिंहाकृति असून अपर भाग नराकृति आहे. एकाच देशाचे ठायीं सिंहत्व व नरत्व नाहीं ह्मणून दृष्टान्त विषम आहे.

वादी उवाचः— ऱ्हस्वत्व व दीर्घत्व इत्यादिकाप्रमाणें वस्तूचे ठायीं सदसदादि विकल्प संभवतो.

सिद्धान्ती उवाचः— तेथें प्रतियोगीभेदास्तव विरोधाभाव आहे, म्हणजे ऱ्हस्व ह्मटले कीं दीर्घत्वाचा अभाव गोचर होतो. येथें प्रतियोगी अन्य असल्यामुळें एकाच पदार्थाचे ठायीं सत्व व असत्व असा सिद्धान्त दाखविण्याविषयीं हा दृष्टान्त विषम होतो. पुनः अनेकान्तप्रतिज्ञेचीही हानी होते, कारण सप्तभंगीनय एकान्त आहे कीं अनेकान्त आहे ? प्रथम पक्षीं प्रतिज्ञाहानि स्पष्टच आहे. " सर्वमनेकान्तम् " ही जैनांची प्रतिज्ञा आहे म्हणून. द्वितीयपक्षीं नय पदार्थांचा साधक होणार नाहीं.

कारण सप्तभंगीनय जसा सर्व पदार्थांचे अनेकान्तत्व साधतो, तसें त्या सप्तभंगीनयाचे अनेकान्तत्व साधण्यालाही अन्य नयाची अपेक्षा लागेल, व त्यामुळें अनवस्थादि दोष येतात. पुनः स्याद्बंधः स्यान्मोक्षः स्यादमोक्षः इत्यादि बंधमोक्षाविषयींही संशयात्मक ज्ञान राहून त्याविषयीं कोणाचीच प्रवृत्ति होणार नाहीं, म्हणून हे आर्हतमत सर्वथा अयुक्त आहे. याप्रमाणें

"नैकस्मिन्नसंभवात्"

(अध्या० २ पाद २ सूत्र० ३३)

"एकाच ठिकाणीं सत् व असत् दोन्ही धर्म संभवनीय नाहींत." ये सूत्रावर भाष्य करतानां श्रीमच्छंकराचार्यांनीं व रामनुजादिकांनीं असेंच ह्मटलें आहे.

वादी उवाचः—अहो तुह्माला आणि तुमच्या आचार्यांनां आह्मा जैनांचे मत समजलेंच नाहीं; कारण स्वरूपादिचतुष्टयाच्या अपेक्षेनें आह्मी वस्तु सत् मानीत असतो, आणि पररूपादिचतुष्टयाच्या अपेक्षेनें असत् मानीत असतो; ह्मणजे घट हा घटाच्या रूपानें आहे, तसाच तो जेव्हां आहे तेव्हां आहे, ह्मणजे आतां घट आहे, आणि येथें आहे ह्मणजे या भूतलावर आहे, भूतल हे त्याचे क्षेत्र होय. भाव ह्मणजे सामर्थ्य. पाणी वगैरे घटांत ठेवतां येते, इत्यादि सामर्थ्यानें घट आहे, आणि पटादिचतुष्टयानें तो नाहीं; असें न मानलें तर घटपट एकरूप होतील.

सिद्धान्ती उवाचः—पूर्वींचे तुह्मा लोकाचें मत एकाठिकाणींच विरोधी धर्म मानावें असें होते, ह्मणूनच आमच्या आचार्यांनीं तसें समजून खंडण केलें आहे; नाहीं तर तूं सांगतोस त्याप्रमाणें समजून त्याना खंडण करतां येत नव्हते असें नाहीं, कारण त्या आचार्यांच्या सहस्रांश देखील माझ्यामध्यें ज्ञान नसून मला तुमच्या मताचें उत्तम खंडण करतां येते. शिवाय तुह्मी जैन पूर्वी नित्यमुक्त, मुक्त व बद्ध असें तीन प्रकारचे जीव मानीत होता. ह्मणूनच आनंदगिरीनें तसें समजून तुमचे खंडण केलें आहे. परंतु नित्यमुक्त जीव मानल्यास ईश्वर मानणें आपल्या गळी येते, असें तुह्मी समजून, मुक्त व बद्ध असें दोन प्रकारचे जीव आहेत इत्यादि प्रतिपादन करणारे नवीन ग्रंथ तुह्मी निर्माण केले आहेत; व त्याकरितां सर्व पूर्वग्रंथ नष्ट झाले असें तुह्मीच

लोक ह्मणत असता. आतां क्षेपकवाद कोणत्याच धर्माविषयीं मान्य नाहीं हें खरें आहे, ह्मणून असें ह्मणता येईल कीं, दोन पक्षांपैकीं एक पक्ष नष्ट झाला, व सध्यां हा एक पक्ष आहे. स्वामीविद्यारण्यांनीं आपल्या सर्वदर्शनसंग्रहांत जैनदर्शनाचें निरूपण करतानां दोन प्रकारचे जीव मानले आहेत, आणि त्यानंतर रामानुजमतनिरूपणांत जैनमताचे खंडण केले आहे. तेव्हां आमच्या आचार्यांनां पूर्वी दोन जीव मानून तुमचे मत खंडण करता येत नव्हते, किंवा स्वरूपादिचतुष्टयानें सत् व पररूपादिचतुष्टयाचे अपेक्षेनें असत् अशी वस्तू समजून घेऊन, त्याना खंडण करता येत नव्हते असें मुळींच नाहीं. आतां तूं सांगितलेला सप्तभंगीनिर्णयही सिद्धसाधनरूप आहे, कारण अन्योन्याभावस्वरूपानें तो पूर्वीच सांगून ठेवला आहे. अन्योन्याभावावांचून स्वचतुष्टयानें सत् व परचतुष्टयाच्या अपेक्षेनें वस्तू असत् आहे या ह्मणण्याचा अन्य अर्थ समजत नाहीं. समंतभद्राचार्यांचा आप्तमीमांसा नावांचा जैनमतांत एक ग्रंथ आहे, त्यावर वसुनंदीची देवागमवृत्तिनांवाची टीका आहे. तेथें अन्योन्याभावासारखेच स्याद्वादाचे निरूपण केले आहे ते पहावें. परंतु एकत्वनित्यत्वादिकांत जरी अपेक्षा दिसते, तरी त्या अपेक्षेनें तोच पदार्थ तथाभूत अतथाभूत होत नाहीं. ह्मणजे एक जो अवयव तो अन्य कोण्या अपेक्षेनें जर अनेक असेल, ह्मणजे त्यांत अन्य सूक्ष्म अवयवांच्या अपेक्षेनें जर अनेकत्व असेल, तर अवयवावयवी विभाग नाहींसा होऊन सर्षपमेरुतुल्यतापत्ति येईल. तसाच अन्य नित्य पदार्थांच्या अपेक्षेनें एखादा पदार्थ अनित्य असूं शकेल, पण नित्यपदार्थ अन्य कोणाच्या अपेक्षेनें अनित्य होऊं शकणार नाहीं. अनादिअनंतत्वलक्षणास्तव वस्तु द्रव्यरूपानें नित्य असून पर्यायादिरूपानें अनित्य आहे, हेंही ह्मणणें सम्यक् नाहीं; कारण पर्याय द्रव्याच्या अपेक्षेनें पर असल्यामुळें त्यांच्या दृष्टीनें द्रव्य असत् आहे, तेव्हां ते द्रव्याच्या मानाचे साधक होणार नाहीं. असत् शब्दाचा अर्थ अन्योन्याभावावांचून अन्य शशशृंगादिकाप्रमाणें असेल, तर मग तुह्माला आपल्या मताचें निरूपणच करतां येणार नाहीं. कारण हे वादिन्! तुझ्या दृष्टीनें आह्मी सर्व वंध्यापुत्राप्रमाणें असत् आहोत, कारण तुला आह्मी परचतुष्टय होत म्हणून, व आमच्या

अपेक्षेनें परचतुष्टयात्मक तूंही वंध्यापुत्राप्रमाणें असत् आहेस. एवं अरिहंतादिकांच्या अपेक्षेनें आपण सर्व असत् आहोत, व आपल्या अपेक्षेनें अरिहंतसिद्धादिक सर्व असत् आहेत. याप्रमाणें गुरू व शिष्य वंध्यापुत्राप्रमाणें असत् असल्यामुळें, स्वतः सत् असणाऱ्या त्यांची परस्पर निरूप्यनिरूपकव्यवहार घडणें संभवनीय नाहीं. अरिहंतादिक आहेत याचें ज्ञान कोणास होतें? सतास होते कीं असतास? प्रथमपक्षीं प्रतिज्ञाहानि होते, कारण अरिहंताच्या अपेक्षेनें आम्ही सर्व असत् आहोत, आणि येथें तर सत् मानावें लागते; आणि द्वितीयपक्षीं वंध्यापुत्रास देखील जैनमताचें ज्ञान झालें पाहिजे, व अरिहंतादिक कळले पाहिजेत. देवागमवृत्तींत वसुनंदीनीं सर्वज्ञत्व साधण्याविषयीं बुद्धकपिलादिकांच्या ठिकाणीं राहणारा असल्यामुळें, तीर्थंकरत्वहेतु व्यभिचारी आहे असें म्हटलें आहे. परंतु वंध्यापुत्र व शशशृंग अशा पदार्थांवर अतिव्याप्ति किंवा व्यभिचार होत नसतो. हे वादिन्! तुला आमच्या मताचें खंडणही करतां येणार नाहीं, कारण तुझ्या अपेक्षेनें ईश्वर नाहीं, तर आमच्या अपेक्षेनें अरिहंतादिक नाहींत, आमचा ईश्वर आमच्या अपेक्षेनें आहेच; असें न मानशील तर तुझ्या स्याद्वादाचीच उलटी हानी होते. तूं जे परमताचे खंडण करतोस, ते काय परमताला सत् समजून करतोस, असत् समजून करतोस, सदसत् समजून करतोस कीं अनिर्वचनीय समजून करतोस? प्रथम पक्ष संभवत नाहीं, कारण सत्पदार्थाचे खंडण होत नसते; अथवा अरिहंतादिक जे सत् आहेत त्यांचेही खंडण कर, व आपलेही खंडण कर; कारण तूं जसा स्वचतुष्टयानें सत् आहेस, तसें परमतही स्वचतुष्टयानें सत् आहे, असें तुला मान्य केलें पाहिजे; आणि तशा सत्पदार्थांचें खंडण मानल्यास तुझे व अरिहंताचे खंडण गळीं येते. द्वितीयपक्षही सम्यक् नाहीं, कारण कोणताही पदार्थ एकान्त असत् तुझ्या मतांत नाहीं. परमत परमतादिचतुष्टयाच्या अपेक्षेनें जर तूं असत् मानशील तर तेवढ्यापुरता तुझ्या मतांत असदेकान्तवादाचा प्रवेश होईल. परंतु आपलें खंडण झाले म्हणून तसेंच मानण्यास तुम्ही माघार घेणार नाहीं, हें तुमचें कैतव आम्हास माहित आहे. असेंच तुम्ही मागेंही ग्रंथपरिवर्तनसमयीं केलें आहे. याप्रमाणें तुमच्या मतांत अन्यही एकान्तवादाचे

प्रवेश होतात. भव्य व अभव्य असें दोन जीव तुम्ही जैन मानीत असता. त्यांत भव्य जीवच कधीं ना कधीं तरी मुक्त होतात असें तुम्हाला इष्ट आहे, पण अभव्य देखील कोणत्यातरी अपेक्षेनें भव्य होत असल्यामुळें, कोणत्यातरी अपेक्षेनें तो मुक्त झालाच पाहिजे, असेंही तुम्हाला मानणें भाग पडेल; पण तुम्ही तसें मानीत नाहीं. पुढें कदाचित् मानालही, पण आतांपर्यंतच्या ग्रंथांत लिहिलेलें नाहीं. आतां पदार्थ सातच आहेत, अस्तिकाय पांचच आहेत, संक्षेपतः पदार्थ दोनच आहेत, तत्त्वें नव आहेत, इत्यादि ज्या संख्या त्या कोणत्याच अपेक्षेनें असंख्यात्व होत नाहींत, म्हणजे सप्तत्वाला कोणत्याच अपेक्षेनें असप्तत्व नाहीं, आणि द्वित्वाला कोणाच्या अपेक्षेनें अद्वित्व नाहीं. आतां द्वित्व हे त्रित्व नव्हे इत्यादि अन्योन्याभावाचाच येथें स्वीकार कराल, तर सुखानें करावा; अन्योन्याभाव मानण्यांत आमची कांहीं हानि नाहीं. याप्रमाणें वर्तमानकालीं असणारा घट, भूत व भविष्यकालाच्या अपेक्षेनें, नसेल तर त्याची आता नास्तित्वप्रतीति होते कशी ? एखादी अपेक्षा मनांत घेऊन नंतर त्या पदार्थांचे विरुद्ध निरूपण करावयाचें असेल तर तेही योग्य नाहीं. कारण पररूप जो अर्थ तो अर्थ तर असत् आहे म्हणून वाच्यवाचकसंबंध घटत नाहीं. अथवा अन्योन्याभावच सर्वत्र इष्ट असेल, तर तुम्हाला भेदवाद इष्ट आहे असें म्हणावें लागेल; परंतु तुम्ही जैन तर कथंचित् भेदाभेदवादी आहां, हें तुमच्या आतांपर्यंतच्या ग्रंथावरून कळते. उत्पादव्य व ध्रव्यत्व हे तुमच्या वस्तूचें लक्षण आहे. उत्तरपरिणामीं उत्पत्ति-पूर्वपरिणामाचा नाश आहे. दोन्ही परिणामाचा आश्रय जे द्रव्य त्याचे नित्यत्व हा त्या लक्षणाचा अर्थ तुह्मास माहित आहे; परंतु ध्रव्यांश उत्पादव्य याशीं भिन्न आहे कीं अभिन्न आहे कीं भिन्नाभिन्न आहे ? द्वितीयपक्षीं पृथक् निर्धार न झाल्यामुळें लक्षण व्यर्थ होते, आणि प्रथमपक्षीं परस्पर असत् असल्यामुळें परस्परांचे साधक नाहींत, किंवा भिन्न जो ध्रव्यांश तो नैय्यायिकांच्या नित्य द्रव्यांत अंतर्भूत होतो, व त्यामुळें एकान्तवादाचा प्रवेश होतो. सजातीय उत्पादव्य होण्यालाही तुमच्या मतांत अन्य नियामक रहात नसल्यामुळें, धर्मापासून अधर्म अरिहंताचा अनरिहंत इत्यादि विजातीय उत्पादही होऊं लागतील.

याप्रमाणें सत्पक्षीं व असत्पक्षीं परपक्षि मत तुला खंडण करतां येत नाहीं. सत्पक्षीं जशी अरिहंतादिकांच्या खंडणाची आपत्ति येते, तशी असत्पक्षीही येते; कारण अरिहंतादिक आपल्या सर्वांच्या दृष्टीनें असत् आहेत, म्हणून असत् अशा परमताचे जर खंडण करितोस, तर अरिहंताचें ही खंडण करतां येईल. किंवा आमच्या दृष्टीनें तरी असत् अशा अरिहंताचे खंडण करण्यास तुला कांहीं प्रत्यवाय वाटणार नाहीं. तृतीयपक्षही सम्यक् नाहीं, विरोधास्तव. पुनः सदसत् परमतास मानल्यास सदंशी सत्पक्षावर आणलेले दोष येतात, व असदंशी असत्पक्षावर आणलेले दोष येतात. अथवा सदसन्मिश्र तुझेंच मत आहे. तूं आपल्याच मताचे खंडण कर. शिवाय जैनधर्म हा परधर्मांच्या अपेक्षेनें असत्च आहे, तेव्हां त्याचा दुसऱ्याकडून अंगिकार करविणें तुम्हा जैनाला उचित नाहीं. तुमची सध्यां अशी स्थिती आहे कीं, थोडे पाऊल टाकावें कीं तुम्हामध्यें अन्यमताचा प्रवेश होतो व नाहींतरी होतोच. चतुर्थपक्ष अंगिकार करशील, तर अनिर्वचनीयाला आधार असें सत् कोठें मानलें पाहिजे, ते मानल्यास वेदान्ताचा तूं अंगिकार केला असें होईल, व न मानल्यास बौद्धाच्या शून्यवादाचा अंगिकार केला असें होईल. शिवाय अनिर्वचनीय मानून खंडण करणें आम्हाला इष्टच आहे. अनुपलब्धीप्रमाणानें व मायेच्या व्यवस्थेनें म्हणजे मायाकृत अनेकत्वधर्मानें आम्हाला अन्योन्याभावाचें ज्ञान होत असते असें वेदान्ती म्हणतात; त्यामुळें सप्तभंगीनय निरूपण करण्यांत सिद्धसाधन आहे.

वादी उवाचः—अहो ! आमच्या प्रभाचंद्रसुरिजैनाचार्यानें आपल्या 'प्रमेयकमलमार्तंड' ग्रंथांत सप्तभंगीनयाचा अन्योन्याभावामध्यें अंतर्भाव केला नाहीं, व अन्योन्याभावाचें खंडणही केले आहे; कसे ते पहा.

"स्वदेशादिषु सत्वं परदेशादिष्वसत्वं च वस्तुनोऽभ्युपगम्यते एवेतरेतराभावादिलक्षणसमीक्षिताभिधानमितरेतराभावस्य घटाद्भेदे तद्विनाशे पटोत्पत्तिप्रसंगात् पटाभावस्य विनष्टत्वात् । अथ घटाद्भिन्नोसौ तर्हि घटादीनामन्योन्यं भेदो न स्यात् । यथैवहि घटस्य घटाभावाद्भिन्नत्वात् घटरूपता तथा पटादेरपि स्यात् । नाप्येषां परस्पराभिन्नानामभावेन भेदः कर्तुं

शक्यो भिन्नाभिन्नभेदकरणे तस्याकिंचित्करत्वप्रसंगात् । नापि भेदव्यवहारः स्वहेतुभ्योऽसाधारणतयोत्पन्नानां सकलभावानां प्रत्यक्षे प्रतिभासनादेव भेदव्यवहारस्यापि प्रसिद्धेः । प्रतिक्षिप्तश्चेतरेतराभावः प्रागेवेति कृतं प्रयासेन" ।

( प्रमेयकमलमार्तंड द्वितीयपरिच्छेद पान ९३ )

पूर्वपक्षीः—( जैनभिन्न ) भावार्थः—स्वचतुष्टयानें वस्तु आहे व परचतुष्टयानें नाहीं या तुमच्या ह्मणण्याचा अर्थ अन्योन्याभावच आहे, त्याचे निरूपण नैय्यायिकांनीं केलेच आहे, तुह्मी अधिक काय सांगि[illegible]

उत्तरपक्षीः—( प्रभाचंद्रसूरि )—अरे तुझा अन्योन्याभाव [illegible] वस्तूशीं भिन्न आहे कीं अभिन्न आहे ? प्रथमपक्षी योग्य नाहीं, कारण घटनाशाबरोबरच अन्योन्याभावाचा नाश झाल्यामुळें पटाची उत्पत्ति झाली पाहिजे, कारण जो अन्योन्याभाव घटाशीं अभिन्न आहे तो पटाशींही अभिन्न आहे, आणि घटाहून भिन्न अन्योन्याभाव मानशील तर घटपटादि वस्तु एक झाल्या पाहिजेत. कारण त्यांचा भेद करणारा अन्योन्याभावच आहे. तो तर त्या वस्तूहून भिन्न आहे, ह्मणून घटादिकांचा भेद करण्याविषयीं तो अकिंचित्कर आहे. प्रत्यक्षप्रमाणानेंच भेदव्यवहाराची सिद्धि होत असल्यामुळें, अन्योन्याभाव मानण्याची आवश्यकता नाहीं, हें आह्मी पूर्वीच सांगितलेंच आहे, आतां प्रयास पुरे.

सिद्धान्ती उवाचः—प्रभाचंद्रानें आपल्या हातानेंच आपले डोळे फोडून घेतले आहेत, ह्मणूनच तो असें बोलत आहे. कारण असत् शब्दाचा अर्थ प्रभाचंद्रकक्षी करणाऱ्या तुला तरी काय समजला आहे ? अनुपलब्ध असणें, अगोचर असणें असाच कीं नाहीं ? तो तर अन्योन्याभावानें सिद्ध आहे.

वादी उवाचः—अहो ! तिन्ही कालीं पररूपादिचतुष्टयरूप न होणें असाही असत् शब्दाचा अर्थ घेतां येईल.

सिद्धान्ती उवाचः—तसें मानल्यानें मृत्तिकेचाच घट झाला पाहिजे, सुवर्णादिकांचा होऊं नये असें होईल; पण सुवर्णादिकांचा घटही दृष्ट आहे, आणि वस्त्रादिकांचा देखील घट करणें शक्य आहे; अथवा योगीसंकल्पानें किंवा मंत्रानें आंब्याच्या झाडाला जीं निंबफळें

लागतात, या चमत्काराचा तुमच्याकडून उलगडा होणार नाहीं. शिवाय प्रभाचंद्रानें अन्योन्याभावावर आणलेले दोष स्याद्वादावरही येतात, कारण परचतुष्टयाचे असत्व ते केवळ बुद्धिगोचर आहे कीं, अन्यपदार्थासी अभिन्न आहे कीं, भिन्न आहे? प्रथमपक्षीं अप्राप्यवस्तु प्राप्त करून घेण्याविषयीं बुद्धीची प्रवृत्ति होणार नाहीं, कारण बुद्धिगोचर असत् जे गगनकुसुमादिक ते मिळविण्याची कोणाला प्रवृत्ति होणार नाहीं. आतां कांहीं पदार्थ कालाच्या अपेक्षेनें असत् आहेत, व कांहीं पदार्थ तिन्ही कालीं असत् आहेत असें ह्मणशील, बा हे कुबुद्धि ! बळेंकरूनच तुझ्या मतांत असदेकान्तवादाचा प्रवेश झाला. परचतुष्टयाचे असत्व हे अन्य पदार्थाशीं अभिन्न आहे असें ह्मणशील, तर घटाभिन्न अन्योन्याभावावर प्रभाचंद्रानें आणलेले दोष प्रभाचंद्राला कक्षी करणाऱ्या तुझ्यावर व त्याच्यावर ही येतात. आतां तें असत्व अन्य पदार्थाहून भिन्न आहे असें ह्मणशील, तर भिन्न अन्योन्याभावावर प्रभाचंद्रानें आणलेले दोष तुझ्यावर व त्याच्यावर येतात. अन्योन्याभाव मानणाऱ्यावर प्रभाचंद्राचे दोष तर मुळींच येत नाहींत; कारण घटासी अन्योन्याभाव अभिन्न मानला, तरी घटनाशानंतर पटोत्पत्तीला घटध्वंसाभाव प्रतिबंधक आहे, आणि याप्रमाणें अन्यध्वंसाचे ध्वंसरूप न्यायांत अंगिकारलेही आहे. शिवाय कार्य प्रागभावाचे प्रतियोगी असल्यामुळें ज्याकारणाचे ठायीं ज्याचा प्रागभाव राहत असतो त्यापासूनच त्याची उत्पत्ति आह्मी मानतो तसेंच तूंही मानत असल्यास तुझ्या परचतुष्टयापेक्षीवस्तुअसद्वादावर सिद्धसाधन दोष येतो. आतां हे तुमचे मानणें मंतव्यशेष आहे असें ह्मणशील, तर तुझें मानणें त्याहीपेक्षां विकलमंतव्यशेष आहे. किंवा अन्यपदार्थाहून भिन्न आणि स्वचतुष्टयादिकाहूनही भिन्न असें जर कांहीं असत्व असेल, तर त्याच्याशीं आह्माला कांहीं कर्तव्य नाहीं. ह्मणजे घट हा स्वचतुष्टयानें सत् आहे, आणि पट हा स्वचतुष्टयानें सत् आहे. आतां पटचतुष्टयानें घट असत् आहे, तर ते घटाचे असत्व पटाशीं अभिन्न असल्यास पूर्वोक्त प्रभाचंद्राचे दोष येतातच, आणि पटाहून ते घटाचे असत्व भिन्न असल्यास घटाशीं अर्थातच ते मिळणारे नव्हे; तेव्हां असत् असा घटाचा आकार अन्यच कल्पावा लागेल. हे महाब्राह्मण ! घटाच्या

आकाराहून अन्य कोणी असत् आकार घटाचा मानत असशील तर तो तुझ्या बुद्धींत खुशाल राहूं दे.

वादी उवाच:---अहो! प्रत्यक्षप्रमाण अन्यव्यावर्तक आहे, कीं नाहीं? आणि अन्यव्यावर्तक जर आहे तर सत्व व असत्व या पदार्थांचे त्यानें ग्रहणच केले पाहिजे.

सिद्धान्ती उवाच:---ते अन्योन्याभावाचे ग्रहण करिते; ह्मणजे घटाचे ग्रहण करिते व पटाचे व्यावर्तन करिते; पण पटादिरूप घट नाहीं असा तुह्मा जैनानां नंतर विचार करावा लागतो, प्रमाण ते ग्रहण करीत नाहीं; किंवा प्रमाणाला विधायक न मानून निषेधक मानशील तर विधेयभिन्न सर्वपदार्थांचे ते निषेधक असते? कीं कांहीं पदार्थांचे निषेधक असते? हा घट आहे येथे जशी घटाकारवृत्ति होते तशी घट पट नव्हे असें ह्मणतानां केवल घटाकारवृत्ति होत नाहीं, तर पटस्मृतिसहित घटाकारवृत्ति होते. तात्पर्य पदार्थांच्या निषेधासहित जेव्हां प्रत्यक्षज्ञान होते, तेव्हां प्रतिषेद्धव्य पदार्थांची स्मृति होते, या नियमाचे कोणासही उल्लंघन करतां येत नाहीं. आतां घटप्रत्यक्षज्ञानसमयीं पटादिपरचतुष्टयात्मक सर्व पदार्थांचा निषेध करण्याकरितां त्या सर्व पदार्थांची स्मृति मानशील तर सर्व जीव सर्वज्ञ होतील; व मग तुमच्या अरिहंतादि तीर्थंकरांची कांहीं अपेक्षा राहणार नाहीं. पण जरी ग्रंथांत लिहिलें नाहीं, तरी मला ठाऊक आहे कीं, तुम्ही जैन सर्व जीव स्मृतीच्या अपेक्षेनें सर्वज्ञ आहेत व प्रमाणाच्या अपेक्षेनें अल्पज्ञ आहेत असें मानण्याला माघार घेणार नाहींत. परंतु संस्कारजन्यज्ञान हे स्मृतीचे लक्षण आहे. अनुभवावांचून स्मृति होत नाहीं. भविष्यत्पदार्थांचा कोणासही अनुभव नाहीं, आणि प्रत्यक्षज्ञान तर तुम्हाला भविष्यत पदार्थांचेही निषेधक मानावे लागेल. कारण तसें न मानल्यास वर्त्तमानघटाची भविष्यत् पटादिकांशीं अभिन्नता होईल. ते भविष्यत् पदार्थ सत् मानल्यास तुमच्या परकालिक असत्वप्रतिज्ञेची हानी होईल, आणि भविष्यत् पदार्थ असत् मानल्यास वर्त्तमानघट त्याच्याशीं अभिन्न झाल्यामुळें वर्त्तमान-असत् होईल. तसें झाल्यानें स्वचतुष्टयापेक्षीपदार्थसत्वप्रतिज्ञेची हानी

होईल. याप्रमाणें प्रथमपक्ष असंगत आहे. द्वितीयपक्ष कांहीं प्रमाण नसल्यामुळें असंगत आहे. याप्रमाणें जैनांची सप्तभंगी सर्वथा असंगत असल्यामुळें, कोण्याही समंजस पुरुषाला संमत होणारी नाहीं. आतां जैनांच्या राहिलेल्या पदार्थांची समीक्षा करितो. जैनांच्या मतांत अनंत पदार्थ आहेत, म्हणून त्यांचे खंडणमंडण करणें व्यर्थ आहे; कारण त्यांच्या मतांत इतर मतांचीही घालघुसड होत असते, आणि संक्षेपतः जैनांच्या मतांत दोनच पदार्थ आहेत. जीव व अजीव. ज्याला जाणीव [illegible] तो जीव, व त्याहून भिन्न सर्व अजीव. अजीव पदार्थ सहा प्रकारचे आहेत. १ पुद्गल. २ आस्रव. ३ संवर. ४ निर्जरा. ५ बंध. ६ मोक्ष. कोणी जैन या पदार्थांचे अन्यप्रकारानें निरूपण करितात, ते असेः– जीवास्तिकाय, पुद्गलास्तिकाय, धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय व आकाशास्तिकाय असे पांच पदार्थ आहेत. कालही एक आहे, पण तो पदार्थ नव्हे. तेव्हां अस्तिकाय शब्द द्रव्यवाचक असल्यासारखा दिसतो. पदार्थवाचक तर तो आहेच. जाणीव ज्याला आहे तो जीवास्तिकाय होय. पुनःपुनः नाश होणें व उत्पन्न होणें असे जे देहादि जडपदार्थांचे अवयव तो पुद्गलास्तिकाय, पुण्य धर्मास्तिकाय, पाप अधर्मास्तिकाय आणि लोकालोकदेश आकाशास्तिकाय होय. याचा विस्तर पाहणें असल्यास नयचक्रसार नामक जैनग्रंथांत पहावा, परंतु सप्तपदार्थवादच समजण्याला सुलभ असल्यामुळें थोडीशी पुनरुक्ति सहन करून त्याचेच पुनः निरूपण करितो. जैनामध्यें कोणी उमास्वामी नांवाचा आचार्य झाला आहे. त्यानें आपल्या मताविषयीं तत्वार्थाधिगम नांवाचा सूत्रग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथाच्या प्रथमाध्यायांत चवथें सूत्र आहे, ते येणेंप्रमाणें:–

"जीवाजीवास्रवबंधसंवरनिर्जरामोक्षास्तत्वम्"

जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जर, मोक्ष हे सात पदार्थ आम्हाला इष्ट आहेत. देहपरिमाणवान् चैतन्यगुणवान् सावयव सततोर्ध्वगमनस्वभाव जे द्रव्य त्याला जीव म्हणतात. जीवाची देहामध्यें जी स्थिती होते ती, चहूकडून कर्मानें दाबून घेतल्यामुळें होते. कर्माचा बंध सुटल्यावर चिखलांतून वर आलेल्या पाण्यावर तरंगत राहणाऱ्या भोपळ्याप्रमाणें जीव नेहमीं वर वर जात राहतो, याला मोक्ष म्हटलें

आहे. जैनांचे हेच मतही आहे. पूर्वीचे जैन तीन प्रकारचे जीव मानीत होते, परंतु नित्यमुक्त जीव मानल्यास आपण ईश्वर मानल्यासारखे होईल, अशा भीतीनें नवीन जैन दोन प्रकारचे जीव मानूं लागले. पूर्वील जैनांत अर्हन्मुनि हा नित्यमुक्त असून, जैनधर्माच्या उपदेशानें इतर जीव सिद्ध समजल्या जात असत; आणि जे जैनधर्माचा अभ्यास करीत नाहींत, असे सर्व जीव बद्ध समजल्या जात असत. यासंबंधी विवेचन आम्ही वर केलेंच आहे, परंतु सध्या 'तत्वार्थसूत्र,' 'नयचक्रसार' इत्यादि ग्रंथांत दोन प्रकारचे जीव मानले आहेत. "संसारिणो मुक्ताश्च" असें तत्वार्थसूत्र असून "जीवा द्विविधाः संसारिणो मुक्ताश्च" असें नयचक्रसारांत म्हटलें आहे. अजीवपदार्थ सहा प्रकारचा आहे. पृथिव्यादि चार भूतें आणि स्थावर जंगम. विषयाकडे ओढणाऱ्या पदार्थाचे नांव आस्रव आहे. इंद्रियसंघात त्यांत येतो. शम, दम, गुप्ती आदिकांस संवर म्हणतात. हा मोक्षाला हेतु आहे. पुण्यापुण्यकर्माचा भोग करून टाकणारा तप्तशिलारोहणकेशलुंचनादिक जो विधि त्याला निर्जरा म्हणतात. आठ प्रकारचे कर्मबंध आहेत. चार कर्म घाती व चार अघाती आहेत. ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय आणि आंतरायीक हीं चार घातीं कर्मे होत.

"सम्यक्‌दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः"

(तत्वार्थसूत्र–अध्या० १ सूत्र० १)

या सूत्रांत सांगितलेल्या सम्यक् ज्ञानानें मोक्ष होत नाहीं, याचें नांव ज्ञानावरणीय कर्म आहे. जैनदर्शनानें मोक्ष होत नाहीं, याचे नांव दर्शनावरणीय कर्म आहे. दर्शनें पुष्कळ असल्यामुळें, कोणत्या एका दर्शनानें मोक्ष होतो असा निश्चय नसणें, याचे नांव मोहनीय कर्म आहे, आणि मोक्षाला प्रतिबंधक जे ऐश्वर्यादिक त्याचे ठायीं जो चित्ताचा आवेश, त्याचे नांव आंतरायीक कर्म आहे. याप्रमाणें चार घातीकर्में सांगितली. आतां चार अघातीकर्में आहेत, ती येणेंप्रमाणें:—– वेदनीय, नामिक, गोत्रिक, व आयुष्क. मला जैनमत समजून घेतले पाहिजे अशा प्रकारच्या बुद्धीला वेदनीयकर्म म्हणतात. माझें अमुक नांव आहे, अशा प्रकारच्या अभिमानास नामिककर्म ह्मणतात. अर्हन्मुनीच्या शिष्य-

वर्गामध्यें मी प्रविष्ट झालों आहे, अशा प्रकारच्या अभिमानाला गोत्रिक कर्म म्हणतात. शरीरस्थितीहेतू जे कर्म ते आयुष्क होय. हीं चार अघातीकर्में होत. कोणी या चार अघातीकर्मांचे प्रकारान्तरानें वर्णन करितात. ते असेः— अपूर्ण.

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

## अध्याय २२ वा.

जय जय सद्गुरु कमलनेत्रा । जय जय सद्गुरु कोमलगात्रा । जय जय सद्गुरु परमपवित्रा । आळंदिपते ॥ १ ॥ जय जय सद्गुरु भक्तभूषणा । जय जय सद्गुरु विश्वजीवना । जय जय सद्गुरु कल्याण निधाना । आळंदिपते ॥ २ ॥ जय जय सद्गुरु मायाविरहिता । जय जय सद्गुरु कृतलोकाहिता । जय जय सद्गुरु निगमैकविहिता । स्वाचा-रगम्य ॥ ३ ॥ जय जय सद्गुरु ज्ञानसमुद्रा । जय जय सद्गुरु अलक्ष-मुद्रा । जय जय सन्मासचकोरचंद्रा । जागृत्स्वप्ननिद्राविरहिता ॥ ४ ॥ तूं अनादि अनंत निर्गुण । शिष्यहिता जाहलासी सगुण । माझी आशा पुरवून । करी कल्याण दयाळा ॥ ५ ॥ मी नाना देवासी शरण गेलो । परी त्या त्या साधनीं श्रमलो । ह्मणूनि तुझिया पायीं लागलो । आळंदि वल्लभे ॥ ६ ॥ प्रारब्ध चुकविणें कांहीं । देवांच्याही हातीं नाहीं । वरी बोध न मिळे तेहि । देवांगण ॥७॥ मग जयाचिया वचनें । अबोध जाय आणि प्रारब्ध उणें । भोगिलियाही लीले साहणें । त्या तुज नमणें कां न योग्य ॥ ८ ॥ वाचें स्मरोनिया नांव । हृदयीं आठवितां ठाव । सर्वत्र यशस्वी आळंदिराव । अनुपम ठेव दावी पुढें ॥ ९ ॥ शिष्य विनवी श्रीगुरुराया । भगवंताचिया वचनें मिया । ऐकिले नाना उपाया । स्वहि-तास्तव ॥ १० ॥ देव अमृत पिऊनि अमर होती । स्वपद कोणी घ्यावें हेही न इच्छीती । तथापि अमृत न देती । दान कवणाते ॥ ११ ॥ तैसे भगवंताचे बोल । ऐकतां येती आनंद डोल । संप्रदायविधि स-खोल । ऐकावाचि वाटे ॥ १२ ॥ कां तान्हयाचिया समयीं । जाणे आधविया आई । यास्तव बोलता नये तया तरीही । सकल जाणे इंगिते

॥ १३ ॥ तेवि शिष्याचिया हृदयीचें । सद्गुरु अखिल जाणती साचे । ह्मणोनि विधि संप्रदायाचे । अनुज्ञारूपाचे करतील ॥ १४ ॥ तैं श्रीगुरु ह्मणती तुह्मी वाणी । माझा बोधसिंधु क्षणोक्षणीं । उल्हासवोनि आणी जनीं । गांगजळ ॥ १५ ॥ तुज योग्य वाटेल ते पुसावे । शिष्यें पुसता ना रुसावे । ऐसेचि आचरण असावे । श्रीगुरूचे ॥ १६ ॥ शिष्याची बुद्धि वाढविणें । हेचि श्रीगुरूची मुख्य लक्षणें । एरवी करामती दाखविणे । ते झकविणें लोकांते ॥ १७ ॥ केवळ गुरूचा आशीर्वाद । जरी होय सुखप्रद । तरी तेथ व्यभिचार सिद्ध । गुरुत्वनियाम तो नसे ॥ १८ ॥ भलताही भलत्याप्रती । आशीर्वाद देई क्षितीं । आतां दाविणें करामती । गुरु न ह्मणिजे तयांते ॥ १९ ॥ चमत्कार दाखविणें । तरी ते घडे मायागुणें । माया तुच्छ या शब्दाविणें । आन उपाय नसे मोक्षा ॥ २० ॥ ह्मणोनि नाना उपायेंकरून । शरण आलियाचे बुद्धिवर्धन । हेंचि मुख्य श्रीगुरुलक्षण । सर्वज्ञात्माचार्य सांगती ॥ २१ ॥

" एतदेवहि दयालुलक्षणं यद्विनेयजनबुद्धिवर्धनम् "

( संक्षेपशारिरक अ० ४ श्लोक ३ उत्तरार्ध. )

चमत्कार दाखविणें । एथ दुसरियासी न्यून पाहणें । बुद्धि वाढविलियाविणें । आपणा ऐसें करणें न घडे ॥ २२ ॥ ह्मणोनि सद्गुरु तोचि आधीं । जो वाढवी शिष्याची बुद्धि । जयाचा तयासी आत्मनिधि । देता त्रिशुद्धि काय गर्व ॥ २३ ॥ गर्वें गुरु मार्गे चुकी । गर्वे शिष्यही कुंभीपाकीं । गर्वाते नाहीं निकी । प्रशंसा कोठें ॥ २४ ॥ कलियुगाचा ऐसा पगडा । लागला गुरुशिष्यांचा झगडा । दोघेही शुल्क दगडा— । स्तव भांडती ॥ २५ ॥ गुरूचे जे सात्विक लक्षण । तेचि अंतःकरणीं धरून । समयदोष निरखून । शिष्य गुरूते निंदिती ॥ २६ ॥ सात्विक गुरु पाहिजे ह्मणती । आपण तामसाचि राहती । ऐसीचि आहे गुरूंची स्थिती । झडपली मति गर्वरूपें ॥ २७ ॥ शिष्याचीं लक्षणें घेऊन सात्विक । आपणा इच्छिती देहसुख । एवं गुरु शिष्य दोघेही नरक । शेवटी निःशंक पाहती ॥ २८ ॥ अवघे सात्विकचि असावे । गर्विष्ठ कोणीही नसावे । विषयामाजीं न फसावे । कोणीही कदा ॥ २९ ॥ गुरु गर्वे देहाभिमानी जाहला । आणि शिष्य गर्वे काय मोक्षा गेला । यालागीं

गर्व अवधियाला । नाशचि करी ॥ ३० ॥ तथापि गुरुगर्वाच्या ठायीं । ज्ञान असतां बाध नाहीं । शिष्य साधक ह्मणोनि तया कांहीं । गर्व लवलाही नसावा ॥३१॥ आतां हे बोलणें न रुचे जया । तरी शास्त्रचि न रुचे तया । दीना अभय देयावया । गुरुगर्वोक्ति मी अपेक्षी ॥ ३२ ॥ पीडित असतां भवदुःख । जो शरण आला नावेक । तयासी अभय न दे जो सम्यक । तो गुरु नपुंसक मी ह्मणे ॥ ३३ ॥ जो ह्मणे माझा राग निमाला । आणि गुरुआज्ञेसी कुचर झाला । तो शिष्य सर्वांग सुंदर असला । तथापि निःशेष त्यागावा ॥३४॥ गुरुप्रतीति शास्त्रप्रतीति । तिसरी ती आत्मप्रतीति । दिवशीं दिवशीं जयाप्रति । घडती तो महायोगी ॥ ३५ ॥ एक स्वयें शास्त्र पाहती । स्वमतें शास्त्रार्थ विचारिती । मग गुरुवाक्यातें दूषिती । आपुलिया बळें ॥ ३६ ॥ तयासी गुरुअभिमत ज्ञान । मिळेचिना निश्चयें करून । एक ते गुरुचि बैसती धरून । शास्त्र वचन नेणती ॥ ३७ ॥ ते भलतेही संप्रदाय । पाहताचि फसती स्वयें । एक दोन्हींचा समन्वय । करिती जरी ॥ ३८ ॥ तरी नेणती आत्मप्रतीति । तेणें स्वहिता सर्वथा मुकती । जैसे चाचपटे चालती । आंधारीं आंधळे ॥ ३९ ॥ जो साच कृतकृत्य जाहला । गुरुदोष न दिसती त्याला । जो वचनाधीन राहिला । तो शास्त्रास वा गुरूला दूषी ॥ ४० ॥ केवळ गुरूवरी ज्याचे प्रेम । तो दूषितो स्मृति निगम । केवळ शास्त्रावरी ज्याचे प्रेम । तो सद्गुरूस दूषितो ॥ ४१ ॥ केवळ देहप्रेम जयासी । तो प्रसंगीं दूषी दोहींसी । ह्मणोनि निश्चये गुरुशास्त्रासी । विचारावे ॥ ४२ ॥ शास्त्र सांगेल तो गुरु । गुरु सांगेल तो शास्त्रविचारु । जैसा कां बीजांकुरु । अन्योन्याश्रय तैसा हा ॥ ४३ ॥ सृष्टींत ईश्वरे बीज निर्मिले । ह्मणजे अनादिपणे द्योतिले । ते मानुषे नेवोनि क्षेत्रीं पेरिले । तरी ते वाढले तेणेंचि मानें ॥ ४४ ॥ तेवि ईश्वरगुरु शास्त्रबीज । पुढती गुरुफळ संप्रदाय बीज । एवं गुरु आधीं शास्त्र सहज । अनंतर आहे ॥ ४५ ॥ गुरु असतो जीव । तो भलतेही सांगेल स्वयमेव । यालागीं शास्त्र पाहणें ह्मणती सर्व । मंदबुद्धि ॥ ४६ ॥ जे कां शास्त्राचे दास । तयांचे ह्मणणें योग्य तयास । परी हे भय वेदान्तियास । कदा नुमटे

॥ ४७ ॥ जी जी प्रक्रिया करी बोध। तीचि तीचि आहे शुद्ध । ऐसे बोलिले प्रसिद्ध । वार्तिककारही ॥ ४८ ॥

"यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि ।
सा सैव प्रक्रियेह स्यात् साध्वी सा चानवस्थितिः" ॥

प्रणवोपासनेसमान । हो शके कैसाब्रह्मज्ञान । वेदान्ताची खूण । ऐसीचि आहे ॥ ४९ ॥ कोणी बळेंचि शास्त्र निंदिती । प्रक्रियाही रचूं नेणती । ऐसे जे गुरु ह्मणविती । जीवे मातींत घालावे ॥ ५० ॥ एका मूर्खाचिये मनीं । गुरु सर्वज्ञ असावा ह्मणोनी । परि मिथ्या जगतीं कोणी । सर्वज्ञता मिरवावी ॥ ५१ ॥ गुरु जितुका अल्पज्ञ असेल । तितुका तो अधिक शोभेल । कारण जयाच्या ज्ञाना अल्प बोल । तोचि उत्तम अधिकारी ॥ ५२ ॥

"श्लोकेन च तदर्धेन श्लोकपादेन वा यदि ।
ब्रह्मज्ञानं भवेद्यस्य क्षीणं तस्य प्रयोजनम्" ॥

( बृहदारण्यवार्तिक )

इत्यादि श्रुतिस्मृतिपुढें । सर्वज्ञतादि तर्क बापुडे । एकानें स्वप्नीचे पुसिले कोडे । ते जागृतींत कोणें कां सांगावें ॥ ५३ ॥ तैसे ब्रह्मज्ञानिया समोर । सर्वज्ञतादि हास्याकार । यालागीं बोधसमर्थविचार । असावा श्रीगुरु ॥ ५४ ॥ सात्विक असतां सात्विक पहावा । तामस असलिया स्वभावा । गुरु मिळेल तैसा पहावा । उपासनार्थ ॥ ५५ ॥ तामस स्वभावासी ज्ञान । सर्वथा नोहेचि जाण । ह्मणोनि घेयावे उपासन । कवणेही परी ॥ ५६ ॥ आपुले आंगीं दोष असतां । तरी दुसऱ्यासी कां निंदावे वृथा । उपदेशावीण श्रीगुरुनाथा । आनश्रमदाता साफिल्य नोहे ॥ ५७ ॥ सात्विकही जाहला । तामसवचनें ज्ञाना भेटला । तरी तामसही आला । सात्विका गुरु ॥ ५८ ॥ परी येथही अपवाद बहु असती । यालागीं राजमार्ग सत्वसंपत्ति । अथवा योग्य गुणत्रयोपयोग विश्वसुधारणार्थी । करी तो गुरुमूर्ति मानवे मातें ॥ ५९ ॥ एक गुरु धरिती शांति । जवळी शिष्य शिष्यीणी येती । मग आपसांत मिसळती । वधुवरपणें ॥ ६० ॥ परी ह्मणी ढळेल साधुपण । यासाठीं न बोलती वचन । तया साधु ह्मणोनि करावे नमन । परी गुरुपण शोभेना ॥ ६१ ॥

ब्रह्मज्ञान जाहले । तेणें अन्यायीं जग हे जाळिले । तरी पाप न लागे बहिले । माहात्म्या तया ॥ ६२ ॥ ह्मणोनि हो कां भलती रीति । परी लोकांसी दाखविणें शांति । ते दाखवी साधकस्थिती । संसारभीति अनिवार ॥ ६३ ॥ एक ते धरोनी अतिशांति । शिष्यांचे चाळे डोळिया पाहती । आणि आपणही करूं लागती । त्यांच्या तोंडावरती थुंकावे ॥ ६४ ॥ एक ते आह्मी ज्ञानी म्हणोन । लोकास बोधिती इच्छा नसून । जैशा मूरळ्या भंडार घेऊन । बळेंचि फांसिती कपाळा ॥ ६५ ॥ ते ज्ञानाभिमानी खळ । न होती गुरु निखळ । एक ह्मणती संत केवळ । लोकहितार्थ धुंडिती ॥ ६६ ॥ तिही आमुच्या घरीं यावे । आम्हासी बोध करावे । पटेल ते घेवो द्यावे । सुखेंचि आम्हा ॥ ६७ ॥ ऐसियांच्या घरीं कोणी । जाय तो साधु पापखाणी । त्या स्थळींचें अन्नपाणी । निश्चयें करूनि वर्जावे ॥६८॥ एवढिया निरूपणाचा सार । कीं प्रथम शरण यावा शिष्यवर । मग गुरूनें देवोनि अभयकर । योग्य तयासि शिकवावे ॥ ६९ ॥ तेथ चुकलिया दंड देयावा । परी उगाचि लोकीं बंडाळा न करावा । तंव वादी ह्मणे स्मृतींत बरवा । मातापिता गुरुरूप ॥ ७० ॥ तेव्हां ह्मणे सिद्धांती । जरी मायबापचि गुरु होती । तरी " मातृदेवो भव पितृदेवो भव आचार्यदेवो भव " ही वचनें नसती । पृथक् पृथक् तैत्तिरीय श्रुतिमाजीं ॥ ७१ ॥ पितयाहुनि श्रेष्ठ माय । मातेहूनि श्रीगुरुराय । वरिष्ठ हे बोलिले गांगेय । महाभारतामाझारीं ॥ ७२ ॥

पितॄन् दश तु मातैका सर्वांसां पृथिवीमपि ॥१७॥
गुरुत्वेनातिभवति नास्ति मातृसमो गुरुः ॥
गुरुर्गरीयान् पितृतो मातृतश्चेति मे मतिः ॥१८॥

( शांतिपर्व अध्याय १०८ )

गुरु होईल मातापिता । तरी गुरूस दान देणें आघवें वृथा । कारण दायविभागे धन तत्वतां । पुत्राचेंचि ते होय ॥ ७३ ॥ पितयासि देणें दान । हे स्मृतींत निषिद्ध जाण । यालागीं मातापितयाहूनि जाण । भिन्नही असे श्रीगुरु ॥ ७४ ॥ मातापिता पुत्र अथवा इतर । जो ब्रह्मज्ञानी चतुर । तो सद्गुरु हा निर्धार । श्रुतिशास्त्रांचा ॥ ७५ ॥

ब्रह्मज्ञानी भगवद्भक्त । तो सद्गुरु विवाद्य नाहीं येथ । कलावतीचा गुरु पतिव्यतिरिक्त । कुमारपणींच ब्रह्मोत्तरखंडीं बोलिला ॥ ७६ ॥ अल्प शाब्दिक जरी जाहला । तरी प्रक्रियाकुशल पाहिजे भला । नाहीं तरी केवळ ब्रह्मज्ञानियाला । नमस्कार करावा परी न घ्यावा उपदेशू ॥ ७७ ॥ विद्वान् आणि ब्रह्मनिष्ठ । ऐसा गुरु तरी भाग्यचि वरिष्ठ । परि श्रोत्रियाहूनि ब्रह्मनिष्ठ । अंश विशेष अवलोकावा ॥ ७८ ॥ वादी ह्मणे संतांची वचनें । शिष्य करूचि नये कोणें । ऐसी आह्याती प्रमाणें । ऐकावी कीरू ॥ ७९ ॥

अभंग

२०३३ मेघवृष्टीनें करावा उपदेश । परी गुरुनें न करावा शिष्य । वांटा लाभे त्यास । केल्या अर्ध कर्मांचा ॥ १ ॥ द्रव्य वेचावें अन्नछत्रीं । भूतीं द्यावें सर्वत्र । नेदावा हा पुत्र । उत्तम याती पोसणा ॥ २ ॥ बीज न पेरावें खडकीं । ओलें नाहीं ज्याचे बुडखीं । थीतां ठके सेखीं । पाठीं लागे दिवाण ॥ ३ ॥ गुज बोलावें संतांसी । पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां तियेसी । वांटा पावे कर्मांचा ॥ ४ ॥ शुद्ध कसूनि पहावें । वरी रंगा न भुलावें । तुका ह्मणे घ्यावें । जया नये तुटी तें ॥ ५ ॥

३१०२ गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ॥ १ ॥ भूतीं नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ॥ २ ॥ न कळता दोरी साप । राहूं नेदावा तो कांप ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुणदोषीं । ऐसे न पडावें सोसीं ॥ ४ ॥

२४९९ शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवासारिखे ॥ १ ॥ त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥ २ ॥ त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य सांगे । योत रागें येती ते ॥ ४ ॥

२५६२ घालूनिया मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥ १ ॥ ऐसे पोटभरे संत । तयां कैंचा भगवंत ॥ २ ॥ रांडापोरांतें गोविती । वर्षासन ते लाविती ॥ ३ ॥ जैसे बोलती निरूपणीं । तैसी न करिती करणी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तयां । तमोगुणियांची क्रिया ॥ ५ ॥

२५८३ गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ। ह्मणती यातीकुळ नाहीं ब्रह्मीं ॥१॥ पविशाला ह्मणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ॥ २ ॥ डोहोर दासी बलुती बारा । उपदेशिती फारा रांडापोरा ॥ ३ ॥ कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी फजिती स्वधर्माची ॥ ४ ॥

नमता करुनी होम खाती एके ठायीं। ह्मणती पाप नाहीं मोक्ष येणें ॥५॥
इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ॥ ६ ॥
नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेमें । उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥ ७ ॥
तुका ह्मणे ऐसे गुरु शिष्य पूर्ण । विठोबाची आण नरका जाती ॥ ८ ॥
४२७७ गुरुचिया मुखें होईल ब्रह्मज्ञान । न कळे प्रेमखूण विठोबाची ॥ १ ॥ वेदांतें विचारा पुराणातें पुसा । विठोबाचा कैसा प्रेमभाव ॥२॥
तुका ह्मणे सांडा जाणींवेचा शीण । विठोबाची खूण जाणती संत ॥ ३ ॥

तै सिद्धान्ती ह्मणे ऐक । या विरुद्ध वचनें आणिक । ते प्रमाणार्थ सम्यक् । सांगतो तूंते ॥ ८० ॥ परी आधीं घेतल्या अभंगाचा । अर्थ निरूपिजेल साचा । मग आणिक वचनांचा । अभिप्राय सांगू ॥ ८१ ॥ प्रथम अभंगीं मेघवृष्टीनें । सांगितलें उपदेश करणें । तेथ शिष्येंचि आपगुणें । स्मरिजे मार्ग ॥ ८२ ॥ बीज पेरूं नये खडकीं । शुद्ध कसूनि पहावें इत्यादिकीं । शिष्य करणिया विशेखीं । सुचविलेंही आहे ॥८३॥ जो शिष्य आपुले नायके। निषिद्ध आचरी निके। द्रव्यासाठीं उपदेशितां लटके । तरी वाटा पावे कर्माचा ॥ ८४ ॥ दुसऱ्या अभंगीं गुरुशिष्यपण । बोलिलें आहे अधमलक्षण । परी ते वेदान्तदृष्टीं पूर्ण । आत्मदृष्टि अवलंबूनि ॥ ८५ ॥ गुरुशिष्यांची व्यावहारिक सत्ता । हा त्या अभंगाचा अर्थ तत्वतां । नातरी मानियेला स्वप्नीं गुरुउपदेश इत्यादि होतील अन्यथा । तुकाराम वाक्याचि ॥ ८६ ॥ गुरु शिष्य कल्पित । आत्मदृष्टीं एक समस्त । यालागीं गुरुशिष्यादिव्यवहारजात । साक्षिभास्य तो ॥ ८७ ॥ परी श्रीगुरु अनध्यस्तविवर्त । तयाचा निषेध करितां अत्यंत । तरी गुरुभक्तिश्रुतिविरोध येत । अप्रमाण सर्वथा तो ॥ ८८ ॥ दृष्टिसृष्टिवादाभिप्रायें । हा द्वितीय अभंग बोलिला आहे । अथवा गुरुत्वाभिमानाची सोये । ऐथ बोलिली ॥ ८९ ॥ तिसरा जो कां अभंग । तयांत बोलिला विराग । गुरुत्वाभिमान धरोनी चांग । शिष्यसेवा इच्छूं नये ॥ ९० ॥ भोगार्थ शिष्यसेवा घेतां । तदा वाढे देहाहंता । परी शिष्यदृष्टीस हा विचार शिवता । घात सर्वथा तयाचा ॥ ९१ ॥

४३४९ सद्गुरूवांचोनि सांपडेना सोय। धरावें ते पाय आधीं आधीं॥१॥
आपणा सारिखे करिती तात्काळ । न लागे काळ तया लागीं ॥ २ ॥

लोह परिसाची न साहे उपमा । सद्गुरुमहिमा अगाधचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैसे आंधळे हे जन । गेले विसरून खऱ्या देवा ॥ ४ ॥

आधीं पूजा सद्गुरुनाथा । चाले देवावरी सत्ता ॥ १ ॥ तुका गर्जतो पवाडे । पहाता गुरुभक्त थोडे ॥ २ ॥

२५३९ सकळ देवाचे दैवत । सद्गुरुनाथ एकला ॥ १ ॥ राम केला ब्रह्मज्ञानी । वसिष्ठमुनि तारक ॥२॥ कृष्ण गुरु संदीपन । ब्रह्मपूर्ण दाविले ॥ ३ ॥ तुका ह्मणे सद्गुरुसेवा । सकल देवा वरिष्ठ ॥ ४ ॥

इत्यादि अभंगा कवण गति । यालागीं शिष्याची न घे सेवा इति । वैराग्यार्थ असती । उक्ति सकळ ॥ ९२ ॥ गुरु विरागी शिष्य सेवाशील । तरीच दोघेही विश्रम सोज्वल । नाहीं तरी पाठी किडाळ । लागे राग द्वेषाचे ॥ ९३ ॥ शिष्यसेवा धर्मकाजा । येथ निषेधिता श्रुतिविरोध दुजा । ह्मणोनिया उक्ति सहजा । वैराग्यार्थ ॥ ९४ ॥ ढोंगी गुरूंची फजिती । तिसरिया अभंगीं स्वामी बोलती । ते सर्वथाचि मजप्रति । मान्य आहे ॥ ९५ ॥ धर्मकाजा वर्षासन । तयाचें नाहीं केलें दूषण । कुटुंबार्थ वर्षासन । दूषिलें आहे ये अभंगीं ॥ ९६ ॥ परी जो परमहंस । तया धर्मकाजही वर्षासन दोष । हाचि आहे सारांश । अभंगांचा इया ॥ ९७ ॥ ढोंगीं गुरूंचे खंडण । कोणीही करावे बळेंकरून । भलते उपदेशिता जाण । तमोगुण चुकेना ॥ ९८ ॥ घरीची सांडोनि शालिग्राम मूर्ति । आपुला खडाऊ पूजावया सांगती । ऐसे गुरु लोकीं मिरविती । ते उभे आगींत जाळावें ॥ ९९ ॥ वेदमार्ग बळें सांगतां । तयाचा निषेध नाहीं तत्वतां । परी कुटुंबभरणार्थ भोळे भोंदता । दाटुनि उपदेश निषेधिला ॥ १०० ॥ शिष्यांहीं जरी द्रव्य दिधले । तरी ते धर्मकार्यीं लावावे सगळे । आपण पोट भरावें उगले । यदृच्छा लाभें वा श्रमज धनें ॥ १०१ ॥ सन्यासी मठ करोनी राहे । तयासी दीक्षा देऊं नोहे । आणि गृहस्थ भिक्षा मागूं पाहे । तरी दीक्षा तयास न द्यावी ॥ १०२ ॥ ऐसंडी धर्मकाजा । आपत्प्रसंग आलिया वोजा । विशेष निषेध नाहीं सहजा । अभक्तिवर्ज आनाचों ॥ १०३ ॥ वाम-मार्गीगुरूंचें दोष । चवथ्या अभंगीं दाविले विशेष । दूषिले आहे भैरवी चक्रास । मद्यमांसाज्ञ ह्मणोनी ॥ १०४ ॥ एरवी काळा आणि जगन्नाथ

भात । तोही दूषिला स्ववाक्यविरोध आणि पुराणविरोध प्राप्त । जेवा-
वयासाठीं जे बोलती अद्वैत । त्यांचें खंडण या अभंगीं ॥ १०५ ॥
ते मज सर्वथा मान्य आहे । आतां पांचवा जो अभंग पाहे । त्यांत
खंडिला तंव आहे । शुष्कवेदान्ताभिमानी ॥ १०६ ॥

स्वात्मतत्वाभिगमनं भवति प्रायशो नृणाम् ।
। मुने विषयवैरस्यं कदर्थादुपजायते ॥ ६ ॥

( वासिष्ठ मु० प्र० स० २ )

शब्दाचे सामर्थ्य ज्ञान करणें । यालागीं उपनिषन्मात्रश्रवणें ।
बहुधा ज्ञान होय वचनें । परी वैराग्य होणें अघटित ॥ १०७ ॥
" वैराग्यावांचुनि कही । ज्ञानासी तगणेंचि नाहीं " । या तात वचनें
मिळे ग्वाही । कीं शब्दज अपरोक्षही पुढें लोपे ॥ १०८ ॥ शब्दें सत्य-
ज्ञान होय । तो निमिष गेलिया अभिमान होय । मग न कळतांहि ब्रह्म
काय । चार्वाकासम बोलूं लागे ॥ १०९ ॥ शब्दें जे ज्ञान जाहलें । ते
वैराग्याविण न जाय रक्षिलें । परी वैराग्यही उगलें । भक्तिविण हारपे
क्षणोक्षणीं ॥ ११० ॥ मनासी विषयाची गोडी । ते स्वरूप ठाव घडी
घडी सोडी । त्यासी लागतां प्रेमाची ओढी । तरी मागें परवडी परते
ना ॥ १११ ॥ वैराग्यें रक्षावी ज्ञानवृत्ति । भक्तीनें रक्षावी विरक्ति ।
परी जे असती शुष्क वेदान्ती । तया सुखप्राप्ति हे नव्हे ॥ ११२ ॥
आर्या:—हरिहरकीर्ति अनादर करितो धरितो मनांत पंचदशी ।
त्याच्या ज्ञानाग्नीनें न जळे एकही पटप्रपंचदशी ॥ १ ॥
एवं प्राकृत साधुवचन । आणि भागवतींही प्रमाण । कीं ज्ञानवैराग्य
भक्तिविण । शोभा सर्वथा पावेना ॥ ११४ ॥

नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।
कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे न चार्पितं कर्म यदप्यकारणम् ॥१२॥

( भागवत स्कं० १ अ० ५ )

नैष्कर्म्य ह्मणजे वैराग्य । भक्तिविण ते अश्लाघ्य । पुनः पुनः
लुटिती भाग्य । विषयेंद्रिय ॥ ११५ ॥ शुद्ध जे कां ज्ञान । तेंही थारेना
भक्तिविण । ईश्वरीं ऐक्य झालिया पूर्ण । ईश्वरभक्तिविण तद्रक्षण कैसें
॥ ११६ ॥ झालिया प्रथम व्यतिरेक । जीव प्रेमें लाहे जो विवेक ।

ईश्वरप्रेमाविण तो एक । आहे हा सान्वयव्यतिरेक रक्षिजे केविं ॥ ११७ ॥ ईश्वरप्रेमचि भक्ति । जीवविवेके प्रारब्धदेहभुक्ति । अनध्यस्त देहप्रीति । ईशान्वयविवेके तेवि ॥ ११८ ॥ ह्मणूनि ज्ञान भक्ति वैराग्य । समुच्चय पाहिजे तरीच योग्य । जिता मेलिया कैवल्य- भाग्य । हाता चढे ॥ ११९ ॥ सांख्याचे पुरुषज्ञान । तेहि न थारे वैराग्याविण । यालागीं अल्प जे शब्दज्ञान । तेचि या अभंगीं निषेधिले ॥ १२० ॥ शेवटील पद जाणतील संत । तेही आघवे होईल व्यर्थ । ह्मणूनि तूं अभंग घेतले जे उदाहरणार्थ । तयाचा अर्थ हा ऐसा ॥ १२१ ॥ अर्थ जाणूनि पुढें बकसी । तरी श्रीमुखांतरी खासी । आतां ऐक प्रमाणासी । तुकारामोक्तीचि ॥ १२२ ॥

अभंग.

४२६९ देवा ऐसा शिष्य देई । ब्रह्मज्ञानीं निपुण पाही ॥ १ ॥ जो कां भावाचा आगळा । भक्ति प्रेमाचा पुतळा ॥ २ ॥ ऐसी युक्ति ज्याला बाणें । तेथें वैराग्याचे ठाणे ॥ ३ ॥ ऐसा झाला हो शरीरी । तुका लिंब- लोण करी ॥ ४ ॥

४२७० कृपा करावी भगवंते । ऐसा शिष्य द्यावा माते ॥ १ ॥ माझे व्रत जो चालवी । त्यासी द्यावे त्वां पालवी ॥ २ ॥ व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा । तीहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ ३ ॥ तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥

प्रथम अभंगीं ब्रह्मज्ञानी । आणि वैराग्याची खाणी । ऐसा शिष्य देवालागुनी । भक्तिसाठीं मागितला ॥ १२३ ॥ ब्रह्मज्ञानी आणि विरक्त । शिष्य पाहिजे भक्त्यर्थ । मग इतर साधका कोण पुसत । आले समस्त प्रवाहेंचि ॥ १२४ ॥ द्वितीय अभंगीं सर्वसंपन्न । परी धर्मप्रचारक पाहिजे ह्मणोन । माझे व्रत जो चालवी हें वचन । याचि साठीं ॥ १२५ ॥ "तुका तुका हाका मारी" । इत्यादि वचनें निर्धारीं । उपास्य देवाचिया द्वारीं । सद्गुरुभक्ति सुचविली ॥ १२६ ॥ "यस्य देवे परा भक्ति । यथा देवे तथा गुरौ" ही श्रुति । अभंगीं सुचविली निश्चिती । येणेंचि मानें ॥ १२७ ॥ जैसा ईश्वरानुग्रहाविण । सद्गुरु न मिळे हें वासिष्ठ वचन । तैसा ईश्वरानुग्रहाविण । सच्छिष्यही भेटना ॥ १२८ ॥

यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् ।
तावन्न सद्गुरुः कश्चित् सच्छास्त्रं वापि नोलभेत् ॥१॥

उपदेशें वा कल्पनेनें । परमेश्वरासी शरण जाणें । मग तयाच्या अनुग्रहानें । सद्गुरु सच्छास्त्र भेटती ॥ १२९ ॥ साच न करितां भगवद्भक्ति । करावया जिज्ञासातृप्ति । जे गुरुशास्त्र धुंडाळिती । ते पाखांडा हातीं सांपडले ॥ १३० ॥ जया धर्मी केवळ उपास्ती । बोलिली आहे निश्चिती । तयांची सद्गुरुसच्छास्त्रप्राप्ति । पुढेंचि राहिली या श्लोकें ॥ १३१ ॥ दृढ झालिया परोक्ष ईश्वरोपासन । मग तदनुग्रहें होय सद्गुरु सच्छास्त्रदर्शन । सच्छास्त्रें अपरोक्ष ब्रह्मज्ञान । अपरोक्ष सद्गुणभजन सद्गुरूचे प्रेमें ॥ १३२ ॥ सद्गुरुदर्शित भगवन्मूर्ति । तेही हृदयीं उमटे प्रीति । एवं शिष्यही देणें भगवंतेहातीं । ह्मणोनी कृपा करावी भगवंते ही उक्ति अभंगीं या ॥ १३३ ॥ आपुलेंचि भजन करविता । तुकारामास न वाटली चिंता । यालागीं गर्वे वा निर्गर्वे तत्वतां । सत्योपदेश करावा ॥ १३४ ॥ तुकारामादि संतांची वचनें । कोट्यावधि असती येणें मानें । परी ग्रंथविस्तरभयें स्थानें । तेवढीच दिधली ॥ १३५ ॥ ज्ञान हीन गुरु त्यजिजे । ऐसे गुरुगीतीचें वचन गाजे । वादी ह्मणे तरी सहजे । गुरुभक्ति नियत केवि ॥ १३६ ॥ तैं ह्मणे ऐक सिद्धान्ती । ज्ञानीच गुरु बोलिला निश्चिती । इतर गुरुचि न होती । तरी ते त्यागिता दोष काय ? ॥ १३७ ॥ शांतिपर्वे महाभारतीं । तयाचिया मोक्षधर्मांतीं । शत आचार्य जनकाप्रती । परम प्रीति बोलिले ॥ १३८ ॥ परी आत्म नित्यत्वाविषयीं जाण । अवघीयांची मतें भ्रम पूर्ण । पंचशिखाचार्य तेथें येऊन । शत आचार्य जिंकिले ॥ १३९ ॥ तेव्हां शत आचार्य सोडुनी । जनक लागला पंचशिखचरणीं । तोही श्लोक प्रमाणीं । भूत ऐके ॥ १४० ॥

जनकस्त्वभिसरंक्तः कापिलेयानुदर्शनात् ।
उत्सृज्य शतमाचार्यान् पृष्ठतोऽनुजगाम तम् ॥१९॥
( शांतिपर्व मोक्षधर्म अ० २१८ पर्वाच्या मानानें )

परी तयाचें हेंचि कारण । कीं आचार्यशतमुखेंकरून । धर्म ऐकत होता आपण । नृपाळ जरी ॥ १४१ ॥ तरी संतोष न होता

तयातें । हेंचि मागील श्लोकीं बोलिले ऐथें । ह्मणूनि गुरुत्वाचि आचार्यतें । आले नाहीं ॥ १४२ ॥ थोर ह्मणूनि राजा । करी सकळांची पूजा । एरवी शिष्य न तोषता ओजा । सद्गुरु ह्मणावा किमर्थ ॥ १४३ ॥ यद्यपि अल्पवाक्यें ज्ञान जया । तो ह्मणिजे उत्तम अधिकारिया । येणें अनुमानें श्रीगुरुराया । अल्पज्ञत्व भूषणाचि ॥ १४४ ॥ तथापि सिद्धान्त प्रक्रिया पाहिजे निश्चित । सानुभवागमपर चित्त । आणि सच्छिष्यातें प्रतीत । होवावी ज्ञानाची ॥ १४५ ॥ मग तार्किकांचे समाधान । हो न हो नाहीं प्रयोजन । ये अध्यायीं याचिकारण । आगम शब्द प्रयोजिला ॥ १४६ ॥ महाभारतीं आणि स्कंदपुराणीं । मरुत्तयाज्ञवल्क्यवाणी । गुरुत्यागाविषयीं प्रमाणी । भूत आहे ॥ १४७ ॥

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥१॥

येथ परमार्थभिन्न गुरुचा । परित्याग बोलिला साचा । विशेषणेंचि तयाचा । अर्थलाभ ह्मणोनि ॥ १४८ ॥ अवलिप्त बोलिजे देहाभिमानी । इत्यासक्त रजोगुणी । कार्याकार्य नेणे तो तमोगुणी । मोहग्रस्त ॥ १४९ ॥ बळेंचि वेदशास्त्र सांडी । अभिमानें जाहला पाखंडी । तो उत्पथगामी प्रचंडी । म्हणावा सर्वथा ॥ १५० ॥ तयाचा परित्याग करितां । दोष येईल कवणिया अर्था । परि तेथही पाहतां । अल्पसा दोषू ॥ १५१ ॥ "गुरोरप्यवलिप्तस्य" हा श्लोक । स्कंदपुराणीं बोलिले याज्ञवल्क्य । तेणें गुरुत्यागही सम्यक । केला पुढती ॥ १५२ ॥ परी तयाची जी विद्या होती । ते समूळ वमुनी घातली क्षितीं । एवं सामर्थ्य जयाप्रति । तया ही उक्ति शोभते ॥ १५३ ॥ एरवी कलीची रिती । शिष्य आपण उत्पथी । तया निग्रहिता गुरुमूर्ती । मूर्ख इच्छिती त्याग करूं ॥ १५४ ॥ प्रऱ्हादाचे उदाहरण । उत्पथग पुत्र देती आपण । धर्म व्याधाचे उदाहरण । बाप देती सकळातें ॥ १५५ ॥ पति स्त्रियेकारण । देती अरुंधतीचे उदाहरण । स्त्रियाही पतिकारण । गोपीचे उदाहरण देती ॥ १५६ ॥ गुरु उत्तंकाचे उदाहरण देती । शिष्य याज्ञवल्क्याचे उदाहरण घेती । एवं परस्पर चावावयाची रीति । सर्वथा नेणती धर्माधर्म ॥ १५७ ॥ गुरु शिष्य पिता पति ।

पुत्र स्त्री मातादि संप्रति । आपुलिया स्वतंत्राचरणा देती । घेऊनि पुष्टि ॥ १५८ ॥ एरवी परमार्थभिन्न गुरु । तयाचाचि बोलिला त्याग विचारु । परमार्थवित् त्यागिला गुरु । हें वचन शास्त्रीं न सांपडे ॥१५९॥ एवं ज्ञानाची ऐसी रीति । आतां उपासनेची कवण गति । तेही ऐकावी पुढती । सावध श्रोतीं होऊनी ॥ १६० ॥ अनिष्ट मंत्र गुरु देतां । तरी तो त्यागावा तत्वतां । मेरुतंत्रीं इया अर्थी । असती वचनें ॥१६१॥

श्रीदेव्युवाचः—

भगवन् देवदेवेश गुरुणाज्ञानिना यदा ।
लोभेन दत्तो मंत्रश्चेद् दुःखमवाप्यते ॥१॥
तदा किं देव कर्तव्यं येन सौख्यं न जायते ।
इहलोके परत्रापि येन लभ्यते सुखम् ॥२॥

श्रीमहादेव उवाचः—

प्रायः कलियुगे देवि गुरवो लोभसंयुताः ।
शिष्या सुखेप्सवोऽभक्ता ह्यतो न कापि सिद्धयः ॥३॥
प्रायो मंत्रग्रहस्तेन दुःखायैवोपजायते ।
तदर्थं संप्रवक्ष्यामि सर्वतंत्रेषु गोपितम् ॥ ४ ॥
मंत्रत्यागं प्रथमतः कृत्वा प्रत्यंगिरां भजेत् ।
मंत्रत्यागविधिं वक्ष्ये येन संजायते सुखम् ॥५॥
(मेरुतंत्र अ० १४)

उमा ह्मणे कैलासपति । अज्ञानी गुरु लोभें मंत्र देती । इष्टानिष्ट न पाहती । तेणें दुःखप्राप्ति सच्छिष्या ॥ १६२ ॥ यया उपाय करावा कवण । मग बोले मीनकेतनदहन । कलियुगीं गुरु लोभसंपन्न । सुखेच्छु जाण शिष्य अवघे ॥ १६३ ॥ गुरु नेणती गुरुधर्मातें । शिष्य नेणती गुरुभक्तीतें । ह्मणोनि मंत्र कवणातें । सिद्ध न होय ॥ १६४ ॥ त्यांतहि सिद्ध साध्य सुसिद्ध अरि । न पाहोनि मंत्र घेतां तरी । दुःखप्रद होय भारी । संशय नाहीं ॥ १६५ ॥ म्हणोनि तो मंत्र-त्याग आधीं करावा । मग प्रत्यंगिराश्रय धरावा । मेरुतंत्रीं विधि बरवा । चतुर्दश प्रकाशीं बोलिला हा ॥ १६६ ॥ तो विशेष तेथचि घ्यावा पाहोनि । मी विस्तरभयें न लिहे या स्थानीं । परी हा मंत्रत्याग

निर्वाणीं । शाक्त विषयक बोलिला ॥ १६७ ॥ मंत्र त्यागिलिया बरी । प्रत्यंगिरा भजावी तरी । वैष्णव शैवासी निर्धारीं । प्रत्यंगिरा प्रयोजन काय ? ॥ १६८ ॥ जे शाक्त संप्रदायी असती । तिहीं करावी ऐसी रीति । आगमोक्त शिवनारायणविद्येप्रति । सिद्धारिचक्र न लगेचि ॥ १६९ ॥ गायत्रीस सिद्धारि पाहतां । तरि मोडावी लागेल व्रतबंध-व्यवस्था । एवं शिवकृष्णादिमंत्रा तत्त्वतां । सिद्धारि सर्वथा असेना ॥ १७० ॥ शिवमंत्रासी शिवपुराणीं । सिद्धारि नाहीं हे बोलिली वाणी। कृष्णमंत्रासी पद्मपुराणीं । सिद्धारि नाहीं हे बोलिले ॥ १७१ ॥ सिद्धारि असेल जयाच्या मंत्रासी । तेणें त्यागुनि भजावे प्रत्यंगिरासी । आम्ही शाक्त नाहीं म्हणोनि आम्हांसी । मंत्रत्याग न लगेचि ॥ १७२ ॥ (वादी उवाच)– अहो सिद्धारिचक्र नाहीं तरि मंत्र सुसिद्ध सर्वांठायीं । मग जपताक्षणीं कां नाहीं । फल होत सकलातें ॥ १७३ ॥ सिद्धान्ती म्हणे ऐक गोष्टी । शिवकृष्णमंत्र कल्पवृक्षसृष्टि । जैसी याचना जयाच्या पोटीं । तैसीच तुष्टि तयातें ॥ १७४ ॥ रिपु कोणासही न होती । पापियासी साध्य होती । पुण्यवंता कामुका सिद्ध असती । सुसिद्ध होती मुमुक्षुते ॥ १७५ ॥ मंत्रनिर्णय सांगतां । हे विशेष बोलिजेल तत्वतां । अथवा संप्रदायिक नामस्मरण करितां । होय सुसिद्धता मंत्राची ॥१७६॥ जे मंत्र देती क्षुद्रफळें । तया चक्र पाहणें लागे वेळे । जे मंत्र देती मोक्ष फळें । तथा चक्रप्रयोजन नाहीं ॥ १७७ ॥ स्वप्नमंत्रासी सिद्धारि नसती। ऐसी ही मंत्रशास्त्राची उक्ति । म्हणोनि गुरुमंत्रत्यागविधि निश्चिती । मधुराद्वैतीं असेना ॥ १७८ ॥ शिष्य म्हणे पद्मपुराणीं । बोलिली आहे ऐसी वाणी । कीं मंत्र घेतां अवैष्णवापासूनी । तरी तो मंत्र त्यागावा ॥१७९॥

अवैष्णवोपपादिष्टश्च पूर्वं मंत्र वरद्वयम् ।
पुनश्च विधिना सम्यक् वैष्णवात् ग्राहयेन्मनूम् ॥१॥
सहस्रशाखाध्यायी च सर्वयज्ञेषु दीक्षितः ।
कुले महति जातोऽपि न गुरुः स्यादवैष्णवः ॥२॥
यस्तु मंत्र द्वयं सम्यक् अध्यायपति वैष्णवः ।
स आचार्यस्तु विज्ञेयो भवबंधविदारकः ॥ ३ ॥

(पद्मपुराण–उत्तरखंड अ० २९४)

पूर्वकथित मंत्र दोन्ही । उपदेशिता अवैष्णवानीं । तरी तयांचा त्याग करूनि । वैष्णवापासुनी घेयावे ॥१८०॥ सहस्रवेदशाखाधीत । सर्व यज्ञाचे ठायीं दीक्षित । श्रेष्ठकुळींही जन्मला निश्चित । परी अवैष्णव गुरु न होय ॥१८१॥ दोन्ही मंत्राचा उपदेशक । समर्थ वैष्णवचि एक । यालागीं भवबंध नाशक । तोचि आचार्य ह्मणावा ॥ १८२॥ श्रीगुरु ह्मणती ऐक वचन । या श्लोकांचें तात्पर्य पूर्ण । कीं जयाचा ज्यावरी विश्वास गहन । त्यापासुनी तो मंत्र घ्यावा ॥ १८३ ॥ जयाची जे इष्ट देवताचि नाहीं । तयाची प्रीति तेथ उपजेल कायी । प्रीतिवांचुनी लक्षाही । साक्षात्कार त्या कैसा ॥१८४॥ प्रीतीविण देवतामंत्र देणें । ते तंव न घडे लोभाविणें । लोभी गुरूचा मंत्रत्याग करणें । हे मेरुतंत्रीं बोलिलेचि आहे ॥ १८५ ॥ परी लोभी गुरूचाही त्याग करितां । प्रायश्चित्त असे सर्वथा । याज्ञवल्क्यानें केला होता । स्कंदपुराणांत कथा ही ॥ १८६ ॥ एरवी गुरुत्याग घडे । जरी आपणा देवता नावडे । तरी पूर्वी वृत्ती ओढे । तिकडेचि तैसी ॥ १८७ ॥ तेव्हां प्रायश्चित्त करावे । लक्ष इष्टनाम स्मरावे । द्विजें हवन करावे । तयाचि मंत्रें ॥१८८॥ उगाचि गुरुमंत्रत्यागी कोणी । तया प्रायश्चित्त नाहीं त्रिभुवनीं । हाही अभिप्राय प्राणतोषिणी । तंत्राधारें सुचविला ॥ १८९ ॥ उपास्यविश्वासी साक्षात्कारी । अल्पज्ञही गुरु पूजावा निर्धारी । त्याविण बहूज्ञही परी । त्यागावा हे रुद्रयामल कुलार्णवतंत्रीं बोलिले ॥ १९० ॥ तंत्रें मूळींचि पाहावे वाचून । म्या सार घेतला निवडोन । जयाचे येथचि धाले मन । तो विनोदन कासया करील ॥ १९१ ॥ शिष्य ह्मणे जी भगवंता । आपण अल्पज्ञ गुरुही पूजावा ह्मणता । परी ज्ञानलुब्ध शिष्यें गुरु त्यागावा सर्वथा । हे बोलिली कथा रुद्रयामल कुलार्णवींच ॥ १९२ ॥

मधुलुब्धो यथा भृंगः पुष्पात् पुष्पांतरं व्रजेत् ॥
ज्ञानलुब्धस्तथा शिष्यो गुरोर्गुर्वन्तरं व्रजेत् ॥१॥

मधुलुब्ध भ्रमर जैसा । पुष्पपुष्पीं हिंडे अनैसा । ज्ञानलुब्ध शिष्य तैसा । नाना गुरु देखतसे ॥ १९३ ॥ श्रीगुरु ह्मणती हें वचन । वेदविरोधें अप्रमाण । देवताही उपदेशिता गुरु सोडोन । तरी संमत नाहीं श्रुतीते ॥ १९४ ॥ एकासी उपदेश केला । क ख ब्रह्मभाव सुच-

विला । पुढें आचार्य गति सांगेल सुकुला । देवताही ऐसा बोलिला वरद देवो ॥ १९५ ॥ तो मुनीही आला गृहासी । प्रसन्न पाहिले शिष्यासी । तेव्हां विचारिता शापभयें मानसीं । शिष्यें आघवें निरूपिले ॥ १९६ ॥ तेव्हां प्रसन्न होवोनी सद्गुरुराव । क ख प्राणाभेद उपाव सांगे सर्व । ऐसा ऐतीह गौरव । उपनिषदेंत केला हो ॥ १९७ ॥ याज्ञवल्क्यें गुरु त्यागिला । परी वेद ओकोनी दिधला । मग एका शिष्यें गिळिला । तैत्तिरिय उपजला तेथोनी ॥ १९८॥ हे अधिकारिकासीचि शोभले । तैसे सामर्थ्य जया आले । तयासीचि गुरु त्यागणें बोलिले । येर ते पडती महानरकीं ॥ १९९॥ विश्वामित्राची कथा ऐकोन । जैसें शूद्र होऊं पाहती ब्राह्मण । परी विश्वामित्राचें अनुष्ठान । म्हणती कामिनीपूजक हे ॥२००॥ तैसीच येथली रीती । कलींत पशुजन स्वतंत्र वागूं इच्छिती । धर्मासचि भार मानिती । त्यासी गुरुमूर्ति रुचेल केवि ॥ २०१ ॥ पुनर्विवाहिता कामिनी । तियेसी भेटली जारिणी । मग पतिपुजेचा मिळोनी । चालविला निषेधू ॥ २०२ ॥ तैसे संसारीं आसक्त । परस्पर मिसळती काकवत । मग गुरुदोष पाहती अखंडित । तयांचें वचन प्रमाण कैसे ॥ २०३ ॥ आपण दुसरिया फसवितां । गुरूनें फसविले ह्मणोनी रडती । ऐसिया साठींच श्रीपति । ढोंगी गुरूस निर्मितो ॥२०४॥ जेणें दैत्यास मोहाया निर्मिली सुरा । जो बाईल होवोनि गेला विरोचनाच्या घरा । तो या लौकिका ठका अचतुरा । ठकवाया महाठक ॥ २०५ ॥ सच्छिष्यही फसेल ह्मणोन । लोभी गुरूंचे दोषदर्शन । एरवीं फसला तयाकारण । श्रद्धा फलदात्री ॥ २०६ ॥ लोकफसव्यासी फसवावया । फसव्या गुरूंची उत्तम चर्या । ते तंव प्रशंसा करावया । पात्रचि आहे ॥ २०७ ॥ जैसा वेश्यांच्या गृहीं । ठेका ठेविती नानकशाई । तैसा फसव्या जनावरी लवलाही । फसव्या गुरूंचा ठेका न चुके ॥ २०८ ॥ सुरा पिणाऱ्या शिष्यासी वेळे । सुरापी गुरूंचा शापही फळे । उत्तम शिष्यासी न फळे । अधमगुरुशाप ॥ २०९ ॥ गुरु शिष्य समवर्तनीं । तेथ गुरुचि श्रेष्ठ शास्त्रवाणी । स्वमाता भोगावी वेश्यापुत्रानीं । हे शास्त्रसंमत नाहीं कीं ॥ २१० ॥ ह्मणोनी मूर्खजनभीड न धरावी । योग्य सत्क्रिया करावी । धर्म स्थापिता आदरावी । उत्तम दिशा ॥ २११ ॥ सत्संगीं सदा मिसळावे । सद्गुरु भेटता

चाळे सोडावे । आतां हें वचन स्वस्थवे । ऐसे समन्वयिजे ॥ २१२ ॥ पिच्छिलातंत्रीं तंत्राचें वचन । कीं दीक्षा शिक्षा भेदेंकरून । गुरूचे प्रकार असती दोन । त्यांत दीक्षागुरु श्रेष्ठ ॥ २१३ ॥ मंत्र ऐकणें का अभ्यासणें । हे जयापासुनी होणें । तयाचे नांव गा ह्मणणें । दीक्षागुरु ॥ २१४ ॥ तेचि प्रमाणार्थ श्लोक । सांगूं तुज सकळीक । तैसे तंत्रवचन आणिक । तेही सांगूं ॥ २१५ ॥

गुरुस्तु द्विविधः प्रोक्तो दीक्षाशिक्षाप्रभेदतः ।
आदौ दीक्षागुरुः प्रोक्तः शेषे शिक्षागुरुर्मतः ॥१॥
यन्मुखात्तु महान्मंत्रः श्रूयतेऽभ्यस्यतेऽपि वा ।
स गुरुः परमो ज्ञेयस्तद्दीक्षा सिद्धिदायिनी ॥२॥

आतांचि पदार्थ बोलिला । शेष भावार्थ वहिला । दीक्षा गुरूचा आज्ञाशब्द भला । सर्वसाधक ॥ २१६ ॥ गुरुवचन तो धर्म । गुरु-वचन ते कर्म । गुरुविण ज्ञान धर्म । विघ्नकर हे शिववाक्य ॥ २१७ ॥ कुलमूलावतार कल्पसूत्र । टीकेंत कुलागमवचन हें पवित्र । तेही सांगूं स्वतंत्र । प्रमाणासाठीं ॥ २१८ ॥

प्रेरकः सूचकश्चैव वाचको दर्शकस्तथा ।
शिक्षको बोधकश्चैव षडेते गुरवः स्मृताः ॥
पंचैते कार्यभूताः स्युः कारणं बोधको भवेत् ।

परमार्थी प्रेरणा करणें । गुरु होय इतुक्यानें । किंवा सूचक करणें । तेही गुरुत्व ॥ २१९ ॥ पुस्तकें वाचुनी दाखविती । तेही गुरु ह्मणिजती । जे करा वाचा ह्मणोनी उपाय दाखविती । तेही गुरु ॥२२०॥ जो शिकवी कांहीं अक्षरें । तोही गुरु होय प्रकारें । परी जयाच्या वचनें थारे । भक्ति ब्रह्मज्ञान तो सद्गुरु । ॥ २२१ ॥ पांच गुरु ते कार्य पूर्ण । सहावा गुरु तो कारण । यालागीं "मधुलुब्ध" हे वचन । कार्यभूत पंच गुरुभ्रमणपर ॥ २२२ ॥ किंवा शिक्षा गुरु नाना पहावे । ऐसें वचन तात्पर्य समजावें । तंव शिष्य ह्मणे भले देवे । समजाविलें ॥ २२३ ॥ परी " गुरोर्गुर्वंतरं " याठायीं । " मंत्रान्मत्रांतरं " हा पाठ लक्षलाही । श्रीगुरु ह्मणती तथही । रहस्य आहे दुसरें ॥ २२४ ॥ नाना दोष मंत्रांचे । मंत्रशास्त्रीं बोलिले साचे । जरी उत्तमशिष्यदुर्दैवाचे । येईल फळ ॥२२५॥

तरी लोभी गुरुपासुनी । सदोष मंत्र पडे कानीं । तो त्यागावा निर्दोष मंत्र घेवोनी । ऐसा त्या पाठांतरवचनीं अभिप्रायो ॥ २२६ ॥ परी शिवकृष्ण मंत्राते कांहीं । दोष कोठें बोलिले नाहीं । यालागीं आमुचे संप्रदायीं । हा तांत्रिक नियम न लाविजे ॥ २२७ ॥ जे ताक फुंकोनी पिती । तयासी गुरूची वाटेल भीति । तरी गौण दीक्षा करावी निश्चिती । संप्रदायीं सांगितली जी ॥२२८॥ परी मुख्य दीक्षा घेऊनी । गुरु सोडील कोणी । तया मधुराद्वैतभ्रष्टालागुनी । पतन निर्वाणीं ममशापें ॥ २२९ ॥ मधुराद्वैत सोडोनी जाईल । तयासी शिक्षा देवाचि करील । परी मधुराद्वैतींच नग्गा उत्तम गुरु फिरेल । तरी मम शाप चुकेना ॥ २३० ॥ जरी संप्रदायांतही लोभी असती । तरी इतर ठायीं लोभ धरिती । मंत्राविषयीं अविश्वास न करिती । तेही जपती ह्मणूनी ॥ २३१ ॥ इतर संप्रदायाचा उपहास । करूनि अन्यदेवतामंत्रास । देती जे कां लोकांस । धन उपटावया लोभी ॥ २३२ ॥ तयाच्या करौनी मंत्र न घ्यावा । हा या श्लोकांचा अर्थ आघवा । एरवी कोणाचा द्वेष करावा । ऐसा अभिप्राय नाहीं ॥ २३३ ॥ अनुभवामृतीं शिवस्तुती । भावार्थदीपिकेंत कृष्णस्तुती । हरिनाम उपदेश हरिपाठीं । केला ताते ॥ २३४ ॥ ह्मणोनी आमुचा संप्रदाय । शिवकृष्णजपीं समान होय । अथवा एक द्वेष न करितां उपाय । कोणी एक धरावा ॥ २३५ ॥ शिवमंत्र जपोनी कृष्णभक्ति । करितां न होय दोषप्राप्ती । ते कर्णामृतकारही ह्मणती । प्रमाण निश्चिती ऐकावें ॥२३६॥

शैवा वयं न खलु तत्र विचारणीयं । पंचाक्षरीजपपरा नितरां तथापि ।
चेतो मदीयमतसीकुसुमावभासं । स्मेराननं स्मरति गोपवधूकिशोरम् ॥२४॥
(कर्णामृत श० २)

आह्मी मुळींचे मुख्य शैव । पंचाक्षरीजप करितो सदैव । परी अंतरीं सगुण सावेव । व्रजराव आवडला ॥ २३७ ॥ कृष्णमंत्रजपीं शिवध्यान । करिताही नाहीं दूषण । स्वयें सांगे नारदपुराण । कीं पशुपतयोगें प्रसन्न विष्णु ॥ २३८ ॥ ह्मणुनी एकाचा जप एकाचे ध्यान । हें विरुद्ध नाहीं आह्मांकारण । मंत्र घ्यावा गुरूपासून । कीं आन विकल्प आहे तो सांगू ॥ २३९ ॥ " शास्त्राद्वा गुरुवक्त्राद्वा ग्राह्येदिति " । कक्षपुटींत प्रथमपटलीं नागार्जुन ह्मणती । ह्मणुनी गुरूपासू-

निच मंत्र घ्यावा निश्चिती । येविषीं आहे विकल्पू ॥ २४० ॥ शिव पुराणीं शिवमंत्रास । हाचि विकल्प बोलिला विशेष । कीं गुरूपासुनी न घेतां तयास । आहेचि सिद्धि ॥ २४१ ॥ " अनादिष्टोऽपि गुरुणा मंत्रोऽयं न च निष्फल " इति । गुरूपासोन न घेतांही मंत्रसिद्धी शिव- पुराणोक्ति । परी गुरूपासुनी घेतां प्रीति । फलाधिक्य बोलिले ॥२४२॥ " अलब्धाल्लब्ध एवेह कोटिकोटिगुणाधिक " इति । गुरूपासुनी घेतलीया मंत्राची अधिक फलश्रुति । शिवमंत्राविषयींच शिवपुरा- णोक्ति । पुढती सांगे ॥ २४३ ॥ एवं ब्रह्मोत्तरखंडीं स्कंदपुराणीं । बोलिले कीं पंचाक्षरीमंत्रास दीक्षा नाहीं ह्मणोनी । पुढती दीक्षा दाशार्ह रायालागुनी । दिधली प्रकारें त्याची मंत्राची ॥ २४४ ॥ श्रीकृष्ण मंत्रासी कहीं । गुरुवांचुनी कृष्ण बोलिलेचि नाहीं । सर्वत्र वरिष्ठ सद्गुरुआई । संशय नाहीं ये अर्थी ॥ २४५ ॥ परंतु कलीयुगीं भयंकर । गुरु भेटती चोर जार । करोनिया वेडेचार । भोळे साचार भोंदिती ॥ २४६ ॥ सुंदर स्त्रीते पाहून । पूर्व जन्मीची स्त्री ह्मणोन । उद्वाहसं- स्काराविण । रतिदान देती तीते ॥ २४७ ॥ एक पूर्व जन्मीचे सांगोनी भाऊ । जन्मभर घेती जेऊ । एवं फसविती नाना उपावू । करोनिया ॥ २४८ ॥ ह्मणोनी भैरवविधि करून । मी स्वसंप्रदायीं सांगतो दीक्षा विधान । हे दीक्षाविधान आहे गौण । निर्लोभ गुरु न भेटता ॥२४९॥ परी सलोभ शिष्यासी कांहीं । हा भैरवविधि बोलिला नाहीं । लोभि- यासी फसवावया लवलाही । लोभी गुरु योग्यचि आहे ॥ २५० ॥ सिंहे व्याघ्रासी भक्षिले । तरी शेळ्यांचे कळप वांचले । येथें कोणाचे काय गेले । बरवे झाले सर्वापरी ॥ २५१ ॥ तैसे लोभियानें लोभियांसी खावे । विरक्तानें उपद्रवरहित व्हावें । हा न्यायचि आहे स्वभावें । नोहे अन्याय ॥ २५२ ॥ सद्गुरु भेटतां उत्तम । सेवेसाठी भिऊनी परम । गौण दीक्षा घेतां सुगम । मोक्ष सर्वथा घडेना ॥ २५३ ॥ कारण महा- वाक्योपदेशप्रक्रियाप्राप्ति । क्षणोक्षणीं उपाधिनिवृत्ती । हे गौण दीक्षेत न सांपडे रीति । म्हणोन भैरवविधि गौण ॥ २५४ ॥ परंतु विरक्त शिष्य लोभी गुरु । ऐसा दुर्दैवे झालिया प्रकारू । ब्रह्मज्ञान नसतां निर्धारू । गौण दीक्षा आश्रयीजे ॥ २५५ ॥ ब्रह्मज्ञानियाचे लोभादि

समस्त । राहती प्रारब्धपर्यंत । जेवि याज्ञवल्क्य मुनि समर्थ । स्त्रीद्वय युक्त ही बृहदारण्यीं कथा ॥ २५६ ॥ रैक मुनि कन्या घेऊन । सांगता झाला ब्रह्मज्ञान । हे छांदोग्यांत निरूपण । जाहलेचि आहे ॥ २५७ ॥ तथापि आह्मी लोभी म्हणोनी । लोकास स्पष्ट सांगितले त्यांनीं । नाहीं फसविले विरक्त म्हणवोनी । कपट करोनी सर्वथा ॥ २५८ ॥ जयास पाहिजे होते वहिले । तिही तयांचे ज्ञान घेतले । इतरासीं बळें उपदेशिले । जाऊनि नाहीं कदा तिहीं ॥ २५९ ॥ प्रक्रियाबळें शिष्य तृप्त होतां । मग गुरुदोष पाहणें वृथा । परी प्रक्रियेवीण लोभी गुरु भेटतां । आणि शिष्य असतां विरक्त ॥ २६० ॥ तेंवि कंटाळे गुरूस धुंडोन । उपासनेविण थारेना मन । तयानें मैरवविधि करोन । गौण दीक्षा घेयावी ॥ २६१ ॥ कोण्याही संप्रदायाभीतरीं । हा विधि नाहीं प्रगटविला आजवरी । द्रव्याशा धरोनी अंतरीं । लोभ निर्धारी वाढविला ॥ २६२ ॥ तो विधि मी करितो प्रगट । प्राकृत भाषेमाजीं स्पष्ट । सदाज्ञेनें घरिच्या घरीं स्पष्ट । उपासना घेवोनी धर्म दृढ करावा ॥२६३॥ या विधीनें मंत्र जपतां । पुढें स्वप्नांत वा जागृतींत तत्वतां । सद्गुरु भेटेल अवचितां । आलिया ताता कळवळा ॥ २६४ ॥ जयासी प्रथमचि भेटला असेल । तयांत हा विधि करितां निष्फळ । जयासी बैसला असेल झोल । तयानें हा विधि करावा ॥ २६५ ॥ ग्रहणाग्रहण विकल्प मनांत । तो गुरु आपत्समयीं करावा समस्त । परी जाऊं देऊं नये व्यर्थ । संप्रदाय आपुला ॥ २६६ ॥ अथ भैरव विधिश्चयरुतेः— अथ तांत्रिक मंत्राणां दीक्षा शृणु गुरुंविना ॥५८४॥ शुक्लपक्षे त्रयोदश्यां चंद्रताराबलान्विते । गत्वा च दक्षिणामूर्तेः सन्निधौ पूजयेच्च तम् ॥ ५८५ ॥ कलशस्थापनं कृत्वा तदग्रे तु परिक्षिपेत् । तालपत्रे लिखित्वाथ मंत्रं देवं च पूजयेत् ॥ ५८६ ॥ देवो गुरुरिति ध्यात्वा मंत्रं व्यक्तं तु वाचयेत् । अष्टोत्तरशतं चैव मंत्रग्रहणमुच्यते ॥ ५८७ ॥ एतत्तत्वं समाख्यातं गोप्यं मातरि जारवत् । गुरौ लोभादयोदोषास्तस्मादुद्विजते जनः ॥ ५८८ ॥

( मेरुतंत्र–प्रकाश ६ )

मेरुतंत्रीं महेश्वरु । उमेसी म्हणे करुणाकरु । कलींत लोभी जाहले गुरु । महाक्रोधी अतिखळ ॥ २६७ ॥ ज्या पंथाचें लोक पाहती ।

तैसीच भाषणें करिती । स्वसंप्रदायही सोडिती । पैशासाठीं ॥ २६८ ॥ परसंप्रदायाची निंदा करणें । हे वाईट आहे सर्व गुणें । परी परसंप्रदाय स्तुती करणें । पैशासाठीं वाईटाचि ॥ २६९ ॥ काम क्रोध लोभ फार । जगीं वाढले समग्र । गुरुत्व म्हणजे व्यापार । होवोनि बैसला ॥२७०॥ उपाध्यायांचे यजमान । जाता कवडीस्तव देती प्राण । म्हणोनी लोक जाहले उद्विग्न । गुरुमंत्राकारणें ॥ २७१ ॥ एक म्हणती मंत्र घ्यावा । मग गुरूवरी दोष लादावा । त्याहूनि मंत्र न घेयावा । उत्तम ऐसे ॥ २७२ ॥ एरवीं शिष्य आणि गुरु । कलींत दोघेही दंभाचारु । एकमेकांची निंदा धरु । एकमेक करिती ॥ २७३ ॥ गुरु सांगे मुख पसरुनि । शिष्य माझे नायके म्हणोनी । शिष्य सांगे तोंड पिटोनी । आम्हांस गुरूनीं फसविले ॥ २७४ ॥ गुरु शिष्यांचे न्याय । चावडीवरी जाती स्वयें । भांडण करिती आचार्य । मग ते तोडिती न्यायाधीश ॥ २७५ ॥ एवं कलीची विचित्र गति । तेथ न लागे कांहींच साधु उक्ति । पैजारपुजा विंचवाप्रति । देता निश्चिंती वदो नये ॥ २७६ ॥ दास दासीला समजाविता । तेथ उभी न राहे पतिव्रता । तेवीं लोभियानें लोभियासी खातां । तया कलींत संता उपेक्षणें ॥ २७७ ॥ परी उत्तम गुरु न भेटे जोंवरी । संप्रदायदीक्षा घेयावी तोंवरी । तेचि उमेसी त्रिपुरारी । मेरुतंत्रीं सांगती ॥ २७८ ॥ अथ शब्दें मंगलाचरण । तांत्रिक मंत्राची दीक्षाग्रहण । उमे सांगतो गुरुवांचून । सावधान ऐकावें ॥२७९॥ शुद्धमासीं शुक्लपक्षीं । सर्वसिद्धान्त त्रयोदशी । चंद्रातारावलासी । अनुकूल पहावें ॥ २८० ॥ उत्तम गुरूच्या सन्निधानें । कुयोग सुयोग होती बलानें । परी जेथ स्वयें आहे दीक्षा घेणें । तेथ शकुन पाहणें उत्तम ॥ २८१ ॥ मूळीं आहे तांत्रिक पद । ते वेदपुराणव्यावर्तक शुद्ध । म्हणजे वेदपुराणदीक्षा प्रसिद्ध । गुरुवांचून न चाले ॥ २८२ ॥ तांत्रिक मंत्राची दीक्षा । गुरुवांचुन चाले ही तंव शिक्षा । वेदपुराणीं गुरुप्रतीक्षा । बोलिलीची आहे ॥ २८३ ॥ परी ऊह करितो ऐसा । कीं तंत्र शब्द सामान्यशास्त्रवळसा । म्हणोनि वेदपुराणींही आपैसा । तंत्रधर्मू ॥ २८४ ॥ तेणें गौण दीक्षाग्रहण । वैदिक पौराणिकही मंत्रग्रहण । उत्तम सद्गुरु भेटे तंव जाण । मंत्र घेऊन जपावा ॥ २८५ ॥ उत्तम

सद्गुरु भेटतां क्षणीं । स्वदीक्षित मंत्राचि घ्यावा उजळोनी । असो आतां मूळ पदानीं । पुढें सांगू ॥ २८६ ॥ चंद्रताराबलान्विती । त्रयोदशी पाहोनी तिथी । जावें जेथ दक्षिणामूर्ति । मंदिर आहे ॥ २८७ ॥ षोडशोपचारें तयाची पूजा । करूनि तोषवावा त्रिभुवनराजा । जो आपुले मोठेपण भक्तकाजा । पुढें न स्मरे ॥ २८८ ॥ " अप्रमेयत्रयातीतनिर्मलज्ञानमूर्तये । मनोगिरां विदुराय दक्षिणामूर्तये नमः " या मंत्रेकरून । पूजा करावी प्रेम धरून । मंत्रार्थही करावा चिंतन । कीं सकळ प्रमाण यत्साक्षिभास्य ॥ २८९ ॥ जो त्रिगुणाते विरहित । जो अशुद्ध मनासी अप्राप्त । जो सर्वथा नाहीं आकळत । शब्दशक्तिवृत्तीनें ॥२९०॥ जो कदापि न दे वामस्फूर्ति । तो भक्तवत्सल दक्षिणामूर्ति । तयाचिया चरणावरुती । साष्टांग असो दंडवत ॥ २९१ ॥ ऐसा मंत्रार्थ चिंतावा । येथ दक्षिणामूर्ति बोलिला बरवा । माझें मत कीं देवो घेयावा । इष्ट आपुला ॥ २९२ ॥ शिव अथवा नारायण । महद्गुरु करुणानिधान । तयाचें करूनिया पूजन । मंत्र ग्रहण करावा ॥ २९३ ॥ साक्षादुपदेशक सद्गुरु । संप्रदाय स्थापक महद्गुरु । न भेटतां उत्तम सद्गुरु । तरी महद्गुरु तारकू ॥ २९४ ॥ दक्षिणामूर्ति शिव । उदारमूर्ति माधव । अथवा श्रीगुरुराव । सर्वोदार ॥ २९५ ॥ जयासी कृष्णमंत्र घेणें । तरी गुरु दक्षिणामूर्ति करणें । गुरु करणें लागे सदाशिव या वचनें । तातांचिया ॥ २९६ ॥ अथवा आळंदीश्वरू । मुख्य पूजोनी महद्गुरु । शिवविष्णुमंत्र ग्रहण निर्धारू । आवडीनें कीजे ॥ २९७ ॥ किंवा गुरुनाममंत्रग्रहण । तेंही सर्व सुखाचें कारण । आतां शिवमंत्र घेणें तंव नारायण । सद्गुरु आपण करावा ॥ २९८ ॥ परी यावांचोनि इतर देव । गुरु करितां नये स्वयमेव । वचन नाहीं कंठरव । म्हणोनिया ॥ २९९ ॥ पंचाक्षरी द्वादशाक्षरी । अथवा पाद्मोक्त कृष्णमंत्र साचारी । न शोधावे कवणे परी । गौण दीक्षे माझारींही ॥ ३०० ॥ इतर मंत्र गुरु जवळीही शोधावे । मग गौण दीक्षेंत काय सांगावें । असो ऐसे पूजावें । इष्ट देवातें ॥३०१॥ सुंदर कलश स्थापोन । यथाशक्ति मंडलादि पुजोन । मंत्र तालपत्रीं लिहोन । मंत्रही आवडी पूजावा ॥३०२॥ गुरूस आणि मंत्रास । योग्य नैवेद्य अर्पूनि विशेष । विघ्नकारक देवतांस । बलि पूजाद्यर्पावे ॥ ३०३ ॥ मग सूर्ये देह

जाळावा । चंद्रें पुढती पाळावा । अमृतेंचि गळावा । संवेदनरूप ।। ३०४।। वायू पृथक् करुनि गति । द्वादशांगुल धरावी प्रीति । मग अमृतकला हृदया आतौती । तनु जीवती करावी ।। ३०५ ।। नाम गुरुकुळींचे घेयावें । दक्षिणामूर्तिपाऊलीं लोळावें । व्यक्त मंत्रातें वाचावें । अष्टोत्तरशत वेळा ।। ३०६।। ऐसा करावा मंत्र ग्रहण । येथील रहस्य मियाचि प्रगटविलें ह्मणून । उद्धावने कारण । समर्थेही मी ।। ३०७ ।। गौणचि विधि सोपा । ह्मणूनि न करावे मुख्यविधिलोपा । मत्प्रतिबंधप्रतापा । कोणता मानीना मत्प्रिय ।। ३०८ ।। एकही अक्षर रहस्यें दिधलें । तरी अवघे तयाचे जाहलें । ह्मणोनी मत्संप्रदायी जे जाहले । तिहीं मदाज्ञा नुल्लंघावी ।। ३०९ ।। जैसें मायेचे जारपण । सांगता लाजती नंदन । तैसे हे दीक्षाग्रहण । गुरु संपूर्ण ओळखावे ।। ३१० ।। ऐसी गौणही दीक्षा घेतां । जो आपणास मान्य तत्वतां । तो कोणी वडील अथवा पिता । समोर होवावा ।। ३११ ।। माता बंधु गुरुबंधु । समोर असावा प्रसिद्ध । किंवा परसांप्रदायिक परी नीतिमंत साधु । आर्यसिद्ध असावा ।। ३१२ ।। अथवा पतिव्रता नारी । समोर असावी परी । किंवा कपिला धेनू सुंदरी । समोर होवावी ।। ३१३ ।। तीर्थक्षेत्रादि स्थानीं । प्रवर्तावें दीक्षाग्रहणीं । गुरुदक्षिणा देवापुढें ठेवूनि । मग ती लावावी देवकार्या ।।३१४।। पुढें जे पंचसंस्कार । आह्मी आहो सांगणार । ते गौणविधींत समग्र । देवसाक्षें करावें ।। ३१५ ।। शास्त्रांतूनि मंत्र घेयावा । कलशापुढें ठेवोनि वाचावा । एवं सुंदर विधि करावा । उत्तम सद्गुरुअभावीं ।। ३१६ ।। परी जावो न द्यावा संप्रदाय । धर्म सर्वथा सोडूं नये । लोकशंका जेथ होय । तेथही ऐसें करावें ।। ३१७ ।। चांडाल असलिया मधुराद्वैती । तयाचा अनुग्रह घ्यावा ही इच्छा जाहली ब्राह्मणाप्रति । तरी त्यास समोर बैसवोनि दक्षिणामूर्ति । युक्त हा विधि करावा ।। ३१८ ।। जयाची लोकलज्या गेली नाहीं । तयानें एकाएकी समाज क्षोभऊं नये कांहीं । जेथ वचनाचि आहे लवलाही । तेथ विशेष अपेक्षा नाहीं समाजाची ।। ३१९ ।। एवं गौण विधि सांगितला । हा आपदि गृहस्था बोलिला वरवा । आतां पाहिजे श्रवण केला । मुख्य विधि ।। ३२० ।। गुरु शिष्याचें लक्षण । मागें सांगितले अनुगुण । आतां शिष्य परिक्षाविधान । प्रथम सांगू ।। ३२१ ।। ज्ञानेच्छु शिष्य आपण ।

असावा साधन चतुष्टयसंपन्न । विवेकेंचि जगत्स्थान । वर्जिले जेणें ॥ ३२२ ॥ विरागें इंद्रियां वेगळा झाला । शमदमीं पूर्ण अभ्यास केला । ऐसा परोक्ष ज्ञानी सुखी भला । आणि समाधानवंत ॥ ३२३ ॥ विवेकें नित्य वस्तु आहे हे कळे । तेणें वैराग्य धैर्य उजळे । शमदमउपरमतितिक्षे न मावळे । जाहले वैराग्य ॥ ३२४ ॥ वस्तु आहे हे यथार्थ । आपण नाहीं चालत भलता पंथ । आज ना उद्या मिळेल निश्चित । येणें चित्त समाधान ॥ ३२५ ॥ समाधानाचिया शक्ति । ऋषिवाक्यीं गुरुवाक्यीं आणि वेदान्तीं । अवचित उजळे महामति । विश्वासरूप ॥ ३२६ ॥ उतावेळ शिष्याचें ठायीं । श्रद्धा कल्पांतीं उपजणार नाहीं । श्रद्धेविण न होये कांहीं । तीव्र संवेगू ॥ ३२७ ॥ मध्यम व्यवहार चाले । परी अति ते श्रद्धेमार्जीचि आले । मुमुक्षुत्व पेक्षिले । अवश्य प्रयत्नीं ॥ ३२८ ॥ तीन साधनीं जयाची तृप्ति । तो सांपडे तुष्टिचिया हातीं । गुरु कथिता अभ्यासीं प्रवृत्ति । न होय तयाची ॥ ३२९ ॥ एवं लक्षणी बरवा । ज्ञानेच्छु शिष्य होवावा । आतां उपास्तीच्छु बरवा । तोही सांगू ॥ ३३० ॥ प्रेमळ आणि सोज्वळ । वत्सल आणि कार्यशीळ । असूयारहित आणि निर्मळ । वचनशीळ ओळखावा ॥ ३३१ ॥ तर्क नाहीं उपास्तीवरी । गुरुपदेश मात्रें सिद्धि खरी । ह्मणोनी वचनशीलता बरी । पहावी शिष्याची ॥ ३३२ ॥ प्रथम सन्मुख बैसवोनी । पृथ्वीतत्व आकर्षोनी । गंभीरता केवि मनीं । पहावी तयाची ॥ ३३३ ॥ पृथ्वीतत्व आकर्षिता । जरी तया न नम्रता । तरी आप तत्व उद्भाविता । आकर्षिजे ॥ ३३४ ॥ तेथही जरी नम्र नोहे । तरी तो शिष्य त्यजावा स्वयें । आणिक तत्व आकर्षू नये । वृथा परिक्षा पहावया ॥ ३३५ ॥ परी हा विधि शुद्ध नाहीं । स्वभाव नम्रा न चले कांहीं । ह्मणोनी विधि लवलाही । दुसरा सांगू ॥ ३३६ ॥ माथा स्पर्श करूनि । मस्तकीं हस्त ठेवोनि । एकान्तीं अनाहतश्रवणीं । प्रवर्तविजे ॥ ३३७ ॥ श्रवणांगोलिकासंयोगें । जरी इष्ट शब्द उमटो लागे । तरी तो शिष्य निघे । संप्रदायस्थापक ॥ ३३८ ॥ अनिष्ट शब्द उमटतां । शिष्य त्यजावा सर्वथा । आणिकही परौता । विधि सांगू ॥ ३३९ ॥ पीठ मंडल करावे । शुचिर्भूत होवावे । दिग्बंधन करावे । सर्वीकडे ॥ ३४० ॥ दुग्धाहारी राहावे । अहोरात्र स्मरावे । रात्रीं

शयन करावे । शवासनीं ॥ ३४१ ॥ सकार एक गिळावा । हकारार्ध सोडावा । द्विदलीं ध्यानीं आणावा । बिंदु एक ॥ ३४२ ॥ आणि तैसेचि निजावे । शिष्य हाकीं प्रार्थावे । तेथ होय नाहीं स्वभावें । स्वप्नीं उमटे ॥ ३४३ ॥ ऐसें पांच दिवसपर्यंत । स्वप्न उमटेल ते यथार्थ । समजोनिया निश्चित । शिष्य करावा ॥ ३४४ ॥

दुर्गे देवि नमस्तुभ्यं सर्वज्ञे सर्वदर्शने ।
सिद्धिः कार्यस्य वासिद्धिः सत्यं स्वप्ने प्रदर्शय ॥१॥

अरुणोदयापासून अर्धरात्रवर । एकासनीं जप करावा सातसहस्र । हाही समर्थ मंत्र । स्वप्नीं सुचवी शुभाशुभ ॥ ३४५ ॥ अवघे हे विधि वैकल्पिक । आतां मुख्य विधि जे ते एक । जो नाथसंप्रदायीं सुरेख । वर्णिला आहे ॥ ३४६ ॥ प्रथम जे शिष्याते तप करवावे । कृच्छ्र वा चांद्रायणरूप बरवें । मग त्रिपुटीसी धरावे । आकर्षोनी ॥ ३४७ ॥ आवडे तें वचन बोलावे । तेथ जे दिसेल आघवे । तया ते पुढती परिक्षावे । सत्वस्वप्नें ॥ ३४८ ॥ ऐसे जरी उमटेल । तरी तो शिष्यचि निघेल । हा विधि मुख्य केवळ । संप्रदायीं आमुच्या ॥ ३४९ ॥ आतां संप्रदाय रक्षणार्थ । शिष्य करणें जरी बहुत । तरी केवळ मंत्रदानें निश्चित । राखावे तया ॥ ३५० ॥ विधिपूर्वक शिष्य मिळणें । हे दुर्लभ बहु बहुपणें । परी रहस्य सांगावया करणें । अवश्य विधि ॥ ३५१ ॥ स्वशरीरनाडीचालनी । जो शिष्य नोहे गुरुवचनेंकरूनि । तयालागीं कुंडलिनी । साक्षात्कार दुःशक्य ॥ ३५२ ॥ असो ऐसा शिष्य परिक्षावा । मग तो विष्णुशिवदीक्षेमार्जी योजावा । अद्वैतेचि होय बरवा । वैष्णव शैव ॥ ३५३ ॥ दास्यसंबंधें सदा द्वैत । हे बाळासीच हो अभिमत । जे कां न होती समर्थ । अद्वैतभक्तिकरणीं ॥ ३५४ ॥

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ।
आत्मबुद्ध्या त्वमेवाहमिति मे निश्चला मतिः ॥१॥

यया श्लोकेंकरून । संकल्प करावा आचार्येंन । व्यवहारीं भगवचिंतन । निरूपण बरवें ॥ ३५५ ॥ मग एकान्तीं बैसतां । संकल्प करावा तत्वतां । पुत्र माता योषिता । यांतुनी कोणी ॥ ३५६ ॥ तेणें संबंधें ध्यान करावें । मग आपणा विष्णु ऐसे ध्यावें । अहंकार जावया सेवावें ।

भगवंता पुढती ॥ ३५७ ॥ सविकल्पें जो विष्णु जाहला । तेणेंचि जरी विष्णु सेविला । तरी तया निर्विकल्प भला । साक्षिसमाधी सांपडे ॥ ३५८ ॥ "अहंविष्णुरिति ध्यात्वा" इत्यादि वाणि । बोलिल्या आहाती पुराणीं । "शिवो भूत्वा शिवं यजेत्" ही वेदवाणी । येते प्रमाणीं ये विषयीं ॥ ३५९ ॥ तुरीय भगवंत होवावे । प्राज्ञाही तैसेचि करावे । तैजसा असो यावे । भगवंतसंबंधी ॥ ३६० ॥ विश्वें दास्य करावें । एवं जैं अभिमान जो स्वभावे । तैसेचि आपणा भावावे । संस्कार हा ॥ ३६१ ॥ जो जयासी जितुका वेळ । अभिमान राहे तितुका वेळ । तेचि भावना बोलिली प्रबळ । विश्वादिकांची ॥ ३६२ ॥ तुरीयाते जाणोनी । माधूर्य वात्सल्यादि संबंधें सकलाभिमानी । हाही विधि उत्तमस्थानीं । संस्कारीं येतो ॥ ३६३ ॥ जातकर्में करून । हा संस्कार दृढ होय ह्मणून । जातकर्मविधानचें करावे ऐसे ॥ ३६४ ॥ मुख्य विधींत माधूर्यभक्ति । असलिया श्रीगुरुमूर्ति । तेणें भगवत्प्रसादें आपणाप्रति । समहृदयस्थिति कल्पावे ॥ ३६५ ॥ मग प्राणबळें चित्त । सूक्ष्म निर्मावे उचित । ते पाठवावे शिष्याआंत । ऐसे अंतर्जातकर्म ॥ ३६६ ॥ गुरु न मिळतां हाचि विधि । रुक्मीणीपासूनी करावा आधीं । गौण विधि तंव प्रसिद्धि । बोलिलीचि आहे ॥ ३६७ ॥ ते बाह्यजातकर्मचिन्ह । कळावया कारण । अवश्य संप्रदायचिन्ह । धारण करावे ॥ ३६८ ॥ अंतर खूण पिशाचाशीं । कदा न कळे निश्चयेसीं । बाह्यचिन्हतेजचि तयासी । भेवडावितु ॥ ३६९ ॥ अंतरखूणेविण । जे धरिती बाह्यचिन्ह । तया अदृष्ट उत्पन्न होय दारुण । परी पिशाचविघ्न या जन्मीं नव्हे ॥ ३७० ॥ जे मेळविती अंतःसंपत्ति । आणि बाह्यचिन्ह न धरिती । तया पुण्याची होय संप्राप्ति । परी या जन्मीं विघ्नें करिती पिशाचासुरादि ॥ ३७१ ॥ फलोन्मुख झालियाविण । अदृष्ट तेजाचे नव्हे दर्शन । साक्षात् पापपुण्य न दिसे ह्मणून । उपनिषद्भाष्यांत आचार्य वदले ॥ ३७२ ॥ एक हत्ति वैष्णव जाहला । तो वेषासीचि वैष्णव मानूं लागला । राजदूत न्यावया आले त्याला । परी तो कांहीं नायके ॥ ३७३ ॥ मग वैष्णव वेष धरून । नेति तया गजाकारण । तेणें मिषेची बळहरण । जाहले गजाचे ॥ ३७४ ॥ एवं भक्तचरित्रीं कथा । तेविचि पिशाचादिका समस्ता । तमोगुणिया अबु-

द्धिमंता । बाह्य चिन्हेंचि भय वाटे ॥ ३७५ ॥ अपवित्र वेष स्पर्शास्पर्श । अज्ञात जाहलिया विशेष । बाह्यचिन्हबळें नाश । होय तयांचा ॥ ३७६ ॥ चिन्हेंचि होय संप्रदायाध्यास । तेणें निवटे असदध्यास । इत्यादि उपपत्ति सुरस । अन्य कुसुमीं बोलिल्या ॥ ३७७ ॥ मालामुद्रा पुंड्रधारण । हे जातकर्मीं संप्रदायबाह्यचिन्ह । तुलसीमाला कंठीं घालोन । रुद्राक्ष जपमाला करावी ॥ ३७८ ॥ किंवा रुद्राक्षमाला धारण करूनि यथारिती । तुलसीमाला ही स्मरणार्थी । परी स्त्रीकारूं नये कुरीति । भलती भलती कल्पित ॥ ३७९ ॥ एक जानवें तोडिती । तुलसीमाला अपेक्षिती । ते बळेंचि वेदाज्ञा मोडिती । तेणें श्रीपति क्षोभतो ॥ ३८० ॥ लाथ मारोनी मायेस । दुग्ध मागिती दासीस । तैसें होय तया मूढास । जे वेदास उल्लंघिती ॥ ३८१ ॥ यज्ञोपवीत ठेवोनी । माला घालतां प्रेमें करोनी । नको ना ह्मणे वेदवाणी । मग उगेंचि कां उल्लंघावें ॥ ३८२ ॥ रुद्राक्षभस्मधारण । येविषयीं आहे उपनिषत् प्रमाण । अपय्यादीक्षित ह्मणोन । तुळसीमाळा निषेधिती ॥ ३८३ ॥ परी तुलसीगोपीचंदनीं । प्रमाण आहे उपनिषद्वाणी । त्या दोन्ही श्रुति घेवोनी । सांगतो येथ ॥ ३८४ ॥

गोपीचंदनसंसक्तमानुषाणां पापसंहरणाच्छुद्धान्तःकरणानां ब्रह्मज्ञानप्राप्तिश्च । गोपीचंदनपंकेन ललाटं यस्तु लेपयेत् । एकदंडी त्रिदंडी वा स वै मोक्षं समश्नुते ॥ १ ॥ देवीन्दधानस्तुलसीं महात्मा विष्णुप्रियां सर्वपापापहंत्रीम् । समस्तपापानि विधूय सद्य परात्परं पदमंते प्रयाति ॥ २ ॥ श्रीमत्तुलस्यास्तुलसीकाष्ठदाम्नि प्राणान् प्रतिष्ठाप्य विधिं विजानन् । तान् धारयेत् सर्वपापापहन्त्यै श्रेयःप्राप्त्यै चापि नारी नरो वा ॥ ४ ॥ यो ह वै तुलसीं कंठ धारयन् जपति ध्यायति पूजयति विष्णुं स परस्य प्रियो भवति, स पुण्यभाग्भवति स मोक्ष भाग्भवति स पापीयानप्यपापीयान् भवति स भ्रूणहाप्यभ्रूणहा भवति स वीरहाप्यवीरहा भवति स स्तेनोऽप्यस्तेनो भवति स सुरापोऽप्यसुरापो भवति स सर्वमहापापतकोऽपि पातकैर्विमुक्तो भवति ।

तुलसी राधासंवत ह्मणोन । नसता द्वेप कल्पोन । तुळसीमाळ अव्हेरून । तृणमाळ घालिती राधावल्लभ ॥ ३८५ ॥ त्यासी वेदशास्त्र

अथवा पुराण । सर्वथाचि नाहीं प्रमाण । नसत्या नाना कल्पना करोन । परंपराच्छेदन करूं नये ॥ ३८६ ॥ यद्यपि धर्म कल्पित । फळदाता होय निश्चित । परी पूर्वीचा असेल अज्ञात । धर्म तेव्हां ॥ ३८७ ॥ पूर्वीचा ज्ञातधर्म असतां । बळेंचि कल्पित अवलंबिता । तरी ते साहस तत्वतां । निरय सर्वथा चुकविना ॥ ३८८ ॥ वेदीं जे नाहीं निषेधिले । नाहीं अपूर्वविधित्वें कथिले । आणि अन्यत्र बोलिले । तरी ते वेदविरोधी नव्हे ॥ ३८९ ॥ ह्मणोनी तयाचे ग्रहण । करिता धर्मचि होय उत्पन्न । यालागीं जेथ वेद मौन । तेथ पुराणतंत्र प्रमाणचि ॥ ३९० ॥ परी याची अतिव्याप्ति । न करावी अनार्य मतावरुती । " न म्लेच्छितव्यं नापभाषितव्यमिति । " महाभाष्यांत श्रुति आहे ह्मणूनी ॥ ३९१ ॥ समस्त म्लेच्छ मत निषेधिले । परी ते म्लेच्छाचे योग्य बोलिले । धर्मी नाहीं विकल्पिले । आर्यांनीं कदा ॥ ३९२ ॥ तंत्राची सामान्यनिषेधक श्रुति । वेदीं न सांपडे निश्चिती । ह्मणोनी सामान्य तंत्राप्रति । निषेध नये ॥ ३९३ ॥ तंत्रांतील विशेष विधि । प्रतिषिद्ध बोलिला वेदीं । यालागीं त्रिशुद्धि । त्यजावा तो ॥ ३९४ ॥ पुराणांतील विशेष सामान्य । दोहोंचाही निषेध ह्मणून । वेदीं न सांपडे यांचि कारण । होती प्रमाण पुराणविधि ॥ ३९५ ॥ पुराणाचे नांव वेदीं आहे । परी विशेष सामान्य निषेध नोहे । ह्मणोनि पुराणविधि प्रमाण आहे । कोण्याही पक्षीं ॥ ३९६ ॥ आतां विशेष आक्षेप पुराणावरीले । ते आगमनिर्णयीं आह्मी निराकरिले । तैसे पुंड्रधारण ऐकिले । पाहिजे पुढती ॥ ३९७ ॥ अदीक्षिते भस्मचंदन । करावें आवडी धारण । गौणदीक्षितेंहि आपण । हाचि विधि करावा ॥ ३९८ ॥ भस्म आणि गोपीचंदन । लालनदीक्षिते करावे धारण । वात्सल्यदीक्षिते पितयान । ऐसेचि धारण करावे ॥ ३९८ ॥ मातृत्वीं वात्सल्यदीक्षित । तो कुंकुम भस्मीं शोभायुक्त । आणि माधुर्यदीक्षित । तोही तैसा ॥ ३९९ ॥ स्त्रियांतें भस्माधिकार । विकल्पें सांगे धर्मशास्त्र । तयाचा उपयोग स्वतंत्र । दीक्षितालागीं ॥ ४०० ॥ संकल्पें दीक्षाभेद कीजे । एवं जातकर्म झालिया सहजे । नामकर्म संस्कार कीजे । तोहा ऐसा ॥ ४०१ ॥ शिष्यातें सन्मुख बैसवोन । तयाची जपपरिक्षा करावी पूर्ण । नाडी आधीं निर-

खून । जप न्यून कीं पूर्ण पहावे ॥४०२ ॥ कर्णासी कर्ण लावूनी । सकार पहावा परिक्षूनी । तो जरी उमटे ऊर्ध्वस्थानीं । तरी जप अधिक समजावें ॥ ४०३ ॥ एकविसहस्र सहाशत । नित्य हंसजप चालत । तो अधिक असलिया सद्गुणयुक्त । शिष्य निश्चित ओळखावा ॥ ४०४ ॥ न्यून होतांक्षणीं । शिष्य समजावा दुर्गणी । न्यून तो काढावा भरोनी । चंद्रांगमहामुद्राभ्यासे ॥ ४०५ ॥ अथवा शिष्याचि त्यजावा । असो शिष्य सांपडलिया बरवा । नामकरणसंस्कार करावा । तयाचा ऐसा ॥४०६॥ डोळे बांधोनी पहवें । आंजुळीं पुष्प देयावे । शिष्याहातीं टाकवावें । देवामस्तकीं ॥ ४०७ ॥ ते जेथ पडेल तद्दासदासी । उपपद कल्पोनी ठेवावे नामासी । येथ हासती ... षी । नास्तिक जन ॥ ४०८ ॥ पुष्प भलतें ठायीं पडे । तरी यांत काय अधिक जोडे । परी नास्तिका हें न कळे फुडे । कीं दैव व्यवहार सर्व सृष्टि ॥ ४०९ ॥ भलते ठायीं पुष्प पडे जेव्हां । यदृच्छा नियामक मानता तेव्हां । नियामक मानावया दैवा । काय तुह्मां दुस्तर ॥ ४१० ॥ यदृच्छा जरी असती । सुख-दुःखाची नियामक होती । तेणेंही पुष्पपतनादिप्राप्ति । सुखदुःखसूचक होईल ॥ ४११ ॥ जे जे कांहीं जेथ घडे । ते भगवन्नियुक्तकर्माविण न जोडे । अकस्मात कांहीं न घडे । निश्चयें करूनी ॥ ४१२ ॥ येऊनिया उत्तम गुढी । पुढें दशा ये दुघडी । याचे कारण आपुली उघडी । दुरा-चारता ॥ ४१३ ॥ सदाचारी जरी राहे । तरी उत्तम गुढी उत्तम होये । चिंतामणिलाभही सुफळ नोहे । खळासी कदा ॥ ४१४ ॥ दारिद्र्यासी भद्रघट लाधला । तो हर्षें तेणें फोडिला । तैसा दुराचारियाचा गेला । उत्तम शकुन तोही वृथा ॥ ४१५ ॥ जयासी गुढींत वाटे हांसा । तो पात्रचि नाहीं धर्मविश्वासा । यदृच्छावादी अ.पैसा । महामूर्ख तो ॥ ४१६ ॥ ईश्वरेच्छा अथवा दैव । जरी सृष्टीचे नियामक सर्व । तरी पुष्प ज्या ठायीं पडे तो ठाव । कां न ह्मणावा देवनियम्य ॥ ४१७ ॥ यदृच्छावादियांचें मत । आह्मी खंडिले ईश्वरनिर्णयांत । असो पुष्पगु-ढीनें यथार्थ । नामसंस्कार करावा ॥ ४१८ ॥ यदृच्छेची स्थितीचि नाहीं । भौतिक स्वभाव प्रत्यक्ष नाहीं । तरी ऐसिया ठायीं ; दैव वा ईश्वरेच्छा प्रमाण ॥ ४१९ ॥ कपटें वारंवार हा विधि करितां । तरी

विपरीत होये तत्वतां । ह्मणोनी निर्विकल्पें सर्वथा । कोणतीही गुढी घेयावी ॥ ४२० ॥ निष्कपट निःसंकल्प मन । सत्य सांगे प्रतिभाज्ञानें-करून । योग आणि न्यायशास्त्र प्रमाण । आहेचि येथ ॥ ४२१ ॥

प्रातिभाद्वा सर्वम् ॥३३॥ ( योगसूत्र--विभूतिपाद )

भाष्यः-प्रातिभं नाम तारकं तद्विवेकजस्य ज्ञानस्य पूर्वरूपं यथोदये प्रभा भास्करस्य । तेन वा सर्वमेव जानाति योगी प्रातिभस्य ज्ञानस्यो-त्पत्ताविति ।

त्रिविध प्रातिभज्ञान । ऊहज अधिकारज आणि स्वभाज पूर्ण । त्यांत योगसूत्राचे प्रातिभज्ञान । ऊहज बोलिले ॥ ४२२ ॥ सध्यान-तर्कोचें योगेंकरून । उमटे जे प्रातिभज्ञान । जे विवेकख्यातिकारण । पूर्वरूप ॥ ४२३ ॥ ते इहजन्मीं सध्यानतर्कप्रयत्नें उपजे । आणि पर-जन्मीं योगजादृष्टें उपजे । तातही बोलिले सहजे । येणेंचि रीति ॥४२४॥

" दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळ-पणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ ४५३ ॥ तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय । तेथ संसरेंवीण जाय । बुद्धि तयाची "॥४९९॥

( ज्ञानेश्वरी अध्याय ६ )

ऐसे हे प्रातिभज्ञान । तेणें सर्वज्ञता होय उत्पन्न । पूर्वकल्पीं तपानुष्ठानेंकरून । जे आधिकारिक या कल्पीं ऋषी ॥ ४२५ ॥ तयासी उपजे जे ज्ञान । आगमोक्त आणि आगमानुक्त धर्मादिदर्शन । ते ह्मणावे आर्षज्ञान । अधिकारज ॥ ४२६ ॥ मन निष्कपट जैसे जैसे । चित्त व्यापक तैसे तैसे । स्वभावेचि अलौकिक विशेषे । कळो जे लागे ॥ ४२७ ॥ ते ह्मणावे स्वभावज प्रातिभज्ञान । योगज अलौकिकसंन्निकर्ष यासी कारण । हे नोहे शब्द ना अनुमान । प्रत्यक्षचि होय ॥ ४२८ ॥ योगजप्रातिभ सांगितलें । आतां अधिकारज आणि स्वभावज राहिले । तै वैशेषिकसूत्रीयप्रशस्तपादभाष्यांत बोलिले । आणि न्यायकंदलींत स्पष्ट केले श्रीधराचार्यांनीं ॥ ४२९ ॥ "संज्ञाकर्म त्वस्माद्विशिष्टानां लिंग"मिति । वैशेषिकसूत्रीं कणादोक्ति । प्रशस्तपादभाष्य संग्रह ह्मणोनी निश्चिती । सूत्रान्वय मात्र ओळखावा ॥ ४३० ॥

" आम्नायविधातॄणां ऋषीणां अतीतानागतवर्तमानेष्वतींद्रियेष्वर्थेषु

धर्मादिषु ग्रंथोपनिबद्धेषु अनुपनिबद्धेषु चात्ममनसोः संयोगात् धर्मविशेषाच्च यत् प्रातिभं यथार्थनिवेदनं ज्ञानमुत्पद्यते तदार्षमित्याचक्षते । तत्तु प्रस्तारेण देवर्षीणां कदाचिदेव लौकिकानां यथा कन्यका ब्रवीति श्वो मे भ्राताऽऽगन्तेति हृदयं मे कथयतीति " । यावरील न्यायकंदली—

आर्षं व्याचष्टे । आम्नायविधातृणामिति । आम्नायो वेदस्तस्य विधातारः कर्तारः ये ऋषयस्तेषामतीतानागतेषु वर्तमानेष्वतींद्रियेषु धर्माधर्मदिक्कालप्रभृतिषु ग्रंथोपनिबद्धेष्वागमप्रतिपादितेषु अनुपनिबद्धेष्वागमाप्रतिपादितेषु चात्ममनसोः संयोगात् प्रातिभं ज्ञानं यथार्थनिवेदनं यथास्वरूपं संशयविपर्ययरहितं ज्ञानमुत्पद्यते तदार्षमित्याचक्षते विद्वांसः । इंद्रियलिंगाद्यभावे यदर्थप्रतिभासं सा प्रतिभा प्रतिभैव प्रातिभमित्युच्यते । तत्र भवद्भिः तस्योत्पत्तिरनुपपन्नेति कारणाभावादित्यनुपयोगे सति इदमुक्तं धर्मविशेषादिति । विशिष्यते इति विशेषो धर्म एव विशेषो धर्मविशेषः । विद्यातपःसमाधिजः प्रकृष्टो धर्मस्तस्मात् प्रतिभोदयः । तत्तु प्रस्तारेण बाहुल्येन देवर्षीणां भवति कदाचिदेव लौकिकानामपि यथा कन्यका ब्रवीति श्वो मे भ्राताऽऽगन्तेति हृदयं मे कथयतीति । न चेदं संशयः उभयकोटिकसंस्पर्शाभावात् । न च विपर्ययः संवादादतः प्रमाणमेव ।

( न्यायकंदली–गुणग्रंथ बुध्याधिकार )

कल्पारंभी मुनीवर असती । वेदद्रष्टे सकल जाणती । आगमोक्त आणि अनुक्तही ओळखती । आर्षज्ञान ते ॥ ४३१ ॥ उभयकोटिक नाहीं ह्मणोनी नव्हे संशय । सत्य ह्मणोनी नोहे विपर्यय । आतां लौकिक जीवासही होय । निष्कपट स्वभावें किंचित् ते ॥ ४३२ ॥ जैसी एकादी कन्या मातेकारण । सांगे उद्या गावाहून । माझा भाऊ येईल हे मन । सांगताहे माझे ॥ ४३३ ॥ तेही ज्ञान नोहे संशय । सत्य होये ह्मणोनी नोहे विपर्यय । जेथ विचारें संकोचित चित्त कन्येचे होय । तेथ मग ते असत्य होतसे ॥ ४३४ ॥ न्यायकंदलीसहित । हा सांगितला प्रशस्तपादभाष्यार्थ । वराहमिहिरबृहत्संहितेंत । ऐसेचि वदले ॥ ४३५ ॥

उन्मत्तानां च या गाथाः शिशूनां भाषितं च यत् ।
स्त्रियो यच्च प्रभाषंते तस्य नास्ति व्यतिक्रमः ॥ ९७ ॥

( बृहत्संहिता अ० ४६ )

शुद्धीवर नसोनी वेडे । क्रमबद्ध बोलती तैसेचि घडे । साक्षिया अवळी इतिहास रोकडे । सांपडती बहु । ॥ ४३६ ॥ बालक बोलती विकाररहित । तेही बहुशा सत्य होत । एकादा अपवाद सांपडे यांत । तरी तो संकोच मतीचा ॥ ४३७ ॥ याच्याचि खटपटीस लागतां । तरी पुष्कळचि सत्य होईल तत्वतां । विश्वास नाहीं तेणें व्यवस्था । करूनि पाहावी ॥ ४३८ ॥ एवं निष्कपट स्त्रियांचे भाषण । तेही सत्य होय निश्चयेंकरून । जेथ व्यतिक्रम भासे तयाचे कारण । वितर्क आहे ॥ ३४९ ॥ यद्यपि ऊहज प्रतिभाज्ञान । योगांत बोलिले पूर्ण । तरी देहा-हून होतां येईल भिन्न । एवढा तो ऊह असावा ॥ ४४० ॥ नाहींतरी मध्यम कुतर्क । दृढ करी देहबुद्धिपर्क । तथापरीस स्वाभाविक । चित्त अलौकिक अधिक दावी ॥ ४४१ ॥ कोणी येथ शंका घेती । तैसे ज्ञान जरी उन्मत्तादिकाप्रति । तरी पापफल दुःखादिप्राप्ति । कैसी तया होतसे ॥४४२॥ तरी सुखदुःखादिकारण । धर्माधर्म आणि सत्वरजोगुण । अत्यंत एका कर्मे उत्पन्न । कोणीही नव्हे ॥ ४४३ ॥ मुंग्या जळातें जाणती । धेनुकीट परस्परचित्त ओळखती । गृध्र दूरचे पाहती । श्वान देखती यमदूत ॥ ४४४ ॥ कावळे प्रेतास निरक्षिती । ते अकृत्रिम होतांचि सर्व जाणती । कृत्रिम तेव्हां तेही विसरती । आपुल्या सिद्धि ॥ ४४५ ॥ सर्प अंगांत येवोनी । भिन्न राहो शके देहाहूनी । तेव्हां या प्राण्यांची क्षुद्रयोनी । चुके काय सांग पा ॥ ४४६ ॥ अचिंत्य मणिमंत्र-औषधिप्रभाव । मुख्य चिंतामणि मन स्वयमेव । ते अकृत्रिम नसतां अपूर्व । गुढी येणें लागे कीं ॥ ४४७ ॥ त्यांतही कृत्रिम प्रयत्न न करितां । गुढी सत्यचि होय सर्वथा । गूढशब्दाच्या अपभ्रष्टार्था । गुढी झाले महाराष्ट्र ॥ ४४८ ॥ गुढी पाहण्याचा प्रकार । सांगती आश्वलायन गृह्यसूत्रकार । कन्या सुगुणी कीं दुर्गुणी हा भावी प्रकार । ओळखावया ॥ ४४९ ॥

दुर्विज्ञेयानि कन्यालक्षणानि ॥ ४ ॥ अष्टौ पिंडान् कृत्वा "ऋतमग्रे प्रथमं जज्ञऋते सत्यं प्रतिष्ठितं यदीयं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत्सत्यं तद्दृश्यतामिति" पिंडानभिमंत्र्य कुमारीं ब्रूयात् एषामेकं गृहाणेति ॥ ५ ॥ क्षेत्राच्चेदुभयतः सस्याद्गृह्णीयादन्नवत्यस्याः प्रजा भविष्यतीति

विद्याद्गोष्ठात्पशुमती वेदिपुरीषात् ब्रह्मवर्चस्विन्यविदासिनी ह्रदात् सर्वसंपन्ना देवनात् कितवी चतुष्पथाद्विप्रव्राजिनी रिणादधन्या श्मशानात्पतिघ्नी ॥ ६ ॥ ( आश्वलायनगृह्यसूत्र अ० १ खंड ५ )

भावार्थः— कन्येचे लक्षणें समजाया कठिण । यासाठीं आठ स्थानांतून । पृथक् शुद्ध मृत्तिका आणोन । तियेचे आठ गोळे भिन्न भिन्न करावे ॥ ४५० ॥

"ऋतमग्रे प्रथमं जज्ञऋते सत्यं प्रतिष्ठितं यदीयं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत्सत्यं तद्दृश्यताम्"

मग ते या मंत्रें मंत्रावे । सत्य दाखवी हा मंत्रभावार्थ स्वभावे । वैदिकमंत्रलिंग बरवे । लिहिलेंचि आहे ॥ ४५१ ॥ मग सांगावें कुमारीकेसी । तुज आवडेल त्या घेई पिंडासी । ती घेईल त्या पिंडावरूनि भावी चरित्रासी । ओळखावें ॥ ४५२ ॥ दोन वेळ धान्य पिके ज्या शेतीं । तेथील मृत्पिंड येतां कन्येच्या हातीं । तरी ती होईल अन्नवती । आणि प्रजासंपन्न ॥ ४५३ ॥ गोठ्यांतील पिंड घेतां । तरी गवादिपशुमती होईल तत्वतां । यज्ञस्थानीय मृत्पिंड घेतां । ब्रह्मतेजस्वीनी होईल ती ॥ ४५४ ॥ सदा पूर्ण डोहांतील मृत्पिंड घेतां । कन्या पावेल संपन्नता । द्यूतस्थानांतील पिंड घेतां । महाकपटी होईल ती ॥ ४५५ ॥ चोहट्यावरील पिंड घेतांक्षणीं । ती समजावी होईल व्यभिचारिणी । नापिक शेतांतील पिंड घेतांक्षणीं । दुर्भाग्या होईल ओळखावें ॥४५६॥ स्मशानस्थ मृत्तिका पिंड घेता । तरी ते विधवा होईल येथ नाहीं अन्यथा । एवं सूत्रकारही या सुंदर अर्था । दाखविती ॥ ४५७ ॥ भोळा तितुका भाग्यवंत । भोळ्यासवें भेटे भगवंत । भोळियासमोर निधानें समस्त । चरणचा निघती हो ॥ ४५८ ॥ सद्गुणी मूर्खासारखा दिसे । हेंचि भोळ्याचें लक्षण असे । अंतःकरणीं कपट नसे । म्हणोनिया ॥ ४५९ ॥ पतीच्या हातीं पिंड देवोनी । परिक्षा पहावी जरू करोनी । परी सूत्रोक्त म्हणोनी । कन्याभविष्य अधिक सत्य ॥ ४६० ॥ लग्न जाहलियाहीवरी । पिंड देवोनी पाहतां निर्धारी । तरी संतपासामान्य म्हणोनी साचारी । किंचित् शुभाशुभ कळेल वाटे ॥ ४६१ ॥ परंतु सूत्रोक्तचि मुख्य आहे । आतां एतत्सदृशाचि लवलाहें । देवापुढें पत्रिका

टाकोनी पाहणें इत्यादि आहे । अप्रमाण नोहे ह्मणोनी ते ॥ ४६२ ॥ दुराचारीयाचे मनोरथ । बळें पिशाच करिती व्यर्थ । जो विश्वास देऊनि दुजिया फसवीत । तया विश्वास देऊनि फसवी गुढी ॥ ४६३ ॥ एकाद्या पुण्यवंतापुढें । डावी गुढीही दुःख न दावी उघडें । अथवा अल्प दुःख घडे । लक्षांत नये ते कोणाच्या ॥ ४६४ ॥ अतिसूक्ष्मविचारें करून । उक्तिसदृश अल्पदुःख जाणोन । ओळखावी खूण । उक्तीचीच ॥ ४६५ ॥ अथवा अतिपुण्यपापी अपवाद जरी । सामान्य सदाचारी-या गुढीचा उत्सर्ग तरी । यालागीं पतितपुष्पें विचारी । नामकरण करिती हो ॥ ४६६ ॥ गुरुदेव नामाचे शीतल अंकन । तें तैंचि करावे धारण । स्मृतिस्मृतींत विरोध ह्मणून । तप्तमुद्रा धरूं नये ॥ ४६७ ॥ तप्तमुद्रा धारणीं । विकल्प आहे ब्राह्मणीं । समुच्चय शुद्रालागुनी । तप्तमुद्रेचा ॥ ४६८ ॥ तथापि नामांकनीं । शीतलाचि उत्तम स्थानीं । अत्यंत पवित्रता एकान्तस्थानीं । तरी तप्तही करावे ॥ ४६९ ॥ येथ आचार्यांचा आक्षेप एक । कीं सकल अंगासी द्यावा अंक । तरी हा वैदिकमतींही निःशंक । समान आक्षेपू ॥ ४७० ॥ उपवीते अंग गुंडाळावे । ह्मणता कोणे काय वदावे । यालागीं वेदीं जे निषेधिले नाहीं बरवे । तेथचि उपजवूं नये कलह वृथा ॥ ४७१ ॥ वृथा कलह उपजवोनी । आपसांतील प्रेम दवडोनी । काय मिळे अधिक या स्थानीं । न कळे माते ॥ ४७२ ॥ हा नामसंस्कार गरुडपुराणीं । बोलिली आहे भगवद्वाणी । तो श्लोक प्रमाणीं । दाखवूनि संशय च्छेदू ॥ ४७३ ॥

गुरुः शिष्यं समभ्यर्च्य नेत्रे बद्धे तु वाससा ।
देवस्य प्रमुखं कृत्वा पुष्पमेवार्पयेत्ततः ॥
पुष्पं निपतितं यत्र मूर्ध्नि देवस्य शार्ङ्गिणः ॥ ११ ॥
तन्नाम कारयेत्तस्य स्त्रीणां नामांकितं स्वयम् ।
शूद्राणां दाससंयुक्तं कारयेत्तु विचक्षणः ॥ १२ ॥

( गरुडपुराण अ० ९ )

देवाचे करूनी पूजन । तैसा शिष्यही सम्यक् पूजोन । मग सन्मुख करून । नारायणाच्या ॥ ४७४ ॥ पुष्पें टाकावी देवमस्तकीं । तेथूनी फूल पडे जेथ कीं । तेचि नाम शिष्यास कीं । ठेवावे आवडीं ॥ ४७५ ॥

तैसे अंकितस्त्रियातें । नाम ठेवावे स्वहस्ते । दासउपपद शूद्राते । ठेवावे नाम ॥ ४७६ ॥ भगवद्दास्य करितां । शूद्रें लाज नाणावी चित्ता । हारितस्मृतीत तत्वतां । द्विजासही भगवद्दासता बोलिली ॥ ४७७ ॥ एवं जन्मपक्षीं अर्थू । गुणकर्मपक्षीं तोचि अर्थू । मंत्रमात्रजपें सद्गुणांतु । प्रवेशीलही तो ॥ ४७८ ॥ माझेकरितां अनन्यभजन । दुराचारीही होय धर्मसंपन्न । ऐसे भगवंताचें वचन । नवमें अध्यायीं गीतेंत ॥ ४७९ ॥ ह्मणोनी लौकिकनामयुक्त । पापियासही दीक्षा नाहीं अनुचित । उलट्या नामें दीक्षित समस्त । वाल्मीकी मुनीस जैसे ॥ ४८० ॥ अध्यात्मरामायणीं ही कथा । एरवी अपापी द्विज वा शुद्र असतां । चांडालही अपापी होता । मंत्र द्यावा पुराणोक्त ॥ ४८१ ॥ तया पुराणोक्तमंत्रजपें करून । विक्षेपवर्ज्य झालिया मन । परीक्षेस उतरलिया शिष्य आपण । मंत्रयोग सांगावा ॥ ४८२ ॥ जातकर्म नामकरण । एवं संस्कार सांगितले दोन । गौणविधींत संपूर्ण । यथाशक्ति करावे ते ॥ ४८३ ॥ स्वाप्नीसुहृत्प्राप्ति वा कृपासुहृत्प्राप्ति । तेथ गौणही होय मुख्य संपत्ति । परी ते अघटित स्थिती । तुकारामासम सदैवांची ॥ ४८४ ॥ एका सांपडला हिरा । ह्मणवोनि तुह्मी कां उपाशी मरा । धरावा राजमार्गचि बरा । प्रायः सोपारा असेल जो ॥ ४८५ ॥ आतां मंत्रसंस्कार तिसरा । तोही ऐकविजे चतुरा । जेणें सहज विधिगोचरा । होय दीक्षा ॥ ४८६ ॥ परी मंत्रसंस्काराचिया आधीं । पहावी पूर्वदेवताशुद्धि । कोणतीही देवता कोणासी सिद्धि । दात्री जरी ॥ ४८७ ॥ तथापि चालिलाचि मार्ग क्रमिता । ठाव शिघ्र पावे तत्वतां । नवा मार्ग बळें धरितां । तरी श्रम वृथा मागिले ॥ ४८८ ॥ तैसें अभ्यासिले जे जे मनें । ते ते न चुके हे आर्यपुत्रबोलणें । "पूर्वाभ्यासेन तेनैव ऱ्हीयते ह्यवशोऽपि सः" इत्यादि वचनें । गीतेमाजीं पहावीं ॥ ४८९ ॥ अहो अभ्यासही नसतां । सुसुधी श्रद्धाचि ठेवितां । तो विश्वासही न जाय वृथा । भगवंत सर्वथा बोलिले आहे ॥ ४९० ॥

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥

जो होवोनि प्रेमश्रद्धायुक्त । जे जे प्रतिक मनीं भावित । तयाची तेचि श्रद्धा यथार्थ । मी भगवंत दृढ करी ॥ ४९१ ॥ ह्मणोनि पूर्वी

अभ्यासिली जी देवता । तीच या जन्मीं उपयोगी तत्वतां । यालागीं पहावी सर्वथा । कैसी ते गा ॥ ४९२ ॥ गुप्तविद्यातंत्राचें वचन । शाक्तानंद तरंगिणींहि प्रमाण । आणि प्राणतोषणींत रामतोषण । हेंचि निरूपण बोलिले ॥ ४९३ ॥

मृतमप्यनुगच्छेत विद्यामंत्रो विशेषत: । मन एव मनुष्यस्य पूर्व-कर्माणि शंसति ॥ यदि न स्यात् महेशानि मनुष्यस्य कथं भवेत् । दीक्षायां च कथं तस्य मनो भवति पार्वति ॥ तस्मात्तु यत्नतो देवि पूर्वं विद्यां समुद्धरेत् । बकुलाश्वत्थवटकं पत्ररत्नं शृणु प्रिये । वटपत्रे महेशानि शक्तिमंत्रं लिखेत् प्रिये । अश्वत्थे वि[ष्णु]मंत्रं च बकुले शिवमंत्रकम् । रक्तचंदनेन देवेशि काश्मीरेण [म]हेश्वरि । शक्तिमंत्रं लिखेत् देवि चंदने विष्णुमंत्रकम् । भस्मना शिवमंत्रं च [लि]लिखेत् परमेश्वरि । सप्तसप्तकपत्रेषु तत्तद्देवताया मंत्रं लिखेदित्यर्थ: । प्राण प्रतिष्ठां तन्मंत्रे कारयेद्यत्नत: सुधी: । तत्तद्देवतायाः प्राण प्रतिष्ठां कारयेदित्यर्थः । यथाशक्त्युपचारेण संपूज्य परमेश्वरि । तत: शिष्योऽर्घ्यपात्रं च हस्ते कृत्वा महेश्वरि । अनेन मनुना मंत्री भास्कराय निवेदयेत् ।

अर्घ्यद्रव्यमाह:––

आप: क्षीरं कुशाग्राणि घृतं दधि तथा मधु । रक्तानि करवीराणि तथैव रक्तचंदनम् । अष्टांग एषोऽर्घ्यो वै भानवे परिकीर्तित: । ॐ भो देव ! पृथिवीपाल ! सर्व शक्तिसमन्वित । ममार्घ्यं च गृहाण त्वं पूर्वविद्यां प्रकाशय । अर्घ्यं दत्वा नमस्कृत्य कृतांजलि पठेत्तत: । गांधर्वे:– न दद्यात् भास्करायार्घ्यं शंखतोयैर्महेश्वरि । ॐ सूर्य: सोमो यम: कालो महाभूतानि पंच वै । एते शुभाशुभस्येहकर्मणो नवसाक्षिणः । सर्वदेवा: शरीरस्था मम मंत्रस्य साक्षिण: । पूर्वजन्मार्जितां विद्यां मम हस्ते प्रदापय । पठित्वेदं महेशानि सत्वरं पत्रमुद्धरेत् । उधृत्य पत्रमेकं तु गुरोर्हस्ते प्रदापयेत् । गुरुस्तु अक्षरश्रेणीमुधृत्य परमेश्वरि । सेतुं दत्वा महेशानि तत्राष्टशतकं जपेत् । शिष्यस्य मस्तके हस्तं दत्वा चाष्टशतं जपेत् ।

(प्राणतोषणी पान २७१ यांत घेतलेला शाक्तानंदतरंगिणीचा उतारा)

भावार्थ– विद्याकामकर्माचा । जो जो अभ्यास केला साचा । मेल्याही तयाचा । संग न सुटे ॥ ४९४ ॥ किरणें धांवती सूर्यापाठीं ।

तैसी विद्या धावे मेलियापाठीं । जिये विद्येची श्रद्धा गोमटी । मनुष्याते ॥ ४९५ ॥ बंधमोक्षाचें कारण । मुख्य आहे एक मन । यालागीं मन-श्रद्धे ओळखून । घेयावी विद्या ॥ ४९६ ॥ ह्मणोनीच कही करणें । दहा-पंच देवाचे भक्त न होणें । एकही श्रद्धा न मिळे तेणें । मग पुढील जन्मीं होय हें ना तें ॥ ४९७ ॥ यद्यपि गणेशादि देवतापूजन । बोलिले बहु विधानें करून । तरी मुख्य देवता स्थान । एकटीच घे ॥ ४९८ ॥ ह्मणोनीच अंगांगीभाव न धरिता । विष्णु शिव वर्जूनि अन्य देवता सम पूजिता । तरी वचनाभावास्तव जन्मांतरी तत्वतां । लाभ न होय ॥ ४९९ ॥ आतां ती विद्या पहावी कैसी । तेही रीति सांगू आपैसी । बकुल अश्वत्थ अथवा वटासी । प्रार्थूनि पानें आणावीं ॥ ५०० ॥ काश्मीररक्तचंदनेंकरून । वटपत्रीं शक्तिमंत्र लिहावा सुयत्न । अश्वत्थपत्रीं श्वेतचंदनेंकरून । विष्णुमंत्र लिहावे ॥ ५०१ ॥ बकुलपत्रीं भस्मयोगें । विरूपाक्षमंत्र लिहावा अंगें । हे शिवें सांगती प्रसंगे । उमेलागीं ॥५०२॥ विष्णु शिव आणि शक्ति । यांचे जे अवतार असती । ते तेचि गणूनी निश्चिती । मंत्र तैसेचि लिहावे ॥ ५०३ ॥ इतर ज्या देवता कांहीं । प्रियद्रव्यें प्रियपात्रावरी लिहाव्या त्याही । वचन सांपडतां तहीं । तैसेचि किजे ॥ ५०४ ॥ सात सात पत्रावरी । मंत्रे लिहावी निर्धारीं । परी शिष्यांनीं दृष्टीभरी । पाहूं नये कृत्य हे ॥ ५०५ ॥ मंत्रीं प्राणप्रतिष्ठा करावी । मंत्रचि देवता ही मेरूक्ति बरवी । "सभूरित्युक्त्वा भुवमसृजत्" या निगमरवि । बोलिले की पृथिवीनाम घेऊनी पृथ्वी सृजिली देवें ॥ ५०६ ॥ पानें उबडी घालावी । नंतर सूर्यपूजा करावी । अर्घ्य देवोनी पूजा करावी । श्रीसूर्याची ॥ ५०७ ॥ पूर्वविद्या प्रकाश करावी ह्मणोन । ऐसा मंत्राचा अर्थ पूर्ण । ध्यानीं आणोनी स्तवन । करावे सूर्याचे ॥ ५०८ ॥ पाणी दुध दही घृत । मधु रक्तकरवीर चंदन रक्त । दर्भांची अग्रे हा सूर्याप्रत । अष्टांग अर्घ्य देयावा ॥ ५०९ ॥ गांधर्व संहितेचे वचन । सूर्यासी अर्घ्य न द्यावा शंखजलेंकरून । भो देव अथवा सूर्य सोम ह्मणोन । अर्घ्य देवोनी नमन करावे ॥ ५१० ॥ वर्णत्रयीं प्रणव-युक्त अर्घ्य द्यावा । शूद्रें अप्रणव ह्मणावा । असो मंत्र जपोनी बरवा । पत्र एक उचलावे ॥ ५११ ॥ ते गुरूचे हस्ती देयावे । गुरूनें वाचुनी

पहावे । आणि मंत्रातें जपावे । अष्टोत्तरशत ॥ ५१२ ॥ शिष्यमस्तकीं हस्त ठेवोन । पुनः अष्टोत्तरशत जपावा आपण । अर्घ्यदानप्रसंगीं नेत्र-बंधन । न करावे शिष्याचे ॥ ५१३ ॥ परी ज्या मंत्रासी सांगितले शोधन । ते मंत्र लिहावे शोधून । सिद्धारिचक्र पाहोन । यथाक्रमें ॥ ५१४ ॥ शोधन सांगितलें नाहीं ज्यासी । तैसेचि लिहावे त्या मंत्रासी । गौणदीक्षेंत प्रक्रिया करितां विशेष । तरी नेत्र बांधोनी स्वयें कीजे ॥ ५१५ ॥ अर्घ्यकाळीं नेत्र सोडावे । नेत्र झांकोनी पत्र उचलावे । नेत्र उघडोनी पुढती वाचावे । गौण दीक्षेंत विधि ऐसा ॥ ५१६ ॥ दक्षिणामूर्तिपुढें ठेवणें । इत्यादि पूर्वी बोलिलेनि मानें । गौणदीक्षेंत ओळखणें । हाचि विधि ॥५१७॥ कोणते मंत्र जन्मांतरीं । उपेगा येती न येती सर्वोपरी । हेही सांगती त्रिपुरारि । मेरूतंत्रीं शिवेते ॥ ५१८ ॥

ईश्वर उवाचः—

न स्वर्गे न च तीर्थेषु नौषधीषु नभेषु च । ऋषयो देवताः संति मंत्रा एव तु देवताः ॥ ५ ॥ साधकानां फलं दातुं तत्तद्रूपं धृतं सुरैः । मुख्यं स्वरूपं तेषां तु मंत्रा एव न चेतरत् ॥ ६ ॥ संस्कृताः सात्विका मंत्राः परत्रेह च शर्मदाः । जन्मांतरे भवेयुश्च बीजरूपा न संशयः ॥७॥ तत्रापि वैदिका मंत्राः सुवर्णाः परिकीर्तिताः । न दुर्गतिमवाप्नोति तेषां संसेवनान्नरः ॥ ८ ॥ द्विजत्वं प्राप्य ये लोके सेवन्ते तांत्रिकान्मनून् । त्यक्त्वा सुवर्णं दुर्बुद्ध्या ग्राम्यवत्तारचारिणः ॥ ९ ॥ ताररूपास्तारकत्वा-न्मनवस्तांत्रिका अपि । फलप्रदा इहामुत्र न सद्बीजा भवांतरे ॥ १० ॥ किंचित् राजससत्वा ये यातनांते पुनस्तु ते । भवंन्ति फलदा यद्वत् वटोदुंबरपिप्पलाः ॥ ११ ॥ तामसाः प्राकृता मंत्राः इह लोके महाफलाः । न परत्र यथा द्राक्षाखर्जूरपनसादयः ॥ १२ ॥ (मेरुतंत्र प्रकाश ४)

भावार्थः—साधकासाठीं साकार । जरी जाहला ईश्वर । तरी तो मुख्य निराकार । आणि प्रणव वाचक तयाचा ॥ ५१९ ॥ तैशा मंत्र-रूपचि देवता असती । नामरूपचि जगत्पती । परी अभय द्यावया साध-काप्रती । प्रगट होती तीव्रसंवेगें ॥ ५२० ॥ कार्य करिती विग्रह धरोन । परी मंत्रस्वरूपें व्यापक पूर्ण । मंत्रही त्रिविध जाण । सात्विक राजस तामस ॥ ५२१ ॥ संस्कृत ते सात्विक मंत्र । किंवा हरीहरवाचकही

सात्विक स्वतंत्र । कामनासाद्गुण्यरहित जे जे मंत्र । ते ते सात्विक• पवित्रचि ॥ ५२२ ॥ वैदिकमंत्र सर्वोपरी । इहपरलोकीं जन्मांतरीं । फल द्यावया द्विजाचे करीं । तत्पर असती सर्वदा ॥ ५२३ ॥ द्विज वैदिक मंत्र सोडुनी । तांत्रिक जपे अनुदिनीं । तो हातीचे कनक टाकोनी । धांव घेतो रजताकडे ॥ ५२४ ॥ यद्यपि तांत्रिक मंत्र । तारक असती पवित्र । तथापि रज:सत्व तंत्र । ब्राह्मणा[illegible] ते ॥ ५२५ ॥ ह्मणोनी यातना भोगिल्यावरी । फल देती हे निधार । तांत्रिक सात्विकमंत्र शूद्राचे करीं । इहपरत्र जन्मांतरीं फलप्रद ॥ ५२[illegible] ॥ परी जे मंत्र पुराणोक्त । तयासी वेद नियमची अनुगत । ह्मणोनी ते समस्त । सात्विकचि शूद्रादिकां ॥ ५२७ ॥ तामस जे प्राकृत मंत्र । ते या लोकीं फळती लौकर । परी परलोक जन्मांतर । साजि[illegible] ते न करिती ॥ ५२८ ॥ गायत्रीसी कांहीं । पूर्वाधिकार पाहणें नाहीं । ब्राह्मणयोनि जाहालिया लवलाही । अधिकार ये तियेचा ॥ ५२९ ॥ तैसे सर्वाधिकारी जे मंत्र असती । ते पूर्व न पाहताही फळती । परी अभ्यासिले कीं नाहीं यासाठीं । पूर्वही पहावे ॥ ५३० ॥ भगवंताचें नांव । जन्मांतरी फळें येथ संशयाभाव । यालागीं वैष्णव आणि शैव । नसतांही पूर्व फळती मंत्र ॥ ५३१ ॥ परी अभ्यासिता वेळ लागे । ह्मणोनी पूर्व पहाणें बरवें अंगें । नाहीं तरी आवडीसंगें । प्रवर्तावे ॥ ५३२ ॥ पूर्व राजस असलिया आवडी सात्विकींच धरावी । आवडी राजस असलिया पूर्वानुसारें सात्विकाची वरावी । सात्विकमंत्रीं प्रीति धरावी । मग निवड करावी देवताविशेषें ॥ ५३३ ॥ शिवपंचाक्षरी आणि कृष्णमंत्रा । अजपा लाविता व्याप्ति सर्वत्रा । दश संस्कारादिपरतंत्रा । नव्हती त्या विद्या ॥ ५३४ ॥ ह्मणोनी त्या अखंड संस्कृत । सदा सात्विक संशयवर्जित । नारायण भजे उमाकान्त । शिव भजे नारायणा ॥ ५३५ ॥ "न सद्बीजा भवांतरे" इत्यादि उक्ति । एतन्मंत्रभिन्नपर निश्चिती । एवं पूर्व देवता ओळखण्याची रीती । अवघी तुजप्रति सांगितली ॥ ५३६ ॥ मंत्र गुप्त ठेवोनि जपावा । तरीच फळतो तो बरवा । येरा ठाऊक तथापि करावा । गुप्तचि तो ॥ ५३७ ॥ भोजन आणि स्त्रीसंग । जाणताहे अवघे जग । तथापि एकान्तीं करिती चांग । शहाणे जन ॥ ५३८ ॥ तैसे गुप्त ते गुप्तचि ठेवावे । तरीच शास्त्रोक्त

फळ पावे । बळेंचि शास्त्र उल्लंघावे । हे अनुचितचि ।। ५३९ ।। शिष्य ह्मणे भगवंता । एवढा मंत्र प्रशंसिता । तरी नाममाहात्म्यीं तत्वतां । नामही सर्वथा प्रशंसिले ।।५४०।। नाम आणि मंत्रांत । भेद मज नाहीं भासत । नाम उघड देयावे समस्त । बोलिले संत दयालु ।। ५४१ ।। श्रीगुरु ह्मणती ऐक वचन । नामासीच क्रियाविशेष संबंधोन । मंत्रत्व ये हे प्रमाण । जाहले आहे ।। ५४२ ।। नामें स्मरण साधे भक्ति । परी आन वाढावया वृत्ति । पाहिजेचि क्रियास्मृति । क्रियाभिव्यक्ति नामासी ।।५४३।। नामें पाप दूर होय । नामें भेटतो यादवराय । तोचि नाम संतु-मुखें होय । तरी तोही मंत्रु ।। ५४४ ।। अद्वैतोपरी नाम घेतां । तरी सहज कृतकृत्यता । परी नामासी क्रिया योजितां । होय लाभ साधकाते ।। ५४५ ।। साधकां नामें स्मरणभक्ति । मंत्रें स्मरणवंदनभक्ति । किंवा स्मरणदास्यभक्ति । स्मरणसख्यभक्ति अथवा ।। ५४६ ।। स्मरणसह अन्य-भक्तीचा । समुच्चय होय साचा । ऐसा ठेवा उमटे वृत्तीचा । मंत्र तो साचा शब्द ह्मणीजे ।। ५४७ ।। थोर ते कामनामंत्र अनेक । ते नामाहूनि गौण सकाळिक । जपावे लागती विशेख । नियम करूनि ।। ५४८ ।। वैष्णव शैव मंत्रासी । नियम आहती विशेषी । परी ते सत्वासी । वाढविती ।।५४९।। अद्वैतोपरी मंत्र जपे । तरी तेथ साम्य सपडपें । ज्ञान झालिया भेदारोपें । करणें काय ।। ५५० ।। एवं नाम आणि मंत्र । लक्षण सांगि-तले स्वतंत्र । आणिक रहस्य मात्र । आहे येथ ।। ५५१ ।। संबंध वा एकीकरण । नाम भगवंतासी पूर्ण । ते गुप्त ठेवणें न व्हावा अभिमान । यास्तव अभिधान मंत्र तया ।। ५५२ ।। एवं मंत्राची उपपत्ति । तुज सांगितली नानारीती । आतां मंत्रही निश्चिती । कवणेपरी तो सांगू ।। ५५३ ।। मज जो आळंदिवरे । मंत्र दिधला निर्धारे । तो सांगावया आज्ञाभंगदरे । कारण नाहीं मज येथ ।। ५५४ ।। मज स्थापणें आहे मधुराद्वैत । यालागीं वेदपुराणोक्त । जे कां मंत्र असती संमत । तेचि सांगू ।। ५५५ ।। आणि आळंदिवरे जे दिधले कांहीं । ते अद्वैता बाहेरचे नाहीं । परी इतरासी नियमावया पाही । हेंचि भले ।। ५५६ ।। सप्रणव द्वादशाक्षरी । जो बोलिला भागवतांतरीं । तो द्विजासी सर्वोपरी । देयावा

मंत्र ॥ ५५७ ॥ तोचि स्त्रीशूद्रासी देणें । तरी स्कंदपुराण जैसें ह्मणे । देयावा तेणें अनुगुणें । तेही ऐक ॥ ५५८ ॥

**पार्वत्युवाचः**—द्वादशाक्षरमाहात्म्यं मम विस्तरतो वद । यथावर्णं तत्फलं च यथा च क्रियते मया ॥ १ ॥ **श्रीमहादेव उवाचः**— द्विजातीनां सहोंकारसहितो द्वादशाक्षरः । स्त्रीशूद्राणां नमस्कारपूर्वकः समुदाहृतः ॥ २ ॥ प्रकृतीनां रामनामसंमतो वा षडक्षरः । सोऽपि प्रणवहीनः स्यात् पुराणस्मृतिनिर्णयः ॥ ३ ॥ क्रमोऽयं स वर्णानां प्रकृतीनां सदैव हि । क्रमेण रहितो यस्तु करोति मनुजो जपम् ॥ ४ ॥ **पार्वत्युवाचः**— मया त्रिमात्रया स्वामिन् सेव्यते जगदीश्वरः । परमस्य कथं जाने वचसामप्यगोचरम् ॥५॥ **ईश्वर उवाचः**—प्रणवस्याधिकारो न तवास्ति वरवर्णिनि । नमो भगवते वासुदेवायेति जपः सदा ॥६॥ **पार्वत्युवाचः**—यदि सप्रणवं दद्यात् द्वादशाक्षराचिंतनम् । प्रणवेनाधिकारो मे कथं भवति धूर्जटे ॥ ७ ॥ **ईश्वर उवाचः**—प्रणवः सर्वदेवानामादिरेष प्रकीर्तितः । ब्रह्मा विष्णुः शिवश्चैव वसंति दयितायुताः ॥ ८ ॥ तत्र सर्वाणि भूतानि सर्वतीर्थानि भागशः । तिष्ठंति सर्वतीर्थानि कैवल्यं ब्रह्म एव यः ॥ ९ ॥ तस्य योग्या तदा देवि भविष्यसि यदा तपः । चातुर्मास्ये हरिप्रीत्यै करिष्यसि शुभानने ॥ १० ॥ तपसा प्राप्यते कामस्तपसा च महत्फलम् । तपसा जायते सर्वं तत्तपः सुलभं नरैः ॥ ११ ॥ यशः सौभाग्यमतुलं क्षमासत्यादयो गुणाः । सुलभं तपसा नित्यं तपश्चर्तुं न शक्यते ॥ १२ ॥ यदाहि तपसो वृद्धिस्तदा भक्तिर्हरौ भवेत् । तदाहि तपसो हानिर्यदा भक्तिर्विना कृतम् ॥ १३ ॥ तावत्तपांसि गर्जंति देहेऽस्मिन्सततं नृणाम् । यदा विष्णुं स्मरेन्नित्यं जिव्हाग्रे पावनं भवेत् ॥ १४ ॥ यथा प्रदीपे ज्वलिते प्रणश्यति महत्तमः । तथा हरेः कथायां च याति पापमनेकधा ॥ १५ ॥ तस्मात्पार्वति यत्नेन हरौ सुप्ते तपः कुरु । चातुर्मास्येऽथ संप्राप्ते प्रणवेन समन्वितम् ॥ १६ ॥ विशुद्धहृदया भूत्वा मंत्रराजमिमं जप । स एव भगवांस्तुष्टो द्वादशाक्षरसंयुतम् ॥ १७ ॥ प्रदास्यति परं ज्ञानं ब्रह्मरूपमखंडितम् । ब्रह्मकल्पांतकोटीषु जप त्वं द्वादशाक्षरम् ॥ १८ ॥ मंत्रराजं सप्रणवं ध्यायेत्सोऽपि न पश्यति । इत्युक्त्वा सा तपोनिष्ठा तपश्चरितुमागता ॥ १९ ॥

( स्कंदपु० नागरखंड अ० २५० )

भावार्थ— उमा ह्मणे भगवंता । द्वादशाक्षरी आवडे संता । तयाचा महिमा कृपावंता । मज समस्त सांगावा ॥ ५५९ ॥ शिव ह्मणे तयाचा महिमा पूर्ण । नये सांगता भगवंताविण । आणि तो तुजकारण । जपताही नये कीं ॥ ५६० ॥ त्वा एकादशाक्षरी जपावा । सप्रणव द्विजासी बोलिला बरवा । प्रथम नमस्कार वदावा । मग संप्रदानान्त भगवत्पद ॥ ५६१ ॥ वासुदेव तया उपरी । सप्रदानान्त करोनि परी । ऐसिया मंत्रोच्चारीं । जपावा [illegible] ॥५६२॥ मूळांत नमो आद्यपद आहे । ह्मणोनी नम आद्य जपता [illegible]हे । परी असच्छूद्रादिकीं स्वये । नमोन्तचि जपावा ॥५६३॥ निषेध आणि [illegible]तिप्रसव । जो विधि स्त्रियासी प्राप्त स्वयमेव । तो शूद्रासही प्राप्त सर्व । ऐसे धर्म[illegible] सांगे ॥५६४॥ षडक्षरी राममंत्र । तोही येणेचिमाने भजावा पवित्र । मग [illegible]उमा [illegible]बोले जोडोनि कर । करुणाकर विनंती ऐका ॥५६५॥ द्वादशाक्षरी ज[illegible]विया कारण । धांव घेत आहे माझे मन । भक्तिआवडी मोक्षाहूनि । तेथ वितर्क चालेना ॥ ५६६ ॥ तरी प्रणवासहित जपावयासी । मज अधिकारता येईल कैसी । शिव ह्मणे भक्तिमंतासी । अवघड नाहीं कांहींच ॥ ५६७ ॥ त्वां चातुर्मास्य तप करावे । तपें साधतसे आघवे । चहुमासाचे तप स्वभावे । सोपेचि आहे ॥ ५६८ ॥ असावे पाळोनी मुनिव्रत । तनुमन असावे शुचिर्भूत । पर्जन्य उष्ण आणि शीत । सहावे सकळ ॥ ५६९ ॥ ऐसे चातुर्मास्य तप करितां । पुढें सप्रणव मंत्र जपावा तत्वतां । हरीचि तयाचिया सम्यगर्था । सांगेल तूंते ॥ ५७० ॥ हा काल प्राप्त होय तोंवरी । जपावा एकादशाक्षरीं । तपें शुद्धि जाहालियावरी । सप्रणव मंत्र जपावा ॥५७१॥ तपें मेलिया चौमासांत । तरी त्याचि वासनेतें होय प्राप्त । मरणभयें जो तप नाहीं करत । तेणें अधिकार कां अपेक्षावा ॥ ५७२ ॥ एवं स्त्रीशूद्रातें विधि । कंठरवें बोलिला त्रिशुद्धि । येथ तपःसाक्षात्कारनिधि । अपेक्षावा दृष्टांतु ॥ ५७३ ॥ तपाविणें नियम मोडितां । तरी कोप येईल भगवंता । मग नरकादि योनी समस्तां । पाववी तो ॥ ५७४ ॥ जो तप करावया बिहे । आणि भगवंतीं ह्मणे भक्ति आहे । तरी तो देहासक्ति लाहे । हे उघडचि झाले ॥ ५७५ ॥ जेव्हां वाढे भगवद्भक्ति । समजावे तेव्हांचि तपाची प्राप्ती । जेव्हां क्षीण श्रीकृष्णभक्ति । तेव्हां तपक्षय सम-

आत्ता ॥ ५७६ ॥ कृष्णनाम नाचे वाणी । तेणें तपासी हर्ष मनीं । नसती तपें धांवोनी । प्रवेशिती तच्छरीरीं ॥ ५७७ ॥ यास्तव निजलिया शेषशयन । तूं चातुर्मास्य तप करी प्रेमेंकरून । चातुर्मास्यमाहात्म्य निरूपण । झालेंचि मागें वैष्णवखंडीं ॥ ५७८ ॥ येथही कालनिर्णयीं बोलिले । असो उमेसी वचन मानले । मग येवोनि स्थल पाहिले । हिमालयीं तपार्थ ॥ ५७९ ॥ स्कंदपुराणीं भागवतीं । मंत्रमहिमा वर्णिला नानारीती । ब्रह्म कोटीकल्प उमेप्रति । जपाया सांगती शिव हा मंत्र ॥ ५८० ॥

पार्वत्युवाचः— ध्यानयोगमहं प्राप्य ज्ञानयोगमवाप्नुयाम् । तथा कुरुष्व देवेश यथाहममरी भवे ॥ १ ॥ ईश्वर उवाचः— प्रत्युक्तोऽयं मंत्रराजो द्वादशाक्षरसंज्ञितः । अव्ययः सुकुमारांगि वेदसारः सनातनः ॥ २ ॥ प्रणवः सर्ववेदाद्यः सर्वब्रह्मांडयाजकः । प्रथमः सर्वकार्येषु सर्वसिद्धिप्रदायकः ॥ ३ ॥ सितवर्णो मधुच्छंदा ऋषिर्ब्रह्मा तु देवता । परमात्मा तु गायत्री नियोगः सर्वकर्मसु ॥ ४ ॥ एतद्ब्रह्ममयं बीजं विश्वमत्र समन्वितम् । वेदवेदांगतत्त्वाख्यं सदसद्रूपमव्ययम् ॥ ५ ॥ नकारः पीतवर्णस्तु जलबीजसनातनः । बीजं पृथ्वी मनश्छंदो विषहा विनियोगतः ॥ ६ ॥ मोकारः पृथिवीबीजो विश्वामित्रसमान्वितः । रक्तवर्णो महातेजा धनदो विनियोजितः ॥ ७ ॥ भकारः पंचवर्णस्तु जलबीजः सनातनः । मरीचिना समायुक्तः पूजितः सर्वभोगदः ॥ ८ ॥ गकारो हेमरक्ताभो भरद्वाजसमन्वितः । वायुबीजो विनियोगं कुर्वतामादिभोगदः ॥ ९ ॥ वकारः कुंदधवलो व्योमबीजो महाबलः । ऋषिमंत्रिपुरस्कृत्य योजितो मोक्षदायकः ॥ १० ॥ तेकारो विद्युद्विकारः सोमबीज महत्स्मृतम् । अंगिरावर्द्धमूलं च वर्जितं कर्मकामिकम् ॥ ११ ॥ वाकारो धूम्रवर्णश्च सूर्यबीजं मनोजवम् । पुलस्त्यर्षिसमायुक्तं नियुक्तं सर्वसौख्यदम् ॥ १२ ॥ सुकारश्चाक्षरो नित्यं जपाकुसुमभास्वरः । मनोबीजं दुर्विषह्यं पुलहाश्रितमर्थिदम् ॥ १३ ॥ देकाराक्षरकं बीजं हंसरूपं च कर्बुरम् । सिद्धिबीजं महासत्वं क्रतौ क्रतुनियोजितम् ॥ १४ ॥ वाकारो निर्मलो नित्यं यजमानस्तु बीजभृत् । प्रचेताश्रियमाश्रेयं मोक्षे मोक्षप्रदायकम् ॥ १५ ॥ यकारस्य महाबीजं पिंगवर्णश्च खेचरी । भूचरी च महासिद्धिः सर्वदा भूविचिंतनम् ॥ १६ ॥ भृगुयंत्रे समाश्रांतिनियोगे सर्वकर्मकृत् । गायत्रीछंद

एतेषां देहन्यासक्रमो भवेत् ॥ १७ ॥ ॐकारं सर्वदा न्यस्यन्नकारं पादयो-र्द्वयोः । मोकारं गुह्यदेशे तु भकारं नाभिपंकजे ॥ १८ ॥ गकारं हृदये-न्यस्य वकारं कंठमध्यगः । तेकारं दक्षिणे हस्ते वाकारो वामहस्तगः ॥१९॥ सुकारं मुखजिव्हायां देकारः कर्णयोर्द्वयोः । वाकारश्चक्षुषोर्द्वंद्वे यकारं मस्तके न्यसेत् ॥ २० ॥ लिंगमुद्रा योनिमुद्रा धेनुमुद्रा तथा त्रयम् । सकलं कृत-मेतद्धि मंत्ररूपे बीजाक्षरम् ॥ २१ ॥ योजयेत्प्रत्यहं देवि न स पापैः प्रलिप्यते । एतद्द्वादशलिंगारं मंत्रस्थं द्वादशाक्षरम् ॥ २२ ॥ शालग्राम-शिलाश्चैव द्वादशैवहि पूजिताः । ताभिः सहाक्षरैरेभिः प्रत्यक्षैः सहसंसुदि ॥ २३ ॥ यथावर्णमनुध्यानैर्मुनिबीजसमन्वितैः । विनियोगेन सहितैश्छं-दोभिः समलंकृतैः ॥ २४ ॥ ध्यानैर्जपैः पूजितैश्च भक्तानां मुनिसत्तम । मोक्षो भवति बंधेभ्यः कर्मजेभ्यो न संशयः ॥ २५ ॥

(स्कंदपुराण नागरखंड अ० २६२)

द्वैत तंव ऋषि मस्तकीं धरून । हृदयीं देव पूजावा करुणाघन । अद्वैतीं ध्यानें विष्णु होवोन । मग तद्वाच्य व्हाया न्यासादिक्रम करावा ॥ ५८१ ॥ ईश्वरत्वाभिमान जीवाप्रति । तो नाशाया करावी भक्ति । हे आगमज्ञान यथानिगुती । रहस्य निश्चिती बोलिले ॥ ५८२ ॥ एरवी मूळश्लोकांचा । अर्थ स्पष्ट आहे साचा । प्रथम सामान्यजपाविण या क्रमाचा । नियमही नाहीं ॥ ५८३ ॥ अभक्तद्विजाही योग न कळवावा । भक्त शूद्र तरी तया द्यावा । हा याचि अध्यायीं श्लोक बरवा । ह्मणोनी येथ अवलंबावा भगवंतु ॥ ५८४ ॥ योगध्याननिर्णयांत । आह्मी सांगूं पैं यथार्थ । जो पंचमसंस्कार येथ । बोलिला आहे ॥ ५८५ ॥ एवं द्वादशा-क्षरी कथिला । काठिण्य वाटे जयाला । तयासी तरी द्यावा भला । आन कृष्णमंत्रु ॥ ५८६ ॥ जो तपाविण सिद्धिदाता । पद्मपुराणीं बोलिला तत्वतां । मजही अत्यंत आवडता । व्रजेश्वरवाचक ह्मणोनी ॥ ५८७ ॥ पद्मपुराणीं पातालखंडांत । एकाशीति अध्यायांत । दोन श्रीकृष्णमंत्र उत्तम यथार्थ । सांगितले आहे ॥ ५८८ ॥

" पर्याया अस्य मंत्रस्य तथा पंचपदीति च । गोपीजनपदं वल्लभान्तं तु चरणानिति ॥ १४ ॥ शरणं च प्रपद्ये चेत्येष पंचपदात्मकः । मंत्र-चिंतामणिः प्रोक्तः षोडशार्णो महामनुः ॥ १५ ॥ नमो गोपीजनेत्युक्त्वा

वल्लभाभ्यां वदेत्ततः । पदद्वयात्मको मंत्रो दशार्णः खलु कथ्यते " ॥ १६॥
( पद्मपुराण पातालखंड अ० ८१ )

मंत्रोद्धारः–गोपीजन वल्लभचरणान् शरणं प्रपद्ये । ऐसी ही पंचपदें । प्रथम मंत्राची विशदें । बोलिली आथी ॥ ५८९ ॥ नमो गोपीजनवल्लभाभ्यामिति । दुसरा मंत्र जपतां प्रीति । विश्वास असो नसो चित्तीं । भगवत्प्राप्ति चुकेना ॥ ५९० ॥ नवल भगवन्नाममहिता । विश्वास उपजे क्रिया करिता । इतर क्रियेसी तत्वता । श्र[illegible] पाहिजे सहायक ॥५९१॥ मुख्य दयालुत्वाचें लक्षण । जपतांही श्रद्धे[illegible] । आपुले दाखवी चरण । कृपानिधान गोविंदु ॥ ५९२ ॥ न मोडावें [illegible] अकर्तेपण । अंगी मोह न यावा म्हणोन । जप लाविला जी[illegible]कारण । [illegible]रवी तारण करुणेनें ॥५९३॥

" एतां पंचपदीं जप्त्वा श्रद्ध[या]ऽश्रद्धयासकृत् । कृष्णप्रियाणां सान्निध्यं गच्छत्येव न संशयः ॥ १७ ॥ न पुरश्चरणप्रेक्षा नास्य न्यायविधिक्रमः । न देशकालनियमो नापिमित्रारिशोधनम् ॥ १८ ॥ सर्वेऽधिकारिणश्चात्र चांडालान्ता मुनीश्वर । स्त्रियः शूद्रादयश्चापि जडमुकाद्यपुंगवाः ॥ १९ ॥ अन्ये हुणाः किराताश्च पुलिंदाः पुक्कसास्तथा । आभीरा यवनाः कंङ्का खशाद्याः पापयोनयः ॥ २० ॥ दंभाहंकारपरमाः पापाः पैशून्यवत्पराः । गोब्राह्मणादिहंतारो महोपपातकान्विताः ॥ २१ ॥ ज्ञानवैराग्यरहिताः श्रवणादिविवर्जिताः । एते चान्ये च सर्वे स्यु मनोरस्याधिकारिणः ॥ २२ ॥ यदि भक्तिर्भवेदेषां कृष्णे सर्वेश्वरेश्वरे । तदाऽधिकारिणः सर्वे नान्यथा मुनिसत्तम ॥ २३ ॥ याज्ञिको ज्ञाननिरतः सर्वतंत्रोपसेवकः । सत्यवादी यतिर्वापि वेदवेदांगपारगः ॥२४॥ ब्रह्मनिष्ठः कुलीनो वा तपस्वी व्रततत्परः । अत्राधिकारी न भवेत्कृष्णभक्तिविवर्जितः ॥ २५ ॥ तस्माद्दराबभक्ताय कृतघ्नाय न मानिने । न च श्रद्धाविहीनाय वक्तव्यं नास्तिकाय च ॥ २६ ॥ नाशुश्रूषुंप्रति ब्रूयान्नासंवत्सरसेविनम् । श्रीकृष्णेऽनन्य भक्ताय दंभलोभाविवर्जिते ॥ २७ ॥ कामक्रोधविमुक्ताय देयमेतत्प्रयत्नतः । ऋषिश्चैवाहमेवास्य गायत्रीछंद उच्यते ॥ २८ ॥ देवता बल्लवीकांतो मंत्रस्य परिकीर्तितः । सप्रियस्य हरेर्दास्ये विनियोग उदाहृतः ॥२९॥ आचक्राद्यैस्तथा मंत्रैः पंचागानि प्रकल्पयेत् । अथवाऽपि स्वबीजेन करांङ्गन्यासकं चरेत् ॥ ३० ॥ मंत्रस्य प्रथमो वर्णो बिंदुना मूर्ध्नि भूषितः ।

गमित्येवं भवेद्बीजं नमः शक्तिरिहोदिता ॥ ३१ ॥ अन्तिमार्णैर्दशांगानि तैरेव च तथार्चनम् । गंधपुष्पादिभिस्तच्च जलैरेवाप्यसंभवे ॥३२॥ न्यासपूर्वं विधानेन कर्तव्यं हरितुष्टये । अत एवास्य मंत्रस्य न्यासाद्यन्ये वदंति च ॥ ३३ ॥ सकृदुच्चारणाच्चैव कृतकृत्यत्वदायिनः । तथापि दशधा नित्यं जपाद्यर्थं प्रविन्यसेत् ॥ ३४ ॥ अथ ध्यानं प्रवक्ष्यामि मंत्रस्यास्य द्विजोत्तम । पीतांबरं घनश्यामं द्विभुजं वनमालिनम् ॥ ३५ ॥ बर्हिबर्हकृतापीडं शशिकोटिनिभाननम् । घूर्णायमाननयनं कर्णिकारावतंसिनम् ॥३६॥ अभितश्चंदनेनाथ मध्ये कुंकुमबिंदुना । रचितं तिलकं भाले बिभ्रतं मंडलाकृतिम् ॥ ३७ ॥ तरुणादित्यसंकाशं कुंडलाभ्यां विराजितम् । घर्मांबुकणिकाराजद्दर्पणाभकपोलकम् ॥ ३८ ॥ प्रियास्यन्यस्तनयनं लीलया चोन्नतभ्रुवम् । अग्रभागन्यस्तमुक्ता विस्फुरत्प्रोच्चनासिकम् ॥ ३९॥ दशनज्योत्स्नया राजत् पक्वबिंबफलाधरम् । केयुरांगदसद्रत्नमुद्रिकाभिर्लसत्करम् ॥ ४० ॥ बिभ्रतं मुरलीं वामे पाणौ पद्मं तथैव च । कांचीदामस्फुरन्मध्यं नुपुराभ्यां लसत्पदम् ॥ ४१ ॥ रतिकेलिरसावेशचपलं चपलेक्षणम् । हसंतं प्रियया सार्धं हासयंतं च तां मुहुः ॥ ४२ ॥ इत्थं कल्पतरोर्मूले रत्नसिंहासनोपरि । वृंदारण्ये स्मरेत्कृष्णं संस्थितं प्रियया सह ॥ ४३ ॥ वामपार्श्वे स्थितां तस्य राधिकां च स्मरेत्ततः । नीलचोलकसंवीतां तप्तहेमसमप्रभाम् ॥ ४४ ॥ पट्टांचलेनाऽवृतार्धसुस्मेराननपंकजाम् । कांतवक्त्रे न्यस्तनेत्रां चकोरीव चलेक्षणाम् ॥ ४५ ॥ अंगुष्ठतर्जनीभ्यां च निजप्रियमुखांबुजे । अर्पयन्ती पूगफलीं पर्णचूर्णसमन्विताम् ॥ ४६ ॥ मुक्ताहारस्फुरच्चारुपीनोन्नतपयोधराम् । क्षीणमध्यां पृथुश्रोणीं किंकिणीजालमंडिताम् ॥ ४७ ॥ रत्नत्राटककेयूरमुद्रावलयधारिणीम् । लसत्कटकमंजिररत्नपादांगुलीयकाम् ॥ ४८ ॥ लावण्यसारमुग्धांगीं सर्वावयवसुंदरीम् । आनंदरससंमग्नां प्रसन्नां नवयौवनाम् ॥ ४९ ॥ सख्यश्च तस्या विप्रेंद्र तत्समानवयोगुणाः । तत्सेवनपरा भाव्याश्चामरव्यजनादिभिः ॥ ५० ॥ अथ तुभ्यं प्रवक्ष्यापि मंत्रार्थं शृणु नारद । बहिरंगैः प्रपंचस्य स्वांशैर्मायादिशक्तिभिः ॥ ५१ ॥ अंतरंगैस्तथा नित्यं विभूतैस्तैश्चिदादिभिः । गोपनादुच्यते गोपी राधिका कृष्णवल्लभा ॥ ५२ ॥ देवी कृष्णमयी प्रोक्ता राधिका परदेवता । सर्वलक्ष्मीस्वरूपा सा कृष्णाल्हादस्वरूपिणी ॥ ५३ ॥ ततः सा प्रोच्यते

विप्र ल्हादिनीति मनीषिभिः । तत्कलाकोटिकोट्यंशा दुर्गाद्यास्त्रिगुणात्मिकाः ॥ ५४ ॥ सा तु साक्षान्महालक्ष्मीः कृष्णो नारायणः प्रभुः । नैतयोर्विद्यते भेदः स्वल्पोऽपि मुनिसत्तम ॥ ५५ ॥ इयं दुर्गा हरी रुद्रः कृष्णः शक्र इयं शची । सावित्रीयं हरिर्ब्रह्मा धूमोर्णासौ यमो हरिः ॥ ५६ ॥ बहुना किं मुनिश्रेष्ठ विना ताभ्यां न किंचन । चिदचिल्लक्षणं सर्वं राधाकृष्णमयं जगत् ॥ ५७ ॥ इत्थं सर्वं तयोरेव विभूतिं विद्धि नारद । न शक्यते मया वक्तुं वर्षकोटिशतैरपि । ५८ ॥ त्रैलोक्ये पृथिवीमान्या जंबुद्वीपं ततो वरम् । तत्रापि भारतं वर्ष तत्रापि मथुरापुरी ॥ ५९ ॥ तत्र वृंदावनं नाम तत्र गोपीकदंबकम् । तत्र राधासखीवर्गस्तत्रापि राधिका वरा ॥ ६० ॥ सान्निध्याधिक्यतस्तस्या ह्याधिक्यं स्याद्यथोत्तरम् । पृथिवीप्रभृतीनां तु नान्यत्किंचिदिहोदितम् ॥ ६१ ॥ सैषाहि राधिका गोपीजनस्तस्याः सखीगणः । तस्याः सखीसमूहस्य वल्लभौ प्राणनायकौ ॥ ६२ ॥ राधाकृष्णौ तयोः पादाः शरणं स्यादिहाश्रयम् । प्रपद्ये गतवानस्मि जीवोऽहं भृशदुःखितः ॥ ६३ ॥ सोहं यः शरणं प्राप्तो मम तस्य यदस्ति च । सर्वं ताभ्यां तदर्थंहि तद्भोग्यं न ह्यहं मम ॥ ६४ ॥ इत्यसौ कथितो विप्र मंत्रस्यार्थः समासतः । युगलार्थस्तथान्यासः प्रपत्तिः शरणागतिः ॥ ६५ ॥ आत्मार्पणमिमे पंच पर्यायास्ते मयोदिताः । अयमेव चिंतनीयो दिवानक्तमतंद्रितैः ॥ ६६ ॥

भावार्थः—ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । स्त्रिया चांडाळ म्लेच्छजाति समग्र । असो नसो भाव जपतां मंत्र । होती पवित्र निःसंशय ॥५९४॥ महेश्वर ऋषी देवता कृष्ण । भगवत्प्राप्तीस्तव विनियोग पूर्ण । संस्कृतांत न्यास ध्यान । कल्पिले आहे ययाचे ॥ ५९५ ॥ वास्तविक या मंत्रासी कांहीं । विधिपुरश्चरणाचा नियम नाहीं । ब्रह्महत्याकारकादि महापापी उपपापीही । मुक्त होती मंत्रोच्चारें ॥ ५९६ ॥ जयांची श्रीकृष्णीं भक्ति । तयासी अधिकार मंत्रीय गति । जयासी नाहीं भगवद्भक्ति । तो सत्कर्मी वेदान्तीही वर्जावा ॥ ५९७ ॥ राधाकृष्णाचें ध्यान । मूळांत बोलिले पूर्ण । ते आवडी स्मरून । मंत्रजप करावा ॥ ५९८ ॥ या मंत्राचे न्यासादिक । सांगती ते तपार्थ देख । भक्त नसलिया उपासक । होवावे तरी कृष्णाचे ॥ ५९९ ॥ एवं हा मंत्र बोलिला । परब्रह्म राधाकृष्ण मंत्रार्थ वहिला ।

तोंहि मूळीं आहे स्थापिला । सुलभ ह्मणोनी ।। ६०० ।। एवं वेदपुराणोक्त । कृष्णमंत्र सांगितला समस्त । आतां सांगू आगमोक्त । जे पवित्र करिती अधिकारिया ।। ६०१ ।। नारायणापासूनी निघाले । शंकरमुखें नारदा मिळाले । ते पंचरात्र ऐसेचि बोले । श्रीकृष्णमंत्र जपावा ।।६०२।।

" सर्वेषु वर्णेषु तथाश्रमेषु नारीषु नानासु यजन्मखेषु ।
दाता फलानामभिवांछितानां द्रागेव गोपालकमंत्र एषः " ।।१३।।

( तृतीयरात्र अध्याय १ )

सकलवर्णाश्रमयुक्ता । स्त्रिया शूद्रादिका समस्ता । शिघ्र मनोवांछित फलदाता । गोपालमंत्र हा ।। ६०३ ।। अनेकतंत्रीं कृष्णमंत्र । अनेक बोलिले असती पवित्र । आवडे तो घ्यावा स्वतंत्र । परी मी येथ सार सांगितले ।। ६०४ ।। एरवी गुरुश्री आज्ञा प्रमाण । सांगतील जे जे वचन । तो तोही मंत्र आपण । श्रद्धालु शिष्यासी होय ।। ६०५ ।। परी ऐसे मंत्र सांगता निर्धारीं । शिष्यसुधारणी गुरूच्या शिरीं । शिष्य पाप करील तरी अधिकारी । गुरुही होय ।। ६०६ ।। म्हणोनी शास्त्रीयचि मंत्र देयावा । तेणें गुरूहि निरहंकार बरवा । अत्यंत पापी असेल तरी सांगावा । पापहारक व्यतिक्रम शब्दु ।। ६०७ ।। कथा अध्यात्मरामायणीं । कां पापीया उपदेश न करावा म्हणोन । ' मरा ' शब्द सांगती मुनि । परी जापक महामुनि वाल्मीकी झाले ।। ६०८ ।।

**गुरुचेनि नावें माती । डोंगरी जयापासी होती । तेणें कोळिये त्रिजगतीं । एकवद केली ।। १७३१ ।।** (ज्ञाने० अ० १८)

ऐसे तातांचें वचन । आणि भारतप्रमाण । म्हणोनी गुरुविश्वासचि कारण । सकलसिद्धीतें ।। ६०९ ।। गुरुसेवेसी कंटाळोनी । एकलव्यकथेचा भरंवसा धरोनी । आपुलिये मंदिरीं बैसती कोणी । त्यासी हे श्रद्धाफळ न मिळे ।। ६१० ।। हातीचे टाकोनी पळते करणें । तैसे हे जाणिजे तयांचे करणें । सिद्धि झालियावरी प्रत्यक्ष द्रोण भेटतां एकलव्यानें । निजांगुष्टदानें तोषविले हो ।। ६११ ।। ह्मणोनी मूर्खांची कथा । सचैल करावे ऐकतां । सद्गुरुचे नाम घेतां । डोंगर जळती दोषांचे ।। ६१२ ।। एवं तृतीय मंत्रसंस्कार । तुज सांगितला समग्र । आतां चतुर्थ पूजासंस्कार । तोही एक ।।६१३।।

इष्टदेवतेचें ध्यान । गुरूपासोनी समजोन । धरोनि ज्ञानाधिष्ठान । समंत्र गुप्तपूजन कीजे ॥ ६१४ ॥ गुरुगम्य गुप्तचि ठेवावें । तरीच मुख्यफळ पावावें । उघड करितां स्वभावें । महापाप ॥ ६१५ ॥ तंव वादी क्षोभला अलतैसा । जेवि रत्नावला हौसा । ह्मणे शिष्य फसवावया सहसा । गुरुवर्गाची युक्ति हे ॥ ६१६ ॥ उघड ग्रंथ वाचोन । जंव होतसे ज्ञान । तरी गुरुगुह्य ह्मणोन । माजावें कां ॥ ६१७ ॥ सिद्धान्ती ह्मणे तुज्ञा कांहीं । जंव विश्वासचि नाहीं । तरी पुसोनी कायी । होईल फळ ॥ ६१८ ॥ तूं आपल्या पत्नीचे अवयव । कां गुप्त ठेविसी सर्व । काय लोकांतें सावयव । ओळखी नाहीं ॥ ६१९ ॥ तेचि तेचि जेविती । परी घरांत कां बैसती । शिष्याची भुलावया प्रीति । गुप्त ठेवणें ह्मटले जरी । ॥ ६२० ॥ तरी काय तुझी हानि । अश्रद्धा होता उघड करोनी । तरी कवणीये प्रमाणीं । होईल फळ ॥ ६२१ ॥ मध्यस्थ ह्मणे श्रद्धा असून । वस्तु कां न मिळे पुस्तकें वाचून । सिद्धान्ती ह्मणे वेदगुह्य उघडतां जाण । भुन्जुब्राह्मण पाप सांगे ॥ ६२२ ॥ देवता स्वयें करिती विघ्न । यालागीं न करावें मर्यादोल्लंघन । ज्याच्या अदृष्टीं विश्वासचि नाहीं पूर्ण । तो मोक्ष त्रिकालाबाध्य मानी केवि ॥ ६२३ ॥ उपाध्यभावावच्छेदानुमानें । मोक्ष त्रिकालाबाध्य मानणें । जैसे सुखदुःखहेतुसाधनें । अदृष्ट कळे ॥६२४॥ एवं सिद्धान्तीचें वचन । ऐकोनि दोघे झाले मौन । परी नाहीं समाधान । अंतःकरण पावले ॥६२५॥ मूर्खतर्कांच्याठायीं । समाधान सर्वथा नाहीं । मग शिष्य कर जोडोनी लवलाही । पुसतु प्रेमें ॥ ६२६ ॥ ह्मणे गुरुवाक्याद्वा शास्त्राद्वेति । ऐशाही असती उक्ति । तेव्हां गुरुगम्य निश्चिती । कवि हा संशय फेडा स्वामी । ६२७ ॥ तेव्हां श्रीगुरु ह्मणती तुज । वादीसंगती संदेहसावज । गिंवसो पाहे तरी तूं सहज । सावध होई ॥ ६२८ ॥ शास्त्र सांगे ह्मणून । मंत्र गुप्त ठेवावयाचें कारण । आणि अनाधिकारी अनर्थ करीत ह्मणून । क्रिया गुप्त ठेवावी ॥ ६२९ ॥ पिशाच्या हातीं कोलते । देता सदन जाळी भलतें । तेवि योगशास्त्र सकामाते । भलते पथें आक्रमी ॥ ६३० ॥ आतां ज्ञानशास्त्र जे आहे । ते वाचोन जरी कळो लाहे । तरी शब्द ज्ञानीका होय । ग्रंथार्थिया ॥ ६३१ ॥ अधिकारे स्पष्टीकरण । द्विविध आणिजे निरसोन । स्वभावरूप

सामान्य । संस्कारविक्षेपें विशेष ॥ ६३२ ॥ तेथ संस्कारविक्षेप नाहीं । आणि सत्वसंस्कार ज्ञानाचे ठायीं । तया सहज शास्त्रेंही । बोध हो शके ॥६३३॥ परी संस्कारविक्षेपे जयासी । अविद्या वाढली विशेषीं । तयांच्या अनंत उपाधीसी । गुरुयुक्तिविण गति नाहीं ॥ ६३४ ॥ पुस्तकें वाचोनी औषध देता । बुद्धीचा उपयोग न करितां । कवणिया भिषग्वर्याचे हाता । लाधले यश ॥ ६३५ ॥ जी शास्त्रें ज्ञान सांगती । तेचि गुरुगुह्यमहत्व प्रतिपादिती । तरी पुस्तकें वाचोनी होईल संवित्ती । हे अहंकृतिमात्र ॥ ६३६ ॥ गुरु आपुले घेईल धन । ऐसे जयाचे भिये मन । तोचि पुस्तके वाचोन । होईल ज्ञान प्रतिपादी ॥ ६३७ ॥ एरवी विरक्ताचे मतें । गुरुसेवे काय वेचते । शास्त्रप्रकारें नीतीय उपाधी असते । सकळांची ऐसे नाहीं ॥ ६३८ ॥ शिष्यार्थ विशेष प्रक्रिया रचिती । तीचि पुढें शास्त्रें होती । मग ती सिद्धान्तप्रामाण्या येती । परी प्रक्रिया गुरुमूर्तिचि रचिती पुनः ॥ ६३९ ॥ ह्मणोनी तियेच्या ठायीं । गुप्तत्व आहे सर्वदाही । आणि निदिध्यासनीं योगग्वाही । गुप्त हे सर्वदाचि झाले ॥ ६४० ॥ योगसूत्रभाष्यवार्तिक । जरी जाहले अनेक । तरी वृत्तीसी भीक । न चुके गुरुघरची ॥ ६४१ ॥ अभ्यासे वृत्तिरोध सूत्र सांगे । उपायविशेष भाष्य सांगे । त्यांतचि उपाय सवेगे । वार्तिक दावी ॥६४२॥ तथापि वृत्तिनिरोधिता । प्रत्यक्ष न कळेचि सर्वथा । येथ उदाहरण घेऊनी तत्वता । एकचि सांगूं ॥ ६४३ ॥ विपर्ययवृत्ति निरोधावी । परी अभ्यासता कैसी पूर्वी । विपर्ययवृत्ति साक्षात्करावी । तरी तो विपर्यय कैसा ॥ ६४४ ॥ अथवा प्रमाणविपर्यय प्रमाणें रोधिला । क्रियाविपर्यय निरोधे रोधिला । प्रमेयविपर्यय विज्ञानें रोधिला । तरी प्रमाणविज्ञानवृत्ति राहे ॥ ६४५ ॥ प्रत्यक्षाग्रही यासी डोळे लावी । ह्मणता हास्य न चुके भावी। तेथ विषयीं निरोधता आघवी । पाहिजे ते नाहीं सूत्रभाष्यीं ॥ ६४६ ॥ एवं एकशतसहस्रकोटी । वृत्तिउपाधी अविवेपोटीं । तितक्याची पाठी । सत्वप्रक्रिया रची ॥ ६४७ ॥ तया प्रक्रियांचे सूत्र । चालविता सद्गुरु ईश्वर । उघड करितां तितुके सूत्र । तरी उपेक्ष्य ज्ञान होय ते ॥ ६४८॥ गीताभागवतादि पुस्तकें । जरी हाता सांपडती निके । तरी धर्मश्रद्धाकाळीं ती सकळीके । गुप्तचि होती ॥ ६४९ ॥ "इदं ते नातपस्काय" इत्यादि

भगवदुक्ति । सांगितल्या अर्जुनाप्रति । आतां जुतीपायी गीता वाचिती । आणि प्रतिपादावे ह्मणती उघड ब्रह्म ।। ६५० ।। सद्गुरुसेवेविण । विद्या मिळविली तपेंकरून । तरी कामवशें तो ब्राह्मण । पावला मरण हे भारतीं कथा ।। ६५१ ।। जयासी योगावस्थे गुरुप्राप्ति । तेथही सद्गुरुनिष्ठाची अन्यस्थिती । ह्मणोनिया संशय चित्तीं । न घेयावा ।। ६५२ ।। आणिक पुस्तकें वाचिता । ज्ञान कळले ह्मणता । परी बुद्धिवेगळिया संचिता । जाणताचि नये ।। ६५३ ।। बुद्धिलक्षण जाणे । विवेक झाला ह्मणे । परी स्वरूपतादात्म्य नेणें । तेणें वागुणाचि वाढे ।। ६५४ ।। सद्गुरुभक्तिविण । सर्वथा न नाशे वाचाऋण । आणिकही एक प्रमाण । आहे येथ ।। ६५५ ।। जो कोणाचे उपकार न मानी चित्तीं । तया चैतन्यद्वेष सर्वाभूतीं । ब्रह्मा शंकर आणि श्रीपति । ना न ह्मणती या गोष्टीते ।।६५६।। ह्मणोनी गुरुगुह्यज्ञान । संप्रदायउपकारा कारण । आणि वेदमर्यादारक्षण । सहज होय ।। ६५७ ।। बुडाले तरी बुडो द्यावे । परी अनधिकारिया न सांगावे । अधिकारीयासाठीं निघे स्वभावे । ईश्वरापासोनी पुढती गुरुमुखें ।। ६५८ ।। ब्रह्मविदे सिद्धानुवाद कीजे । साधककार्य झाले तरी देखीजे । ब्रह्मरूप बद्धासही निरखीजे । परी उपदेश न कीजे अधिकाराविण ।। ६५९ ।। प्रश्नाविण उपदेश करितां । तरी ब्रह्मवेत्यासी विषमता । उद्धट प्रश्नासी उत्तर देता । तरी उपेक्ष्यज्ञानें अभिमान वाढे ।। ६६० ।। सेवापुरःसर प्रश्नासी । उत्तर द्यावे ह्मणता विशेषी । तरी गौण्यत्व आले उपदेशी । कृपाविशेषे ।।६६१।। पत्रादिलेखी दीक्षाग्रहण । तेथ न मिळती हे सद्गुण । ह्मणौनी त्या दीक्षेस गौण । ठेविले नांव ।। ६६२ ।। एवं गुरुगुह्याची उपपत्ती । तुज सांगितली सौम्यमूर्ति । परी पूजासंस्काराआधीं रीति । आणिकही सांगू ।। ६६३ ।। झालियावरी दीक्षा । शिष्यविश्वासानिया परिक्षा । पावलिया महादीक्षा । देईजे तया ।। ६६४ ।। आत्मवेत्तिया सद्गुरुविण । जो महादीक्षा देऊं बैसे आपण । तयासी वर्षे लोटता तीन । दुःख परिपूर्ण तो पावे ।। ६६५ ।। आतां शिष्य आणि सद्गुरुमूर्ति । दोघांची विपरीत स्थिति । परस्पर पुत्रभावप्राप्ति । जाहली येथ ।। ६६६ ।। आत्मवेत्ता गुरु । तो शिष्येंचि निर्मिला स्वप्नाकारु । दृष्टिसृष्टिवादे विचारु । अविद्यानाशा ।। ६६७ ।। तथापि शिष्य अविद्यावृत्ति ।

यालागीं मुख्य कुमारलालनस्थिति । म्हणोनी मातेसमान गुरुवरुती । दृढ विश्वास असावा ॥ ६६८ ॥ सर्पविषही विश्वासेंकरून । जंव होय पियूष-समान । तंव महामायेंत सद्गुरुवचन । सत्य केवि घडेना ॥ ६६९ ॥ विश्वासियाचा कहीं । नाश कोणी देखिला नाहीं । विश्वासें विपरीत-स्वभावही । सुपरीत होय ॥ ६७० ॥ अपशकुनाचे शकुन । विश्वासें झाले हे बृहत्कथेंत कथन । विश्वासेंही जेथ दिसे मरण । तेथ आयते वेळीं विश्वास क्षीण होय म्हणोनी ॥ ६७१ ॥ वेद जंव असतील प्रमाण । तरी मी निश्चयें वांचेन । ऐसें भट्टाचार्यें म्हणोन । बौद्ध-घाटावरून टाकिली उडी ॥ ६७२ ॥ तयाचा फुटला एक डोळा । आकाशवाणी जाहली ते वेळा । कीं वेदीं ईश्वर आहे कीं नाहीं तुजला । संशय आहे म्हणोनी नाशिला नयन ॥ ६७३ ॥ एवं कित्येक धाडसी भिल्लादिक । विश्वासानें बळी होती निःशंक । परी बळी जाता समयींच मूर्ख । कचरती मनीं ॥ ६७४ ॥ मग अर्ध धैर्य अर्ध मान । अर्धविश्वासें पावती मरण । म्हणोनी विश्वासानुभव पाहिल्याविण । सहसा धाडस करूं नये ॥ ६७५ ॥ जया मरणाची नाहीं भीति । तया धाडसाची नाहीं खंती । मग आयतेवेळीं थोडी ढळलियाही मति । द्वितीय जन्मीं फळ पावे ॥ ६७६ ॥ न कचरतां आयतेवेळीं । मरणा आधींच फळ आंजुळीं । म्हणवोनी कवणियेहि वेळी । आनर्थक नोहे विश्वासु ॥६७७॥ जया विश्वासचि नाहीं । ते तंव त्यागिले सर्वांठायीं । आतां अदृढ विश्वासी जो लवलाही । तेणें क्षुद्रानुभवें विश्वास दृढ कीजे ॥ ६७८ ॥ गुरुंडराज्यापूर्वी बहुत । आर्यदेशीं सती होत्या जात । आतांही सामर्थ्यें जाती कचित् । हे वार्ता प्रतीत बहु होय ॥ ६७९ ॥ सती जावया पूर्वी निघता । सरणांतूनि पळो पाहता । तरी बळेंचि मारीत होते तत्वतां । म्हणोनी जळत होती ती ॥ ६८० ॥ परी ज्या साच होत्या सती । त्या तांदुळ शिजविता पायावरुती । अनलस्पर्शे सरणाप्रति । अतिआनंदे स्मरति राम ॥ ६८१ ॥ बळें करोनी करितां सहगमन । तरीही द्वितीय-जन्मीं फळ पावे दारुण । डांगासतीचा इतिहास अवलोकन । करिता कळे ॥ ६८२ ॥ म्लेंच्छासी राज्य देत होता पती । म्हणोनी राणीनें वधविले त्याप्रति । मग सहगमन केले प्रायश्चित्तार्थी । उपभोग कांहीं न

सेविता ॥ ६८३ ॥ ब्राह्मणवचनें द्वियेतें । उत्तम फळ प्राप्त चित्तें । डांगा गांवांत या कथेतें । अवघे जाणती ॥ ६८४ ॥ परी जीवंत असतां पती । व्यभिचार करोनी जाती सती । ऐशा कलियुगांत बहुत युवती । म्हणोनी महानिर्वाणतंत्रीं चितारोहणनिषेध ॥ ६८५ ॥ असो जात गुरुश्रद्धावाटे । निरूपणीं आले आडफाटे । ते दृष्टांतेंसी सज्जन नेटे । उपसाहोत ॥ ६८६ ॥ तंव वादी म्हणे विश्वास ठेविता अति । लेकुरे अग्नीनें जळतां दिसती । हांसोनी म्हणे सिद्धान्ती । महामूढमति अससी तूं ॥ ६८७ ॥ लेकुरें अग्नी धरिती हातीं कीं पतंग दीपीं झेपवती । ते रूपविषय रुचे म्हणोनी धांवती । परी मी न मरेन ही वृत्ति न धरिती मनीं ॥ ६८८ ॥ तीव्र विश्वासाचे मुख्य लक्षण । वस्तुशक्ति अभिभवे एकात्मभावन । तंव मध्यस्थ ह्मणे याकारण । योग कां न म्हणावा ॥ ६८९ ॥ सिद्धान्ती म्हणे म्हणत पाही । कोण म्हणे हा योग नाहीं । योग म्हणजे कांहीं । बागुल नव्हे ॥ ६९० ॥ जन्म देता आपुली माय । जो बाळाचा विश्वास होय । तोचि विश्वास मिळवावया उपाय । दत्तकपुत्रासी करणे पडती ॥ ६९१ ॥ अहो सहज विश्वास जो औरसा पोटीं । तो मिळवावया योग लागे दत्तकापाठीं । जो स्त्रीचे ठायीं सहज विश्वास हा माझा पति । तो उपपतीस म्हणावया पती योग करणें लागे ॥ ६९२ ॥ नुसत्या ब्राह्मणाच्या वचनेंकरून । वीतहव्य क्षत्रिय झाला ब्राह्मण । विश्वामित्रा मुळींचा ब्रह्मसंस्कारही असून । ब्राह्मण्य मिळवावे लागले तपें ॥ ६९३ ॥ रायाच्या वचनें होय प्रधान । एकादा स्वपराक्रमें होय प्रधान । परी पहिल्यापरीस मी प्रधान हा अभिमान । काळेंकरून दुसरिया उपजे ॥ ६९४ ॥ जीवासी विषयीं योग सहजगती । परी अभ्यास करावा लागे परमार्थी । एकाएकीं न पालटे मती । म्हणोनिया ॥ ६९५ ॥ वचनासरिसी जयाची वृत्ति । आत्मा होय तया न लागे योग रिती । म्हणोनी हृदयाचार्य ज्ञानेश्वरींत ह्मणती । कीं सद्गुरु योगेविण दाविती कैवल्य डोळा ॥ ६९६ ॥

**"नातरी हे चित्त । मनबुद्धि सहित । माझ्याठायीं अचुंबीत । न शकसी देवों ॥ १०४ ॥ तरी गा ऐसे करीं । यया आठा पाहारामाझारीं । मोटके निमिषभरीं । देत जाई" ॥ १०५ ॥** (ज्ञानं० अ० १२)

याही ओवियांचा अर्थू । कीं अर्धविश्वासियासी योगप्रांतु । प्राणायामादिके श्रांतु । तयासी कीजे ॥ ६९७ ॥ जो पशु गृहीं नये आपण । तयाचे नाकींचि पडे वेसन । जो धांवे चपळ रानोरान । गळा लोढणें तयाचे ॥ ६९८ ॥ तैसें अभ्यासवैराग्यादि सकळ । अर्धविश्वासिया घालिती गळ । अविश्वासी अथवा संशयी केवळ । तो तंव निखळ त्यजावा ॥ ६९९ ॥ संशयीस द्विकोटिक ज्ञान । अल्पविश्वासिया एककोटिकज्ञान । परि विश्वास नाहीं इतकाचि जाण । दोष तयामाजीं ॥ ७०० ॥ संशयी आणि अविश्वासी । हे तंव त्यागावे निश्चयेसी । तिसरा मानविश्वासी । तोहीवेगें त्यजावा ॥ ७०१ ॥ शुद्धविश्वास नाहीं अंतरीं । परी लौकिकासाठीं मात्र करी । तयासी थोडे टोचूनी पाहतां निधारी । कळो ये विश्वास तयाचा ॥ ७०२ ॥ आतां अशांत विश्वासी जो चवथा । तोही त्यागावा सर्वथा । जयाच्या विश्वासाची कथा । परावलंबी ॥ ७०३ ॥ आपणासी अनुभव आला जरी । आणि परासी अनुभव न येता निर्धारी । अनुमान करूनी भलतेपरी । विश्वास त्यजी ॥ ७०४ ॥ तयाच्या विश्वासाची परिक्षा । येणेचि रीती पहावी प्रत्यक्षा । एका अनुभव दाखवुनी उपेक्षा । दाखवावी अन्याची तया ॥ ७०५ ॥ पांचवा विश्वासघातकी पूर्ण । तो वरी वरी उत्तम दिसे शुद्धविश्वासियाहून । न कळतीया निंदका संगतीन । तयाची परिक्षा करावी ॥ ७०६ ॥ सकळांत मुख्य परीक्षारीती । दहराकाशांत सद्गुरुप्रति । पुसूनिया यथानिगुती । शिष्यनिर्णय कीजे ॥ ७०७ ॥ परी सर्वदा श्रम द्यावे । हे तो भक्ता न भावें । ह्मणोनी पूर्वोक्त करावे । लागती उपाय ॥ ७०८ ॥ "गुरु गुंगा गुरु बावला गुरु देवनका देव"। एवं साधु ह्मणती स्वयमेव । परी येथ रहस्य ठेव । एक आहे ॥ ७०९ ॥ लुच्चा लफंगा अज्ञानी । दगड अधार्मिक पापखाणी । ऐसियाही गुरूच्या चरणीं । तीव्र विश्वास ठेविता जगत्फळ मिळे ॥ ७१० ॥ जगद्रूपमायेचे मुख्य लक्षण । भावनानुसारे होणें विचक्षण । म्हणोनी आर्य बौद्ध मुसलमान । प्रसंगीं चमत्कार समान दाखविती ॥ ७११ ॥ परी अध्यात्मविद्या नोहे तैसी । तेथ बोधकपटुता होवावी विशेषी । बोधकपटुता मिळता निश्चयेसी । मग अविश्वासीं हेतु नाहीं ॥ ७१२ ॥ इतर-

सिद्धि तंव स्वविश्वासे । कोठूनही मिळती हे दिसे । मग अध्यात्मवेत्तिया जवळी ते नसे । ऐसिया अविश्वासे मरिजे कां ।। ७१३ ।। जेणें आधींच ठेविला विश्वास तीव्र । तयास फळती आज्ञासिद्धमंत्र । स्वप्नसिद्धही समग्र । तयाचिसाठीं ।। ७१४ ।। आज्ञासिद्ध स्वप्नसिद्ध मंत्रातें । सिद्धारिचक्र न लगती म्हणती समस्ते । जो अर्धविश्वासी तयाते । चक्र पाहोनी मंत्र द्यावा ।। ७१५ ।। आतां मंत्र निर्माणरीति । तेही सांगू तुजप्रति । परी हे अदीक्षीतीं । उघड करिता न नाशू ।। ७१६ ।। पुल्लिंग स्त्रीलिंग नपुंसक । शब्द पाहोनिया सम्यक् । नाम योजावे सुरेख । आदिशब्दीं ।।७१७।। इंदुसंस्कारेंकरून । नामैकदेशा बीजोद्भावन । गं गणपतये नम इत्यादि प्रमाण । धरूनिया कीजे ।। ७१८ ।। बीज नाम आणि लिंगांत । सुसिद्ध देयावे साधकाप्रत । शास्त्रीय मंत्र असलिया अनिर्मित । तरी सुसिद्ध होय ते नामकरण कीजे ।। ७१९ ।। स्वनिर्मित मंत्र असेल जरी । नामकरण न करिता देयावा सुसिद्ध तरी । मंत्रगत प्रार्थना शब्द परी । विशेष चक्रीं न विचारिजे ।। ७२० ।। नाम देवतेसी आवडे । ते तंव पथ्य रोकडे । आणि अपथ्य जे नावडे । तत्सदृशही ।। ७२१ ।। घडेल देवतेचा अपमान । ऐसे जे स्वभोगपदार्थ जाण । तेही अपथ्य समजोन । त्यागावे कीरु ।। ७२२ ।। स्वनिर्मित मंत्रासी । पथ्यापथ्य एवढीच सरसी । ज्याचा मंत्र त्या शिष्यासी । भिन्न भिन्न असे ते ।।७२३।। जाति वर्ण प्राण । तत्व ग्रहदशा नक्षत्र पूर्ण । ताडणादि संस्कारकरण । करितां निर्माण लक्षावे शब्दगत ।। ७२४ ।। संस्कृताबरोबरी भलतिया भाषेचा । मंत्र येता साचा । सार्थ अथवा अनर्थाचा । दोष नाहीं तयातें ।। ७२५ ।। विश्वासे अमंत्रही मंत्र घडे । तरी मंत्र निर्माण कां करिता पुढें । सिद्धान्ती ह्मणे हे जरी घडे । तरी विघ्न येती ।। ७२६ ।। तेचि मंत्रें कार्य होय निर्विघ्न । यासी देतो उदाहरण । कीं आघातादि दुःख दूर होय कांहीं काळ करितां सहन । परी उपायानें लौकर हारपे ।।७२७।। असो शास्त्रीय मंत्र जे होती । तया शास्त्रीय पथ्यापथ्य निश्चिती । स्वनिर्मित मंत्र जे होती । तया स्वनिर्मित पथ्यापथ्य ।। ७२८ ।। आपण करोनी देवता प्रसन्न । तियेसी ठेवावी शपथ घालोन । दुसरियासाठीं मंत्र निर्माण । परोपकारें कीजे ।। ७२९ ।। परी हा नियम अगृहस्थासी ।

जो मुख्य नाथसंप्रदायी त्यासी । ह्मणौनी गृहस्थे या निर्मितीसी । ह्मटोचि नये ॥ ७३० ॥ भक्तींत नाम मंत्रकल्प । तेथ पथ्यापथ्य असे अल्प । आणि सात्विक संकल्प । पथ्य सदा ॥ ७३१ ॥ अनाचार अपथ्य पूर्ण । घडलिया प्रायश्चित्त नामेंचि परम । परी सिद्धिमंत्राकारण । पथ्यापथ्य अवश्य दृढ ॥ ७३२ ॥ सिद्धिमंत्रांत पुरुषदेवता । आणि मंत्र अन्यलिंगीं असतां । तरी स्वामीभाव अथवा पिता । संबंधी कीजे ॥ ७३३ ॥ स्त्रीसी माधूर्यसंबंधही घडे । स्त्रीदेवता अन्यालिंगमंत्रीं मातृसंबंध जोडे । समदेवतालिंग मंत्रीं पडे । सदा स्वामीसंबंधु ॥ ७३४ ॥ परी सिद्धिपुढें तुच्छ सकळ । ह्मणोनी पथ्यापथ्य पाळणें प्रबळ । वात्सल्य अथवा स्त्रीत्वादिसंबंध केवळ । सिद्ध्यर्थचि घडती ह्मणोनी पाळणें पथ्यापथ्य ॥ ७३५ ॥ शास्त्रसिद्ध जे भाव । बुद्धिरुद्ध निर्मू नये मंत्रठेव । जैसी गिरजा सांडुनी शिव । जापकस्त्री होईल हा मंत्र निर्मू नये ॥ ७३६ ॥ शास्त्रीं ज्या देवता परपुरुष भोगिती । तैसे भाव मंत्री तदर्थी । निर्मिता प्रायश्चित्ते सुटे सहजगति । नातरि निर्माण करतिया महानरकू ॥ ७३७ ॥ शास्त्रीय लिंगभेदेंकरून । वशीकरणादि मंत्र करावें निर्माण । गुरुआज्ञा वा तपेंकरून । अलिंगमंत्रही निर्मावे ॥ ७३८ ॥ आज्ञारहित निर्मित मंत्रीं कुटादि वर्ज्यावे । आज्ञादत्त निर्मित मंत्रीं आज्ञासमचि करावे । मनोमुद्रेनें पडताळोनी धरावे । तीव्र संवेगे ॥ ७३९ ॥ एवं हे नियम निर्मिताप्रति । शास्त्रीया शास्त्रीयचि नियम होती । तंव सच्छिष्य कर जोडोनी विनंति । सद्गुरुप्रति करिता होय ॥ ७४० ॥ शास्त्रीय मंत्र असलियावरी । कां पडावे निर्मितिच्याभरी । तेव्हां सद्गुरु ह्मणती मधुरोत्तरीं । बापा ही कुसुरी नाथसंप्रदायींच ॥ ७४१ ॥ कित्येक शास्त्रीय मंत्र युगपरत्वें फळती । कित्येक शास्त्रीय मंत्रा शाप निगुति । कित्येक शास्त्रीय मंत्र सुप्रसिद्ध असूनही उमापति । न जावे दुष्टाहाती ह्मणोनी खिटाळी ॥ ७४२ ॥ युगपरत्वें असती ते सुसिद्धही निरूपयोगी । तेथ इतरा कोण ह्मणे उपयोगी । शाप जया मंत्रासी देती योगी । तयासी शापमोचन करणें लागे ॥ ७४३ ॥ वसिष्ठादिशाप गायत्र्यादि मंत्रातें । तन्मोचन ठाऊक तयास फळती ते । जरी भक्तीनें देती चित्तशुद्धीतें । तरी सिद्ध्यर्थे शापमोचन पाहिजे ॥ ७४४ ॥ आणि शापमोचन

करिता । अंगीं कालानुसार पाहिजे भाषितपथ्यव्यवस्था । आतां खिळाटिले जे मंत्र तत्वता । तयासी उत्कीलन पाहिजे ॥७४५॥ उत्कीलन नसता । सुसिद्धहि जाती वृथा । सप्त कोटि महामंत्रांची अवस्था । ऐसिचि जाहली आहे ॥ ७४६ ॥ गीतादि मालामंत्र जाण । परी ते परलोकमोक्षप्रधान । सिद्धि मिळे कालेंकरून । तयालागी ॥ ७४७॥ ह्मणौनी सिद्धीसाठीं । नाथपंथीं सोडुनी शास्त्रघरटी । मंत्रनिर्माण कक्षपुटीं । दाखविली हे ॥७४८॥ नागार्जुनादि सिद्धपंथांत । यंत्रिकमंत्रशुद्धिकरणचि दिसत । परी निर्माणशक्ति तंव यथार्थ । नाथसंप्रदायींतचि आहे ॥७४९॥ यद्यपि गृहस्थासी अन्य देवता । प्रसादे मंत्र येथे निर्मिता । परी पंचायतन स्वाम्यादिप्रसादे मंत्र निर्मिवा । दोष गृहस्थाही घडेना ॥ ७५० ॥ अलिंग मंत्रारंभीं शपथ । स्वगुरुनामें शक्तिपात । वाणि देवता हृदयस्थ । स्वगुरु भक्तिवृत्ति यथार्थ । गुर्वादि पूज्य शपथ मंत्र स्फूर्ति ॥ ७५१ ॥ हे अस्त्रमंत्र कराड । तयाची निर्माणरीति गूढ । परी येथ पथ्यापथ्य दृढ । अति पाहिजे ॥ ७५२ ॥ चुकलिया साधकाचे मरण । आतां सांगूं मुद्रा निर्माण । देवता अपमान न होय ऐसे ससाहित्य देवताचिन्ह । शरीरावयव संक्रमण बोलिजे मुद्रा ॥ ७५३ ॥ असलिया ऐहिक कामासक्ति । उपचार करावे जे देवा आवडती । अथवा भावनान्वयें पदार्थी । उपचार भाविजे ॥ ७५४ ॥ भावनान्वये बाह्य उपचार करून । मग करावे मानस पूजन । मंत्र जो केला निर्माण । तो जरी नियमें फळेना ॥७५५॥ तरी शास्त्राधारें दशविध संस्कार । करूनी चेतवावा मंत्र । परी उत्कीलन प्रकार । निर्मित मंत्रीं लागेना ॥ ७५६ ॥ अक्षर लक्ष चतुर्गुण । जप नियमाचा विशेषें करून । आद्यन्त सुसिद्ध असलिया जाण । स्मरणचि नियमावें ॥ ७५७ ॥ मंत्र घेवोनि शिष्य उन्मत्त । होतां तो मंत्र शापावा त्वरित । मंत्र शापावया स्वनिर्मित । अधिकार आहे निर्माणकर्त्या ॥ ७५८ ॥ वातास्त्र इंद्रें चोरिता । नाथें शापिले तत्वता । कीं नाथपंथीं फळ न होता । तरीच अस्त्र फळेल हे ॥ ७५९ ॥ गोरक्षनाथें शिष्य कारण । उन्मत्त पाहतां स्वनिर्मित मंत्र शापिले संपूर्ण । कीं माझी मंत्रकळा जे करतील धारण । ते पावतील पतन महानरकीं ॥ ७६० ॥ अध्यात्म यथार्थ शिष्याप्रति । वळवीत असतां तृतीय नाथमूर्ति । मंत्र

सिद्धीनें फुगोनी निश्चिती । शिष्य प्राण घ्यावया धांवती नाथावरी ॥ ७६१ ॥ तेव्हां शापिले स्वनिर्मित मंत्रा । मत्स्येंद्र संहितादौ हे कथा पवित्रा । अर्वाचीन भक्तितत्वामृतीहीं कथा । बोलिली आहे ॥ ७६२ ॥ ह्मणाल सिद्धीचे काय कारण । उगेचि कां करावे मंत्र निर्माण । तरी प्रतिरोधाया कलिवर्धक जन । पाहिजे ते ॥ ७६३ ॥ स्वसंप्रदायोच्छेद-कासी । शमवाया पाहिजे ते विशेषी । वादी ह्मणे तरी तुह्मी लोकासी । कां देत नाहीं तावितादि ॥ ७६४ ॥ तेव्हां ह्मणे सिद्धान्ती । तावितादि दिधले जयाप्रति । ते भिन्नात्रि पथ्यापथ्य न पाळिती । मग होती अवगुणी ॥ ७६५ ॥ संप्रदायविद्येची निंदा होणें । तयापरीस बरवे तावितादि न देणें । कावळियाचे अमर करणें । कासयासाठीं ॥७६६॥ मजमाजीं आहे मंत्र निर्माण शक्ति । आणि ती लिहिली आहे इये ग्रंथीं । उपयोग पडेल तै दीक्षितीं ; इये रीतीं निर्मीजे मंत्रा ॥ ७६७ ॥ वादी ह्मणे गुरुविश्वास । एवढा मान्य जरी तुह्मास । तरी कां त्यागिले पूर्व गुरूस । सांगावे ते ॥ ७६८ ॥ सिद्धान्ती म्हणे मी विश्वास धरितो । तरी गुरुकथित आगमोक्त फळ पावतो । परी असार जाणोनी विटलो होतो । फळाते तया ॥ ७६९ ॥ ह्मणोनी सोडिला मानभाव । दुजियाही उपदेशिला दत्तदेव । परी जन्मांतरीहूनि गोपिकाधव । आवडता माझा ॥ ७७० ॥ तेणें बळें ओढितां मन । माझा शिथिल झाला प्रयत्न । परी मज वाटे त्या विधानें करून । मंत्रही नव्हता घेतला कीं ॥ ७७१ ॥ अथवा लौकिक विधानेही न घेतला । ऐसा जाणोनीच बारा वर्षे सोडिला । परी गुरुभाव नाहीं निंदिला । मनांतूनी ॥ ७७२ ॥ पुढें तिहींच येवोनी भले । कृष्णमंत्र जपावा ऐसे बोलिले । परी यापूर्वीच अंगिकारिले । होते ताताही मज ॥ ७७३ ॥ तातांनीं सविधान मंत्र दिधला । परी म्यांचि होवोनि चतुराक्षरी याचिला । तथापि कृष्णमंत्र आवडी मनाला । सोडीचि ना ॥ ७७४ ॥ ह्मणोनी नित्य हृदयीं घोंटाळा । दाह तापवी कपाळा । तथापि निश्चय हाचि या वेळा । उचित दावितील तातचि ॥ ७७५ ॥ फळ मिळो वा न मिळो कांहीं । परी तातपद त्यागणें नाहीं । आवडो कृष्णपायावरीही । ठेवोनिया ॥ ७७६ ॥ येथें अथवा पुढें । मार्ग उजळेल मी जाणे फुडे । उचितानुचित रोकडे । तातास ठावे

॥ ७७७ ॥ परी ऊहबुद्धिसिद्धिस्फूर्ति । या तातादत्तमंत्रापूर्वी नव्हती या हातीं । प्रार्थना करोनी लोकाप्रति । ग्रंथ वाचाया लावीत होतो ॥७७८॥ असो हे उगे निज चरित्र । निर्मावे मंत्र महामंत्र । भक्तीनें स्तोत्र मालामंत्र । तेही निर्मिजे ॥ ७७९ ॥ परी बीज मंत्र निर्माण । न करावे आग्नेय जन्माविण । गोमुखी जन्मोनि बीज मंत्रनिर्माण । गौण ह्मणती ॥७८०॥ अथवा तीव्र विश्वासे सद्गुरुदीक्षा । जन्म घडता बीज मंत्र निर्मावे पडलिया अपेक्षा । साधकविघ्ना लावावः दीक्षा । दीक्षामंत्र निर्मावे ॥७८१॥ जगद्गुरु अवतारनामें संप्रदायवर्धन । [illegible]ा ईश्वरासम त्याहोन । चालावे ह्मणोनी सिद्धमंत्र निर्माण । करणें हें प्रयोजन मुख्य ॥ ७८२ ॥ अधिकारियार्थ प्रणव ठेवावा । इतरार्थ [illegible] ठेवावा । निर्मित मंत्रींही ओळखावा । भाव ऐसा ॥ ७८३ ॥ महाविद्या क्षूद्रविद्या । आणि देव साबरी भूतविद्या । कैशा निर्माव्या हे आद्या । प्रक्रिया येथ सांगितली ॥७८४॥ नाममंत्रीं महाविद्या । बंधनमंत्रीं क्षूद्रविद्या । कराडमंत्रीं साबरी विद्या । बोलिली आहे ॥ ७८५ ॥ कराडमंत्रीं प्रार्थना पदे । देव साबरी बोलिजे सिद्धे । आणि कराडमंत्रीं रोधन पदें । भूतसाबरी बोलिली ॥७८६॥ भूत साबरींत पथ्यापथ्य । निचासी सांगावे भूतासी आवडे न आवडे तथ्य । भूतसाबरींत पथ्यापथ्य । शुद्धासी तेजचि आहे ॥ ७८७ ॥ इतर मंत्रीं जाण । पथ्यापथ्य सर्वासी उपर्युक्त समान । भक्तीमार्जी मंत्रग्रहण । भगवन्नाम अथवा शास्त्रोक्त ॥ ७८८ ॥ नामशास्त्र चहुयुगीं प्रमाण । निष्कामा प्रेमचि मूळ कारण । शापमोचन उत्कीलन । नलगे तया ॥ ७८९ ॥ "न सापडे शास्त्रीं पुराणीं पाहता । तैसी या अनंता ठेवूं नावे"। इत्यादि तुकाराम बोलिले स्वभावे । ह्मणोनी शास्त्रोक्त असताही प्रेमवशें निर्मावे । नाममंत्र घडती ॥ ७९० ॥ स्वनामाक्षराहूनि मंत्राक्षरांत । प्रथम द्वितीय स्थानीं सिद्ध साध्य ह्मणीजेते । तृतीय चतुर्थस्थानीं सुसिद्ध रिपूतें । ओळखावे ॥ ७९१ ॥ येणेंचि क्रमें पंचम षष्ठादि समस्त । स्थानें ओळखावी परी सुसिद्धाहि होय प्रथमहि अक्षरगत । इतर संस्कार मंत्रशास्त्रीं पहावे समस्त । किंवा प्रसंगें येतील याही ग्रंथीं ॥ ७९२ ॥ आतां स्पर्शादि प्रकारी । महादीक्षा कवणे परी । जयाची दृढश्रद्धा सद्गुरुवरी । तदर्थ सांगू ॥ ७९३ ॥ (अपूर्ण)

र्थ
।।
प
ये

